निवेदन

नाशिक शहराच्या जडणघडणीमध्ये भूतपूर्व नाशिक
नगरपालिकेचे योगदान बहुमोल असेआहे.
नाशिक नगरपालिकेची स्थापना दि. १ मे १८६४ रोजी
झाल्यापासून सुमारे १०० वर्षांच्या वाटचालीमधील
ठळक घडामोडी, अर्थसंकल्प, नागरी सुविधा व व्यवस्थापन
यांची माहिती देणारे प्रभावी साधन म्हणून
.जीवनगंगा. या पुस्तकाचा उल्लेख करावा लागेल.
सदर पुस्तकाचे संपादन मा.वि.वा.
तथा तात्यासाहेब शिरवाडकर यांनी केलेलेआहे.
सदर पुस्तक सध्या दुर्मिळ असून काही प्रती
मान्यवर संस्था व नागरीकांकडे जरी उपलब्ध असल्या
तरी या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात नवीन पिढीला
नगरपालिकेच्या इतिहासाची थोडीफार माहिती व्हावी या अपेक्षेने
या पुस्तकचे सी.डी. मध्ये रूपांतर करण्यात आले आहे.
त्याकामी मे. सिर्डॅक यांचे बहुमोल सहाकार्य लाभलेआहे.

आपले विनीत,
गुरूमितसिंग बग्गा
मोहन रानडे
प्रशांत मगर



नासिक नगरपालिका व शहर यांची
गेल्या शंभर वर्षांची वाटचाल.

जीवनगंगा

१८६४
ते १९६४

संपादक

श्री. वि. वा. शिरवाडकर

(कुसुमाग्रज)

- सहाय्यक

श्री. द. मा. [illegible]

श्री. गोपाळ बेलगांवकर

सजावट

पंडित [illegible]

- छायाचित्रे

सुरेंद्र कुलकर्णी

[illegible]

[illegible]

- [illegible]

[illegible]

- मुद्रक

[illegible] प्रेस

[illegible] प्रेस

[illegible] प्रेस

[illegible] प्रेस

- प्रकाशक

[illegible]

अध्यक्ष

[illegible]

- [illegible]

— प्रस्तावना —

सुमारें तीन वर्षांपूर्वी, तेव्हांचे नगराध्यक्ष श्री. शांतारामबापू वावरे यांनीं नाशिक नगरपालिकेच्या शताब्दि संस्मरण ग्रंथाची कल्पना मला सांगितली आणि त्याचे संपादन मी करावें असें सुचविलें. श्री. वावरे यांचे आणि माझे संबंध स्नेहाचे असल्यामुळें, स्वतःच्या या विषयासंबंधील गतीविषयी साशंक असूनहि मला नाहीं म्हणणें अवघड होतें. शिवाय नगरपालिकेचा उत्सव म्हणजे सर्व नागरिकांना उत्सव असल्यानें, आपल्याला त्यासाठी कांहीं करता आल्यास करावें असेंहि वाटलें. त्या भावनेने मी संपादनाचें काम स्वीकारलें आणि नगरपालिकेच्या इतिहासाबरोबर नाशिक शहराच्या सांस्कृतिक प्रगतीचा गेल्या शंभर वर्षांचा स्थूल आराखडा या पुस्तकांत देतां आल्यास तें अधिक उपयुक्त व संदर्भाच्या दृष्टीनें महत्वाचे होईल असें सुचविलें. श्री. शांतारामबापू वावरे यांनी ही योजना लगबगीनं आनंदानें मान्य केली आणि त्यासाठीं आवश्यक ती तरतूद उपलब्ध करून दिली. पुढें नेहमीप्रमाणें कांहीं अडचणी आल्या आणि ग्रंथाचें काम काही काळ रेंगाळलें. मध्यावधीं श्री. हरीभाऊ शेलार हे नगराध्यक्ष आले. श्री. वावरे व श्री. शेलार हे तरुण, उत्साही आणि पक्षाचे कार्यकर्ते आहेत. शांताराम बापूंनी सुरू केलेल्या कार्याचें सूत्र त्यांच्या हातीं आलें आणि काम पूर्ण झाल्याशिवाय स्वस्थ बसायचें नाहीं ही त्यांची वृत्ति असल्यानें, मलाहि नंतर स्वस्थ राहायला सवड मिळाली नाहीं. त्यानंतर चालू वर्षी, शहरांतील एक निष्ठावंत आणि नावाजलेले समाजसेवक श्री. नित्तनराव दसरे हे अध्यक्ष आणि श्री. भालेराव हे उपाध्यक्ष आहेत या दोघांच्या नेतृत्वाखालीं शतसांवत्सरिक उत्सवाची योजना सिद्ध होत आहे. आज हा ग्रंथ पुरा होत आहे. हे काम सर्वांकडे सोपविणाऱ्या आणि नंतर तें माझ्याकडून हरप्रकारें सहाय्य देऊन करवून घेणाऱ्या या तिन्ही नगराध्यक्षांचे आणि उपाध्यक्षांचे मी मनःपूर्वक आभार मानतो.

प्रस्तुत संपादनाचें कार्य सुलभ आणि सोयीचे झालें याचें श्रेय प्रा. श्री. द. ना. सद्‌गुणे आणि श्री. गोपाळ वेलणकर या माझ्या सहकारी संपादकांकडे आहे. श्री. सद्‌गुणे यांनीं जुनी दप्तरें अभ्यासून नगरपालिकेचा इतिहास तयार करण्याची अवघड जबाबदारी घेतली आणि वेलणकर यांनीं संपादन मुद्रणाच्या सर्वच बाबतींत मनापासून सहाय्य केलें.

नाशिकमधील प्रसिद्ध चित्रकार श्री पंडित गोसावी यांजकडे सजावटीचे कार्य सोपविलें होतें ते त्यांनी अत्यंत दक्षतेनें पार पाडलें. ग्रंथाच्या सर्व बाह्यसौंदर्याचें श्रेय त्यांचेंच आहे. पुस्तकाच्या प्रकाशन, मुद्रणाचीं अनेक कामें तडीला लावण्यासाठी नगरपालिकेंतील एक अधिकारी श्री. ना. कृ. काळे यांनीं अपार परिश्रम घेतले. त्यांची आणि त्यांचे सहकारी श्री प्रभाकर गुप्ते, श्री. मधुकर भोरे व श्री. हंसराज परदेशी यांची मदत मिळाली नसती तर हें काम वेळेवर होणें कठीण झालें असतें. पुस्तकांतील विविध विषयांवर अभ्यासपूर्ण आणि मार्गदर्शनात्मक लेख लिहिणाऱ्या लेखकांनी तर माझ्यावर फारच अनुग्रह केला आहे. प्रा. दातार, श्री. अकोलकर, श्री. सानपुरे, प्रा. देशपांडे, प्रि. गोसावी, श्री. वामनराव पुरोहित, श्री. पानसे, डॉ. गोगटे या सर्वांनी हें काम आपल्या शहराचें आहे अशा भावनेनें स्वीकारलें आणि समर्थपणानें पुरें केलें.

या सर्व मित्रांचा आणि मुद्रणाचें काम आपलेपणानें केल्याबद्दल विज्ञान व गावकरी या छापखान्याचाहि मी फार आभारी आहे.

नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक उत्सवासाठी भारताचे संरक्षणमंत्री मा. श्री. यशवंतराव चव्हाण हे येत आहेत हा मोठाच सुयोग होय. या ग्रंथाचें प्रकाशन त्यांच्याच हस्तें होणार आहे. मराठी मातीची अस्मिता भारताच्या सरहद्दीपर्यंत पोचविणाऱ्या या थोर लोकनेत्याचे हात या प्रकाशनास लाभत आहेत हें महत् भाग्य होय. मा. श्री. यशवंतराव चव्हाण हे भारताचे आहेत, महाराष्ट्राचे आहेत, तसे सध्या नाशिकचेहि आहेत. लोकसभेच्या निवडणुकीच्या निमित्तानें कृष्णा गोदावरीचा अपूर्व संगम झाला आहे. या पुरातन नदीच्या तीरावर विसावणाऱ्या "जीवनगंगे"शी जडलेलें त्यांचें नातें या प्रसंगानें दृढावत आहे याचा सर्व नागरिकांना अतिशय आनंद वाटत आहे.

या पुस्तकाची अखेरची छपाई चालू असतां, भारताच्या किंबहुना जगाच्या इतिहासांतील एक अत्यंत दुःखदायक घटना घडून आली. आधुनिक भारताचे शिल्पकार आणि जागतिक राजकारणांत शांततेचा आणि सुजनतेचा निर्भय पुरस्कार करणारे युगपुरुष श्री. जवाहरलाल नेहरू हे अकस्मात् निधन पावले. संताचें हृदय, कवीची दृष्टि आणि तत्त्ववेत्त्याची बुद्धिमत्ता असलेल्या त्या थोर युगनेत्याच्या पावन स्मृतीला, एक नम्र श्रद्धांजलि म्हणून हा ग्रंथ मी नगरपालिकेच्या वतीनें अर्पण करीत आहे,

— वि. वा. शिरवाडकर

पत्र सं. (६) ६४ द्रि. New Delhi 2.

दि. १४ मे १९६४

शके १८८६

प्रिय महोदय,

आपका पत्र दिनांक १० अप्रैल. १९६४ प्राप्त हुआ। प्रधान मंत्रीजी नाशिक नगरपालिकाके शताब्दि महोत्सवके अवसर पर अपनी शुभ कामनाएं भेजते हैं।

भवदीय

प्राणनाथ साही

प्रधान मंत्रीजीके निजी सचिव



कै. जवाहरलाल नेहरू : भारताचे लाडके दिवंगत पंतप्रधान. आता त्यांची स्मृति हीच आम्हांला स्फूर्ति !

गांवकरी प्रेस

दिनांक अप्रैल १६, १९६४
चैत्र २७, १८८६ (शक)

प्रिय महोदय,

आपके दिनांक १० अप्रैल, १९६४ के पत्र से राष्ट्रपति जी को यह जानकर प्रसन्नता हुई कि नासिक नगरपालिका अपना १०० वा वर्ष पूर्ण कर रही है और इस उपलक्ष्य में एक संस्मरण ग्रंथ के प्रकाशन का भी आयोजन किया जा रहा है।

उक्त आयोजन की सफलता के लिये राष्ट्रपति जी अपनी शुभकामनायें भेजते हैं।

भवदीय,

सही – **व. जे. मोर**

अवर सचिव

मंत्री

इमारत व दळणवळण आणि शिक्षण

महाराष्ट्र.

सचिवालय, मुंबई — ३२

दिनांक २८ एप्रिल १९६४

नासिक नगरपालिकेच्या शताब्दीच्या शुभप्रसंगी आपण 'नासिक नगरपालिका संस्मरण ग्रंथ' प्रकाशित करण्याचे ठरविले आहे ही गोष्ट औचित्यपूर्ण अशीच आहे. या ग्रंथामुळे नासिक शहरातील लोकांच्या जीवनाचा विकास घडविणाऱ्या महत्वाच्या संस्थेचा इतिहास उपलब्ध होऊ शकेल. नगरपालिकेचा इतिहास हा एका अर्थाने नागरजीवनाच्या प्रगतीचा आरसाच होय. त्याचे मनोज्ञ दर्शन आपणास या संस्मरण ग्रंथात घडून येईल अशी अपेक्षा वाटते.

स्थानिक स्वराज्य संस्था या लोकशाही शासनाच्या आधारशिला आहेत. लोकशाहीचा विकास या संस्थांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असतो. महाराष्ट्र राज्यातील एका नगरपालिकेचे शंभर वर्षांचे कार्य इतर संस्थांनाही उद्बोधक ठरू शकेल. आपल्या या उपक्रमास मी सुयश चिंतितो.

आपला

सही— म. ध. चौधरी

दि. २३-४-१९६४.

श्री. हरिश्चंद्र तात्याबा शेलार,

अध्यक्ष, नासिक नगरपालिका, नासिक.

यासी,

स. न. वि. वि.

आपले क्र. ६७, शताब्दी. दिनांक १०-४-१९६४ चे पत्र मिळाले. आभारी आहे.

नासिक नगरपालिकेस स्थापन होऊन मे १९६४ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत आहेत हे वाचून फार आनंद वाटला.

नगरपालिकेच्या सदस्यांना जे अधिकार आहेत ते महानगरपालिकेच्या सदस्यांना नाहीत. ते मिळविण्यासाठी आज आम्ही प्रयत्न करीत आहोत. सुदैवाने आपल्या नगरपालिकेच्या सदस्यांना हे हक्क असल्यामुळे आपण आपल्या पाठीमागील कारभाराप्रमाणेच भविष्यकाळातही आरतीत जास्त लोकाभिमुख व नागरिकहितपर कारभार करून लौकिकास पात्र व्हाल अशी अपेक्षा आहे. आपले शहर हे एक ऐतिहासिक व पवित्र ठिकाण आहे. आपल्या शहराची याही बाबतीतील पूर्वपरंपरा आपण कायम राखाल अशी आशा आहे.

समारंभास माझ्या शुभकामना. समारंभ यशस्वीपणे पार पडो अशी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. कळावे.

आपला,
मही स. मु. किराड
महापौर पुणे.

जीवन-रंग

Dr. B. P. Divgi
M. B. B. S.

Corporation Hall,
1601 of 21-4-64 Bombay.

I am glad to know that the Nasik Borough Municipality is celebrating its centenary in the month of may and to commemmorate the same, is bringing out a Souvenir.

The important duty of the Municipality – big or small – is to make availoale all civic amenities for the benefit of its citizens and the Nasik Borough Municipality is striving hard to see that its citizens are satisfied with the amenities it is providing to them.

On this happy occasion, as the Mayor of Bombay and on behalf of the citizens of this premier City in India, I send my greetings and good wishes to the Members of Nasik Borough Municipality and the citizens of Nasik and wish the Nasik Municipality greater success in the years ahead

Sd/- X. X. X.
(B. P. Divgi)
Mayor of Bombay

दिनांक २४-४-१९६४.

नासिक नगरपालिकेच्या येत्या १०१ व्या वर्षगाठीच्या शुभ निमित्ताने नियोजित संस्मरण ग्रंथ प्रकाशनाचे प्रसंगी नगरपालिकेस व नासिक शहराच्या रहिवाश्यास मी हार्दिक साभिनंदन शुभेच्छा पाठवितो. प्रजातंत्र स्वराज्य चालविण्याची कार्यक्षमता भारतात अशाच पुरातन संस्थांनी पोसलेली आहे. आज जे शहर करील ते उद्या खेडेगाडे. म्हणूनच नगरपालिका ग्रामीण विभागाचे आदर्शस्थानी असतात. नासिक शहराचा महिमा अर्थात केवळ यावरच अवलंबून नाही. त्रिंबक, पंचवटी, पवित्र गोदावरी नदीचा उगम, तीर्थस्थान वगैरे अनेक धार्मिक व सांप्रत अनेक नैसर्गिक विशेषांमुळे नासिकचा टापू अत्यंत महत्वाचा आहे. अशा टापूचे धुरिणत्व नासिक नगरपालिकेच्या नियंत्रणाखाली नासिक निरंतर व ओजस्वी व प्रभावी रीतीने करीत जावो हीच देवाजवळ प्रार्थना.

आपला,

सही– चिं. द्वा. देशमुख

सौर वैशाख ७-१८८६
दिनांक २७ एप्रिल १९६४

" नासिक शहरी मी शहरवासीयास असे सूचित केले होते की, नासिक हेच एक महाराष्ट्रातले अखिल भारतीय तीर्थक्षेत्र आहे. आणि त्याचा पुरावा तीर्थोपाध्यायांच्या वह्यात मिळतो. कुंभमेळ्याचे वेळी नासिकच्या अखिल भारतीय स्वरूपाचे दर्शन होते. अशा या शहरी काम करणारी नगरपालिका नासिक शहराचे अखिल भारतीय महत्व ओळखून सर्व प्रकारचे उपाय योजील तर नासिकचे महत्व आजच्यापेक्षाही पुष्कळ पटीने वाढेल. पुणे शहरास ज्याप्रमाणे हवामानाची अनुकूलता आहे तशीच ती नासिक शहरालाही लाभलेली आहे. त्यामुळेच भारत सरकारचेही नाशकावर प्रेम आहे. कोणी मनापासून कामास असेल आणि व्यापक दृष्टीने विचार करून नासिकचे महत्व वाढविण्याची योजना आखील आणि नासिकचे नागरिक एकमनाने त्या यशस्वी करतील तर नासिकचे नाव सर्वत्र दुमदुमेल. एकेकाळी नासिक द्राक्षाकरिता प्रसिद्ध होते. महाराष्ट्रात पुन्हा द्राक्षयुग सुरू होत आहे. अशावेळी नासिकने मागे पडू नये. नासिकचे ऐतिहासिक महत्वहि अपरंपार आहे. त्या सर्वांचा योग्य अभिमान धरून नासिककरांनी झटावे अशी माझी विनंती आहे. "

आपला,
सही- दत्तो वामन पोतदार

दिनांक २६-४-१९६४

श्री. हरिश्चंद्र तात्याबा शेलार

अध्यक्ष, नासिक नगरपालिका, नासिक.

सप्रेम नमस्कार,

आपले कृपापत्र मिळाले. नासिक नगरपालिकेस स्थापन होऊन १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त आपण आयोजित करीत असलेला समारंभ उत्तम होणारच. गेले १०० वर्षात नासिक नगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात, कारभारात, कार्यकर्त्यात व कर्मचाऱ्यात कितीतरी स्थित्यंतरे झाली असतील. नासिक नगरवासीयांना संस्मरण ग्रंथ रूपाने संकलित झालेली ही माहिती निःसंशय मनोरंजक व उद्बोधक होईल.

महानगरपालिकेच्या उंबरठ्यावर उभी असलेल्या नासिक नगरपालिकेचा शंभर वर्षांचा इतिहास आगामी महानगरपालिकेच्या कार्यक्षमतेत भर घालण्यास जरूर उपयोगी पडेल असे मला वाटते. लोकप्रतिनिधी व नासिकवासीयांना या निमित्ताने भावी काळचा संकल्पही सोडता येईल. परमेश्वर त्यांना तसे सामर्थ्य देवो हीच प्रार्थना.

अगत्यपूर्वक निमंत्रण पाठविल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

आपला,

सही– **रा. का. म्हाळगी**

दिनांक २०—४—१९६४

श्री. शेलार,

अध्यक्ष, नासिक नगरपालिका, नासिक.

स. न. वि. वि.

नासिकच्या नगरपालिकेस मे १९६४ मध्ये शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. हे पाहून अत्यंत आनंद वाटला. स्थानिक स्वराज्य संस्था लोकशाहीची आद्य व्यासपीठे आहेत. नगरपालिकासारख्या स्थानिक स्वराज्य संस्थांची संवत्सरी आपण साजरी करीत आहात. जनमानसात लोकशाही शासन व्यवस्थेची धारणा किती खोलवर रुजली आहे याचेच हे द्योतक आहे. माझ्या मते लोकशाहीवरील अभंग निष्ठेचा हा अविष्कार आहे. नाशिक नगरपालिकेचा भविष्यकाल उज्वल आणि प्रखर कार्य निमग्न होवो अशी इच्छा याप्रसंगी व्यक्त करतांना मला अभिमान वाटतो.

नासिक नगरपालिकेच्या संवत्सरीच्या मंगल प्रसंगास आणि तत्प्रीत्यर्थ प्रकाशित होणाऱ्या संस्मरण ग्रंथास माझ्या हार्दिक शुभेच्छा मी व्यक्त करतो. कळावे.

आपला,

सही— वि. पा. पाटील

(विनायकराव पाटील)

Vice – chancellor
University of Bombay.
22nd December, 1964.

Dear Shri. Wazare,

I am happy to hear that the Municipal Borough of Nasik is celebrating its centenary on the 15th & 16th January under the Presidentship of our respected Defence Minister Shri. Yeshwantraoji Chavan. I wish the function all success.

Yours sincerely,
Sd. /- R. V. Sathe,
Vice - Chancellor
University of Bombay.

Shri N. T. Wazare,
President,
Municipal Borough,
Nasik.

Raj Bhavan
Bhopal
27th December 1964.

MESSAGE.

I am glad to learn that the centenary celebrations of the Nasik Municipal Borough will be held on the 16th & 17th January 1965 and that Shri. Y. B. Chavan, Union Minister for Defence, will inaugurate the same.

I wish all success to the centenary celebrations.

Sd/- H. V. Pataskar,
GOVERNOR
Madhya Pradesh.

Government of Maharashtra
Raj Bhavan,
Bombay.
23rd December, 1964.

Nasik occupies an important place in our history and culture. The town has seen many vicissitudes but has always succeeded in keeping its unique character as a pilgrim centre. I am happy that the Nasik Municipal Borough is celebrating its centenary in January 1965. I send my best wishes on this auspicious occasion and I pray that it will soon progress in such a way that it will become a model municipal administration.

Sd. /- P. V. Cherian

Minister for Irrigation, Power,
Buldings & Communications,
Sachivaloya Bombay - 32.
24th December, 1964.

I am happy to know that the Municipal Borough Nasik has completed 100 years of its civic service to the people and that the centenary celebrations is being held on the 16th January, 1965. It is in the fitness of things that Shri. Yeshwantrao Chavan, Union Minister for defence, has been requested to inaugurate the celebrations on 16th and 17th January, 1965.

With the rapid urbanisation, the Municipalities have to shoulder greater responsibility in providing civic amenities to the ever growing urban population. The Nasik Munic pal Borough has a very good record of service and is a progressive Municipal Borough in the state. Nasik city which is a great centre of pilgrimage attracts a large number of pilgrims from all over India and has additional responsibility of catering to the needs of the pilgrims who visit Nasik. I have no doubt that the members of the Municipal Borough will put in their best efforts to see that the municipal administration is run on more efficient lines, so that the people of the area can get the distinction of having a very efficient municipal administration.

I send my good wishes for the success of the centenary celebrations and also of the centenary volume that is being brought out on the occasion.

Sd. /- S. B. Chavan

Prime Minister's Secretariat

9/3/64 Pms.

New Delhi-11, the 22nd December 1964.
1st. Pause 1886 (Saka).

Dear sir,

Please refer to your letter No. GB/WS-105 dated December 16, 1964. The Prime Minister sends his good wishes on the occasion of the centenary celebrations on January 16, 1965 of the Municipal Borough Nasik.

Yours faithfully,
Sd. - P. N. Sahi,
Private Secretary
to the Prime Minister.

The President,
Municipal Borough,
Nasik.

No. F. 9 (3) -G/64.

Secretary to the President of India,
Rashtrapati Bhavan,
New Delhi. - 4.
December 22. 1964.
Pausa 1, 1886.

Dear Shri. Wazare,

The President is glad to know that the Centenary of the Municipal Borough, Nasik, will be celebrated in January, 1965. He sends his congratulations on the occasion and best wishes for the future.

Yours sincerely,
Sd./- K. R. Damle,

Shri. N. T. Wazare,
President,
Municipal Borough,
Nasik

No. V P. (II) 7040
Vice President, India,
New Delhi.
December 21, 1964.

Dear sir,

Thank you for your letter of the 16th inst.

I send my best wishes for the success of the Centenary celebrations of the Municipal Borough, Nasik.

Yours faithfully,
Sd. /- Zakir Hussain

The President,
Municipal Borough,
Nasik.

Minister for Food and Civil Supplies.
Housing, Printing Presses, Fisheries,
Small Savings and Tourism,
Government of Maharashtra,
Sachivalaya, Bombay 32 (INDIA).
22nd December 1964

-: MESSAGE :-

Civics, untramelled by politics can be the soul of satisfaction for the people. Make that your Centenary resolve

Sd. - Homi J. H. Taleyarkhan
Minister for Food and Civil Supplies,
Housing, Printing Presses Fisheries
Small Savings & Tourism,
Sachivalaya, Bombay. (India).

B. S. Surve.
Mayor of Nagpur
Dated Dec. 30, 1964.

My dear Shri. Wazare,

I am happy to know that the Nasik Municipal Borough has completed 100 years of its civic service and that you are going to celebrate its centenary from the 16th proximo.

Centenary Celebrations are a matter of pride for a civic institution. The Nasik Municipal Borough is one of the premier and oldest civic bodies of the Countay with a long record of efficient service to its tax payers.

I wish the Centenary Celebrations all success:

Yours Sincerely,
Sd. /- B. S. Surve.
Mayor,
Nagpur Municipal Corporation.

Shri. N. T. Wazare
President,
Municipal Borough,
Nasik.

Minister for Labour,
Sachivalaya, Bombay 32.
Dated 31st Dec. 64

Dear Shri. Wazareji,

I am happy to know that the Nasik Municipal Borough has completed 100 years of civic service and that it is celebrating its centenary on January 16th and 17th. It is in the fitness of things that Shri. Yeshwantaroji Chavan, our popular Union Defence Minister, is inaugurating the Centenary Celebrations.

With the impact of urbanisation on our daily life, Municipalities have to play a very vital role in providing more efficient civic services I am sure, that the Nasik Municipality will do its best to cater to the needs not only of the local people but of the large number of tourists and pilgrims who visit Nasik.

I send my good wishes for the success of the centenary celebrations.

Sd/- N. M. Tidke,
Minister for Labour.

Shri. N. T. Wazare,
President,
Municipal Borough, Nasik.

Minister for Railways, India.
New Delhi,
December 23rd, 1964.

I am glad to know that the Nasik Municipal Borough is celebrating its Centenary and is publishing a Centenary Volume depicting the growth and development of Nasik City and its urban life. Nasik situated on the banks of Godavari is an important town and a holy place of piligrimage. The civic obligations of a growing urban city of its type are very exacting. The Municipal Borough of Nasik has been discharging its obligations to the best of its ability. A Municipality, which is the base of local self-government, has its own place in the administration of the country. It provides the training ground for our budding public workers and administrators. I have no doubt that the Nasik Muuicipality will make efforts to develop Nasik on more modern lines and try to make the City more beautiful in all respects. I send my felicitations and good wishes to the Municipal Borough on the happy occasion of its Centenary.

Sd. /- S. K Patil
Minister of Railways.

शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य,
सचिवालय, मुंबई ३२.
दिनांक ५ जानेवारी १९६५.

नासिक नगरपालिका "शतसांवत्सरिक महोत्सव" लवकरच साजरा होणार आहे हे वाचून आनंद झाला.

असा प्रकारचा समारंभ स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासांत महत्वाचे स्थान संपादितो. परंतु स्थानिक स्वराज्य संस्थांची लोकप्रियता त्यांच्या कारकीर्दीत जनहितांची कार्ये किती झाली यावरच अवलंबून असते. आपली नगरपालिका याहि बाबतीत मागे नाही अशी खात्री आहे.

संरक्षणमंत्री माननीय यशवंतराव चव्हाण यांचे शुभहस्ते होणाऱ्या "शतसांवत्सरिक समारंभास" माझ्या शुभेच्छा.

म. ध. चौधरी,
शिक्षण व वन मंत्री.

नासिक नगरपा लि

कार्यालय दूरध्वनी क्र. ५६५२१-१
निवास दूरध्वनी क्र. २३०३२ व २५१३५
दुकान दूरध्वनी क्र. २३५१३
७१४, रविवार पेठ, पुणे २.
दि. २१-१२-१९६४.

श्री. नि. त्र्यं. वझरे

अध्यक्ष, नासिक नगरपालिका, नासिक. यांसी :—

सप्रेम नमस्कार.

मे १९६४ मध्यें नासिक नगरपालिकेस स्थापन होऊन १०० वर्षे पूर्ण होत आहेत हें वाचून आनंद वाटला.

महाराष्ट्रांतील नासिक हें शहर एक ऐतिहासिक तीर्थक्षेत्र आहे. तसेंच ते आधुनिक तीर्थक्षेत्र देखील आहे. भारताच्या संरक्षण व्यवस्थेसाठीं लागणाऱ्या वस्तुंचे उत्पादन करण्याचे कारखाने आपल्या शहराचे आवतीभोंवती होत आहेत. यामुळे आपल्या शहराची भरभराट होऊन आप या शहराला उज्वल काळ येईल यांत शंका नाही.

दिनांक १६ व १७ जानेवारी १९६५ रोजीं होणाऱ्या शताब्दि समारंभाचें अध्यक्षस्थान भारताचे संरक्षणमंत्री मा. ना. यशवंतराव चव्हाण हे स्वीकारणार आहेत ही फार चांगली गोष्ट आहे.

समारंभाप्रति माझ्या व माझ्या सहकाऱ्यांच्या शुभकामना कळावे.

आपला.

काळूराम उदनसिंग ऊर्फ बबनराव परदेशी
महापौर, पुणे.

मन्त्री, उद्योग खाते,
महाराष्ट्र राज्य,
सचिवालय, मुंबई ३२

श्री. नि. त्र्यं. वझरे,
अध्यक्ष, नासिक नगरपालिका,
नासिक–

यांस स. वि. वि.

नाशिक नगरपालिका दिनांक १६–१७ जानेवारीला शताब्दि-महोत्सव साजरा करीत आहे हे वाचून फार आनंद वाटला. मानवी जीवनाला १०० वर्षांची कमाल मर्यादा असली तरी मानवाने निर्माण केलेल्या संस्था चिरन्तन असतात आणि म्हणून कालाबरोबर त्या अधिकाधिक परिणतावस्थेला जात असतात. आपल्या नगरपालिकेने १०० वर्षे जनसेवेचे कार्य करून लोक-सेवेच्या विविध प्रकारच्या कामांचे पुण्य पदरीं पाडून घेतले आहे आणि अधिक जबाबदारीच्या पुढील कार्यासाठी मोलाचा अनुभव संग्रही केला आहे तेव्हां या वेळीं शताब्दि महोत्सव साजरा करून केलेल्या कामाचा आढावा घेणे व पुढील कार्याचा संकल्प करणे रास्तच आहे. लोकशाही मूल्यांना शिरोधार्य मानणारा माननीय श्री. यशवंतरावजींसारखा नेता आपणाला या शुभप्रसंगी मार्गदर्शनासाठी लाभला हे मोठे भाग्यच होय.

उच्चतर पातळीवर लोकशाही यशस्वी होण्यासाठी लागणारे लोकनेते तयार करण्याचे कार्य स्थानिक संस्थानाच करावे लागते. लोकशाही मूल्याचे जतन आणि जोपासना करून लोकांच्या मनांत लोकशाहीबद्दल आस्था आणि प्रेम उत्पन्न करण्याच्या आणि अधिक मोठ्या जबाबदाऱ्या पेलणारे नेते निर्माण करण्याच्या कामाचा भार आपली नगरपालिका मोठ्या प्रमाणांत उचलील याची मला खात्री आहे.

शताब्दि-महोत्सवाला मी सुयश चिंतितो.

आपला
[सही] स. गो. बर्वे

कार्यालय–९१६
दूरध्वनी : खाजगी–२०३
निवासस्थान–१६४

श्री. अध्यक्ष,

म्युनिसिपल बरो, नाशिक यांसी.

महाशय,

आपले दिनांक १६-१२-६४ चे पत्र मिळाले, नाशिक नगरपालिका स्थापन होऊन मे १९६४ मध्ये १०० वर्षे पूर्ण झाली आणि तन्निमित्त आपण शतसांवत्सरिक उत्सव साजरा करून एक ग्रंथही प्रसिद्ध करणार आहात हे वाचून अत्यानंद झाला. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकशाही शासनाच्या आधारशिला होत. त्या दृष्टीने आपली नगरपालिका सतत जनहिताच्या दृष्टीने "नगरसेवा हीच ईशसेवा" हे ध्येय नजरेपुढे ठेऊन १०० वर्षे कार्य करीत आहे. याही पुढे जनतेच्या हिताकरिता आपली नगरपालिका जास्तीत जास्त झटेल अशी आशा आहे. आपल्या नगरपालिकेला सुयश चिंतून उत्तरोत्तर भरभराट होवो ही इच्छा व्यक्त करतो.

आपला,
पारसमल ज. जोशी
महापौर,
सोलापूर महानगरपालिका

टेलिफोन नं. ५६२०४
ओल्ड हाऊस नं. १००-३ न्यू हाऊस नं. ११७०
सदाशिव पेठ. पुणा २ दि. २-१-६५

श्री. नि. त्र्यं. वझरे.

अध्यक्ष. नासिक नगरपालिका. नासिक

सप्रेम नमस्कार वि. वि.

आपले ता. १६-१२-६४ चे पत्र पोंचले. आभारी आहे. नासिक म्युनिसिपालिटीचा शताब्दि महोत्सव भारताचे संरक्षणमंत्री माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते होणार असल्याचे वाचून आनंद झाला. यशवंतरावजींच्या मार्गदर्शनाखाली समारंभ यशस्वी होवो ही शुभेच्छा व्यक्त करतो.

भारतामध्ये लोकशाही प्रस्थापित करून जनतेच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करण्यासाठी आपण स्वातंत्र्य मिळविले. लोकशाही तत्त्वावर आधारलेली राज्य-घटना बनविली आणि लोकशाही विकेन्द्रीकरणाच्या तत्त्वाचा पुरस्कार केला. लोकशाही म्हणजे पाच वर्षांनी एकवेळ मतदानाच्या हक्काचा वापर करून प्रतिनिधि निवडणे नव्हे. ती एक जीवनपद्धति आहे. समाजाच्या निरनिराळ्या थरावर लोकांनी आणि त्यांच्या प्रतिनिधींनी सामाजिक न्यायाच्या तत्त्वानुसार जनतेचे प्रश्न हाताळण्यास शिकले पाहिजे. ग्रामशहर. तालुका. जिल्हा इत्यादि दरेक थरावर निर्णय घेण्याची पात्रता आम्हांला मिळविली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कारभारात जनतेला सहभागी करून त्या यशस्वी चालविणे ही गोष्ट लोकशाही जीवनपद्धति भारतात यशस्वी आणि स्थिरपद करण्याचे दृष्टीने अतिशय महत्त्वाची आहे. आपल्या गावचा अगर शहराचा कारभार लोकहिताचे दृष्टीने चांगला चालवणे जर आपल्याला जमले नाही तर आपली लोकशाही तकलुबी स्वरूपाची राहील. लोकशाहीच्या मार्गानेच आपला देश समर्थ आणि समृद्ध बनविण्याचा आपण निर्धार केलेला आहे. नासिकची जनता आणि नगरपालिका या महान प्रयत्नात आपली जबाबदारी पार पाडील अशी प्रतिज्ञा शताब्दि महोत्सवाच्या निमित्ताने होऊ शकल्यास ते समुचित होईल. कळावे.

आपला.

श्रीधर महादेव जोशी
बी. ए. एलएल. बी.
चेअरमन एस्. एम्. पी.
कौन्सिलर पुणा म्युनिसिपल कार्पोरेशन

Home Minister,
India.
New Delhi.
January. 11, 1965.

-: M E S S A G E. :-

I am very happy to note that the Municipal Borough of Nasik has completed hundred years of service to its citizens.

We have set before ourselves the goal of rapidly rising standards of economic, social and moral well-being. For its achievement in a democratic set-up, public co-operation has been recognised to be a factor of crucial importance. The idea of public co-operation has special relevance to the programmes of local bodies, especially Municipal Boroughs, which are intended to satisfy the minimum civic needs of the people and are specially suited for evoking public interest and participation. This can be achieved if the councillors of the Municipalities would discharge their obligations to the people irrespective of political affiliations, creed or community or status.

I wish every success to the centenary celebrations and hope that the Municipality will be guided by the lofty principles of truth, righteousness and service.

Sd. /- Gulzari Lal Nanda.

Minister for Urban Development & Waqfs.
Government of Maharashtra,
Sachivolaya, Bombay - 32.
12th January, 1965.

Dear Shri. Wazare,

I am happy to know that the Nasik Municipality, which completed hundred years of its existence on 13th May 1964, would be celebrating its centenary on the 16th and 17th January 1965.

Nasik is a big and important city in the State of Maharashtra. The Godavari, fondly referred to as the " Ganga " flows through Nasik. Many temples on either bank of the Ganga are held sacred by the Hindus particularly the Panchavati where Lord Rama spent some time of his fourteen - years exile. The Pandavas also spent some period of their exile near Nasik. The importance of Nasik as a pilgrim centre is further increased by the fact that Trimbakeshwar, one of the twelve Jyotirlingas held sacred by the Hindus, is only a few miles from Nasik and the pilgrims to Trimbakeshwar have to pass through Nasik.

A Municipality does not have to strive to reach the 100 years of age but to reach that age with a consistently good record of civic administration and service will undoubtedly be an achievement of distinction. I am happy to say that the Nasik Municipality has more or less achieved that distinction.

The Nasik Municipality is naturally aspiring to be raised to the status of a municipal corporation,

like Sholapur. The request made by the municipality in that behalf is under the active consideration of the Government.

Nasik can hardly be called industrialised. The Government has recently declared its policy regarding dispersal of industries from the Bombay–Thana–Panvel Poona complex. I think Nasik should take advantage of that policy as it is ideally situated for industries in view of the good road and rail connections which it has with other parts of the State as well as the country; moreover, because of the recent development in its area an industrial climate has also been created.

I wish every success to the Nasik Municipality and prosperity to the citizens of Nasik.

Yours Sincerely
Sd. /- Rafiq Zakaria

Shri. N. T. Wazare,
President, Municipal Borough,
Nasik.

Bombay Pradesh Congress Committee
Congress House,
Vithalbhai Patel Road.
Bombay - 4.
28th December 1964.

-: MESSAGE :-

I am happy to learn that Nasik Municipal Borough, which has completed hundred years of glorious service to its citizens is planning Centenary Celebrations and that it is brining out a Centenary Volume on the occasion.

I am sure that the Borough will continue to serve the people of historical city of Nasik in the same magnificient way as it has been doing so far.

I send my warmest greetings.

Sd./- Bhawanji A. Khimji
President.

भारतीय जनसंघ, ठाणे
दिनांक [illegible]

श्रीमान अध्यक्ष महोदय,
नाशिक नगरपालिका, नाशिक शहर

स. न. वि. वि.

आपली नाशिक नगरपालिका शतसंवत्सरी साजरी करीत आहे या बद्दल भारतीय जनसंघ महाराष्ट्र प्रदेश तर्फे आपले अभिनन्दन करतो.

लोकशाही शिक्षणाचा पाया असलेली स्थानिक स्वराज्य संस्था अशीच दीर्घ काळ काम करीत रहो व दिवसेंदिवस नागरिकांची लोकशाही निष्ठा, देशभक्ति व सुखसमृद्धि वृद्धिंगत करण्याकरता सतत कार्यरत रहो हीच अपेक्षा.

आपला स्नेहांकित

मुकुन्दराव आगासकर
अध्यक्ष, भारतीय जनसंघ महाराष्ट्र प्रदेश मुंबई



गांवकरी प्रेस

❀ संरक्षण मंत्री ना. यशवंतराव चव्हाण : महाराष्ट्राचा कणखर सह्याद्रि म्हणून दिल्लीत निवास. आणि नासिक जिल्ह्याचा प्रतिनिधि म्हणूनहि.

गावकरी प्रेस


मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक : महाराष्ट्राचे कार्यक्षम आणि कनवाळू मुख्यमंत्री.



गांवकरी प्रेम

✻ डॉ. रफीक झकेरिया : महाराष्ट्र राज्याचे नागरी विकास खात्याचे मंत्री. तडफदार आणि काणेदार लोकनेते.




श्री. निवृत्ती त्र्यंबकराव वझरे, अध्यक्ष नासिक नगरपालिका,
(दिनांक ३।७।१९६४ पासून)

सौजन्यमूर्ती व मृदुभाषी या गुणांमुळें लोकप्रिय
झालेले अध्यक्ष यांच्या कारकीर्दीत नासिक
नगरपालिकेचा शतसांवत्सरिक महोत्सव साजरा होत आहे.



श्री. मल्हारराव लक्ष्मण चांदवडकर, उपाध्यक्ष नाशिक नगरपालिका
(दिनांक ३।३।१९६४ पासून)

तरुण व उत्साही कार्यकर्ते. त्यांचे अंगचे गुणा-
मुळे व विनयशील वृत्तीमुळें ते सर्वांनाच
हवेसे वाटतात



गावकरी प्रेस

❖ श्री. हरिश्चंद्र तात्याबा शेलार : तडफ आणि लवचिकपणा यांचा संगम असलेले शतसांवत्सरिक कालांतील नगराध्यक्ष : आपल्या कचेरींत कार्यमग्न आहेत.




गावकरी प्रेस

जीवनगंगा.....


नासिक नगर पालिका व शहर
यांची गेल्या शंभर वर्षाची वाटचाल

नगरपालिकेचा मनोरा : या मनोऱ्या-
वरील घड्याळ नासिक शहरांतील
नागरिकांना काळ-वेळ दाखवितें.





गांवकरी प्रेस



नगरपालिकेचा पूर्वारंभ — याच राजे-बहादूर वाड्यात नाशिक नगरपालिकेचे बाल्यपण गेले.



नगरसंस्थांचे तत्वज्ञान

विभाग पहिला

प्रा. डी. एन्. सद्गुणे

● गरज ही मानवाची प्रेरणा–

नित्याच्या जीवनात मनुष्याला अनेक गरजा भासतात. कुणीही स्वयंपूर्ण नसतो, आणि गरजाही असंख्य तसेच अनंतही असतात. ह्या गरजांची पूर्ति करणे हेच सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचे सारसर्वस्व ठरते. ह्या गरजांच्या पूर्तिसाठी जे जे म्हणून आवश्यक असेल ते ते प्राप्त करणे हे माणसाच्या दैनंदिन जीवनाचा फार मोठा भाग व्यापून उरते. पोटाचा प्रश्न, वस्त्रप्रावरण, निवारा, इत्यादि प्रश्नांनी त्याचे जीवन बव्हंशी व्यापलेले असते. कार्ल मार्क्सने तर मानवी मन हे भौतिक गरजातूनच बनत असल्याची ग्वाही आपणास दिल्याची आढळते.

● बिना सहकार नही उद्धार–

ह्या गरजापूर्तीसाठी तरी निदान मानवाला इतरांशी सहकार्य करणे भाग पडते. शेजारी, घरमालक, सावकार, किराणा व्यापारी, न्हावी, धोबी, आपणाला आवडो न आवडो, त्यांच्याशी संबंध हे ठेवावे लागतातच. खेरीज ह्या सर्वव्यापि संबंधातूनच मानवी मनाचा विकास होत असल्याने मनुष्य हा समाजप्रिय प्राणी बनला आहे. मनुष्याच्या ह्या गरजनिष्ठ व संगतप्रिय स्वभावातून

सामुदायिक जीवनाची वाढ होत गेली. हे सामुदायिक जीवन शांततामय व प्रगतपर राखण्यासाठी, माणसाने नियंत्रण संस्था शोधून काढली. नियंत्रणासाठी, आवश्यक ते कायदे करून त्या द्वारा समाजाचे अधिकाधिक हित साधणे हे त्या नियंत्रण संस्थेचे – जिला आपण व्यवहारी भाषेत सरकार म्हणतो – तिचे प्रमुख कर्तव्य. समाजातील प्रत्येक घटक व्यक्तीला जास्तीत जास्त विकासाची संधी उपलब्ध करून देणे, हा शासनव्यवस्थेचा आदर्श. या आदर्शाची व कर्तव्याची उत्कृष्ट मासला रामाने घालून दिली म्हणून रामराज्याची पकड भारतीयांच्या मनावर फार

● पाशवी शक्तीचे केंद्र–

समाजातील घटकांचे हितसंरक्षण व सुव्यवस्थेद्वारा स्वातंत्र्याची वाढ, ह्यासाठी निर्मिलेल्या सरकारच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण होणे अपरिहार्यच आहे. संरक्षणासाठी, सैन्य, आरमार, हत्यारे व आयुधसंपत्ति, युद्धप्रसंगी करावे लागणारे मानवांचे नियंत्रण, युक्तायुक्त मार्गांनी उभारावा लागणारा द्रव्यसंचय, तसेच असामान्य अंगभूत धाडस, कर्तव्यशक्ति, महत्वाकांक्षा, इत्यादि गुणांनी संपन्न असलेले व्यक्तिमत्व, व त्यातून निर्माण झालेली विभूतिपूजा इत्यादि कारणांनी शासनयंत्रणा ही पाशवी शक्तीचे केंद्र बनत गेली. "सत्ता ही माणसाला भ्रष्ट करणारी आहे. अनिर्बंध सत्ता तर माणसाला निखालस भ्रष्ट करते" म्हणूनच उर्मट, उद्दाम, बेमुर्वतखोर सत्ताधाऱ्यांची परंपरा प्राचीन आणि अर्वाचीन इतिहासातील अनेक देशांच्या जीवनात आपणास आढळते. सत्तेचे केंद्रीकरण म्हणजे मतिशून्यता, असमानता आणि व्यक्तिस्वातंत्र्याची गळचेपी.

● विकेंद्रीकरण हाच मार्ग–

सरकारच्या निरंकुश सत्तेत जास्तीत जास्त भागीदार असणे किंवा खऱ्या अर्थाने सर्वांचेच राज्य–जेथे सर्व शास्ते आणि शास्तीही आहेत – अशी विकेंद्रित शासन व्यवस्था म्हणजे लोकशाही. लोकशाही हा राज्यप्रकार लोकप्रिय का ठरतो ह्याचे प्रमुख कारण म्हणजे तेथे घडवून आणलेले सत्तेचे विकेंद्रीकरण होय.

"मनुष्य हा जन्मतः स्वतंत्र असून देखील सर्वत्र बंदिवासात असल्याचे भासते" ह्या जन्मजात स्वातंत्र्याचे रक्षण करणे ही मानवाची मूलभूत प्रेरणा आहे. त्यासाठी अनंत हाल अपेष्टा, कष्ट, रक्त आणि अश्रु सांडून मनुष्याने ही जीवनज्योत पेटती ठेवली आहे. मनुष्य लोकशाहीची कास धरतो, ह्याचे कारण लोकशाही ही व्यक्तीच्या प्रतिष्ठेची कदर करते, व्यक्तिस्वातंत्र्याची क्षितिजे रुंदावते. "बहुजन हिताय, बहुजन सुखाय" झटणारी ही शासनव्यवस्था, आजचा युगधर्म होऊ पहात आहे.

पण लोकशाही म्हणजे रोग उत्पन्न आणि मात्रा एक, असा गैरसमज होऊ नये. निसर्ग देखील, वाटेल तेथे वाटेल त्या काळी इच्छित वस्तू, वनस्पती अथवा वन्य जीव निर्माण करू शकत नाही. तद्वत लोकशाहीसाठी देखील काही विशिष्ट स्थळ, काल व मनोभूमि आवश्यक आहेत. विशेषतः यशस्वी लोकसत्ता स्थापन करताना आपणाला लोकशाहीचा मूलभूत विचार करणे अत्यावश्यक ठरते.

● ग्रामराज्य ते रामराज्य–

लोकशाहीचा प्रवास ग्रामराज्यापासून सुरू होत असल्याने स्थानिक स्वराज्यसंस्थांना लोकशाहीचा पाळणा मानला जातो. स्थानिक स्वराज्यसंस्थांचे प्राथमिक तत्वज्ञान अगदी सुगम आहे. मानवी समुदायाच्या एखाद्या स्थानिक विभागाने आपले प्रश्न, आपल्या बुद्धीने, कुवतीनुसार सोडवावे हा त्यातील मुख्य गाभा. यासाठी आवश्यक सत्ता सर्वांच्या संमतीने धारण करावी व सर्वांच्या हितासाठी

वापरावी, हा त्यातील राजकीय अर्थ. त्या योगे एकमेकांमध्ये स्वत्वाची जाणीव निर्माण होते. सहकार्याची भावना दृढावते व सर्वोदयाचे क्षितिज दिसू शकते, हा झाला त्यातील सामाजिक भावार्थ. थोडक्या कष्टात, सहकार्यामुळे थोडक्या मूल्यात, जीवनाच्या गरजा पुरविल्या जाण्याची शक्यता, हा त्यातील आर्थिक आशय. व्यक्तींच्या अंगी असलेल्या अनंत सुप्त शक्तींना प्रेरणा देऊन, संपन्न व्यक्तित्व घडविण्याची संधी प्राप्त होणे हा झाला, त्यातील लौकिक अर्थ.

"Local assemblies of citizens constitute thestrength of free nations. Town meetings are to liberty what primary sehools are to science. They bring liberty within the peoples' reach. They teach men, how to use and how to enjoy it. A nation may establish a system of free Government; but without the spirit of municipal institutions it cannot have the spirit of liberty." De Tocqueville

ज्ञानासाठी प्राथमिक शाळा, तशी स्वातंत्र्य जोपासनेसाठी ग्रामसंस्था अशी श्रद्धा असणाऱ्या वरील विचारवंताने स्वतंत्र राष्ट्राची शिवशक्ति स्थानिक स्वराज्य संस्थेत असल्याचा निर्वाळा दिला आहे.

● स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच लोकशाही—

स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजेच व्यक्ति स्वातंत्र्याचा, लाभ होण्याची संधी असे समीकरण राज्यकर्त्यांनी ध्यानात घेणे आवश्य आहे. स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे स्थानिक नेतृत्व पैदा करून, जोपासून, देशसेवेसाठी उपलब्ध करून देण्याची शिक्षणपद्धति होय. अप्रत्यक्ष लोकशाही शासन व्यवस्थेचा, लोकनेतृत्व हा गाभा. ज्या प्रमाणात आणि प्रतीचे लोकनेतृत्व असेल, त्या प्रमाणात व प्रतीची लोकसत्ता देशात पैदा होते हे आपल्या व शेजारच्या देशातील काही उदाहरणावरून ध्यानात येऊ शकेल. म्हणूनच लोकशाही यशस्वी करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांचे तत्वज्ञान नीट आकलन होणे व तदनुसार आचरण घडणे ही आजची निकडीची गरज ठरते. ज्या देशात स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रतिष्ठा आहे, तेथेच लोकशाही बीजरूपाने नांदते आहे असा परामर्श काढणे अयोग्य ठरणार नाही.

❀ ❀

लोकोपयोगी कारभार—

—आपण म्युनिसिपालिटीत १२–१३ वर्षे होतो. पहिली काही वर्षे आपापसातील भांडणात गेली.

—प्रेसिडेंटपदावर आलो असता महत्वाची २२ कामे पेंडिंग होती. ती तातडीने पूर्ण करण्यात आली.

—बाकी वसुली बरीच होती. सरकारकडून सूचना येताच बाकी वसुली न्यायनिष्ठुरपणे करण्यात आली. प्रेसिडेंट झाल्यावर बाकी वसुलीबाबत पहिली नोटीस आपण आपल्या वडिलांना काढली.

—भय्यासाहेब पांडे
माजी म्यु. प्रेसिडेंट

प्राचीन भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था

विभाग दुसरा

● स्वधर्मे निधनं श्रेय:–

व्यक्तिस्वातंत्र्याच्या जपणुकीसाठी, सत्ता विकेंद्रीकरण साध्य करणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांना, भारतीय राजकीय विचार आणि आचारांत फार मोठे स्थान असल्याचे आपणास आढळून येईल. भारतीय संस्कृतीचा पिंडच स्नेहमयी व सहिष्णु. विवेक आणि आत्मसंयमावर भर फार. त्यामुळे सहकार्य आणि स्वेच्छेनुसार स्वातंत्र्याचा (मर्यादित) अनुभव घेणे हा प्राचीन भारतीय राजकीय विचाराचा गाभा.

त्या वेळच्या राजकीय विचारांत 'स्वधर्म' या शब्दाची व्याख्या फार विस्तृत अर्थाने केली जात असे. प्रत्येक घटकाचा म्हणून स्वधर्म असे. जसा राजाला राजधर्म होता, तसा प्रजेला प्रजाधर्म होता. मोक्षाच्या कल्पनेंत प्रत्येक व्यक्तीचे सर्वश्रेष्ठ श्रेयस् आणि प्रेयस् साठवले असल्याचे सांगितले जात असे. राजधर्माने अनिर्बंध राजसत्तेला प्रजाधर्माने अनिर्बंध प्रजाधिकाराला आणि मोक्ष इच्छेने व्यक्तीच्या अनिर्बंध वर्तनाला सहाजिकच आळा बसत असे. अंतिमतः राजा, प्रजा अथवा व्यक्ती, स्वेच्छाचारी बनणें अशक्य होई. कारण प्रत्येक घटक (स्व) धर्म नियमानें बांधलेला असे. जेथें स्वातंत्र्याचा, स्वाधिकारांचा उपभोग, वचनाची प्रतिष्ठा राखून घतला जातो, तेथेच कायद्याचे राज्य (Rule of Law) असू शकते आणि असे कायद्यान्वित राज्य आणणे हे कोठल्याही राज्यसंस्थेचे आदर्श ध्येय होय. प्राचीन भारतात ह्या दृष्टीने विचार व आचार असल्याचे अनेक दाखले आपणास उपलब्ध होऊ शकतात.

● कौटिल्यीय राज्यरचना–

प्राचीन तसेच अर्वाचीन भारताच्या इतिहासाचा सूक्ष्म अभ्यास नवदृष्टीने होणे आवश्यक झाले आहे. विशेषतः प्राचीन भारतीय इतिहास हा फार उद्बोधक असल्याने त्याचा डोळस अभ्यास आज निकडीचा आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीला व्यक्तिस्वातंत्र्याची कदर फार. तत्कालीन प्रचलित राजकीय व सामाजिक विचार आणि आचारावरुन आपणास त्याचा पडताळा लाभू शकतो. उदाहरणार्थ– इसवी सन–पूर्व तिसऱ्या शतकात होऊन गेलेल्या कौटिल्याने आपल्या 'अर्थशास्त्र' नामक ग्रंथात स्थानिक स्वराज्य संस्थांचे स्थान, अधिकार, मर्यादा तसेच प्रभाव ह्याविषयी दीर्घ चर्चा केली असल्याचे आपणास आढळते.

गुप्त कालीन स्थानिक संस्थांना जे एक महत्वपूर्ण स्थान होते ते अजूनदेखील स्वतंत्र भारतातील स्थानिक स्वराज्य संस्थांना प्राप्त झाले नाही.

● ग्रामसभा–

गावातील नियुक्त किंवा निवडलेल्या वृद्ध व अनुभवी पंचांची ग्रामसभा बनत असे. अशा ग्रामसभांना, कारभारविषयक, आर्थिक तसेच न्यायविषयक अधिकार असत ग्रामसभाच्या

संमतीशिवाय राजा कर लादू शकत नसे. ग्रामसभाद्वारा राजसैनिकांची भरती करण्याची प्रथा त्यावेळी अंमलात होती. ग्रामसभांकडेच करवसूलीचे काम सोपवलेले असे. ग्रामसभाचा सर्व वजा जाता उर्वरित धन राजकोशात घाडण्याची प्रथा त्यावेळी होती.

अनेक गावे मिळून बनणारी "जानपद सभा" ही तर विभागीय लोकशाही गणली जात असे. अनेक ग्रामप्रतिनिधी मिळून होणारी जानपदसभा ही राजसत्तेतील मोठी भागीदार म्हणून गणली जात असे. राजाने घेतलेले निर्णय पूर्वावस्थेत तसेच उत्तरावस्थेतही जानपदसभांना ज्ञात असत. अप्रिय व अपात्र मंत्र्यांना स्थानभ्रष्ट करण्याविषयी जानपदसभा हट्ट धरू शकत. राज्यारोहण प्रसंगी तसेच राज्य वारसा ठरविण्याबाबत, जानपदसभाचे मत व मान वैशिष्ट्यपूर्ण असे.

● राज्याच्या त्रिशक्ति–

सारांशाने असे मानता येईल की राजाची व राज्याची सारी शक्तिकेंद्रे, "जानपदसभा व ग्रामसभा" ह्यांच्या मार्फत नियंत्रित होत असत. उदाहरणार्थ– करसंमती व करवसूलीद्वारा राजाची "कोशशक्ति," राजनिर्णय, राज्यारोहण, वारसा इत्यादिद्वारा राजाची "मंत्रशक्ती" आणि सैनिकांच्या भरतीद्वारा राजाची "प्रभुशक्ति" तत्कालीन स्थानिक अथवा प्रातिनिधिक स्वराज्य संस्थाच बनवीत असत. "दण्ड शास्ति प्रजाः सर्वे" असे सांगणारे चाणक्य हे प्रच्छन्न सत्तावादी असल्याचे सांगितले जाते. पण राजावर, राजधर्माने, त्याच्या त्रिशक्तीवरील बंधनांनी, आणि त्याच्या सप्तांगाच्या वर्णनानी आर्य चाणक्यानी स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारा, निरंकुश राज्यसत्तेला, लोकसत्तेचा अडसर घातल्याचेच आपणास आढळते.

● स्थानिक स्व. संस्थांची चैतन्य-गंगा–

प्राचीन भारतातील राज्यसंस्था व शासन संस्था ह्या जनशक्तीची जाणीव असणाऱ्या, लोकाभिमुखी व लोकहितैषी कशा होत्या ह्यांची अनेक उदाहरणे व पुरावे आपणास लाभू शकतात. प्राचीन भारतीय स्थानिक स्वराज्यसंस्था ह्या लोकसत्ताक असल्यामुळेच अर्वाचीन काळातील ब्रिटिशांच्या आगमनापर्यंत त्या टिकू शकल्या. सुमारे पाच हजार वर्षापर्यंत व्यक्तिस्वातंत्र्य अबाधित राखणाऱ्या राज्य–सत्तेला मर्यादित राखणाऱ्या स्थानिक प्रतिष्ठा उंचावून, स्थानिक निष्ठा जोपासणाऱ्या, भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, आजही आपणास मार्गदर्शक ठरण्याच्या प्रतीच्या आहेत.

आर्य, अनार्य, द्रवीड, गुप्त, हूण, इत्यादि राज्य आणि साम्राज्यकर्ते येथे होऊन गेले. विशाल आणि वैभवसंपन्न भरतभू लुटण्यासाठी अनेक आक्रमक येथे आलेत. येथील संपत्ति, व संस्कृति नष्ट करण्याच्या संकल्पात अनेक शतके रत झालेत, आठव्या शतकापासून झालेल्या यावनी राज्यकर्त्यांनी येथील राज्य व शासनसंस्थेत अनेक स्थित्यंतरे घडविलीत. तदनंतर आलेल्या ब्रिटिशांनी देखील १५० वर्षेपर्यंत येथे शासन केले. थोडा अपवादात्मक काल आणि स्थळे सोडल्यास, गेली दीडहजार वर्षे भारत हा परदास्य आणि धर्मग्लानीतच असल्याचे भासते. परकीय आक्रमकांची व साम्राज्यांनी उलथापालथ घडणाऱ्या ह्या भारतात मात्र वरील अनेक आवर्त प्रत्यावर्तांच्या खाली असलेली स्थानिक स्वराज्य संस्थानी परंपरा आणि प्रकृति मात्र अस्पर्श आणि अभंग राहिली. भारतीय स्थनिक स्वराज्य संस्थांच्या ह्या दीर्घायुषी, चैतन्यमय अस्तित्वाबद्दल अनेकांनी प्रशंसोद्गार काढल्याचे आढळते.

The characteristic of Indian village life has been handed down with Extra ordinary pertinacity from a

distant past. असे उद्गार व उल्लेख आपणास विपुल आढळतात. अनेक राज्ये आलीत आणि गेलीत. आक्रमक, क्रूर परकीयांनी येथील राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवन विस्कळित करण्याचे अनेक प्रयत्न केलेत. पण सर्वांत खालच्या स्तरावर असणारी स्थानिक स्वराज्य संस्था मात्र अतुल्य अशा चिकाटीने आणि जीवनशक्तीने टिकून राहिली, ही फार मोठी विस्मयकारक घटना भारतीय इतिहासात आढळून येते.

मुंबई इलाख्यांतील नगरपालिकांचा इतिहास

विभाग तिसरा

गेट वे ऑफ इंडिया—

ब्रिटिश इंडियातील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास हा बराचसा आकस्मिक तसेच अकल्पित असल्याने सूत्रबद्धता त्यात फार कमी. खेरीज तुलनेने तो बराचसा अर्वाचीन असल्याने प्राचीन अथवा मध्ययुगीन भारतीय इतिहासाशी त्याची सांगड घालणे फारच दुरापास्त होत आहे. ह्या विकलांग इतिहासाला कारणे अनेक आहेत, पण प्रधान कारण म्हणजे परकीय राज्यकर्त्यांना, येथील नागरिकांविषयी हितबुद्धि व स्वातंत्र्याविषयी हितबुद्धि व स्वातंत्र्याविषयी आदरबुद्धि बाळगण्याचे काहीच कारण नाही. साम्राज्यतृष्णा व उपेक्षावृत्ति ह्या दोन वैशिष्ट्यांनी भरलेला ब्रिटिश अमदानीतील स्थानिक स्वराज्य संस्थांचा इतिहास मात्र फार मनोरंजक असल्याचे आढळते.

● आंदण बेटाचे नंदनवन—

इसवी सन १६०० मध्ये आशियाई देशाशी आणि मुख्यत्वे भारतातील मसाल्यांचा किफायतशीर व्यापार करण्यासाठी स्थापन झालेल्या ईस्ट इंडिया कंपनीपासून ब्रिटिश अमदानीची सुरुवात होते हे सर्वांस ठाऊक आहे. लग्नामध्ये आंदण म्हणून मिळालेले मुंबई बेट कंपनीने व्यापारासाठी नंदनवन म्हणून निवडले, ही गोष्टही सर्वांस ज्ञात आहे. इसवी सन १६८७ मध्ये इंग्लंडचा स्टुअर्ट घराण्यातील राजा, दुसरा जेम्स याने ईस्ट इंडिया कंपनीला राजाज्ञेद्वारा, मद्रास शहरासाठी एक स्वायत्तसंस्था व मेयर्स कोर्ट स्थापण्याबद्दल अनुज्ञा दिली. ह्या योजनेचे सर्व श्रेय कंपनीचे गव्हर्नर सर जोसिया चाईल्ड यांना जाते. त्यांच्यासमोर असलेल्या शहर सफाईच्या गंभीर समस्येला उत्तर म्हणून वरील योजना अंमलबजावणीत आणण्याचे ठरले. मद्रास प्रांतात (बखारी शेजारील अखत्यारातील भूभाग) मुलकी अधिकाऱ्यांनी आंग्ल पद्धतीप्रमाणेच, मेयर, आल्डरमेन (Aldermen) आणि बर्गीसेस (Burgesses) ह्यांच्या स्वायत्तसंस्थेस (Corporation) कर लादण्याचे अधिकार बहाल केले. व्यापाराचे भेटीसाठी, देवीघेवीसाठी हॉल तसेच

तुरुंग आणि शाळा, इत्यादि सोयी पहाण्याचेही काम वरील कॉर्पोरेशनला पाहावे लागे.

त्यानंतर १७२६ मध्ये वर्गीमेस वगळून आल्डरमेनांची मेयर कोर्टे, मद्रास, मुंबई, कलकत्ता ह्या (प्रेसिडन्सी टाऊन) शहरामध्ये स्थापिली गेलीत. परंतु ह्या कोर्टाद्वारा मुलकी कामाखेरीज न्यायविषयक कामेच पार पाडली जात. दोन विभिन्न देशातील, व्यवहार विषयक कायद्यांचे संयोजन असणे हे कोठल्याही व्यापारी संघास आवश्यक असते. म्हणून न्यायदानावरील हा भर सयुक्तिकच वाटतो.

● नागरी शासनाची सुरुवात–

नागरी शासन विषयक पहिली कायदे तरतूद आपणास १७९३ च्या चॉर्टर ॲक्टामध्ये आढळते. त्या कायद्याद्वारा गव्हर्नर जनरलला कंपनीच्या नोकरातून व ब्रिटिश रहिवाशातून, मद्रास, कलकत्ता, मुंबई शहरी जे. पी. (Justice of Peace) नियुक्त करण्याचा अधिकार प्राप्त झाला. त्याच्या न्यायाधिकाराव्यतिरिक्त शहराची स्वच्छता, रस्ते दुरुस्ती व नगररक्षण, ही कामे जारी केली होती. त्यासाठी होणारा खर्च हा घरे व जमिनीवर कर आकारणी करून निभवावयाचा होता.

इसवी सन १८४० ते १८५३ च्या दरम्यान म्युनिसीपालिटीच्या कायद्यात बऱ्याचशा सुधारणा झाल्यात. नगरपालिकेची कार्य विषयक क्षितिजेहि रुंदावलीत. प्रतिनिधित्वाच्या तत्वाला अल्पसा वावहि लाभला. मुंबई नगरपालिकेत ४ व्यापारी संस्था व भिन्न जमातींचे प्रतिनिधी आणण्याची तरतूदही ह्या दरम्यानच झाली. पण ईस्ट इंडिया कंपनीचे एक सोयीस्कर खाते म्हणूनच वरील तिन्ही शहरांतील (मुंबई, मद्रास, कलकत्ता) स्थानिक स्वराज्य संस्था काम करीत होत्या.

जवळ जवळ १८५० पर्यंत शहरी भागांत असणारे स्थानिक स्वराज्य संस्थांचे अस्तित्व खऱ्या अर्थानें भारतांत आपणास आढळत नाहीच. मुंबई इलाख्यांत तोपर्यंत पारंपारिक स्थानिक संस्थाच आपापले ऐतिहासिक कार्य प्राचीन तसेच पेशवाई थाटाने करीत असल्याचे आपणास आढळते.

१८५० च्या म्युनिसिपल कायद्याने खऱ्या अर्थानें मुंबईशहराखेरीज, इलाख्यांतील महत्वपूर्ण नागरी विभागांना स्थानिक स्वराज्य विषयक चालना मिळाली. १८५० च्या कायद्यात, एखाद्या शहरातील नागरिकांनी विनंती केल्यास नगरपालिका स्वरूपाची "शहर-समिती" नेमावी व त्या समितीने अप्रत्यक्ष कर बसवून नगरविषयक कामे पार पाडावीत. असे प्राथमिक स्वरूप होते. गव्हर्नर आणि त्याच्या कायदेमंडळाने संमत केलेल्या शहरवासीयांनी तेथील मॅजिस्ट्रेटच्या अधिपत्याखाली कामे करावीत अशी शिफारस वरील कायद्यांत आढळते. १८५० च्या कायद्याचा सूर शिफारसोवजा जरी असला तरी मुंबई इलाख्यातील बऱ्याच शहरांतून अशा प्रकारच्या स्थानिक स्वराज्य संस्थांनी ह्या काळांत मुळे धरल्याचे आढळते. उदा. सुरत– १८५०, पुणे– १८५७, येवला– १८५८, सिन्नर-१८६०, मालेगांव– १८६३ नासिक– १८६४.

ब्रिटिश अंमदानीतील भारतात, मुंबई इलाखा, हा वरील क्षेत्रात फारच अग्रगण्य ठरला, ह्याचे कारण मुख्यत्वे असे आहे की येथे पेशवेकालीन असलेले करच स्थानिक संस्थाद्वारा आकारले जात असल्याने लोकांना ते नवीन अथवा जाचकारक ओझे वाटले नाही. वायव्य सरहद्द प्रांत व मध्यप्रांत हे पाठोपाठ वाटचाल करीत असल्याचे त्यावेळेच्या इतिहासावरून आपणास दिसते.

● कंपनीराज संपुष्टात येते–

इ. स. १६०० मध्ये व्यापारासाठी स्थापन झालेल्या तागडीबहाद्दरांनी सुरुवातीस सुरुवातीस फ्रेंचांना, डचांना, पोर्तुगीजांना, तर

स्पर्धेत हटविलेच पण तलवार आणि शिस्त ह्यांच्या जोरावर, मराठेशाही, मोगलशाही, पेशवेशाही, निजामशाही इत्यादि राज्यकर्त्यांच्या हातूनही सत्ता मिळवून १८१८नंतर सर्व हिंदुस्थानभर आपला अमल बसविला. ह्या मुलुखगिरीसाठी युद्धे करावी लागलीत, आणि अतोनात पैसा खर्चावा लागला. व्यापारी कंपनीस राजकारणाच्या व्यापारात खोट खाण्याची वेळ आली. त्यामुळे १८३३ साली ब्रिटिश सरकारने कंपनीस कर्ज देऊ केले व २० वर्षाची नोटीस दिली. १८५२ च्या "चार्टर" प्रमाणे कंपनीस आपले व्यापारी संबंध तसेच राजकीय संबंध संपुष्टात आणण्याची ताकीद मिळाली होतीच. १८५७ साली उडालेल्या पहिल्या भारतीय स्वातंत्र्य संग्रामाच्या ठिणगीने कंपनीचे ऐहिक आयुष्यच संपुष्टात आणले. बंडाची आग राणी व्हिक्टोरियाच्या जाहीरनाम्याने विझून राजकीय सत्तांतर घडून आले. इतःपर कंपनीचे हितसंबंध हे ब्रिटिश सरकारचे होऊन भारतीय प्रजाजन ही इंग्लंडच्या राणीची प्रजा समजली जाऊ लागली. दोनशे सत्ताव वर्षांच्या आयुष्यात, एका परकीय व्यापारी कंपनीचे हे कर्तृत्व आणि इतिहास, फारच अभ्यासनीय आहे. स्थानिक स्वराज्य संस्थाच्या इतिहासाच्या अनुषंगाने कंपनीच्या आयुष्यातील १८५० ते १८५८ पर्यंतचा काल फारच महत्वपूर्ण असल्याचे आपण पाहिलेच.

● १८६२ चा म्युनिसिपल ॲक्ट—

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने १८५० च्या कायद्याने फारशी वाटचाल घडली नव्हती हे आपण पाहिलेच. १८६२ च्या कायद्याने मात्र स्थानिक स्वराज्य संस्थाच्या घटनेत बराचसा उल्लेखनीय बदल घडवून आणला होता. ह्या कायद्यानुसार कलेक्टर, मामलेदार, महालकरी हे त्या त्या नगरपालिकेचे पदसिद्ध (Ex-officio) अधिकारी मानले गेले. शिवाय काही इतर सरकारी अधिकारी देखील नगरपालिकांचे पदसिद्ध अधिकारी म्हणून संबोधले जात. उदाहरणार्थ- जिल्ह्याचा अथवा तालुक्याचा सर्जन अथवा आरोग्याधिकारी, हुजुर (डेप्युटी) कलेक्टर, एक्झिक्युटिव्ह इंजिनियर, पोलीस अधिकारी इ. इ. परंतु अशा सरकारी पदसिद्ध अधिकाऱ्यांची संख्या, सरकारी अथवा निमसरकारी नियुक्ताच्या संस्थेच्या ¦ पेक्षा अधिक असू नये अशी तजवीज करण्यात आली होती. त्या अनुसार सुरत नगरपालिकेत सरकार नियुक्त ७ तर निमसरकारी २१ असे नगराधिकारी होते.

● नगरी का नरकापुरी ? –

हिन्दुस्थानातील प्रमुख शहरांची आरोग्य विषयक दैना किती हिणकस होती ह्याचे दारुण चित्र इ. स. १८६३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या "रॉयल आर्मी सॅनिटरी कमीशन रिपोर्ट" मध्ये आपणास आढळून येते. ह्या रिपोर्टात, परंपरागत चालत आलेल्या स्थानिक स्वराज्य संस्था कशा अपूर्ण पडतात, हिंदुस्थानातील अडाणी आणि दरिद्री जनतेस आरोग्य विषयक दृष्टिकोन व इष्ट सवयी अजिबात का नाहीत इत्यादि समस्यांकडे ब्रिटिश सरकारचे लक्ष वेधले गेले. सामाजिक सुधारणा, (उदा. – रिफॉर्म बिल्स, चार्टिस्ट चळवळ) राजकीय प्रबोधन, उदा.– मजुरांच्या चळवळी, पुअर लॉज, १८४८चा कार्ल मार्क्सचा जाहिरनामा) इ. इ. नवमतवादाच्या लाटा युरोपवर आदळत होत्या आणि त्यांची छोटी कंपने भारतासारख्या वसाहतींवरही उठत होती. त्या अनुसार स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वाढीसाठी प्रांतोप्रांती कायदे होत होते. मुंबई इलाख्यात मात्र १८५० चाच कायदा थोड्याशा दुरुस्त स्वरुपात अंमलवाहीत आणला जात होता. या १८५० च्या तसेच १८६२ च्या कायद्यानुसारच बऱ्याचशा नगर-

पालिका, नासिक नगरपालिकेसमवेत स्थापन झाल्याचे आपण पाहिलेच आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तत्वज्ञानाचा परामर्श घेऊन, प्राचीन भारतीय शासनपद्धती व स्वराज्य व्यवस्थेवर दृष्टिक्षेप टाकून आपण ब्रिटिश अमदानीच्या इतिहासाचा येथे थोडक्यात परामर्श घेतला. इ. स. १६०० ते १८६२ पर्यंत वाटचाल करीत ब्रिटिश अमदानीच्या इतिहासाची व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या उगमापासूनचा विकास येथवर आपण तपासीत आलो आहोत. ह्या पार्श्वभूमीतच आपणास नासिक नगरपालिकेचा जन्मापूर्वीचा इतिहास आढळू शकतो. १ मे १९६४ रोजी जनसेवेची शंभर वर्षे पूर्ण करणारी, शहराच्या प्राचीन व अर्वाचीन कीर्तिपरंपरेला सालंकृत करणारी ही नगरपालिका, ह्या कालखंडातच जन्मास आल्याचे ध्यानी धरू या! नासिक नगरपालिकेचा शताब्दि इतिहास या पुढील भागात आपण बघू या.

● प्रस्तुत ग्रंथाचे आयोजन—

नगरसंस्थांच्या इतिहासलेखनासाठी, गतकालाची अनेक दृष्टिकोनातून चिकित्सक नजरेने तपासणी होणे आवश्यक असते. विषयासंबंधी अपार जिव्हाळा असूनही अभ्यासासाठी पुरेसा कालावधी व विवेचनासाठी पुरेशी स्थलप्राप्ती ह्या ठिकाणी होऊ न शकल्यामुळे, संक्षिप्त विहंगमावलोकनावरच येथे भागवावे लागत आहे. गेल्या १०० वर्षांच्या नगरपालिकेच्या घटनात्मक वृद्धीचे सोयीस्कर कालखंड कल्पून त्यांचे विवेचन करण्याचा अल्पसा व नम्र प्रयत्न येथे आयोजित आहे.

१८६४ ते १८७३ च्या प्रथम कालखंडांत नासिकच्या नगरपालिकेची स्थापना, घटना व कार्यपद्धती ह्याविषयीं विवेचन आहे.

१८७४ ते १९०१च्या द्वितीय कालखंडांत नासिक नगरपालिकेस प्राप्त झालेला टाऊन म्युनिसिपालिटीचा दर्जा, बदल व कार्य ह्या विषयीचा संक्षिप्त आढावा आहे.

१९०२ ते १९२५च्या तृतीय कालखंडांत नासिक नगरपालिका "मुंबई डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल ॲक्ट" (१९०१) प्रमाणें कशी बदलली होती व जनसेवा करीत होती, ह्याविषयींचा उहापोह आहे.

१९२६ ते १९४७ च्या चवथ्या कालखंडांत नासिक नगरपालिका मुंबई म्युनिसिपल बरोज् ॲक्ट (१९२५)च्या कलमानुसार करीत असलेली कामे व अनुषंगिक घटना ह्या विषयींचे निवेदन आहे.

१९४८ ते १९५२ चा पांचवा कालखंड, ह्या सर्वाधिकाऱ्याचा काल होय. नगरपालिका सर्वाधिकाऱ्याचे ताब्यांत जाण्याची कारणे, सर्वाधिकाऱ्याने केलेली कर्तव्यपूर्ती इत्यादि घटनांचा उल्लेख ह्या भागात योजला आहे.

१९५२ ते आजतागायत ह्या सहाव्या कालखंडात, गेल्या १०।१२ वर्षातील केलेल्या अभिमानास्पद कर्तबगारीचा उल्लेख करून सध्याच्या कार्यपद्धतीचाहि थोडक्यात उल्लेख आहे.

ह्या सर्व कार्यात प्राप्त झालेल्या सहकार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करून ही प्रस्तावना येथे संपवीत आहे.

✠ ✠

कर आकारणी

नासिक नगरपालिकेची १८७४-७५मध्ये घरपट्टी १ रुपया व भंगीपट्टी १॥रुपया अशी आकारणी होती. पुढे १८७९-८०मध्ये घरपट्टी २ रुपये झाली, सन ७७-७८मध्ये भंगीपट्टी ३ रुपये व ७९-८०मध्ये भंगीपट्टी ४॥रुपये झाली.

— श्री. गणपतराव निरंतर, माजी म्यु. सभासद.

प्रथम कालखंड
१८६४ ते १८७२

विभाग पहिला

● उपोद्घात्–

नासिक शहराची, तेजस्वी इतिहास व थोर सेवादर्श म्हणून फार थोड्या शहरांशी तुलना करता येईल. मुंबई इलाख्यातील अनेक शहरांना या ना त्या कारणास्तव अलौकिक ऐतिहासिक महत्व प्राप्त झालेही असेल, पण अति प्राचीन आणि उज्वल परंपरा लाभण्याचे भाग्य मात्र नासिक शहरानेच आहे. सौजन्य आणि सेवा, निष्ठा आणि सत्व यांची जोपासना करणाऱ्या श्रीरामाच्या पवित्र चरणांनी ही भूमि पुनीत झाली आहे त्या मर्यादापुरुषोत्तमाचा गोदातटाकी आयुष्यातील बराचसा काल गेला असल्याने येथील वास्तूला एक आगळे पावित्र्य व परंपरा लाभली आहे या कारणानेच नासिक शहराचे महत्व आणि इतिहास देखील आगळा आणि अतुल्य वाटतो.

नासिककरांचा पिंडच रामचरित्र मानसाच्या नवनीतावर पोसला गेल्याचे भासते. रामाची चारित्र्यसंपन्नता व निष्कामद जीवन रामवंशाची प्रजाहितदक्षता येथील भूमीच्या कणाकणातून व प्राणाप्राणातून वंशपरंपरेने तळपत असल्याचे विरळ दृश्य नाशकात व नासिककरात दिसते. प्रसिद्धीची हाव न धरता अविरत कार्य करीत राहणे हा या रामभूमीचा गुण येथल्या पुरात, पौरात आणि पौरसंस्थान देखील विपुल प्रमाणात आढळतो. म्हणूनच १ मे १८६४ रोजी सकाळी ८ वाजता नासिक नगरपालिकेचा जन्म झाला व आजच्या शुभ-

दिनी तिची शताब्दि साजरी होत आहे. ह्या दोनही घटना वरकरणी अबोल व अप्रसिद्ध भासत असल्या तरी त्यांचा मान व त्यांचे मोल नासिककरांना असामान्य आहे.

● नासिक शहर–

१९ एप्रिल १८१८ रोजी नासिक शहर पेशव्यांच्या हातून ब्रिटिश साम्राज्यात सामावले. १८१८ ते १८६४ पर्यंतच्या कालात नाशिक शहराची अभिवृद्धि होत होतीच. खेरीज तीर्थक्षेत्र, "दक्षिणची काशी" म्हणूनहि कीर्ति फैलावत होती. आपल्या परीक्षणाच्या कालारंभी नासिक शहराची लोकसंख्या २२ हजाराच्या आसपास होती. नासिक नगराच्या व नगरपालिकेच्याही सीमा २२ जून १८६५ च्या रिपार्टात खाली वर्णिल्याप्रमाणे होत्या.

कसबे नासिक -रिपोर्ट क्रमांक ५३

पूर्वेस–१) रायगीर गोसावी यांचे मठापर्यंत, २) गणेशवाडी पर्यंत. नरसिंगपुऱ्यापर्यंत.
३) महालक्ष्मीपर्यंत.

पश्चिमेस–१) खडकाळीवरील फुलार मुसलमान लोकांचे घरापावेतो.
२) मल्हारदरवाजाचे गणपती पर्यंत.

दक्षिणेस–१) मोठ्या महारवाड्यापर्यंत.
२) तहतगीर अलिशा फुलान याचे तक्यापर्यंत.
३) तार ऑफिस पर्यंत.

उत्तरेस–१) ओकाचे बागापर्यंत.
२) वाघाडी पर्यंत.
३) गंगानदी पर्यंत
४) भद्रकदरवाज्या पर्यंत

येणेप्रमाणे कसबे नासिकची चतुःसीमा आहे.

● १ मे १८६४

अशा या चतुःसीमा वलयांकित शहरामध्ये १ मे १८६४ रोजी सकाळी ८ वाजता नासिक नगरपालिकेचा जन्म झाला. (सध्याच्या पेठे हायस्कूलच्या) पेशवे वाड्याच्या एका विभागात नगरपालिकेचे ऑफिस स्थापले गेले. १८५० च्या कायद्यातील तरतुदी अंमलबाजीत आणण्यासाठी मुंबई सरकारने मंजूर केलेला ठराव कलेक्टर साहेब (जे. एच्. हंट) यांनी वाचून दाखवला, तसेच १८६२ च्या कायद्याचे स्वरूपही समजावून सांगितले.

● घटना व कार्यपद्धति–

१) मॅनेजिंग कमिटी म्हणजे व्यवस्था मंडळीत ५ सभासद इसम व एक चेअरमन इतके असतील. जनरल कमिटीचे व्हाईस प्रेसिडेंट हे ह्या कमिटीचे कायम हुद्याने ऑनररी चेअरमन होतील.

२) जनरल कमिटीत, सरकार नियुक्त पदसिद्ध (Ex–officio) अधिकारी म्हणून व पदाधिकारी म्हणून—

१] मेहरबान कलेक्टर साहेब, प्रेसिडेंट व चेअरमन.

२] मेहरबान हुजुर डेप्युटी कलेक्टर व्हाईस प्रेसिडेंट व चेअरमन मॅनेजिंग कमिटी.

३] जिल्ह्याचे असिस्टंट सिव्हिल सर्जन.

४] जिल्ह्याचे एक्झिक्युटिव्ह इंजिनियर.

५] जिल्ह्याचे पोलीस सुपरिंटेंडेंट.

६] शहराचे पोलीस प्रमुख.
(City Chief Constable)

७] तालुक्याचे मामलेदार.

यांच्या खेरीज सरकारनियुक्त नगरवासीयांपैकी १६ असे एकूण २३ अधिकारी नगरपालिकेच्या कामात असतील.

३) नगरपालिकेच्या कामाकरिता सभासदातर्फे एका व्यक्तीस सेक्रेटरी म्हणून नेमले जाईल, व त्यास दरमहा ५० रु. पगार असेल.

४) परिशिष्ट 'अ' मध्ये दाखविल्याप्रमाणे नगरपालिकेची कामे व खर्च व्यवस्था असेल. (पृष्ठ १२ पहा)

५) सभासदांना आरोग्यविषयक नियम व कर आकारणी आणि वसुली याविषयी

देखील सविस्तर तरतुदी होतील व त्या नियमांचा भंग करणाऱ्या नागरिकांस रु. ५० पर्यंत दंड करण्याचाही अधिकार नगरपालिकेस राहील.

परिशिष्ट–अ

क्रमांक	हुद्दा	दरमहा वेतन	रक्कम	खातेवार दरमहा खर्च	कोणत्या अधिकारान्वये
	देखरेख व जमा खर्च	रु. आ	रु. आ.	रु. आ.	रेव्हेन्यु व पोलिस कमिशनरांच्या संमतिपत्र नं. १२०७ दिनांक २२ सप्टेंबर १८६९ व ठराव नं. ६०३० दिनांक १६ नोव्हेंबर १८७० प्रमाणें.
१	सेक्रेटरी	५०–०	५०–०		
१	कारकून	३५–०	३५–०		
१	दुय्यम कारकून	२५–०	२५–०		
३	शिपायांचा मुकादम	१०–०	१०–०		
४	शिपाई	७–०	२८–०	१४८–०	
	कर वसुली				
१	कारकून	१५–०	१५–०		
४	शिपाई	७–०	२८–०	४३–०	–वरील संमती पत्रान्वये–
	देवी टोचणेबाबत				
१	देवी डॉक्टर	१५–०	१५–०		
१	शिपाई	७–०	७–०	२२–०	–वरील संमती पत्रान्वये–
	सार्वजनिक बांधकाम खाते				
१	सल्लागार इंजिनिअर	५०–०	५०–०		
१	मिस्त्री	२५–०	२०–०		
१	शिपाई	७–०	७–०		
	प्रसंगनिष्ट खर्च	३–०	३–०	८०–०	
	सॅनिटरी डिपार्टमेंट				
१	आरोग्याधिकारी	१००–०	१००–०		
	घोड्यासाठी खर्च	२५–०	२५–०		
२	ग्रामीण तपासनीस	२०–०	४०–०		
२	भंगी मुकादम	१५–०	३०–०		
२	झाडूवाले	१०–०	२०–०		–वरील संमति पत्रान्वये–
४०	भंगी	१५–०	६००–०		
३६	झाडूवाले	८–०	२८८–०		
१०	मैला वाहून नेणाऱ्या गाडीवानाचा पगार व बैल गाडीचे भाडे	२०–०	२००–०		
८	कचरा वाहून नेणाऱ्या गाडीचे भाडे व गाडीवानाचा पगार	१७–०	१३६–०	१४३९–०	
				२०७८४–० वार्षिक खर्च	

● खराट्याचे स्वराज्य–

जिल्ह्याचा कलेक्टर सर्व दृष्टींनी 'स्वामी' व सर्वाधिकारी म्हणून मानण्याची प्रथा व घटनाधीर वस्तुस्थिति परवापरवा पर्यंत होती. व्हाईसरॉय व गव्हर्नर ह्यांच्यावर बरेच ज्ञात व अज्ञात अंकुश असत. त्यामानाने कलेक्टरासच मुक्ताधिकार जास्त असल्याचे इतिहासाच्या सूक्ष्म अभ्यासकास आढळते.

कलेक्टर हा जिल्ह्याच्या नगरपालिकेचा, अध्यक्ष (प्रेसिडेंट) व सभापति (चेअरमन) दोन्हीहि असे. ह्याविषयी नवकवींना लाजवील अशी एक काव्यपंक्ति कै. शंकर मोरो रानडे ह्यांची उपलब्ध आहे–

नगर छबेली म्युनिसिपालिटी
वंदन करितो तुला ।
कलेक्टर मुख्य पती तुज भला ।।

सभापती ह्मणून नगरपालिकेच्या सभा घेणे या खेरीज त्या सभातील निर्णयानुसार अंमलबजावणीचीही जबाबदारी त्याच्यावरच असे. स्थानिक स्वराज्य संस्थाचा कारभार, कलेक्टर या नात्याने न संभाळता, सभापति ह्या नात्याने तो पहात असे वस्तुस्थितीनूनच, स्थानिक संस्थांचा सभापतीच, कार्यकारी अधिकारी (चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर) मानला जाण्याची प्रथा बऱ्याच ठिकाणी पडल्याचे आपणास आढळते. अर्थात् कलेक्टर हा सरकारचा प्रतिनिधि तसेच नगरपालिकांचा सभापति ह्मणूनही असणे फायद्याचे असे. कारण त्याच्याद्वारा, जिल्ह्याच्या इंजिनीयर, आरोग्याधिकारी, शिक्षणाधिकारी ह्यांचे सहाय्य नगरपालिकांना उपलब्ध होऊ शकत असेच. या खेरीज नगरपालिकांचे उत्पन्न हे नेहमी कार्याच्या मानाने अपुरेच असणार. अशा वेळी सरकारी अनुदाने व द्रव्यसहाय्य मिळविण्याचे कामी कलेक्टर फार उपयोगी पडत.

अर्थात ह्या स्थितीमुळे तोटेही अनुभवास येतात. कलेक्टरास "डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेट" चे अधिकार असल्याने आचार, विचार, प्रचार व संचार स्वातंत्र्यावर (नगरपिते व नागरिकांच्या) घाला येणे हे साहजिक आहे आणि अनेक ठिकाणी अनेकांना त्याचे (कटु) अनुभवहि आलेले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थाविषयक कलेक्टरच्या अधिकारांची परिणती, प्रथमतः सरकारी नियुक्त १८८२च्या नंतर, निमसरकारी नियुक्त व शेवटी १९०८ पासून निवडलेला नगराध्यक्ष अशी झाल्याचे आपणास आढळते. कलेक्टराचे कालांतराने नगरपालिकांचे अध्यक्षत्व तसेच सभापतिपद जरी गेले असले तरी नकाराधिकाराचा (व्हेटो) गैर वापर करून तो बरीचशी कळसूत्रे हाती ठेवीत असे. अशा रीतीने स्वयंनिर्णय अथवा स्वयंशासन ह्या तीनहि बाबतींत स्थानिक संस्थांना वाव नव्हता.

नगरपालिकेने करावयाच्या कृत्यांबाबतहि असेच नियंत्रण जारी असल्याचे आपणास दिसून येते इ. स. १८५० च्या कायद्याप्रमाणे रस्ते बांधणे, दुरुस्त करणे, स्वच्छ ठेवणे, दिवा बत्तीची सोय करणे, गटारे काढणे, इत्यादि कामे, त्यांचा खर्च, शासनव्यवस्था इ. सरकारच्या, पूर्वसंमतीनंतरच नगरपालिकांनी हाती घ्यावयाची असत. १८९२च्या कायद्याने वरील यादीत इस्पितळे, दवाखाने, शाळा बांधणे व चालवणे इ. कामे वाढविलीत. पण नगरपालिकेच्या उत्पन्नाच्या एक चतुर्थांशपेक्षा जास्त खर्च गव्हर्नरांचे संमतीशिवाय कोठल्याहि वर्षी करू नये असा दंडकहि घातला गेला. म्हणूनच पुष्कळशा हितकारक सुधारणा नगरपालिका करू शकली नाही. त्यांचा क्रमाक्रमाने उल्लेख पुढे होईलच. सध्या सारांशाने एवढेच म्हणता येईल की सुरुवातीच्या घटनेद्वारा नगपालिकेला मिळाले ते खराट्याचे स्वराज्य.

नगरपिते—

सुरुवातीस नगरपिते हे सरकार नियुक्त असल्याने त्यांची "सरकार निष्ठा" हा नियुक्तीचा प्रमुख निकष. नाशिक नगरपालिका ह्या बाबतीत बरीचशी भाग्यवान कारण सुरुवातीपासूनच तिला दीर्घदृष्टी असलेले, अनुभवी व नगरहिताची तळमळ असलेले अनेक नगरपिते लाभले. अनेक प्रसंगी त्यांनी दाखवलेला बाणेदारपणाही स्पृहणीय वाटतो. पण सत्य आणि ज्ञान हे सत्तेपुढे निष्प्रभ ठरावे ही जगरहाटी. म्हणूनच लोकशाही स्वरूपाच्या स्थानिक संस्थांचे शिलेदार आणि मानकरी म्हणून बजावलेल्या त्यांच्या कामगिरीचा सन्मानानेच उल्लेख करावा लागतो.

● नागरसंस्था की नाकरसंस्था—

नगरपालिकेची स्थापना म्हणजे कर लादणारी व करवसूली करणारी संस्था, वृद्धी निर्माण करणे असा सर्वसामान्य प्रवाद आहे याच भीतीने पुण्यास तेथील रहिवाशांनी तीन वर्षे नगरपालिका स्थापू दिली नाही. बंगालमधील मिदनापूर जिल्ह्यातील कलेक्टराने नगरपालिकेच्या कर वसुलीसाठी सेवक पाठविला, तर त्या सेवकावर "खाजगी जागेवर" अतिक्रमण केल्याचा दावा. घरमालकाने केला व बेकायदेशीर कर वसूली करतो म्हणून कलेक्टरासच कोर्टापुढे खेचले. १८३० साली वसई येथील सरकारी अधिकाऱ्याने प्रत्यक्ष कर लादले म्हणून कोळी माळी व इतरांनी साहेबास. त्याच्या बंगल्यातच खुर्चीवर बसवून ठेवले. कर रद्द केले म्हणून लिहून दे असे लोक त्याच्याकडे मागणी करू लागले. जलमार्गाने साहेबाने ठाण्यास पळून जाण्याचा प्रयत्न करताच कोळ्यांनी समुद्रात पोहत जाऊन साहेबाची बोट परतविली. शेवटी त्यांच्यासाठी साहेबास कसेबसे सोडवले. या झटापटीत साहेबास कित्येकांनी धोंडे मारले व धक्काबुक्कीही केली. त्याचे अंगावरील कपडे फाडले.

कोल्हापूर नगरपालिकेने घरफाळा–पट्टी बसविल्याबरोबर मोठा लोकप्रक्षोभ उडाला "हल्लीचा घरफाळा देणे हे आम्हास जाचक आहे' अशी ब्राह्मणांनी सक्त नाकीद दिली 'ब्राह्मण हे विशेष मान्यस्थ लोक आहेत. कमी प्रतीचे लोकांस कर द्यावा लागत असेल, वाटी लोकास माफी आहे. विशेष मान्यस्थ ह्मणोन ब्राह्मण लोकास माफी मिळाली पाहिजे. वरील (घरफाळ्याच्या योजनेपासून आह्मास अतीव दु:ख होणार आहे." अशी करवीर क्षेत्रस्थ ब्रह्मवृंदाने आपल्या परंपरागत विशेष पदाची जाणीव नगरपालिकेस करून दिली. तर "सरदार घराण्यातील कित्येकांनी. आपले घराण्याचा व सरकारचा (राजे छत्रपतींचा) तह झालेला असून त्यानुसार "आपणास नगरपालिकेच्या करापासून माफी आहे." असा ऐतिहासिक दावाहि लावला. त्या वेळच्या (१८७३) च्या पोलिटिकल एजंट 'कर्नल अँडरसन' ह्यांनी दिलेले उत्तरहि फार समर्पक आहे. "ज्या शहरात आपण राहतात, त्याबद्दलची कर्तव्ये करण्यापासून आपणास सुटता कुठल्याहि आधाराने मिळू शकणार नाही.'

या काही उदाहरणावरून तत्कालीन लोकांची मनोवृत्ति व विचारपद्धती यावर चांगलाच प्रकाश पडतो. नागर संस्था ह्या नाकर संस्था असाव्यात, अशी एक वेगळ समजूत व अपेक्षा तत्कालीन नागरिकाची होती. नासिक क्षेत्रस्थहि ह्या गोष्टीस अपवाद नव्हता.

९ मे १८७० रोजी नगरपालिकेचे सदस्य व वकीलीचा व्यवसाय करणारे श्री. वासुदेव हरी निरंतर ह्यांनी इतर २०० रयतेच्या सहीनिशी मेहेरबान गव्हर्नर साहेबास एक

(तक्रार) अर्ज सादर केला होता. नासिक नगरपालिकेने बसविलेला डोईजड व अन्याय्य कर रद्द करण्याविषयी त्यात विनंती होती. त्यातील कारणपरंपरा खालील प्रमाणे होती.

(१) नासिकच्या 'आग्नेय' बाजूस असलेला, सरस्वती नाला ही नासिकची, निसर्गदत्त गटार. पाला पाचोळा, माती दगड, इत्यादि मुळे वारंवार हा नाला भरतो. तो उपसून नैसर्गिक प्रवाह चालू ठेवणे हे भारी खर्चाचे काम. इ. स. १८६९ मध्ये, नाला उपसण्याचे खर्चाच्या निमित्ताने नगरपालिकेने शहरातील मालावर जकात बसविली.

२) त्या नाल्याचा प्रवाह बदलणे व नवीन बांधणी करणे ह्या सबबीखाली घरपट्टी सुरु केली.

(३) नाला उपसण्याचे काम आता संपले पण वसूली मात्र चालूच आहे. मालावर कर, घरावर कर, भंगीपट्टी व इतर अनेक कर येथील रहिवाशांना डोईजड होऊन पाठ मोडावयाच्या बेतास आलेल्या उंटासारखी येथील रयतेची परिस्थिती झाली आहे.

(४) आगीत तेल ओतण्यासाठीच की काय, ५ एप्रिल १८७०च्या जनरल बोर्डाच्या सभेने मालावरील जकात दर चौपटीने वाढविण्याचा निर्णय घेतला आहे हा निर्णय अप्रस्तुत व बेसनदशीर आहे कारण.

(अ) म्युनिसिपालिटीच्या (१८६२) कायद्यानुसार दोन तृतीयांश सभासदांच्या मताधिक्याने कर वाढ व्हायला हवी.

(ब) त्या सभेत हजर असलेल्या १२ सभासदांपैकी ७ तर सरकारी पदसिद्ध अधिकारीच आहेत.

(क) कायद्याप्रमाणे दोनतृतीयांश नगरपिते हे स्थानिक हवेत तशी परिस्थिती नाही.

वरील अर्जाची नंतर सविस्तर चौकशी व शहानिशा होऊन—

(१) सभेच्या दिवशी १८ सभासद हजर होते, व ह्यातील ५ फक्त पदसिद्ध अधिकारी होते.

(२) अर्जातील बऱ्याचशा सह्या बनावट व परक्याच्या आहेत.

(३) प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार व सरकारी पूर्व संमतीनेच नगरपालिकेचे काम सुरळीत व समाधानकारक पद्धतीने चालू आहे.

(४) अर्जदार हा एका विशिष्ट (हिंदू) "धार्मिक" गटाचा पुढारी स्वतःला मानून गटबाजीचे राजकारण खेळू पहात आहे.

अतएव नगरपालिकेच्या प्रचलित कामात सरकार बदल अथवा ढवळाढवळ करू इच्छित नाही असे सरकारी ठराव २५३३ दिनांक ११ सप्टें. १८७१ रोजी जाहीर झाले.

दिव्यचक्षूंचे प्रज्ञावंत वा पुरोगामी सामाजिक राजकीय संस्था कितीहि पुढे जावोत सर्वसामान्य जनता आणि माणूस हा नेहमी सनातनी व स्थितिप्रिय रहातो हेच खरे.

१८९६–९७ ची मॅनेजिंग कमिटी

श्री गणपतराव निरंतर यांच्याकडे सापडलेल्या कागदपत्रावरून सन १८९६–९७ साली नासिक नगरपालिकेची मॅनेजिंग कमिटी पुढीलप्रमाणे होती.

चेअरमन : नारायण विनायक गोळे, सभासद : त्र्यंबकराव बाळकृष्ण टाकळकर, अमोलक केवलचंद, चिंतामण कृष्ण हर्डीकर, काझी मीर गियासुद्दीन, आणि वासुदेव हरी निरंतर.

नगरपालिकेची कामे

विभाग दुसरा

● नगरपालिकेची कामे—

या विभागात तत्कालीन नगरपालिकेने मैलासफाई, सांडपाणी, गटारे, पाणीपुरवठा व अनेक अनुषंगिक कर्तव्याबाबत केलेल्या योजना व पूर्ति ह्यांची माहिती देण्याचा प्रयत्न आहे.

पाणीपुरवठा—

त्र्यंबक दरवाजाजवळ मोठ्या नाल्यातून जरी सुमारे ५००० लोकवस्तीला पाणी पुरवठा होत असला तरी मुख्यतः गोदावरीचेच पाणी बहुसंख्य लोकवस्ती वापरते सुंदरनारायणाच्या देवळापासून खालपर्यंतच्या पात्रातून पाणी पुरवठा होतो. गोदावरीचे पाणी पिण्याच्या दृष्टीने अतिशय अशुद्ध आहे त्यात होणाऱ्या आंघोळी, कपडे धुणे. निर्माल्य, अस्थि विसर्जन तसेच घरातील व शहरातील केरकचरा गंगाविसर्जित होत असल्याने येथे विशुद्ध पुण्य लाभते पण पाणी नाही अशी या क्षेत्राची अवस्था झालीआहे. येथून ६ मैलावर असलेल्या "गंगापूर" येथें गोदावरीस धरण बांधावे अशी योजना होती, पण मुंबई सरकारचे प्रमुख सॅनिटरी इन्स्पेक्टरांनी (मिस्टर हेवलेट) गोदावरीचे पाणी पिण्याच्या दृष्टीने अशुद्ध म्हणून अयोग्य असा शेरा दिल्याने हे पाणी वापरूच नये असा सरकारी कयास आहे. डॉ. लिथ यांनी १८६५मध्ये सुचविलेली व मिस्टर हेवलेट यांनी १८८१मध्ये संमती दिलेली एक प्रतियोजना अंमलबजावणीत आणावी अशी धारणा आहे नासिक शहराच्या नैऋत्येकडून वस्तीच्या बाहेरून वाहणाऱ्या 'नासर्डी' चे पाणी शुद्ध असण्याचा संभव आहे. 'नासर्डी' चे पाणी नासिककरांना उपलब्ध करून देण्याच्या योजनेस सुमारे १ लाख ३० हजार रुपये खर्च येईल आणि सध्याच्या नगरपालिकेस हा खर्च पेलवणे संपूर्णतः अशक्य आहे खेरीज गोदावरीशिवाय अन्य जल वापरण्यास नासिककरहि तयार नाहीत.

सुमारे ९० वर्षापूर्वी पेशवेकालीन सुभेदार धोंडो महादेव यांनी त्र्यंबक दरवाजाजवळ एक हौद बांधला होता त्र्यंबक रोडपासून १।। मैलावरून वाहणाऱ्या 'नासर्डी' च्या झिरपणाऱ्या पाण्याचा एक २०५ फुटी साठा देखील धोंडो महादेव यांनी केलेला होता आजुबाजूने त्यास फरसबंदी केलेली आढळते. पण गेल्या कित्येक वर्षापासून दुर्लक्षिला गेल्यामुळे गवत, माती ह्यांनी तो झाकला गेला आहे. ह्या साठ्यातून. भूमिगत मोरीने पाणी हौदापर्यंत आणले होते. पण ही पाणसाठी खाजगी मिळकत असल्याने, शिवाय तिचा बराचसा उपयोग, आजूबाजूचे बागा व शेतीस होत असल्याने शहराची पाणीपुरवठा समस्या सुटली जात नाही. पाणी स्वच्छ असल्याने, सध्याच्या दुर्लक्षिलेल्या स्थितीतहि नागरिकांच्या सोईसाठी नगरपालिकेने. ही पाणसाठी सन १८७३ साली ३०,००० रुपयास विकत मागितली होती कारण हिट

सहर्ष अभिनंदन

नासिक नगरपालिकेच्या शताब्दि महोत्सवा-
निमित्त नगरपालिकेच्या गेल्या शतकातील
प्रगतीबद्दल धन्यवाद पुढेही नगर-
पालिकेची अशीच प्रगती व्हावी
ही सदिच्छा व शुभेच्छा



भिकुसा यमासा क्षत्रिय

प्रायव्हेट लि., सिन्नर.

विडीचे कारखानदार.

सन्माननीय अध्यक्ष



श्री. एन्. व्ही. गोळे
सन १९०९ ते १९१२
सन १९०० ते १९०२, १९०७ ते
१९०९ उपनगराध्यक्ष



श्री. जी. एन्. विंचूरकर
सन १९१५ ते १९१६



श्री. बुधमल केवळचंद
सन १९१६ ते १९१७



श्री. विश्वनाथ गंगाधर केतकर
१९१७ ते १९, १९२३-२४-२६-२७,
१९१२ ते १९१३ उपनगराध्यक्ष



श्री. दत्तात्रेय सदाशिव ओक

सन १९१० ते १९२२

सन १९१७ ते १९१० उपनगराध्यक्ष



श्री. वासुदेव बापुजी अकुत

सन १९२२ ते १९२३

१९२७-२८ उपनगराध्यक्ष



श्री. निळकंठ पांडुरंग पाटणकर

सन १९२७–२८

१९१३ ते १७ उपनगराध्यक्ष



श्री. रा. ब. गोपाळ वामन प्रधान

सन १९२८ ते २९ ३० ते ३१

३१ ते ३२ ३२ ते ३४

श्री. फत्तेचंद चुनीलाल

सन १९३१ ते ३२

म्यु. स्कूलबोर्ड चेअरमन

१-४-२५ ते १-१-२८





श्री. धोंडो त्र्यंबक कोचरगावकर

सन १९३४ ते ३५, ३५ ते ३६



काशिनाथ नारायण केतकर

सन १९३३ ते ३४

१९३१ ते ३२ उपनगराध्यक्ष



श्री. पृथ्वीराज अमोलकचंद निमाणी


१९३५ ते ३६, ३६–३७, ३८–४०,

१९४२ ते ४३, ४५ ते ४६

श्री. आर. जे. पांडे
सन १९३६ ते १९३८



श्री. पांडुरंग बाळशेट चांदवडकर
सन १९४० ते १९५१



श्री. लक्ष्मण सखाराम जाधव
सन १९४१ ते १९५०
स्टँ. कमि. चेअरमन ६-३-४६ ते ३१-३-४८



श्री. जे. ए. लाल
सन १९५३ ते १९५५
२२-३-३७ ते ६-३-४० स्टँ. क. चेअरमन



श्री. रा. ब. हिरामण नारायण शिंदोरे
सन १९४४ ते ४५
१९२३ ते १९३३ उपनगराध्यक्ष
म्यु. स्कूलबोर्ड चेअरमन २-२-२८ ते
१५-६-२८, २८-७-२८ ते ३१-३-३७
१९२३ ते २७, २९ ते ३१, ३१ ते ३२,
३२ ते ३३

श्री. गुलाब हुसेन कोकणी
सन २२-१२-४५ ते १६-३-४६
१९३४ ते १९३६ उपनगराध्यक्ष






श्री. पुरुषोत्तम त्रिंबक मिरजकर
सन १९४७ ते ४८



श्री. एन्. डी. पवार
सन १९४६ ते ४७
१९४१ ते १९४२ उपनगराध्यक्ष



ॲड. मे. चव्हाण
सन १९४८ ते १९५२



श्री. एम्. जे. शाह
सन १९५२ ते १९५३



श्री. मुरलीधर गंगाराम लोणारी
सन १९५३ ते १९५४



श्री. यादवराव गणपतराव वाघ
सन १९५४ ते १९५५ विद्यमान सदस्य



श्री. रामकृष्ण अमृतराव मिरजकर
सन १९५५ ते १९५६
म्यु. स्कूलबोर्ड चेअरमन
५-११-५७ ते २७-१-५९



श्री. सदाशिव गंगाराम भोरे
सन २-४-५६ ते २०-६-५६
१७-५-५८ ते १७-५-५९
विद्यमान सदस्य



श्री. यशवंत सखाराम शुक्ल
सन २८-७-५६ ते १६-५-५७
१९५४ ५५ उपनगराध्यक्ष
विद्यमान सदस्य



श्री. रा. वि. रहाळकर
सन १७-५-५७ ते १६-५-५८

विद्यमान सदस्य



श्री. माधव धमाजी कैरे

१८-५-५९ ते १७-५-६०

विद्यमान सदस्य



श्री. गुलाममहंमद इब्राहीम सा. जीन

७-६-६१ ते ६-६-६२

१९५२ ते १९५३ उपनगराध्यक्ष



श्री. श्रीपत भिकाजी कांडे

१८-५-६० ते ६-६-६१



श्री. शांताराम कोंडाजी वावरे

७-६-६२ ते १७-६-६३

म्यु. स्कूलबोर्ड व्हा. चेअरमन १९-४-५२

ते ४-११-५७ म्यु. स्कूलबोर्ड चेअरमन

२५-११-६१ ते ८-१-६३ विद्यमान सदस्य

धर्मीयेतरांची, त्या योगे सोय होऊ शकली असती. पण तो सौदा नाकारला गेला. वरील दोन तीन योजनाखेरीज, शहरात एकूण ८२५ विहिरी वा आड आहेत. जुन्या गावात सुमारे ५०२, नव्या वस्तीत २७० व पंचवटीत ५३. यांतील ४ फक्त नगरपालिकेच्या मालकीच्या आहेत व त्यातील पाणीही शास्त्रीय दृष्ट्या अशुद्ध ठरले गेलेले आहे.

वरील पाणीपुरवठ्याचे वर्णन वाचून व सध्याच्या पुरवठ्याशी तुलना केल्यास, वाचकांना नगरपालिकेविषयी सहानुभूतीचीच भावना वाटेल. कारण, पावसाच्या दृष्टीने इगतपुरी तालुका सोडल्यास सबंध नाशिक जिल्हा ह्या दृष्टीने अभागी असल्याचे भासते. शेजारचा पेठ तालुका, कळवण, सटाणे, मालेगाव इत्यादि विभाग वरकरणी तपासले तरी पिण्याच्या पाण्याचे सर्वत्र हालच होत असल्याचे अद्यापही आपणास दृश्य दिसते.

● सांडपाणी व गटारव्यवस्था—

शहरातील असमाधानकारक गटार व सांडपाणी व्यवस्था हे येथे मृत्युप्रमाण जास्त का आहे ह्याचे प्रमुख कारण होय. कसबे नासिकातील बऱ्याचशा रस्त्यांना गटारे आहेत पण गटारी फुटणे अथवा अति पावसामुळे भरून वाहणे किंवा घाणीमुळे तुंबून पाणी अितरत्र मुरणे ही नित्याची गोष्ट. काझीपुऱ्यातील गटारव्यवस्था अतिशय निकृष्ट आहे. आदितवार भागात तर गटार पद्धतीच नाही. काही ठिकाणी फरशा टाकून घरातील आंघोळीचे व मलमूत्राचे पाणी भर रस्त्यावर आणून सोडले आहे. अितरत्र ठिकाणी साचलेले पाणी वर्षभरात केव्हातरी उपसले जाते अथवा नाही. उमामहेश्वराच्या देवळाजवळ व सती दरवाजास वाळूत खड्डे खणलेले असून त्यात गटारी सोडलेल्या आहेत. गोरारामाच्या देवळाजवळील तीन गटारी व मुरलीधराच्या कोटाजवळील दोन गटारी गोदावरीच्यापात्रात घाणपाणी आणून सोडीत असतात. नवापुरा भागातील बऱ्याचशा गटारी सरस्वती नाल्यात सोडल्या आहेत. सरस्वती नाल्याच्या दोन शाखा आहेत. पश्चिम शाखा ही नवापुऱ्यातील गटारमार्गी राजेबहाद्दराच्या वाड्यापर्यंन्त आणते. दक्षिण शाखा, कलेक्टर बंगल्यापाशी उगम पावून, त्र्यंबक दरवाजाद्वारा जळक्यावाड्यापाशी पश्चिम शाखेस मिळते. तेथून फरसबंदी मार्गातून वहात बालाजीचे देवळापाशी गटार पाण्यासह ही सरस्वती लुप्त होते. किंवा लौकिक अर्थाने गंगेस मिळते. सबंध हिवाळा व उन्हाळा घाणीच्या पाण्याने प्रवाह व गटार तुंबणे हे नित्याचे दृश्य. कोटामुळे उंचावलेल्या रस्त्याखालून थेट नाव दरवाजापासून सुमारे ११ गटारातून पाणी बालाजीचे देवळापाशी तुंबते. त्यामुळे तेथे एक नैसर्गिक सांडपाणी तलाव झाल्याचे भासते. दुसराही अशाच प्रकारचा तलाव नावदरवाजाजवळ दिसतो. डिंगरआळीतील तसेच बुधवार पेठेतील ९ गटारी व आसरा गेट आणि दिल्ली दरवाजातील गटाराचे पाणी तेथे तुंबते. ते तुंबलेले पाणी दोन मोठ्या लोखंडी पाईपातून नदीच्या मुख्य प्रवाहात टाळकुटे देवळापाशी मिळते.

पंचवटीतील बऱ्याचशा रस्त्यांना गटारव्यवस्था आहे. नारोशंकराच्या देवळाभागील नदीच्या खडकाळ भागात पंचवटीतील गटारे येऊन मिळतात. महार, कोळी, कागाडी, अित्यादींच्या वस्त्यांना गटारव्यवस्था निसर्गानेच पुरवावी असा संकेत आहे.

नगरपालिकेने सुमारे २५०० रु. खर्चून पिंजारघाट, उर्दू बाजार ते काजीपुरा अशा गटारी बांधल्या.

दिनांक २९ सप्टेंबर १८७० च्या रिपोर्टात नगरपालिकेने "गोदावरी"च्या पात्राशेजारी एक मोठा पाणसाठा झाला होता, व त्यांतील दुर्गंधाने आसमंतातील नागरिकांना

अतिशय उपद्रव होत होता. अतएव मातीने तो भाग भरून काढून नागरिकांची मोठी सोय केल्याचा उल्लेख आहे. पंजाब प्रांतातील कपूरथळा संस्थानचे राजे येथे आले असताना, नगरपित्यांनी त्यांना ही अवस्था सांगितली. त्यांनी दिलेल्या उदार देणगीने वरील नगरहित साधले गेले. नदीच्या बाजूने पक्का दगडी कोट बांधण्याचे काम असे क्रमाक्रमाने व अल्प खर्चाने झाले तसेच गटारांना फरसबंदी करण्याचेही काम हळु हळू करण्याचा संकल्प व मानस नगरपालिकेचा असल्याचेही उल्लेखिले आहे.

मैला सफाई व्यवस्था—

रात्रीच्या साठलेल्या मलमूत्राचे खत करण्याची पद्धती नासिक नगरपालिकेने फार यशस्वी रीतीने चालविली होती. शहरापासून सुमारे १ मैल लांब अंतरावर टाकळी रस्त्याच्या बाजूस नगरपालिकेने ५ एकर जमीन ह्या कामासाठी खरेदी केली होती. सुमारे तीस फूट चौरसाचे तीन विभाग पाडले होते. शहरातील सारा केर कचरा जमा करून तो जाळायचा व त्याच्या राखेचा ४ ते ५ इंच थर वरील विभागात पसरला जात असे. शहराचे साठलेले मलमूत्र येथे गाड्यातून आणले जाई व राखेशी फावड्याने मिसळले जाई. पहाटे ४ वाजून ९ वाजेपर्यन्त ५ भंगी हे काम करीत असत. हे मिश्रण जमीनीवर सपाट पसरले जाई व उन्हात तीन दिवसपर्यन्त वाळू दिले जाई. शेवटी ह्या सोनखताचे ढिगारे उभारले जात, व ते खत शेतकऱ्यांना विकले जाई. ही एक फार उपयोगी व नीट उल्लेखावी बाब नगरपालिकेस उपलब्ध झाली. ऐसी पावसाळ्यांशिवाय [illegible] करून खत उपलब्ध न झाल्यास चार [illegible] मिश्रणासाठी वापरले जाई. [illegible] शिवाय पावसाळ्यासाठी राखेचा साठा करणे हाही त्यामागे उद्देश होता. सुमारे १५० फूट लांब व ३० फूट रुंद अशा तीन बाजूंनी मोकळ्या व एका बाजूस बांधलेल्या बखळीत राखेचा हा खताचा साठा केला जात असे. खतात मिसळण्यासाठी राखेचा उपयोग करण्यापूर्वी एका मोठ्या जाळीच्या चाळणी-द्वारा राखेतील खडे, विटांचे तुकडे इत्यादि दूर केले जाई.

पावसाळ्यात देखील ३।४ दिवस ऊन दाखवून खताचा वापर करणे शक्य असल्याने ह्या खतास मोठीच मागणी होती. खतास दर गाडीमागे चार आणे दाम पडत असे. मिस्टर हॅवलेट ह्यांच्यामते मलमूत्राचा नासिक नगरपालिकेने केलेल्या पद्धतीप्रमाणे उपयोग हा भारतीय ग्रामीण पद्धतीस अतिशय योग्य आहे.

१८६९–७० ह्या वर्षीच्या वार्षिक अहवालात नमूद केले आहे की, जनतेच्या सोयीसाठी नगरपालिकेने सप्टेंबर १८६९ पासून खाजगी संडास सफाईचेही काम हाती घेतले. शिवाय थोड्या सार्वजनिक मुताऱ्या व संडासही बांधीत. ह्यामुळे नगरपालिकेचा बांधकामाचा खर्च तर वाढलाच. शिवाय मैला वाहून नेण्यासाठी बैल व गाड्याही विकत घ्याव्या लागल्यात.

१८७० च्या जुलै महिन्यात टाकळी रस्त्यावरील मैला डेपोमध्ये एक भंगी काम करीत असताना, अपघाताने मैल्याच्या साठ्यात पडला. त्यास खूप खटपट करूनही वाचविता आले नाही. विधवा झालेल्या त्याच्या पत्नीस व पोरक्या पोराला नगरपालिकेने रु. १०० बक्षीस दिल्याचा उल्लेख आहे.

● नगरपालिकेची सर्वहितैषी कामे व दृष्टी—

१८५० च्या व १८६२ च्या कायद्यामध्ये नगरपालिका ज्या अनुस्यूत होत्या त्या पूर्वी पाहिल्याप्रमाणे मुख्यत्वे खराटयाची कामे करण्यासाठी त्यानुसार पाणीपुरवठा,

सांडपाणी, मैलासफाई वि० वि० शहर-स्वच्छतेची कामे येथल्या नगरपालिकेने कशा कार्यक्षमतेने केली, ह्याचा वृत्तान्त येथवर पाहिला. यांरीज नागरिकांच्या सर्वांगीण सुख-सोयी व हितासाठी ही नगरपालिका कशी झटत होती, ह्याविषयी १८६९-७० च्या रिपोर्टात काही उल्लेखनीय कामे आहेत.

दिवाबत्ती सोय : पूर्वी शहरात फक्त बारा कंदील होते. आता केरोसीन तेलाचे दिवे शहरात लावावेत असे कमिटीने ठरवल्या-वरून उत्तम प्रकारचे कंदील मुंबईहून आणावे लागलेत. चार नोकराद्वारा सर्वत्र शहरभर १३८५ केरोसीनचे कंदील अंधाराशी झुंज देत प्रकाश फैलावण्याचे काम करीत असतात.

आगीचा बंब: कमिटीच्या ताब्यात एक बंब आहे. नादुरुस्त झाल्या कारणाने कमिटीने रु. ३५-८-० खर्चून त्याची दुरुस्ती करविली.

सार्वजनिक सुखाकरिता गंगानदीच्या काठावर बाके ठेवली होती. सभोवती कुंड्या ठेवून गारवेलाचे मांडव बांधण्याचीही रचना त्यावेळच्या नगरपित्यांना अभिप्रेत होती. बालाजीच्या देवळासमोरील बाके बऱ्याचशा वृद्ध पेन्शनरांनी भरलेली असणे, गंगालहरी-वरून वाहणारा सुखद वारा, त्यांच्या वृत्ती उल्हासित करीत आहे, आणि गत जीवनातील सुखद स्मृतींचा आकंठ भरलेला कढ त्यांना एका गोड भावसमाधीत नेऊन पोहोचवीत आहे, अशा दृश्याची कल्पना करणे फारसे अयोग्य होणार नाही.

१८६९ सप्टेंबरपासून नगरपालिकेच्या कारभाराचेही शास्त्रशुद्ध विभाजन करण्यात आले. म्युनिसिपल कमिटीत वेगवेगळी खाती काढून त्यांनी वेगवेगळी कामे करावीत अशी व्यवस्था केली गेली.

नगरपालिकेच्या स्थापनेपासूनच्या एका दशकांतील कामाचा कामकऱ्यांचा व त्यांच्या समस्यांचा इतिहास येथवर आपण संक्षेपाने पाहिला. १८७२ नंतर नगरपालिकेच्या काय-देशीर घटनेत थोडासा फरक पडल्याने त्याचा इतिहास आपण पुढील विभागात पाहू:

गेल्या १०० वर्षातील नासिक नगरपालिकेच्या उत्पन्नाचा तक्ता

सन	कराचे उ.	इतर उत्पन्न	एकूण	सन	कराचे उ	इतर उत्पन्न	एकूण
१८६४-६५			६९१६	१८७५-७६			३७४७५
१८६५-६६			६९०२	१८७६-७७			३४२३२
१८६६-६७			८६४०	१८७७-७८			३४३८३
१८६७-६८			८७९६	१८७८-७९			३५०७८
१८६८-६९			८६२३	१८७९-८०			४१३३५
१८६९-७०			८८२४	१८८०-८१			३८५०९
१८७०-७१			४७६०२	१८८१-८२			४५०४३
१८७१-७२			४३९६२	१८८२-८३			५५६६३
१८७२-७३			५१७९२	१८८३-८४			५२७७५
१८७३-७४			४०२८०	१८८४-८५			७४६७३
१८७४-७५			३९६५४	१८८५-८६			१०२२२२

सन	कराचे उ.	इतर उत्पन्न	एकूण	सन	कराचे उत्पन्न	इतर उत्पन्न	एकूण
१८८६-८७			५१५२१	१९२६-२७	२०८६५४	८४३१४	२९२९६८
१८८७-८८			५१७०८	१९२७-२८	२३८४००	७९३०४	३१७७०४
१८८८-८९			४९४००	१९२८-२९	२४२४७०	७७१६१	३१९६३१
१८८९-९०			४९६९८	१९२९-३०	२६३२३०	७४७६२	३३७९८२
१८९०-९१			५७२९२	१९३०-३१	२४६०८०	८५३२४	३३१४०४
१८९१-९२			६३००१	१९३१-३२	२५१८५९	१००३५४	३५२२१३
१८९२-९३			५८५६२	१९३२-३३	२३४३४०	९८६८३	३३३०२३
१८९३-९४			५९८०९	१९३३-३४	२४२८६०	९५६२२	३३८४८२
१८९४-९५			११४०१२	१९३४-३५	२८६०१५	९२८५२	३७८८६७
१८९५-९६			१०२६३४	१९३५-३६	२९६२१४	९५९३७	३९२१५२
१८९६-९७			८९२०४	१९३६-३७	२७०८४४	६९९२७	३४०७७१
१८९७-९८			८५३१२	१९३७-३८	३०३७७४	७६५३६	३८०३१०
१८९८-९९			५९३९४	१९३८-३९	२९२५३८	९४२३०	३८६७६८
१८९९-०			८०५७९	१९३९-४०	२८१४७३	१३३१२८	४१४६०१
१९००-१			५४३७८	१९४०-४१	३२८३७३	१६१८३२	४९०२०५
१९०१-२			८१३६६	१९४१-४२	३४२४६७	१८५२३७	५२७७०४
१९०२-३			५८६६०	१९४२-४३	३३२०५५	२६६६९९	५९८७५४
१९०३-४			७२८३४	१९४३-४४			६०५६३८
१९०४-५			७०७४५	१९४४-४५			८४३१०२
१९०५-६			७७९८५	१९४५-४६	४३००२३	४१४९४०	८४४९६३
१९०६-७			७९९६३	१९४६-४७	५७८७३२	३४१४८७	९२०२१९
१९०७-८			६८५६३	१९४७-४८	७८०९७३	४१८९६२	११९९९३५
१९०८-९			१११६०३	१९४८-४९			१२८३५८२
१९०९-१०			१६५२८८	१९४९-५०			२१४०८८९
१९१०-११			१२१२२५	१९५०-५१	१२४३३६०	८२२७६५	२०६६१२५
१९११-१२			१२१९२५	१९५१-५२	१३४५००६	६५६९७५	२००१९८१
१९१२-१३			१०६६८७	१९५२-५३	१३७६४६१	६२११३१	१९९७५९२
१९१३-१४			११६३८०	१९५३-५४	१३३७२९५	१०२१२००	२३५८४९५
१९१४-१५	८२७८३	२६५०२	१०९२८५	१९५४-५५	१४३६३४१	९५८०९६	२३९४४३७
१९१५-१६	९४९४७	२९३१५	१२४२६२	१९५५-५६	१४२९०५३	९५३५४३	२३८२५९६
१९१६-१७	९९०१४	२३७७३	१२२७८७	१९५६-५७	१६८०४५९	१२०३७२०	२८८४१७९
१९१७-१८	१०६८१९	२९८३७	१३६६५६	१९५७-५८	१६६०५४१	९०४६८९	२५६५२३०
१९१८-१९	११९६४४	३५८९६	१५५५४०	१९५८-५९	१८८७२९४	११३८७०५	३०२५९९९
१९१९-२०	१४३४८१	७२२४१	२१५७२२	१९५९-६०	१९७०८४१	११९०६२०	३१६१४६१
१९२०-२१	२४६२९७	११३९८८	३६०२८५	१९६०-६१	२०९८४६६	१२३०३७८	३३२८८४४
१९२१-२२	२०९६२६	६४१८७	२७३८१३	१९६१-६२	२११६७००	१२४५८०४	३३६२५०४
१९२२-२३	१६०८७७	७६५७४	२३७४५१	१९६२-६३	२४८७००३	१६११९६४	४०९८९६७
१९२३-२४	१७९००७	१६०९१२	३३९९१९	१९६३-६४	३०५१५१८	११६०७२९	४२१२२४७
१९२४-२५	२५५६२०	७६७९१	३३२४११	१९६४-६५	३१५७१००	१०९७३५१	४२५४४५२
१९२५-२६	२३८२९६	६८८५४	३०७१५०	(अंदाजीत)			

द्वितीय कालखंड
१८७४ ते १९०१
विभाग दुसरा

● **विकेंद्रीकरणाचे नवे धोरण–**

१८७० साली हिंदुस्थानातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या जीवनात एक महत्वाचा बदल झाला. भारताचे गव्हर्नर जनरल लार्ड मेयो ह्यांनी प्रांताच्या आर्थिक पुनर्घटनेची योजना आखली. शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक रस्ते इत्यादि खाती मध्यवर्ती सरकारने कारभारासाठी प्रांतिक राज्याकडे सोपविली. या कामासाठी होणाऱ्या खर्चापैकी काही हिस्सा मध्यवर्ति सरकार प्रांत सरकारांना देई व बाकीची रक्कम कर रूपाने आपापल्या राज्यात उभारावी असे ठरवून दिले. या प्रमाणे प्रांतिक सरकारांचे उत्पन्न व खर्च निश्चित झाल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अर्थव्यवहाराला निश्चितपणा येऊ लागला. प्रांतिक वा स्थानिक संस्थांच्या प्रगतीचा कणा म्हणजे त्यांची सांपत्तिक स्थिति. ती या कायद्याने निश्चित झाल्याने त्यांची भविष्यकालीन वाटचालहि निश्चित झाली. The operation of this resolution in its full meaning and integrity will afford opportunities for the development of self Government for strengthening municipal institution and for the association of Natives and Europeans to a greater extent then heretofore in the administration of affairs. असा जो आशावाद लार्ड मेयोच्या ठरावात प्रकट होता तो बराचसा सफल झाल्याचे आढळते.

● **१८७३ चा म्युनिसिपल अॅक्ट–**

लार्ड मेयो ठरावानुसार १८७३ साली मुंबई सरकारने एक कायदा पास केला. या कायद्यानुसार मुंबई राज्यातील नगरपालिकांच्या क्षेत्रात तीन बदल घडले.

या कायद्याने प्रथम नगरपालिकांचे दोन प्रकार पडले. दहा हजाराहून जास्त लोकसंख्या असलेल्या गावातील नगरपालिका मोठी नगरपालिका (City Municipality) म्हणून संबोधण्यात आली, व २००० ते १०,००० लोकसंख्येच्या गावातील नगरपालिकेला छोटी नगरपालिका (Town Municipality) म्हणून ओळखण्यात येऊ लागली. छोट्या नगरपालिकेसाठी दोन हजार लोकसंख्येचे जे बंधन घालण्यात आले हे पूर्वी नसल्याने अत्यंत लहान खेड्यातसुद्धा नगरपालिका स्थापल्या गेल्या होत्या. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला गावची नगरपालिका ही १८५० सालच्या कायद्याप्रमाणे स्थापली गेलेली मुंबई इलाख्यातील पहिली नगरपालिका. तिचे उत्पन्न वर्षाला ८८ रुपये होते. त्यातील बहुतेक भाग पट्टेवाल्याच्या पगारासाठीच खर्च होई.

या कायद्यानुसार दुसराही एक महत्वाचा बदल झाला. इ. स. १८५० ते १८७२ पर्यंत या प्रांतातील सर्व नगरपालिका सरकारनियुक्त

सभासदांच्या ताब्यात होत्या. या कायद्यानुसार असा नवा बदल झाला की, सरकारला योग्य वाटल्यास नगरपालिकेच्या निवडणुका घेण्यात येतील व अशा लोकनियुक्त सभासदांच्या हातात नगरपालिकांचा कारभार सोपविण्यात येईल. निवडणुकीचे तत्त्व कायदेशीररीत्या का होईना या वेळी प्रथम मान्य करण्यात आले. अर्थात या कलमाची अंमलबजावणी मुंबई प्रांतात कोठेच झाली नाही.

याशिवाय तिसरा बदल म्हणजे या कायद्यान्वये नगरपालिका ह्या 'कार्पोरेट बॉडीज' ठरल्या. त्यांच्या स्थावर मिळकतीवर त्यांची संपूर्ण मालकी प्रस्थापित झाली. या पूर्वी ही मालमत्ता 'सरकारी मालमत्ता' मानली जात असे.

● १८८२ चा कायदा--

या कायद्याने स्थानिक लोकशाहीच्या जीवनातील दुसऱ्या पर्वास प्रारंभ झाला. राज्यकर्त्या इंग्लंडच्या राजकीय जीवनातील वैचारिक व सामाजिक वावटळी ध्यानात घेता १८८२ चा कायदा किंवा लॉर्ड रिपनचा ठराव या भाषेत प्रचलित असलेल्या ह्या कायद्यामागे उदारमतवादी पक्ष (Liberal) राज्यकर्ता झाल्याची घटना आहे. १८३३ पासून इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारातून स्वातंत्र्य, समता व व्यक्तिवादाची जीवनमूल्ये आमच्याही मनावर प्रभाव पाडीत होती. राजकीय स्वातंत्र्याची व प्रखर राष्ट्रवादाची प्रेरणा आमच्या समाजास त्यातून प्राप्त होत होती.

' या असंतोषाला वेळीच वाट मोकळी करून देणे हे मुत्सद्देगिरीचे ठरेल ही वाफ तुम्ही कोंडून ठेवू पाहाल तर ती तोंड फोडून बाहेर आल्याशिवाय राहणार नाही,' असा इशारा देणारे लॉर्ड रिपन हे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या दृष्टीने भारताच्या इतिहासात प्रभावी स्थानी आहेत.

१८८२ पर्यंत स्थानिक स्वराज्य संस्थांचा कारभार सरकारनियुक्त सभासद व सरकारी नोकर ह्यांच्या ताब्यात होता. शिवाय जिल्हाधिकारी या संस्थांचे पदसिद्ध अध्यक्ष असत. या कारणामुळे स्थानिक स्वराज्य संस्था इतर सरकारी खात्याप्रमाणेच एक खाते म्हणून गणले जाई. लॉर्ड रिपन यांनी हे धोरण बदलून प्रथमच लोकनियुक्त सभासदांच्या हातात या संस्था दिल्यात.

स्थानिक स्वराज्य संस्था आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी व संपन्न असाव्यात. स्थानिक स्वराज्य संस्थांना ही स्थिती लाभेपर्यंत प्रान्तिक सरकारांनी त्यांना सढळ हाताने मदत करावी असेही लॉर्ड रिपनने सुचविले. या आर्थिक धोरणानुसार स्थानिक स्वराज्य संस्थावर सरकारने फक्त बाहेरूनच नियंत्रण ठेवावे. तिच्या अंतर्गत कारभारात त्यांना स्वायत्तता द्यावी, असाही अर्थ रिपनना अभिप्रेत होता.

१८८२ च्या लॉर्ड रिपनच्या कायद्यात प्राथमिक शिक्षणाचे काम स्थानिक स्वराज्य संस्थाकडे द्यावे अशी तरतूद होती. मुळातील मध्यवर्ति सरकारकडे असलेले हे खाते लॉर्ड मेयोंच्या सूचनेनुसार प्रान्तिक सरकारकडे गेलेले होते. पण शिक्षण ही नुसती खर्चाची बाब आहे. त्यात अर्थलाभ काही नाही. त्यामुळे प्रान्तिक सरकारे ह्याबाबत नेहमी उदासीन असत. लॉर्ड रिपनने हे काम स्थानिक स्वराज्य संस्थाकडे देऊन शिक्षण प्रसारास मोठीच चालना दिली. १८८२ च्या कायद्यानुसार नगरपालिकांच्या कर्तव्यांची कक्षाही बरीच वाढली. उदाहरणार्थ--

१) सार्वजनिक आरोग्य, झाडलोट, मैलापाणी, वाहतूक, स्मशानव्यवस्था, जन्ममृत्यु नोंद, सार्वजनिक संडास, मुताऱ्या, सार्वजनिक दवाखाने, देवी टोचण्याची सोय.

२) सार्वजनिक रस्ते, बांधकाम, मंडई बांधणे, रस्ते दुरुस्ती, पाणी पुरवठा अि०

३) सार्वजनिक सुरक्षितता व उपयुक्त कामे, दिवाबत्ती आगीचा बंदोबस्त, पिसाळ-

लेल्या कुत्र्यांपासून बचाव, वेडे व संसर्गजन्य रोग्यांची सोय अि.

नगरपालिकांची स्थित्यंतरे त्यातील लोक सत्तेचा अंश व कामाची वाढ, ह्यांचा येथ-पर्यन्त जराशा विस्ताराने आढावा घेतला. कारण १८८२ च्या कायद्याला व त्यामागील प्रेरकांना महत्वच मोठे आहे. यानुसार नासिक नगरपालिकेत फरक काय व कसे घडलेत ह्यांचा पडताळा बघणे जास्त मनोरंजक आहे.

● **नासिक नगरपालिका ' डिस्ट्रिक्ट ' नगरपालिका होते–**

१८७३ चा डिस्ट्रिक्ट म्युनिसिपल अॅक्ट पास झाल्यानंतर त्याच्या कलमाची अंमल-बजावणी करण्यासाठी नासिकच्या कलेक्टरास लिहिले गेले. त्याच्या शिफारसीनुसार सर-कारी ठराव नंबर २७६३ दिनांक २३ सप्टें-बर १८७४ रोजी पास झाला. त्यायोगे...

१) नासिक नगरपालिका हो सिटी म्युनिसिपालिटी म्हणून ओळखली जावी.

२) सप्तशृंगी व दिंडोरी येथील नगर-पालिका रद्द व्हाव्यात.

२) त्र्यंबकेश्वर नगरपालिका बंद करण्याबाबतची सूचना अग्राह्य ठरावी. (कारण ते तीर्थक्षेत्र आहे.)

४) मनमाड येथीलही नगरपालिका रेल्वे स्टेशन असल्यामुळे बंद करू नये.

या आज्ञेनुसार नासिक नगरपालिकेचे पदाधिकारी म्हणून.

पदसिद्ध अधिकारी --

१) अध्यक्ष– नासिक कलेक्टर.

२) उपाध्यक्ष– नासिकचे असिस्टंट कलेक्टर.

बिन सरकारी नियुक्त सभासद—

३) मिस्टर इ. टी. रिचर्डसन

४) मिस्टर आर. प्रॉक्टर सिम्स

५) मिस्टर नारायण आप्पाजी वाड

६) मिस्टर सखाराम मायराळ देशपांडे

७) मिस्टर बी. बर्न्स

८) मिस्टर सोनाजी मोरेश्वर वकील

९) मिस्टर मीर गजाफर अली ऊर्फ नन्हे मिया

१०) मिस्टर बानाचंद हिराचंद

११) मिस्टर केवलचंद खूपचंद

१२) मिस्टर बयरामजी जहागिरजी

१३) मिस्टर त्र्यंबक श्रीपाद यार्दी

१४) मिस्टर बाळकृष्ण बावाजी फाटक

या कायद्याने नाशिक शहर नगरपालि-केतील पूर्वीच्या १६ नियुक्तांची संख्या १२ वर आणल्याचे आढळते.

लोकवस्ती हा दंडक **१८७३** च्या काय-द्याने प्रथमच मानला गेल्याने नाशिक शह-राच्या लोकवस्तीचे शिरगणतीनुसार आकडे खाली दिलेल्या तक्त्यात आहेत.

नासिक शहराची लोकसंख्या

शिरगण-तीचे वर्ष	लोकसंख्या	शेरा
१८६४	२२,०००	अंदाजे
१८७१	२२,४३६	
१८८१	२४,१०१	
१८९१	२४,४२९	
१९०१	२१,४९०	
१९११	३०,१११	४०%लोकसंख्येत वाढ
१९२१	३८,२११	
१९३१	४५,७४४	
१९४१	५२,३८६	
१९५१	९७,४०८	
१९६१	१,३०८०४	१,३१,२०३

२२·५ चौरस मैल शहर विस्तार

नाशिक शहरातील लोकवस्तीची धार्मिक श्रद्धानुसार विभागणी ३ ऑगस्ट १८७४ रोजी खालीलप्रमाणे होती :

हिन्दु– – – – – – –	१८,४७३
मुसलमान – – – – –	३,१४८
बुद्ध – – – – – – –	२५०
खिश्चन– – – – – –	५३५
अितर – – – – – –	२८
एकूण	२२,४३६

● नासिक नगरपालिकेचे कामकाज –

मुंबई सरकारच्या आरोग्य खात्याने विचारलेल्या प्रश्नावलीला नासिक नगरपालिकेने दिनांक २३ एप्रिल १८७५ रोजी जी उतरावली पाठविली त्यातून तत्कालीन नगरपालिकेच्या कामकाजाची चांगली माहिती लाभते.

१) नासिक नगरपालिकेचे वार्षिक उत्पन्न १८७४-७५ साली ३८२३१ रु. १२ आणे ६ पै होते. हे उत्पन्न येथील वस्तीच्या दरडोई **१** रु. **११** आणे ३ पै या सरासरीने पडे. साफसफाईचा खर्च दरडोई १३ आणे ९ पै एवढा पडत असे.

२) साफसफाई खात्याचा तपशील खालील **प्रमाणे** आहे.

(अ) मैला वाहून नेणे. या कामासाठी चार सागवानी लाकडाच्या पण जस्ती दरवाजे असलेल्या गाड्या असून खाजगी शौचकुपातील १४ किलोवॅट व सार्वजनिक शौचकुपातीस १० किलोवॅट मैला प्रतिदिनी वाहून नेतात.

मैला साठविण्यासाठी चार डेपो आहेत. (पूर्वी टाकळी रस्त्यावर असलेला एकच होता.)

१) पंचवटी. २) घारपुरे घाट, ३) दुर्गादेवी व ४) टाकळी रोड.

गटारातील घाण सफाईसाठी एक गाडी असून, सकाळी ५ ते दुपारपर्यंत सरासरी १० खेपात घाण वाहून नेण्याची सोय केली आहे.

एकूण १९ सार्वजनिक संडास नगरपालिकेने बांधलेले असून तदुपरांत १४ तात्पुरते संडासही उभारले आहेत.

रस्त्यावर दिवाबत्तीची सोय करण्यासाठी प्रत्येक दिव्यामागे, दरवर्षी नगरपालिका १४ रु. ९ आ. १० पै खर्चीत आहे

खर्च		रु. आ. पै.
रस्ता रोषणाई		३०१०–१०–५
गटार सफाई	,,	९६८– ५–५
भंगी व मैला सफाई	,,	१२४५१–१४–२
रस्ते दुरुस्ती व सफाई	,,	५५२९– ८–०
रस्त्यावर पाणी शिंपणे		४२०– १–१
		२२३८०– ३–१

● पिण्याचे पाणी–

हिंदु मुख्यत्वे करून गोदावरीचेच पाणी पितात, इतर धर्मीय त्र्यंबकदरवाजाजवळ असलेल्या पाणपोईचा उपयोग करतात. नवीन कोठलीही पाणी पुरवठा योजना हाती घेतलेली नाही. पाणी पुरवठा खात्यावर जेमतेम रु. २५०–९–० इतका खर्च झाला आहे.

● स्मशान व्यवस्था–

शहरात हिंदुसाठी प्रेते जाळण्याची सोय खालील ठिकाणी आहे.

१) घारपुरे घाट, २) आनंद दरवाजा ३) दुर्गादेवी.

मुसलमान, पारशी, इत्यादि धर्मियेतर प्रेत संस्कार डाक बंगल्याच्या बाजूस उरकतात.

● बाजार वगैरे व्यवस्था–

१८७० साली त्र्यंबक दरवाजाबाहेर एक मोठी जागा नगरपालिकेने १० वर्षाच्या करारान भाड्याने घेतली होती. ह्या जागेवर भाजी बाजार वगैरे भरवून निकडील रहिवाशांची सोय करावी असा कमेटिचा उद्देश होता.

परन्तु व्यापारी लोक तेथे जाईनात,' गंगा किनारी तसेच रस्त्याच्या कडेनेच तीर्थकरी व प्रवाशी गिऱ्हाइके लाभण्याची संधी व शक्यता असल्याने, धान्य, किराणा व भाजी व्यापाऱ्यांची ओढ व अव्यवस्था तेथेच भारी सापडे. विशेषे करून बुधवार व शनिवार या बाजारांच्या दिवशी आजुबाजूचे खेडूतही बाजारासाठी येत व खरेदी विक्री, लिलाव, जनावरांची देवाण–घेवाण यासाठी गर्दी करीत.

या व्यापाऱ्यांच्या असहकारामुळे नगर–पालिकेने भाड्याने घेतलेल्या जागेचा उपयोग शेवटी त्यातील काही भाग द. म. ७ रु. भाडे कराराने देऊन केला. उरलेल्या भागात पर–गावाचे तसेच स्थानिक भाडेकरु तांगे, बैल-गाड्या यांच्यासाठीं स्टॅंड करण्याचे ठरविले. परन्तु या बाबतचा सरकारी कायदा नाशिक शहरास मुंबई सरकारने लागू न केल्याने ती जागा पडून राहिली. तथापि शहरात जी खाटिक लोकांची दुकाने वगैरे आहेत, ती इकडे कोठे तरी आणावी अशी निकड आहे. सध्या राहात्या घरीच खाटिक लोक जनावरे मारतात, व मटनाचा व्यापार करितात, त्यांच्यासाठी वेगळा बाजार बांधून देण्याचा मनसुबा कमिटी चा आहे.

● देवी टोचण्याबाबत–

भारतीयास आरोग्यविषयक अनास्था व नागरिकी संवयी अजिबात नसल्याचे तत्कालीन इतिहासावरून दिसतेच. उलट या दृष्टीने ब्रिटीश सरकारने जे जे म्हणून सुरु करावे, त्या विषयी अपग्रह करण्याची, व दुराग्रहाने पारं–पारिक अनास्था चालू ठेवण्याची प्रवृत्ती अनेक घटनातून व पुराव्यातून सिद्ध होते.

साऱ्या भारत देशात देवीच्या रोगाने असंख्य मुले माणसे दगावत. त्यासाठी प्रति-बंधक लस टोचून घेण्याविषयी जो जो ब्रिटीश अधिकारी आग्रह व चिकाटी धरीत तो तो भारतीय जनता त्यांच्याकडे साशंकतेने पाहून त्यापासून दूर पळण्याचा प्रयत्न करी. त्याचे एक बोधप्रद चित्र वाचकाम येथल्या नगर–पालिकेच्या प्रयत्नातून आढळते. नगरपालिकेने देवी टोचण्याच्या कामासाठी एक देवीडॉक्टर

परिशिष्ट

नासिक नगरपालिका– आरोग्य खाते

(दि. १० ऑगस्ट १८८०)

नोकर संख्या	हुद्दा	द. म. पगार	शेरा
१	हेल्थ सुपरिटेंडेंट	१२५	
१	कारकून	२०	
१	इन्स्पेक्टर	१५	
१	सब इन्स्पेक्टर	१२	
८	मुकादम	८	
१	ऑफिस शिपाई	७	
१	सुतार	१५	
१५	रस्ते झाडणारे	७	गाडीवानासह
१४	,,	६	
२	,,	५	
१५	,, स्त्री नोकर	४	
२०	,, ,,	३	
७	भंगी मैलावाहूननेणारे	१०	
३८	,, ,,	८	
३	,, ,,	७	
६	,, ,, स्त्री नोकर	६	
२०	,, ,, (,,)		
१	भिस्ती	१०	सार्वजनिक संडास व मुताऱ्या सफाईसाठी
८	दिवेलावण्यासाठी	८	पाणी पुर-वठ्यासाठी
२३	बैल (नगरपालिका मालकीचे)		

सही–जॉन स्वेअर
हेल्थ सुपरिटेंडेंट
नासिक नगरपालिका

नेमलेला होता. त्याला मदतनीस म्हणून एक शिपाई असे ठराविक कालान्तराने वस्तीवस्तीतून गावागावातून हिंडून देवीची लस टोचण्याचे काम जिल्हा आरोग्याधिकाऱ्यामार्फत नियंत्रित होत असे. नगरपालिकेच्या एका देवी डाक्टराचे हाताखाली असलेला शिपाई हा वृद्ध लष्कर निवृत्त मनुष्य. तो अकार्यक्षम वाटल्यावरून नगरपालिकेने त्यास कमी केले. देवी डॉक्टराना बदली शिपाई पुरवलाच पाहिजे, अशी लेखी तक्रारवजा शिफारस नासिकच्या असिस्टंट सर्जनने कलेक्टराना केली. त्यातील विचार व कारणे मोठी मनोरंजक आहेत.

"माझ्या अवलोकनाप्रमाणे नासिकची जनता अजूनही देवी टोचून घेण्यास विरोध करीत आहे. त्या वेळी मुलेच नी सबब सांगून देवी टोचण्याचे वेळी लोक टाळत असतात. उदाहरणार्थ– मुलाला घरातच दडवून ठेवणे आणि परगावी पाठविल्याचे सांगणे. अशा वेळी दडलेल्या अथवा खोटयाच गायब झालेल्या पोराना खेचून बळजबरीने बाहेर आणण्यासाठी, देवी डाक्टराकडे शिपायाची सक्त जरूरी आहे. अतएव कलेक्टरांनी एखाद्या हुषार व कार्यक्षम शिपायाची नेमणूक तातडीने करुन देवी टोचण्याच्या ह्या आरोग्यविषयक हितकर कार्यास हातभार लावावा." वार्षिक अहवाल दिनांक १५ जून १८७४. कालांतराने देवी डाक्टराना महंमद नावाचा एक शिपाई पुरवला गेला, हे खरे पण वरील साध्या प्रसंगातून तत्कालीन समाजाच्या धारणेवर मात्र विदारक प्रकाश पडतो.

लोकांचा कर विरोध हा कित्येक प्रसंगी कसा अनाठायी व आडमुठा असतो ह्या विषयीचा ३ मे १८७४च्या "नासिक वृत्त" ह्या साप्ताहिकातील उताराही असाच बोलका आहे.

गोदावरीचे पात्रातील पाणी, या शहरात फार खोलवर गेलेले आहे. तरी देवीच येथल्या नगरपालिकेने ते स्वच्छ व वाहते ठेवण्याची पराकाष्ठा केलेली आहे. नगरपालिकेच्या असल्या व इतर मुख्द तसेच हितकर कार्याची प्रशंसा करणारे येथील पौरजन, नगरपालिकेने बसविलेल्या भगीपट्टीबद्दल मात्र एवढा गहजब का करीतात हे समजू शकत नाही. आमचे तर असे स्पष्ट मत आहे की, इतर सुखसोयी समाधानकारक पद्धतीने व अंशानी पुरविणाऱ्या नगरपालिकेच्या भगीपट्टीस विरोध करतांना नागरिकांनी विवेक बुद्धी बाळगावी. ज्या ज्या वेळेस नगरपालिकेने अहितकारक कृत्ये केलीत, त्या त्या वेळी आमच्या साप्ताहिकातून आम्ही कर्तव्य बुद्धीने टिका केली आहे आणि नगरपालिकेने ही चूक सुधारून आम्हास प्रतिसाद दिला आहे.'

● १८८२ चा कायदा आणि नासिक नगरपालिका–

लॉर्ड रिपन याना भारतीय स्थानिक स्वराज्य संस्थाचे जनक म्हणून मानले जाते कारण त्यांनी विकेंद्रीकरणाच्या धोरणाचा अवलंब केला. लोकशाहीची प्रतिष्ठा राखली. सरकारी नोकर व सरकार–नियुक्त सभासदाच्या हाती बटीक म्हणून वापरल्या जाणाऱ्या नगर संस्थामध्ये लोक प्रतिनिधींना प्रतिष्ठा १८८२ नतर मिळाली. तदनुसार १८८३, १८८६मध्ये लोक नियुक्त सभासद नगरपालिकेचे काही अंशानी सूत्रधार बनले.

● त्या गाजलेल्या निवडणुका–

नगरपित्याची निवडणूक (मर्यादित मतदार संघातर्फे का होईना) ही भारतीयांना मोठी नावीन्याची बाब वाटली. तत्कालीन वृत्तपत्रांचे, साप्ताहिकाचे रकानेच्या रकाने भरून येऊ लागले. विनंति पत्रके, मतदानाचा आग्रह करणारी आग्रह पत्रके व काही निस्पृह, निर्भिड चिकित्सा करणारी आवेदने नासिक शहरातील जुन्या नागरिकांजवळ आढळतात

१८८९ साली २ फेब्रुवारीस लोकनियुक्त १२ सभासदांच्या निवडणुका झाल्यात. आदल्या दिवशी "स्थानिक स्वराज्य" नावाचे एक पत्रक लोकहितचिंतकाच्या सहीने प्रसिद्ध झालेले वाचनात आले. त्यातील तोंडाळपणा जरी बराच बोचक असला तरी तत्कालीन कार्यपद्धतीवर व कार्यकर्त्यांवर प्रकाश झोत टाकणारा आहे.

"पुलावाचून आज किती नुकसान झाले, होत आहे व पुढेहि होईल. परंतु ते होऊ देण्यास सर्वस्वी कारण हेच नगरपिते होत. यात्रेकऱ्यांवर कर कधीही कायम झाला नसता, परंतु ह्या आपमतलबी लोकामुळे तो कायम झाला. ही गोष्ट सर्व लोकांचे मताविरुद्ध झाली व त्यापासून सर्वास अतिशय त्रास व अडचणी सोसाव्या लागल्यात व लागतील. कमिटीतला पैसा आपला खरा. परंतु त्यापासून दिवाबत्ती व शौचकूप या भोंपीपलीकडे आपणास कांही उपयोग होत नाही. शौचकूप तेही नीट साफ होत नाहीतच. गटारींच्या मोऱ्या व सडका यांच्या दुरुस्तीचे नावाने नन्ना. इतकेहि करून" हलवायाच्या दुकानावर फाटचा "या न्यायाने कमिटीच्या पैशाची पाहिजे तशी उधळपट्टी हे करीत आहेत. इस्पितळाचे खर्चास साल्हीना दोनशे रुपये देण्याचे ठरले. तसेच इस्पितळाची इमारत बांधण्यास दहा हजार रुपये खर्ची घातले. डफरीन फंडास दरसाल अडीचशे रुपये कमिटीचे पैशातून देण्याचे ठरले. परंतु लोकांना त्याचा बिलकूल उपयोग नाही. कमिटीच्या पैशानले पाचशे रुपये तरी शोभेच्या दारुपायी व पानसुपारी याचे खर्चात लंवे होत असले तरी हे यत्किंचित् मागेपुढे पाहणार नाहीत. या करिता जनहो वेळेवर सावध व्हा, चांगले लोक निवडून देण्यात सुस्त राहूं नका".

अशा रीतीने जनतेस इशारा व उमेदवारांच्या गुण दोषांचे निरूपण देखील आपणास वरील पत्रकात आढळले

लोकांच्या भोईसाठी खाली लिहिल्याप्रमाणे मेंबराचे गुण दोष स्पष्टपणे दिले आहेत.

१) रावसाहेब कचरदास मयाराम– सत्यप्रिय, इमानी, निस्पृह आणि खटपटी, लोकमत न मोडणारा.

२) रावसाहेब वासुदेव बाळकृष्ण टाकळकर– वाणेदार, सत्यप्रिय व कोणाचा न बांधलेला.

३) रावसाहेब गंगाधर नरसिंह केतकर– हुषार, सुस्वभावी, लोकांचे बऱ्याकरता झटणारा व बाकबगार.

४) रावसाहेब पुरुषोत्तम सदाशिव मटंगे– आस्थेवाईक, झटून काम करणारा, मेहनती, निस्पृह व हुषार.

५) रावसाहेब श्रीधर गोपाळ पट्टेकर– वाणेदार, खटपटी, सत्यप्रिय व हुषार.

६) रावसाहेब सीताराम दामोदर भोंडे– सरळ स्वभावाचा, सत्यप्रिय, व स्वतंत्र निवडला जाण्यास लायक.

७) रावसाहेब लक्ष्मण रामराव मुकेणकर– हुषार. सरळ बुद्धीचा, लोकमत न मोडणारा,पंचवटीत निवडला जाण्यास लायक.

या खेरीज सुमारे २१ उमेदवारांचे गुणदोष वर्णन अत्यंत प्रखर व अशिष्ट भाषेत असल्याचे आढळले. अर्थात् निवडणुकीच्या प्रचारातल्या वाङ्मयाची चिकित्सा फारशी करण्यासारखी नसते. बहुधा त्यातून तळमळीपेक्षा मळमळच फार असल्याचा सध्याच्या लोकशाहीत आपणास प्रत्यय येतोच. वरील वाङ्मय मर्यादित उल्लेखित करावयाचा उद्देश एवढाच होता की, भारताच्या त्या कालीन समाजात निवडणुकीचे नावीन्य, लोकांतील राजकीय जागृतता, समाजहित बुद्धि, परकीय राजकर्त्यांशी वागण्याची पद्धति इत्यादि गोष्टीविषयी आपणास थोडीशी माहिती उपलब्ध होऊ शकते. खेरीज लोकशाहीच्या प्राथमिक

अवस्थेतील 'नेत्यांची पखरण' कशी माळली जात होती त्याचेही अवलोकन करविण्याचा हेतु आहेच. लोकशाहीच्या यशासाठी नेतृत्वाची जोपासना अत्यंत आवश्यक असते. येथील स्थानिक स्वराज्य संस्थांचे नेतृत्व अशा रीतीने जोपासले जात होते. शेवटी २ फेब्रु. १८८९मध्ये निवडणुका होऊन, खालील नगरपिते यशस्वी म्हणून निवडून आले.

वार्ड नं. १–रावसाहेब वी. डी धुमाळ, मते २९. (एकूण तीन स्पर्धक)

वार्ड नं. २–रावसाहेब रामदास सयाराम मते ६१ (एकूण दोन स्पर्धक)

वार्ड नं ३–मिस्टर गोपाळराव त्र्यंबक फडके मते ४३ (एकूण तीन स्पर्धक)

वार्ड नं. ४–रावसाहेब पी एस. मटगे मते ५२ (एकूण चार स्पर्धक)

वार्ड नं. ५ रावसाहेब जे. आर. निवकर मते ३१ (एकूण चार स्पर्धक)

वार्ड नं ६ रावसाहेब एम्. टी. पिपळे मते ६७ (एकूण पाच स्पर्धक)

वार्ड नं. ७–रावसाहेब वासुदेव हरी निरंतर मते ४९ (एकूण सहा स्पर्धक)

वार्ड नं८-मिस्टर जी. आर मुठे मते ५० (एकूण सहा स्पर्धक)

वार्ड नं. ९- मिस्टर एम्. जी पळशीटकर मते ५० (एकूण तीन स्पर्धक)

वार्ड नं १०–मिस्टर अहमदसाहेब बद्रुद्दीन मते ४१ (एकूण दोन स्पर्धक)

वार्ड नं. ११–मिस्टर दाजी विष्णु केतकर मते १३ (एकूण दोन स्पर्धक)

वार्ड नं. १२–रावसाहेब वा. आ. टाकळकर मते ४३ (एकूण स्पर्धक एक)

१८८२ सालापासून दर तीन वर्षांच्या अंतराने कायद्यान्वित संस्थेसाठी लोकप्रतिनिधींच्या निवडणुका १९४८पर्यंत अव्याहतपणे होत आल्याचे ध्यानी घ्यावयास हवे

● "नासिक शहराचा प्रबोधन काल'

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धातील भारतात एक प्रकारचे नवे प्रबोधन (Renaissance) होत होते. या देशाची राजकीय ग्लानी संपून एक नवीन जाणीव पैदा होऊ पहात होती. स्वाभिमान व आत्मनिष्ठेवर आधारलेले एक नवीन व्यक्तिमत्व घडू पहात होते. अिंग्रजांची साम्राज्यतृष्णा स्पष्ट झाली होती. त्यांचा स्वातंत्र्य समता, विश्वबंधुत्व विषयक बोल-घेवडेपणा बऱ्याच व्यक्तींच्या ध्यानी येत होता. त्यामुळे लोखंडाच्या थंड गोळ्याला अग्नि देऊन वितळावा तसे ह्या देशातील सुस्तावलेल्या समाजाला धग देण्यासाठी वन्हि चेतविण्याचे काम राजकीय व सामाजिक सुधारक हाती घेत होते. १८८५ साली स्थापन झालेल्या कॉंग्रेस या राष्ट्रवादी संघटनेने ह्या कामास सुरुवात केली होती. तिच्या पडखाऊ, वेळखाऊ व सदिच्छावलंबी धोरणावर नाखुष असलेल्या एका गटाने "रणाविण स्वातंत्र्य कोणा मिळाले" अशी आव्हानात्मक आरोळी ठोकली होती. राष्ट्रवादाच्या ह्या चैतन्यवारी झळा नासिकसारख्या थंड हवेच्या ठिकाणालाही प्रक्षुब्ध आणि संत्रस्त करू लागल्याची चिन्हे तत्कालीन अितिहासातून आढळतात.

नाशिक शहराला प्राचीनतम अितिहास आहे. मध्ययुगीन अवकळा आहे. तसेच अर्वाचीन प्रबोधनही आहे. नगरपालिकेच्या दृष्टीने नवदृष्टी, नवविचार व नवाचार याचा लाभ करून देण्याचे प्रबोधनकार म्हणून गणला जाण्याचे सामर्थ्य कैलासवासी काशिनाथ महादेव थत्ते ह्यांच्या व्यक्तिमत्वाला निश्चित आहे. नासिक शहराचे अग्रगण्य वकील व त्यामुळे पदसिद्ध उपाध्यक्ष म्हणून ह्या थोर विभूतीचा नासिक नगरपालिकेशी संबंध आला. तेजस्वी व्यक्तिमत्व, शुद्ध चारित्र्य आणि जनहिताची तळमळ ह्या गुणांमुळे येथल्या

नगरपालिकेवर त्यांचा पगडा फार. त्यांचाहि येथील पौरांवर व पौर-संस्थांवर लोभ फार. म्हणूनच जवळ जवळ एक दशक वर्षांच्या त्यांच्या कारकीर्दीचा गौरवाने उल्लेख करावा लागतो.

नासिक शहर गोदावरीमुळे विभागले आहे. पंचवटी आणि नासिक असा द्वंद्व समास अनेक शतकापासूनचा आहे. त्यातील अंतर कमी करण्यासाठी अनेक प्रयत्न संकल्पीले होते. पण सिद्धी ही सिद्धकासाठी प्रतीक्षा करीत असते की काय कोण जाणे. सध्या नासिक पंचवटी ह्या विभागांना जोडणारा "व्हिक्टोरिया पूल" बांधण्याचे बहुतांशी श्रेय श्री. थत्ते यांच्याकडेच जाते.

१८७४ साली असल्या प्रकारच्या योजनांना द्रव्यसहाय्य करण्याचे सामर्थ्य नगरपालिकेत नाही असा स्पष्ट ठराव दप्तरात आढळतो. त्यानंतर सुमारे १८८४।१८८८ च्या दरम्यान ही नगरपालिका २५००० रु. ह्या कामासाठी देण्यास तयार असून तदनुसार सरकारी तिजोरीत रोख ठेवण्यास संमती मागते. हा चमत्कार घडून येण्यास कारणीभूत थत्ते आणि अितर मंडळीच होत. नगरपालिकेचे सहाय्य अपुरे म्हणून नासिककरांनीच "पुलासाठी फंड" उभारावा व त्याचे धुरीणत्व थत्यांकडे जावे ह्याच्यात अनैसर्गिक काही नाही. पण १८९३ सालानंतर सेवानिवृत्त होऊन संपूर्ण वेळ ह्या कामासाठी देण्याची तयारी दर्शविणारे मन मात्र निश्चित असामान्य वाटते. जनहिताची खरी खरी तळमळ असल्याशिवाय असला त्याग घडत नाही.

ह्या साऱ्या श्रमाची परिपूर्ती म्हणून, १८९७ साली बांधला गेलेला व्हिक्टोरिया पूल हा श्री. थत्ते ह्यांच्या कामगिरीचे स्मारक म्हणूनच मानणारा नासिककर, व्यवहाराचे दृष्टीने चूक करीत असेल, पण मानवतेचे दृष्टीने योग्य तेच करीत असल्याची ग्वाही द्यावी लागते.

● दळणवळणांतील क्रान्ती—

नाशिक क्षेत्रातील जुने रहिवासी श्रीयुत सखाराम काशिनाथ दशपुत्र ह्यांच्या मनोरंजक आठवणीतून नाशिक शहरातील प्रबोधन व दळणवळणाच्या क्षेत्रातील घडलेली क्रान्ती ही कुणाही नाशिककराला मनोरंजकच वाटावी.

पूर्वी पंचवटी भागात दाट झाडी होती. ती नाहीशी करूनच पूल बांधावा लागला. इंद्रकुंडाचेही भोवती दाट झाडी होती. पावसाळ्यात नदीला पूर येणे हे साहजिकच. त्यामुळे नासिक पंचवटी दळणवळण फार जिकीरीचे होई. पुराचे स्वरूप रौद्र असल्यास दळणवळण पाणी ओसरे तो बंद असल्यासारखेच होई.

पावसाळ्यात पंचवटीत जाण्यायेण्यासाठी टाळकुटे देवळाजवळ नाव होती. त्या नावेत बसून लोक जाणे येणे करीत. नदीचे दोन्ही तीराला उंच मनोरे दगडात बांधले होते. त्यावर लोखंडी साखळीने नावा बांधीत असत. खाली दगडी पक्के उताराचे बांधलेले अजूनही आढळतात. दुसरेही एक वृद्ध नागरिक श्री. गोपाळ सिताराम महाशब्दे ह्यांनी १८९६ साली अशा नावेतून प्रवास केल्याची आठवण सांगितली. जाण्यायेण्यासाठी व्यक्तीमागे १ आणा दर आकारला जात असे.

पावसाळ्यात पाणी कमी झाल्यावर, चांदवडकर यांच्या वाड्यावर हमाल लोक उभे असत. हमाल लोक मनुष्याला पाठीवर घेऊन पलिकडे पोहोचवीत असत. त्यांना मजूरी म्हणून एका खेपेस "सहा पै" द्यावी लागे. गवताची ने आण करण्यासाठी गोदावरीस असलेल्या दोन उताराचा वापर होई. एक डांगर उतारा व दुसरा मुक्तेश्वराच्या देवळाजवळील उतारा.

पुलामुळे लोकांची फार सोय झाली. त्याच्या बांधणीमुळे पंचवटी भागात तसेच आदितवारातहि खूप वस्ती वाढली. मुंबईच्या

धनिक भाटीयांनी पंचवटीत अनेक धर्मशाळा बांधल्यात. पुलामुळे नाशिकचे मध्ययुग संपले असे म्हटल्यास फारसे वावगे ठरणार नाही. पुलाच्या बांधणीसाठी रावसाहेब काशिनाथ महादेव थत्ते ह्यांनी फार मेहनत घेतली. गावो-गाव जाऊन वर्गणी जमा केली. तसेच सरकारी मदत मिळविली. या पुलाचा खर्च वसुलीसाठी " पिलीग्रीम टॅक्स " सुरू झाला. दरडोई चार आणे कर होता. पुलाचे काम पूर्ण होते न होते तो २९ जुलै १८९७ मध्ये नाशिकचा पहिला महापूर आला. पेशवेवाडा (पोलीस कचेरी) ७ पायऱ्या पाणी पाण्यात होता. त्यावेळी पुलाच्या कमानी खालील लाकडी सेंटी-गच्या तीन कमानी वाहून गेल्या. वरील माहि-तीतून व्हिक्टोरिया पूल म्हणजे नवयुगाची पहिली निशाणी नाशिककरांना का वाटते, ह्याचा खुलासा होतो.

● **नासिकची ट्रॅम–**

परवाच्या २८ मार्च ६४ ला मुंबई शह-रातील ट्राम वाहतूक संपूर्ण बंद झाल्याचे वृत्त-पत्रात अनेकांनी वाचले असेल. नासिक शह-रात देखील दळणवळणाच्या क्रान्तीचा भाग म्हणून अशीच ट्राम सर्व्हिस असल्याची मनो-रंजक हकीकत ह्या कालात आपणास लाभू शकते. हल्ली ज्याठिकाणी नगरपालिकेची अिमारत आहे त्या जागी पूर्वी ट्रामचा स्टँड होता. नासिक शहर ते नासिक स्टेशन अशी वाहतूक ट्राममधून होत होती. एकावेळी सुमारे २५।३० माणसे ट्राममध्ये बसत. माणशी एक आणा भाडे होते ट्रामला घोडे जोडलेले असत. हल्ली असणाऱ्या नासिक-रोड मार्गेच ट्राम दौडत असे. रस्त्याच्या मध्यतरात घोडे बद-लत. घोड्यासाठी तबेलाही तेथे उभारला होता. पुढे पुढे वाफेवर चालणारी ट्राम आली. आणि कालान्तराने सर्व ट्रामसर्व्हीसच बंद झाल्याचे नासिककरांनी पाहिले. ह्या ट्राम-मधून प्रवास केलेले कितीतरी नागरिक अजू-नही जुन्या रम्य आठवणीत रमून जातात.

योजनांना विरोध नव्हता.

नासिक हे तीर्थक्षेत्र आहे. तेव्हा त्र्यंबकेश्वराहून येणारे पाणी अडवावे आणि बंधारा बांधावा किंवा वाहतुकीसाठी पूल बांधण्यात यावा म्हणून म्युनिसिपालिटीच्या ज्या योजना होत्या, त्यांना नासिकच्या ब्रह्मवृंदाचा विरोध होता असा जो आक्षेप घेण्यात येतो तो वृथा आहे. पूर्वी रामशेजजवळ बंधारा बांधण्याची योजना होती. पाणी पुरवठ्याच्या आणखीहि योजना होत्या. पिण्यासाठीं येणारे पाणी पंपिंग करून न येतां उताराने यावे, अशी लोकांची श्रद्धा होती. पण बंधारा बांधण्यात आला तरी पात्रातील कुंडांना भरपूर पाणी राहील असें आश्वासन मिळाल्याने नळाच्या योजनेला विरोध राहिला नाही. नदीच्या पात्रात बंधारा बांधल्यास पात्र कोरडे ठणठणीत पडेल, असा संभव होता

पिल्ग्रिम टॅक्स बसवावा व त्या उत्पन्नातून पूल बांधावा, असा प्रारंभी विचार होता. लोकांचा या पिल्ग्रिम टॅक्सला विरोध होता परंतु नासिकमध्ये विशेषत: हिंदु समाज येणार, व पुलाचा उपयोग सर्वांनाच होणार म्हणून पहिला विरोध कमी झाला. हा पूल सरकारी मदत घेऊन बांधावयाचे ठरले आणि विरोध आणखी मावळला.

– दामोदर महादेव चंद्रात्रे माजी ज्य सभासद

नासिक नगरपालिकेतील लोकसत्तेची घटनात्मक वाढ — तक्ता

सन	निवडलेले						सरकार नियुक्त			
	सर्व साधारण	महिला	मुस्लीम	अस्पृश्य	मागासलेल्या जमाती	एकूण निवडलेले	बिनसरकारी नियुक्त	नियुक्त सरकारी पदसिद्ध	एकूण नियुक्त	एकूण
१८६४–६५	—	—	—	—	—	—	१६	७	२३	२३
१८८३–८४	—	—	—	—	—	१२	१२	६	१८	२८
१९०२–०३	—	—	—	—	—	१२	७	५	१२	२४
१९१०–११	—	—	—	—	—	१६	—	—	८	२४
१९२२–२३	—	—	—	—	—	१६	५	३	८	२४
१९२४–२५	—	—	—	—	—	२४	३	३	६	३०
१९३२–३३	२८	—	४	१	—	३३	४	१	५	३८
१९६२–६३	४०	५	—	३	२	५०	—	—	—	५०

तृतीय कालखंड
१९०२ ते १९२६

त्रिभाग निमग

● **१९०१ चा कायदा—**

इ. स. १८८४ चा कायदा तयार होऊन सुमारे १६।१७ वर्षाचा काळ लोटला होता. या काळात मुंबई राज्यातील शहरी जीवनात नवे प्रश्न निर्माण झाले होते. मोठ्या शहरातून मुख्यतः ड्रेनेज, पाणीपुरवठा व शहर स्वच्छता हे प्रश्न तीव्रपणे जाणवत असल्याचे आपण मागील अवलोकनात पाहिलेच होते. वाढती लोकसंख्या व रोगराई, पूर, अनावर्षण इत्यादींमुळे हे प्रश्न जास्तच बिकट होत होते. दीर्घमुदतीच्या उपाय योजनांसाठी आवश्यक ते द्रव्य सहाय्य आणि अधिकार, नगरपालिकांना नसल्यामुळे, मुंबई राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांना एकोणिसाव्या शतकातीचा हा काळ अत्यंत कष्टप्रद व जाचकारक ठरला होता. वरील प्रश्न सोडविण्याची तरतूद १८८४ च्या कायद्यात नव्हती हे कार्य सुकर व्हावे म्हणून नगरपालिकेच्या कायद्यात सरकार एक महत्वाचा बदल करू इच्छित होते. नगरपालिकेच्या कारभाराचे दोन स्पष्ट भाग पडावे. एक धोरण ठरविण्याचा (Deliberative) व दुसरा या धोरणाची अंमलबजावणी करण्याचा. (Executive) या योजनेनुसार नगरपालिकेचा दैनंदिन कारभार एका स्वतंत्र अधिकाऱ्याच्या हातात सोपवावा, व तो अधिकारी लोकप्रतिनिधींच्या नियंत्रणापासून शक्यतो मुक्त असावा, अशी तरतूद सरकार या नव्या कायद्यात करीत होते. सरकारने या ठरावाची रुपरेषा इ. स. १८९९ मध्ये प्रसिद्ध केली त्या वेळी लोकमान्य टिळकांनी त्यावर जळजळीत टीका केली.

या नव्या कायद्याच्या मसुद्यावर टिळकांसारख्या मातब्बर लोकनेत्याने जळजळीत टीका केली तरीही इ. स. १९०१ मध्ये "मोठ्या नगरपालिकांचा" हा कायदा पास झालाच.

त्याअन्वये नासिक नगरपालिकेत मुख्याधिकारी (Chief officer) आरोग्याधिकारी (Health officer) आणि इंजिनीयर (Executive Engineer) असे तीन सरकारी अधिकारी लादले गेले.

१९०१ च्या नव्या कायद्यानुसार मुख्याधिकाऱ्यांना त्यांच्या नोकरीची शाश्वति देण्यात आली. एकूण सभासदांच्या ¾ संख्येने त्यांना काढून टाकण्याचा ठराव संमत केला, तर त्यांना कामावरून दूर करण्याचा अधिकार नगरपालिकांना वापरता येईल. व्यवहारात ह्या अधिकाराचा वापर नगरपालिकांना अशक्य होता. कारण ७५ टक्के सभासद कोणत्याही बैठकीला उपस्थित असणे नगरपालिकेच्या जीवनात प्रायः अशक्यच होते आणि २५ टक्के सभासदांना अनुकूल राखण्यात मुख्याधिकारी बहुशः यशस्वी ठरत

या खेरीज तिसरा महत्वाचा विशेष हा की, दरमहा ३० रुपयापर्यंत वेतन असणारा नोकरवर्ग मुख्याधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली आला असा नोकरवर्गाच्या नेमणुका करणे,

सन्माननीय उपाध्यक्ष



श्री. व्ही. एस्. खरे
१९०२-३ ते १९०४-५



श्री. डी. के. शिन्दे
१९२० ते १९२३



श्री. ब्रम्हदेव सखाराम वाघ
१९३३ ते १९३४



श्री. डी. एन्. टिळक
सन १९३५ ते १९३६
१९३६ ते १९३८



श्री. सि. मो. कोकणी
सन १९३८ ते १९३९




श्री. गो. रा. बोडस
सन १९४० ते ४१



श्री. इब्राहिम सो. अ. जीन
सन १९४३ ते ४४



श्री. अब्दुलहुसेन आदमजी बोहरी
सन १९४५ ते ४६



स्वा. स. श्री. गियासुद्दीन ज. कोकणी

[illegible] ते [illegible] [illegible] ते [illegible]



श्री. हुसेनसाहेब हैदरसाहेब कोकणी

[illegible] ते [illegible] [illegible] ते [illegible]



श्री. शिवाजी दादाजी साळुंके
सन २२-१२-४५ ते १६-३-४६



श्री. एकनाथ शिवराम चौधरी
सन १९४७ ते ४८



श्री. एम्. सी. शेख
सन १९५३ ते ५४



सौ. वत्सलाबाई स. मुठाळ
सन १९५५ ते ५६



सौ. शशिकलाबाई स. मोरे

सन २-४-१९५६ ते २०-६-५६


२७-७-५६ ते १६-५-५७



श्री. अब्दुलरज्जाक अहमदसो. कोकणी

सन १७-५-१९५७ ते १६-५-१९५८

विद्यमान सदस्य



श्री. उत्तम भिकाजी चव्हाण

सन १७-५-१९५८ ते १७-५-५९



श्री. फरिउद्दीन कादरसो. कोकणी

सन १८-५-१९५९ ते १७-५-६०



श्री. कासम एन. पटेल
१८।५।६० ते ६।६।६१



श्री. गु. न. पटेल
७।६।६१ ते ६।६।६२



श्री. लक्ष्मण सहादु जानमाळी
७।६।६२ ते १७।६।६३



श्री. गणपत पुंडलीक काटे
१४।६।६३ ते १३।६।६४

त्यांना काढून टाकणे, बढती देणे इत्यादि अधिकार मुख्याधिकाऱ्याच्या हाती आले. यापूर्वी नगरपालिकेचा सर्व नोकरवर्ग सभासदांच्या नियंत्रणाखाली असे. नव्या कायद्यामुळे सभासदांचे नोकरवर्गावरील नियंत्रण बव्हंशी उखडले गेले.

● कार्यक्षेत्राचा विस्तार—

नगरपालिकेच्या कार्ययंत्रणेतील बदलाव्यतिरिक्त या नव्या कायद्याने नगरपालिकेचे कार्यक्षेत्र काही प्रमाणात विस्तृत केले.

१) शहरातील महारोगी व वेडे यांच्यासाठी स्वतंत्र इस्पितळे काढावी वा अन्य मार्गांनी त्यांची व्यवस्था करावी.

२) शहरातील शिक्षणाच्या व्यवस्थेसाठी एक शिक्षण समिती नेमावी व तिच्याकडे शहरातील सर्व, वा काही भागांची शैक्षणिक कामे सोपवावी.

३) शहरात प्लेग वा कॉलरा यांच्यासारख्या रोगांच्या साथी उद्भवल्यास त्यांच्या निर्मूलनासाठी आवश्यक ते सर्व अधिकार हाती घ्यावेत.

● १९०९ चा विकेंद्रीकरण समिति अहवाल—

या नंतर १९०७ साली भारत सरकारने एक विकेंद्रीकरण समिति Decentralization Commission) नेमली होती. मध्यवर्ती व प्रांतिक सरकारे यांच्यामधील सत्तेचे विभाजन कसे करावे, त्यांची कामे कोणत्या तत्वावर विभागावीत, यासंबंधीचा अहवाल सादर करण्याचे काम या समितीकडे दिले होते. ही समिती नेमण्यामागे राजकीय परिस्थिति कारणीभूत होती. १८८२ नंतर सुमारे २५ वर्षे मध्यवर्ती सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सुधारासाठी कांहाही केलेले नव्हते. ब्रिटीश राजवटीबद्दल लोक कडवट बोलू लागले होते. परकीय सत्तेविरुद्ध असंतोष धुमसत होता. तशातच कर्झनच्या जुलमी कारभाराची आणि बंगालच्या फाळणीची भर पडल्याने देशभर सशस्त्र क्रांतीच्या मार्गाने परकीय सत्ता उखडून टाकण्याची दहशतवादी कारस्थाने व स्फोट होत होते. नाशिक शहरातील १९१० चा जॅक्सन खून हा त्या परिस्थितीचा द्योतकच मानायला हवा. ही परिस्थिति ध्यानी घरून देशात भडकणारा असंतोष कमी करण्यासाठी, त्याची धार बोथट करण्यासाठी " विकेंद्रीकरण समिति" सरकारने १९०७ साली नेमली होती.

या समितीने १९०९ साली भारत सरकारला आपला अहवाल सादर केला. "स्थानिक स्वराज्य संस्थांमधील लोकशाही अधिक द्रुतगतीने विकास पावली पाहिजे", असे या समितीने आपल्या अहवालात सरकारला सुचविले होते.

या समितीने सरकारला पुढील शिफारशी केल्या :—

१ स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकनियुक्त सभासदांचे प्रमाण वाढवावे. १८८२ पासून लोकनियुक्त सभासदांना लोकशाही राजवटीचा पुरेसा अनुभव आलेला आहे. त्यामुळे या संस्थांमधून लोकनियुक्त सभासदांचे बहुमत करावे व त्यांच्यातूनच एक अध्यक्ष निवडण्याची मुभा त्यांना द्यावी.

२ नगरपालिकांनी ड्रेनेज, पाणीपुरवठा, यांच्यासारख्या फार खर्चाच्या योजना हाती घेतल्यास सरकारने त्यांना कर्जे व अनुदाने देऊन सहाय्य करावे.

३ नगरपालिकांच्या अर्थव्यवहारावर नगरपालिकांचेच पूर्ण नियंत्रण असावे. सरकारने घातलेली बंधने त्यांनी पाळली म्हणजे झाले. त्यांच्या अर्थव्यवहारात सरकारने हस्तक्षेप करू नये. आपल्या सुधारणा योजनासाठी नवे कर बसविण्यास सरकारने नगरपालिकांना स्वातंत्र्य द्यावे.

४ प्रान्तिक सरकारांनी नगरपालिकांची उत्पन्ने वाढविण्यासाठी नवी क्षेत्रे त्याना मोकळी करून द्यावीत.

१९१९ चा कायदा—

इ. स. १९१७ मध्ये पहिल्या महायुद्धाचा शेवट जवळ आला होता. त्यावेळच्या इंग्लंडमधील भारताचे सेक्रेटरी माँटेग्यू यानी असे घोषित केले की, "भारताला जबाबदारीचे स्वराज्य देणे हे आमचे उद्दिष्ट राहील." त्या नंतर इ. स. १९१८ मध्ये माँटेग्यू-चेम्सफर्ड सुधारणांचा अहवाल प्रसिद्ध झाला 'स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वाढीसाठी त्याना जास्तीत जास्त स्वायत्तता देणे इष्ट ठरेल. सरकारने फक्त बाहेर राहून देखरेखीचे काम करावे असा इशारा वरील अहवालात आहे. ह्या अहवालाचे कायद्यातील रूपान्तर म्हणजे १९१९ चा कायदा. ह्या कायद्याद्वारा भारतात द्विदल राज्यपद्धती (Dyarchy) सुरू झाली. प्रान्तीय सरकारच्या खात्यांची राखीव (Reserved) व सोपीव (Transferred) अशी विभागणी झाली. स्थानिक स्वराज्य संस्था ह्या सोपीव खातेद्वारा नियंत्रित होऊ लागल्या. सोपीव खाती लोकांनी निवडून दिलेल्या मंत्र्यांच्या हाती असत.

त्या नुसार १९२० साली मुंबई सरकारने एक ठराव पास करून सर्व नगरपालिकांना पुढीलप्रमाणे आदेश दिला.

१ नगरपालिकांच्या मतदारवर्गात वाढ करावी. त्यासाठी मतदारांच्या शैक्षणिक आणि कर भरण्याच्या पात्रतेची अट अधिक सैल करावी.

२ नगरपालिकेतील सरकारनियुक्त सभासदांचे प्रमाण कमी करून लोकप्रतिनिधींची संख्या वाढवावी. सरकार नियुक्तांचे प्रमाण जास्तीत जास्त ¼ असावे. लोक प्रतिनिधींना त्यांचा अध्यक्ष निवडण्याचा अधिकार असावा.

३ एका मतदार संघांतून ३-४ उमेदवार निवडण्याची पद्धती सुरू करावी व त्यासाठी समुच्चय मतदान पद्धती (Cumulative voting) अंगिकारावी.

यामध्ये अल्पसंख्य जमातींना जास्तीत जास्त प्रतिनिधित्व मिळावे अशी सरकारची इच्छा होती परंतु या तत्त्वामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये अल्पसंख्य व बहुसंख्य जमातींमधील वितुष्ट मात्र वाढीस लागले त्याचा परिणाम त्यांचा सर्वत्र सामाजिक जीवनावर झाला.

येथवर आपण १९०१ ते १९२५ पर्यंतच्या कालखंडातील स्थानिक स्वराज्य संस्थाविषयक कायद्यांच्या तरतुदी विस्ताराने पाहिल्या. घटनात्मक वाढीचा हा इतिहास जरासा विस्ताराने देण्याचे कारण. देशाच्या इतिहासातील हा काल कायदे व घटना तुलनेने फार महत्त्वाच्या वाटतात. परत्र भारतातील, जन जागृति, राजकीय जाणीव व राष्ट्रीय सत्वांची जोपासना ह्या काळात दृढमूल झाल्यात. शिक्षण व देशभक्तीच्या प्रेरणांतून, स्वदेशाभिमान, आत्मोद्धार, अन्यायाच्या प्रतिकारासाठी सत्याग्रह, आत्मनिग्रह, करबंदी, सविनय कायदेभग, इत्यादि विधायक मार्ग, तर परकी मालाची जाळपोळ, उन्मत्त सत्ताधारांची हत्या, सशस्त्र क्रांति इत्यादि विध्वंसक मार्ग येथील जनता अवलंबीत होती. जनमानसाचा प्रक्षुब्ध सागर अडविण्यासाठी आंग्ल सरकार कसे वाळूचे बांध घालीत होते, याचे समग्र जरी नाही तरी स्पष्ट चित्र डोळ्यासमोर उभारण्यासाठी या कालखंडातील कायद्यांचा इतपत उहापोह आवश्यक वाटतो

नगरपालिकेतील लोकशाही—

या कालखंडात नासिक नगरपालिकेच्या घटनेत घडलेले बदल

सन	लोकनियुक्त	निम सरकारी नियुक्त	सरकारी नियुक्त	पद सिद्ध सरकारी	एकूण
१९०२– ३	१२	७	४	१ कलेक्टर	२४
१९१०–११	१६	८	१९०८ पासून लोकनियुक्त अध्यक्ष		२४
१९२२–२३	१६	५	३		२४
१९२४–२५	२४	३	३		३०

वरील तक्त्यावरून आपल्या ध्यानात येते की,

(१) १९०१ ते १९२४ ह्या कालखंडात, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व त्या अन्वये नासिक नगरपालिकेच्या जीवनात लोकमतांश वाढत गेला. (१२ ते २४) आणि निमसरकारी नियुक्तांची संख्या कमी होत गेली. (७ ते ३)

(२) १९०८ पासून नगरपित्यांच्या सभेने आपला अध्यक्ष निवडावा अशी कायदेशीर तरतूद नासिक नगरपालिकेत अमलात आली. आणि लोकनियुक्त अध्यक्ष नगरपालिकेचे शासन नियंत्रण करू लागले.

(३) १९०१ च्या कायद्यान्वये नासिक नगरपालिकेलाही १९०७ पासून चीफ ऑफीसर आला. इतके दिवस मॅनेजिंग कमिटीकडे असलेल्या अमलबजावणी व धोरण ठरविणे ह्या दोन्ही एकवटलेल्या बाबी विभक्त होऊन, अंमलबजावणीचा अधिकार चीफ ऑफीसरकडे गेला.

● आदर्श चीफ ऑफीसर–

नाशिक शहराचे आणि नगरपालिकेचे भाग्य फार थोर. अर्धशतक लोटले तरी नाशिक नगरपालिकेचे प्रथम 'चीफ ऑफीसर' श्री. विष्णु गोविंद रेडे यांची कार्यक्षमता, कर्तृत्व आणि जनहितबुद्धि, अजूनही वृद्ध नागरिकांच्या स्मृतीत ताजी असल्यासारखी आहे. वयोवृद्ध महाशय त्यांना अजूनही आदर्श ऑफीसर म्हणून संबोधितात.

१९१० – ११ चे अध्यक्ष रावसाहेब गोळे ह्यांनी देखील ह्या ऑफीसरबद्दल गौरवोद्गार काढलेले आढळतात. गृहस्थ भल्या पहाटे उठून घोड्यावरून साफसफाईच्या प्रत्येक जागी जात असे, व्यायामाचे व फिरण्याचे निमित्ताने गंगेवरून हिंडून, पाणी स्वच्छ राखण्याची कोशिस, तीर्थकरूंची विचारपूस इत्यादि नेहमीचे असे आणि काम हाती आले की त्याचा फडशा पडलाच अशी हातोटी. विशेषतः १९०७ ते ११ पर्यंत, प्लेगने ह्या शहरावर आपली काळीकभिन्न छाया पाडली असताना प्रतिबंधक उपाय योजणे आणि मृत्यु-संख्या घटविणे हे कार्य मानवतावादी म्हणून नव्हे तर नगरपालिकेचे आद्य–कर्तव्य म्हणून अत्यंत तळमळीने अविश्रांत मेहनतीने श्री. रेडे यांनी सांभाळले. उदाहरणार्थ सुमारे ३३८०७ उंदीर अथवा रोजी १८० प्रमाणे ह्या रोग-दूतांचा नाश करण्याचे कार्य केल्याबद्दल नगरपालिकेच्या दप्तरात उल्लेख आहे.

● रोगाश्च शत्रव इव प्रहरान्ति देहम्

रोगराई, साथी इत्यादि विरुद्ध नगरपालिकेने दिलेली झुंज हे ह्या कालखंडाचे खरे मर्मस्थान मानायला पाहिजे. भारताचा १८९७ पासूनचा इतिहास हा पूर, दुष्काळ ओला तसेच सुका–साथीचे रोग, इत्यादींनी

भरलेला आढळतो. जवळजवळ सारा मुंबई प्रान्त ह्या शत्रूंच्या वारंवार होणाऱ्या हल्ल्यांनी संत्रस्त झाल्याचे अनेक पुरावे आढळतात. नाशिक जिल्ह्यातील दृश्यहि थोडक्यात वरील प्रमाणेच आढळते. विस्तारभयास्तव सविस्तर परिस्थिति, हयात, वृद्ध व पीडित लोकांच्या स्मृति आणि श्रुतींवर मापवून नगरपालिकेने केलेला कामाचा थोडासा आढावा घेत आहे.

● नासिक जिल्हा आणि शहर—रोगराई—

गॅझेटीयर मुंबई प्रान्त १९२६ यात नासिक शहरच नव्हे तर सारा नाशिक जिल्हा या कालखंडात कसा रोगराईने ग्रासला होता ह्याचे चित्र खालील प्रमाणे आहे.

नाशिक जिल्ह्यातील प्लेग लागण व मृत्यु—

सन	लागण संख्या	मृत्युसंख्या	दोरा
१९१२–१३	४१	२९	
१९१३–१४	२७	२५	
१९१४–१५	९५४२	७१३९	
१९१५–१६	६६६३	४८५८	
१९१६–१७	६५८७	४९२८	
१९१७–१८	१४८९२	११२७१	
१९१८–१९	७०७	४९३	
१९१९–२०	११६	७८	
१९२०–२१	—	—	
१९२१–२२	३३२	२६६	
एकूण	३८९१०	२९०८३	९८२९०

नासिक जिल्हा १९१४–१५ ते १९१७–१८ चे दरम्यान प्लेगने ग्रासला गेल्याचे आढळते. तदनंतर जवळजवळ प्लेग नाहीसा झाल्याचे दिसून येते.

१९१८ साली अिन्फ्ल्युएन्झाची (मान–मोडी) भयंकर प्रपाती साथ या जिल्ह्यात ओढवली. आणि तिने ८५२७९ जीवाचा बळी घेतला.

१९११ साली नासिक जिल्ह्याची लोकसंख्या ९०५०३० होती ती १९२१ साली ८३२५७६ वर आली म्हणजे सुमारे ७२७२८ संख्येने ती घटली.

नासिक शहर रोगराई मृत्यु (१९२०-२१)

मृत्युसंख्या दर १००० व्यक्ती मागे

कॉलरा	देवी	ताप	पोटदुखी	जखम	अितर दुखापती रोगामुळे
२७	—	१३.९३	६.६६	.७८	३०.७३

नासिक जिल्ह्यातील पेठ तालुका आणि मालेगाव येथील बकाल वस्ती ह्यामुळे रोगोत्पत्ती ह्या दोनही ठिकाणाहून त्वरेने होऊन अितरत्र फैलावे. खेरीज येथल्या लोकांच्या मागासलेल्या पारंपारिक श्रद्धा व अंध रूढीप्रियता यामुळे आधुनिक औषधोपचार (तसेच प्रतिबंधक उपाय योजना करणे कसे जिकीरीचे काम असे, ह्याविषयी उद्बोधक विचार आणि वृत्त आपणास अन्यत्र विपुल प्रमाणात आढळते. १९३४–३७ सालापर्यंत नाशिकला अि. डब्ल्यु. पेरी नावाचे कलेक्टर होते. त्यांनी "ग्रामसुधारणा चळवळ" नामक आपल्या एका लेखात पेठ व नाशिकच्या आजूबाजूचे परिसरात चलती असलेल्या 'भगतगिरीच्या' प्रकारावर चांगलाच प्रकाश झोत टाकलेला आढळतो. पोटदुखी, आव, हगवण, देवी, ताप अित्यादि रोगावर क्विनाईन, सॅन्टोमिन अि० सरकारी योजनाद्वारा मिळणाऱ्या औषधाचा वापर न करता, भुताटकी, भगतगिरी अि० उपायांवरच येथील रहिवाशांचा भर असे. मरीआईचा गाडा काढणे हा देवी व हिवताप प्रतिबंधक प्रमुख अिलाज मानला जात असे. जादुटोणा करून आजाऱ्याचे मागे रोग लावून दिले, अशा आरोपावरून दिंडोरी भागातील एका भिल्ल स्त्रीला गावकऱ्यांनी कठोण सत्व परिक्षेस बसविलेच खेरीज जातभाईनी तिला

बेदम मारून तिचा जीव घेतला. ह्या प्रकारचे अनेक खटले बेभे चालवले गेल्याचे दाखले तत्कालीन समाज परिस्थितीची कल्पना देतात.

१९११ ते १९२१ ह्या कालखंडातील नगरपालिकेच्या उत्पन्न खर्चाचा तक्ता

सन	उत्पन्न	खर्च
१९११–१२	१२१९२६	१२८९१५
१९१२–१३	१०६६८५	३१६१५९
१९१३–१४	११६३८०	९८०७६
१९१४–१५	१०९२८५	१३४१९७
१९१५–१६	१२४२६२	१७६८१६
१९१६–१७	१३२७९१	१२४८००
१९१७–१८	१३६६५५	१३२९१०
१९१८–१९	१५५४५०	१५३९९०
१९१९–२०	२१८८५८	१९१७४९
१९२०–२१	३९१८८५	३७६६४२
१९२१–२२	२७८०८७	२९९४९०

वरील तक्त्यावरून नगरपालिकेचे उत्पन्न जरी वाढत असल्याचे दिसत असले तरी वाढत्या लोकसंख्येकडे बघता त्यात फारशी समाधानकारकता वाटत नाही. इ. स. १९०१ मध्ये २१४९० असलेली लोकवस्ती शि. स. १९११ मध्ये ३०१११ झाली म्हणजे लोक–संख्येत ८६२१ जीवांची भर पडली. किंवा ४०% वाढ झाल्याचे दिसून येते. शि. स. १९२१ मध्ये हीच संख्या ३८२११ झाल्याचे आढळून येते. या साऱ्याच्या सुखसोयीचा प्रपंच संभाळणे खरोखरीच जिकीरीचे काम होते. तरी पण नासिक नगरपालिकेने ह्या प्रपंचाचा नेटका सांभाळ करून आपली भौतिक प्रगति करून दाखविण्याचे अनेक दाखले आपणास देता येतील.

पाणीपुरवठा—पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सतत होत रहावा, ह्या हेतूने पूर्वीपासून नदीकाठाने लोक वस्ती करीत. आर्यांची ही दृष्टी रामाच्या ठिकाणी तर होतीच. पण नाशिककरांनी देखील वस्तीसाठी गोदातट निवडले. गोदेचा उगम जवळ १८ मैलावर असूनही पाणी नित्य असे. त्यामुळेच पेशव्यां–नीही येथील नदीवर घाट बांधले. आनंदी–बाईंनी ४ मैलावरील पश्चिमेस ,आनंदवल्ली शहर वसविले. आणि गेल्या शतकापर्यन्त पाण्याचा पुरवठा हा फारसा शुद्ध जरी नसला तरी पुरेसा होता, असा वृत्तांत मागील काल–खंडात वाचलाही.

वाढत्या वस्तीसाठीं पाण्याचा पुरवठा ही एक मोठी जटिल समस्या नगरपालि-केला होती. विशेषतः पुलाची बांधणी झाल्याने वाहत्या पाण्याचा लाभ येथील रहिवाशांना होईना. लक्ष्मण कुंडाचे पाणी पिण्यासाठी राखून ठेवावे लागे. सर्व लोक त्या कुंडातील पाणी पिण्याकरिता आणीत असत. व घरोघर पाण्याचे आड असतच. आसराच्या वेशीकडील लोक मुक्तेश्वर देवाचे समोरील गंगेचे पात्रात बांधीव झरे आहेत, त्या झऱ्याचे पाणी पिण्या-करिता नेत असत. पाणीपुरवठ्याची शास्त्र–शुद्ध व मोठ्या प्रमाणावर योजना होणे अत्यावश्यक झाले होते. शेवटी नगरपालिकेने सरकारी अनुदान रु० ३५००० मिळवले. आणि पंपिंग स्टेशन बांधण्याचा निर्धार केला. नदीच्या पात्रातच दोन खोल विहिरी पाणी-साठ्याकरिता बांधून तेथून पाणी शहरात नेण्याची धाडसी योजना, ह्या कालखंडात पार पडली.

● नळ आले–

शहरात नळ आणून घरोघरी 'उदंड जाहले' पाणी स्नान संध्या करावया' असा नगरपालिकेचा संकल्प नासिककरांना फारसा स्वागतार्ह वाटला नाही. नळाचे पाणी (पाणी-पट्टीच्या भयाने) लोक घेतील की नाही, ही नगरपालिकेला भीति होतीच. नळातून पाणी गेल्यावर कुंडे भरली जाणार नाहीत, ही भीति अनेकांनी व्यक्त केली. काहीच्या मनात गंगा

बाटली जाईल अशी शंका डोकावून गेली. ह्याच भीतीतून व्हिक्टोरिया पुलावरून जा ये करणारे धर्मनिष्ट लोक पायात जोडे घालून जात नसत. मुख्यातीला सावधानता म्हणून जेमतेम १००० नळाचे एस्टिमेट केले होते. गंगेचे पाणी अशुद्ध, त्यामुळे कॉलरा व अितर रोग त्वरीत फैलावत. नळाचे शुद्ध पाणी लोकांना मिळण्याची शक्यता झाल्याने कालान्तराने १९२६–२७ साली नगरपालिकेला पंपिंग स्टेशनशी तिसरी विहीर खोदावी लागली. खेरीज टेकडावर पाणी चढविता यावे अशा उद्देशाने पाण्याचा जोर वाढविणे व जास्त पाईप पुरविणे आदीसाठीही नगरपालिकेने तरतूद केल्याचा उल्लेख अहवालात आढळतो. आनंदवल्लीच्या धरणाची उंची वाढवून पाण्याचा साठा वाढवावा, या विषयी देखील नगरपित्याच्या मनात असल्याचा दाखला आहे. पुरविलेले पाणी निर्जंतुक करविण्यासाठी क्लोरीनचा वापर करता येईल अशा यंत्रणेसाठी कमिटीने रक्कम मंजूर केली होती. मुबईच्या हाफकिन अिन्स्टिट्यूटमध्ये येथील पाण्याचे नमुने वर्षातून तीनदा पाठवले जात. आणि पिण्यास योग्य असा शेरा त्यास लाभत असे. खेरीज नदीचे पाणी शुद्ध राखण्याची खबरदारी म्हणून "रखवालदार" ठेवले होते. खेरीज वेळोवेळी लोकांना जाहीर ताकीद देखील दिली जात असे.

● **मैलासफाई–**

टाकळी रस्त्यावरील मलमूत्राचे खतात रूपान्तर करण्याची योजना अतिशय उपकारक व यशस्वी असल्याचा निर्वाळा आपणास मागे मिळालाच होता. खाजगी तसेच सार्वजनिक शौचकुपांची संख्या सारखी वाढत होती. मैल्याच्या साठ्यावरून फिरणाऱ्या माशा, किडे याचे तांडे हेही एक दृश्य डोळ्यांना खुपणारे होते. पावसाळ्यात खत व राख यांच्या साठ्यासाठी नवीन वाफे व शेड तयार केल्या. कॅप्टन हायास यांनी सुचविलेल्या बहुमोल सूचनानुसार या डेपो पर्यंतचे रस्ते सुधारले गेले. पूर्वी सागवानी लाकडाच्या गाड्यामधून मैला व कचरा वाहून नेला जाई. हेल्थ ऑफीसर मिस्टर ड्यूज मिचेल ह्यांनी लोखंडाच्या बंद गाड्याची सोय केली. पूर्वी शौचकुपातील मैला बुरुडाच्या पाट्यात राख घालून भरला जाई. नंतर लोखंडी डबे ह्या कामासाठी वापरले जाऊ लागले.

शहर स्वच्छता तसेच उत्पादक (खत विक्रीद्वारा) असे हे कार्य असल्याने नगरपालिकेने पंचवटीत १० एकर जागा खरेदी करून तेथे अशाच पद्धतीचा डेपो उभारला.

गंगाघाटाच्या बाजूस चबुतरे तसेच पात्रासभोवती फरशी घालण्याचेही नगरपालिकेने मनावर घेतले. तदनुसार १९१०-११ चे दरम्यान कुंडांना जोडणाऱ्या दगडी फरशा बांधल्या गेल्या. "वाळवंटातील मुख्याप्रमाणे, धक्र आणि घाणीत लोळणाऱ्या असंख्य यात्रेकरूंची त्या योगे फार सोय झाल्याचे त्या वर्षीच्या अहवालात नमूद केलेले आहे.

या तीर्थकरूंना औषधोपचार तसेच त्यांच्याद्वारा रोग फैलाव (विशेषत: संसर्गजन्य रोगाचा) होऊ नये म्हणून इस्पितळ बांधण्यासाठी, नगरपालिका जागेचा शोध करीत होती.

● **दिवे–**

शहरात पेट्रोमॅक्स दिवे लावण्यासाठी, तसेच खांब उभारण्यासाठी सुमारे ११३८५ रुपये नगरपालिकेने १९२६–२७ साली खर्च केले होते.

● **अग्निशामक व्यवस्था–**

पूर्वी म्हणजे १९०१ पर्यंत अग्निशामक व्यवस्था फारशी अद्यावत व उपयुक्त नव्हती आग लागली की मोठमोठ्याने घंटा वाजविल्या जात. त्या एकनाच भागातील म्युनिसीपल

नोकरांनी एकत्र जमावे असा आदेश असे. त्या नुसार सारे एकत्र जमत, व आग विझविण्यासाठी निघत. आग विझविण्याची साधने फारशी नव्हतीच. जमावाने एक रांग करावी घराघरातून वादल्या, हंडे इत्यादि साधने आणावीत, आडापाशी पाणी तोलण्यास गर्दी जमत आणि भरलेल्या बादल्या, भांडी एकाकडून दुसऱ्यास या प्रमाणे आगीचे जागी ओतल्या जात, रिकामी भांडी, त्याच पद्धतीत उलटया क्रमाने आडापाशी येत.

बोहोरी पट्टी भागात मोठी आग लागली होती, त्यावेळी आजूबाजूच्या इमारतीहि पेटल्या होत्या. स्वामी नारायणाच्या भागातही अशीच एकदा आग पेटली होती. त्रिंबक दरवाजाची आग तर बऱ्याच जणांच्या स्मृतीत असेल. १९११ च्या अहवालात " नगरपालिका आग बंब विकत घेऊ शकली नाही. कारण शहरातील दिवे लावण्यावर जास्त खर्च करावा लागला. " असा उल्लेख आहे. १९१७–१८ मध्ये अग्निशामक साधने, उदाहरणार्थ वाळूने भरलेल्या बादल्या इ. इ. तयार ठेवण्यासाठी ५८३ रु. खर्च केल्याचे नमूद केलेले आहे. कलेक्टरच्या बंगल्यास आग लागली, त्या योगे चक्रे सुरू झाली. कोर्ट, कचेरी, सरकारी शाळा नगरपालिका इत्यादि ठिकाणी अग्निशामक साधने तयार ठेवण्याविषयी योजना अमलात आणल्या गेल्या. युद्धजन्य परिस्थितीमुळे किंमती वाढल्या असताना सुद्धा कमिटीचा हा निर्णय जनहितकारक म्हणून संमत झाला. १९२७ साली नगरपालिकेने अग्निशामक खात्यासाठी अग्निशामक इंजिने व बादल्या आणि दुरुस्ती प्रीत्यर्थ एकूण रु. १४२० रु. खर्च केल्याचे आपणास आढळते. आगीच्या चटक्यांनी होरपळल्याने लहान मूल देखील दूर राहाण्याचा धडा शिकते. नाशिककरानी आपापल्या कुवतीप्रमाणे अग्नि दूर ठेवण्यासाठी व शांत भविष्यासाठी वाढती दक्षता घेतल्यास नवल नाहीं.

● नाशिक शहरांतील नव्या इमारती

ब्रिटीश शासन व्यवस्था येथे १८१८ पासून जरी असली तरी शासनकेंद्रे फार थोडी होती. १८६२ पासून सरकारी केंद्रीकरणाचा वाढता वेग १९०० पर्यंत होता. याचा इतिहास आपण क्रमाने पहात आहोतच. पण इमारती, सरकारी ऑफीसे इत्यादींची बांधणी मात्र १८९० ते १९२० पर्यंतच्या कालातच सरकारने केल्याचे आढळते.

१ हॅरिस जनरल हॉस्पिटल: हे १८९१ साली बांधले गेल्याची नोंद आहे. नगरपालिकेनें या साठी १०, ००० रुपये इमारती प्रीत्यर्थ व दरसाल अनुदान म्हणून २५० रुपये मंजूर केल्याचे आपण मागे पाहिलेच होते. ही अनुदान परंपरा आजदेखील नगरपालिकेने राखली आहे. त्याचे सविस्तर दर्शन आपण " सहाव्या' प्रकरणात घेऊच.

२ कलेक्टर कचेरी : सध्या जेथे पेठे विद्यालय आहे तेथे पूर्वी मामलेदारची (नासिक तालुका) कचेरी होती. सध्याच्या सिव्हिल कोर्टाची इमारत १९०८ साली बांधली गेली. १९१४ साली कलेक्टर कचेरीची इमारत बांधली गेली. त्या वर्षी पहिले महायुद्ध सुरू झाल्याने ही इमारत प्रमुखत्वें लष्करासाठी बांधली होती. ह्या इमारतीत असलेले माजी सैनिक व नाविक मंडळ दप्तरविभाग अजूनही त्यांची ग्वाही देतो.

● केतकर टॉऊन हॉल—

सध्या गंगाकिनारी असलेल्या टॉऊन हॉल भागात पूर्वी पोलीस लाईन होती. तेथे असलेला, वकील लोकांचा क्लब पूर्वी फार ख्यातनाम होता. नाशिकचे विद्वान समाजसेवक कै. गंगाधर नरसिह केतकर ह्यांच्यां स्मरणार्थ "केतकर टॉऊन हॉल" १९०१ साली बांधला गेला. श्री. बापू बळवंत पाराशरे यांनी त्यासाठी अतिशय श्रम घेऊन,

वर्गणी गोळा करून हॉल उभारला. उद्‌घाटनासाठी न्यायमूर्ती रानडे आले होते. केतकर टॉऊन हॉलच्या लायब्ररीस असलेले रानडे हे नांव ह्या घटनेचा संदर्भ दर्शविणारेच आहे. केतकर टॉऊन हॉलचे ट्रस्टी सर्वश्री ग. वि. केतकर व शंकर नारायण रानडे, हे नाशिक नगरपालिकेचे भूतपूर्व (१९२३–४३) सदस्य असल्याची नोंद आहे.

● समालोचन

नासिक नगरपालिकेचा इतिहास, नासिक शहरापासून, नासिककरापासून तसेच नाशिक जिल्ह्याच्या इतिहासापासून अलग करणे अशक्य आहे. 'जे 'दारी ते घरी जे माहेरी ते सासरी' अशा म्हणी आपल्या प्रचारात असतात. त्यामवून या ऐतिहासिक सत्याचा प्रत्यय आपणास येतो. हिन्दुस्थान देशातील, राजकारणावर इंग्रजी राज्यकर्त्यांच्या समस्या व धोरण, साम्राज्यशाहीतील चढउतार यांचे पडसाद उठणे साहजिकच. आणि भारतीय राजकीय, सामाजिक, चावटळीची धळ, येथवर येऊन पोहोचणे हे नैसर्गिकच होय; म्हणूनच घटनात्मक वाढीचा इतिहास असो, अथवा रोगराई, साथी या विषयीचा उल्लेख असो. प्रत्येक वेळी तत्कालीन देशाचा व देशविभागाचा संबंध कार्यकारणाने देणे आवश्यक होई. तदनुसार येथवर १९०१ ते १९२५ पर्यंतच्या कालखंडाचा, संक्षेपाने इतिहास दिलेला आहे. बऱ्याचशा बाबी विशेषत शिक्षण व सामाजिक विषयांचा उहापोह या ग्रंथात स्वतंत्र लेखाद्वारा केला गेलेला असल्याने, येथे त्या अस्पर्शीत ठेवल्या आहेत. नगरपालिकाच्या कामांचा, कार्य विस्तृतीचाही इतिहास, येथवर अत्यंत मर्यादेनेच घेतलेला आहे वर्णित विषयात देखील आकर्षकता व सूत्रबद्धतेच्या दृष्टीनं मर्यादा घालणे भाग पडले आहे

नगरपालिकेच्या जीवनातील सुमारे ६० वर्षांचा आढावा द्रुत गतीने येथवर घेऊन पुढील कालखंडातील प्रगति आपणास ध्यानात घ्यायची आहे—

❀ ❀

नासिक नगरपालिकेचा गेल्या शंभर वर्षातील सरासरी खर्चाचा तक्ता.

१८६३-६४	—	१८७८-७९	४०९५२
१८६४-६५	६४२१	१८७९-८०	३६६९६
१८६५-६६	४३७१	१८८०-८१	४०३५७
१८६६-६७	८६४०	१८८१-८२	३२३७०
१८६७-६८	८७९६	१८८२-८३	४१०६७
१८६८-६९	१६८२४	१८८३-८४	३९७५३
१८६९-७०	२८७३९	१८८४-८५	९५८३०
१८७०-७१	४५९५७	१८८५-८६	८४०६६
१८७१-७२	३७३५१	१८८६-८७	७३५८३
१८७२-७३	४७३३६	१८८७-८८	४३६३२
१८७३-७४	४०३१८	१८८८-८९	४६४२१
१८७४-७५	३७२१८	१८८९-९०	४६०१५
१८७५-७६	३६७०२	१८९०-९१	५०९१८
१८७६-७७	३३२४३	१८९१-९२	५४२१२
१८७७-७८	३३२६०	१८९२-९३	५७०३६

१८९३-९४	६२२४४८	१९२८-२९	३२२२५६
१८९४-९५	११३५०३	१९२९-३०	३३०४५३
१८९५-९६	१६१६८६	१९३०-३१	३४४३२८
१८९६-९७	८३०८७	१९३१-३२	३४७२८९
१८९७-९८	८१६७१	१९३२-३३	३७०३४४
१८९८-९९	९०४८३	१९३३-३४	३४१२१३
१८९९- ०	६८०२९	१९३४-३५	३३९५५९
१९००- १	५७६९४	१९३५-३६	३५२२०२
१९०१- २	५६०७८	१९३६-३७	३४१४८९
१९०२- ३	५८९००	१९३७-३८	३७२०१८
१९०३- ४	५५४०२	१९३८-३९	३८६९०२
१९०४- ५	६०२४५	१९३९-४०	३९३१८५
१९०५- ६	६२९८६	१९४०-४१	४४५८८१
१९०६- ७	६२४०७	१९४१-४२	५४८४११
१९०७- ८	६३५१४	१९४२-४३	५८२६२८
१९०८- ९	९६९७६	१९४३-४४	४८२८७५
१९०९-१०	१३३७९४	१९४४-४५	९८६४३१
१९१०-११	९५७८४	१९४५-४६	५६०५९०
१९११-१२	१३८४२२	१९४६-४७	९३१९४६
१९१२-१३	३२१७७३	१९४७-४८	१५०४९५८
१९१३-१४	१०२९४७	१९४८-४९	१४५८६४५
१९१४-१५	१३४१९७	१९४९-५०	२०६३८९३
१९१५-१६	१७६८१६	१९५०-५१	१६८३९२६
१९१६-१७	१२४७९७	१९५१-५२	२५०९१६७
१९१७-१८	१३२९१२	१९५२-५३	१६२६६७७
१९१८-१९	१५३९९१	१९५३-५४	२३८०२६२
१९१९-२०	१८७८६९	१९५४-५५	२०६३५७१
१९२०-२१	३३४००६	१९५५-५६	३५८०५३२
१९२१-२२	२६८३७२	१९५६-५७	२७६५६७१
१९२२-२३	२२८०६५	१९५७-५८	२८९३४६३
१९२३-२४	२६८७२२	१९५८-५९	२५८०८९१
१९२४-२५	२७०५७७	१९५९-६०	२८४५७४८
१९२५-२६	२५४७०९	१९६०-६१	२७७७४३३
१९२६-२७	२७२३८०	१९६१-६२	३००१६५३
१९२७-२८	२८३१३२	१९६२-६३	४४५२६४५

पूर आणि पूल.

अलिकडे १९२९ साली गोदावरीला महापूर आला होता. हा पूर अतिशय मोठा समजायला पाहिजे. सन १९१८-१९ च्या सुमारास नदीला असाच मोठा पूर आला होता. त्या पुरामुळे पूल बांधण्यासाठी उभारण्यात आलेल्या लाकडी कमानी वाहून गेल्या. त्या पुराचा अंदाज घेऊन पुलाच्या संकल्पित कमानी आणखी वर उचलण्यात आल्या. पूर आल्यामुळे पूल उभारला जातो, पण यावेळी उंचही करण्यात आला.

– दामोदर महादेव चंद्रात्रे, माजी म्यु. सभासद

चतुर्थ कालखंड
१९२६ ते १९४७
विभाग चौथा

१९२५ चा कायदा

इ. स. १९२५ मध्ये मुंबई सरकारने मोठ्या नगरपालिकेसाठी 'बाँबे बरो म्युनिसिपालिटीज अॅक्ट' हा कायदा पास केला. या कायद्याने नगरपालिकेच्या घटनेत काही महत्वाचे बदल झाले. या कायद्याचा एक उद्देश असा होता की, नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्याचे कारभारावरील नियंत्रण वाढावे. सभासदांनी धोरण ठरवावे, ठराव पास करावे. परंतु एकदा हे काम केल्यावर त्यांनी त्या धोरणांची व ठरावांची अंमल–बजावणी करण्याचे काम मुख्याधिकाऱ्याकडे सोपवावे या अंमलबजावणीसाठी त्याच्या हाताखालच्या नोकर वर्गावरील त्याचे नियंत्रण वाढावे या बाबतचे आपले उद्दिष्ट सरकारने या ठरावाच्या प्रारंभी स्पष्ट केले आहे.

But in the larger cities, the municipality can do little more than determine the questions of policy Committees can exercise only a general control over the municipal staff. The executive power must be exercised largely by the permanent staff. It is necessary, therefore, to define with greater clearness, the powers of the executive and to secure proper supervision and control by the appointment of a responsible Executive Officer, with clearly defined statutery powers at the head of the municipal staff. (The Bombay Municipal Boroughs Act of 1925. Statement of objects and Reasons)

मोठ्या नगरपालिकांच्या बाबतीत हा कायदा करण्याचे कारण असे की शहरातून ड्रेनेज, पाणी पुरवठा, नगर नियोजन योजना, रस्तेदुरुस्ती, शहरस्वच्छता, प्राथमिक शिक्षण इ. अनेक कामांची निकड निर्माण होत होती व ही कामे समाधानकारकरीत्या करावयाची तर मुख्याधिकाऱ्याच्या हातात सर्व सत्ता सोपविणे जरूर होते पूर्वीच्या कायद्यानुसार दरमहा ३० रु. वेतन असणारा नोकरवर्ग मुख्याधिकाऱ्याच्या अधिकारकक्षेत येत नव्हता. त्याच्या नेमणुका व बडतर्फी, बढती इत्यादि बाबतचे अधिकार हे मॅनेजिंग कमिटीचा व इतर यांच्या हातात होते. त्यामुळे हा नोकरवर्ग मुख्याधिकाऱ्याच्या हाताखाली काम करीत होता. परंतु तो जबाबदार होता सभासद वर्गाला ! त्यामुळे नोकरवर्गाने मुख्याधिकाऱ्याची आज्ञा अवमानिली तरी मुख्याधिकारी त्यांना काहीच शासन करू शकत नव्हते कारभार यंत्रणेवर याचा अनिष्ट

परिणाम होई. हा दोष दूर व्हावा म्हणून नगरपालिकाविषयी हा कायदा सरकारने पास केला.

इ. स. १९११ मध्ये नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांची सत्ता या कायद्यानुसार वाढली. ५० रुपयेपर्यंत पगार असणारा नोकरवर्ग त्याच्या संपूर्ण नियंत्रणाखाली आला. मुख्याधिकाऱ्यांना कामावरून काढून टाकावयाचे असले तर एकूण सभासदांपैकी $\frac{2}{3}$ सभासदांनी त्यांच्याविरुद्ध ठराव पास केले पाहिजेत, अशी अट घालण्यात आली. याशिवाय मुख्याधिकारी पदवीधर (बी. ए. व बी. ई.) असावा असा निर्बंध या कायद्याने घातला. या अटीचा सुपरिणाम असा झाला की सुशिक्षित अधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली नगरपालिकेचा कारभार चालू लागला.

● कार्यक्षेत्र विस्तार -

या कायद्यानुसार नगरपालिकेच्या कामाचे क्षेत्रही वाढू लागले. इ. स. १९०१ च्या कायद्यानुसार महारोगी व वेडे यांच्या व्यवस्थेची जबाबदारी नगरपालिकेवर टाकण्यात आली. इ. स. १९२५ च्या कायद्याने त्यात आणखी भर टाकली. शहर हद्दीत जर कोणाला पिसाळलेले कुत्रे चावले तर त्यावर नगरपालिकेने मोफत औषधोपचार करावा व त्यासाठी योग्य तो खर्च करावा.

याशिवाय नागरी जीवनात काही नवीन समस्या निर्माण झाल्या होत्या. त्या समस्या सोडविणे आवश्यक होते. तथापि या नव्या कामासाठी सरकार करांचे उत्पन्न द्यायला तयार नव्हते. यासाठी सरकारने नगरपालिकेच्या कामाचे दोन प्रकार पाडले. १) आवश्यक कर्तव्ये व २) ऐच्छिक कर्तव्ये. दुसऱ्या प्रकारात अनेक कामांचा अन्तर्भाव होत गेला. ही कामे पुढीलप्रमाणे होत

१) शहरातील गलिच्छ वस्त्या हलविणे.

२) नगरपालिकेच्या नोकरांसाठी चाळी वा घरे बांधणे.

३) करमणुकीसाठी संध्याकाळी नागरिकांना संगीत ऐकविण्याची व्यवस्था करणे.

४) शहरामध्ये बस वा ट्राम वाहतुकीची व्यवस्था करणे.

५) शहरात टेलिफोन पुरविणे.

नगरपालिकांनी इ. स. १९५० नंतर ही कर्तव्ये पार पाडण्यास प्रारंभ केला. कारण पूर्वीच्या तोकड्या उत्पन्नात ही खर्चाची कामे अवघडच नव्हे तर अशक्य होती.

इ. स. १९२५ च्या कायद्यानुसार नगरपालिकांमधील लोकनियुक्त सभासदांचे प्रमाण वाढविण्यात आले. सर्व सभासदात सरकार नियुक्त सभासद $\frac{1}{10}$ पेक्षा अधिक असू नयेत, असा दंडक कायद्याने घालण्यात आला.

● १९३५ नंतर–

इ. स. १९२८ ते १९३५ पर्यंत मुंबई राज्यातील नगरपालिकांच्या घटनेत कोणताच बदल झाला नाही. परंतु १९३५ मध्ये भारताला संयुक्त राज्य घटनेची तत्वे लागू करण्यात आली. या नव्या घटनेप्रमाणे सर्व प्रांतात स्वायत्त राज्ये सुरू झाली. १९३७ मध्ये या नव्या तत्वाप्रमाणे देशात निवडणुका सुरू झाल्या. हिंदुस्थानातून, ११ प्रांतातून कॉंग्रेस बहुमताने निवडून आली. मुंबई प्रांतातही कॉंग्रेसने आपले मंत्रीमंडळ तयार केले.

अधिकारावर येताच कॉंग्रेसने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या प्रश्नांना हात घातला. या क्षेत्रात विकेंद्रित लोकसत्तेचे पाऊल पुढे पडण्यासाठी काही कायद्याची तरतूद करण्याचे व स्थानिक लोकशाही बलशाली करण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेतील घटनेतील काही मर्यादा वा दोष दूर करण्याचे सरकारने ठरविले. त्यानुसार १९३८ मध्ये सरकारने मुंबई राज्यातील नगरपालिकांच्या घटनांचे दुरुस्ती विधेयक संमत केले या नव्या विधेयकाप्रमाणे नगरपालिकात खालील बदल आले.

१) नगरपालिकेत सरकारनियुक्त सभासद नेमण्याची प्रथा बंद झाली व ही नगरपालिका १९३८ साली पूर्णपणे लोकशाही स्वरूपाची झाली. १८५८ पासून १९३८ पर्यंत सरकार-नियुक्त सभासदांची संख्या कमी जास्त होती त्यांची संख्या किती होती हा प्रश्न महत्वाचा नव्हता. ही बाबच लोकशाही तत्वाशी मुतराम् जुळणारी नव्हती. या दृष्टीने १९३८ साली कांग्रेस सरकारने केलेली सुधारणा महत्वाची होती

२) लोकनियुक्त सभासदांची संख्या २४ वरून ३३ पर्यंत नेली. १९२१ ते १९३८ या काळात लोकसंख्या खूपच वाढली होती. विस्तार वाढत होता वाढत्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व वाढविण्यास हवे ही गरज ओळखून लोकप्रतिनिधींची संख्या वाढविण्यात आली

३) याशिवाय एक महत्वाची सुधारणा झाली १९२५ पर्यंत स्त्रीयांना मतदानाचा अधिकार होता. परंतु उमेदवार म्हणून निवडणुकीस उभे राहण्याचा हक्क नव्हता. त्यांच्या नागरिकत्वावर हीनतेचे शिक्कामोर्तब करणारा हा ठराव १९२४ साली रद्द करण्यात येऊन स्त्री–पुरुषांना निवडणुकीच्या प्रांगणात समान हक्क देण्यात आले

स्त्रियांनी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कारभारात भाग घेतला पाहिजे म्हणून सरकारकडून त्यांच्यासाठी जागा राखून ठेवण्यात आल्या.

कांग्रेसने १९३८च्या ठरावानंतर आणखी काही ठराव पास करून या स्थानिक लोकशाहीच्या क्षेत्रात आणखी काही सुधारणा केल्या. संसदीय लोकशाहीचे हे अधिष्ठान अधिक बळकट करण्याच्या योजना बोलून दाखविल्या जात परंतु पुढे लवकरच युद्धाचा वणवा पेटला. महायुद्धात इंग्लंडसह सारा युरोप जीवनमरणाच्या झगड्यात गुंतला हिंदुस्थानलाही या युद्धाच्या वणव्यात खेचण्यात आले. कांग्रेस व ब्रिटिश सरकार यांचे या प्रश्नावर तीव्र मतभेद झाले. अखेरीस कांग्रेसच्या मान्य मंत्र्यांनी व आमदारांनी आपले राजीनामे सरकारला सादर केले व आपला असन्तोष व्यक्त केला. १९३९ पासून १९४५ पर्यंत इंग्लंड युद्धात गुंतले होते. आलेल्या या महान् आपत्तीतून बाहेर कसे पडावे याच एका चिंतेने ते ग्रासले गेले होते. अशा काळात स्थानिक स्वराज्य संस्थांचे नवे कायदे करणे ब्रिटीशांना शक्य नव्हते. त्यामुळे १९४७ पर्यंत नगरपालिकेच्या घटनात्मक जीवनात कसलाच बदल झाला नाही. पूर्वीच्या घटनेनुसार ती आपला जीवनक्रम आखीत होती. परन्तु त्या नंतर मात्र तिची घटना, तिची कामे, अर्थ व्यवहार, सरकारी नियंत्रण, कारभार, सभासद वर्गाचे स्वरूप या तिच्या प्रत्येक अंगोपांगात आमूलाग्र बदल झाले.

● निवडणुका—

१९२५ च्या मुंबई "म्युनिसिपल बरो" अॅक्टाच्या कलमानुसार १९२६ च्या नोव्हेंबर महिन्यात येथे नगरपित्यांच्या निवडणुका घेतल्या होत्या परंतु त्या दुरुस्त कायद्याच्या (म्हणजे १९२५च्या) तरतुदीनुसार घेतलेल्या नसल्याने रद्द ठरवल्या गेल्या. आणि पूर्वीचेच नगरपिते १९२७ सप्टेंबरपर्यन्त काम करीत राहिले. निवडणुकाविषयक नवीन नियम बनविले गेले. नाशिक शहराची ९ वार्डात विभागणी केली गेली. पैकी ७ वार्ड हे मुस्लीमेतरासाठी १ वार्ड मुस्लीमांसाठी व १ वार्ड मागासलेल्या जमातींसाठी राखला गेला. पहिल्या (७+१) ८ वार्डातर्फे प्रत्येकी ४ प्रमाणे व शेवटच्या वार्डातून १ असे एकूण ३३ लोकनियुक्त नगरपिते व ५ सरकार-नियुक्त अशी नगरपालिकेची रचना तयार झाली. पूर्वी २४ लोकनियुक्त व ६ सरकार-नियुक्त अशी रचना होती, हे आपण मागे पाहिलेच आहे

सप्टेंबर १९२७ चा निवडणूक निर्णय तक्ता

वा. नं.	एकूण मतदार	मिळालेली मते	मतांची टक्केवारी	एकूण स्पर्धक
		(मुस्लीमेतर)		
१	१२३६	३११०	६२·९	६
२	१२८१	२८३०	५५·२	५
३	१३०१	३१३५	६०·२	६
४	९७८	२६१८	६६·९	६
५	९७५	२६२५	६७·३	७
६	८३७	९५७	२८·६	५
७	११३५	३२५६	७१·४	६
		(मुस्लीम)		
८	११२५	३१७५	७०·५	७
		(मागासलेल्या जातीसाठी)		
९	१५७	१००	१५·९	२

● पाणीपुरवठा–

मागील प्रकरणांत शास्त्रीय पद्धतीने व मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा योजना नगरपालिकेने हाती घेऊन १९१२ पासून नागरिकांना नळाची सोय करून दिल्याचे आपण पाहिलेच होते. त्यावेळी जेमतेम ४५ हजार गॅलनच पाणी नगरपालिका पुरवू शकत होती त्यानंतर १९२५ साली नगरपालिकेने रु. ३५००० सरकारी मदत मिळवून बारा बंगला टाकी बांधण्याचा अितिहासही आपण ध्यानी घेतला होता. ह्या टाकीमुळे १ लाख गॅलन पाणीपुरवठा होत असे. दुसऱ्या महायुद्धाचे कालात देवळाली येथील सैन्यतळाचे तसेच सैनिकी शस्त्रोत्पादनाचे मोठे केंद्र निकटवर्ती असल्यामुळे लोकांची, सैन्याची, सैन्याधिकाऱ्यांची येजा सारखी वाढली. सैन्यतळाच्या गरजेच्या अनुषंगाने बाकीचे व्यवसाय, व्यापार उदीमही वाढला. शिवाय नासिकची लोकवस्ती भरपूर प्रमाणात वाढली, येथल्या नगरपालिकेस या व अितर निर्वासितांच्या अनियंत्रियणीय, वाढत्या लोकवस्तीची हितकर्तव्ये व आवश्यक सेवा कर्मे अशक्य झाल्यासारखेच दिसून येते. या पार्श्वभूमीत- नासिक नगरपालिकेने अनेक धाडसी योजना व भांडवली खर्चाची कामे अंगिकृत केली. अर्थात त्याची परिणती अंतिमतः आर्थिक परिस्थिती खालावण्यात व त्यामुळे नगरपालिका सरकारजमा होण्यात झाली. पण ही स्थिति हेतु पुरस्सर आणली असा सरकारी दावा आणि परिस्थितीजन्य असल्याचा नगरपालिकेचा निर्वाळा ह्यातून सत्याचा बोध, जाणत्या वाचकांना निश्चित होऊ शकेल.

पाणीपुरवठा योजना मोठया प्रमाणावर उभारण्यासाठी पंपिंग स्टेशनची शक्ती वाढवण्यासाठी नगरपालिकेने २ लाखाचे १९१०–१९१६ साली काढलेले कर्ज १९३६ पर्यन्त फेडीत आणले होते. त्यानंतरही १९४१ साली पात्रान्तर्गत विहिरीसाठी, क्लोरीनतळ बांधण्यासाठी नैसर्गिक फिल्टरिंग साधण्यासाठी नगरपालिकेस ५,९५,००० रु.कर्ज मिळविण्यासाठी सरकारकडे मजूरी अर्ज करावा लागला.

त्यानंतर १९४७ पासून गंगापूर धरणबांधणी सुरु झाल्यामुळे गोदातटाकीच्या नासिककरांना तिच्या पाण्यावरील आपला नैसर्गिक ताबा गमवावा लागला.

● म्युनिसिपल बिल्डींग—

सुरवातीचे नगरपालिका दप्तर हे हल्लीच्या पेशवे वाड्यात (पेठे हायस्कूल) असल्याचे आपण पाहिलेच होते. तेथेच असलेल्या मामलेदारांच्या वाढत्या कार्यालयामुळे नगरपालिकेस आपले ऑफिस तेथून हलवावे लागले. हल्ली जेथे चित्रमंदीर सिनेमागृह आहे तेथे पूर्वी राजेबहाद्दरांचा वाडा होता तेथे १९१८ साली दप्तर स्थापले गेले. तसेच १९२५ ला तेथे आलेल्या मुंबईच्या गव्हर्नरांना दिलेल्या मानपत्रात नगरपालिकेने सरकारवाड्याची ऑफीससाठी मागणी केली होती. शिवाय राजेबहाद्दराच्या वाड्याची करार मुदतही संपत आली होती. त्यासाठी १९३४ साली नगरपालिकेने स्वतःची इमारत बांधण्यास सुरुवात केली. सुरुवातीचे एस्टिमेट २०,००० रु.चे होते. पण इमारत मागील बाजूस असलेल्या ड्रेनेजच्या पाणथळ जागेमुळे बांधण्यास अयोग्य असे मत प्रचलित होते. शेवटी सरकारी सर्व्हेअरने मजबूत पायाबांधणी केल्यास धोका नाही असा निर्वाळा दिल्याने बांधकामास सुरुवात झाली. नगरपालिकेची तरतूद ८०५६० रुपयांचीच होती. कामाची निकड, कॉन्ट्रॅक्टरची हाव व बांधणी कामातील दिरंगाई ह्या त्रिदोषामुळे सुमारे १९७००० रु. खर्च होऊन ही इमारत बांधली गेली. कॉन्ट्रॅक्टरकडे ॲडव्हान्स म्हणून दिलेल्या पैशाची परती अथवा हिशोब दोन्ही वेळेवर न येऊ शकल्याने नगरपालिकेस ह्याबाबत दोषाचे धनी मात्र व्हावे लागले. अजून देखील कोनशीलेवर असलेला सर्व्हे नं. १ आकडा ह्या खेदजनक प्रसंगाची नासिककरांना आठवण करून देईल. नगरपालिकेसारख्या प्रमुख नगरसंस्थाना स्वतःच्या इमारती असणे अत्यंत आवश्यक आहे. पण तत्कालीन सरकारी दृष्टी स्थानिक स्वराज्य संस्थाकडे कृपाळूपणे पहाण्याची नव्हती हेच खरे. स्वातंत्र्योत्तर काळातच ह्या दृष्टीने भारतातील मोठ्या शहरातून ह्या दृष्टीने प्रगति झाल्याचे आपणास आढळते ते ह्यामुळेच.

● ड्रेनेज सुधारणा—

नासिक नगरपालिकेच्या आरंभीचा इतिहास पाहताना आपण अगदी पूर्वीची सांडपाणी, गटारे, इत्यादींची माहिती घेतलीच होती तदनंतर वेळोवेळी होत गेलेल्या सुधारणांचाही इतिहास ध्यानी घेतला. १८९७ साली व्हिक्टोरिया पूल बांधल्यापासून नदीच्या जोरकस प्रवाहास प्रतिबंध झाला होता. आणि नासिकमधील बहुतेक गटारे, पुलाखालील भागात गोळा होत. मेहरबान कन्सल्टिंग पब्लिक हेल्थ इंजिनीयर यांनी नासिक ड्रेनेजची योजना प्रथम १९३० साली सुचविली सन १९३१ साली म्युनिसिपालिटीने रु. ३६०० सरकारी खजिन्यात भरून तपशीलवार योजना मागविली. सदर योजना १९३६ पर्यंत सरकारी दप्तरातच होती मध्यन्तरी, नदी किनाऱ्याच्या बाजूने मोठमोठ्या इमारती ड्रेनेज नसलेल्या भागातून तयार होत गेल्याने घाण पाणी पवित्र अशा गंगोदकात शिरकाव करू लागले. नासिक हे हिंदुस्थानातील सर्व यात्रेकरूंचे यात्रेचे महत्वाचे ठिकाण असल्याने व गंगावाडीसारख्या आरोग्यास विघातक अशा भागामुळे शहराच्या आरोग्यावर अनिष्ट परिणाम झाला. सन १९३४ च्या मे महिन्यात नासिकमध्ये कॉलरा व टायफाईड या साथी भयंकर स्वरूपात झाल्या. सन १९३५ साली मे. डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ यांनी नासिकचे सार्वजनिक आरोग्य तपासण्यासाठी नेमलेल्या अधिकाऱ्याच्या

रिपोर्टमध्ये खालील वाक्ये नमूद केली होती. "लोकसंख्येपैकी शेकडा ८० लोक कुंडामध्ये स्नान करतात. आणि अशा पाण्याचे आचमन पवित्र समजले जाते. पुलाजवळ पात्रात घाण पाणी सोडल्यामुळे नदीचे पाणी खराब होते, आणि हेच पाणी नदीपात्रातील पवित्र कुंडात ज्या ठिकाणी शेकडो लोक स्नान करतात, त्या ठिकाणी मिळते. हे थांबविण्यात यावे," अतएव म्युनिसिपालिटीने "इन्टर सेप्टिंग ड्रेन" योजना मंजूर केली. व—

सन	रुपये
१९३२–३३	६४४३,
१९३३–३४	४६१०,
१९३४-३५	६६१०,
१९३५–३६	१०४२९,
१९३६–३७	१३९३८,
एकूण रु.	४२०३०

अशा रीतीने सुमारे ५ वर्षांत वरील रक्कम खर्चून नदीपात्रात खराब पाणी मिळण्याचे थांबविण्याचे अधिक महत्वाचे असल्याने, ज्या भागात अजिबात ड्रेनम् नव्हत्या अशा भागात व्यवस्था केली. याबाबत सल्लागार पब्लिक हेल्थ इंजिनीयर यांचे १९४० साली काढलेले उद्गार स्मरणीय आहेत:

"आम्ही सन १९३८ साली भेट दिली. त्या वेळेस कुंडाच्या पाण्यात घाण पाणी सोडले होते. सदर परिस्थितीत आम्हास आता फारच सुधारणा झाल्याचे दिसत आहे. पोहोण्याची व्यवस्था नदीपात्रात केल्याचे पाहून सन्तोष वाटला. सदरचे काम म्हणजे नाशिक शहराचे वैभव व भूषण आहे. त्याबद्दल म्युनिसिपालिटीस धन्यवाद देणे जरूर आहे."

● आरोग्य खाते १९३६–३७

		लोकसंख्या	वाढ
१९०१	साल	२१४९०	—
१९११	,,	३००९८	८६०८
१९२१	,,	३८२११	८११३
१९३१	,,	४५७४४	७५३३

वरील आकड्यावरून दरसाल सरासरी ८०८ संख्येने नासिक शहराची लोकसंख्या वाढत होती. १९३१ पासून १९३६ पर्यंतच्या अवधीत ४४४४ ने वाढ धरल्यास १९३६–३७ साली ती ५०,१८८ च्या घरात गेल्याचे दिसून येईल.

१९३१ साली नासिकमध्ये असलेल्या लोकवस्तीची धर्मश्रद्धानुसार होणारी विभागणी पुढीलप्रमाणें आहे:

हिन्दु	३८०९०,
मुस्लीम	६४०९,
ख्रिश्चन	६६५,
जैन	३५७,
शिख	३,
पार्शी	२२२,
ज्यू	४,
एकूण	४५,७४४

त्यातून सुमारे ७६५४ अहिंदु असल्याचे दिसते. पूर्वी गंगेच्या पाण्याचा लाभ त्यांना पिण्यासाठी होऊ शकत नसे. नळ व पाणीपुरवठा योजनाद्वारा इतक्या लोकवस्तीची सोय नगरपालिकेने केली, ही गोष्ट नासिकसारख्या धर्मप्रभाव असलेल्या शहरास निश्चित भूषणावह आहे. खेरीज मुस्लिम व इतर धर्मीयांची शिक्षण व्यवस्था नगरपालिका कशा प्रकारे राखीत होती, ह्याविषयीचा उल्लेख येथे विस्तारभयास्तव देता येत नाहीं.

प्लेग :– १९१४–१९१८ ह्या सालातील प्लेगच्या त्या भयंकर साथीचा आणि नगरपालिकेने आपल्या सामर्थ्यानुसार केलेल्या प्रतिबंधक योजनांचा आपण थोडक्यात इतिहास पाहिलाच. ह्या कालखंडात, जरी प्लेगचा १९३५–३६ खेरीज फारसा प्रादुर्भाव दिसला नाही, तरी नगरपालिकेने प्रतिबंधक

उपाययोजना सातत्याने चालू ठेवली होती. उंदीरांना मारण्यासाठी पुरविलेल्या पिंजऱ्याची संख्या जरी कमी केली होती तरी एकूण ८०० पैकी १५० पिंजरे आळीपाळीने पुरविण्याची योजना अमलात ठेवली. १९३६ मार्ली त्यात २५० ची भर घातली आणि या प्राणघातक रोगाशी झुंज देण्याचे नासिककरांचे सामर्थ्य सतत वाढते ठेवले.

क्षयरोग : हा कालरा, प्लेग ह्यांच्या खालोखालचा नासिक नगरपालिकेचा शत्रु. प्रतिबंधक तसेच, शुश्रुषा विषयक इस्पितळ चालविण्याची मनीषा १९३६ च्या अहवालात स्पष्ट केलेली होती. तोपर्यंतच पंचवटी येथील अनाथ विद्यार्थी गृहाच्या आरोग्य शाखेतर्फे हे काम चालत होते. त्यातील १०१ रोग्यांपैकी शहरातील फक्त १२ रोगीच होते.

महारोग : नासिकसारख्या तीर्थक्षेत्राचे ठिकाणी यात्रेकरूंची येजा मोठ्या प्रमाणावर असे. त्यांच्या ठायी असलेल्या धार्मिक भावनामुळे व दानधर्म होत असल्यामुळे भिकाऱ्यांची समस्या इतर क्षेत्रासारख्या ह्याही क्षेत्रात आहेतच. पण महारोगादि सांसर्गिक रोगांनी पछाडलेल्या भिकाऱ्याची संख्या नासिकला फार मोठ्या प्रमाणात होती. गावातून देवळापाशी व इतर सर्वत्र, हे रोगी आपले आसन घालून, अवनत मानवतेचे दर्शन घडवीत असत. पंचवटीत मिशनतर्फे एक केन्द्र चालवले जात असे. त्यात सुमारे ६४ पुरुष व ४४ स्त्रीयांची सोय होत असे. खेरीज २७ रोग्यांना बाह्योपचार उपलब्ध होत होता. पंचवटीतील गणेशवाडी भागात बरेचसे महारोगी वस्ती करून असत. पांजरापोळ व गाडगे बुवा मठाच्या अधिकाऱ्यांतर्फे देणगी जमा करून त्यांचा चरितार्थ चालविण्याची जुजबी व्यवस्था होती. ह्या कामासाठी नगरपालिकेने जी व्यवस्था केली, तिचा साग्र वृत्तांत ६ व्या प्रकरणी आपण पाहूच

या खेरीज, टायफाईड, इन्फ्लुएन्झा बाळंतरोग घटसर्प, आव, मलेरिया, इत्यादि रोगांशीही झुंज देण्याचे नगरपालिकेचे सामर्थ्य ह्या कालखंडात क्रमाक्रमाने वाढत असल्याचे आपणास प्रतीवर्षीच्या अहवालावरून आढळते.

● रस्ते बांधणी दुरुस्ती इत्यादि—

नगरपालिकेचा घटनात्मक इतिहास तपासताना सुरुवातीचे काळात नगरपालिकेचे स्वरूप जिल्हाधिकाऱ्याला सल्ला देणाऱ्या समितीसारखेच असल्याचे आपण पाहिले होते. स्थानिक स्वराज्य संस्था, ह्या स्थानिक सरकारी संस्था म्हणूनच काम करीत असल्याचे, तत्कालीन सरकार नियुक्त वा पदसिद्ध अधिकाऱ्यांच्या संख्येवरून सहजच ध्यानी येईल. त्यामुळे नागरिकांच्या हिताच्या महत्वाच्या अथवा भांडवली खर्चाच्या योजना संकुचित स्वरूपात अत्यंत मंदपणे अमलात येत होत्या, आणि बऱ्याचदा सरकार-दरबारी धूळ खात पडत होत्या.

कालान्तराने जसजसे नगरपालिकेच्या शासन मंडळात लोकनियुक्त सभासदांची संख्या वाढत गेली, तसतशा नवीन धाडसी व महत्वाच्या योजना हाती घेतल्या जाऊ लागल्या. रस्तेबांधणीची प्रगति ह्या दृष्टीने मोठी बोलकी आहे.

पूर्वीचे बहुतेक रस्ते दगडी होते १९३१ पासून नगरपालिकेने डांबरी रस्ते करण्यास सुरुवात केली. मेनरोड हा त्याच साली डांबरी केला गेला. परंतु नासिक शहराची चढ उताराची मांडणी असल्याने डांबरी रस्त्याचा हा प्रयोग अयशस्वी झाला असेच मानावे लागेल.

या दरम्यान इलाखा सरकारने आधुनिक पद्धतीने रस्ते करण्याबाबतची विस्तृत योजना आसपास व नासिकच्या हद्दीत अमलात आणल्यामुळे येथील नगरपालिकेलाही आधुनिक वाहनांच्या साधनांच्या योगाने व भरमसाट वाढणाऱ्या रहदारीमुळे, आपले कायमचे

नादुरुस्त झालेले रस्ते दुरुस्त करण्याची तसेच नवीन रस्ते बांधण्याची सिमेंट कॉंक्रीट करण्याची योजना पत्करावी लागली. दरसाल जुन्या पद्धतीच्या खडीच्या रस्त्यावर होणारा खर्च, कायमचा वाचण्याचे दृष्टीने नगरपालिकेने असोसिएटेड सिमेंट कंपनीशी एक सोयीचा करार केला. सिमेंट रस्त्याची कामे हाती घेण्यासाठी सुमारे ६०,००० रुपयांची सिमेंट खरेदी वरील कंपनीकडून करावी व हप्त्याने रक्कम देण्याची सोय बघावी या करारामुळे नगरपालिकेस सिमेंट उपलब्ध झाल्याने शहरातील बऱ्याच रस्त्याचा कायापालट ह्या कालखंडात झाल्याचे आपणास आढळून येते. नगरपालिकेच्या एकूण २२ मैल लांबीच्या रस्त्यांपैकी अत्यंत महत्वाचे असे २।। मैल लांबीचे रस्ते सिमेंटचे ह्या दरम्यान झाले. मेनरोड १९३७ ला सिमेंट कॉंक्रीट झाला. रस्ते बांधणी दुरुस्ती व सिमेंटचे करणे ह्या विषयी अशीच महत्वाची सुधारणा, १९४८ ते ५२ ह्या सर्वाधिकाऱ्याच्या कालात झाल्याचे पुढे आपणास आढळलेच.

आज नासिक शहरातील एकूण ३० मैल लांबीच्या रस्त्यांपैकी २४ मैल रस्ते सिमेंट कॉंक्रीटचे झाले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात सिमेंटचे रस्ते असण्याबद्दल मुंबई, पुणे, इत्यादि महत्वाची थोडी शहरे सोडल्यास नाशिकचा क्रमांक, महाराष्ट्र राज्यात, फार वरचा लागतो. नाशिक नावाची उत्पत्ती नवशिख, म्हणजे नऊ टेकड्यांवर वसलेले अशी केली जाते. नासिक शहर हे "साज" नावाच्या टेकाडावर वसलेले आहे. त्यामुळे, चढउताराची मांडणी, हा रस्ते बांधणीतील फार मोठा अडथळा असूनही, नगरपालिकेने ह्या बाबतीत केलेल्या कामगिरीचा उल्लेख अभिमानानेच करावा लागतो.

● समालोचन--

१९२५ ते १९४८, ह्या सुमारे पावशतकातील नगरपालिकेच्या जीवनाचे येथे विस्कळित का होईना चित्र उभारण्याचा एक प्रयत्न केला आहे. ह्या कालखंडात विशेषतः १९३५ नंतर नगरपालिकेने नगर रचना, व नागरिकांच्या हिताच्या अनेक धाडसी योजना आखल्या व साकार करण्याचा प्रयत्न केला.

या कामाकडे पहाण्याची सरकारी दृष्टी फारशी उत्साहवर्धक नसल्याचे आपणास आढळून येते. विशेषतः १९४२ सालापासून सरकारने नगरपालिकेची चौकशी करण्यासाठी एक विशेष अधिकारी नेमला, त्याने नगरपालिकेच्या प्रत्येक खात्याची व खात्याच्या उपांगाची कसून चौकशी केली. ४२ ते ४७ पर्यंत, सालोसाल नगरपालिकेने सुधाराव्या. म्हणून, ताकिदी दिल्या गेल्या, पण तसे घडू शकले नाही. मुख्यत्वे करून, करवसुली खात्यात आणि थकबाकी वसुलीविषयक करावयाची कठोर अमलबजावणी नगरपालिकेने केली नाही, शासनयंत्रणाही दिवसेंदिवस अकार्यक्षम होत गेली. जीवनाच्या अनेक क्षेत्रात चमकलेले, नगराध्यक्ष, अनुभवी, सुशिक्षित व तळमळीचे नगरपिते, ह्या कालात नगरपालिकेला लाभले. खेरीज स्वातंत्र्य सम्पादनासाठी उत्सुक झालेला भारत देश, त्यातील जागृत जनता ही देखील नासिक शहरात होतीच. कै. पृथ्वीराज निमाणीसारखे द्रष्टे पण असलेले नगराध्यक्ष असूनदेखील, नगरपालिकेची आर्थिक परिस्थिती सुधारू शकली नाही. हे का व कसे घडत गेले, हा मोठा चिंतनीय विषय आहे. ह्या कालखंडाच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असा तो विषय असूनही, येथे त्याविषयी नामनिर्देशाखेरीज काहीच करता येणे शक्य नाही. याविषयी सखेद दिलगिरी व्यक्त करून ह्या परिस्थितीचा परिणाम म्हणून, नासिक नगरपालिका सरकारजमा झाली व येथे सर्वाधिकाऱ्याची सत्ता सुरू झाली, त्याचा अहवाल पुढील प्रकरणात पाहू या.

पंचम कालखंड

१९४८ ते १९५२

विभाग पाचवा

● मुंबई सरकारचा ठराव--

मुंबई राज्याच्या "आरोग्य आणि स्थानिक स्वराज्य संस्था" खात्याचा ठराव व आज्ञापत्र-क्रमांक ४६३३।३३ दिनांक १२-१-१९४८ यामध्ये नाशिक नगरपालिकेचे लोकशाही युग संपून "येथे सर्वाधिकाऱ्याचा अमल " आण-ण्याची शिफारस आहे.

१) ज्या अर्थी मुंबई सरकारच्या म्युनिसिपल बरो अॅक्टच्या (१९२५) कलमा-नुसार आवश्यक ती कर्तव्ये पार पाडण्याची क्षमता, तसेच, कर्तव्यपूर्तीत सतत होत गेलेली चालढकल नाशिक बरो म्युनिसिपालिटीने दाखविली आहे.

२) त्याबाबत वेळोवेळी सूचना दिली असतानाही, समाधानकारक सुधारणा सिद्ध केला नाही.

३) त्या अर्थी वरील कायद्याच्या कलम २१९ उपकलम १) ह्या द्वारा सरकारला प्राप्त झालेल्या अधिकारान्वये सरकार ही नगरपालिका तीन वर्षांसाठी ताब्यात घेत आहे.

सही : एम्. के देशपांडे.
उपसचीव

या मुंबई राज्याच्या आदेशानुसार, कलेक्टर जिल्हा नाशिक. ह्यांनी नगराध्यक्ष नाशिक नगरपालिकेस पत्र क्रमांक M. U. N. V G 25।B द्वारा आदेश दिला की,

" सरकारच्या आदेशानुसार, नाशिक बरो म्युनिसिपालिटी तीन वर्षांसाठी सरकार १२-१-४८ पासून ताब्यात घेत आहे. पुणे विभागाचे रेशन कंट्रोलर श्री एम् जी चव्हाण ह्यांची सर्वाधिकारी म्हणून नेमणूक केली आहे.

दिनांक १२-१-१९४८ रोजी ११॥ वाजल्यानंतर श्री. चव्हाण हे नगरपालिकेची सर्व सूत्रे हाती घेतील त्यांना नगराध्यक्ष तसेच नगरपालिकेच्या सेवकांनी मदत करावी प्रसंगी नगरपालिकेच्या कागदपत्र स्थावर जंगम इस्टेटीबाबत, कोणी काही हलवाहलव, मोड-तोड करण्याचा प्रयत्न केल्यास त्यावर शिस्तभंगाबद्दल योग्य तो उपाय करण्यात येईल

सही — व्ही. नारायणा, कलेक्टर नाशिक

प्रत श्री चव्हाण यांना रवाना

अशा रीतीने नाशिक नगरपालिकेतील लोकशाही जमाना संपला व सर्वाधिकाऱ्याची कारकीर्द सुरू झाली.

● प्रश्नोत्तरांचा कलगी तुरा

मागील प्रकरणात आपण पाहिलेच होते की मुंबई सरकारच्या खात्यामार्फत आलेल्या चौकशी अधिकाऱ्याच्या यथामति व यथाशक्ति प्रश्नोत्तराचा कलगी तुरा नगरपालिकेच्या दप्तरातून होतच होता. सुमारे १९४२ ते ४७ पाच वर्षांपर्यंत ह्या नाट्याच्या फेरी चालू

होत्याच. कायद्याच्या तीक्ष्ण टोकावरुन चाललेले सरकारी खाते आणि लोकशाहीच्या लवचिक तत्वांचा वापर करणारी नगरपालिका ह्यांच्या ह्या कक्षा फेकीमधून नेवटी उग्र-लेली आरोपाची, तथाकथित आक्षेपांची येथे संक्षेपाने यादी व उत्तरे देण्याचा प्रयत्न आहे.

● सरकारी आक्षेप–

१) नगरपालिकेची आर्थिक परिस्थिति अत्यंत खालावलेली आहे. नगरपालिकेने थकबाकी वसूलात दर्शविलेली चालढकल, अव्यवहार्य खर्चिकपणा आणि योग्य नियंत्रणाचा अभाव यामुळे ही परिस्थिति अंशत: ओढवून घेतलेली आहे.

२) सालोसाली, नगरपालिकेच्या कराची बाकी थकू देणे, गेल्या दोन वर्षापासून जिल्हाधिकाऱ्यांनी वारंवार ताकीद दिली असतानादेखील, थकबाकी वसुलीची कोणतीही जारीची उपाययोजना न अवलंबिणे.

३) शहर स्वच्छतेबाबत योग्य त्या दिशेने व गतीने वाटचाल व समाधानकारक प्रगति न दर्शविणे.

४) नगरपालिकेचे हिशेब अत्यंत असमाधानकारक पद्धतीने ठेवणे. सरकारी हिशेबतपासणीसाच्या शंकाना (Audit notes) वेळीच उत्तर देणे अथवा, दर्शवून दिलेल्या दोषाबाबत सुधारणा करणे, ह्या बाबतीत नगरपालिकेने अक्षम्य दिरंगाई दर्शविलेली आहे.

५) नगरपालिकेची शासनयंत्रणा अत्यंत अकार्यक्षम, व अनेक बाबतीत कुर्मगतीची आहे. कायद्याच्या तरतुदीविरुद्ध तसेच सरकारी अधिकाऱ्याच्या सुचनाविरुद्ध नगरपालिका सतत वर्तन करीत आलेला आहे.

वरील आक्षेप सरकारी आज्ञापत्रकात मागाहून असल्याने ते येथे उद्धृत केले आहेत. सर्वाधिकाऱ्याने त्यांना दिलेली उत्तरे सविस्तर देताना, त्या मागील परिस्थितीची योग्य कल्पना येणे शक्य होईल म्हणून, उत्तरे वरकरणी, कायदेबाज, वाटत असली तरी विस्ताराने देत आहे तत्पूर्वी सर्वाधिकाऱ्याने घेतलेली काळजी व उचललेली पावले ह्या विषयी उल्लेख करणे आवश्य वाटते.

● राजा कालस्य कारणम् –

" राजा कालस्य कारणम् " असे एक संस्कृत सूत्र आहे राजा हा राज्याची प्रेरणाशक्ति होय. असा त्यातील गर्भितार्थ आहे. ह्या सूत्राचा प्रत्यय नासिक शहरातील अनेक नगराध्यक्षांनी व नगरपित्यांनी आपल्या अविश्रांत श्रमाने आणून दिलेला आहेच. नासिक नगरपालिकेचे सर्वाधिकारी म्हणून नियुक्त झालेले श्री. एस. जी. चव्हाण यानी देखील ही चैतन्यमालिका स्वतःच्या कर्तबगारीने चालू ठेवल्याचे आपणास आढळते. श्री.चव्हाण यांचा "उत्कृष्ट शास्ता" म्हणून असलेला लौकिक सरकार दप्तरी होताच. नुकतेच धुळे येथील "जिल्हा लोकलबोर्डाचा त्यांनी स्थापून दिलेला नेटका संसार बघून सरकारने त्यानाच नासिक नगरपालिकेचे सर्वाधिकार दिले. आणि त्यांनी देखील आपल्या असामान्य गुणांनी नासिककराच्या हृदयात अविस्मरणीय स्थान मिळविले. परिस्थितीचा अंदाज घेऊन सद्बुद्धिनुसार निर्णय घेण्याची व कार्यक्षमतेने अमलबजावणी करण्याची श्री. चव्हाणांची हातोटी फार वाखाणणीय होती. " स्वे स्वे कर्मण्यभिरत: " अशी शासनयंत्रणा म्हणजेच आदर्श शासनसंस्था असा त्याचा सरळ दिशोब असल्याने येथील नगरशासनाला त्यांनी विशिष्ट दृष्टिकोन तर दिलाच खेरीज शिस्तही बांधून दिली. ते वळण चालविणारे असिस्टंट चीफ ऑफिसर श्री. भोडक, हेडक्लार्क के. बाय. काळे, हेल्थ ऑफिसर थत्ते, श्री. के. के. काळे. आदि अनेक अधिकारी अजूनही नगरपालिकेत आहेत. सत्यसंकल्पाचा दाता परमेश्वर असतो. तसेच

जनहिताच्या खऱ्या सेवकास परमेश्वरी सहाय्य लाभते. म्हणूनच आर्थिक, शासकीय, आरोग्य विषयक सर्व दृष्टींनी खालावलेल्या ह्या नगरपालिकेद्वारा श्री. चव्हाण.च्या कारकीर्दीत अनेक जनहिताची कामे घडल्याचे आपल्याला आढळून येते. अर्थात मानवी बुद्धि व शक्ति ह्यास मर्यादा आहेतच. खेरीज स्खलनशीलताही आहेच. म्हणूनच ह्या मर्यादा ध्यानात घेऊन श्री. चव्हाण यांनी उचललेल्या पावलाची प्रथम आपण माहिती घेऊन नंतर त्यांनी सरकारी आक्षेपांना कशी उत्तरे दिलीत ह्याचा आढावा घेऊ या.

तुझे आहे तुजपाशी—

सर्वाधिकारी म्हणून सूत्रे हाती घेतल्यावर श्री. चव्हाणांच्या ध्यानी आले की, शासन यंत्रणा विस्कळित झाली ह्याचे प्रमुख कारण म्हणजे स्वत्वाच्या जाणिवेचा अभाव. आपली कर्तव्ये कोणती. अधिकार कोठले याची नीटशी जाणीव नसल्याने शासनयंत्रणेच्या घटकाचे हातून नियुक्त कामे होत नाहीत. हे सूत्र धारण केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत श्री. चव्हाणांनी सर्व खातेप्रमुखांची बैठक बोलावून त्यांचे अहवाल मागविले तसेच अधिकारशक्तीचा वापर करण्यास त्यांना उद्युक्त केले. निर्भीड मते ध्यानात घेऊन उत्तम ही सेवकांना योग्य ते उत्तेजन व पाठिंबा दिला. आरोग्याधिकारी, अभियंता, मुख्याधिकारी, हिशेब तपासणीस व करवसूली अधिकारी यांना त्यांनी लिहिलेली सविस्तर पत्रे मोठी बोधकारक आहेत. "गोष्टी मागेन शक्तिच्या चार" अशा भावनेने मतप्रभाव सामर्थ्य वापरण्याचे कृष्ण—कौशल्य श्री. चव्हाणांनी प्रथमतःच दर्शविले. आत्मज्ञान व आत्मविकास हा परस्परावलंबी कसा असतो हे प्रत्येक खात्यास व घटकास दर्शवून दिल्याने " तुझे आहे तुजपाशी "ची जाणीव प्रत्येकास नव्याने झाली आणि नवकर्तृत्वास संधी असल्याचाहि निर्वाळा प्रत्येकास प्राप्त झाला.

अपात्र ते त्याज्य—

यशस्वी शास्त्याला जसे गुणी माणसाचे मूल्यमापन करावे लागते, त्याचप्रमाणे अवगुणाचीही किंमत ठरवावी लागते. श्री. चव्हाणांची या बाबतची निरीक्षण शक्ति व स्वभावपरीक्षा फार अचूक असे. त्यामुळे योग्य व कार्यक्षम माणसास जसा त्यांचा विश्वास वाटू लागला तसा अपात्र व अकार्यक्षम माणसांना त्यांचा धसका घ्यावा अशी परिस्थिति उत्पन्न झाली. नगरपालिकेच्या दप्तरातून तत्कालीन करवसुली कारकून, जॉंब अस्टिमेंट्स हिशोब कारकून इत्यादिकांविषयी चव्हाणांचे शेरे वाचल्यास त्यांच्या असामान्य निरीक्षणशक्तीचे कौतुकच करावेसे वाटते. आपल्या कामावर अथवा काम न करण्यावर सतत कुणाची तरी करडी नजर आहे. गलथानपणाबद्दल जाब विचारला जाणार आहे. असमाधानकारक कामाबद्दल गय केली जाणार नाही ही भीतीची टांगती तलवार जेव्हा प्रत्येक शासन घटकाच्या डोक्यावर ठेवली गेली. तेव्हा यंत्रणा वेगाने हालचाल करू लागली जनी कागदपत्रे वर आलीत. टेबलावरच्या फायली हलू लागल्यात पत्रे पोस्टात जाऊं लागलीत. आलेल्या डाकेला उत्तरे त्वरेने मिळू लागलीत. वेळच्यावेळी सरकारी फतव्यांना साद मिळू लागला आणि नगरपालिकेच्या अिमारतीला जाग आल्याचे प्रत्येक नागरिकास आढळून आले. अशा रीतीने प्रथम घरसफाईस सुरुवात करून नंतर दार सफाईस श्री. चव्हाणांनी हात घातला.

कर वसूली खाते हे नगरपालिकेचे मुख्य अर्थसाधन. जकात नाक्यावर अकस्मात छापा घालण्याचे सत्र सुरू केल्याने नगरपालिकेच्या पै, पैशाचा योग्य संग्रह व हिशेब होऊ लागला. ह्या शाखेतील मक्तेदारी आणि मानवरी मोडून काढणे फार कठीण काम पण 'अप्रिय—

स्यच पथ्यस्य" अशा कामी लागणारे मनाचे काठिण्य श्री. चव्हाणांनी दर्शविले आणि नगरपालिकेच्या तिजोरीत थेंबे थेंबे तळे साठविण्याची किमया सुरू केली.

थकबाकी बाबत नगरपालिकेच्या शिल्लक दर्शविणाऱ्या खालील तक्त्यावरून वाचकांना सहज कल्पना येऊ शकेल.

साल व महिना		नगरपालिकेची शिल्लक
१९४७	एप्रील	१,५०,३८६
१९४८	,,	२०,५९८
१९४९	,,	१,७७,७०७
१९५०	,,	२,२६,५०८
१९४७	मे	४५,७७४
१९४८	मे	९९,२५६
१९४९	मे	१,५२,५१२
१९५०	मे	२,७८,४५१

सर्वाधिकाऱ्याने ज्या वेळी हाती सूत्रे घेतली त्या वेळी नगरपालिकेच्या तिजोरीत जेमतेम २०५९८ रु. होते. दोन वर्षाच्या अवधीत तीच शिल्लक २७८४५१ रुपयापर्यन्त (१४ पटीनी) वाढविण्याची कर्तबगारी चव्हाणांचीच.

नुसती शिल्लक वाढविणे हे व्यापारी सूत्र नागरिकी संस्थांचे बाबतीत वापरता येत नाही. नुसते कन्येचे पालनपोषण करण्याने पित्याचे कर्तव्य संपत नसते. तर कन्या पराचे धन समजून योग्य ठिकाणी दिल्यानेच कन्यादानाचे पुण्य लाभते. तद्वत नगरपालिकेची देणी फेडणे हेही अत्यंत अवघड काम सर्वाधिकाऱ्यास उरकावे लागले. सूत्रे हाती आली त्या घटकेला सुमारे २८५७८७ रु. ची नगरपालिकेस देणी होती. नियमित व निश्चित करवसुली होण्याची व्यवस्था केल्याने देणेकऱ्यांची देणी फेडण्यास त्यांनी सुरुवात केली. हे चालू असतांना नियमबाह्य नगरपालिकेचा पैसा सांभाळणाऱ्या लोकांनाहि त्यांनी तगादा लावण्यास सुरुवात केल्याने नगरपालिकेची पत वाढली एवढेच नव्हे तर दराराहि वाढला. पूर्वी कंत्राटदारांना आगाऊ रक्कम म्हणून देण्याची अनिष्ट परंपरा एकदम थांबविली गेली. कबूल केलेल्या कालमर्यादेत कामे न झाल्यास दंड जारी झाला. लागेबांधे असणाऱ्या सगे सोयऱ्यांची कंत्राटे बंद झालीत.

या व इतरही अनेक प्रसंगी कटु आणि अप्रिय वाटणाऱ्या गोष्टी घडत गेल्याने नगरपालिकेच्या अनुषंगाने वाढणाऱ्या, घडणाऱ्या ज्या अनेकविध आर्थिक धडामोडी होत्या, त्यांतील जुने सरंजामी दोष नाहीसे झाले. एक प्रकारची करडी शिस्त जाणवू लागली. आणि नगरपालिकेस स्वास्थ्य, स्थैर्य आणि प्रतिष्ठा प्राप्त होऊं लागली. अशा रीतीने नासिक नगरपालिकेचे आर्थिक आरोग्य सुधारले गेले.

होत असलेली गळती थांबविण्याचे काम, छिद्रे लिपण्यानेच संपते असे नव्हे तर मोठ्या प्रमाणावर डागडुजी अथवा संपूर्ण नूतनीकरण कित्येक प्रसंगी आवश्यक ठरते. ह्या व्यवहारी तत्वानुसार श्री. चव्हाणांनी खालील काही बाबतीत डागडुजी केल्याचे आढळते.

● छिद्रेष्वनर्था: बहुली भवन्ति।

स्टोअर्स खाते म्हणजे आलिबाबाची गुहा समजून वाटेल तो माल तेथे साठवावा, व बेहिशोबीपणाने त्याचा वापर करावा, अशी परिस्थिती सरकारी अधिकाऱ्यांनी हेरली होती. त्या अनुषंगाने प्रथम असलेल्या मालाचा योग्य हिशेब श्री. चव्हाणानी मागवला व त्यातून व्यय मालाचे पुरावे काढून, प्रत्येकी व्ययाचे सकारण-अकारण दाखले जातीने तपासले. अयोग्य व अनियमित व्ययाबद्दल, फार कटाक्ष पाळला आणि काटकसरीने व्यय कमी करिता येईल, ह्याविषयी विचारपूर्वक

पद्धत बसवून दिली. त्या योगे "गळती मोठ्या प्रमाणावर थांबली. आणि डागडुजीचेहि काम हाती घेतले गेले. अद्ययावत नूतनीकरण ही नगरपालिकेची फार निकडीची गरज होती. विशेषत: सिव्हील हॉस्पिटलमध्ये शस्त्र-क्रिया इत्यादि साठी साधने [illegible] होती ती सारी पुरविण्याची जबाबदारी चव्हाणांनी घेतली. शहर सफाईच्या साधनांचा पुरवठा फार मोठ्या प्रमाणात असावा लागतो. तीही दक्षता संभाळून अग्निशामक यंत्रणेच्या साधन-सामुग्रीतही भर घालण्याची योजकता त्यांनी दर्शविली.

युद्धातील यशापयश, शस्त्रास्त्र साध-नांच्या आधुनिकतेवर अवलंबल्याचे आपण पहातो तेच तत्त्व कार्यक्षम व परिणामकारक रीतीने जनसेवा करणाऱ्या संस्थांबाबतही वापरण्याची दृष्टी सर्वाधिकाऱ्याने दर्शविली.

कर्मण्येवाधिकारस्ते ! —

गावात अनेक इंग्रजी शाळा चालू होत्या अशा प्रसंगी म्युनिसिपालिटीच्या शाळांना संलग्न असे इंग्रजी क्लास चालविण्याची गरज काहीच नव्हती. तरी पण येथील स्कूल बोर्डाने असे क्लासेस गेल्या काही वर्षांपासून सुरू केले होते. सरकारी हिशेबनिसाने याबाबत बरीच कानउघाडणी केली होती. ह्या (उगाच) खर्चापायी सुमारे २४३२० रु. ९ आ. ६ पै खर्चास सरकारी मंजुरी मिळेना. कुरुक्षेत्री शत्रू म्हणून उभे ठाकलेल्या गुरु, आजे, काका, बंधू, सगे, सोयरे, यांचेवर धनुष्य चाल-विण्यास अर्जुनास धीर होईना. श्रीकृष्णाने 'कर्मण्येवाधिकारस्ते' ची गीता त्यास सांगून युद्धास उद्युक्त केले." तद्वत् श्री चव्हाणांनी स्कूलबोर्डातील जबाबदार व्यक्तींवर या खर्चा-ची भरपाई करण्याची जबाबदारी टाकली. सरकारने त्यांना साथ दिल्याने, त्यांच्या स्कूलबोर्डास वरील सर्व रक्कम "इंग्रजी क्लास फी" म्हणून भरावी लागली.

रस्त्यावरील सस्ते बाजार—

नगरपालिकेच्या मालकीच्या जमिनी खंडाने घेऊन, त्यावर करारविरुद्ध कायम स्वरूपाची दुकाने, हॉटेले, उभारलेली अनेक ठिकाणी आढळून येत. कायद्याच्या भाषेत हे एक प्रकारचे अतिक्रमणच होय. पण काय-द्याची भाषा, ह्या भागात बोलण्याची इतरांना सोय नसे व कायदे शास्त्रविशारदांची सोय नसे. नगरपालिकेच्या नोटीसी फिरत फिरत येत आणि जात. पण हॉटेले अथवा दुकाने उठ-ण्याची शक्यता नव्हती. ह्या धाडसाची साथ शहरात सर्वत्र फैलावत होती आणि रस्त्या-च्या कडेकडेला अड्डे, बिछायती पसरत रस्त्यावरील ही सस्ती व्यापार पेठ चांगलीच बाळसे धरू लागली होती.

अत्यंत कठोर मनाने व कडवटपणाने कायद्याची प्रतिष्ठा, पोलिसांच्या दंडुक्याद्वारा व कोर्टाच्या बेलिफाद्वारा प्रस्थापित्वाचे श्रेय श्री. चव्हाणांना द्यावे लागेल. पुण्याचे कमि-शनर बर्वे सध्याच्या महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री यांचीच आठवण व्हावी असा प्रसंग आणि व्यक्ती, नासिक नगरपालिकेच्या जीव-नातहि येऊन गेली.

● मंत्रज्ञाऐवजी तंत्रज्ञ हवेत—

नासिक शहराच्या लौकिकात येथील वेदशास्त्र जाणणाऱ्या अनेक ब्राह्मण घराण्यांनी भर घातली आहे. येथील मंत्रज्ञांची कीर्ति केवळ रामकुंडापुरतीच मर्यादित राहिलेली नाही तर थेट काशी प्रयाग पर्यंत गेलेली आहे. येथील श्रीधरस्वामी वारे हे आधुनिक ऋषि मानण्याइतपत सामर्थ्याचे आहेत. तरीपण सध्याचे जग मंत्रज्ञांचे राहिले नसून तंत्रज्ञांचे झाले आहे. आधुनिक जगाच्या ह्या विश्व-कार्याचे स्थान नित्याच्या नागरिकांच्या नगर संस्थांत, किंबहुना जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात फार मोठे स्थान आहे. शासन संस्थेतील यश

बऱ्याच अंशाने विशेषज्ञ अथवा तंत्रज्ञावर अवलंबून असल्याचे ध्यानी घेऊन येथील सर्वाधिकाऱ्यांनी तज्ञ माणसे नगरपालिकेसाठी नेमण्याची फार शिकस्त केली. अकौंटस् व करवसूली खात्यासाठी रेव्हेन्यू खात्यातील योग्य माणसांची मागणी त्यांनी येथील कलेक्टर साहेबांकडे केली होती. यांप इन्स्पेक्टर हा नुसता "अमलदार" न ठेवता तज्ञ व अनुभवी असावा असा कटाक्ष त्यांनी ठेवला. विशेषतः आरोग्य-खात्याकडे तज्ञ माणसाची फार गरज असल्याचे त्यांचे मत होते. नित्य बाटल्यांचे सहवासात रहाणारा कपौंडर हा डॉक्टरची जागा घेऊ शकत नाही. तद्वत् केवळ अनुभवी म्हणून कोठल्याही जागेला, कोणीही पात्र होऊ शकत नाही. 'जेनो काम तेनो थाय" या नात्याने योग्य माणूस योग्य जागी नेमण्याची त्यांची मनीषा फारशी जरी फलद्रूप होऊ शकली नाही, तरी तो संस्कार मात्र नगरपालिकेच्या शासनावर राहून गेला. मुंबईतील लोकल सेल्फ गव्हर्नमेन्ट इन्स्टिट्यूट तर्फे चालणारे सॅनिटरी, इन्स्पेक्टर्स सारखे वर्ग येथे चालवावेत ही त्यांची इच्छा अजूनही अतृप्तच आहे. कोल्हापूर नगरपालिकेने या दृष्टीने बरीच प्रगति केली आहे. पुढे मागे नासिक नगरपालिकेचे महापालिकेत रूपांतर होण्याचे स्वप्न साकार झाल्यास अशा प्रकारच्या शिक्षणाची जरूरी निश्चित भासणार आहे.

● नासिक शहराचा कायापालट–

संस्थांना जरा आणि मरण दोन्हीही नसतात. पण बाल्यावस्था आणि युवावस्था मात्र निश्चित असतात. ह्या साहित्यिक संकेतानुसार नासिक नगर संस्थेचा आपण बाल्यकाल पाहिला. किशोरावस्था पाहिली. युवावस्थेमध्ये रूपांतर किंवा कायापालट होण्याचा कालखंड म्हणून, ह्या कालखंडाचा आपणास उल्लेख करावा लागेल. आधुनिक नासिक शहराचे स्थित्यंतराचा आकार व पाया या दरम्यान घातला गेल्याचे आपणास खालील माहितीवरून ठरवता येईल.

नासिक शहराचे भौगोलिक व ऐतिहासिक अवलोकन ध्यानी धरून, अविकसित, विकासनीय व प्रविकसित, असे विभाग व अवस्था कल्पून त्यानुसार या मुग्धनगरीस माधुरी आणण्याचा संकल्प केला गेला.

पंचवटी विभाग ऐतिहासिक दृष्ट्या अतिशय प्रसिद्ध खरा. पण शहररचनेच्या दृष्टीने अतिशय मागासलेला असल्याचे वृत्त देशभर येथे येणारे तीर्थकरू पसरवीत होते. भावभक्तीच्या या गंगेचा येथे नीटसा सत्कार होत नाही. हे दृश्य नगरपालिकेच्या दृष्टीने अतिशय नामुष्कीचे पण 'आळशाला गंगा दूर' ही त्यातली खरी कारणपरंपरा असल्याचे ध्यानी धरून चव्हाण साहेबांनी पंचवटी विभागास प्राधान्य दिले. मुंबईत कारणपरत्वे जात असलेल्या, भाटीयादि धनिकांकडून, पंचवटी सुधारणेसाठी त्यांनी देणग्या मिळविण्यास सुरुवात केली. आणि वैयक्तिक म्हणा अथवा रक्तात असलेल्या दानशूरत्वामुळे म्हणा हा हा म्हणता १ लाख रुपयांचा निधी जमला. पंचवटीतील पुरियापार्क, पुरिया मार्ग पुरिया नाला इत्यादि वास्तूतील स्थित्यंतर हे ह्या संकल्पाचे व सिद्धिचेच उदाहरण होय. खेरीज पुरोहा व संठा ह्यांच्या देणग्यातून येथील हॉस्पिटलमध्ये "सांसर्गिक रोग प्रतिबंधक" विभागहि उघडला गेला.

रस्ते बांधणी. दुरुस्ती, व रुंदीकरण हे काम फार जिकिरीचे असल्याचे अनुभव ह्या कामाशी परिचय असलेले कोणीही सांगू शकतील. खरी बिकट समस्या, रस्त्यावर अनधिकृतपणे बसलेले बाजारकरी, दोन्ही कडांनी बांधलेली घरे, त्यातून चालवलेली दुकाने, खेरीज रस्त्याच्या मध्येच असलेले एखादे मारुतीचे अथवा पीराचे ठाणे– नाशिकमधील तेली

गल्ली, घासबाजार इत्यादि मूर्त स्वरूपे अशा वास्तूचे दाखले पूर्वी देत असत. चव्हाणांचे कारकीर्दीत या बाबतीत मोठ्या महत्वाकांक्षी योजना पार पडल्याचे आपणास खालील यादीवरून दिसून येईल :

रस्ते दुरुस्ती व बांधणी

			फूट	रुपये आणे
१)	महात्मा गांधी रोड	सिमेंट	१५००	५६४७३–१४
२)	कपालेश्वर रस्ता	..	१६५०	१३३६१–००
३)	सिव्हील हॉस्पिटल रोड		२३२०	६३५०४–००
४)	पगडबंद गल्ली	,,	५००	५११३–१२
५)	लोणार आळी	,,	५००	१०९६६– ७
६)	कॅनरा हॉस्पिटल रोड	मेटल	४३००	२२७२–११
७)	गंगापूर नाका ते त्रिंबक नाका	,,	१४००	५७७–००

● रस्ते दुरुस्ती व बांधणी—

हे प्रमुख व इतर मिळून, एकंदरीत १३,१४५ फुटाचे सिमेंट व मेटलचे रस्ते, सुमारे १,७८,६१५–७–० रुपये खर्च करून बांधण्यात आले.

● आरोग्य विषयक—

घास बाजार आणि पंचवटीतील काही वस्त्या, ह्या कॉलरा व प्लेग यांची माहेरघरे समजली जात असत. घास बाजारात अधून मधून आगी लागत. पण, सतत तुंबलेली गटार साठलेला केरकचरा आणि चौफेर विखुरलेले मलमूत्र, ह्यातून रोगाची लागण होणे माहजिकच होते. हे दृश्य बदलण्यासाठी पाणी पुरवठा, ड्रेनजची सोय जागोजागी सार्वजनिक मुताऱ्या व शौचकुपे बांधलीत. एवढेच नव्हे तर एक अलिशान मार्केट, ज्याला हल्ली फुले मार्केट म्हणून संबोधले जाते तेही बांधले गेले. नगरसंस्थानी मनावर घेतल्यास नरकाचे नंदनवन करण्याचे सामर्थ्य निश्चित रीतीने त्यांच्याजवळ असते. अहमदनगर येथील माळीवाडा वस्तीत कोंबड्यांचा खुराडा व डुकरांचे वसतीस्थान म्हणून एक जागा कित्येक दिवस पडून राहिली होती. तत्कालीन नगराध्यक्ष श्री. नेर्लीकर यांची त्या जागेवरून नजर फिरली आणि पाहता पाहता तेथे एक "सौभाग्य मंदन" उभारले गेले. अवघ्या ५ रुपये भाड्याने तेथे "शुभमंगल सावधान" ची सोय नगरसारख्या जिल्ह्याच्या ठिकाणी केल्याबद्दल अनेक गरीब वरबापू पित्याचे तसेच वधू वराचेही धन्यवाद त्याना लाभत आहेत. नाशिक शहरी अशा शुभकार्यालयाची मोठीच गरज आहे.

पाणी पुरवठा, विशेषत बुधवार पेठ व आजूबाजूच्या भागात अत्यंत अपुरा असे; पाण्याला योग्य दाब नसल्याच्या तक्रारी मोठे कॉलनीतून येत असत पाण्याचे पाईप मोठे करून (९ × ३) पाण्याचा दाब व त्याचे विभाजन करणे ही एक मोठी खडतर कामगिरी होती. पंचवटीस पाण्याचा तुटवडा तर नित्याचीच असे. या बाबतीत लोकसंख्येच्या गरजेनुसार योजना आखणे, आणि त्वरेने अमलात आणणे फार आवश्यक होते. श्री चव्हाणांनी या बाबतीत शक्य ते प्रयत्न केले. गोदावरीस गंगापूरजवळ धरण बांधावे ही कल्पना १८६५ सालीच निघाली होती.




श्री संत गाडगे महाराज यांची नगरपालिकेस भेट १९५४—१९५५




श्रीमती अिंदिरा गांधी यांची नगरपालिकेस भेट १९५५—१९५६





◈ माननीय श्री. हरेकृष्ण मेहताब, राज्यपाल, मुंबई राज्य यांची नगरपालिकेस भेट १९५५—५६

गावकरी प्रेस



◈ माननीय डॉ. बाळकृष्ण केसकर नभोवाणी मंत्री, भारत सरकार यांचे शुभहस्ते श्रीरामसेतू पुलाचे उद्घाटन १९५५—५६

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या शुभहस्ते शिवाजी महाराज यांच्या ◈
पुतळ्याचे अनावरण १९५५—५६

गांवकरी प्रेस

◈ माननीय श्री. रसीकलाल पारेख महसूल मंत्री मुंबई राज्य,
यांची नगर पालिकेस भेट १९५६—५७




◈ माननीय श्री. कन्नमवार, आरोग्य मंत्री. मुंबई राज्य.
यांची नगरपालिकेस भेट १९५६—५७

गावकरी प्रेस



◈ माननीय श्री यशवंतरावजी चव्हाण मुख्य मंत्री, मुंबई राज्य
यांची नगरपालिकेस भेट १९५७-५८





माननीय श्री. निलम संजीव रेड्डी
अध्यक्ष, अखिल भारतीय कांग्रेस कमेटी
यांना नगरपालिकेतर्फे मानपत्र
१९५९—६०

गांवकरी प्रेस






माननीय श्री. चिंतामणराव देशमुख, अध्यक्ष, विद्यापीठ अनुदान मंडळ, यांची नगरपालिकेस भेट १९६०—६१





गात्रकरी प्रेम

मान्नीय श्री यशवतरावजी चव्हाण, मुख्य मत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते
पाणीपुरवठा सुधारणा योजनेच्या टाकीचा कोनशीला समारंभ १९६१—६२





भारताचे उपराष्ट्रपति
माननीय डॉ. झकीर हुसेन यांची
नगरपालिकेस भेट १९६३—६४

◈ माननीय श्री. वसंतरावजी नाईक, मुख्य मंत्री, महाराष्ट्र राज्य,
याना नगरपालिकेतर्फे मानपत्र १९६३—६४



गांवकरी प्रेस



कै. गोविंदराव देशपांडे



कै. भाऊसाहेब हिरे



श्री. वसंतराव नाईक

गावकरी प्रेस

१८८१ साली तत्कालीन सॅनिटरी इन्स्पेक्टरचे गंगाजल पिण्यास अयोग्य असे ग्रह असल्याने अन्यत्र योजना करण्याचा मानस होता. शेवटी, मुंबई राज्याच्या सार्वजनिक पाणी-खात्याने हे काम १९४७ मध्ये अंगावर घेतले आणि १९५१ मध्ये पूर्ण केले. पण त्यायोगे, नगरपालिकेच्या पंपींग स्टेशनचा पाणी पुरवठा संकुचित तसेच अनियमित झाला. ही गोष्ट ध्यानात धरल्यास, गेल्या १७-१८ वर्षापासून पिण्याच्या पाण्याची समस्या कशी व का बिकट होत आहे ह्याचा सोपपत्तिक इतिहास नाशिकच्या नागरिकांना समजू शकेल.

आंबेडकर कॉलनीत नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यासाठी घरे बांधली गेलीत. तेथे रुग्णालय स्थापले गेले. मागासलेल्या गरीब कर्मचाऱ्यांसाठी करमणूक केंद्रे व वाचनालय अित्यादि सोयीचे श्रेय कांही अंशी श्री. चव्हाणाकडे जाते.

नगरपालिकेच्याच अिमारतीत असलेल्या जिजामाता प्रसूतीगृहाची कल्पना मूर्त स्वरूपात आणण्याचे श्रेयही श्री. चव्हाण यांना द्यावे लागते. ह्या सर्व विभागात पूर्वी नगरपालिकेची निर्जीव दप्तरे होती. तेथे हल्ली अनेक सजीव बालके वाढत असल्याचे दिसते. जेथे पूर्वी अितिहासाची जोपासना होत असे तेथे हल्ली भविष्यकाल जोपासला जात आहे.

● **समालोचन–**

या खेरीज श्री. चव्हाणांच्या हातून रूपांतर, स्थित्यंतर, घडलेल्या अनेक वास्तु त्यांच्या यशस्वी कारकीर्दीचे आणि नाशिक विषयी असलेल्या त्यांच्या आपुलकीचे प्रत्यंतर आपणास घडवितात.

त्यांच्या कारकीर्दीचे न्याय्य रीतीने समालोचन करणे, विस्तारभयास्तव येथे शक्य नाही. आणि अनेक कारणासाठी युक्तही नाही. तरी पण नासिक नगरपालिकेच्या जीवनातील हा काल " क्रान्तिकाल " मानला जावा असे कोठल्याही अितिहास समीक्षकास वाटल्यास नवल नाही. सरकारी नोकरीत नोकरदारास कामाबद्दल व स्थानाबद्दल जिव्हाळा नसणे हा सर्वसामान्य नियम आपणास आढळतो. कामाबद्दल आपुलकी बाळगल्याशिवाय, प्राण ओतल्याशिवाय कामास योग्य ते रूप व यशही येऊ शकत नाही हा नित्याचा पडताळा आहे. आणि केलेल्या कामाबद्दल, रसग्रहण अथवा कृतज्ञतेच्या शब्दाची वानवा हा सरकारी खाक्या, ह्या सर्व दृष्टींनी एक सरकारी नोकर म्हणून श्री. चव्हाणांकडे पहाणे अथवा त्यांनी त्या प्रमाणे वर्तन ठेवणे हे अपेक्षित असले तरी त्याप्रमाणे घडले नाही. शेवटी मानवी श्रद्धा मानवी मन, म्हणून काहीतरी असते. त्यायोगे कित्येक प्रसंगी मनुष्य अपारंपारीक, अनपेक्षित वा अपवादात्मक वागतो. श्री. चव्हाणांचा नाशिक शहराबद्दलचा जिव्हाळा, कार्यात त्यांनी घेतलेला रस आणि अनेक अडचणींवर मात करून पूर्ण केलेली कार्यसिद्धी, ह्या मधून त्रयस्थ अभ्यासकालादेखील गौरवोद्‌गार काढावे लागतात.

जसा शिल्पकाराला मूर्ती साकार करण्यासाठी पुरेसा अवधी आवश्यक असतो, तद्वत् श्री. चव्हाणांनाही हाती घेतलेली कामे तडीस नेण्यासाठी नियुक्त कालापेक्षा जास्त अवधी आवश्यक होता. सरकारी खात्याला वेळोवेळी पाठविलेल्या अहवालातून त्यांची ही मागणी वारंवार आढळते. तदनुसार १२–१–१९५१ रोजी संपणारी त्यांची कारकीर्द ३१ मार्च १९५२ पर्यन्त त्यांनी नगरपालिकेची सूत्रे साभाळून लोकनियुक्त सभासदांच्या हाती २–४–१९५२ रोजी कारभार दिला आणि पूर्वीच्या सरकारी हुद्यावर ते परत रुजू झाले.

१ एप्रील १९५२ रोजी कलेक्टराच्या देखरेखीखाली नवीन निवडलेल्या सभासदांची बैठक भरली. डॉक्टर एम० जे० शहा व श्री. गुलाम महंमद अिब्राहिम जिन हे क्रमाने

नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष म्हणून एक वर्षाचे मुदतीसाठी निवडले गेले.

१ एप्रील १९५२ ते आजतागायत नगरपालिकेचा कारभार समर्थ व लोकशाही प्रेमी नगरपित्याकडून हाकला जात आहे. समाज–सेवेची अनेक नवीन क्षितिजे उघडली गेली आहेत. तसेच रुंदावलेली आहेत भारतात लोकशाहीची प्रतिष्ठा डौलमपणे राखली जात आहे. आणि नाशिकसारख्या नगरात देखील नगरसंस्थाद्वारा हा जगन्नाथाचा रथ सर्वांचा हातभार लागून प्रगतीच्या वाटेने धावत आहे त्याचे साग्रचित्र, नगरपालिकेच्या ह्या शताब्दि ग्रंथाद्वारा नाशिककरासमोर उभे करण्याचा हा अल्पसा प्रयत्न आहे.

प्रथम कालखंड

१९५२ ते १९६४

विभाग पहिला

नाशिक नगरपालिकेचा गल्या ९० वर्षांचा अितिहास येथवर आपण तपासीत आलो आहो. या शेवटल्या प्रकरणात नगरपालिकेच्या माजी व आजी नगरपित्यांचे. नगराध्यक्षांचे व उप–नगराध्यक्षांचे संक्षेपाने नामनिर्देश व गुणगौरव करून आजच्या नगरपालिकेचे स्वरूप विशद करण्याचा प्रयत्न आहे.

येथील नगरपिते

पहिल्या काही वर्षात म्हणजे १८६४ ते १९०० पर्यंतच्या कालातील काही प्रभावी कौंसिलर्सचा उल्लेख कृतज्ञतेने आवश्यक आहे, त्यातील बरेचसे स्वकर्तबगारीने समाजाचे पुढे आलेले होते व सरकारी नियुक्ती त्याच्या समाजातील स्थानामुळे त्यांना प्राप्त झाली होती. अर्थात कित्येक प्रसंगी सरकारी मेहेरनजर ओढवून घेण्याचाही प्रकार असेच. आपला संबंध त्यांनी नगरसंस्थाद्वारा नागरिकांच्या केलेल्या सेवेशी आहे. म्हणून कृतज्ञता बुद्धीने सादर निर्देश करणे आवश्यक वाटते. १८६४ ते १८८० पर्यंतच्या नगरपित्यांची सुसंगतवार माहिती दुर्दैवाने लाभत नाही तरीपण त्याच्या अनामिक स्मृतींस वंदन करून पुढील काळातील मान्यवर नेत्यांचा उल्लेख करीत आहे.

१८८८ साली रा. ब. गणेश पांडुरंग वैद्य हे कमिटीचे चेअरमन होते व रा. ब. ई. ए. वाड उपाध्यक्ष होते. खेरीज पु. स. मराठे, जी. व्ही. केतकर, एम. बी. म्हाळकर, आदि कमिशनरांनी नगरपालिकेद्वारा सेवा केली होती

१८९८–१९०० रा. ब. एन. व्ही. गोळे, व्ही. एस. गोळे, व्ही. एस. खरे, कॅप्टन ह्यूज मिचेल, श्री. गो. पट्टेकर, आदि व्यक्ति नगरपित्याची पदे भूषवीत होत्या.

१९०७–८ ह्या सालात श्री. आर. ए. एल. मूर, हे कलेक्टर व प्रेसिडेन्ट असून रा. ब. एन. व्ही. गोळे हे उपाध्यक्ष होते. खेरीज श्री वि ना खोतकर, हजूर डेप्युटी कलेक्टर

व रा. स. आठवले, मामलेदार आदि सरकार नियुक्तही होते. सरदार ना. त्रि राजेबहादूर, बुधमल केवलचंद, वा. बा. आकृत हेही आपले जनसेवेचे सुरवातीचे धडे गिरवीत होते.

१९१३–१४ ह्या कालात गणेश हरी हर्डीकर, हे लोकनियुक्त नगराध्यक्ष म्हणून काम करीत होते, व श्री. एम. पी. पाटणकर, हे उपाध्यक्ष होते. सरदार जी. एन. विंचूरकर, व्ही. जी. केतकर, आर. एन. गद्रे, चांदवडकर कर्णिक ही मान्यवर विभूतींची परंपरा त्या काळी नगरपालिकेत होती. ढील कालातच (१९१५) साली सरदार विंचुरकरांनी अध्यक्षपद विभूषित केले होते.

१९२७ साली वि. गं केतकर हे अध्यक्ष होते व श्री. हिरामण नारायण शिंदोरे उपाध्यक्षपदी होते. खेरीज शं. बा. चुंबळे, रा. ध शिंदे, दा. म. चंद्रात्रे, वि. भा. पटवर्धन, आर्देसर एदलजी लाल, नि. पां. पाटणकर, दे. क. राठी, रा. के. तळाजिया, शेखसाहेब खतीब, अबदुल रहिमान नूरा पाटील, आबासअल्ली अब्दुलअल्ली बोहरी, व ग. जा. कोकणी अित्यादि न नि दृष्टीची व धडाडीची मंडळी नगरमंडळात होती.

१९३४–३७ चे दरम्यान गु. हु. कोकणी कॅ. प्र. शं. गुप्ते, गु. हं. राका, दे. ना. टिळक, पु. अ. निमाणी (अध्यक्ष) गो. वा. प्रधान, का. ना. केतकर (अध्यक्ष १९३४) ह्यांचे कारकीर्दीत नगरपालिका अिमारतीचा कोनशीला समारंभ झाला. वा. वि पाराशरे, डॉ. द वि देवळालकर, ग. वा. निरंतर, डॉ. स. कोचरगावकर, पी. टी. मिरजकर, रा. ज. पांडे, सौ. लिलादेवी, सौ. चौधरी, ग. स. कानडे आदि नगरपिते नगरपालिकेद्वारा नाशिककरांची कीर्ति वाढवीत होते.

१९४७–४८ साली ना. दा. पवार हे अध्यक्ष व हि. श्री. ना. शिंदोरे उपाध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांच्याच प्रभावळीत शोभायमान होणारे या. ग. वाघ, डॉ. चौभे, स. चि. खाडे, रा वि. रहाळकर, ज. गो संठवाल गो. ना. वारे, एन. डी. पटेल, शि. दा. साळुंखे, सौ. क. आ. देवरे, नि. त्र्यं. वझरे बा. म. पाथरवट. र. र. पठाण, अबदूल रझाक कोकणी, आदि तरुण कार्यकर्त्यांची जोड नगरपालिकेस लाभली.

१९५३–५४ साली मु. ग. लोणारी हे प्रेसिडेंट व शेखमहंमद चांद साहेब व्हाईस प्रेसिडेंट होते. खेरीज र. म. खाडीलकर, डॉ. द. ब. खाडीलकर, श्री. मो. गो. रॉय, का. पु. वैशंपायन, सौ. शशीकला मोरे. बा. ना. हिंगमिरे, भा. बा. विसपुते. सौ. यमुनाबाई गोगटे, शेख अल्ली यासीन, बा. ग. थोरात, व. भि. पारख अित्यादि नाशिककर येथील नगरपालिकेत होते.

१९६०–६१ साली श्री. भि. करंडे हे अध्यक्षपदी व श्री. का. न. पटेल उपाध्यक्षपदी होते. खेरीज पु. रा. बुरकुले, ग. पुं. काठे, सौ गो. भा. गायकवाड, सौ. क. आ. धारणकर, सौ. ना. भि. जाधव, श्री. च. मोहेकर, मा. ध खैरे, शि. ने. शर्मा, वा. गो. कुलकर्णी, कृ य. अंधारे, गो. द. गोडे, ना. रा. चव्हाण, सो. त्रि. गुवाडे, शं. ध. खोडे, डॉ. ल. ख्. मिश्री, स गं भोरे, श्री. व सौ. शुक्ल, ल. ह. सावंत श्रीमती प्र. ल. गोसावी आदि तळमळीने काम करणाऱ्या व्यक्ती नगरपालिकेस लाभल्या होत्या.

नगरपालिकेच्या शंभर वर्षाच्या हयातीत अनेक थोर, द्रष्टे जनसेवक होऊन गेलेत, नगराच्या सर्व थरातून सर्व धर्मपंथातून असंख्य नगरपिते नगरपालिकेच्या सेवाकार्यात हातभार लावीत होते. अर्थात सर्वांचा नामनिर्देश करणे अशक्यच. त्यांच्या हृदयात असलेली सेवेची तळमळ त्या अनुसार अज्ञात, कित्येक प्रसंगी अनामिक राहूनही प्रकट कीर्तीचा लोभ न धरता, अनेकांनी नासिक नगरीची सेवा केलेली आहे. नासिक नगरपालिकेची कीर्ति वाढविण्यासाठी अमाप त्याग, कष्ट, अश्रु.

रक्त व धन वेचलेले आहे. प्रथमतः म्हटल्याप्रमाणे, कीर्तिची हाव न धरता, सद्विवेक बुद्धीची आज्ञा पाळून, " माझे नासिक, माझे नासिककर " ह्या अभिमानाने अविरत सेवाकार्यात मग्न रहाणे, हा जो रामाचा गुण त्या गुणाचे पालन व दर्शन, या शंभर वर्षांच्या कारकीर्दीतील अनेक नगरपित्यांनी केलेले आहे. नासिककराना ह्या सुपुत्राबद्दल अभिमान तर वाटतोच. पण कृतज्ञतेच्या भावनेतून ह्या जनसेवकासाठी त्याचे हातही जोडले जातात.

नासिक नगरपालिकेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष

पासून	पर्यंत	नांव
१८६४	१९०७	नासिक कलेक्टर
१९०८	१९०९	श्री गणेश हरी हर्डीकर
१९०९	१९१२	श्री. एन्. व्ही. गोळे
१९१३	१९१४	श्री. गणेश हरी हर्डीकर
१९१५	१९१६	श्री. जी. एम्. विंचूरकर
१९१६	१९१७	श्री. बुधमल केवलचंद
१९१७	१९१९	श्री. विश्वनाथ गंगाधर केतकर
१९२०	१९२१	श्री दत्तात्रय सदाशिव ओक
१९२२	१९२३	श्री. वासुदेव बापूजी आकूत
१९२४	१९२७	श्री. विश्वनाथ गंगाधर केतकर
१९२८	१९२९	श्री. निळकंठ पांडुरंग पाटणकर
१९२९	१९३०	श्री. रा. ब. गोपाळ वामन प्रधान
१९३१	१९३२	श्री फतेचंद चुनीलाल
१९३२	१९३३	श्री. रा. ब. गोपाळ वामन प्रधान
१९३४	१९३५	श्री. काशिनाथ नारायण केतकर
१९३५	१९३६	श्री धोंडो त्र्यंबक कोचरगांवकर
१९३६	१९३७	श्री. पृथ्वीराज अमोलकचंद निमाणी
१९३७	१९३८	श्री. रामचंद्र जगन्नाथ पाडे
१९३८	१९३९	श्री. पृथ्वीराजअमोलकचंद निमाणी
१९३९	१९४०	श्री. पांडुरंग बाळशेठ चांदवडकर
१९४०	१९४१	श्री. लक्ष्मण सखाराम जाधव
१९४१	१९४२	श्री. पृथ्वीराज अमोलकचंद निमाणी
१९४२	१९४३	श्री. जे. ए. लाल
१९४३	१९४४	श्री. रा. ब. हिरामण नारायण शिंदोरे
१९४४	१९४५	श्री. गुलाम हुसेन कोकणी
१९४५	१९४६	श्री. एन् डी. पवार
१९४६	१९४७	श्री. पुरुषोत्तम त्रिंबक मिरजकर
१९४८	१९५२	श्री. ॲडमिनिस्ट्रेटर
१९५२	१९५३	श्री. डॉ. एम्. जे. शहा

पासून	पर्यंत	नाव
१९५३	१९५४	श्री. मुरलीधर गंगाराम लोणारी
१९५४	१९५५	श्री. यादवराव गणपतराव वाघ
१९५५	१९५६	श्री. रामकृष्ण अमृत मिरजकर
१९५६	१९५७	श्री. डां. यशवंत सखाराम शुक्ल
१९५७	१९५८	श्री. रा. वि. रहाळकर
१९५८	१९५९	श्री. सदाशिव गंगाराम भोरे
१९५९	१९६०	श्री. माधव धर्माजी खैरे
१९६०	१९६१	श्री. श्रीपत भिकाजी करंडे
१९६१	१९६२	श्री. गुलाम महंमद इब्राहिमसाहेब जिन
१९६२	१९६३	श्री. शांताराम कोंडाजी वावरे
१९६३	१९६४	श्री. हरिश्चंद्र तात्याबा शेलार

● येथील नगराध्यक्ष–

१९०९ ते १९६४ च्या ५५ वर्षांच्या कालात सुमारे ३३ नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष येथे होऊन गेलेत. सुरुवातीच्या काळात नगराध्यक्षांची मुदत जास्त असे. खेरीज खालील व्यक्तींनी नगराध्यक्षपदाची माळ पुनः पुन्हा धारण केल्याचे आढळते.

श्री. विश्वनाथ गंगाधर केतकर ५ वर्षे
(१९१७ ते १९१९ व १९२४ ते १९२७)
श्री. पृथ्वीराज अमोलकचंद निमाणी
३ वर्षे १९३६, १९३९, १९४२)
श्री. एन. व्ही. गोळे ३ वर्षे
(१९०९ ते १९१२)
श्री. रा. ब. गोपाळ वामन प्रधान २ वर्षे
(१९२९ ते १९३२)
श्री. गणेश हरी हर्डीकर २ वर्षे
(१९०८ ते १९१३)

येथील नगराध्यक्षांचे राजकीय व सामाजिक विश्लेषण नुकत्याच पुणे येथे वाचलेल्या आपल्या एका संशोधनपर लेखात, श्रीमती हेमलता आचार्य ह्यांनी केल्याचे आढळते.

वर्ष	जाती, जमाती	व्यवसाय व राजकीय श्रद्धा	
१९०९–३५	उच्चवर्णीय हिंदु		स्वतंत्र
अपवाद			
१९१६–१७	ब्राह्मण आणि सी .के. पी.	वकील	
१९१६–१७	मारवाडी	व्यापारी	
१९३५–३६.	ब्राह्मण	वकील	कॉंग्रेस
१९३६–३९	मारवाडी आणि ब्राह्मण (परप्रांतीय)	व्यापारी	कॉंग्रेस
१९४०–४१	ब्राम्हण	मिळकतदार	
१९४१–४२	मारवाडी,	व्यापारी	कॉंग्रेस
१९४३–	पार्शी	,,	स्वतंत्र
१८४४–४७	ब्राह्मणेतर	,,	कॉंग्रेस
१९४७–५२	सर्वाधिकारी		
१९५२–५४	गुजराथी	डॉक्टर	,,

वर्ष	जाती जमाती	व्यवसाय व राजकीय श्रद्धा	
१९५४–५७	ब्राह्मणेतर	किरकोळ व्यापार	,,
१९५७–५९	ब्राह्मण	१ डॉक्टर	,,
		१ वकील	स्वतंत्र
१९५९–१९६४	ब्राह्मणेतर	व्यापारी	काँग्रेस

(एक मुस्लीम १९६१–६२)

वरील तक्त्यावरून लेखिकेने काही निष्कर्ष काढलेले आहेत.

उदा. १) १९०७ ते १९३३ या काळातील नगराध्यक्ष अपक्षीय असून, बहुतेक ब्राह्मण वर्गातील असून व्यवसायाने वकील असल्याचे आढळते. अर्थात नासिक ह्या तीर्थक्षेत्रस्थ ब्राह्मण नगराध्यक्षांनी पुरोगामी वृत्तीच दर्शविलेली आहे.

२) १९३५ नंतर जरी काँग्रेस पक्षीय नगराध्यक्ष आढळतात, तरी देखील काँग्रेसचा प्रभाव होता असे म्हणता येणार नाही. कारण बहुमत तिच्या बाजूला फार काळ नव्हतेच. नगराध्यक्षांचे प्रभावी व्यक्तिमत्व ही खरी प्रेरणाशक्ती त्या मागे होती.

३) स्वातंत्र्योत्तर काळात मात्र सर्व थरातून व्यक्ती पुढे येत होत्या. काँग्रेसला प्रभावी स्थान व मत प्राप्त होत होते. नगरपालिकेचेही उत्पन्न सहस्रावधींनी वाढलेले होते. कल्याणकारी राज्याच्या कल्पनेमुळे जनसेवेची क्षितिजेहि विस्तारली होती. शिवाय अखिल हिंदुस्थानभर राज्यकर्ता पक्ष म्हणून काँग्रेस गेली १६।१७ वर्षे स्थान टिकवून आहे.

४) वैयक्तिक सामाजिक सेवेमुळे म्हणा अथवा द्रव्यबळामुळे म्हणा, पण काँग्रेसची संघटना आज नगरपालिकेद्वारा जनसेवेसाठी उपयोगात आणली जात आहे. इतर राजकीय पक्ष हे विस्कळीत स्वरूपात, निश्चित योजनांच्या अभावामुळे मलूल झाल्यासारखे भासत आहे. येथे स्थानिक पक्ष नाहीतच असे म्हटले तरी फारसे वावगे होणार नाही. १९५७ च्या निवडणुकी काँग्रेस जिंकू शकली नाही हे जरी खरे असले तरी "लोकहितकारी" या नावाने बरेचसे परीचित कार्यकर्ते सत्तेत भागीदार होतेच.

५) निवडणुकांच्या वेळा खेरीज, येथील सामान्य रहिवासी नगरपालिकेतील सत्तापक्ष अथवा पक्षधारी याबद्दल बहुताशी उदासीन असल्याचे आढळतात. "जागृत नागरिक" व नागरिकता येथे फारशी आढळत नाही.

वरील निष्कर्षावरून नगराध्यक्षांचे प्रभावी व्यक्तिमत्व हीच येथील संजीवनी शक्ति आपल्या ध्यानात येईल नासिक शहराचे भाग्यच असे आहे की एकाहून एक असे सरस नगरपिते लाभत गेले आणि प्रत्येकाने आपली कारकीर्द यशस्वी व अविस्मरणीय करून ठेवली. कै. हर्डीकर याच्या कारकीर्दीपासून नागरिकांना नळ मिळू लागलेत कै. आकूत कै पाटणकर हेही अविस्मरणीय आहेत १९३० पासून नासिक नगरपालिकेत दोन गट तयार झाले होते. श्री हि. ना शिदोरे व श्री. भैय्यासाहेब पांडे आपापल्या गटाचे नेतृत्व करीत होते. या काळात अनेक वर्षे नगरपालिका आपले हाती ठेवण्याचा विक्रम कै पृथ्वीराज निमाणी यांनी केला. प्रशासकाच्या कालानंतर मात्र हे गट अस्तंगत पावून, नगरपालिकेत राजकीय पक्षाचा प्रवेश झाला त्या वेळेपासून, डॉ. एम. जे शहा, म. ग लोणारी, या ग. वाघ, रा. अ. मिरजकर, डॉ. शुक्ल, रा. वि. रहाळकर, म. गं. भोरे, मा. व. खैरे, श्री. भि करंडे, गुलाम महंमद जिन, शां. कों. वावरे इत्यादि

प्रभावी व्यक्तिमत्वाचे, धडाधडीचे, उत्साही नगरपिते नाशिक शहराला भूषणावह ठरत गेले. सध्याचे नगराध्यक्ष श्री. हरिश्चंद्र तात्याबा शेलार ह्यांनी तर तरुण वयातच मानाचे स्थान पटकाविले. तीक्ष्ण बुद्धि, जलद निर्णय घेण्याची शक्ति, निस्सीम पक्षश्रद्धा आणि नासिक विषयी वाटणारा अभिमान नासिककरांवरील अमर्याद प्रेम इत्यादि गुणां- मुळे त्यांनी नासिककरांच्या हृदयात आदराचे व कौतुकाचे स्थान पटकाविले आहे. वाच- कांच्या समोर असलेला हा शताब्दिग्रंथ त्यातील नगरपालिकेचा शंभर वर्षाचा इतिहास हे शेलार ह्यांच्या श्रमाचे फळ होय. ह्या ग्रंथ- रूपाने त्यांनी केलेली नासिककरांची सेवा ही अविस्मरणीयच होय.

नासिक नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष

पासून	पर्यंत	नांव
१८८८	१८८९	श्री. रा. ब. एन्. ए. वाड
१८९१	१८९२	
१८९२	१८९३	श्री. रा. ब. सी. एम्. थत्ते
१८९३	१८९४	श्री. लल्लूभाई
१८९६	१८९७	श्री. रा. ब. सी. एम्. थत्ते
१८९७	१८९८	श्री. रा. ब. जो. पी. वैद्य
१८९९	१९००	,, ,, ,,
१९०२	१९०३	श्री. व्ही. एम्. खरे
१९०४	१९०५	
१९२०	१९२१	श्री. डी. के. शिंदे
१९३२	१९३३	श्री. जी. जे. कोकणी
१९३३	१९३४	श्री. ब्रह्मदेव एस्. वाघ
१९३६	१९३७	श्री. दे. ना. टिळक
१९३८	१९३९	श्री. सी. एम्. कोकणी
१९३९	१९४०	श्री. एच्. एच्. कोकणी
१९४०	१९४१	श्री. जी. आर्. बोडस
१९४२	१९४३	श्री. इब्राहिम साहेब जीन
१९४३	१९४४	श्री. शेखसाहेब बडेसाहेब खतीब
१९४४	१९४५	श्री. अबदुल हुसेन बोहरी
१९४५	१९४६	श्री. एस्. डी. साळुखे
१९४६	१९४७	श्री. रा. ब. हि. ना. शिदोरे
१९४७	१९४८	श्री. इ. एम्. चौधरी
१९४८	१९५२	श्री. अॅडमिनिस्ट्रेटर
१९५३	१९५४	श्री. एम्. सी. शेख
१९५५	१९५६	श्री. श्रीमती वत्सलाबाई एस्. मुठाळ
१९५६	१९५७	श्री. श्रीमती शशीकलाबाई एस्. मोरे
१९५७	१९५८	श्री. अबदुल रझाक कोकणी

पासून	पर्यंत	नाव
१९५८	१९५९	श्री. उत्तम भिकाजी चव्हाण
१९५९	१९६०	श्री. के. के. फरीद
१९६०	१९६१	श्री. मी एन्. पटेल
१९६१	१९६२	श्री. जी एन्. पटेल
१९६२	१९६३	श्री. एल् एम् जानमाळी
१९६३	१९६४	श्री. जी पी. काटे

● **येथील उपनगराध्यक्ष–**

सोबत,आजवर होऊन गेलेल्या उपनगराध्यक्षांचा, नामनिर्देश केलेला आहे. नगरपालिकेच्या घटनेच्या दृष्टीने नगराध्यक्षांच्या गैरहजेरीत उपनगराध्यक्ष काम करीत असतात. त्यावरून त्यांचे मूल्यमापन करणे अयोग्य ठरेल. कारण वैचारिक संघर्ष, देवाण घेवाण ह्या बाबतीत जवळपास असणाऱ्या व्यक्तींचा राजकारणी व्यक्तीवर ह्यांच्या निर्णयावर, चारित्र्यावर तसेच कर्तबगारीवर फार मोठा प्रभाव पडलेला असतो. ह्याच कारणासाठी कोणत्याही वस्तुस्थितीचे राजकीय मूल्यमापन करताना भोवतालच्या ह्या वातावरणाचा, व्यक्तींचा, अभ्यास करणे युक्त व आवश्यक ठरते.

या खेरीज उपनगराध्यक्षाकडे भावी नगराध्यक्ष म्हणूनहि आशेने पहाता येते एवढेच नव्हे तर, सोबतच्या तक्त्याचा डोळस अभ्यास केल्यास कालच्या उपनगराध्यक्षातूनच बरेचसे आजचे नगराध्यक्ष जन्मास आल्याचे दिसते आणि लोकशाहीत अशी कार्यकर्त्यांची मालिका सतत तयार ठेवणे भारी आवश्यक असते. त्या अभावी नेहरू नंतर कोण असे अभागी प्रश्न लोकशाहीत निर्माण होतात.

ह्या दृष्टीने नासिक नगरपालिकेने अत्यंत प्रभावी अशी कालच्या व आजच्या लोकसेवकाची शाळा आणि परंपरा चालू ठेवल्याचे कोणत्याही सूज्ञ वा चकास आढळून येईल.

सध्याच्या नगरपालिकेचे स्वरूप–

गेल्या इतिहासाकडे अभ्यासू नजरेने पहाणाऱ्या वाचकांच्या ध्यानी येईलच की स्वातंत्र्यानंतर भारतीय जीवनपद्धती ढवळून निघाली आहे. देशाभिमान आणि स्वातंत्र्य ह्यांच्या संस्कृतीची वाढ होण्यात फार मोठा भाग असतो. १९५२ सालापासून नियोजनपूर्व विकासाचा संकल्प देशाने केलेला असल्याने सर्व क्षेत्रात जनसेवेच्या सर्व परिघांमध्ये एक प्रकारचा नवीन दृष्टिकोन आणि नवीन श्रद्धा येऊ पहात आहे. सध्याचे नासिक नगरपालिकेचे प्रगत स्वरूप हे नवीन जाणीवेचाच प्रत्यय होय असे म्हणावे लागेल. पूर्वी नुसते खराट्याचे स्वराज्य राबवणारी संस्था आज सर्वोदय साधण्याची महत्वाकांक्षा धारण करीत आहे आणि तळमळीच्या कार्यकर्त्यांद्वारा हे स्वप्न जास्तीत जास्त सुंदर व विलोभनीय करण्याचा प्रयत्न आहे. सध्याच्या प्रगत नगरपालिकेचा परिचय खालील शब्दात संक्षेपाने होईल.

विस्तार : सुरुवातीस ६॥ मैलाचा असलेला शहरी विस्तार आज २२॥ मैलापर्यंत वाढलेला आहे. १९५६ पासून शरणपूर गावठाण, वडाळी, आगर टाकळी, उपनगर इत्यादि विभाग नगरपालिकेच्या ताब्यात आले आहेत. आणि महानगरपालिकेची प्रतिष्ठा प्राप्त झाल्यास, नासिकरोड, देवळाली, भगूर इत्यादि विभागहि ह्या महान संस्थेच्या उपकारी कक्षेत येतीलसे वाटते.

सध्या एकूण शहराचे **११** निवडणूक विभाग असून त्या द्वारा ५० नगरपिते दर तीन वर्षांनी निवडले जातात. वॉर्ड नं. २, ४, ७, ८, ९, १०, मधून प्रत्येक **५** प्रमाणे व १,

३, ५, ६, ११, मधून प्रत्येकी ४ प्रमाणे एकूण (३०+२०) ५० नगरपिते सध्या आहेत. पैकी ५ जागा स्त्रीयांसाठी, ३ जागा मागासलेल्या जातीसाठी व ३ जागा वर्गीकृत जमातीसाठी रिझर्व आहेत.

सध्याच्या कार्यकर्त्यांची निवड १४ मे १९६१ साली झालेल्या निवडणुकीतील जनतेच्या संमतीने झाली आहे.

चालू सालाकरिता नगरपालिकेच्या कामाकरिता ज्या समित्या नेमलेल्या आहेत त्यांची सभासदांसह यादी सोबतच्या तक्त्यावर आहे.

यापुढे नगरपालिकेच्या विभिन्न खात्यांचा परिचय खालीलप्रमाणे करून देण्याचा प्रयत्न आहे.

● स्कूलबोर्ड –

इ. स. १८८३ पासून जरी प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिका सांभाळीत असली तरी त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या वेळोवेळीच्या कायद्यानुसार अनेक स्थित्यंतरे घडत गेली आहेत १९२५ पासून मात्र प्राथमिक शिक्षणाचे कार्य नगरपालिकेद्वारा "नगरपालिकेचे स्कूल बोर्ड" करीत आलेले आहे.

सध्याच्या स्कूलबोर्डाच्या लोकनियुक्त नियंत्यांची तसेच स्कूलबोर्डाच्या माजी व आजी मान्यवर सत्ताधाऱ्यांची यादी सोबत असली तरी ह्या उपयुक्त क्षेत्रात नगरपालिका किती जागृततेने जनसेवा करीत आहे ह्या विषयीचे चित्र खालील माहितीवरूनच ध्यानात येऊ शकेल.

– नासिक म्युनिसिपल स्कूल बोर्ड –

गेल्या ३ वर्षातील प्रगती तक्ता

साल	एकूण शाळा	एकूण विद्यार्थी	एकूण शिक्षक	अंदाजितखर्च	प्रत्यक्ष खर्च	सरकारी मदत
१९६०-६१	३९	१५४४७	३४०	६९३२३२	६०८४६४	३३६१७६
१९६१-६२	४०	१६९४८	३६२	७४६८३१	६८०४६६	५६२०००
१९६२-६३	४२	१७६७१	४०२	७३५९५३	६९९४८८	३०४४१५

● वॉटर वर्क्स कमिटी–

दिनांक २३–१२–१९६३

१) श्री. दा. भि. येलमाने, चेअरमन
२) श्री. मु. कु. गायके, सभासद
३) श्री. र. शं. फळे, "
४) श्री. वि. व्ही. संघवी "
५) श्रीमती प्रभादेवी भा. राय, सभासद
६) श्री. दु. रा. पांडे, "
७) श्री. शेख महंमद यासिन चाँद "

● पब्लिक वर्क्स कमिटी

दिनांक २३–१२–१९६३

१) श्री. शं. प. सोडे, चेअरमन
२) श्री. व. दा. भोईर सभासद

३) श्री दां. ग. नांदूर, सभासद
४) श्री. ग. ई. जिन ,,
५) श्री डॉ. व. ग. शुक्ल ,,
६) श्री. मा. गो. फरशाळे ,,
७) श्री. मु. कृ. गायके, ,,

गार्डन्स् व डिस्पेन्सरीज् कमिटी—

दिनांक २३–१२–१९६३

१) श्री. हि. च. मोहिकर, चेअरमन
२) सौ. प्रभादेवी मो. राव. ,,
३) डॉ. द. वि. देवळालकर ,,
४) श्री गो. वि. गवांडे, ,,
५) श्रीमती हरीबाई भा. अग्रवाल. ,,
६) श्रीमती गोदूबाई ल. ठाकरे, ,,
७) श्री. ग. आ. जाधव, ,,

स्टँडिग कमिटी निवडणूक—

दिनांक २३–१२–१९६३

१) श्री. विवेक लक्ष्मण रहाणे, चेअरमन
२) श्री दत्तात्रेय विनायक देवळालकर सभासद
३) श्री. रामचंद्र शिवराम थत्ते, ,,
४) श्री. गुलाममहंमद इब्राहिमसाहेब जिन ,,
५) श्री. सदाशिव गंगाराम भोरे, ,,
६) श्री. नाना रामचंद्र चव्हाण, ,,
७) श्री. यादवराव गणपतराव वाघ, ,,
८) श्री. निवृत्ती त्र्यंबक वझरे ,,
९) श्री. शेखमहंमद यासिन चांदसाहेब ,,
१०) श्री. दत्तात्रेय केशवशेट तांबोळी, ,,
११) श्रीमती हरीबाई भागचंदजी, ,,

सॅनिटरी कमिटी—

दि. २३-१२-१९६३

१) श्री. रामेश्वर मुरलीधर कमोद, चेअरमन
२) श्री. रघुनाथ आनंदा जाधव, सभासद
३) श्री. भिमाशंकर केशव तांबोळी, ,,
४) श्री. यादवराव गणपतराव वाघ, ,,
५) श्री. गोविंद दगडू गोडे. ,,
६) श्री, महादू दुर्गाजी क्षिरसागर सभासद

७) श्री. वासुदेव लक्ष्मण जानोरकर ,,

फायनान्स कमिटी—

दिनांक २३–१२–१९६३

१) मे. प्रेसिडेंट साहेब
२) मे. चेअरमनसाहेब, स्टॅं. क.
३) मे. चेअरमन साहेब, सॅनि. क.
४) मे. चेअरमनसाहेब, गा. व डि. क.
५) मे. चेअरमनसाहेब, प. व. क.
६) मे. चेअरमनसाहेब, बा. व. क.
७) मे. चेअरमनसाहेब म्यु. पल. स्कूलबोर्ड. नासिक

● लॉ अँड रेफरन्स कमिटी —

१) मे. प्रेसिडेंटसाहेब, चेअरमन
२) मे. चेअरमनसाहेब, स्टॅं. क. सभासद
३) मे.चेअरमनसाहेब म्यु. पल. स्कूलबोर्ड, नासिक सभासद
४) डॉ. द. वि. देवळालकर ,,
५) श्री. वा. ल. जानोरकर ,,
६) श्री. नि. त्र्यं. वझरे ,,
७) शेखमहंमद यासिन चांद ,,

● अतिक्रमण कमिटी —

दिनांक २३-१२-१९६३

१) श्री. द. के. तांबोळी. चेअरमन
२) श्री स. ग. भोरे, सभासद
३) श्रीमती हरीबाई भा. अग्रवाल, सभासद

● कुष्ठरोग समिति—

दिनांक २३–१२–१९६३

१) मे. प्रेसिडेंटसाहेब
२) मे. व्हा. प्रेसिडेंट
३) मे. चेअरमन सॅनि. क.
४) मे. चेअरमन गा. व डि. क.
५) डॉ. व. ग. शुक्ल
६) डॉ. द. वि. देवळालकर
७) डॉ. ला. म्यु. मिश्री
८) श्रीमती हरीबाई भा. अग्रवाल
९) मे. कलेक्टरसाहेब, नासिक
१०) मे. सिव्हिल सर्जन, नासिक

हिशेब तपासनीस समिती–

दिनांक २३-१२-१९६३

१) शेखमहंमद यासिन चांदसाहेब.
२) श्री. वा. ल. जानोरकर

अमरधाम समिती–

दिनांक २३-१२-१९६३

१) श्री. मोतीलाल गोकुळशेट राय, चेअरमन
२) श्री. नि त्रि वक्षरे सभासद
३) श्री. बा. स. सोनवणे, ,,
४) श्री. रा. ग. पोरजे, ,,
५) श्री. स गं. भोरे, ,,
६) श्री. द. के. तांबोळी, ,,
७) श्री. भि. के. तांबोळी, ,,

● वीज समिती–

दिनांक २३-१२-१९६३

१) श्रीमती गोदुबाई ल ठाकरे, सभाप्रमुख
२) श्री. गु. न. पटेल, सभासद
३) श्री. घि. त्रि. संघवी ,,
४) श्रीमती हरीबाई भा. अग्रवाल ,,
५) श्री. गो. त्रि गुंबाडे ,,
६) श्री. र. आ. जाधव ,,
७) श्री. र. गं. फळे ,,

नासिक जिल्हा कुष्ठरोग निवारण मंडळ

१) श्री. र. शा. जाधव
२) श्री. हि. च. मोहेकर
३) डॉ. श्री. ला. खु. बदलानी

नासिक म्युनिसिपल स्कूल बोर्डाचे चेअरमन

१)	श्री. फतेलाल चुनीलाल	१–४–१९२५ ते १–१–१९२८
२)	श्री. हिरामण नारायण शिंदोरे	२–२–१९२८ ते १५-२–१९२८
		२८–७-१९२८ ते ३१–२–१९३७
३)	श्री. जे. ए. लाल	२३–३–१९३७ ते ६–३–१९४०
४)	श्री. ज. गो. सुठवाल	७–३–१९४० — —
५)	श्री. एल्. एस् जाधव	
६)	श्री. ज.गो. सुंठवाल	६–३–१९४६ ते २१–३–४८
७)	श्री. श्री. गं. मंडाळे	२२–३–१९४८ ते २७–४–४९
८)	श्री. वा गं यार्डी	२८–४–१९४९ ते १८–४–५२
९)	श्री. ल. ह. गावंन	१९–४–१९५२ ते ४–११–५७
१०)	श्री. ग. अ मिरजकर	५–११–१९५७ ते २७–१–५९
११)	श्री. बा. गो. कुलकर्णी	१५–२–१९५९ ते १८–१–६०
१२)	श्री. पं. गो. नागरे	७–२–१९६० ते २८–११–६१
१३)	श्री. या. कों. वावरे	२५–११-१९६१ ते ८–१–६४
१४)	श्री. डॉ ला. खु. मिश्री	९–१–१९६४ पासून

नासिक म्युनिसिपल स्कूल बोर्डाचे व्हाईस चेअरमन

१)	श्री. एस् जी. जोशी	१–४–१९२५ ते ४–५–३१
२)	श्री. वा. वि. पारासरे	५–५–१९३१ ते २१–३–३७
३)	श्री. गं. भि. नांयट	२२–३–१९३७ ते ६–३–४०
४)	श्री. सा. वा. दाणी	७–३–१९४० ते

५)	श्री. बा. गो. जाधव	—
६)	श्री. द. बा. टकले	५–३–१९४६ ते ६–३–४६
७)	श्री. ज. ना. डाकीफळे	२३–३–१९४८ ते २७–४–४९
८)	श्री. ल. ह. सावंत	२८–४–१९४९ ते १८–४–५२
९)	श्री. ग्या. कां. बावके	१९–४–१९५२ ते ४–११–५७
१०)	श्री. शेख महंमद यासीम चांदसाहेब	५–११–१९५७ ते १५–११–५८
११)	श्री. गु. न. पटेल	२७–११–१९५९ ते २४–११–६१
१२)	श्री श्री. व्ही. संघवी	२५–११–१९६१ ते ८–१–६४
१३)	श्री भि. के. नावोळी	९–१–१९६४ पासून

कर आकारणी पूर्वीपासून घरपट्टी, पाणी पट्टी व भंगी पट्टी ही अलग अलग आकारण्याची प्रथा अमलात होती. त्यायोगे वसूली व हिशेब ह्या दोन्हीही बाबतीत अनेक अडचणी आढळतात. दिनांक १-७-१९६० पासून हे सर्व कर संघटीत गेल्या मालमिळकतीच्या प्रत्येक रुपयावर १७ नये पैसे ह्या दराने आकारले जाऊ लागले. जकातीच्या दरात तसेच नगरशीलातही अनेक बदल होऊन गेले आहेत. त्याची माहिती विस्तारभयास्तव येथे देणे शक्य नाही.

पाणी पुरवठाः हा प्रश्न नगरपालिकेच्या जन्मापासूनच कठीण समस्येसारखा असल्याचे आपण पहात आलो आहोत, आधुनिक यंत्रयुगात मोठ्या प्रमाणावर यंत्रद्वारा ह्या प्रश्नाची उकल करावी म्हणून नासिक नगरपालिकेने अनेक प्रयत्न केले आहेत. पण त्यावेळची जुजबी योजना ही कालान्तराने अपुरी वाटावी अशी परिस्थिति निर्माण झाली आहे.

पुणे येथील सरकारी आरोग्यखात्याच्या इंजिनियरांनी १९५२ सालीच एक योजना सुचविली होती. एकूण २५ लाख रुपयाची ही योजना आवाक्याबाहेरची म्हणून प्रथम टप्पा सुमारे ११७२४०० रुपयांचा १९५९ सालीच मंजूर झाला. त्यायोगे ३० टक्के पाणीपुरवठा होऊ शकेल असा आशावादही मनाशी होता.

ह्या योजनेचे स्वरूप थोडक्यात विशद करावयाचे झाल्यास–.

१) आग्रारोड व त्रिवक रोड येथे मोठा पाण्याचा सांठा करून २७ इंची पाईपाने तो मुळ स्टेशनशी जोडणे

२) वरील ठिकाणावरून वडाळी पोलिस चौकी पावेतो २१ इंची पाईपाने जोडणे

३) येथून उर्दू हायस्कूलच्या ग्राऊंडपर्यन्त १८ इंची पाईपाने पाणी आणणे. तेथे एक पाण सांठा तयार करावी की ज्यात ३ लाख गॅलन पाणी साठवणे शक्य होईल.

ह्या योजनेला महाराष्ट्र सरकारची संमती १९६१ साली मिळाली. त्या अनुसार नगरपालिकेने कर्ज उभारणी केली.

लाईफ इन्शुरन्स कार्पोरेशनने	६५००००
नासिक डिस्ट्रिक्ट सें. को. ऑ. बँकेने	२०००००
बँक ऑफ बरोडाने	२,३८,०००
याप्रमाणे रक्कम गुंतविली.	११,३८,०००

वरील फलदायी योजनेतील दर्गा विभागात टाकी बांधण्याचा कोनशीला समारंभ माननीय श्री. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते ३१–५–१९६२ रोजी झाला सध्याचे नगराध्यक्ष श्री. सोलार हे जातीने ह्या कामात लक्ष घालीत असून नजिकच्या काळातच हा महान संकल्प पुरा होईलसे वाटते.

जलशुद्धीकरणाची मोहीमही अशाच प्रकारची धाडसी आहे. सध्या नदी पात्रातील पाणी सछिद्र पाईपद्वारा साठोण्याच्या विहीरीत साठवले जाते. प्रवाहातील मातीने ही छिद्रे बुजली जाणे हा नित्याचा अडथळा. शिवाय सध्या असलेल्या पाईपद्वारा दरताशी जेमतेम १,२०.००० ते १॥ लाख गॅलन शुद्ध पाणी पुरविणे शक्य होते आणि पावसाळ्यात तर ६० हजार ते ८० हजारावर पुरवठा उतरतो. त्यामुळे नगरपालिकेद्वारा सध्या सकाळी ६ तास व सायंकाळी ४ तास असा पाणी पुरवठा करण्याचे बंधन जारी करावे लागले. आणि ताशी २ लाख गॅलन पाणी पुरविणे तर जरूरीचे आहे.

जलशुद्धीकरणाची योजना गेल्या ५ वर्षापासून प्राथमिक अवस्थेतच पडून होती. दरसाल तगादा लावला जात आहे. गेल्या ४ महिन्यापूर्वी ह्या बाबत थोडीशी हालचाल झालेली असून सरकारी अनुदान कर्ज व नगरपालिकेचा संकल्प ह्यातून सुमारे १३ लाख रुपय.ची योजना कार्यवाहीत आणणे शक्य होत आहे. एकूण ३५ लाखाच्या वर खर्च अपेक्षित आहे पण केल्याने होत आहे रे ... या भरवशाने हत्याहरत्याने नगरपालिकेने ह्या विकट कामासाठी देखील कंबर कसली आहे.

● सांडपाणी व्यवस्था–

नासिक शहरातील सांडपाण्याची सोय असमाधानकारक व अपूर्णच होती. ह्या क्षेत्रातही आधुनिकीकरण निकडीचे झाले होते. त्यामुळे नगरपालिकेने सरकारी आरोग्य खात्याच्या सल्ल्याने व मदतीने ह्या प्रश्नाची उकल करण्याचा संकल्प केला. आणि सुमारे २७ लाख खर्चाच्या या योजनेस प्रारंभ करून शेवटास नेण्यास फारसा कालावधी लागणार नाही, असा नगरपालिकेचा कयास आहे. सांडपाणी एकत्रित साठवून पंपाचे व यंत्राचे द्वारा त्याचे शुद्धीकरण निर्जलीकरण, करून खतासाठी उपयोग आदि पायऱ्या ह्यात अंतर्भूत आहेत. नासिक शहराचा रोगराईसाठी असलेला बदलौकिक ह्या योजनेने दूर होऊन पवित्र व स्वच्छ शहर असा लौकिक प्रस्थापित होणे सुकर होईल.

● आरोग्यविषयक–

नगरपालिकेतर्फे देशी विदेशी औषधांचे दवाखाने चालविले जातात. खेरीज शिवाजी रोडवर असलेल्या "हॅरिस हॉस्पिटल" ला नगरपालिकेद्वारा अनुदान प्राप्त होतच आहे. ह्या बाबतीत सिव्हिल हॉस्पिटलची आधुनिक विस्तृत इमारत लौकरच बांधण्याचा संकल्प आहे. त्यायोगे शारीरिक रिपूशी सामना देणे नगरपालिकेस शक्य होणार आहे. खेरीज नगरपालिकेद्वारा अनेक रोगप्रतिबंधक इलाज केले जात आहेतच. उ० देवी टोचणे– साथीच्या लसी टोचणे इत्यादि. सरकारी मदतीद्वारा नगरपालिकेस सुमारे २५०० रुपयांची डी. डी. टी. प्राप्त होत असते. दर जुलैच्या दरम्यान फवारे मारून डास व ढेकणाचा प्रादुर्भाव कमी करण्याचीही मोहीम नगरपालिका हाती घेत असते. मलेरिया उच्चाटन समितीसमवेत नगरपालिकेचेही सहकार्य असते. खेरीज शाळा शाळातून विद्यार्थ्यांची आरोग्यविषयक तपासणी करण्याचाही पायंडा आहेच

नगरपालिकेच्या " कुष्ठरोग निवारण समितिद्वारा पंचवटीतील " कुष्ठरोगधामाचे नियंत्रण होत असते. पूर्वी सर्वत्र विखुरलेले महारोगी ह्या धामातून उपचार व निर्वाहव्यवस्थेचा फायदा घेत आहेत.

" घाणेरड्या, वस्त्यांचे उच्चाटन " ही मोठी समस्या जागतिक स्वरुपाची असल्याचे आढळेल. लंडन शहरातील अशा वस्त्यांच्या उच्चाटनाचा इतिहास हा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या इतिहासातील फार मोठा मनोरंजक प्रश्न असल्याचा प्रवाद आहे. औद्योगिक क्रांतीमुळे भरमसाठ वाढलेल्या मजूर वस्त्यांचे

सुसूत्र नियोजन अजून देखील अिथल्यांदला शक्य झाले नाही. सरकारी फंड येतात, त्यानुसार संकल्प होतात, योजना आखल्या जातात आणि द्रव्य सहाय्याभावी त्या बारगळतात, असा खाक्या येथेही दुर्दैवाने चालू आहे. पण महापालिकेचा दर्जा प्राप्त झाल्यास ह्याविषयी योजना करणे शक्य होईल असा आशावाद प्रकट केला जात आहे.

● औद्योगीकरण–

नासिक नगर हे थंड हवेसाठी प्रसिद्ध आहे. तसेच गोदावरीचे पाणी मुबलक मिळणे शक्य झाले तर व विजेचा पुरवठा केला गेल्यास नासिकचे औद्योगीकरण होणे शक्य आहे. ह्या धारणेतून येथून ४ मैलावर असलेल्या 'सातपूर' या खेडेगावाभोवती औद्योगिक वसाहत आखली जात आहे. १९६२–६३ साली 'महाराष्ट्र अिंडस्ट्रियल डेव्हलपमेन्ट कॉर्पोरेशनने ह्या दृष्टीने सहकार्य मागितले असता, नगरपालिकेद्वारा उद्योगधंद्यांना खालील सवलती देण्याचे आश्वासन दिले गेले.

१) उद्योगधंद्यासाठी लागणाऱ्या यंत्रावर व कच्च्या मालावर जकात कर सूट

२) मजूर वस्त्यांसाठी बांधलेल्या वसाहतींना घरपट्टी, पाणीपट्टी हलालखोर कर अित्यादीत शेकडा २० कपात.

३) म्युनिसीपालिटीच्या खर्चाने पाणीपुरवठा, रस्तावांधणी दिवाबत्ती गटारे अि० अि० व्यवस्था.

कॉर्पोरेशनशी संगनमत करून नगरपालिका नासिकच्या औद्योगीकरणास इतरही अन्य मार्गांनी मदत करण्यास समर्थ आहे व संमतही आहे. नजीकच्या काळात हां हां म्हणता येथे उद्योगधंदे वसविले जातील आणि नगरपालिकेच्या प्रगतिपथावर वैभवाचे वारे अिकडे वाहू लागतील अशी आशा आहे. महाराष्ट्र सरकार, महाराष्ट्रीय भांडवलदार, आणि नगरपालिकेचे सूत्रधार, ह्यांच्या एकत्रित कार्यातून नासिकला पुणे–मुंबई सारखे वैभव प्राप्त होईल, हे नासिककरांचे सुखस्वप्न साकार होणे अगदी शक्य झाल्यासारखे आहे.

● समालोचन –

कल्याणकारी राज्याच्या आगमनाने नगरपालिकेची कार्यक्षेत्रेही विस्तारली आहेत. लोकशाही शासन प्रकाराचे शिक्षण येथील नगरपित्यांना प्राप्त होत आहे. नासिकची जनताही नगरपालिकेस सहाय्यभूत होत आहे. आजच्या व आजवर होऊन गेलेल्या नगरपित्यांनी नगरपालिकेचा लौकिक व कर्तव्यशील वर्चिष्णु ठेवलेली आहे. वाढती लोकसंख्या, औद्योगिकरणाचा वाढता वेग व गरजा ध्यानात घेऊन स्थानिक स्वराज्य संस्था विषयक महाराष्ट्र शासनाने उत्तेजनाचाच दृष्टिकोन अवलंबलेला आहे. या विषयक कायद्यामध्ये देखील प्रगतिकारक सुधारणा करण्याचा मानस नुकताच बोलून दाखविला गेला. ह्या सर्व परिस्थितीतच नासिक नगरपालिकेचे रूपान्तर महापालिकेत करावे अशा सूचनेला बाव मिळाला आहे. मुंबई नागपूर पुणे या महाराष्ट्रातील तीन महापालिका ह्या अनुभवावर पाऊले टाकून सोलापूर येथील नगरपालिकेस १ मे रोजी महापालिकेचा दर्जा प्राप्त झाला त्याच प्रमाणे ठाणे नगरपालिकेची देखील अशीच मागणी मान्य होण्याच्या मार्गावर आहे. कोल्हापूर नगरपालिका आणि नासिक नगरपालिका ह्यांचे महापालिकेत रूपान्तर होणे सर्वथैव योग्य आहे. नासिक नगरपालिकेचे महापालिकेत रूपान्तर लवकरच होवो अशी सदिच्छा प्रकट करून ह्या नगरपालिकेचा हा १०० वर्षांचा धावता अितिहास येथे पुरा करीत आहे. ह्या बाबतीत नगराध्यक्ष श्री. नेवार, नगरपिते श्री. ठकार, डा. गोगटे, मोहेकर तसेच नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांकी बापूसाहेब मोडक, हेडक्लार्क कुलकर्णी, काळे.

गुप्ते, व रेकॉर्ड क्लार्क ह्याचे मजला खूपच सहाय्य झाले आहे. त्या सर्वांचे ऋण मजला फेडणे अशक्य आहे. महाराष्ट्रातील मान्यवर कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या मार्गदर्शनाखाली मजला हे काम करण्याची बहुमोल संधी लाभली, ह्यात तर मी परमेश्वरी संकेतच मानतो. श्री. गोपाळराव बेलगांवकरांचे सहाय्य विसरण सर्वथैव अशक्य आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

1 Nasik Municipality Rules 1871

2 Nasik Municipality Rules & By-laws 1898

3 Bombay District Municipal Acts of 1873 & 1884

4 Bombay Municipal Act 1901

5 Bombay Municipal Boroughs Act 1925

6 Bombay Government Nasik Dist. Gazetteer 1883

7 Gazetteer of Bombay Presidency 1926
(Volume XVI-B Nasik & Surgana)

8 The Imperial Gazetteer of India 1909
Vol. I Descriptive

9 The Indian Municipality By H. T. S. Forrest (1909)

10 The Growth of Local Self Government 1955
By Rasikchandra G. Shah

11 Some Social Services of the Govt. of Bombay
Chapter VIII 1936-37
Village Improvement in Nasik Dist. By Collector
E. W. Perry

12 The Bombay Municipal Corporation (An Election study) By B. A. V. Sharma & R. T. Jangam.

13 पुणे नगरसंस्था शताब्दि ग्रंथ. लेखक–मा. प. मंगुडकर, एम्. ए., पी. एच्. डी.

14 कोल्हापूर नगरपालिकेचा इतिहास (१८५४ ते १९४४)
लेखक–जयंत पी. नाईक, बी. ए.

15 नासिक नगरपालिका अॅडमिनिस्ट्रेशन रिपोर्टस् व सालोसालचे दप्तर

16 An Enquiry in patterns of influence in Nasik Town.
By Mrs. Hemalata Acharya, Dept. of Sociology.
Deccan College, Poona (Unpublished)

नासिक शहरातील लोकोपयोगी संस्था

● **अनाथ महिलाश्रम**–

ठिकठिकाणच्या बेवारशी, अनाथ व निराधार स्त्रिया आणि मुले यांना समाजात काही स्थान प्राप्त व्हावे व त्यांचे जीवित सुलभ व्हावे हा हेतु. आतापर्यंत संस्थेचा २५ स्त्रियांना आणि ८५ मुलांना आश्रय. आरंभ गुलालवाडीत, श्रीमती अिंदिराबाई बापट यांच्या घरी. संस्थेसाठी श्री. म. वा. दातार यांचे विशेष प्रयत्न. अनेक सरकारी निमसरकारी संस्थाची मदत ही मदत अपुरी म्हणून नाट्यप्रयोग, उसनवारी, भिक्षादेहीची फेरी काढावी लागते. आश्रम व्यवस्थेत श्रीमती बापट, निर्मला गोखले, सौ. अिंदुताई खाडीलकर यांचा भाग.

● **लोकहितवादी मंडळ**–

स्थापना १९५०; उद्देश नासिकमधील नागरिकांच्या जीवनात संस्कृति साहित्य व कला याविषयी आवड निर्माण व्हावी हा हेतु या हेतुनुसार वासंतिक महोत्सव, शारदीय महोत्सव, लोकहितवादी वाक्स्पर्धा, लोकहितवादी व्याख्यानमाला. अभ्यासवर्ग, साधना व्याख्यानमाला अित्यादि कार्यक्रम. नाट्यशाखचे उल्लेखनीय कार्य. आतापर्यंत ५० नाटके सादर. सरकारी नाट्यमहोत्सवात सांघिक व व्यक्तिगत पारितोषिके. मंडळाची वार्षिक सभासद संख्या ५००. कार्यकारिणीत १५ सदस्य. मंडळाच्या संस्थापकात कवि कुसुमाग्रज, डॉ. वर्टी, प्रा. आथेकर, वा. श्री. पुरोहित, सोपानदेव चौधरी, डॉ. गुप्ते, ब. चि. सहस्रबुद्धे, गो. के. खरे, ग. वि. अकोलकर यांचा समावेश. १९६३–६४ कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष द. शं. पोतनीस.

सार्वजनिक वाचनालय–

स्थापना १८४०; नासिकचे एक महत्वाचे शैक्षणिक व सांस्कृतिक केन्द्र. १८८५ साली सभासद संख्या ६५ होती. ती १९६३ साली १०३३ झाली. १९६३ च्या अंदाजपत्रकानुसार जमा १९२५० रु., खर्च २११३६ रु. वाचनालयाच्या मुक्तद्वार विभागात विनामूल्य प्रवेश मिळतो. १७५ नियतकालिके येतात. रोजची सरासरी ५००. बालविभाग, वस्तु संग्रहालय, हस्तलिखित संग्रह, संदर्भ विभाग, साने गुरुजी कथामाला, वह्निःशाल शिक्षण व्याख्यानमाला, ज्ञानवर्धिनी, विविध विषय विभाग ग्रंथसंग्रह, परपोच मासिके व पुस्तक विभाग, अित्यादि विभागाचे उल्ले

खनीय कार्य. हायस्कूल ग्राऊंडवर नवी अिमारत बांधावयाची योजना. संकल्पित खर्च ५ लाख रुपये. अिमारतीसाठी महाराष्ट्र सरकार १ लाख रु., नासिक नगरपालिका ५० हजार रु., कै. परेमीबाई दस्तूर ५० हजार रु. तसेच नासिक रोटरी क्लबचे बालविभाग हॉल बांधण्यासाठी १० हजार रु. देण्याचे आश्वासन. नवीन वाचनगृहात प्रसन्नता, मोकळेपणा, शांतता व स्वास्थ्य असावे हा हेतु. १९६३-६४ कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष वि. वा. शिरवाडकर, उपाध्यक्ष ग. ज. म्हात्रे व वि. म. गोगटे.

सार्वजनिक सुभाष वाचनालय—

स्थापना १९४९; स्वातंत्र्य लढयात प्रसिद्ध होणारे क्रांतिकारी वाङमय सेवादल सैनिकांना व नागरिकांना वाचावयास मिळावे या उद्देशाने वाचनालयाची स्थापना १९४६ साली झाली. वाचनालयाची व्यवस्था म्युनिसिपल शाळेकडे. पुढे १९५३ साली सार्वजनिक वाचनालय म्हणून स्वरूप. मराठी, हिंदी व अिंग्रजी वृत्तपत्रे वाचनालयात येतात. रोजची वाचकांची सरासरी २००; बालविभागाची रोजची सरासरी १००; साने गुरुजी कथामालेचे केंद्र चालविले जाते. जुन्या नासिकमधील एकमेव सामाजिक संस्था. संस्थेच्या उभारणीसाठी श्री. यशवंत शिंदे यांची विशेष खटपट. १९६३-६४ कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष : आमदार श्री. वसंतराव नाईक.

रमाबाई आंबेडकर विद्यार्थिनी वसतिगृह -

२६ मे १९४७; स्त्रियांची, विशेषतः मागास वर्गातील स्त्रियांची शैक्षणिक क्षेत्रात उन्नती व्हावी या उद्देशाचा एक भाग म्हणून वसतीगृहाचा जन्म. सुरुवातीला २० मुली. आज ८० मुली. स्त्रियांना स्वतःच्या पायावर उभे राहता यावे म्हणून संस्था निरनिराळे धंदे, शिक्षणाचे वर्ग काढण्याच्या विचारात आहे. अिमारत बांधकामासाठी श्री. दादासाहेब गायकवाड यांची ६ हजार रु. मदत संस्थेच्या सुपरिंटेंडेन्ट सौ गीताबाई भाऊराव गायकवाड १९६३-६४ चे अध्यक्ष श्री. आर. आर. पवार, सेक्रेटरी कु. शांताबाई दाणी.

श्री. शाहू छत्रपती बोर्डिंग, नासिक—

स्थापना : १९१९; अस्पृश्य समाजातील मुलांची शिक्षणाची सोय व्हावी म्हणून स्थापना. सुरुवातीला ३ विद्यार्थी. आता ६५ विद्यार्थी. पूर्वी पत्र्याची चाळ. निरनिराळ्या धनिकांनी दिलेल्या १५ हजार रुपयांच्या देणग्यामुळे आजची अिमारत उभी. श्री विजयसिंहजी, भिमाणी, घनश्यामदास बिर्ला, रामेश्वरदासजी दामोदर आनंदजी, नसरवानजी कावसजी खुरसीगर, एन्. पी. पाटणकर वकील. डॉ. बर्टी यांचे विशेष आर्थिक साहय १९६४ साली सुपरिंटेडेंट एल्. एम्. जाधव.

कलायतन—

स्थापनाः १ एप्रिल १९६०. उद्देश नाद, ताल, लय, रंग, रेषा, मुद्रा आणि वाणी या सौन्दर्याच्या मूळ अंगाची बालकांना जाणीव करून द्यावी या हेतूने स्थापना. २ जुलै रोजी संस्थेचा वर्धापन दिन साजरा करण्यात येतो. हस्तलिखित मासिक स्पर्धा, महाराष्ट्र बालकवी स्पर्धा अित्यादि विविध स्पर्धा प्रतिवर्षी घेण्यात येतात. अभिनय साधना शिबीर हा अभिनव उपक्रम प्रत्येक वर्षी हाती घेण्यात येतो. १९६३-६४ साली कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष शांतारामबापू वावरे. कार्यकारिणीत एकूण २० सभासद.

नाटयसंघ —

स्थापना. १ ऑगस्ट १९५९. उद्देश नाट्य कलेच्या सेवेसाठी तरुण कलावंतांनी चालविलेल्या नाटयविषयक चळवळींना उत्तेजन. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेच्या पहिल्या फेरीत यशस्वी ठरलेल्या नाटकाचे निरनिराळ्या संस्थासाठी धर्मार्थ प्रयोग. याशिवाय

निरनिराळ्या लोकोपयोगी कार्यासाठी नाटकांचे प्रयोग. दिवाकर नाट्य स्पर्धा, नाट्य वाचन, संगीताचे कार्यक्रम, संगीत साभिनय कथा इत्यादि उपक्रम. आपल्या कलागुणांनी नासिक शहराच्या गौरवात भर घालणाऱ्या कलावंतांचा १९६३ मध्ये सत्कार. श्री. विश्वेश्वर कुलकर्णी नाट्यसंघाचे प्रमुख आधारस्तंभ

✿ नासिक कला निकेतन–

स्थापना : जून १९४० ; उद्देश : नासिक शहरात चित्रकलेचा एक संग्रह असावा अशी कल्पना. प्रथम संस्था नासिक आर्ट ट्रेझर्स नावाने ओळखण्यात येई. हल्ली नासिक कला निकेतन हे नाव. संस्थेतर्फे नासिकमध्ये प्रत्येक वर्षी चित्रकलेचा प्रदर्शन भरते. त्यातील उत्कृष्ट चित्र संग्रहालयासाठी विकत घेतले जाते, कलाप्रसार करण्यासाठी कलावंतांची प्रात्यक्षिके व व्याख्याने होतात. संस्था १९४७ पासून चित्रकला शिक्षणाचे वर्ग चालविते. १९५९ मध्ये अखिल भारतीय बाल चित्रकला स्पर्धेचे आयोजन. चित्रसंग्रह, चित्रकार स्नेहसंमेलन, लहान मुलांना स्केचिंगचे मार्गदर्शन, इत्यादि उपक्रम. चित्रकला विद्यालय आणि कला निकेतन या संस्थांच्या उभारणीत वा. गो. कुलकर्णी यांचा महत्त्वाचा भाग. १९६३–६४ च्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष एम. जे. दीक्षित (रिटायर्ड कलेक्टर).

✿ राष्ट्रीय तरुण मंडळ–

जुन्या नासिक विभागातील सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात अग्रेसर असणारी एक प्रमुख संस्था. १९४६ साली स्थापना. गणेशोत्सवाला पुरोगामी आणि विधायक स्वरूप देण्यात प्रामुख्याने भाग. तरुणांची शारीरिक व बौद्धिक वाढ व्हावी यावर संस्थेकडून विशेष भर. राष्ट्रीय एकतेत भर पडेल असे कार्यक्रम हाती घेतलेले आहेत. गणेशोत्सवाची मांडणी व सजावट अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असते. गणेशोत्सवातील दृश्यात शिवचरित्रातील अनेक प्रसंगाचे प्रभावी प्रदर्शन. कार्यवाह–गणपत पु. काळे, अध्यक्ष–मुरलीधर भ. जुन्नरे, उपाध्यक्ष–परशराम वि. खोडे.

✿ श्री अवधूत नाट्य मंडळ–

स्थापना: १८ आक्टोबर १९६२; उद्देश : सांस्कृतिक कार्यक्रमाद्वारा नागरिकांचे मनोरंजन करणे, थोर पुरुषांचे उत्सव, साहित्यिक कलाकारांचे मनोरंजक कार्यक्रम घडविणे. मंडळाने धार्मिक उत्सव साजरे केले. शहरात नाट्यप्रयोगासाठी येणाऱ्या कलावंतांचा सत्कार घडवून आणला. मंडळ पहिले नाटक बसवीत आहे. १९६३–६४ च्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष जगन्नाथराव जाधव. प्रमुख कार्यकर्ते व कार्यवाह नाना बेळे

✿ श्री विष्णू संगीत विद्यालय–

स्थापना : १ जानेवारी १९३२. उद्देश : कै. गायनाचार्य विष्णु दिगंबर पलुस्कर यांच्या स्मरणार्थ संस्थेची उभारणी. विद्यालयाच्या स्थापनेपासून शिस्त, नियमितपणा आणि अभ्यासू वृत्ति यांचा परिपाठ. संस्थेच्या सुरुवातीपासून विद्यार्थ्यांना विद्यालयातून संगीत साधने मिळू लागली. व त्यामुळे शिक्षण घेणे सुलभ झाले. विद्यालयात पहिल्या वर्षी ८३ विद्यार्थी होते. सन १९५२ मध्ये संगीत नाटक आकादमीची विद्यालयास मान्यता. १९५७ पासून संस्थेस सरकारी अनुदान मिळू लागले. १९५७ पासून गांधर्व महाविद्यालयाच्या परीक्षा सुरू. संस्थेत १५० ते १६५ विद्यार्थी शिक्षण घेतात. संस्थेतून शिक्षण घेऊन अनेक व्यक्ती, संगीत कलेचे शिक्षण देतात. स्त्रिया व मुलींच्या गायनवादन विभागाचे काम सौ. कुसुमावती त्रिवेदी या पाहतात. संगीतकलेच्या प्रसाराचे कार्य सतत ३३ वर्षे संस्था अखंड रीतीने करीत आहे.

✱ इंडियन मेडिकल असोसिएशन (नासिक शाखा)—

स्थापना : १९२५; उद्देश : व्यावसायिक ज्ञान व स्नेह संवर्धन करणे. व्यावसायीक व आरोग्य विषयक मासिक चालविणे व वैद्यकीय (मॉडर्न मेडिकल सर्व्हिसेस) लायब्ररी सुरू करणे. संस्थेने 'ट्रिपल अॅन्टीजन' सेन्टर चालविले आहे. संस्थेतून पुरुष व स्त्रियांना कुटुंब नियोजनाचा सल्ला मिळतो. संस्थेतर्फे 'बाल आरोग्य स्पर्धा' चालविली जाते. इंडियन मेडिकल असोसिएशनच्या महाराष्ट्र प्रान्तिक शाखेची दोन अधिवेशने संस्थेने यशस्वीरीत्या भरविली. नासिक शाखेतील डॉ. पी. एस्. गुप्ते, डॉ. द. वि. कुलकर्णी आणि डॉ. व्ही. पी. गुप्ते यांची निरनिराळ्या अधिवेशनात अधिकारपदावर नियुक्ती.

✱ नासिक जिल्हा कुष्टरोग निवारण मंडळ—

स्थापना १९४८; देशात कोणी कुष्टरोगी राहू नये ह्या उद्देशाने १९५० मध्ये मंडळ स्थापना. नासिक येथे भरलेल्या ५६ व्या कॉंग्रेस अधिवेशनात प्रचारात व उपचारास आरंभ सन १९५६ मध्ये मुंबई राज्याचे आरोग्यमंत्री ना. शांतीलाल शहा यांच्या हस्ते कुष्टरोग्याच्या निरोगी मुलासाठी शिशुविहार सुरू. १९५६ साली संत तुकडोजी महाराज यांच्या हस्ते संत गाडगेमहाराज कुष्टधाम सुरू. कुष्टरोगाची पिछेहाट करून राष्ट्र सुधारण्यासाठी रोगी मुलांवर उपचार करण्याकरिता १ एप्रिल १९६० पासून कुष्टधाम सुरू. कुष्ट पाहाणी, प्रचार आणि उपचार यासाठी सेट सेंटर चालविण्यात येते. गाडगे महाराज कुष्टधामातर्फे कुष्टरोगी मुलासाठी शेती काम, हस्त व्यवसाय शिक्षण, बगीचा काम आणि गवंडी कामाचे शिक्षण दिले जाते. कुष्टधामसाठी डॉ. दि. म गोसावी हे काम पहातात.

✱ तरुण ऐक्य मंडळ—

स्थापना जून १९२८; उद्देश तरुणात संघटना कौशल्य, समाजप्रीति, राष्ट्रीयवृत्ति प्रसंगावधान, तडफ, करारीपणा, निष्ठा, नेतृत्व वगैरे गुणांचा संचय व्हावा हा उद्देश. अशा गुणांचा संग्रह करून मंडळातील तरुण जागोजागी चमकले. मंडळातर्फे हस्तलिखित 'हिंदी तरुण' नियतकालिक प्रसिद्ध होते मंडळ सध्या बालवाडी, प्राथमिक शाळा व हायस्कूल अशा संस्था चालविते. मंडळाच्या व्यायाम विभागातर्फे मर्दानी व मैदानी खेळांचे राष्ट्रीय व परदेशी खेळाचे शिक्षण देण्यात येते ग्रामसेवक शिबिरे आणि मनोरंजक नाटकाचे कार्यक्रमहि सादर करण्यात येतात सन १९६३–६४ साली कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष वामन गंगाधर यार्दी व कार्याध्यक्ष शंकर सखाराम. वाघ आहेत.

✱ पुणे अनाथ विद्यार्थी गृह —

(नासिक शाखा) स्थापना: १४ मे १९२६, गरीब विद्यार्थ्यांना शिक्षण निवारा आणि भोजन याची सोय उपलब्ध व्हावी हा उद्देश संस्था प्रथम श्री गोकुळनाथजी महाराजांच्या जागेत होती. नंतर केशव महाराजांच्या मठात आली. संस्थेत ५० विद्यार्थ्यांचे वसतिगृह. सिंहस्थ काळात व स्थानिक यात्रा महोत्सवात स्वयंसेवक पथके तयार करून यात्रेकरूंना अनेक प्रकारे मदत. संस्थेचे माजी विद्यार्थी डॉ. शं. वि. देवधर याच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र क्षयरोग सॅनिटोरियमची स्थापना या संस्थेस पुढे नासिक टयुबरक्युलॉसिस अिन्स्टिटयूट हे नांव मिळाले, नासिकमधील अन्नछत्रे व सदावर्तांचा संस्थेतील विद्यार्थ्यांना सतत फायदा. कै. दादासाहेब केतकर व ना. वि पेंडसे यांची संस्था उभारणीस विशेष मदत.

महात्मा फुले शिक्षण संस्था–

स्थापना १५ ऑगस्ट १९६१: खेड्यातून शहरात शिक्षणासाठी येणाऱ्या व होतकरू हुशार मुलांच्या निवासस्थानाची सोय व्हावी या हेतूने संस्थेची स्थापना. वसतीगृहात सर्व जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश खुला असून त्यांच्याकडून नाममात्र प्रवेश फी आकारली जाते. संस्था विद्यार्थ्यांसाठी वाचनालय चालविते. अभिज्ञान शिक्षण वर्गातर्फे विद्यार्थ्यांच्या सहली काढण्यात येतात. संस्था शहराच्या जुन्या भागात असून तेथील विद्यार्थ्यांसाठी हायस्कूल काढण्याचा प्रयत्न चालू आहे. संस्थेचे अध्यक्ष निवृत्ति गंगाराम का[illegible] हे आहेत.

दि ॲग्रिकल्चर प्रोड्यूस मार्केट कमिटी–

स्थापना : २१ नोव्हेंबर १९५२ शेतीच्या उत्पादनाचे क्रयविक्रयाचे योग्य नियमन करून क्रयविक्रय पेठा वसविणे या कायद्यानुसार कमिटीची स्थापना. मार्केट कमिटीच्या प्रत्यक्ष कामकाजास १ सप्टेंबर १९५३ पासून आरंभ. मार्केट यार्डचा उद्घाटन समारंभ मार्केट कमिटीचे चेअरमन रावसाहेब भाऊसाहेब थोरात यांच्या हस्ते झाला. मार्केट कमिटीने आपले कार्यक्षेत्र निश्चित केले असून विक्रीच्या वस्तू नियमित केल्या आहेत. मार्केटची सर्व व्यवस्था नोकरवर्ग व कार्यकर्ते पाहतात. मार्केट यार्डचा फायदा शेतकऱ्यांना कळू लागल्याने शेतकऱ्यांकडून कमिटीचा जास्तीत जास्त फायदा घेतला जातो. १९६३-६४ सालच्या कार्यकारी मंडळाचे चेअरमन माधवराव दुर्गाजी क्षीरसागर. १९६२-६३ साली मार्केट यार्डावर ५,३०,९३९ पोत्यांची विक्री झाली.

दि नासिक सराफ मंडळ प्रा. लि.–

स्थापना १९२४ एकमेकांना साह्य करून सर्वांचा सर्वांगीण उत्कर्ष व्हावा या हेतूने संघटनेची स्थापना. मंडळाच्या सभासदांना दागिन्यावर अथवा हातावर कर्ज देणे व अशा प्रकारे त्यांना मदत करणे हा संस्था स्थापन करण्यामागे प्रमुख उद्देश होता. याच संस्थेतर्फे श्री नासिक सराफ असोसिएशन धर्मशाळा या नावाची संस्था स्थापन करण्यात आली. गेली ३९ वर्षे संस्थेचे कार्य चालू आहे. संस्थेतर्फे सार्वजनिक गणेशोत्सव साजरा केला जातो. नासिक मधील पहिला गणेशोत्सव संस्थेने सुरू केला. सराफ मंडळ सभासदांना बँकिंगचा व्यवहार करीत होते ते कार्य सध्या स्थगित आहे. १९६३–६४ सालच्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष बापूसाहेब कुममोडे असून चिटणीस प्र. आ. वडनेरकर हे आहेत.

नासिक नृत्यकला केंद्र–

स्थापना १९५६; शहरातील स्त्रिया, नागरिकांना या केंद्रामार्फत नृत्यकलेचा प्रसार व्हावा या हेतूने केंद्राच्या कार्यास आरंभ. हेमंत शेख केंद्राचे प्रमुख. केंद्रातर्फे गांधर्व महाविद्यालयाच्या नृत्य परीक्षेस विद्यार्थिनी बसतात. या विद्यार्थिनींपैकी अनेक मुली नृत्यकलेतील विशारद परीक्षा उत्तीर्ण झाल्या आहेत. संस्थेस डॉ. [illegible] यांचे विशेष मार्गदर्शन.

नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.

स्थापना २६ जानेवारी १९५५, उद्देश प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतःची मध्यवर्ति बँक असावी या तत्वानुसार स्थापन करण्यात आलेली महाराष्ट्रातील पहिली जिल्हा मध्यवर्ति सहकारी बँक. कर्मवीर भाऊसाहेब हिरे यांच्या नेतृत्वाखाली स्थापना. ग्रामीण विभागाच्या व आदिवासी विभागाच्या विकासासाठी गरजू शेतकऱ्यांना नजिकच्या ठिकाणाहून पैसा व बँकिंगच्या सोयी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने बँकेचे जिल्ह्यातील २५ गावात शाखा चालू. अल्पबचत ठेव योजना मासिक

आवर्तक ठेव योजना. या नवीन योजनांचा अंगिकार करून जिल्ह्यातील जनतेस ठेवी ठेवण्यास बँक प्रवृत्त करू शकली. ग्रामीण पत पुरवठा आणि मध्यम मुदत कर्जे या उपक्रमातही बँकेने नेत्रदीपक प्रगती केली आहे. जिल्ह्याच्या विकासासाठी अनेक मूलभूत संस्था स्थापन करण्यात बँकेचा पुढाकार. प्रि. पुराणिक यांचे बँकेस सुरवातीपासून मार्गदर्शन. १९६३–६४ साली बँकेचे चेअरमन नरहर कारभारी ठाकरे हे आहेत.

स्त्रीवर्गाचा शिवण वर्ग—

स्थापना : १९५६; उद्देश : हल्लीच्या महागाईच्या दिवसात कुटुंबाचा योगक्षेम चालविण्यासाठी कुटुंबातील प्रमुख घटकांनी काही ना काही उत्पन्नाची भर घालावी हा उद्देश. हा वर्ग महात्मा गांधी रस्त्यावर मोडक यांच्या वाड्यात भरतो. सौ. लिलाबाई दळवी व सौ. जान्हवीबाई मोडक वर्गाची देखरेख पाहतात; व वर्गात येणाऱ्या स्त्रियांना शिवणकाम शिकवितात. वर्ग दुपारी ३ ते ६ भरतो. सर्व साधारणतः २० ते २५ स्त्रिया वर्गात शिक्षण घेतात. हा वर्ग स्त्री मंडळातर्फे चालविला जातो.

संगीत कलोपासक मंडळ—

स्थापना आक्टोबर १९६२: संगीत कलेची शक्य त्या मार्गाने आराधना करणे हा उद्देश संस्था स्थापन करण्यामागे आहे. मधुसूदन परशुराम पेडसे यांचा कलोपासक मंडळाची स्थापना करण्यात पुढाकार. संस्थेचे बहुतेक सभासद मध्यमवर्गीय व सरकारी नोकरीत आहेत. सभासद एकत्रित येवून संगीताची आराधना करतात, प्रसिद्ध कलावंतांच्या पुण्यतिथ्या साजऱ्या करतात, उदयोन्मुख कलाकारांना वाव देण्याच्या दृष्टीने कार्यक्रम घडवून आणतात. कार्यक्रमाबद्दल मिळणाऱ्या देणग्यामधून व मासिक वर्गणीतून खर्च चालविण्यात येतो.

प्रागतिक गुजराती युवक मंडळ—

स्थापना : १९४५; समाजाच्या लोकांनी एकत्र येऊन समाजाची व राष्ट्राची शक्य तितकी सेवा करावी, या उद्देशाने संस्थेची स्थापना, मंडळातर्फे पुस्तकालय आणि वाचनालय चालविले जाते. वक्तृत्व, रांगोळी, हस्तलिखित मासिके यांची स्पर्धा घेतली जाते. थोर पुरुषांचे स्मृतिदिन, नाटक, गरबा नृत्य वगैरे कार्यक्रमही साजरे केले जातात. मंडळात समाजातील सर्व थरांचा समावेश. १९६३–६४ च्या कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष डॉ. बाबुभाई मंगलदास जोशी हे आहेत.

जिल्हा एस्. टी. व रेल्वे प्रवासी संघ—

उद्देश : प्रवाशांच्या अडीअडचणी, तक्रारी, सूचना विधायक दृष्टिकोनातून मांडणे. रेल्वे आणि एस्. टी. कडून संघास मान्यता मिळाली आहे. संस्थापक : शरद पुरुषोत्तम बुरकुले अध्यक्ष : माधवराव लिमये.

विद्यार्थी साहाय्यक संघ—

गरीब परंतु ज्यांना सरकारी फी सवलत (१२०० रु. उत्पन्नाची) मिळत नाही अशा हुषार होतकरू विद्यार्थ्यांना फी, पुस्तके अभ्यासास जागा व अभ्यासात विनामूल्य मार्गदर्शन. १९६३–६४ साली ७ जणांना शालेय फी व सुमारे ३०–३२ जणांना मोफत मार्गदर्शन. अध्यक्ष : नितीन एन. जोशी, उपाध्यक्ष : शरद बुरकुले व वामनराव अष्टपुत्रे.

संगीत भारती—

अभिजात शास्त्रीय संगीताचा प्रसार व प्रचार करण्याच्या हेतूने वर्षातून ५–६ कार्यक्रम. गेल्या चार वर्षांपासून हा यशस्वी उपक्रम चालू.

✤ नाशिक नगरपालिका क्रीडा मंडळ–

सन १९५७ मध्ये नासिक नगरपालिका कर्मचाऱ्यांचे क्रीडा मंडळ स्थापन होऊन नगरपालिका कर्मचारी क्रीडा सामन्यामध्ये भाग घेत आहेत व शहरांत होणाऱ्या क्रिकेट, हुतुतु व व्हॉलीबॉलच्या सामन्यामधून भाग घेऊन आजपर्यंत क्रीडा क्षेत्रात बरीच प्रगति केलेली आहे. विशेष उल्लेखनीय म्हणजे येथील गुलालवाडी व्यायाम शाळेतर्फे होणाऱ्या कामगार क्रीडा सामन्यामध्ये सन १९५९ व १९६० साली लागोपाठ दोन वर्षे हुतुतूच्या अंतिम सामन्यात बलाढ्य संघाचा पराभव करून ढाल मिळविली. त्याचप्रमाणे क्रिकेट व व्हॉलीबॉलच्या सामन्यामध्ये सुद्धा बरेच विजय मिळविलेले आहेत. नगरपालिका क्रीडा मंडळाचे संघ नांवाजलेले म्हणून संबोधिले जातात.

ता. १४–१०–१९६३ पासून नगरपालिका क्रीडा मंडळाच्या विद्यमाने वाचनालय विभाग सुरू करण्यात आला आहे. याबाबत नासिक नगरपालिकेने १००० रुपयांचे अनुदान मंजूर केले आहे. त्यामुळे वाचनालयाचे कार्य उत्तरोत्तर प्रगतिपथावर चालेल, असे वाटते.

✤ आयुर्वेद महाविद्यालय–

स्थापना : १९५४. वैद्य बिंदुमाधवशास्त्री पंडित व डॉ. वि. म. गोगटे यांच्या विशेष प्रयत्नाने स्थापना. मॅट्रिकनंतर पाच वर्षांचा एम्. एफ्. ए एम्. हा सरकारमान्य अभ्यासक्रम शिकविला जातो. १०० चे वर विद्यार्थी शिक्षण घेतात. प्रात्यक्षिक शिक्षण. आरोग्यशाळा, प्रसूतिगृह व अल्पार्य दवाखाना येथे मिळते. संस्थेतर्फे औषधी कारखाना चालविला जातो. महाविद्यालयाला मोठे ग्रंथालय व वाचनालय आहे. गणेशवाडी भागात संस्था वाढीची योजना. वैद्य बिंदुमाधवशास्त्री महाविद्यालयाचे पहिले प्राचार्य

✤ श्री. क्षत्रिय आहेर शिंपी समाज मंडळ–

सरकारमान्य संस्था. शहरातील सामाजिक व धार्मिक कार्यात अग्रभागी. श्री. विठ्ठल रखुमाई मंडळाच्या जीर्णोद्धारासाठी चार हजारांचा निधी जमविला. या निधीतून सुसज्ज असे मंगल कार्यालय बांधावयाचा विचार. धार्मिक उत्सवात भजन, कीर्तन, प्रवचन इत्यादि कार्य चालू असते. या कार्याचे श्रेय अध्यक्ष जगन्नाथ रामचंद्र सोनवणे, शिवराम धोंडो खैरनार, प्रभाकर ब्राह्मणकर इत्यादि कार्यकर्त्यांना आहे.

✤ आयुर्वेद सेवा संघ–

स्थापना : १९२४ अहमदनगर. १९४३ साली नासिक येथे स्थापन. आयुर्वेदाचे शिक्षण आणि संशोधन. लोकांना वैद्यकीय सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून हॉस्पिटल, दवाखाने, आरोग्यशाळा वगैरे चालविणे. संस्थेतर्फे औषधीभवन, आयुर्वेद महाविद्यालय, आरोग्य शाळा, स्वास्थ्य विभाग, वैद्यक ग्रंथ भांडार व आयुर्वेद पत्रिका अशा शाखा चालविल्या जातात. औषधी भवनात सुमारे ५०–७५ कार्यकर्ते,– तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली शास्त्रशुद्ध औषधे तयार केली जातात. आरोग्य शाळेत नुकताच नेत्रविभाग चालू झाला आहे. आजार होऊ नये म्हणून स्वास्थ्य विभागांत मार्गदर्शन केले जाते. वैद्यक ग्रंथ भांडारांतून वैद्यक विषयांवरील पुस्तके मिळण्याची सोय आहे. संस्थेतर्फे 'आयुर्वेद पत्रिका' हे वैद्यक विषयांचे मासिक मुखपत्र चालविले जाते.

✤ रिमांड होम–

स्थापना १९ जुलै १९४४ रोजी कॅप्टन नंजाप्पा यांच्या नेतृत्वाखाली स्थापन. निराधार, गुन्हेगार व वाट चुकलेल्या मुलांना प्रवेश मिळतो. दरवर्षी १५० केसेस दाखल. ३०–३५ मुले त्यांच्या भावी आयुष्याच्या दृष्टीने मार्गदर्शन. संस्थेचे २ पेट्रन्स, ३४ लाईफ मेंबर्स व ६७ मेंबर्स आहेत. नासिक रिमांड होमचे चालू वर्षाचे सुपरिंटेंडेंट पद्मनाभ मालपाठक हे आहेत.

शिवण कलाकार औद्योगिक सहकारी मंडळ--

सहकारी क्षेत्रांत पांच वर्षे कार्य. शिवणकाम करणाऱ्या सर्व जातीच्या कामगारांसाठी ही संस्था झटते. चेअरमन मु. दि. गवळी आहेत. कामगारांना मजुरी पुरविणे, त्यांची आर्थिक उन्नती करणे यासाठी संस्था झटते.

श्री विठ्ठल रखुमाई मंदिर पंचमंडळी–

शहरांतील जुनी सार्वजनिक संस्था. सांस्कृतिक व धार्मिक प्रचाराचे कार्य संस्था करते. संस्थेच्या कार्यांत जगन्नाथ सोनवणे, शिवदास खैरनार व मु. दि. गवळी यांचा विशेष भाग.

श्री जलाराम सत्संग मंडळ–

संस्था पंचवटीत धार्मिक कार्यक्रम घडवून समाजांत अध्यात्मिक भावनांचा प्रचार करते. सौराष्ट्रांतील संत जलाराम यांच्या नावाने हे मंडळ स्थापन करण्यात आले आहे. मंडळाचे अध्यक्ष हरीराम डुंगरशी ठक्कर असून मंत्री अंबाशंकर जोशी व हेमराज दावडा आहेत. मंडळ धार्मिक प्रचार करते व व्याख्याने घडविते.

श्री गाडगे महाराज धर्मशाळा–

स्थापना : १९३२ : उद्देश : नासिकमध्ये येणाऱ्या व उतारू प्रवाशाची सोय. अवाढव्य इमारतीस तीन लाख रु. खर्च. दोनशे ते तीनशे खोल्यांची सोय. धर्मशाळा उंच टेकडीवर असल्याने कलात्मक सौंदर्याचा लाभ. नासिक धर्मशाळेत आंधळ्या पांगळ्या व दीन दुबळ्यासाठी अंधपंगू सदावर्त स्थापन. संत गाडगे महाराजांच्या मागे नासिक धर्मशाळेचे सर्व कार्यकर्ते धर्मशाळेचा कारभार श्री. बाबांच्या शिकवणुकीप्रमाणे करतात. धर्मशाळेच्या सुरुवातीच्या ट्रस्टमध्ये श्री. प्रतापशेटजी, छोटूसा लहानसा क्षत्रीय, अच्युतराव गुलाबराव देशमुख व गणपतराम हरिभाऊ गांगण यांचा समावेश. सध्या गुणवंतराव बाजीराव चराटे हे धर्मशाळेचे मॅनेजर आहेत.

नासिक म्युनिसिपल सर्व्हंटस को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी--

स्थापना : २६ जानेवारी १९५७; सन १९६४ साली सभासद संस्था ४२७ असून शेअर्स भांडवल ६८७९० रुपये आहे. सभासदांना त्यांच्या शेअर्सवर ६ टक्केपर्यंत डिव्हिडंट देण्यांत येतो. सभासद संख्या वाढत आहे. चालू वर्षाच्या कार्यकारी मंडळांत पुढील व्यक्ती आहेत. चेअरमन संतू पाटील, व्हा. चेअरमन– सिताराम गोविंद जाधव, खजीनदार– रघुनाथ माधवराव जोंधळे, सभासद– धर्मराज बाबूराव वाघ, सखाराम दामोदर देशमुख, पांडुरंग गणपत भोसले, त्रिलोकचंद बुधानीराव बरेलीकर, विष्णू आबाजी उफाडे, विश्वनाथ फकीरराव कदम, ऑ. सेक्रेटरी गोपीनाथ पुंडलीक चौधरी.

नासिक नाभिक संघ–

नासिक नाभिक संघाची स्थापना कांही वर्षांपूर्वी झाल्यानंतर ह्या संस्थेने विद्यार्थी व वसतिगृह चालविण्याचा उपक्रमच हाती घेतला आहे. त्यावसतिगृहाचे नांव गेनामहाराज विद्यार्थी वसतिगृह आहे. वसतिगृहासाठी मंडळाने स्वतःची इमारत घेतली आहे. मंडळाचे अध्यक्ष श्री. पां. स. चव्हाण असून सेक्रेटरी श्री. शं. भा. जाधव आहेत.

नासिक जिल्हा पत्रकार संघ–

नासिक जिल्ह्यात पत्रव्यवसाय हा बराच जुना आहे. तरीसुद्धा या व्यवसायात कार्य करणाऱ्यांची संघटना स्थापन झालेली नव्हती. जानेवारी ६४ मध्ये त्या दृष्टीने प्रयत्न करण्यात आले व मालेगांव येथे पत्रकार परिषद भरविण्यात आली. या परिषदेत नासिक जिल्हा पत्रकार संघाची रीतसर स्थापना करण्यात आली. संघाचे अध्यक्ष 'जागृती'चे संस्थापक श्री. पं. य. पाटील असून कार्यवाह श्री. गोपाळ वेलणकर व रमेश पटेल हे आहेत. याशिवाय कार्यकारिणीत श्री. न. ग. शिरवाडकर, डी. पी. बगाडे, गं. न. कुलकर्णी पुणतांबेकर वकील, भा. ना. जाधव वकील, कांतीलाल गुजराती, गोविंदराव गोरवाडकर आदींचा समावेश आहे. संघाने पत्रकारांपुढील समस्यांच्या अडचणी सोडविण्याचे काम उत्साहाने हाती घेतले आहे.

लोकनाटच कलापथक–

स्थापना १९५१; समाजातील सर्वसामान्य जनतेची करमणूक व त्याद्वारे लोकशिक्षण व समाजजागृती करून सामान्य लोकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचा हेतु. शाहीर प्रतापसिंग परदेशी व श्री. बी. डी. जाधव यांच्या प्रेरणेने संस्थेची स्थापना. १९५५ मध्ये महाराष्ट्रातील गावोगावी संग्रामगीतांचा कार्यक्रम, व गोवा विमोचनासाठी प्रभावी प्रचार. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत संस्थेतील कार्यकर्त्यांचा उत्साहाने भाग 'मुंबई कुणाची' हा वग विशेष गाजला. पुणे येथील समरशताब्दि मेळावा, दिल्लीत भारतीय लोकनाट्य परिषद वगैरे कार्यक्रमात भाग. १९६१ साली पुणे पूरग्रस्तासाठी जास्तीत जास्त सर्वांगीण मदत. नंतर १९६३ मध्ये लोकरंजन नाट्य शाखेची स्थापना. सामाजिक व ऐतिहासिक नाटके सादर करण्यास आरंभ. कलापथकाचे अध्यक्ष डा. श्रीराम कुळकर्णी.

मधली होळी तरुण मित्र मंडळ


स्थापना १९६२. या मंडळाने सुरवातीला मोफत पेटी वाचनालय सुरु केले. सर्व लोकांना वर्तमानपत्रे वाचावयास मिळावी हा मुख्य उद्देश कारण सर्वच लोक वर्तमानपत्रे विकत घेऊन वाचू शकत नाहीत या गोष्टीचा विचार करून मंडळाने हे पाऊल उचलले. याचा फायदा पुष्कळ नागरीक घेतात. तिवंध्यामध्ये ही पेटी ठेविली जाते कारण हा रस्ता भरघोस रहदारीचा आहे श्री. राजाभाऊ देव, श्री. अरविंद देव, श्री कृष्णा शुक्ल व प्रभाकर देव वगैरे अनेक कार्यकर्ते मंडळाचे कार्य उत्साहाने करतात.

वीर बापुराव गायधनी स्मारक समिती–

वीर बापुराव गायधनी यांचे निधन ११–४–३१ ला झाले. ४ मे १९३१ रोजी नासिकच्या नागरिकांची दुखवट्याची सभा झाली व वीर बलिदानाची चिरंजीव स्मृति कायम रहावी म्हणून गो. ह. देशपांडे, डॉ. खाडीलकर, रघुनाथ हरी गद्रे, श्रीधर उद्धव गायधनी आदि रहिवाशांनी स्मारक समिती स्थापन केली. या स्मारक समितीने प्रामुख्याने दोन कामे तातडीने हाती घेऊन ती पार पाडली. (१) वीर बापुरावाचे स्मारक बांधले व (२) प्रतिवर्षी परजीवित रक्षणार्थ स्वतःला धोका पत्करून धाडसी कार्य करणाऱ्या लोकांची माहिती जमवून त्यांना वीर बापुराव गायधनी पदके व रोख बक्षिसे देण्यास सुरवात केली. डॉ. गायधनी यांनी वीर बापुरावाच्या स्मृति प्रीत्यर्थ लिहिलेले 'परजिवीत रक्षण यज्ञ' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. त्यात बापुरावांचे चरित्र व अनेक महत्वपूर्ण प्रकरणांचा समावेश आहे. डॉ. खाडीलकर डॉ. गायधनी, मणीभाई देसाई, रत्नाकर गुजराथी, मु. रा. औरंगाबादकर, रघुवीर भालेराव आदि सदस्यांचा विशेष भाग

सन्माननीय विद्यमान सभापति व सभाप्रमुख

(दि. ३१।१२।६४ पासून)



श्री. ना. ग. चव्हाण
सभापति आरोग्य समिति



श्री. घि. वि. संघवी
सभापति, स्थायि समिति




श्री. र. अं फळे
सभापति पाणीपुरवठा समिति



श्री द. के. नांगोळी
सभापति सार्वजनिक बांधकाम समिति



श्रीमती गोदुबाई ल. ठाकरे
सभाप्रमुख उद्यान व देवस्थान समिति



श्री. मा. ना. फगनाडे
सभापति अतिक्रमण समिति



श्री. गो. त्रिं. गुम्ताडे
सभापति बीज समिति



श्री. व. दा. भोईर
सभापति अग्निशामक समिति



श्री. शं. ग. तांबट
सभापति अभ्यास समिति

सन्माननीय सभासद



श्री. गोविंद त्रिंबक गुम्बाडे
वार्ड न. १



सौ. ताराबाई भिकाजी जाधव
वार्ड नं. १



श्री. रामचन्द्र शिवराम घनवटे
वार्ड नं. १



श्री. टापजी पालजी मारु
(रिपब्लीकन) वार्ड नं. २



श्री. माधवराव नारायण फरताळे
वार्ड नं. २



डॉ. श्री. दत्तात्रय विनायक देवळालकर
वार्ड नं. २



श्री. रघुनाथ आनंदा जाधव
वार्ड नं. २



श्री. मोरेश्वर प्रल्हाद उपळेकर
वार्ड नं. ३



श्री. शंकरराव गणपतराव तांबट
वार्ड नं. ३




श्री. लक्ष्मण अमृत कुलकर्णी
वार्ड नं. २




श्री. नाना रामचन्द्र चव्हाण
वार्ड नं. ३




सौ. लिलावती पुरुषोत्तम म्हाळस्कर
वार्ड नं. ४




श्री. दत्तात्रय केशव तांबोळी
वार्ड नं. ५



डॉ. श्री. विष्णू महादेव गोगटे
वार्ड नं. ५



श्री. मुरलीधर लक्ष्मण चांदवडकर
वार्ड नं. [illegible]




श्री. प्रभाकर दत्तात्रय टकले
वार्ड नं. ८



श्री. भिमाशंकर केशव तांबोळी
वार्ड नं. ५
म्यु. स्कूलबोर्ड व्हा. चेअरमन
९-१-१९६४ पासून



श्री. रघुनाथ नाना भालेराव
वार्ड नं. ५



श्री. प्रतापसिंग कन्हैयासिंग परदेशी
वार्ड नं. ५



श्रीमति गोदुबाई लक्ष्मण ठाकरे
वार्ड नं. ६




श्री. रघुनाथ शंकर फळे
वार्ड नं. ६



श्री. दामोधर मुरलीधर कमोद
वार्ड नं. ७



श्री. त्रिंबक लक्ष्मण म्हाणे
वार्ड नं. ७



श्री. शिवा गंगाराम काळे
वार्ड नं. ८



श्री. गोविंद दगडु गोडे
(आदिवासी) वार्ड न. ८



श्री. माधव दुर्गाजी क्षिरसागर
वार्ड नं ८



श्री. निवृत्ती त्र्यंबकराव वझरे
वार्ड नं. ८



श्री. दामोधर भिमाजी येलमाने
वार्ड नं. ८



मौ. प्रभादेवी मोतीलाल राय

वार्ड नं. ९



श्री. हिरामण चदरु मोहेकर

वार्ड नं. ९



श्री. शेखमहंमद यामीन चांदसो.

वार्ड नं. ९

म्यु. कु. बोर्ड च्या चेअरमन

७-११-५७ ते १५-११-५८



श्रीमति हरिबाई भागचंदजी अग्रवाल

वार्ड. न. १०



श्री. शंकर धर्मा खोडे
वार्ड नं. १०



श्री. बजुराव दादाजी भोईर
वार्ड नं. १०



डॉ. श्री. लालचंद खुशीराम सिंधी
वार्ड नं. १०
चेअरमन म्यु. स्कूलबोर्ड
९-१-१९६४ पासून



श्री. मुरलीधर कुशाबा गायके
वार्ड नं. १०



श्री. वासुदेव लक्ष्मण जानोरकर
वार्ड नं. ११



श्री. दुर्गाप्रसाद रामचंद्र पांडे
वार्ड नं. ११



श्री. धिरुभाई व्हीकमचंद संघवी
वार्ड नं. ११
न्यु स्कूलबोर्ड चे चेअरमन
२५-११-६१ ते ८-१-१९६४

अमरधाम कमेटी



श्री. मोतीलाल गोकुळशेट राय



श्री. बाबूराव सखाराम सोनवणे



श्री. रामचंद्र गणपत पोरजे

सन्माननीय अधिकारी



श्री. एम. एन्. ऐनापुरे बी. ए. (ऑनर्स)
चीफऑफिसर



श्री. डी. अ. थत्ते
हेल्थऑफिसर



श्री. एम्. व्ही. इट्टी
ओव्हरसीअर



श्री. पी. जी. मुळे
इंजिनिअर

म्युनसिपल स्कूलबोर्ड




श्री. ज. गो. सुंठवाल
चेअरमन ७-३-४० ते २७-४-१९४९



श्री. वा. गं. यार्दी
चेअरमन २८-४-४९ ते १८-९-५२



श्री. ल. ह. सावंत
चेअरमन १०-४-५२ ते ४-११-५७
व्हा. चेअर. २८-४-४९ ते १८-९-५२



श्री. वा. गो. कुलकर्णी
चेअरमन १५-२-१९५९ ते १८-१-६०



श्री. पंडित गोविंद नागरे
चेअरमन ७-२-६० ते २४-११-६१



श्री. वासुदेव विष्णू पाराशरे
व्हा. चेअरमन ५-५-३१ ते २१-३-३७



ज. ना. ढाकीफळे. व्हा. चेअरमन
२३-३-४८ ते २७-४-४९.



श्री. दत्तात्रय बाळकृष्ण टकले
व्हाईस चेअरमन ५-३-४६ ते २१-३-४८



श्री. बा. गो. जाधव
व्हा. चेअरमन

सन्मानीय विद्यमान सदस्य

चरित्रात्मक टिपणे

नासिक नगरपालिका

चरित्रात्मक टिपणे

विद्यमान सदस्य

श्री. निवृत्ती त्र्यंबकराव वझरे,

अध्यक्ष, नासिक नगरपालिका

जन्म सन १९२०. ६ जुलै १९६४ रोजीं नासिक नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.

नासिक पाणी पुरवठ्याचा प्रश्न समाधानकारकरीत्या सुटावा आणि पाणी शुद्धीकरण योजना लवकर पूर्ण व्हावी व नागरिकांची मोठी गैरसोय दूर करावी या दृष्टिकोनांतून प्रयत्न चालू केले. त्यांना सामाजिक कार्याची मनापासून आवड आहे.

जुने निष्ठावंत काँग्रेस कार्यकर्ते. सन १९४२ पासून १९६० पर्यंत वॉर्ड नं. ८ मधील मंडळ काँग्रेसचे अध्यक्षस्थान भूषविले.

सन १९४५ सालापासून आजपर्यंत नासिक नगरपालिकेचे सभासद म्हणून निवडून येत आहेत. नासिक नगरपालिकेत अनेक महत्त्वाची अधिकार-पदें मोठ्या सचोटीने भूषविली आहेत. सन १९५२ मध्यें सार्वजनिक बांधकाम समितीचे सभापती, सन १९५४ मध्ये आरोग्य समितीचे सभापती, सन १९६० मध्ये स्थायी समितीचे सभापती व दि. ६ जुलै १९६४ पासून नासिक नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून निवड झाली.

सौजन्यपूर्ण स्वभाव, निष्ठेने काम करण्याची तळमळ, सर्व सहकार्यांना विश्वासांत व बरोबर घेऊन प्रश्न सोडविण्याची हातोटी, नागरिकांच्या तक्रारी सहानुभूतीनें ऐकून घेऊन त्या बाबत त्वरीत उपाययोजना करण्याची वृत्ती, इत्यादि गुणांमुळे ते आपल्या सहकाऱ्यांमध्ये व जनतेमध्ये अत्यंत प्रिय आहेत.

श्री. हरिश्चंद्र तात्याबा शेलार

जन्म सन १९३१ शिक्षण इंटर आर्टस् पर्यंत १९५७ सालापासून नाशिक नगरपालिकेचे सभासद. सन १९६३-६४ मध्यें नासिक नगरपालिकेचे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. निवडून आल्यानंतर नासिकच्या पाणीपुरवठ्याच्या व पाणी शुद्धीकरण योजनांच्या प्रश्नाकडे त्यांनी लक्ष केंद्रित केले व या योजना कार्यवाहीत आणण्यासाठी कसोशीनें प्रयत्न करून या योजनेंतील पाणीपुरवठ्याचे पाईप्स टाकणें व तीन लाख गॅलन धारणाशक्ती असलेली टाकी बांधणें या दोन्ही कामास जोरात चालना दिली आहे. तसेच सुमारे ३७ लाख रुपये खर्चाची पाणी शुद्धीकरण योजना सरकारकडून मंजूर झाली असून या बाबतचे कर्जाचे मंजुरीसाठी प्रकरण सरकारकडे पाठविले आहे. त्याही योजनांची लवकरच सुरवात होईल. शहरातील कालिका मंदिरासमोर अद्यावत बगीचा. कै. गोविंदराव देशपांडे पथास समांतर असा ६० फुटी रुंदीचा टिळकपथ, नगरपालिका इमारतीत जादा बांधकाम करून म्यु. पल सभासदांसाठी वाचनालयाची सोय, नगरपालिकेचे बोधचिन्ह वगैरे अनेक सार्वजनिक सुखसोईची कामे त्यांनी अत्यंत उत्साहाने व सर्व सभासदांच्या सहकार्यानें पूर्ण केली. कालिका बागेत स्वामी रामकृष्ण परमहंस व स्वामी विवेकानंद यांचे पूर्णाकृती पुतळे बसविण्यात आले. तसेच संत गाडगेमहाराज व बाबासाहेब आंबेडकर यांचे पुतळे शहरात बसविले गेले. कालिका मंदिर ते सर्कल सिनेमापर्यंतच्या आग्रारोडवर ट्यूबलाईटच्या योजनेमुळे त्या रस्त्याची शोभा वाढली असून नागरिकांची चांगली सोय झाली आहे. मेनरोडवरील वाहनांच्या गर्दीमुळे नागरिकांस फारच त्रास होत होता, म्हणून एकमार्गी वहातुक सुरू करण्यात आली. तसेच नगरपलिकेचा भोंगा दुकानदारांना शॉप ॲक्टच्या दृष्टीने सोयीचे व्हावे म्हणून रात्री ८-३० वाजता वाजविण्याची सोय करण्यात आली. शहरात आलेल्या कॉलरा साथीचा प्रतिबंध नगरपालिकेने व्यवस्थित व निकराने आणि कुशलतेने केला, या बद्दल सरकारी आरोग्य खात्याने नगरपालिकेचे अभिनंदन केले आहे. अंतर्गत टेलिफोन पद्धती नगरपालिकेने सुरू केली व त्यामुळे कामकाजाचा उरक वाढला. श्री शेलार शांत, सरळ स्वभावाचे व उत्साही नगराध्यक्ष नासिक शहराला लाभले व शहराचा कायापालट झाला. सर्वांशी मिळून मिसळून वागण्याचा स्वभाव व समोरच्या व्यक्तीच्या मताबद्दल आदर या गुणांमुळे नागरिकांच्या मनात तरुण वयातच त्यांनी आदराचे स्थान मिळविले आहे.

श्री. गणपत पुंडलिक काठे

जन्म सन २१ मार्च १९३४. शिक्षण इंटर पर्यंत शेती, बहुजन समाजातील एक आघाडीचे कार्यकर्ते. १९४२ पासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंध. जनसंघाच्या स्थापनेपासून जनसंघाचे नासिक जिल्ह्यातील एक प्रमुख आधारस्तंभ. जुन्या नाशिक विभागातील सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यात शालेय जीवनापासून भाग घेतलेला आहे. १९५७ मध्ये जनसंघाच्या तिकीटावर नगरपालिकेत पहिल्याने प्रथमच निवडून आले. १९६१ मध्येही पुन्हा जनसंघाच्या तिकीटावर नाशिक नगरपालिकेत निवडून आले. १९५८-५९ मध्ये सार्वजनिक बांधकाम खात्याचे सभापति म्हणून निवड. १९५९-६० मध्ये अमरधाम समितीचे सभापति. १९६३-६४ चे उपाध्यक्ष. एक सुशिक्षित व मनमिळावू, उत्साही निगर्वी कार्यकर्ते म्हणून परिचित. प्रगतीशील शेतकरी.

सौ. ताराबाई भिकाजी जाधव

जन्म सन १९२० [illegible] १९४५–४६ पासून सुरुवात [illegible] पासून सभासद म्हणून निवड व तेव्हापासून [illegible] कार्य करीत आहेत. [illegible] महिला [illegible] अनेक [illegible] आहेत [illegible] संघटनेचे [illegible] जाधव सभासद [illegible] सरकारच्या [illegible] समिती [illegible] असून [illegible] नाशिकमध्ये महाराष्ट्राच्या महिला मंडळाच्या संस्थापक आहेत

श्री. गो. त्र्यं. गुंबाडे

जन्म [illegible] काम पाहिले [illegible] सभासद [illegible] महळाचे नाशिक [illegible] स्वभाव [illegible]

श्री. गुलाबशेठ नवरोजी पटेल

[illegible]

[illegible]

श्री. रामचंद्र शिवराम वनवटे

[illegible] कार्यकर्ते [illegible] सभापती [illegible] उत्कृष्ट [illegible]

दाखविलेली चमक. व्यायाम शौकीन, शरणपूर विभागांतील सार्वजनिक कार्यकर्ते. नागरिकांच्या अडीअडचणी आत्मीयतेने निवारण्याचा प्रयत्न करतात.

श्री. टाभजीभाअी पालजीभाअी मारु

जन्म १९०८ साली झाला. शिक्षण गुजराथी ६ वी. रिपब्लिक पार्टीचे प्रमुख कार्यकर्ते. सतत १२ वर्षे नगरपालिका सदस्य. अतिक्रमण कमिटी व नगरपालिकेचे इतर निरनिराळ्या जबाबदारीच्या जागेवर काम केले. कामगारांचे प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीने अतिशय मोलाची कामगिरी केली आहे. मेघवाळ समाजामधील अनेक दृष्टींनी सुधारणांचा महत्वाचा हिस्सा श्री. टाभजीभाअी यांजकडे जातो. अस्पृश्यांना धार्मिक मंदिरे खुली केली जावीत म्हणून काळाराम मंदीर व रामकुंड सत्याग्रहातील आघाडीचे कार्यकर्ते. निरलस, निस्पृह व अबोल स्वभावाचे. कमी बोलून जास्तीत जास्त कार्य करणारे. त्यांना त्यांच्या समाजात व नासिक शहरात मान आहे.

श्री. यादवराव गणपतराव वाघ

१९४२ साली नगरपालिकेच्या निवडणूक आखाड्यात उतरून आजतागायत प्रत्येक निवडणुकीत ते पहिल्या क्रमांकाने निवडून येतात. १९४५ साली सॅनिटरी कमिटीचे चेअरमन. १९४७ साली स्टँडिंग कमिटीचे चेअरमन व १९५४–५५ सालासाठी नगराध्यक्ष म्हणून कामगिरी. त्यांच्या कारकीर्दीत श्री रामसेतु पूल, श्री गाडगे महाराज पूल, प्रसूतिगृह, आंबेडकर कॉलनीत सफाई कामगारांसाठी वसतीगृह, रविवार पेठेत आयुर्वेदिक दवाखाना, २-२॥ मैल लांबीचे सिमेंटचे रस्ते, एच. पी. टी कॉलेजसाठी पाण्याची व लाईटची सोय, मॅटर्निटी होमसाठी खास लेडी डॉक्टरची सोय, कुष्टधामासाठी जागा, रविवार पेठेत मार्केटसाठी जागा, मर्क्युरी लाईटस् व पाण्याचे स्टँडपोस्ट यांची विशेष सोय झाली. तत्वनिष्ठा, पक्षनिष्ठा आणि कायद्याची चाकोरी सांभाळून कोणालाही हवी-तेवढी मदत हल्ली नगरपालिकेत असलेल्या नगरपालिका सदस्यात सर्वांत जुने व अनुभवी सभासद.

श्री. माधवराव नारायण फरताळे

जन्म : १९०९ : शिक्षण: ख्रिश्चन मिशनरी संस्थेच्या शाळेत अियत्ता ५ वी पर्यन्त. दांडेकर तालीम संघाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद, शिवाजी मंडळाचे संस्थापक. अशोकस्तंभ निर्मितीत प्रमुख कार्यकर्ते. शहरांतील सार्वजनिक कार्यात आघाडीवर असतात. लहानपणापासून कुस्त्यांची आवड. वयाच्या १२ ते २० वर्षापर्यंत मैदाने गाजविली. हातास जखम झाल्याने पहिलवानी पेशा सोडला. आठ वर्षापासून नगरपालिका सभासद, आरोग्य समितीचे सभासद म्हणूनही यापूर्वी काम केले आहे.

श्री. रघुनाथ आनंदा जाधव

वार्ड नं. २ मधून कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून निवडून आले. हे लोकप्रिय सभासदांपैकी एक असून मागील तीन वर्षांपासून नगरपालिका कॉंग्रेस पक्षाचे चिटणीस आहेत. अखिल महाराष्ट्रीय धनगर परिषदेचे ते प्रमुख आधारस्तंभ असून अनेक सार्वजनिक, सामाजिक राजकीय व शैक्षणिक संस्थेत त्यांनी उत्कृष्ट काम केले आहे. सहकारी चळवळीतील त्यांचा अनुभव मोठा आहे. नगरपालिकेच्या कामकाजात ते तन्मयतेने भाग घेतात. ते सन १९६२-६३ साली आरोग्य समितीचे सभापति होते. सार्वजनिक वाचनालय, नासिक जिल्हा कुष्टरोग निवारण समिति, सिव्हिल हॉस्पिटल सल्लागार समिती वगैरे संस्थात ते काम करतात. सुविचारी व गोड स्वभावामुळे 'रघुनाना' सर्वांना हवेसे वाटतात.

डॉ. दत्तात्रय विनायक देवळालकर

(एल्. सी. पी. एस्. स्कीन स्पेशालिस्ट)

जन्म १३ मे १९०५ (नासिक). सन १९२३ मध्ये मॅट्रिक. सन. १९२९ साली एल्. सी. पी. एस्. उत्तीर्ण. नासिक शहरांतील त्वचारोगाचे स्पेशालिस्ट डॉक्टर. सन १९३३ नगरपालिका निवडणुकीत प्रथम उभे राहिले व आजतागायत–१९६४ अखेर निवडून येतात. कमिटिचे सॅनिटरी चेअरमन. गार्डन, डिस्पेन्सरी, वीज कमिटी, या समित्यावरही सभापती म्हणून त्यांनी काम पाहिले. नगरपालिकेच्या सर्व कमिट्यांचे सभासद. संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नावर राजीनामा देवून पुन्हा प्रचंड बहुमताने निवडून आले. नासिकच्या सार्वजनिक वाचनालयात सतत १२ वर्षापासून निवडून येतात. अध्यक्ष, सेक्रेटरी आदि जबाबदारीच्या जागावर काम केले. भोसला मिलिटरी स्कूल गव्हर्निंग कौन्सील तसेच सिधी भांडेकर हायस्कूलचे चेअरमन. कॉंग्रेसचे निष्ठावन्त कार्यकर्ते व सभासद. मनमिळावू स्वभाव, स्पष्टवक्ता, म्हणून आपल्या सहकाऱ्यात, व शहरातील नागरिकांमध्ये डॉक्टरांबद्दल आदर आहे.

श्री. मोरेश्वर प्रल्हाद उपळेकर

जन्म २७ फेब्रुवारी १९२३. शिक्षण मॅट्रिकपर्यन्त. दांडेकर तालीम संघ या संस्थेच्या कार्यकारी मंडळावर काम. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत प्रभावी प्रचाराने जनतेत जाणीव निर्माण केली. शहरांतील कुठल्याहि सार्वजनिक हिताच्या कार्यावर आघाडीत राहाणे हे त्याचे वैशिष्टय. गेल्या चार वर्षापासून नगरपालिकेत विरोधी पक्षांतील सभासदात एक अग्रगण्य सभासद. नासिक शहरात खाद्यपेय विक्रेता संघ स्थापन करून त्याच्या प्रश्नास वाचा फोडली. खाद्यपेय विक्रेता संघाचे पहिले अध्यक्ष म्हणून त्यांचीच निवड झाली होती.

श्री. शंकर गणपत तांबट

जन्म १९२० शिक्षण मराठी ३ री पर्यन्त. लहानपणापासून कुस्त्यांची आवड. दांडेकर तालीम संघाच्या स्थापनेत प्रमुख. तालीम संघाचे अध्यक्ष म्हणूनही जबाबदारी सांभाळली. नासिक शहरातील सार्वजनिक कार्यात मुक्तपणे भाग. गेल्या चार वर्षापासून नगरपालिका सभासद. व्यायाम क्षेत्रात अनुभवी कार्यकर्ते म्हणून सगळ्याची काम. दांडेकर तालमीचे वस्ताद म्हणून परिचित आहेत. होतकरु पहिलवान तयार करीत आहेत. नगरपालिका अधिकारारुढ पक्षांतील प्रमुख सदस्य.

श्री. लक्ष्मण अमृत कुलकर्णी (उर्फ लखुमामा)

जन्म १९३२ शिक्षण मॅट्रिक. १९४३ पासून राष्ट्रसेवादलाचे कार्य. प्रजासमाजवादी पक्षाचे कार्यकर्ते, दि नासिक पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँकेचे माजी व्हा. चेअरमन. रिमांड होम, आफ्टर केअर सोसायटीचे सभासद. साने गुरुजी आदिवासी विद्यार्थी वसतीगृहाचे सभासद. नासिक नगरपालिकेचे विद्यमान सभासद. मनमिळावू, कार्यतत्पर आणि सेवाभावी तरुण नगरपिता व कार्यकर्ता म्हणून शहरात लौकिक.

श्री. नाना रामचंद्र चव्हाण

शिक्षण मराठी ४ थी पर्यंत. हमाली करुन उदरनिर्वाह करीत असता आपल्या मनमिळावू स्वभावाने सर्वांची मने आपलीशी करून १९५७ साली ते निवडून आले. ते आजपर्यन्त नगरपालिकेचे सदस्य आहेत. गेल्या आठ वर्षाच्या कारकीर्दीत नगरपालिकेच्या कार्यात सक्रीय भाग घेतला. एक वर्ष बांधकाम समितीचे सभापती म्हणूनही काम केले. उत्कृष्ट पहिलवान असून त्यांनी अनेक कुस्त्या केल्या आहेत. आजही होतकरु पहिलवान तयार करीत आहेत.

सौ. लिलावती पु. रहाळकर

जन्म १४ मे १९१७. शिक्षण प्राथमिक. पुण्यात ६ वर्षे जनसंघाच्या सेविका म्हणून कार्य केले. पुणे येथ १५ वर्षे राष्ट्रसेविका, त्यानंतर नासिक जनसंघ महिला आघाडीचा आरंभ करून ४ वर्षे महिला आघाडी प्रमुख म्हणून काम केले. गेल्या वर्षापासून नासिक जिल्ह्याच्या महिला आघाडी-प्रमुख म्हणून नासिक जिल्ह्यात काम करीत आहेत. गेल्या वर्षी नासिकच्या सर्व पक्षीय भारत संरक्षण साहाय्यक महिला समितीच्या उपाध्यक्ष या नात्याने नासिक शहरातील पक्षनिरपेक्ष अशा सार्वजनिक कार्यात भाग. मूक विद्यालय नासिक या संस्थेच्या कार्यकारी मंडळातील एक सदस्य. त्याचप्रमाणे भारतीय जनसंघाच्या सेविका म्हणून व जेव्हा शक्य असेल तेव्हा सर्वपक्षीय सार्वजनिक कार्यात पक्षनिरपेक्ष असे कार्य. नासिक नगरपालिकेच्या वार्ड नं. ४ च्या पोट निवडणुकीत बहुमताने निवडून आल्या. उत्तम प्रकारे कीर्तनहि करीत असतात.

श्री. विष्णू महादेव गोगटे

जन्म मलवाड (ता. जव्हार–ठाणे) ता. १ एप्रिल १९१०; शिक्षण : १९३० मध्ये आयुर्वेद-तीर्थ परीक्षा प्रथम वर्गात पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण. शिरोडा सत्याग्रह, स्वातंत्र्य चळवळ व १९४२ च्या मोहिमेत सक्रीय भाग तुरुंगवास व स्थानबद्धतेच्या शिक्षा. १९३१ ते १९४३ पर्यन्त अहमदनगर आयुर्वेद महाविद्यालयात प्राध्यापक. या कालात विविध जबाबदाऱ्या व कामगिऱ्या. आयुर्वेदिक हॉस्पिटलचे चीफ मेडिकल ऑफिसर म्हणूनही कामगिरी. सध्या नासिक येथे वास्तव्य. १९४३ पासुन आयुर्वेद सेवासंघाचे तहाहयात सभासद सार्वजनिक वाचनालयाचे उपाध्यक्ष, १९५२ पासून म्यु. कौन्सिलर, महाराष्ट्र सामाजिक परिषदेच्या कार्यकारी मंडळाचे सभासद. नासिक जिल्हा कुष्टरोग निवारण मंडळ, महाराष्ट्र प्रांतिक वैद्यमंडळ, वसंत व्याख्यानमाला. बहिःशाल शिक्षण केंद्र, कम्युनिटी सर्व्हिस, कमिटी रोटरी क्लब, रिमांड होम, नवजीवन मंडळ, कलानिकेतन अित्यादि अनेक संस्थावर जबाबदारीची कामे. व्यायाम विषयक अनेक संस्थावर वरिष्ठ पदाधिकारी. आयुर्वेद पत्रिका, गांवकरी व अन्य नियतकालिकांत मार्गदर्शक व वैचारिक लेखन. गोवा सत्याग्रहत सीमेवरील वैद्यकीय व्यवस्था भागाचे प्रमुख. बंगाल मधील साथीत वैद्यकीय मदत. आयुर्वेद सेवा संघ या संस्थेचे विद्यमान अध्यक्ष. नासिक आयुर्वेद महाविद्यालयाचे सल्लागार. टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे परीक्षक. डॉ. गोगटे म्हणून सर्व नासिकचे आवडते. सर्व कुटुंब वैद्यकीय व्यवसायात.

श्री. प्रभाकर दत्तात्रय टकले

जन्म २०–८–१९३२, शिक्षण इंटर आर्टस्, सेवादल १९४०, कलापथक १९४४, प्रजा-समाजवादी पक्षाचे कार्य १९४९, लोकहितवादी मंडळ १९५६, रेडक्रॉस सोसायटी, गजानन मंडळ, सार्वजनिक वाचनालय. ८ वर्षापासून त्या त्या संस्थांच्या ध्येयाप्रमाणे सेवेचे अगर सांस्कृतिक, राजकीय सार्वजनिक कार्य. धान्यभाव वाढीविरुद्ध सत्याग्रह १९५२. दीड महिना कारावास. संयुक्त महाराष्ट्र सत्याग्रह, प्रतापगड मोर्चा, दिल्ली मोर्चा यातून प्रत्यक्ष भाग. पानशेत धरण फुटीमुळे निर्माण झालेल्या संकटाला सहाय्य गोळा करणे, १९५८ मध्ये झालेल्या फ्लूच्या साथीचा प्रतिकार यामध्ये प्रत्यक्ष भाग घेतला. १९५७ मध्ये नगरपालिकेत निवड. १९५८–५९ मध्ये नगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती. या काळात कर्मचाऱ्यांना प्रमोशनची संधी देणे, टेंपररी फार काळ न ठेवता कायम करणे, योग्य पगारवाढ देणे, त्याचप्रमाणे घरपट्टीबाबत घरमालकांच्या अडीअडचणी जागेवर जावून तपासल्या, ऐकल्या. त्यातून योग्य ते निर्णय घेण्यात आले. जकात कराबद्दल काम-

गार व व्यापारी यांना प्रत्यक्ष भेटून त्यांना नगरपालिकेला निर्मळ सहाय्य करण्याची विनंति केली. याचाच परिणाम जकात वसुली वाढण्यात झाला. गढूळ पाण्याचा प्रश्न मंत्र्यापर्यंत प्रत्यक्ष पोचविला. आग प्रतिबंधक साधने जास्त घेण्याचा आग्रह धरला. जनतेपर्यंत नगरपालिकेचे कामकाज पोचावे यासाठी निरनिराळे ठराव आणून त्यादृष्टीने प्रयत्न केले, नव्या प्रथा निर्माण केल्या, मोफत प्राथमिक शिक्षणाचा आग्रह धरला, कामगारांना विमा उतरविण्याची व्यवस्था पगारातून केली, पेन्शन योजनेस मंजुरी आणली.

श्री. दत्तात्रय केशव तांबोळी

जन्म १५-१२-१९२९. नासिक येथील सुविद्य व मोठ्या मतदाराच्या वार्डातून केवळ लोकप्रियतेमुळे सतत दोनदा निवडून आलेले उत्साही कार्यकर्ते. सामाजिक कार्यात आघाडीवर असणारे म्हणून त्यांचा निर्देश केला जातो. नासिक येथील पिढीजात व घरंदाज व्यापारी घराण्यात जन्म. १९४२ च्या स्वातंत्र्याच्या लढ्यात शाळा सोडली. बिहारचा भूकंप, सुरतेचा जलप्रलय, पानशेतची दुर्दैवी आपत्ति यामुळे गांजलेल्यासाठी त्यांनी मदतीचा हात नेहमीच पुढे ठेवलेला होता. हल्लीही सार्वजनिक कामी नेहमी आघाडीवर असतात. व्यापार, लोकसेवा व देशसेवा अशा लोकप्रियतेच्या विविध क्षेत्रात संचार. आता नासिक नगरपालिकेच्या अतिक्रमण कमेटीचे अध्यक्षपद भूषवीत आहेत.

श्री. मुरलीधर लक्ष्मण चांदवडकर

जन्म ४-२-१९३१, शिक्षण इंग्रजी ४ थी. सामाजिक कार्यकर्ते. मनमिळाऊ स्वभाव. वार्ड नं. ४ मधील म्यु.पल प्रतिनिधी. वार्ड नं. ४ चा पाणी पुरवठ्याचा बिकट प्रश्न सोडविण्यासाठी विशेष आस्थेने प्रयत्न. सन १९६१ मधील निवडणुकीत यशस्वीरित्या निवडून आले. सदर वार्ड नं. ४ ची निवडणूक रद्द झाल्यावर फेर अिलेक्शनमध्ये प्रचंड मताने पुन्हा निवडून आले. शहरातील कापड विक्रेत्यांपैकी प्रमुख व्यापारी. नगरपालिकेतर्फे सरकारी दवाखान्यावर म्यु पल प्रतिनिधी म्हणून व सार्वजनिक वाचनालयाच्या पुराणवस्तु विभागाकडे म्यु. पल प्रतिनिधी म्हणून नियुक्ती.

श्री. रघुवीर नाना भालेराव

जन्म सन १९३४. शिक्षण मॅट्रीक पर्यन्त. रा. स्व. संघाचे स्वयंसेवक. जनसंघाचे प्रमुख कार्यकर्ते. गुलालवाडी व्यायाम शाळा, अवधूत नाट्य मंडळ, ओकाची तालीम, रामाप्रसाद मुखर्जी मंडळ, नेहरू मंडळ, अित्यादि मंडळाचे पदाधिकारी म्हणून काम करीत आहेत. १९४९ साली संघबंदी उठविण्यासाठी सत्याग्रह १९५७ साली पोट निवडणूक म्हणून (वार्ड नं. ८) प्रथम नगरपालिकेत निवडून आले. १९६१ साली जनसंघाच्या तिकीटावर वार्ड नं. ५ मधून पहिल्या क्रमांकाने नगरपालिकेत निवडून आले. नगरपालिकेच्या विरोधी पक्षाचे सभासद म्हणून जनसेवा करीत आहेत. सार्वजनिक सेवेची व जनतेच्या तक्रारीची दाद लावून देण्याची तळमळ व प्रयत्न.

डॉ. यशवंत सखाराम शुक्ल (एम्. बी. बी. एस्.)

यांचा जन्म सन १९११ या साली नासिक येथे झाला. सन १९३७ मध्ये ते एम. बी. बी. एस. ची परीक्षा उत्तीर्ण झाले व थोड्याच वर्षांत कुशल नेत्ररोग तज्ञ म्हणून त्यांनी लौकिक मिळविला. त्यांना बलोपासनेची लहानपणापासूनच आवड असून शरीरसौष्ठव व मसल कंट्रोल यामध्ये त्यांनी पारितोषिके मिळविली आहेत. सामाजिक कार्याबद्दल स्वभावताच आवड असल्याने नासिक शहर

बालवीर संघटना, गुलालवाडी व्यायामशाळा, मेडिकल असोसिअेशन, रामकृष्ण हरि सेवा संघ, अित्यादी संस्थांचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. नासिक जिल्हा कुष्टरोग निवारण मंडळाचे सन १९४८ पासून कार्यवाह व मुंबई राज्य कुष्ट सल्लागार समितीचे सभासद. होमगार्ड संस्थेचे सेकंड इन कमांडर, सन १९५२ पासून नासिक नगरपालिकेचे सभासद. सन १९५६–५७ मध्ये नगराध्यक्षपद भूषविले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारच्या बोर्ड ऑन सॅनिटेशन अॅन्ड वॉटर सप्लाय (पूर्वीचे बोर्ड ऑफ हेल्थ) या समितीवर त्यांनी भरीव व बहुमोलाची कामगिरी केली असून नासिक नगरपालिका पाणी पुरवठा, पाणी शुद्धीकरण व ड्रेनेज या योजनाला जोराची चालना दिली.

सुस्वभाव व सौजन्य या दोन गुणामुळे त्यांना सौजन्यमूर्ती म्हणूनच ओळखतात.

श्री. भिमाशंकर केशव तांबोळी

जन्म ३०–१०–१९२७. शिक्षण अिंग्रजी पाचवी. व्यवसाय व्यापार, शेती. वार्ड नं. ५ मधून निवडून आलेले म्यु. पल सदस्य. सार्वजनिक कार्याचा वारसा त्याचे पिताजी. लालजी ऊर्फ केशवशेठ तांबोळी यांच्यापासून मिळाला. शहरात गणेशोत्सव भव्य प्रमाणात सादर करणाऱ्या बाल मित्र समाज या संस्थेचे प्रमुख कार्यवाह. ओकाची तालीम या संस्थेचे सदस्य. सार्वजनिक कामाचा व्याप सांभाळून शेतीमधून उत्तम पिके काढून शेती उत्तरोत्तर हातभार लावणारे नासिक तालुक्यातील एक आदर्श शेतकरी. वार्ड नं. ५ मधील पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी नेटाने प्रयत्न केले. त्याचबरोबर अनेक सार्वजनिक सुधारणा, नासिक स्कूलबोर्डाचे उपसभापती, शांत व प्रेमळ स्वभाव त्याचबरोबर स्पष्टवक्तेपणा व हरजबाबी स्वभाव म्हणून आपल्या सहकाऱ्यात व शहरात लोकप्रिय. पानशेत धरण फुटलेल्या काळात आपदग्रस्तांना शहरांतून मदत पाठविण्याच्या कामी अविश्रांत श्रम घेवून जबाबदारीने कार्य केले.

श्री. प्रतापसिंग कन्हैयासिंग परदेशी

जन्म २६ ऑगस्ट १९३१. लहानपणापासून गाण्याची आवड. लोकजागृति व लोकशिक्षण करण्याच्या तळमळीने १९५१ साली लोकनाट्य कलापथकाची स्थापना. श्री. प्रतापसिंग यांचे कलापथक महाराष्ट्रातील सामाजिक जीवनाशी एकरूप झाले आहे. १९५५ साली महाराष्ट्रांत गोवा आंदोलनाची लाट उसळली त्यात हिरीरीने भाग. संयुक्त महाराष्ट्राचा प्रभावी प्रचार. दिल्ली येथे भरलेल्या लोकनाट्य परिषदेत भाग. चिनी आक्रमणानंतर शाहिरी कावनाच्याद्वारा लोकजागृतीचा अखंड प्रयत्न. १९६१ सालच्या म्युनिसीपल निवडणुकीत कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य म्हणून विजयी. १९६१ नंतर कोकणांतील वादळग्रस्तासाठी व पुण्याच्या पूरग्रस्तांसाठी निधी जमविण्याचे कार्य. नगरपालिकेत विरोधी पक्षाचे सभासद.

लोकरंजन कलाकेंद्र, लोकनाट्य कलापथक, दिनानाथ स्मृतीमंडळ, वसंत व्याख्यानमाला आदि शहरांतील सामाजिक संस्थाचे कार्य.

श्रीमती गोदुबाओी लक्ष्मणराव ठाकरे

जन्म-सन १९१४. वार्ड नंबर ६ च्या स्त्री राखीव जागेवर प्रचंड बहुमताने निवडून आल्या. सुप्रसिद्ध पहिलवान, हाडवैद्य व सिनेनट कै. लक्ष्मणराव ठाकरे यांच्या पत्नी. त्यांनी सार्वजनिक कार्याचा वारसा आपल्या पतिनिधनानंतर सांभाळला. धार्मिक श्रद्धा असल्याने शहरांतील अनेक कीर्तन संस्था भगिनी मंडळांशी संबंध. शांत. प्रेमळ सात्विक स्वभाव त्यामुळे शहरांत त्यांच्याबद्दल विशेष आदर आहे.

श्री. शांताराम कोंडाजी बावरे

कॉंग्रेसचे सुमारे २० वर्षापासून सभासद व निरलस कार्यकर्ते. अनेक वर्षापासून नाशिक नगरपालिकेचे व म्युनिसिपल स्कूलबोर्डाचे सभासद, सन १९६१–६२ म्युनिसिपल स्कूलबोर्डाचे चेअरमन. सन १९५५–५६ मध्ये स्टँडिंग कमिटीचे चेअरमन. १९६२–६३ मध्ये नगरपालिकेचे अध्यक्ष अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत नाशिक जिल्ह्यांतील नगरपालिकांची परिषद घेऊन त्यामध्ये नगरपालिकांच्या अडीअडचणींचा विचार करण्यात आला. राज्यसरकारपुढे त्यांची योग्यरीत्या मांडणी करण्यांत आली व त्याबाबत आश्वासने मिळविण्यांत आली. पाणीपुरवठा सुधारणा योजना, पाणी शुद्धिकरण योजना, ड्रेनेज, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, नगरपालिकेचे उत्पन्न वाढविणे वगैरे सुधारणाकडे अध्यक्षीय कारकीर्दीत प्रामुख्याने लक्ष दिले. नगरपालिकेच्या दवाखान्यासाठी एक्सरे मशीन घेऊन माफक दरात नागरिकांना एक्सरे फोटो काढून देण्याची सोय केली. चिनी आक्रमणामुळे निर्माण झालेल्या आणीबाणीच्या परिस्थितीत शहरातर्फे संरक्षण निधी जमविण्यात पुढाकार. धडाडीचे, कर्तबगार व मनमिळवू कार्यकर्ते. दिलेल्या शब्दास जागणारे अशी ख्याति.

श्री. रघुनाथ शंकर फळे

श्री. रघुनाथ शंकर फळे यांचा जन्म विणकर समाजात येवले तालुक्यातील नागडे या खेडेगावी झाला. वडिलोपार्जित धंदा विणकऱ्यांचा आहे. यांत्रिक युगाची झपाट्याने जसजशी वाढ होत चालली तसा तसा विणकराचा धंदा बसत चालला. त्यामुळे कौटुंबिक जीवनाची जबाबदारी दिवसेंदिवस वाढत चालली. मंदीची लाट असल्याने श्री. शंकर उमाजी फळे हे आपली मुलेबाळे घेवून सुमारे १९२८ साली नाशकास आले. श्री. रघुनाथशेठ यांना लहानपणीच हॉटेलमध्ये नोकरी करून वडिलांच्या धोरणानुसार कामे करण्याची पाळी आली. ती कामे त्यांनी इमाने इतबारे करून निसर्गाने दिलेल्या बुद्धीवरच शिक्षणाविना बालपण घालविले.

दरम्यान कॉंग्रेसमध्ये प्रवेश करून १९४२ च्या स्वातंत्र्य लढ्यात त्यांनी भाग घेतला. त्या धामधुमीत त्यांना तुरुंगवासही भोगावा लागला. सन १९५६ साली श्री. फळे नाशिक नगरपालिकेत निवडून आले. तसेच ते १९६१ साली नासिक पालिकेत निवडून आले. त्यात त्यांच्या प्रेमळ मित्र मंडळीचे सहकार्य दिसून येते. म्युनिसिपालिटीत अनेक कमिट्यात ते सभासद आहेत व अनेक सार्वजनिक कामात ते भाग घेत आहेत. कोणत्याही परिस्थितीत मानाला बळी न पडता स्वतःचा धंदा सांभाळण्याकडे मनाची प्रवृत्ती असल्याने ते आपल्या स्वतःच्या कामात मग्न असतात.

श्री. लक्ष्मण सहादु जानमाळी

जन्म सन १९२४. शिक्षण मराठी ७ वी. व्यवसाय शेती. १९४० पासून राजकारणात प्रवेश. सहकारी सोसायटी व शेती व्यवसायात प्रगती. लेफ्ट बँक कॅनॉल, नाशिक शहर-चेअरमन. चार वर्षे सभासद. १९६१ साली नगरपालिकेच्या निवडणूकीत वॉर्ड नं. ७ मध्ये निवडून आले. १९६२–१९६३ साली नासिक नगरपालिकेत व्हा. प्रेसिडेंट. उत्साही व धडाडीचे कार्यकर्ते. सार्वजनिक सुभाष वाचनालयाचे सभासद. पानशेत धरण व संरक्षण निधी जमविण्यात अग्रेसर. पडित माळरानाची जमीन स्वतःच्या कर्तबगारीने १९५४ साली बागायतीस उपयोगात आणली. कॉं. कार्यकर्ते.

श्री. माधवराव धर्माजी खैरे

गेल्या सुमारे तीस वर्षापासून कॉंग्रेसचे क्रियाशील सभासद व कार्यकर्ते. वार्ड नं. ७ च्या मंडळ कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष. जिल्हा कॉंग्रेस मंडळाच्या कार्यकारिणीवर, तसेच शहर कॉंग्रेस कार्यकारिणी-

वर सध्या काम पाहातात. रोकडोबा तालीम संघाचे चालक. श्री. संत गाडगे महाराज मिशनचे सभासद. नासिक नगरपालिकेचे सभासद. सन १९५७ साली नगरपालिकेच्या स्टॅंडिंग कमिटीचे चेअरमन. सन १९५९-६० मध्ये नासिक नगरपालिकेचे अध्यक्ष. नासिक नगरपालिका क्रीडा मंडळाचे अध्यक्ष, सन १९५७ ते आजपर्यंत. सन १९६१ पासून नगरपालिकेच्या काँग्रेस पक्षाचे प्रमुख.

श्री. त्र्यंबक लक्ष्मण रहाणे

(सभापति स्थायी समिति)

यांचा जन्म नासिक शहरात एका गरीब घराण्यात झाला. घरची प्रतिकूल परिस्थिति असूनही सतत परिश्रमाने प्रतिकूल परिस्थितीशी झुंजत राहून ते आपल्या कर्तबगारीवर मोठे झाले. घरचा मूळचा व्यवसाय शिवणकामाचा, परंतु श्री रहाणे यांनी ही नोकरी सोडून धाडसाने नवीन धंद्यात प्रवेश केला व त्यात कष्टाने यश प्राप्त करून घेतले. ते शेतीही करतात. यांना सामाजिक कार्याची आवड आहे. ते नासिक येथील नामदेव शिंपी समाज मंडळाचे सतत ४-५ वर्षे अध्यक्ष होते. तसेच ते प्रांतिक नामदेव शिंपी समाजाचे सेक्रेटरी म्हणून ६ - ७ वर्षे काम करीत आहेत. जुन्या नासिक शहरात असलेल्या सार्वजनिक सुभाष वाचनालय मधलीहोळी तालीम संघ, यशवंत व्यायाम शाळा इत्यादि शहरातील अनेक सार्वजनिक संस्थात काम करीत असतात. ते मंडळ काँग्रेसचे सभासद व क्रियाशील कार्यकर्ते आहेत. १९६१-६२ च्या म्यु पल सार्वत्रिक निवडणुकीत वार्ड नं. ७ मधून ते लोकप्रतिनिधि म्हणून निवडून आले. ते स्वभावाने सुशील व विनयी असून गरिबांविषयी त्यांना अतिशय कळकळ आहे. जुन्या नासिक भागातील ते एक नामवंत सार्वजनिक कार्यकर्ते आहेत. वसंत व्याख्यान माला या संस्थेच्या मंडळावर ते नगरपालिकेचे प्रतिनिधी म्हणून नियुक्त झाले आहेत.

श्री. दामोदर मुरलीधर कमोद

जन्म :- सन १९२६, व्यवसाय :- शेती.

सन १९६१ च्या नगरपालिका निवडणुकीत यशस्वी होऊन नगरपालिका सभासद; सन १९६४ सॅनिटरी कमिटी चेअरमन; महात्मा फुले शिक्षण संस्था, नासिकचे संस्थापक, सदस्य व उपाध्यक्ष; १९६१ ते आजपावेतो. कार्यकारी पंच-समस्त माळी मंडळ, चौकमंडई, नाशिक १९६० ते १९६२; कार्यकारी सभासद व म्यु. प्रतिनिधी, सार्वजनिक सुभाष वाचनालय, १९६३ ते १९६४; उपपक्ष नेते नगरपालिका काँग्रेस पक्ष, १९६३; गोदावरी लेफ्ट बँक कॅनॉल को. ऑ. सोसायटीचे कार्यकारी सभासद १९६३; संरक्षण समिति वा. नं. ७ सदस्य, निधि गोळा करण्यात पुढाकार.

सार्वजनिक कार्याची तळमळ, काँग्रेसचे निष्ठावंत व धडाडीचे कार्यकर्ते, जनतेशी समरस होण्याची वृत्ती, जुन्या नाशिक विभागाची पाणी टंचाई व इतर अडचणी दूर करण्यासाठी सतत धडपड. तेथील मागासलेल्या विभागाच्या उन्नतीसाठी शिक्षणाची सोय व्हावी म्हणून तेथील नियोजित झारेकरी कोठावरील शाळेची नगरपालिकेची स्वतःची इमारत व्हावी म्हणून प्रयत्नशील.

श्री. शि. गं. काळे

जन्म : सन १९१२ शिक्षण मराठी ७ वी व इंग्रजी ३ री. १९२७ ते ५० सरकारी नोकरी (पोलीस डिपार्टमेंट) १९२८ पासून समाजसेवा, समाजाच्या उन्नतीसाठी नेहमी प्रयत्न. १९५० नंतर राजकारणांत प्रवेश. नगरपालिकेचे गेले १२ वर्ष सभासद. चेअरमन वॉटर वर्क्स व सॅनिटेशन म्हणून काम केले. मागासलेल्या वर्गाला इतर वर्गाबरोबरीची प्रतिष्ठा प्राप्त करून देण्यात प्रयत्नशील.

श्री. गोविंद दगडू गोंडे

जन्म : १९२१, आदिवासी समाजातील कार्यकर्ते. १९५२ पासून नासिक नगरपालिकेच्या वार्ड नं. ८ मधून निवडून येतात. सिहस्थाच्या वेळी सॅनिटरी कमिटीचे चेअरमन म्हणून योग्य काम-गिरी बजावली. १९६२–६३ साली सार्वजनिक बांधकाम खात्याचे चेअरमन म्हणून जबाबदारी पार पाडली. लोकप्रिय व तडफेने काम करणे, कामाची तळमळ. आपल्या वार्डातील अबालवृद्ध नागरिक न लोकप्रिय.

श्री. माधवराव दुर्गाजी क्षीरसागर

जन्म : १९०६; शेतकरी घराण्यात जन्म. शेतीच्या जुन्या व नव्या पद्धतीचा संगम करून वाडवडिलांच्या कीर्तीत भर घातली. सन १९३१ मध्ये वॉर्ड नं. ८ मधून पहिल्या क्रमांकाने निवडून आले. १९६१ च्या अॅग्रिकल्चरल प्रोड्यूस मार्केट कमिटीच्या चुरशीच्या निवडणुकीत सभासद म्हणून निवड. मार्च १९६३ मध्ये अॅग्रिकल्चर प्रोड्यूस मार्केट कमिटीचे चेअरमन म्हणून अविरोध निवड. विविध सहकारी संस्थांच्यांचे सभासद व चेअरमनपद. नगरपालिकेच्या वॉटर वर्क्स कमिटीचे चेअरमन असताना जुन्या नासिकमधील पिण्याच्या पाण्याच्या दुर्भिक्षाचे निर्मूलन करण्याचा आटोकाट प्रयत्न. महात्मा फुले शिक्षण संस्थेचे आजीव सभासद व मुख्य चालक. संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सक्रीय भाग व गुरे पुनर्वसन निधी आणि संरक्षण निधी जमविण्याचा जिवापाड प्रयत्न.

श्री. निवृत्ति त्र्यंबकराव वझरे

जन्म : १९३०. व्यवसाय वडिलोपार्जित शेतीचा, वडील श्री. त्र्यंबकराव वझरे हे म्युनिसि-पालिटीचे २० वर्षे सभासद होते. १९४२ ते १९६० पर्यंत वॉर्ड नं. ८ कमेटी गट समितीचे अध्यक्ष. सन १९४५–४६ पासून आजपर्यंत नासिक म्युनिसिपल सभासद. १९५२ ला पब्लिक वर्क्स कमिटीचे चेअरमन. १९५४ ला सॅनिटरी कमिटीचे चेअरमन. १९६० मध्ये स्टॅंडिंग कमिटीचे चेअरमन सन १९४० ते आजपर्यंत चौकमंडई येथील माळी समाजाचे अध्यक्ष.

श्री. दामोदर भिमाजी उर्फ अण्णासाहेब येलमामे

यांचा जन्म सिन्नर येथे सन १९२२ साली झाला. शालेय शिक्षण मराठी ७ वी पर्यंत व इंग्रजी ३ री पर्यंत झाले आहे. लहानपणापासून त्यांना व्यायामाची आवड असल्याने त्यांनी कुस्त्यांची अनेक मैदाने गाजविली आहेत, सामाजिक कार्याची पूर्वीपासून आवड असल्याने सर्व प्रकारच्या सामाजिक कामात ते नेहमीच भाग घेतात. सन १९६१ च्या नगरपालिका निवडणुकीत ते वॉर्ड नं. ८ तर्फे स्वतंत्र म्हणून निवडून आले व सन १९६३–६४ मध्ये त्यांची वॉटर वर्क्स कमिटीचे चेअरमन म्हणून निवड झाली. शहराचा पाणी पुरवठा जास्तीत जास्त चांगला कसा होईल या तळमळीने त्यांनी शहरामध्ये अनेक ठिकाणी पाईप लाइन्स टाकण्याच्या योजना आखल्या व कार्यवाहीत आणल्या. ते स्वभावाने तडफदार व सत्त्वनिष्ठ असे असल्याने सर्वांच्या मनात त्यांच्याबद्दल आदरयुक्त प्रेमाची भावना असते.

श्रीमती प्रभादेवी राय

जन्म २५ मार्च सन १९२१. शिक्षण–हिंदी ७ वी कक्षा. सार्वजनिक कार्याविषयी आवड काँग्रेस महिला संघटना कार्यकारिणीच्या सभासद. सन १९५० पासून मंडळ काँग्रेस नं. ५ कार्यकारिणीच्या सभासद. १९५८ ते आजपर्यंत आदर्श विभाग डेव्हलपमेंट स्कीम सभासद.

जुन्या नासिक विभागात आशिक्षितांना मार्गदर्शन, बालवाडी काढण्याकरिता सहाय्य. महिलांना साक्षर करण्याकरिता वर्ग चालविला. हरिजन महिलांचा उद्धार करण्याकरिता, दैनिक व्यवसाया-करिता शिवणवर्गात प्रवेश मिळवून देणे व शिवण वर्ग चालविण्याचे प्रयत्न. १९६१ मध्ये झालेल्या नगरपालिका निवडणुकीमध्ये सर्व स्त्री सभासदात पहिल्या क्रमांकाने निवडून आल्यानंतर १९६१–१९६२ मध्ये गार्डन डिस्पेन्सरी कमिटीच्या चेअरमन. चौकमंडईत आयुर्वेदिक दवाखाना लोकांच्या आग्रहावरून सुरू केला.

श्री. हिरामण चतरु मोहेकर

जन्म: ११–३–१९२७ शिक्षण. मॅट्रिकपर्यंत, गरीब कुटुंबातील जन्म. १९४० पासून खादीचा वापर. वेगवेगळ्या सामाजिक कार्यात भाग. १९५२ च्या म्युनिसिपल निवडणुकीत कॉंग्रेस तिकिटावर निवड त्यावेळी ते सर्वात लहान मेंबर. समाजकार्याची आवड असल्याने सिव्हिल हॉस्पिटलच्या सल्लागार समितीवर वेळोवेळी नियुक्ति आजहि त्या समितीवर आहेत. दवाखाने, उद्याने समितीचे सभापति म्हणून दोनदा निवड. बांधकाम, पाणी पुरवठा समितीचे सभापति म्हणून कामगिरी. कॉंग्रेस पक्षाच्या शहर, जिल्हा कमिटीवर जबाबदारीचे काम. म्युनिसिपल कॉंग्रेस पक्षाचे सेक्रेटरी म्हणून कामगिरी. या लोकोपयोगी कार्यामुळे १९५६ पासून नासिक जिल्ह्याचे ऑनररी मॅजिस्ट्रेट म्हणून नेमणूक. आजपावेतो नेमणूक चालू आहे. म्युनिसिपल स्कूलबोर्ड समितीवर निवड सालस, मनमिळावू आणि सचोटीचा कार्यकर्ता म्हणून ख्याति. स्वकर्तबगारीवर मोठेपण.

श्री. गुलाममहंमद अिब्राहिम साहेब जिन

यांचा जन्म १९२९ मध्ये नासिक येथे झाला. ते कांग्रेस पक्षाचे सभासद असून त्यांना जनसेवेची मनापासून आवड आहे. यांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले आहे. त्यांना व्यायाम व कुस्ती याबाबत लहानपणापासूनच आवड असून कुस्तीच्या अनेक दंगली त्यांनी गाजविल्या आहेत. ते तरुण, तडफदार सुस्वभावी व शांत स्वभावाचे कॉंग्रेस कार्यकर्ते असून प्रवेश केल्यापासून नगरपालिकेत सतत निवडून येत आहेत

त्यांनी नगरपालिकेचे उपाध्यक्षपद व अध्यक्षपद भूषविले. त्यांच्या कारकीर्दीत जुने नासिक भागात पिंजारघाट येथे पाण्याची टाकी बांधण्याचा भूमिपूजन समारंभ झाला. हा समारंभ त्या वेळचे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री श्री. यशवंतरावजी चव्हाण यांच्या हस्ते झाला. व जुने नासिक येथील पाणी पुरवठ्याच्या बाबतीत मुहूर्तमेढ रोवली गेली.

श्री. शेखमहंमद यासिन चॉंदसाहेब

जन्म दिंडोरी सन १९०४.

नगरपालिकेत सन १९५२ पासून निवड. सार्वजनिक कार्याची मनापासून तळमळ व स्वतः कष्ट घेऊन काम. निस्वार्थ व सचोटीने काम पूर्ण करण्याची हातोटी व लौकिक.

सार्वजनिक कार्यक्षेत्रात सन १९२० पासून भाग घेतात स्पष्टवक्ते, सचोटीने काम करणारे व तळमळीचे निष्ठावंत कॉंग्रेस कार्यकर्ते. म्यु. प. स्कूलबोर्ड, व्हाईस चेअरमन दि. ५–११–५७ ते १५–११–५९.व स्टँडिंग कमिटीचे चेअरमन म्हणूनहि काम केले. जकात उत्पन्नात त्यांच्या कारकीर्दीत १ लाख रुपयांची वाढ. सर्वांशी मिळून मिसळून लोकांची मने राखण्याचा स्वभाव.

श्री. अब्दुलरझ्झाक हाजीअहमदसाहेब

जन्मः २७ एप्रिल १९१५. उर्दू मराठी ७, इंग्रजी ३ री. सन १९४६ पासून कॉंग्रेस प्रवेश १९४६ मध्ये नासिक नगरपालिका व डिस्ट्रिक्ट लोकलबोर्ड सभासद. १९४५ पासून राजकारणात

प्रवेश. नासिक नगरपालिकेचे व्हॉ. प्रेसिडेंट म्हणून कामगिरी. धडाडीचे व उत्साही कार्यकर्ते. पानशेत धरण व संरक्षण निधी जमविण्यात पुढाकार घेतला. नॅशनल उर्दू हायस्कूलचे ते सदस्य आहेत. १९४६ पासून आजपर्यंत ते नगरपालिकेत निवडून येत आहेत.

श्रीमती हरिबाई भागचंदजी अग्रवाल

श्रीमती हरिबाई भागचंदजी अग्रवाल यांचे घराणे पहिल्यापासून कॉंग्रेसचे. मूळ ठिकाण धामणगांव नासिक येथे काँग्रेसने आखलेल्या कार्यक्रमाप्रमाणे गेली काही वर्षे समाजसेवा चालविली आहे. म्युनिसिपालिटीमध्ये दवाखाने व उद्याने समिति याच्या त्या चेअरमन होत्या. त्यांच्या प्रयत्नाने सुमारे ३० हजार रुपयांची [illegible] मशिन आली आणि शिवाय कालिकेकडे बाग तयार झाली. याशिवाय नासिक पंचवटी येथे [illegible] महिला मंडळाची स्थापना केली. त्या मंडळाच्या संस्थापक (संचालक) असून [illegible] व कुष्टधाम यांच्याही बरेच वर्षांपासून सभासद असून हल्ली तेथील चेअरमन आहेत. शहर [illegible] स्त्री संघटना त्यांनी चालविली आहे व शहर काँग्रेस स्त्री संघटनेच्या त्या अध्यक्ष आहेत. स्वत त्या देखरेखीखाली बालमंदिर व शिवण क्लास चालवीत आहेत.

सध्या त्या स्थायी समितीच्या सभासद आहेत. तसेच इतर पाच कमिट्यांमध्ये सभासद आहेत. त्या मोठ्या घराण्यातील असून त्यांनी जयरामजीदास भागचंदजी या नावाने व्यापारी पेढी चालू आहे.

श्री. शंकर धर्मा खोडे

सन १९२२ मध्ये जन्म. शिक्षण लिहिण्या वाचण्यापुरते. आदिवासी समाजातील चळवळीचे कार्यकर्ते. अखिल भारतीय सेवा मंडळाच्या नासिक येथे भरलेल्या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष नगरपालिकेत ८ वर्षे नगरपालिका सभासद होते. गार्डन कमिटीचे सभापति सध्या बांधकाम समितीचे सभापति नासिक शहरात हमालीचा व्यवसाय करून शहरातील अनेक संस्थांचे कार्य निस्वार्थ बुद्धीने सांभाळणारे, मन मिळावू प्रेमळ, निगर्वी स्वभावाचे काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते. सार्वजनिक निवडणुकीच्या काळात खोडे आणि पार्टी या कलापथकाद्वारे काँग्रेसचा प्रचार संबंध नासिक जिल्ह्यात अहोरात्र मेहनत घेऊन कसोशीने केला. सुमारे एक लाख एकर जमीन आदिवासी समाजाकरिता मिळविण्याच्या कामी विशेष कामगिरी.

गंगापूर धरणात गेलेल्या जमिनीबद्दल सरकारकडे शिष्टमंडळ अर्ज. निवेदने करून जमिनी मिळविल्या त्यातील ८-५ [illegible] करण्याचे, शेती करण्याचे [illegible] गव्हर्नमेंट फॉरेस्ट डेपो याचे [illegible] कौन्सिलर. नासिक शहर तालीम संघाचे सदस्य.

श्री. बजुराव दादाजी भोईर

जन्म : माणीकखांब (ता. इगतपुरी). शिक्षण सातवीपर्यंत. शाळा संपल्यावर मोलमजुरी करून पोट भरीत. त्यांना लहानपणापासून व्यायाम आवडता. व्यायामाप्रमाणेच नाटकांची गोडी. दोन्ही गुणात वडिलांचे वळकावणी. भूषर सर्कसमध्ये सामील होऊन जोखमीची कामे केली. मग व्यवस्थापक म्हणून जबाबदारी सांभाळली. नासिक म्युनिसिपालिटीत जवळजवळ २० वर्षे गवंडी आणि फिटरची कामे. जनतेच्या पाठिंब्यावर म्युनिसिपल सभासद. हरिजन सत्याग्रहाच्या वेळी हरिजनांकडून कामगिरी व पुढाकार भरवया आणि [illegible] जमातीचे अध्यक्ष. १९२४ पासून येणाऱ्या

सिंहस्थ पर्वण्यात व्यवस्था कमिटीचे मार्गदर्शक म्हणून त्यांनी बहुमोल कामगिरी बजावली. कुस्ती हा आवडता विषय असल्याने जिल्हा कुस्तीगीर परिषदेचे सेक्रेटरी. नामांकित फडांच्या वेळी पंचाचे काम चोख बजावणारे म्हणून ते मान्यता पावले आहेत.

डॉ. लालचंद खुशिराम बदलानी

जन्म दि. १२–२–१९२६, सुलतान कोट (सिंध पाकिस्तान) शिक्षण मॅट्रिक. आयुर्वेदिक वैद्यकीय चार वर्षाचा ट्रेनिंग कोर्स. सन १९४७ मध्ये झालेल्या पाकिस्तान आणि हिंदुस्थान यांच्यातील विभागणीमुळे सन १९४८ मध्ये नासिक येथे येऊन पंचवटीत दवाखाना सुरू. सिंध मॉडर्न हायस्कूल या संस्थेचे विश्वस्त नासिक नगरपालिकेचे सभासद दि. ९ एप्रिल १९६४ पासून म्युनिसिपल स्कूलबोर्डाचे चेअरमन म्हणून निवड.

श्री. मुरलीधर कुशाबा गायके

जन्म चांदोरी सायखेडा येथे सन १९३४ साली शेतकरी घराण्यात झाला. शालेय शिक्षण घ्यावे ही इच्छा असूनही परिस्थितीने ती पुरी होऊ शकली नाही. नासिक येथे स्थायिक झाल्यावर मोटार धंद्याच्या व्यवसायात त्यांनी लक्ष घातले. आज वक्तशीरपणे मालाच्या वाहतुक करणाऱ्या ज्या ट्रान्सपोर्ट कंपन्या शहरात आहेत त्यात श्री. गायके यांचा वरचा क्रमांक लागतो. धंद्याच्या निमित्ताने व मनमिळावू स्वभावामुळे त्यांचा अनेक लोकांशी संबंध आला असल्याने अनायासे राजकारणात व समाजाची सेवा करावी या ध्येयाने समाजकारणात ओढले गेले व नासिक नगरपालिकेच्या निवडणुकीत पंचवटी विभागातील नागरिकांचा प्रतिनिधी म्हणून निवडून आले. नगरपालिकेच्या कारभाराच्या दृष्टीने अनेक सुधारणा घडवून आणण्याचे कामी त्यांनी बरेच प्रयत्न केले. नगरपालिकेच्या वॉटरवर्क्स कमिटीचे चेअरमन असताना शहरातील पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्याच्या दृष्टीने त्यांनी बरेच प्रयत्न केले. कमी बोलावे व कार्य अधिक करावे अशा सात्विक वृत्तीचे भाऊ शहरात मानाचे स्थान मिळवून आहेत.

श्री. सदाशिव गंगाराम भोरे

यांचा जन्म नासिक येथे सन १९१७ साली झाला. सन १९३५ पासून ते कांग्रेसचे सभासद असून त्यांनी स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला आहे. तसेच नासिक येथील अनेक सामाजिक संस्थांमध्ये त्यांनी जबाबदारीच्या जागा भूषविल्या आहेत. १) पंचवटी नागरिक को. ऑ. सोसायटी या संस्थेचे प्रमुख कार्यकर्ते आहेत. तसेच २) पिपल्स को ऑ. बँक, ३) शहर तालीम संघ, ४) सार्वजनिक वाचनालय, ५) होमिंग सोसायटी, ६) मोठा आखाडा तालीम संघ, या विविध संस्थांशी त्यांचा निकटचा संबंध असून या संस्थांच्या कार्यात ते प्रयत्नशील आहेत. पंचवटी विभागातर्फे ते नगरपालिकेत निवडून येत आहेत. नगरपालिकेतील विविध पोट–समित्यांवर त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे १७–५–५८ ते १७–५–१९५९ नासिक नगरपालिकेचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. नासिक शहर काँग्रेस कमिटीचे ते अध्यक्ष आहेत. श्री. सदाशिवराव हे निगर्वी, समजूतदार स्वभावाचे तसेच त्यांचे संघटनाकौशल्य इत्यादि गुणांमुळे ते शहरात अत्यंत लोकप्रिय आहेत.

श्री. वासुदेव लक्ष्मण जानोरकर

जन्म २३–२–१७. वयाच्या विसाव्या वर्षापासून सार्वजनिक कामास सुरुवात केली. नासिक शहर कांग्रेस कमिटीचे सतत ६ वर्षे चिटणीस. सन १९४२ च्या आंदोलनात हिरीरीने भाग घेऊन तुरुंगवास भोगला. नासिक मधील वसंत व्याख्यानमाला. पंचवटी नागरिक को. ऑ. स्टोअर्स, तरुण ऐक्य मंडळ वगैरे संस्थात निरनिराळ्या अधिकारपदाच्या जागा भूषविल्या. सन १९५२ सालापासून नगरपालिका सभासद. गार्डन, डिस्पेन्सरी वॉटर वर्क्स, स्थायी समितीचे चेअरमन. पंचवटीतील

पाण्याचे दुर्भिक्ष्य दूर करण्यासाठी पाण्याची टाकी पंचवटीत बांधण्यासाठी मौलिक कामगिरी. त्याचप्रमाणे गंगाघाटाचा परिसर सुन्दर व पवित्र राखण्याच्या दृष्टीने सुधारणा. पंचवटी विभागात तसेच नासिक शहरातील मनमिळावू गृहस्थ व काँग्रेसचे एकनिष्ठ कार्यकर्ते जिल्ह्यातील एक नामवंत शेतकरी.

श्री. धिरुभाई व्हीकमचंद संघवी

पंचवटी नागरिक को. ऑपरेटिव्ह लि. पंचवटी या संस्थेचे व्हा. चेअरमन. याशिवाय सदर संस्थेच्या निरनिराळ्या पदांवर कामगिरी. पंचवटी हौसिंग सोसायटी, पंचवटी एज्युकेशन सोसायटी या संस्थांचे पदाधिकारी म्हणून कामगिरी. १९४७ पासून काँग्रेसचे सभासद. १९६० पासून मंडळ काँग्रेस कमिटीचे मेंबर. १९६२ पासून म्युनिसीपल कौन्सीलर, शोभना सिल्क मिल पंचवटी, भारत हार्डवेअर पंचवटी, डी. एन पंचवटी महावीर केमिकल पंचवटी या संस्थांचे चालक व भागीदार म्हणून काम पहातात म्यु. स्कूलबोर्ड व्हाईस चेअरमन सन २५–११–६१ ते २६–१२–६३.

श्री. दुर्गाप्रसाद रामचंद्र पांडे

यांचा जन्म सन १९२६ मध्ये झाला. त्यांचे शिक्षण इंग्रजी ६ वी पर्यंत झालेले आहे. सन १९४२ पासून ते काँग्रेसचे क्रियाशील आणि ध्येयनिष्ठ कार्यकर्ते आहेत. क्रीडाक्षेत्रात त्यांनी बरेच काम केलेले असून सन १९४९ मध्ये ऑलिंपिक स्टॉक होम येथे झालेल्या क्रीडा महोत्सवानिमित्त त्यांचा परदेशात दौरा झालेला आहे.

सामाजिक कार्यामध्ये तर ते नेहमीच आघाडीवर असतात. सामाजिक तसेच राजकीय कार्य करण्याचा वारसा त्यांना आपल्या पित्यापासूनच मिळाला असल्यामुळे नगरपालिकेसारख्या सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थाकडे त्यांचे लक्ष आकृष्ट झाल्यास नवल नाही. सन १९६१ मध्ये झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकीत पंचवटी वार्ड नं. ११ मधून प्रचंड मतांनी नगरपालिकेचे सदस्य म्हणून निवड. सन १९६१–६२ मध्ये आरोग्य समितीचे सभापति म्हणून निवड.

शांत, निगर्वी व मृदुभाषी स्वभावामुळे ते जनतेत अत्यंत लोकप्रिय झालेले आहेत.

नाशिक म्युनिसिपल स्कूलबोर्ड विद्यमान समिति

श्री. डॉ. लालचंद खुशीराम वधवानी चेअरमन
श्री. भिमाशंकर केशवशेट तांबोळी. व्हा. ,,
श्री हरिश्चंद्र नात्या शेलार, सदस्य
श्री. शांताराम कोंडाजी बावरे ,,
श्री डॉ. यशवंत सखाराम नवल ,,
श्री. हिरामण चतरु मोहेकर, ,,
शेख महंमद यासीन चांदसाहेब. ,,

श्री धिरजलाल व्हिकमचंद संघवी, सदस्य
श्री. गणपत पुंडलिक काळे, ,,
श्री. पुरुषोत्तम रामचंद्र बुरकुले, ,,
श्री. लक्ष्मण हरी सावंत, हेडमिस्ट्रेस गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूल नासिक } सरकारनियुक्त सदस्य

श्री. ल. ह. सावंत (गुरुजी)

शिक्षण मॅट्रिकपर्यंत. न्यू हायस्कूलच्या संस्थापकांपैकी प्रमुख व आजीव सभासद. काँग्रेसचे ३० वर्षे सभासद. नगरपालिकेत जवळ जवळ २० वर्षे सभासद म्यु. पल. स्कूलबोर्ड १९३० पासून सभासद व व्हाईस चेअरमन, सन १९४९ ते १९५२ पर्यंत, आणि चेअरमन सन १९५२ ते १९५७ (स्कूलबोर्ड). न्यू हायस्कूल या संस्थेने चालविलेल्या सरस्वती विद्यालयाचे सुपरिटेंडेंट. डिस्ट्रिक्ट स्कूल

बोर्डात सरकारतर्फे नियुक्त माजी स्कूल बोर्डाचे चेअरमन, सभासद. कुष्टधाम व नासिक जिल्हा कुष्टरोग निवारण मंडळाचे एक सभासद.

श्री. पुरुषोत्तम रामचंद्र बुरकुले

जन्म सन १९०० मध्ये झाला. त्यांचे शालेय शिक्षण बी. ए., एल्.एल्. बी. झाले असून वकीली हा त्यांचा व्यवसाय आहे. त्याचे सर्व जीवन सार्वजनिक कार्यात व्यतीत झाल्याचे दिसून येते. ते काँग्रेसचे सन १९३० पूर्वीपासून आतापर्यंत ध्येयनिष्ठ, पक्षनिष्ठ व क्रीयाशील सभासद आहेत. शहर काँग्रेस व जिल्हा काँग्रेसच्या महत्वाच्या पदाधिकारीपदाच्या जागा त्यांनी वेळोवेळी भूषविल्या आहेत. शहर काँग्रेस व जिल्हा काग्रेसच्या होणाऱ्या अंतर्गत निवडणुकांचे निर्वाचन अधिकारी म्हणून त्यांनी २ वेळा काम केले आहे. सन १९५२ पासून १९६३ पावेतो म्युनिसिपल सभासद होते. नगरपालिकेच्या विविध पोट समित्यावर सदस्य या नात्याने त्यांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. म्युनिसिपल स्कूल बोर्डाचे सन ११-११-१९५७ पासून आतापावेतो सदस्य आहेत. तसेच शहरातील विविध सार्वजनिक संस्थातही त्यांचे कार्य चालू आहे. २० वर्षापूर्वीपासून तो आता पावेतो वसंत व्याख्यान मालेचे ते प्रमुख संचालक असून मालेच्या विविध पदाधिकारीपदांच्या जागा त्यांनी भूषविलेल्या आहेत. ते सार्वजनिक वाचनालयाचे गेली कित्येक वर्षापासून सभासद असून मोठमोठ्या जबाबदारीच्या जागा त्यांनी भूषविल्या आहेत. आता कार्यकारिणीचे सभासद म्हणून काम करीत आहेत. ते दि नासिक पीपल्स को. ऑ बँकेचे अनेक वर्ष डायरेक्टर व आता व्हाईस चेअरमन व पंचवटी को. ऑ. हौसिंग सोसायटीचे सेक्रेटरी आहेत. सन १९६१-६२ मध्ये नासिक येथून प्रसिद्ध होणाऱ्या 'जनसेवा' या साप्ताहिकाच्या संपादनाचे कार्य त्यांनी केले आहे.

कवि व साहित्यिक म्हणूनही ते नासिककरांना परिचित आहेत. कायद्याची चाकोरी सांभाळून अहर्निश, तळमळीने कार्य करणे हा त्यांचा विशेष गुण आहे. श्री. तात्यासाहेब शांत, निरलस, निस्पृह व अबोल स्वभावाचे, कमी बोलून जास्त कार्य करणारे कार्यकर्ते आहेत. सौजन्यमूर्ती म्हणून ते जनतेत परिचित आहेत.

अमरधाम कमिटी

श्री. मोतीलाल गोकुळशेट राय

जन्म २४-५-१९२४. शिक्षण मॅट्रिकपर्यन्त व्यवसाय शेती. १९४२ च्या आंदोलनात सक्रीय भाग. वडील १८ वर्षे नगरपालिकेत सभासद. वडिलांच्या मृत्यूनंतर १९४८ मध्ये होमगार्डे संघटनेत सामील त्याच साली जुन्या नासिकमध्ये आदर्श विभाग कंझ्युमर्स को. ऑपरेटिव्ह सोसायटी सुरू केली. व पदाधिकार सांभाळले. होमगार्ड संघटनेत सामील होवून नेमबाजीत प्रावीण्य. अखिल भारतात ३ रा क्रम. १९५२ मध्ये वार्ड नं. ७ मधून नगरपालिकेत निवड. त्यासाली वॉटरवर्क्स कमिटीचे चेअरमन म्हणून निवड. अ. भा हैहय क्षत्रिय महासभेच्या कार्यकारिणीवर निवड. निरनिराळ्या सामाजिक संस्थावर पदाधिकारी. शहर काँग्रेसचे उपाध्यक्ष. कुस्तीगीर व तालीम संघटनावर प्रतिनिधी म्हणून काम.

श्री. रामचंद्र गणपत पोरजे

श्री. पोरजे नासिक नगरपालिकेने नियुक्त केलेल्या ' अमरधाम ' समितीचे सन १९६३पासून सभासद आहेत. ते सन १९३० पासून काँग्रेसचे क्रियाशील सभासद असून त्यानी नासिक शहर काँग्रेस कमिटीचे अनेक वेळा सेक्रेटरीपद भूषविले आहे. पंचवटीत हरिजनोद्धाराचे काम प्रथम त्यांनीच सुरू केले. १९५१ साली नाशकात झालेल्या अखिल भारतीय काँग्रेसच्या ५६ व्या अधिवेशनाचे ते

कार्यकर्ते होते. १९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात ते एक निष्ठावान सैनिक होते. मंडळ काँग्रेसचे अध्यक्षपद त्यांनीच प्रथम भूषविले. सार्वजनिक कार्यात ते आघाडीचे सैनिक म्हणून आजतागायत कार्य करीत आहेत. आपली सर्व हयात त्यांनी लोकसेवेत घालविली. नासिक शहर तालीम संघाचे आज ते उपाध्यक्ष असून नासिक पंचवटी येथील शिवजयंति उत्सव समितीचे ते अध्यक्ष आहेत. अनेक सार्वजनिक संस्थांचे ते एक आधारस्तंभ असून सार्वजनिक संस्थांचे कार्य ते मोठ्या तन्मयतेने करीत असतात.

श्री. बाबुराव सखाराम सोनवणे

काँग्रेसचे सन १९३० पासून क्रियाशील सभासद व निष्ठावंत कार्यकर्ते. १९४२ च्या आंदोलनात घडाडीने भाग-अनेक वेळा शहर काँग्रेस कमिटीचे सेक्रेटरी व मंडळ काँग्रेसचे अध्यक्षपद भूषविले. उभे आयुष्य राजकीय व सार्वजनिक कार्यात खर्च केले. जुन्या नासिकमधील सुभाष वाचनालयाचे माजी अध्यक्ष. वाचनालयाची भरभराट त्यांच्याच कारकीर्दीत झाली. सन १९६२-६३ मध्ये स्मशान कमिटीचे चेअरमन. आपल्या कारकीर्दीत स्मशानभूमीत अनेक लोकोपयोगी कामे पूर्ण केली. तेथे झाडे लावली. इलेक्ट्रिक लाईटची सोय केली.

नगरपालिकेचा अधिकारी वर्ग

श्री. सं. ना. ऐनापुरे (चीफ ऑफिसर)

श्री. संगप्पा नागनाथ ऐनापुरे, बी. ए. (ऑनर्स) जन्म (सांगली जिल्हा) येथे सन १९१७मध्ये. प्राथमिक, माध्यमिक शिक्षण वार्शी. येथे. कॉलेज शिक्षण-लिंगराज कॉलेज बेळगाव व राजाराम कॉलेज कोल्हापूर येथे झाले. नोकरी प्रथम मॅनेजर म्हणून सोलापूर ग्लास वर्क्स लिमिटेड मध्ये १९४३-४४ व नंतर सेक्रेटरी म्हणून रत्नाकर इंडस्ट्रीअल लि. कोल्हापूर येथे सन १९४५ ते १९५० पर्यंत. सन १९५१ ते १९५२ मध्ये इचलकरंजी येथे म्युनिसिपालिटीत चीफ ऑफिसर, दि. १-११-५२ पासून नासिक नगरपालिकेत चीफ ऑफिसर म्हणून काम करीत आहेत. महाराष्ट्रातील सर्व नगरपालिकांचे कायदे एकत्रित करून महाराष्ट्र नगरपालिका नवीन अॅक्ट तयार करण्यासाठी जी सल्लागार कमिटी सरकारने सन १९६३ मध्ये नेमली, त्या सल्लागार कमिटीवर नासिक नगरपालिकेचे चीफ ऑफिसर श्री. ऐनापुरे यांचीही सभासद म्हणून नेमणूक महाराष्ट्र सरकारन केली आहे.

श्री. पी. जी. मुळे (म्यु.पल अिंजीनियर)

जन्म दि. १८-११-१९२१ रोजी झाला. विजापूर शहर सर्वांगसुंदर करण्याचे बहुतेक श्रेय श्री. मुळे यांच्याकडे जाते. विजापूर ड्रेनस्कीम, वॉटर सप्लाय स्कीम, मास्टर प्लॅन, तलाव बंधारा उंच करणे, भोपाळ शहराची वॉटर सप्लाय स्कीम, २ कोटी रुपयाची तात्या टोपे नगर वसाहत योजना व एडन येथे दोन अडीच वर्षे प्रॅक्टीसिंग वाय ३ महत्त्वाच्या योजना व जबाबदारीच्या जागेवर काम पाहिले आहे. नासिक शहराचे पाण्याचे दुर्भिक्ष व स्वच्छ पाणी पुरवठा योजना चांगल्या तऱ्हेने कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने त्यांची नासिक नगरपालिकेचे अिंजीनियर म्हणून झालेली नियुक्ती नासिक शहरास उपयोगी पडेल.

श्री. द. अ. थत्ते

जन्म : २९ जानेवारी १९१७. रॉयल सॅनेटरी इन्स्टिट्यूट, लंडन सॅनेटरी इन्स्पेक्टर्स कोर्स. व्हॅक्सिन इन्स्टिटयूट, बेळगांव-येथून ॲडव्हान्स्ड कोर्स इन् व्हॅक्सिनेशन मीट इन्स्पेक्शन कोर्स वगैरे

पास झाल्यानंतर नाशिक नगरपालिकेत १९३८ सालापासून नोकरी चीफ सॅनिटरी इन्स्पेक्टर म्हणून १७ वर्षे काम करीत आहेत. १९४४–४५ सिंहस्थामध्येही आरोग्याधिकारी म्हणून ६ महिने काम उत्कृष्टपणे पाहिले. एप्रिल १९६२ पासून मेडिकल ऑफिसरचा चार्ज नगरपालिकेसाठी पब्लिक हेल्थ–पॅटर्न ठरविण्यासाठी सरकारने जी कमिटी नेमली होती, त्या कमिटीवर सभासद म्हणून निवड. कॉलऱ्याच्या साथीमध्ये (१९६३) उत्कृष्ट कामगिरी.

श्री. एम्. व्ही. इट्टी.

जन्म : १५ जानेवारी १९२५. शिक्षण : डी. सी. ई. १९५८ ते फेब्रुवारी १९६४ पर्यंत ॲक्टिंग म्युनिसिपल इंजिनियर म्हणून कामगिरी. सन १९५३ पर्यंत ... बनासकाठा येथे ओव्हरसीयर म्हणून कामगिरी. त्यापुढे १९५६ पर्यंत डी. एल्. बी.त सब डिव्हिजनल ऑफिसर म्हणून जबाबदारी सांभाळली

श्री. एस्. एन्. ऐनापुरे बी. ए. (ऑनर्स) चीफऑफिसर

यांना भारत सरकारने १९६१ ने खानेसुमारीचे चांगले कामाबद्दल प्रशस्तिपत्र व चांदीचे पदक दिलेले आहे. नासिक नगरपालिकेच्या १०० वर्षांच्या जीवनात चीफऑफीसर म्हणून जास्तीतजास्त वर्षे म्हणजे १२ वर्षे श्री. ऐनापुरे हेच चीफऑफीसर म्हणून काम करीत आहेत.

लोकोपयोगी संस्था

नासिक नगरपालिका क्रीडा मंडळ, वाचनालय–

अध्यक्ष– श्री. माधवराव खैरे, उपाध्यक्ष - श्री. रामचंद्र धनवटे, श्री. गुलाब पटेल. सेक्रेटरी– श्री श्रीकांत बी. चव्हाण, जॉईंट सेक्रेटरी– श्री. सुधीर जाधव, श्री. प्रभाकर टिळे खजिनदार– श्री. एम्. आर. काळे. वाचनालय– सेक्रेटरी– श्री. के. के. काळे, खजिनदार– श्री. संभाजी गव्हाड.

सा. सुभाष वाचनालय– उपसेक्रेटरी– ना. भि. विधाते, खजिनदार– का. का. भामरे कार्याध्यक्ष– दामोदर भडके, हरिभाऊ करे, म्यु. पल प्रतिनिधी– दा. मु. कमोद.

लोकनाट्य कला पथक–

लोकनाट्य कलापथकाच्या कार्यकारिणीत प्रताप परदेशी, गजाभाऊ वेणी, दत्ता काची, किसनराव बागूल, उद्धवराव बाबीसकर, नामदेवराव पाटील इत्यादि कार्यकर्ते आहेत.

लोकरंजन कला केंद्र–

स्थापना– चैत्र शुद्ध पौर्णिमा हनुमान जयंति शक १८८५, ८ एप्रिल १९६३. कार्यकारी मंडळ– डॉ. श्रीराम कुलकर्णी अध्यक्ष, श्री. गजानन भट खजिनदार, श्री. मधुकर झेंडे सरचिटणीस, श्री. मुकुंद शुक्ल, प्रताप परदेशी, श्री. दत्ता काची, किसन बागुल, गजानन वेणी, बाळासाहेब वद्य, शंकर गवळी, जयंत पुराणिक, प्रभाकर पुजारी, प्रभाकर व्यवहारे, कृष्णा पवार. संस्थेने एका वर्षात आचार्य अत्रेकृत कवडीचुंबक व साष्टांग नमस्कार हे नाट्यप्रयोग सादर केले. साष्टांग नमस्कार या नाटकाचे प्रयोगातून सुमारे ५०० रु. विठ्ठल मंदिराचे जिर्णोद्धारासाठी दिले. महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत भाग घेण्याची तयारी संस्था करीत आहे. नासिक शहराचा सांस्कृतिक वारसा योग्यरीतीने पुढे चालविणाऱ्या संस्थेची ही छोटी प्रतिकृति आहे.

✽ नासिक जिल्हा पत्रकार संघ–

हा संघ महाराष्ट्राच्या मराठी पत्रकार संघाशी संलग्न असून डॉ. अ. वा. वर्टी हे अध्यक्ष आहेत. संघातील प्रमुख आधारस्तंभ आमदार माधवराव लिमये, महाराष्ट्र संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य असून श्री. द. गं. पंतनीस, जितमलजी छाजेड, सेक्रेटरी आदि एस्. लाल, जॉइंट सेक्रेटरी श्री. मनुभाई ह. जोशी, श्री शरद बुरकुले, श्री. [illegible]रेश कुलकर्णी, श्री वि. अ. नेत्रे, आदि सदस्य पत्रकार संघातही कार्य करतात व अन्य संस्थातही कार्य करतात.

✽ महात्मा गांधी रोड मोफत पेटी वाचनालय मंडळ, नासिक. (र नं.इ १३६एन्)

नासिक शहराच्या सर्वसामान्य जनतेत व विद्यार्थ्यांत वर्तमानपत्रे वाचण्याची अभिरुचि निर्माण व्हावी या हेतूने [illegible] या दिवशी मंडळाची स्थापना [illegible] पेटी वाचनालय नासिक शहरात प्रथमच महात्मा गांधी रोडवर [illegible] केले. त्यात सर्व प्रकारची दैनिके ठेवण्यात येतात. तसेच सदरहु मंडळातर्फे दरवर्षी क्रीडा महोत्सव साजरा करण्यात येतो. त्यामध्ये हुतुतू क्रिकेट, कॅरम, वगैरे स्पर्धांचा समावेश करण्यात येतो. नासिकच्या सर्वसामान्य जनतेत व क्रीडा-प्रेमी उत्साही जनतेस व खेळाडूंना एकत्रित करून सर्वांच्या सोईसाठी हुतूतूचे सामने मंडळातर्फे रात्री ९ च्या पुढे भरविण्यात येतात. सदरहु मंडळाचा क्रीडा महोत्सव दरवर्षी मे महिन्यात साजरा करण्यात येतो व सुमारे १५ दिवस चालतो.


सर्वश्री रघुनाथ यादवराव वाघ, ॲडव्होकेट, सुंदरलाल करंजकर, एच्. कामदार, योगेश पाटील, अरविंद वैद्य, उत्तम डिकले, विजयराव मांडवे, दत्तात्रेय तांबोळी (म्यु. सभासद) रामदास दरगोडे, [illegible] घुलेकर, गोपिनाथ वाघ, वसंत वैद्य, नाना हुजरे व वसंतराव विचारे हे सभासद मंडळाचे कार्य करीत आहेत

✽ बाल उन्नती मंडळ (र. नं. ई १३७)


सरकारमान्य संस्था, नासिक शहरात लोकोपयोगी काम करणाऱ्या संस्थेत बाल उन्नती मंडळ हे अग्रेसर आहे. [illegible] जलप्रलय व भारत संरक्षण निधीचे साह्यार्थ संस्थेने केलेले कार्य [illegible] आहे. सर्वसाधारण [illegible] काची गरज ध्यानात घेऊन संस्था मोफत पेटी [illegible] या द्वारे [illegible] जागृतीचे कार्य करीत आहे. राष्ट्रीय सण [illegible] नगरपालिकेचे अनुदान संस्थेस मिळते. या संघटनाकौशल्याचे [illegible] ठाकरे, प्रभाकर गेलकर, श्री. एकनाथ वाबळे, श्री. रामचन्द्र फड [illegible] श्री. [illegible] आदि कार्यकर्ते [illegible] आहेत.


✽ दीनानाथ स्मृति मंडळ, नासिक–

उपरोक्त संस्थेने हे रंगभूमीवरील दिवंगत [illegible] मा. दीनानाथ मंगेशकर यांचा अर्ध-पुतळा उभारून महाराष्ट्रात [illegible] करीत आहे. या संस्थेतर्फे शास्त्रोक्त नाट [illegible] एक नवे दालन नासिकच्या रसि-कांना उघडून [illegible] नासिक शहरात [illegible] भव्य नाट्यमंदिर उभारण्याचा संस्थेचा मानस आहे. संस्थेचे अध्यक्ष श्री. ह. ता. सेलार [illegible] म्यु.), उपाध्यक्ष श्री. जितमलजी छाजेड (संपादक, लोकवार्ता), श्री. जी. एन्. पंडे (म्यु. क.), खजिनदार श्री. रा. अ. मिरज-कर सेक्रेटरी श्री. [illegible] व मधुकर झेंडे हे आहेत व डॉ. या. आ. जोशी. श्री. वसंतराव [illegible] आदि सभासद आहेत.



उत्पन्न
१८६४ ते १९६४ मधील उत्पन्न वाढ
४० लाख
३० लाख
२० लाख
१० लाख
६५३३६ रुपये
३१६५५४ रुपये
७४६७३ रुपये
११४०१२ रुपये
७०५५५ रुपये
१०९२८७ रुपये
३७२४१३ रुपये
३७१२६७ रुपये
८४३१७२ रुपये
२३९०४३७ रुपये
४३८२३६० रुपये
१८६४-६५
१८७४
१८८४
१८९४
१९०४
१९१४
१९२४
१९३४
१९४४
१९५४
१९६४





नगरपालिका सदस्य १९६४.


ब्लॉक प्रिंटर्स : न्यु श्रीराम प्रेस, नासिक.



खाते प्रमुख—नासिक नगरपालिका.




म[illegible] बोर्ड विद्यमान समिति




ओम्. टी. ओस्. विभाग.




बाजार वसुली विभाग.




सेंट्रल ऑफिस – कर्मचारी




घरपट्टी वसुली विभाग.




पी. डब्ल्यू. डी वॉटर वर्क्स.




वॉटर वर्क्स




अकाऊन्ट विभाग.



आरोग्य खाते




पंपींग स्टेशन – कर्मचारी.




फायर ब्रिगेड – कर्मचारी




वाखाने व उद्यान.




मलेरिया प्रतिबंध वर्कशॉप.




जकात विभाग १.




जकात विभाग २ नाके क्लार्कस्




सफ़ाई कामगार



सफ़ाई कामगार



सफाई कामगार स्त्रीया



सफाई कामगार स्त्रीया



कवि गोविंद



अनंत कान्हेरे

सिनेस्टार कै. मास्टर शंकरराव वझे



शेतकरी घराण्यात जन्म. वयाचे १५ वे वर्षा-पासून सिनेसृष्टीत पदार्पण करुन सतत तीस वर्षे लोकप्रीयतेच्या शिखरावर होते.

नासिक येथे आदर्श नाटय संघाचे संस्थापक. महाराष्ट्राला भुषण झालेले नासिक येथील सिने व नाटय कलावंत.

जन्म १९१३ मृत्यु २१।२।१९८६

राष्ट्रीय पारितोषिक विजेते

श्री भास्कर तुकाराम बागूल

मुख्याध्यापक

[illegible] मराठी मुलांची शाळा नं. १२ पंचवटी नासिक.



उत्कृष्ट अध्यापक, शालेय पुस्तकाचे लेखक, शैक्षणिक व सास्कृतिक कार्यक्रमांचे आयोजक, सहकारी संस्थेंत यशस्वी कार्य-कर्ते, राष्टीय विचारसरणीतून शैक्षणिक मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक या नात्यानें भारत सरकारनें सन १९६१ सालीं दिल्ली येथें भारताचे राष्ट्रपतीचे शुभ हस्ते राष्ट्रीय पारितोषिक देऊन सन्मान केला

महाराष्ट्र राज्य पालिका कर्मचारी परिषद नासिक.



महाराष्ट्र राज्यातील नगरपालिकांचे कर्मचाऱ्यांची परिषद दि. २५ आक्टोबर १९६४ रोजी नासिक येथे घेणेत आली. या परिषदेचे उद्घाटन नासिकचे लोकप्रिय नगराध्यक्ष मा. श्री. नि. व्य. वझरे यांचे शुभहस्ते झाले.



श्री. माधव रघुनाथ काळे बी. ए.

महाराष्ट्र राज्य पालिका कर्मचारी परिषद अध्यक्ष

खातेप्रमुख

[१] श्री. शंकर गणेश मोडक, बी. ए.

नगरपालिकेचे नोकरीस प्रारंभ एप्रिल १९३४. अॅक्टिंग चीफ ऑफिसर म्हणून काम केले (डिसेंबर १९४७ ते नोव्हेंबर १९५०). नंतर असिस्टंट चीफ ऑफिसर.

[२] श्री. माधव रघुनाथ काळे, बी. ए.

सन १९४० सालापासून टॅक्स सुपरिटेंडेंट म्हणून. रिव्हिजन (आकारणी) ऑफिसर ही जबाबदारी यांचेकडे असते.

[३] श्री. दयानंद गणेश कुलकर्णी.

सन १९४७ ते १९५० व सन १९५४ पासून हेडक्लार्क म्हणून काम करीत आहेत. तत्पूर्वी इतर जागांवर कामे केली आहेत.

[४] श्री. शंकर रामचंद्र पन्हाळे.

सन १९४६ साली नोकरीत प्रवेश. आरोग्यखाते, स्टोअर किपर, ऑफिस चेकर म्हणून कामे केली आहेत. हल्ली सेकंड क्लार्क म्हणून काम करीत आहेत.

[५] श्री. एम्. एस्. क्षिरसागर, बी. कॉम.

दिनांक १ ऑगस्ट १९५४ पासून नाशिक नगरपालिकेचे अकौंटट.

[६] श्री. पी. सी. महाजन, बी. कॉम., बी. ए.

दिनांक २८ डिसेंबर १९५७ पासून नासिक नगरपालिकेंत म्युनिसिपल ऑडिटर.

[७] श्री. लक्ष्मण बाळकृष्ण कुलकर्णी, बी. ए.

सन १९४८ सालापासून नगरपालिकेंस जकात सुपरिटेंडेंट म्हणून काम करीत आहेत.

[८] श्री. केशव माधव नाटकर, बी. ए.

सन १९४८ ते १९६० पर्यंत शॉप इन्स्पेक्टर. सन १९६० पासून मिसलेनियस् टॅक्स सुपरिटेंडेंट म्हणून काम करीत आहेत.

[९] श्री. आर. जे. काझी,

सन १९३३ मध्ये नोकरीस लागले. स्टँ. क. क्लार्क, मराठी टायपिस्ट, प. हे खात्यात चीफ क्लार्क म्हणून काम केलें. सन १९४३ सालापासून सेंट्रल स्टोअर किपर म्हणून काम करीत आहेत.

[१०] श्री. जी. एम. कन्नल, इलेक्ट्रिशिअन (डिप्. जे. टी. आय्. मुंबई)

दिनांक ९–१०–१९५० पासून लाईट इन्स्पेक्टर.

[११] श्री. खानचंद चंदनदास रोचाणी,

दिनांक ८ जून १९५३ पासून अतिक्रमण ऑफिसर म्हणून काम करीत आहेत.

[१२] श्री. बाबूलाल तुळशीराम बुरड.

सन १९३९ सालापासून नासिक नगरपालिकेंत नोकरीस. १९४० ते १९४२ पर्यंत सॅनिटरी इन्स्पेक्टर. सन १९४३ पासून फूड इन्स्पेक्टर.

[१३] श्री. बगोबा सिताराम साळी.

सन १९४० सालापासून नोकरीस. सन १९४८ साली सॅनिटरी कोर्सला नगरपालिकेतर्फें पाठविलें. सन १९४५ ते १९५२ पर्यंत सॅनिटरी इन्स्पेक्टर. सन १९५२ सालापासून सेकंड फूड इन्स्पेक्टर.

[१४] श्री. नारायण गंगाधर ओक, बी. ए.

सन १९५२ सालापासून नोकरीस. आरोग्य खात्यांत १० वर्षे चीफ क्लार्कचें काम व त्यानंतर शॉप इन्स्पेक्टर.

[१५] श्री. वामन विनायक दांडेकर, बी. ए.


सन १९४९ पासून नोकरीस. सन १९६० पासून शॉप इन्स्पेक्टर.

[१६] श्री. बाळकृष्ण परशराम तिडके,

सन १९५३ पासून नगरपालिकेंत नोकरीस. १ ऑगस्ट १९६१ पासून डेपो मॅनेजर.


[१७] श्री. कृष्णराव राजप्पा गवळी, ट्रेंड नॅ. फा. स. कॉलेज.


सन १९५२ पासून मोटार व फायर ब्रिगेड खात्याकडे नोकरीस असून, सन १९६० साली नॅशनल फायर सर्व्हिस कॉलेज गव्हर्नमेंट ऑफ इंडियाचें ट्रेनिंग घेतलें. दिनांक १ ऑगस्ट १९६१ पासून फायर सुपरिंटेंडेंट.



विभाग दुसरा



जीवन-गंगा
नासिक नगरपालिका


नाशिक शहर

गेल्या शतकांतील जीवनप्रवाह

- श्री. ग. त्रि. अकोलकर
- डॉ. बा. वा. दातार
- श्री. द. बा. पोतनीस
- श्री. मु. गो. देशपांडे
- श्री. मो. स. गोसावी
- श्री. वा. श्री. पुरोहित
- श्री. वसंतराव नागपुरे
- डॉ. वि. म. गोगटे

विभाग दुसरा

सन्मानीय लेखक



पूर्व परंपरा

- ग. वि. अकोलकर

● नासिकं नासिकोपमम्

श्रीप्रभु रामचंद्राच्या निवासाने पावन झालेल्या व वृद्धा गंगा गौतमी हिच्या शीतल तरंगलहरींच्या स्पर्शाने पवित्र बनलेल्या नासिक नगरीचा पुरातन अितिहास कुणाहि नासिकवासीयाचे व महाराष्ट्रीयाचे हृदय अभिमानाने नि गौरवाने पुलकित करील असाच आहे. नासिकच्या परिसरांतील मयूरांच्या केकांनी गजबजलेल्या गिरीराजींनी, निर्भयपणें अितस्ततः बागडणाऱ्या हरिणसमूहांनी व्यापलेल्या वनस्थळींनी नि प्रवासाचा श्रमभार नाहीसा करणाऱ्या जललहरींनी, आदिकवि वाल्मीकी, महाकवि कालिदास आणि नाट्यकलाकोविद भवभूति यांच्या प्रतिभेला मोहविले आहे. जनस्थानाच्या या परिसरात अनेक ऋषिमुनींनी आपली तपःसाधना पार पाडली आहे. या परिसराने शास्त्रीपंडितांची तर्ककर्कश तत्त्वचर्चा गंभीरपणे श्रवण केली आहे. हरिनामाच्या गजरात आपला आर्त स्वर मिळवला आहे, आणि राजनीतिज्ञांचे मनसुबे उत्कटतेने ऐकून त्यांची 'राजगुह्ये' विश्वासाने उराशी बाळगली आहेत. गोदावरीच्या तीरावर या जनस्थानात अनेक धर्म-समर व स्वातंत्र्य-संग्राम झाल्याने त्याला 'धर्मक्षेत्र व कुरुक्षेत्र' यांची प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. नासिकच्या चतुःसीमेवर असणाऱ्या अनेक गडांनी आणि दुर्गांनी स्वातंत्र्य-वेड्या वीरांना आपल्या कुशीत आधार दिला आहे. या नगरीने विद्वानांना सतत संभाविले. संतसज्जनांचा सत्कार केला, सागरपार कीर्ति नेणारी वस्तुसंपदा निर्माण केली. धर्मपरंपरा उजळवली व विद्वत्परंपरा जोपासली. गेल्या चार साडेचार हजार वर्षांचा नासिकचा अितिहास विविधतेने नटलेला आहे. गुणसंपदेने समृद्ध आहे. नव्या कल्पनांना आणि उद्योगांना प्रेरणा देणारा आहे. नासिकची प्राचीन भौतिक व आध्यात्मिक संपदा ही गौरवशाली व स्फूर्तिशाली आहे. भारताच्या धार्मिक, राजनैतिक व सांस्कृतिक अितिहासात नासिकने एक वैशिष्टयपूर्ण स्थान प्राचीन काळापासून प्राप्त करून घेतले आहे. नासिकची ही भव्योदात्त परंपरा ध्यानात घेऊनच एका पुराणकाराने मोठ्या मार्मिकपणे म्हटले आहे. 'शरीरसौन्दर्यात जे नाकाचे महत्व तेच भारत देशात नासिकचे.

गोदायाः संनिधौ पुण्यं नासिकं नासिकोपमम्।'

● निसर्गाचे वरदान—

नासिकवर निसर्गाचा वरदहस्त आहे. वाल्मीकी–रामायणाच्या अरण्यकांडात गोदातीराचे फार मोहक वर्णन आहे. श्रीराममुखाने वाल्मीकी सांगतात —

—अत्र गोदावरी रम्या पुष्पितैस्तरुभिर्वृता।
दृश्यन्ते गिरयः सौम्य फुल्लैस्तरुभिरावृताः॥

–खर्जूरपुष्पाकृतिभिः शिरोभिः पूर्णनगछले [illegible]
शोभन्ते किञ्चिदानम्रा [illegible] **शालयः** [illegible] ।

फुलांनी बहरलेल्या [illegible] वरीची तीन मोठी रमणीय [illegible] सभोवतालचे पर्वत [illegible] फुलांनी [illegible] झाडांनी [illegible] [illegible] फुलाच्या आकाराची [illegible] ळाच्या दाण्यांनी भरलेली [illegible] साळीची [illegible] गोल्याप्रमाणे [illegible] झाली आहेत पहा.

निसर्गाच्या अनुपम वरदानामुळेच व येथील पुष्पांच्या समृद्धीमुळेच कृतयुगात या नगराला ' **पद्मपूर** ' असे [illegible] वेड्या औरंगजेबालाही या [illegible] केले व या नगरीला '**गुलछनाबाद** —[illegible] नगरी असे नाव देण्याचा [illegible] आला नाही. या घटनेला [illegible] गोदेच्या प्रवाहास वळण बदलले असेल, शहराचे रूप पालटले असेल.

'पुरा यत्र स्रोतः पुलिनमधुना तत्र सरितां
विपर्यासो यातः घनविरलभावः क्षितिरुहाम्।

—जेथे जलप्रवाह होता, [illegible] वाळवंट झाले आहे. [illegible] मैदाने आली आहेत, आणि जेथे [illegible] होती तेथे [illegible] झाडी माजली आहे, असा बदल भवभूतीच्या रामाला [illegible] होता. पण त्यामुळे येथील [illegible] तिळमात्र फरक पडला नाही. एकोणिसाव्या-विसाव्या शतकातले आपले चंद्रशेखरही गोदा **गौरव** गताना म्हणतात—

> गंगे! येता ग्रीष्म दिनान्तीं,
> पवनहि तव जळकेलि करी
> जे रविनेजो ग्रहण [illegible]
> ते [illegible] चंद्र तु यात [illegible]
> मासे [illegible]
> तुषार चमकती जेविं [illegible]
> या समयाला [illegible]
> दिसते रम्य [illegible]

[illegible] आटापासून [illegible] गोदेचे महा-[illegible] नदीप्रदक्षिणा [illegible] पडेल.

[illegible]

[illegible] म्हणून [illegible] आढळतात त्यात [illegible] पर्वताच्या कुशीत [illegible] डेबडचा-[illegible] वसलेली आहेत. आजही [illegible] तटबंदी त्याच्या [illegible] दक्षिणेस त्रिरश्मी (पांडव-[illegible]) [illegible] उत्तरेस रामशेज व चांभार [illegible] पूर्वेस [illegible] [illegible] प्रदेशाला [illegible] प्रकारची अभे-[illegible] एकेकाळी नाशिकच्या पूर्वेस [illegible] (सिन्नर) [illegible] गोवर्धन ([illegible]) उत्तरेस [illegible] (चांदवड) अशी राजधानीची गावे होती. नाशिक हे त्याचे [illegible] केवळ तीर्थस्थान म्हणून (किंवा [illegible] अभाव म्हणून) ते राजधानी झाले [illegible] शिवाजी [illegible] व [illegible] त्यांनी [illegible] नाशिकच्या परिसरातला [illegible] वरेचसे [illegible] सुरुंग लावून [illegible] उध्वस्त केले. नाशिकचा भौगोलिक व प्राचीन राजकीय [illegible] आहे.


नाशिकचे पूर्वस्वरूप व विस्तार


नाशिकची विभागणी आज जशी नाशिक-[illegible] [illegible] विभाग होता. [illegible] **गढीचा** भाग [illegible] होते. नाशिक [illegible] [illegible] (नवशिव : नाशिक) वसलेले गाव

गांवकरी प्रेस




नासिकचा काळाराम : पेशव्यांचे सरदार ओढेकर यांनी बांधलेले राममंदिर साध्या पण दणगट शिल्पाचा एक नमुना.






❖ नारोशंकर मंदिर व घंटा : सरदार राजेबहाद्दर यांनीं बांधलेलें शिवमंदिर. दर्शनी भागांत नारोशंकरी घंटा. कोरीव काम पहात रहावें.



❋ सुंदरनारायण मंदिर : गोदावरीच्या पश्चिम तीरावरील मंदिर सरदार चंद्रचूड यांनी बांधले [illegible]




❋

गांधी–ज्योत : राष्ट्रपित्याची स्मृति सतत जागृत ठेवणारें गोदावरीच्या तीरा–वरील स्मारक.

गांवकरी प्रेस



❖ सिहस्थ मिरणूक : आली सिंहस्थ पर्वणी. . .,–सिंह–स्थांत भारतांतील निरनिराळे आखाडे येतात. प्रमुख आखाड्याचे महंत असे हत्तीवरून मिरवतात.



❖

ध्वजा ! या ध्वजा वैष्णवाच्या नाहीत, महंताच्या आहेत. ध्वज–मिरवणूक हें सिंहस्थाचें खास आकर्षण असते.

गांवकरी प्रेस





तपोवनांतील नवीन बांधलेले लक्ष्मीनारायण मंदिर.





रथयात्रा : प्रभु रामचंद्रांच्या रथाचा हा सोहळा म्हणजे भक्तीची लयलूट. चैत्र शुद्ध एकादशीस हा सोहळा भरतो.

गावकरी प्रेस

त्या कालच्या पद्धतीप्रमाणे शहराभोवती तट-बंदी असावी व त्यात ठिकठिकाणी वेशी होत्या या नवटेकांची नांवे– दुर्गा टेक, गणेश टेक, चित्रघंटा टेक, डिंगरआळी टेक, म्हसरूळ टेक, जोगवाडा टेक, पठाणपुरा टेक, व कोकणी टेक अशी होती. वेशीची नांवे आसराची वेस, भगूर दरवाजा, त्र्यंबकदरवाजा, दिल्लीदरवाजा नावदरवाजा, सतीदरवाजा, अशी होती. सुंदर-नारायणाच्या पश्चिमेस एके काळी नदीपात्रांत स्मशानभूमी असून तेथे सतीदरवाजा होता. सतीच्या मूर्ति परवापरवापर्यन्त तेथे दिसत. शहराच्या भोवती विपुल राया, बागबगीचे व वाड्या होत्या. सुंदरनारायणाच्या आसपास विठ्ठलवाडी, पलिकडे हिरावाडी, गणेशवाडी, असे भाग होते. क्षेमकल्याणी व चंद्रात्रे ही येथील फार पुरातन ब्राम्हण घराणी. राष्ट्रकूट, चालुक्य व शिलाहार यांच्या कालात अनेक मराठी, गुजराती व नंतरच्या कालात मुसलमान येथे येऊन स्थायिक झाले. प्रत्येक नव्या राजवटीत नवीन समूह वा जमाती येथे आल्या व स्थिर झाल्या आणि शहराचा विस्तार वाढत गेला.

पुराणकालातील तपोभूमि व तीर्थस्थान

नासिकचे पुराणांतरीचे महत्व दोन प्रकारचे आहे– एक तपोभूमि म्हणून व दुसरे तीर्थक्षेत्र म्हणून ! जगन्माता पार्वती व तिचे सुपुत्र गणेशपंडित यांनी गोदावरीला भूलोका-वर आणण्यासाठी व्यूह रचला. गौतममुनीला गोहत्येचे पाप लावविले. त्यातून मुक्त होण्या–साठी तपोबलाने त्यांनी गोदावरी भूतलावर आणली. याच्या मुळाशी पार्वतीमाईचा हेतु होता लोककल्याणाचा. अवर्षणामुळे अन्नान्न दशा झालेल्या दण्डकारण्यातील प्रदेशांत धान्य-समृद्धि व्हावी म्हणून गोदेचे तेथे अवतरण घडविले. ब्रह्मदेवाने आपले मनोमन घडलेले पाप नाहीसे व्हावे म्हणून अरुणावरुणा संगमावर तपश्चर्या केली. शिव व विष्णूहि त्याच्या सान्निध्य येऊन राहू लागले. त्यामुळे नासिक हे हरिहर क्षेत्र बनले. भगवान शंकरांना लागलेल्या ब्रह्महत्येचे निरसनहि रामकुंडात स्नान केल्याने झाले. श्रीकपालेश्वर स्वरूपात येथे त्यांनी वास्तव्य केले. श्रीकपाले-श्वर हे ज्योतिर्लिंग मानले जाते. नीळकंठे-श्वराची स्थापना जानकीपिता जनक याने केली.

श्रीरामचंद्रांनी पित्याची आज्ञा पालन करण्यासाठी वनवासाचे दिवस सीतामाई व लक्ष्मणजी यांच्या समवेत पंचवटीत काढले. त्यांना हे स्थान विशेष आवडले होते. रामप्रभू हे महाविष्णूंचे अवतार. त्यांच्या पदरजांने पवित्र झालेली भूमि सामान्य जनांना पावक वाटावी यात नवल नाही. श्रीराम भगवान शंकराचे उपासक. भगवान शिवजीस हिरे, माणकादि पंचरत्ने त्यांनी अर्पण केली. ते पंचरत्नेश्वराचें मंदीरहि आज नाशकात आहे. श्रीरामचंद्रांनी खर, दूषण, त्रिशिर राक्षसाचा नाश करून 'त्रिकंटका'चे जनस्थान' बनविले.

श्रीगोदेच्या पात्रात पितृतीर्थ, ऋण–विमोचन तीर्थ, गालव तीर्थ, कण्वतीर्थ, विश्वा-मित्र तीर्थ, श्वेत तीर्थ, अग्नीतीर्थ अशी पाच–पंचवीस तीर्थे आहेत. प्रत्येकाशी काहीना काही कथा निगडित आहे. कुठे यमधर्माचा उद्धार, कुठे सूर्याचे उपेशी मीलन, कोठे पृथ्वीने घेतलेल्या कपिलागाईच्या दुग्धप्रवाहाचा गोदेंत झालेला संगम, अशा अनेक घटना त्या त्या ठिकाणी घडल्या आहेत. मातेच्या मुक्तीसाठी गरुड अमृतकुंभ नेत असता पाच ठिकाणी त्यातील अमृतबिंदु सांडले, त्या पाच भाग्य–वान स्थानांपैकी नासिक हे एक. म्हणून हे सिंहस्थांत कुंभमेळ्याचे ठिकाण बनले. सूर्य–शापाने पांच ब्राह्मणकुमार जेथे वटवृक्षात रूपान्तर पावले, ते पंचवटीचे स्थान. या सर्व कथांत सत्याचा अंश किती आहे, त्यांतील रूपकार्य काय आहे, की स्थानमहात्म्य वाढ–विण्यासाठी पुराणकारांच्या कल्पनेतून या कथा निर्माण झाल्या आहेत हें सांगणे कठीण. या सर्व कथांचा रोख एकच दिसतो तो म्हणजे

नासिक हे भारतीय संस्कृतीत [illegible] बन-विणे. नासिकचे हे माहात्म्य [illegible] दक्षिण काशी म्हणून मान्यता देऊन सर्व भारतीयांनी मान्य केले आहे. पद्म, ब्रह्म, [illegible] वामन, शिव आदि अनेक पुराणांत [illegible] तीर्थमहिमा वर्णिला [illegible] फार प्राचीन [illegible] हे स्थान लोकांनी योग्यांचे सिद्धिस्थान [illegible] माहात्म्य [illegible]

नासिक केवळ तीर्थस्थान [illegible] आत्म-साधनेच्या [illegible] आध्यात्मिक वातावरण येथे आहे [illegible] मार्गातील [illegible] श्रीनिवृत्तिनाथांनी समाधि घेतली ती नासिकच्या परिसरात त्र्यंबकेश्वरी. पण खुद्द नासिक-[illegible] अशी स्थाने दाखविता येतात. [illegible] शृंगेरी पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य श्रीमद् सच्चिदानन्द महाराज व त्यांचे शिष्य शंकराचार्य ब्रह्मानन्द स्वामी यांच्या समाधी असून तेथे आता आचार्यांचा मठ आहे. रामचंद्रि-राच्या उत्तरदरवाजाला केशव महाराजांनी योगसमाधि घेतल्याजागी केशवमहाराजांचा मठ आहे. (अ. वि. गृहाची शाखा येथे सध्या आहे) कपालेश्वराशेजारी 'अजगर बुवांचा मठ' आहे. तोहि एका विरागी कनोजी ब्राह्मणाच्या समाधीचे स्थान आहे. श्रीरघुनाथ भटजी या सिद्ध पुरुषानेहि अशीच जिवंत समाधि गोदातटी घेतली. त्याचाही मठ [illegible] नासिकचे विद्याकेंद्र होते. (त्यांच्या समा-गृहाच्या माडीवर व आवारात सध्या '[illegible]-करी' आहे) सोमवारातील स्वामी नारायण मठ हाही एका सिद्ध पुरुषाचे समाधिस्थान. हे तिन्ही चारी मठ गेल्या तीन-चार शतकांतील. श्री समर्थ स्वामी रामदासांनी नासिकच्या परिसरातच (टाकळी येथे) गायत्री पुरश्चरण केले. नाशकांत बसून त्यांनी श्रीवाल्मीकी रामायण स्वतःच्या हाताने लिहून [illegible] नासिकचे हे माहात्म्य [illegible] भागवतांत पुढील प्रमाणें वर्णिले आहे

काशीपुरी च [illegible] महाकालं च नासिकम्।
त्र्यंबकं च महाक्षेत्रं [illegible] इमं भुवि ॥
स्कं. १ २१ ३२

'तीर्थ' याचा अर्थ 'सिद्धिस्थान.' योगमार्गाने [illegible] अनेक [illegible] आज नाग-[illegible] व त्यांच्या [illegible] आहेत. त्यांतील [illegible] गजानन महाराज [illegible].

पुराणकालातून [illegible] ऐतिहासिक कालात प्रवेश करतांना नासिकच्या [illegible] अनेक पुरावे [illegible] उपलब्ध होतात व नासिकच्या [illegible]. इतर [illegible] सुसंगत जीवनपट आपण पाहू शकतो. [illegible] (म. प्र.) येथील [illegible] शिलालेख, पांडव लेण्यांतील २४ शिलालेख, नासिकच्या गावातील [illegible] नदी-पात्रात [illegible], [illegible] व [illegible] (वस्तु[illegible] आहे) आणि ग्रंथग्रंथांतरीचे उल्लेख यांच्या आधारे नासिकचे ऐतिहासिक कालातील महत्त्व स्पष्ट-पणे लक्षात येते

● पहिले स्वातंत्र्यसमर-

[illegible] गौतमी-पुत्र सातकर्णी याने वैदिक धर्माची पुन-र्स्थापना केली. [illegible] व महाराष्ट्र [illegible] केला महाराष्ट्रांतील हे पहिले स्वातंत्र्यसमर नासिक येथे लढले गेले. महाराजमाता गौतमी बालश्रीने आपल्या पुत्राची [illegible] कृत्ये मोठ्या अभिमानाने [illegible] शिलांकित करून ठेवली आणि (लेणे क्र. ३) या युद्धाची माहिती [illegible] आवश्यक-[illegible]. या वर्ण-[illegible] नाहिसे होते. यज्ञश्री सातकर्णीने [illegible]

स्थापिली आणि रुद्रदामन् क्षत्रपाच्या कन्येशी विवाह केला. शालिवाहन राजांच्या कारकीर्दीत विद्या, व्यापार व कला यांना बहर आला. शालिवाहन राजे हे प्राकृत भाषेचे—सामान्य जनांच्या बोलीचे पुरस्कर्ते होते. हालाची गाथासप्तशती प्राकृतात आहे व ती गोदावरीतीरी निर्माण झालेली आहे. सातवाहनांचा राज्यारंभ नाशिक व पैठण येथूनच चालत असावा. या काळात नाशिक हे धर्मसंस्थाचे पीठ व व्यापाराचे केंद्र होते याची साक्ष इजिप्तचा प्रवासी टॉलेमी याच्या ग्रंथात पहावयास मिळते.

त्याच काळात शकवंशीय क्षहरात या क्षत्रप घराची सत्ता अपरान्त (कोंकण) व लाट (गुजरात) प्रदेशावर होती. भडोच हे त्याचे राजधानीचे ठिकाण. सातवाहनांना मागे सारून महाराष्ट्रावर अंमल बसवण्याचा प्रयत्न त्यांनी केला. क्षत्रप राजा नहपान याने नाशिक व जुन्नर ही आपली प्रमुख केंद्रे बनवली. त्याची कन्या दक्षमित्रा व जावई उषवदात यांचे शिलालेख पांडवलेण्यात (क्र. १०-१४) आहेत. त्यांनी येथे ब्राह्मणभोजने घातली. गोदाने दिली. धर्मशाळा बांधल्या, अशा अनेक धर्मकृत्यांची त्यात नोंद आहे. नहपान क्षत्रपांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केला होता. ते मूळचे अहिंदू. वरील दानधर्म हे बहुधा बौद्धधर्म प्रसारासाठी वशीकरण मार्ग असावेत.

इ. स. २०० ते ५०० हा काल महाराष्ट्रात यादवीचा गेला. त्या काळात नाशिकखानदेशावर आभीर (गौळी) लोकांचे राज्य होते. त्याच वेळी व नंतर त्रैकूटक, अश्मक व वाकाटक घराण्यांची राज्ये या भागात आली. वाकाटकांचे राज्य वऱ्हाडात होते. त्यांनी बुद्धधर्मियांना आश्रय दिला होता. पण वैदिक धर्माभिमानी राष्ट्रकूट व चालुक्य यांनी बौद्धांचा पाडाव करून हिंदू राज्याची स्थापना केली. दुसरा पुलकेशी चालुक्य इ. स. ६१० मध्ये राज्यावर आला. तो महाप्रतापी होता. सम्राट हर्षवर्धनाचाही त्याने पराभव केला होता. इ. स. ६४० मध्ये **ह्युएनसंग** हा पुलकेशीच्या दरबारी आला, त्यावेळी पुलकेशीचा मुक्काम नाशिकजवळ होता. ह्युएनसंगने पुलकेशीच्या वैभवाची व मराठ्यांच्या पराक्रमाची मुक्तकंठाने स्तुति केली आहे. चालुक्यांचा काळ हा भरतखंडातील वैदिक धर्माच्या पुनरुज्जीवनाचा कालखंड होय. प्रख्यात मीमांसक कुमारीलभट्ट हे चालुक्यांच्या काळातले. आद्य शंकराचार्यांचा काळही हाच. या काळात नाशिकला धर्मपीठाची योग्यता होती, धर्मनिर्णय करण्याचा अधिकार येथील धर्माधिकाऱ्यांना श्री शंकराचार्यांनी दिला असून तो एका ताम्रपटावर नोंदविलेला उपलब्ध आहे.

पण इ. स. ७५० च्या सुमारास महाराष्ट्रावर पुन: राष्ट्रकूटांनी आपले वर्चस्व बसवले. आणि दहाव्या शतकात चालुक्य वंशीय तैलपाने राष्ट्रकूटांचे राज्य धुळीस मिळविले. ही चालुक्यांची सत्ता प्रामुख्याने दक्षिण महाराष्ट्रात होती. गोदातीरी मात्र यादवांचे (सेऊणांचे) राज्य होते. प्रारंभी सिन्नर, चांदूर (चांदवड) ही त्यांची राजधानीची नगरे होती पुढे त्यांनी ती देवगिरी (दौलताबाद) येथे हलविली. यादवांचे साम्राज्य विस्तृत होते. महादेव व रामदेवराव यादवांच्या कारकीर्दीत हेमाद्री व बोपदेव ही राज्यकार्यधुरंधर, शास्त्रनिष्णात व कलाभिज्ञ जोडी निर्माण झाली. त्यांनी स्वत: अनेक ग्रंथ निर्माण केले. त्यांच्या प्रोत्साहनाने नाशिकमध्ये त्या काळात अनेक शास्त्रीपंडितांचा उदय झाला असावा. यादवांच्या कारकीर्दीचा कळस म्हणजे मराठी भाषेचा सौभाग्यालंकार जो ज्ञानेश्वरी त्या ग्रंथाची निर्मिती !

या यादवीच्या काळांत जैन येथे येऊन स्थायिक झाले होते. इ. स. १०० ते ११०० या कालांत चांभारलेणी खोदली गेली. जैनांचे ८वे तीर्थंकर चंद्रप्रभ स्वामी नासिकला रहात होते.

उत्तरेकडील मुसलमानांच्या आक्रमणामुळे यादवांचे राज्य अस्तास गेले. नासिक हेही मुसलमानांच्या सत्तेखाली गेले. बहामनी राज्याची स्थापना होऊन तिचे चार शकले झाल्यावर नासिक अहमदनगरच्या सुलतानाच्या ताब्यांत गेले. पुढे मोंगली सत्तेच्या उत्कर्षकाळात औरंगजेबाची दक्षिणच्या सुभ्यावर नेमणूक झाली. औरंगजेबाने नासिकचे प्राचीन वैभव नष्ट केले. पंचवीस देवळे त्याने उध्वस्त केली. त्यांत सुंदरनारायणाचे मंदिरही होते. तेथे त्याने थडगे उभारले. सुंदरनारायणाच्या आसपासचा भाग स्मशानभूमि झाली. मध्यवस्तीतील महालक्ष्मीच्या मंदिराच्या जागी त्याने जुम्मा-मशिद बांधली. (त्या मशिदीच्या दरवाजावर गणपतीची मूर्ति अद्यापही आहे) औरंग-दरवाजा, दिल्ली दरवाजा हेही मोंगलकाळ नव निर्माण झाले. राजकीय दृष्ट्या नासिक नगर संगमनेरचा भाग बनले ते इ. स. १८६७ मध्ये स्वतंत्र जिल्ह्याचे ठिकाण होईपर्यंत.

जागती धर्मज्योत

औरंगजेबाने अनन्वित धर्मच्छळ केला असला तरी नासिकवासियांची धर्मभावना लुप्त झाली नाही. स्वधर्मरक्षणासाठी अन्य-मार्गाने नासिकने **जोरदार प्रतिकार** केला. शहाजहान बादशहाच्या कारकीर्दीत विद्यानिधि **कवीन्द्राचार्य सरस्वती** म्हणून एक तेजस्वी पुरुष नाशकात जन्मास आला. त्याची संस्कृत ग्रंथरचना बरीच आहे पण त्याची मुख्य कामगिरी म्हणजे शहाजहानाच्या दरबारांत त्याने केलेली हिंदूंची वकिली. आपल्या अस्खलित अभेद्य व तेजस्वी वक्तृत्वाने काशी व प्रयाग येथे जाणाऱ्या हिन्दू यात्रेकरुंवर लादलेला अन्याय कर त्याने माफ करवून घेतला. याबद्दल अखिल हिंदु राष्ट्राने त्याचा गौरव करून त्यास मानपत्र अर्पण केले. नासिकच्या तेजस्वी वक्तृत्व परंपरेचा इतिहासाला ठाऊक असलेला हा पहिला पुरावा.

नासिकमध्ये या काळात शास्त्राध्ययन व पुराण–प्रवचन याची परंपरा चांगलीच रूढ असावी. बोपदेव याने श्रीमद् भागवतावर रचना केली होती. संतश्रेष्ठ एकनाथ याना भागवतावर टीका लिहिण्याची प्रेरणा झाली ती चंद्रादित्यपुर (चांदवड) येथे भागवत प्रवचन ऐकून. नासिकच्या तीर्थयात्रेच्या निमित्ताने नाथांचे गीता, भागवत इत्यादि ग्रंथांचे दृढ अध्ययन नासिकलाच पुरश्चरणाच्या काळात झाले असावे.

साहित्याची लेणी: एकनाथाच्या काळांतच सोळाव्या शतकात **कृष्णयाज्ञवल्क्य** या नावाचा प्रसिद्ध कवी होऊन गेला. त्याने देवीमहात्म्य नावाचा ग्रंथ लिहिला. पण त्याची फार मोठी कामगिरी म्हणजे **कथाकल्पतरु** या पौराणिक ग्रंथाची रचना. हा त्याने नासिक येथेच रचला आहे. त्याच काळातला दुसरा कवि व तत्त्वज्ञ म्हणजे **रंगनाथ** चित्सदानंदलहरी, योगवासिष्ठ-सार, व पंचरत्न ही त्याची ग्रंथनिर्मिति तिन्ही मिळून वीस हजारांवर रचना आहे. तो 'नासिकीं वसत' असे त्याच्या शिष्यांनी नमूद केले आहे. नासिकचे साहित्य-सौभाग्य वाढ-विणारा आणखी एक कवि म्हणजे मध्वमुनी. कृष्णजीवनावरील त्यांची अनेक गोड पदे व प्रल्हादाख्यान ही महाराष्ट्र शारदेची लेणी आहेत. प्रसिद्ध कवि अमृतराय हे त्यांचेच शिष्य. नासिकमध्ये जशी देववाणीत रचना पूर्वीच्या व नंतरच्या काळात झाली. तशी ती लोकवाणी मराठीतहि झाली, नासिकची कवि परंपरा फार जुनी आहे व ती मधुर नि तेजस्वी अशी दोन्ही प्रकारची आहे.

● स्वराज्याच्या उष:कालात—

श्री शिवछत्रपतींचा अवतार मुळी स्वराज्य व स्वधर्म यांच्या संरक्षणासाठी त्यांचा पराक्रमसूर्य तळपू लागताच नासिक-पंचवटी या क्षेत्रावर पसरलेला पारतंत्र्याचा अंधकार नष्ट होऊ लागावा यात नवल नाही. पेशवाईत तर नासिक महाराष्ट्राची उपराजधानीच बनले. नासिकचा खऱ्या अर्थाने कायापालट झाला पेशवाईत. श्रीगोदेला देवळांची व बंदिस्त घाटांची दाने अर्पण करून तिचे महत्व व शोभा वाढविण्याचा महाप्रचंड प्रयत्न झाला तो पेशवाईत. नासिक शहराचा विस्तार होऊन त्याला आजचे नवे स्वरूप प्राप्त झाले ते पेशवाईतच. येथील विद्या, कला व व्यापार यांना प्रोत्साहन मिळाले ते पेशवाईच्या चढत्या व उतरत्या काळातच.

नासिकच्या क्षेत्रोपाध्यांच्या नामावळीत ज्या थोर व प्रसिद्ध व्यक्तींचे लेख आहेत ते पाहिले म्हणजे नासिकचे धार्मिक व सांस्कृतिक महत्व सतराव्या व आठराव्या शतकात अखिल भारतात नव्याने कसे निनादू लागले होते याची कल्पना येते. नासिकच्या तीर्थोपाध्यायांच्या वहयात श्रीसमर्थ रामदास व श्री शिवाजी महाराज यांच्या हातचे लेख आहेत. त्याचबरोबर भक्तश्रेष्ठ तुकाराम यांच्या मुलाचेही हस्ताक्षर आहे श्री शिवप्रभूंचे साथी व सरदार व शूर मावळे वीर स्वराज्य संस्थापनेसाठी तळहातावर शिर घेऊन लढणारे येसाजी कंक, नेताजी पालकर बाजी पासलकर, बाजी घोरपडे, मुरारराव घोरपडे, हंबीरराव मोहिते हे नासिकला येऊन गेले शिवाजी महाराजांना राज्याभिषेक करणारे गागाभट्ट, आणि प्रधान मंडळातील मोरोपंत डबीर व आबाजी चिटणीस यांनी श्रीगोदेचे दर्शन घेऊन स्वतःला पावन करून घेतले. मिर्झा राजा जयसिंग हा कुलोपाध्ये हिंगणे यांच्याकडे येऊन गेला. संभाजी महाराजांचा कंठमणि कविकलश कलुशा याचेही पाय नाशकास लागले. औरंगजेबाला 'देमाय, घरणी ठाय' करून सोडणारे वीरद्वय धनाजी जाधव व संताजी घोरपडे यांनी आपल्या तट्टांना श्रीगोदेचे पाणी दाखवून ताजेतवाने केले व श्रीरामप्रभूंचे आशीर्वाद मागितले. श्री शिवाजी महाराजांनी सुरतेवर स्वारी केली ती नासिकमार्गे. स. १६६४ मध्य त्यांचा मुक्काम नासिकला होता. 'समर्थाचिया सेवका वक्र पाहे। असा सर्व भूमंडळी कोण आहे!' ही पराक्रमाला आवाहन देणारी वाणी ज्यावेळी नासिककरांच्या कानात घुमत होती व वर उल्लेखिलेली मातबर मंडळी जेव्हा नासिकला भेट देऊन जात होती, पेशव्यांचे कुलोपाध्ये देवराव हिंगणे फारशीवरील प्रभुत्वाने जेव्हा पेशव्यांचे वकील म्हणून दिल्लीस गेले, त्यावेळी स्वराज्यस्थापनेच्या व स्वधर्म-सेवेच्या कल्पनेने नासिककरांचे अन्तःकरण कसे उचंबळून येत असेल!

● सोनेरी कळस झळकू लागले—

औरंगजेबाच्या कारकीर्दीतच नासिकचे 'गुलाब-नगरी' (गुलछनाबाद) हे नांव मागे पडून तीर्थक्षेत्राचे वैभव त्याला प्राप्त करून देण्याचे प्रयत्न सुरू झाले. हे तीर्थक्षेत्र मराठी राज्यांत असावे म्हणून सन १६७२ मध्ये मोरोपंत पिंगळे यांनी नासिकवर स्वारी केली होती. संभाजीच्या आश्रयाला आलेला औरंगजेबाचा मुलगा अकबर सन १६८२ त नासिकला होता. सन १६८४ मध्ये मराठ्यांनी पुनः स्वारी केली. सन १६९६ मध्ये सातारचे विश्वास यांनी रामकुंड बांधले. नासिकच्या वैभवप्राप्तीची ती मुहूर्तमेढ ठरली मराठ्यांचा अंमल नासिकवर सुरू झाल्याची ती साक्ष मानता येईल. पहिल्या बाजीरावाच्या कारकीर्दीत नासिक संपूर्णपणे मराठी राज्यांत आले व उपराजधानीपदाकडे नासिकची वाटचाल सुरू झाली. नासिकच्या उद्धाराचे कार्य पेशवे व त्यांचे अंकित सरदार यांनी

पुढील [illegible]

[illegible]

(१[illegible] [illegible] [illegible] देवमंदिर (१[illegible])

श्री बालाजी मंदिर (१[illegible]) श्री गोराराम मंदिर (१[illegible]) आणि श्री भद्रकाली मंदिर ([illegible]) [illegible] मुरलीधर मंदिर [illegible] [illegible] प्राणप्रतिष्ठा [illegible] श्री [illegible] (१[illegible]) श्री रामेश्वर (नारोशंकर) (१[illegible]) विठ्ठल (१[illegible]) [illegible] मंदिर (१[illegible]) [illegible] (१[illegible]) [illegible] (१[illegible]) श्री शंकराचार्यांचा मठ (१[illegible]) [illegible] (१[illegible]) [illegible] सन १[illegible] [illegible] श्री काळाराम [illegible] पासून [illegible] पर्यंत सारी [illegible] बघितले कुत्रा- [illegible] [illegible] मोठे [illegible] व [illegible] [illegible] [illegible] [illegible] व बाललीला [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible] दुमदुमून गेली असतील. [illegible] येथील

होळकराच्या व नासिक मधील पळशीकराच्या वाकमाळीतील लाखो रुपयांच्या वाड्यांची येथे शाळा असतील व मनमुराद असंख्य देवळे असतील देवळे म्हणजे पुराणप्रवचन, कथा-कीर्तन, उत्सव, संतर्पण यांची केंद्रे. लोकशिक्षणाची ती त्या काळ मोठी केंद्रे. पंचवीस वर्षे प्रत्यक्ष अहिल्याबाईच्या आश्रयाने राहिलेले शास्त्री पंडितांनी येथे संभाषण झाली. एकेल आणि कथा कीर्तनकारांना येथे स्फूर्ती मिळाली असेल या काळात निर्माण झालेली ग्रंथसंपदा अद्याप प्रकाशात यावयाची आहे. पण इंग्रजी राजवटीच्या आरंभी व मध्यकाळी जी प्रसिद्ध संस्कृतज्ञ घराणी उदयास आली, कीर्तनकार नावाजले, कविकोकिळ गाऊ लागले. आणि स्वातंत्र्यदेवतेचे निःसीम उपासक विद्वत्तेच्या तेजाने चमकले, त्या सर्वांचा पाया या कालखंडात घातला गेला, अशी इतिहासाची साक्ष आहे. शिवशाही-पासून पेशवाई पर्यंतचा काल म्हणजे नासिक-च्या जीवनातील चैतन्याने नटलेले सोनेरी पान आहे.

● स्वराज्याची अखेर

पेशवाईच्या अस्तावरोबरच नासिकचे स्वातंत्र्यसूर्य अस्ताला गेला. सन १८०३ मध्ये होळकर व अमृतराव पेशवे यांनी नासिकची लूट केली. पेंढाऱ्यांचाहि उपद्रव झाला. १९ एप्रिल १८१८ या दिवशी ब्रिटिश कमिशनर कॅ. ब्रिग्ज यांनी नासिक घेतले. ७६ लक्ष रुपयांचे पेशव्यांचे जडजवाहिर व हजारो रुपयांचे चांदीचे सामान त्यांच्या हाती लागले. नासिक हे संगमनेर जिल्ह्यातील एक तालु-क्याचे सामान्य गाव बनले.

इंग्रजी राजवट सुरू होताच नवसंस्कृतीचे वारे वाहू लागले. मिशनरी लोकांनी ... आपले धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले. सन १८... मध्ये येथे ख्रिस्ती धर्माची पाळेमुळे रोवली गेली. रे. गार्डन व रे. मिचेल डिक्सन यांनी नासिकला येऊन तळ ठोकला. रविवार पेठेतील पेशवे वाड्यात (सध्याच्या पेठ रस्त्याकडच्या जागी शाळेच्या पुढील इमारतीत) १३ जुलै १८३२ मध्ये मिशनची स्थापना झाली. त्यांनी धर्मप्रसाराबरोबरच शिक्षणप्रसाराला बरोबरच सुरुवात केली. ... यांनी मुलींची शाळा व मराठी शाळा काढली. सन १८३५ मध्ये मिशनच्या ... मराठी शाळा. १ मुलांची शाळा व १ इंग्रजी शाळा सुरू केली. त्या शाळेत आरंभी फक्त १२ विद्यार्थी होते. पण सन १८५० मध्ये ही संख्या ... पर्यंत गेली. सरकारी हायस्कूलचे विद्यार्थी ... अवघे ८०-९० विद्यार्थी होते. सन १८५४ मध्ये मिश-नऱ्यांनी शहराच्या पश्चिमेकडील जागा खंडाने घेऊन 'शरणपूर' वसाहतीची स्थापना केली. तेथे अनाथाश्रम त्यांनी उघडला व ख्रिस्ती-धर्माचे शिक्षण देणारी शाळाही काढली. प्रसिद्ध प्रवासी लिव्हिंगस्टन हा सन १८६५ मध्ये येथे येऊन गेला व शरणपुरातील ८–१० मुले तो बरोबर घेऊन गेला.

● मिशनऱ्यांचा हाहाकार

मिशनऱ्यांच्या धर्मप्रसाराच्या कार्याला नासिकच्या समाजाने चांगलाच विरोध केला. ... मोठ्या ... हिंदू समाजातून ... कोणी निघाले नाहीत. हिंदुधर्मियांना नासिक हे ... मिशनऱ्यांना मान्य करावे लागले. सन १८४३ मध्ये ... यांचे धर्मांतराचे व धर्मगुरूंचे प्रकरण ... गाजले व पुणे व नासिक येथील ब्रह्मवृंदापुढे ते निर्णयासाठी ...

मिशनऱ्यांचा धर्मप्रसार ... तरी शिक्षण प्रसार ... झाले. ... कारखाने महाराष्ट्रातील नारीच ... लोकजी-वनासाठी त्यांनी सुरू केलेल्या सुधारणा लोकांना

आकृष्ट करीत होत्या. सन १८४० मध्ये सिव्हिल हॉस्पिटलची स्थापना झाली त्याच वर्षी येथे असलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी नेटिव्ह जनरल लायब्ररींची स्थापना केली (हल्लीचे सार्वजनिक वाचनालय) नासिकच्या नव्या जीवनाचा हा आरंभबिंदु म्हणावयास हरकत नाही.

● अध्यापन-लेखनाची उज्ज्वल परंपरा

या नव शिक्षणाने स्वधर्मश्रद्धा व आचार परंपरा यांचा लोप व संकोच फार मोठ्या प्रमाणांत नासिकला तरी झाला नाही. संस्कृत विद्येची परंपरा इंग्रजी राजवटीच्या आरंभ-कालात येथे मोठ्या प्रमाणावर नांदली व वैदिक वाङमय, काव्य इत्यादि संबंधी ग्रंथ-संपत्तिहि निर्माण होत राहिली इ. स. १८५० च्या आगे मागे अनेक वेदपारंगत, ब्राम्हणपाठी, घनपाठी विद्वान, तसेच वैय्या-करणी व वैद्यक निष्णात घराणी येथे होती. हरिशास्त्री गर्गे, सखारामशास्त्री गर्गे, फडके इ. मंडळी श्री. एकनाथ शास्त्री पडेगाव-कराची परंपरा चालवित होती. सन १८३१ मध्ये अच्युतराय मोडक यांनी साहित्यसार व भामिनीविलास यावर टीका लिहिल्या लक्ष्मणशास्त्री यांनी भांती अभिनव रामायण चंपू रचिला. बापूभट्ट चंद्रात्रे यांनी सप्तसतो-वर व्याख्या लिहिली. हरिबाबा पडेगावकर कृष्णशास्त्री महाबळ यांचीहि विपुल रचना केली. श्री. नानाशास्त्री तर्टे, वाग्भट या वैद्यक ग्रंथाच्या छपाईच्या तयारीत होते. नासिकच्या आयुर्वेद विशारदांच्या परंपरेचे ते जनक श्री. बाळकृष्ण देव, चिंतामणी देव इ. घनपाठ, जटापाठ म्हणणारे वैदिकही अनेक होते. श्रौत व स्मार्त याज्ञिकी करणारे अनेक मंडळी होती. पुराणिक, प्रवचनकार व कीर्तन-कारहि होते. महाराष्ट्रात व भारतात त्याना मानाचे स्थान होते भारतांतील विविधभाषी यात्रेकरू नासिकला येत असल्याने भारतांतील बहुतेक भाषा बोलणारी कुलोपाध्ये मंडळी येथे होती तसे संस्कृत पंडितहि होते.


● कलाकौशल्य व व्यापार

कलाकौशल्य व व्यापार या बाबतीत नासिक पूर्वीच्या कालात मागे नव्हते. पांडव-लेण्यांतील काही मूर्तिकाम व नक्षीकाम उत्कृष्ट दर्जाचे आहे नासिक येथे पेशवाईच्या वा त्या पूर्वी बांधलेल्या वाड्यात जे लाकडी शिल्प आहे ते विशेषता खासण्याजोगे होते. पैठणच्या पैठणीप्रमाणे नासिकची रेशमी वस्त्रे पूर्वी प्रसिद्ध होती. तेराव्या शतकातील मार्कोपोलो याला बगदाद येथे जो रेशमी कापडाचा नमुना मिळाला. ते नासिक येथे तयार झालेले होते. ही विणकर मंडळी गोवर्धन (गंगापूर) येथे रहात असत. नासिक हे तांब्या पित-ळेच्या भांड्यासाठी प्रसिद्ध होते. पुढे चांदीच्या भांड्याविषयी व नक्षीकामाविषयीहि नासिकचा लौकिक सर्वत्र पसरला.

नासिकचा पौराणिक, ऐतिहासिक, भौतिक व सांस्कृतिक जीवनाचा प्रवाह हा असा आहे. दक्षिण-उत्तर भारताच्या सीमेवरचे क्षेत्रस्थान मोगली सत्ता व मराठी स्वराज्य यांच्या सीमा रेषा येथे भिडलेल्या, गुजरात व खानदेश यांचा दुवा जोडणारे ठिकाण, शैव, वैष्णव, शाक्त व योगमार्गी वैदिक धर्मानुयायी व भागवतधर्मीय या सर्वांचे आश्रयस्थान, ब्राम्हण बौद्ध, जैन, या संस्कृतीचे मिलनस्थान. या सर्वांच्या संगमामुळे आदान प्रदानामुळे नासि-कचे जीवन बहुरंगी झाले. सन १८६४ मध्ये नगरपालिकेची स्थापना झाली. नासिकच्या या पूर्वपरंपराचा विकास विविध अंगानी, विविध मार्गांनी पुढील शंभर वर्षांत कसा झाला ते यापुढे पहावयाचे आहे.



नासिकमधील सामाजिक आंदोलने व संस्था जीवन



— डॉ. वा. वा. दातार

गेल्या शे दीडशे वर्षांत आपल्या समाज-जीवनात ज्या ज्या घडामोडी झाल्या त्यांचे प्रतिबिंब नासिकच्या सार्वजनिक जीवनात उमटत आले आहे. अिंग्रजी राज्य व अिंग्रजी विद्या ह्यांचा संपर्क होण्यापूर्वीचे आपले जीवन व नंतरचे जीवन ह्यातील विलक्षण व क्रांतिकारक स्वरूपाचे अंतर सुस्पष्ट आहे. अिंग्रजी राज्याने आपल्या शेकडो वर्षे चालत आलेल्या परंपरागत जीवनाचा मार्ग व दिशाच बदलून टाकली. देशात सर्वांगीण संक्रमणाला चालना मिळाली. देशाचे अंतरंग व बहिरंग झपाट्याने बदलू लागले व ह्या संक्रमणातूनच विविध संस्था, धार्मिक, सामाजिक, राजकीय, अित्यादि चळवळी निर्माण होत गेल्या.

'संस्था' ह्या आता सुपरिचित व रूढ झालेल्या संज्ञेने ज्या प्रकारच्या संघटनाचा निर्देश आजकाल होतो, त्या प्रकारच्या संघटना किंवा संस्था, अिंग्रजी सत्ता व अिंग्रजी विद्या ह्यांचा हात धरूनच आपल्या समाजजीवनात पावले टाकू लागल्या. तत्पूर्वी देवतांचे उत्सव साधुसंतांचे जन्मदिन वा पुण्यतिथि, यात्रा, सत्याग, काही सण, अित्यादींच्या अनुषंगाने संघटित व सामूहिक स्वरूपात काही गोष्टी घडत आलेल्या असल्या तरी त्यामागील प्रेरणा मूलतः धार्मिकच होती. नासिकमध्ये परंपरागत पद्धतीने वरील गोष्टी करण्यासाठी भिन्न भिन्न जातीच्या पृथक किंवा संयुक्त संघटना व व्यवस्था होत्या व आजही शहरातील प्रमुख मंदिरे व धार्मिक उत्सव ह्यातून त्या टिकून आहेत. परन्तु 'संस्था' निर्माण झाल्या त्या अिंग्रजी अमलानंतरच. अिंग्रजी सत्ता, अधिकारी व खिरस्ती मिशनरी ह्यांनी आपापल्या उद्दिष्टांनुसार अशा संस्थांच्या निर्मितीस हातभार लावला. आपण केलेला त्यांचा स्वीकार, प्रतिकार, डोळस किंवा अंध अनुकरण ह्यातून नव्या नव्या संस्था व चळवळी निर्माण होत गेल्या. नासिकमध्येही हेच घडले.

नेटिव्ह एज्युकेशन 'सोसायटीच्या वतीने १८२४ साली नासिक येथे 'मुलकी' शाळा सुरू करण्यात आली. व परंपरागत संस्कृत विद्येचे शिक्षण देणाऱ्या पाठशाळांपेक्षा अनेक दृष्टींनी वेगळे शिक्षण देणारी 'संस्था' नासिकमध्ये प्रथम अस्तित्वात आली. 'गोविंद त्रिंबक' नावाचे ब्राम्हण पंतोजी ह्या शाळेवर होते व १८२८ साली विद्यार्थ्यांची संख्या २६ होती.

अिंग्रजी विद्येच्या वाढत्या प्रभावातून निर्माण झालेली दुसरी महत्वाची संस्था म्हणजे १८४० मध्ये स्थापन झालेली 'नेटिव्ह लायब्ररी' (आज सुप्रसिद्ध झालेले सार्वजनिक वाचनालय) वृत्तपत्रे, छापील पुस्तके, व त्यांचा उपयोग करणारा एक विशिष्ट सभासद वर्ग ह्या नव्या गोष्टी आता मूळ धरू लागल्या.

ख्रिस्ती मिशनरी :– [illegible] धर्म प्रसाराच्या मुख्य [illegible] मिशनरी [illegible] कार्यातूनही [illegible] लागल्या. [illegible] मध्ये [illegible] अॅंग्लिकन मिशनऱ्याने नासिक [illegible] धर्मप्रसारा[illegible] आलेल्या [illegible] शुश्रूषा केली व [illegible] मिशनरी कार्याची [illegible] रोवली. १८३२ मध्ये [illegible] दारू [illegible] नासिकच्या [illegible] पंडे विद्यालय) [illegible] वर्तमान [illegible] भाषे[illegible] बाहेर [illegible] ब्राह्मणाच्या तत्कालीन [illegible] प्रतिक्रिया [illegible] व [illegible] काशीनेही [illegible] समाजा[illegible] अ[illegible] जातीतील लोकांनी [illegible] चांगला [illegible] केले [illegible] मुलींची [illegible] शिक्षणाबरोबर [illegible] पाव [illegible] झाल्या. १८३२ [illegible] रामकृष्ण [illegible] ब्राह्मण मुलांनी १८४१ [illegible] यांनी ह्या [illegible] १८४[illegible] नासिकमध्ये बाप्तिस्मा [illegible] ह्या [illegible] ब्राह्मण [illegible] झाले. [illegible] आवश्यक [illegible] १८५[illegible] ची स्थापना झाली. १८५७ मध्ये [illegible] लोकसंख्या १२१ होती. अनाथ [illegible] आश्रम, सुतारकाम, [illegible] अ. शिवशिवणारे समया, [illegible], [illegible] अस्पितळ ह्या गोष्टी हळू हळू स्थापन [illegible]

१८६० मध्ये आफ्रिकेतून गुलाम म्हणून विकलेल्या [illegible] स्वतंत्र वसाहत झाली. ([illegible] लिव्हिंग्स्टन ह्याने नासिकचा [illegible] १८६५ मध्ये ह्यातील ९ [illegible] आफ्रिकेबरोबर [illegible].) १८८० मध्ये [illegible] मिशन स्थापन झाले. [illegible] मराठा व ब्राह्मण मुल-मुलींसाठी [illegible] शाळा स्थापन [illegible].

[illegible] चा भयानक दुष्काळ व वारंवार येणारी [illegible] ह्या [illegible] अनाथ [illegible] असहाय [illegible] [illegible] विधवांचा सांभाळ [illegible] मिशनरी [illegible] आपल्या [illegible] दीनदुबळ्यांना [illegible] मिशनऱ्यांनी [illegible] नासिक [illegible] आहे हे [illegible] नाकारून चालणार नाही.

सुधारकांच्या चळवळी.– इंग्रजी विद्येने प्रभावित [illegible] आगरकरांकडील [illegible] सुधारणेचे कार्य सुरु [illegible] त्या काळी चालू [illegible] नासिकच्या सामाजिक जीवनात त्या वेळी उमटलेला [illegible]. १८६४ मध्ये नासिकला म्युनिसिपालिटी स्थापन झाली. १८७१ च्या सुमारास सरकारी हायस्कूल निघाले. वृत्तपत्रे, पुस्तके [illegible] ह्यांच्या माध्यमाने नवे विचार [illegible] लागले व नव्या संस्था [illegible] लागल्या.

पुण्याच्या सार्वजनिक सभेच्या प्रभावाने नासिकला १५ मे १८६९ रोजी ' सार्वजनिक सभा ' स्थापन झाली. (असे नासिक गॅझेटिअर सांगतो) प्रारंभी ४२ सभासद होते व प्रत्येक सभासद आपले एक दिवसाचे उत्पन्न वर्गणी म्हणून देत असे. सुमारे १ वर्षभर संस्थेचे काम नियमित चालले. म्युनिसिपालिटी संबंधी सरकारकडे अर्ज वगैरे करण्यात आले पण एकंदरीने पुढे संस्थेचे काम नाममात्रच राहिले.

१८७३–७४ मध्ये पंचवटीत भोडे, मुठे वि. विद्यार्थ्यांनी ' वक्तृत्ववर्धक ' बालसभा काढली. तर १८७५–७६ मध्ये नासिक हाय-स्कूलच्या काही विद्यार्थ्यांनी ' स्वसुधारणेच्छु ' सभा काढली. ह्या संस्थांच्या वतीने अनेक विद्वानांची व्याख्याने भरविण्यात आली. ह्या दोन्ही संस्थांची मिळून पुढे एक संस्था झाली. १८७८ मध्ये न्या. रानडे नासिकला न्याया-धीश म्हणून आले व त्यांनी वक्तृत्ववर्धक सभेच्या चालकांचा उत्साह पाहून ' वक्तृत्व सभा ' स्थापन केली. १८७७ मध्ये लोकहित-वादी श्री. गो. ह. देशमुख जॉइंट जज्ज म्हणून नासिकला आले होते. ह्या दोन्ही सुधार-काग्रणींनी वक्तृत्वसभा, प्रार्थनासमाज, वाचना-लय, सूतिकागृह, बालरक्षकगृह, उद्योगशाळा, गायनसमाज, अनाथालय वि. अनेकविध सुधा-रणानुकूल उपक्रमांना नासिकमध्ये चालना दिली. पुण्याच्या 'सार्वजनिक काकांनी १८७७ मध्ये नासिकला येऊन 'लवाद कोर्ट' स्थाप-ण्यास प्रोत्साहन दिले. नासिकचे त्या वेळचे पुढारी श्री. गं. न. केतकर हे ह्या विविध संस्थांचे संचालन करीत.

सुधारणेच्या वरील उपक्रमांना किंवा प्रार्थनासमाजाच्या स्थापनेला नासिकसारख्या कर्मठांच्या क्षेत्रात पुण्यासारखा विरोध झाला नाही हे लक्षात घेण्यासारखे असले तरी ह्या उपक्रमांना विशेष प्रोत्साहन लाभून स्थिरता आली नाही हेही विसरता कामा नये.

पुनर्विवाह, स्त्रीशिक्षण, बालविवाह निषेध वि. प्रश्नासंबंधी पुरोगामी विचार बाळ-गणाऱ्या व कृतीत ते व्यक्त करणाऱ्या काही व्यक्ती नासिकमध्ये ह्या वेळी होत्या, येवढेच म्हणणे युक्त ठरेल. प्रख्यात डॉ. आनंदीबाई जोशी ह्यांना दि. १५-४-८३ रोजी पाठवि-लेल्या पत्रात त्यांचे पती श्री. गोपाळराव ह्यांनी आपण नासिकच्या प्रार्थनासमाजाला दिलेल्या भेटीसंबंधी लिहिले आहे. आपण स्वतः, कार्यवाह श्री केतकर वकील व एक पगारी ह्यांखेरीज तेथे कोणीही नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. जुन्या आचारविचा-रांचा व रूढीचा पगडा त्यावेळी नासिकमध्ये किती जबरदस्त होता व तो दूर करण्याजितके व वरील सुधारक संस्थांना बळीच कसे लाभले नाही हे पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल. २५ वर्षांचा एक कोकणस्थ ब्राह्मण तरुण निधन पावल्यानंतर त्याच्या शोकाविह्वल पत्नीने वपनाच्या धास्तीने स्वतःला खोलीत कोंडून घेतले असता आलेला पुत्रशोकाचा आवेग बाजूला ठेऊन तिच्या सासूसासऱ्यांनी खोलीचे दार फोडून आपल्या सुनेचे वपन ती बेशुध्द स्थितीत असताना करवून घेतल्याचे वृत्त स्वतः श्री केतकरांनी नमूद केले आहे. डॉ. आनंदी-बाई जोशी व त्यांचे पती अमेरिकेतून आल्यानंतर प्रायश्चित्त न घेता आपल्या घरी जेवले म्हणून वृद्ध नासिकमधील सुधारणाविषयक चळवळीचे अध्वर्यू श्री. केतकर ह्यांच्या वडिलांनी आपल्या मुलाचे घर कायमचे सोडले. ग्रामा-ण्यातील मैत्राणी शाखेच्या श्री मुठे यांच्याकडे काही ब्राह्मण भोजनास गेले व धर्मबाह्य वागले म्हणून धर्मसभेकडे एका ऋग्वेदी ब्राह्मः णाने तक्रार नोंदवून 'ग्रामण्या'ची मागणी केली.

सामाजिक सुधारणा विषयक विचार जागृती नासिकला होण्यास प्रारंभ झाला येवढेच ह्या सामाजिक संस्थांच्यामुळे घडून आले. ह्यातील वक्तृत्व सभेचे कार्य मात्र

पुढेही बरीच वर्षे चालले व १९२३ मध्ये स्थापन झालेल्या वसंत व्याख्यान मालेच्या रूपाने परिणत झाले असे दिसते. खाजगी वर्गणी काढून ह्या संस्थेमार्फत वक्तृत्व स्पर्धा घेतल्या जात. नासिक बाहेरील प्रमुख शहरा-तूनहि स्पर्धक येत. पुढे आपल्या वक्तृत्वाने सारा देश हालवून सोडणाऱ्या सावरकरांनी आपल्या आत्मचरित्रात "ह्या संस्थेने आम-णास पारितोषिके देऊन" आपल्या वक्तृत्वा-च्या अंकुरास वेळकाभर पाणी दिल्याबद्दल कृतज्ञतापूर्वक उल्लेख केला आहे. १८८० मध्ये नासिकला गीर्वाण परिषद स्थापन झाली. संस्कृत मधून व्याख्याने दर प्रतिपदेस होऊ लागली. १८९३ मध्ये इंग्रजी वक्तृत्वोत्तेजक सभा स्थापन झाली व ती खूपच लोकप्रिय झाली.

१८७०-८० ह्या अवधीत नासिकवृत्त, गंगालहरी ही वृत्तपत्रे नासिकला प्रसिद्ध होऊ लागली. सरदार विंचूरकरांच्या नेतृत्वाने जमीनदारांचे हितसंबंध राखण्यासाठी एक संस्था स्थापन झाली व पुढे १८८५ नंतर कॉंग्रेस व सामाजिक परिषदेसाठी नासिकचे प्रतिनिधीही जाऊ लागले.

१८९०-१९०० च्या दरम्यान विशेषतः १८९६ मध्ये श्री सं. न. केळकर दिवंगत झाल्यानंतर नासिकच्या सामाजिक संस्थांची हालचाल कमी झाली. केळकरांच्या स्मरणार्थ बांधावयाचा टाऊन हॉलचा पाया त्या. रानडे ह्यांनी पुढे घातला व त्या. रानडे ह्यांच्या मृत्यूनंतर ह्या टाऊनहॉलमध्येच न्या. रानडे मोफत वाचनालय पुढे (शके १८४१) सुरू झाले.

ह्या अवधीत नासिक वैभव (संपादक खरे) व लोकसेवा (संपादक अनंत वामन बरवे) ही वृत्तपत्रे नासिकला प्रसिद्ध होऊ लागली. व हळू हळू नासिकच्या सार्वजनिक जीवनाला व संस्थाना टिळकांच्या राजकारणाचा रंग चढू लागला. परंपरागत गणेशो-त्सवाला लोकमान्यांचे वळण मिळाले. मेळे निघाले, शिवजयंती साजरी होऊ लागली. पुण्यात चिपळूणकरांनी स्थापन केलेल्या न्यू इंग्लिश स्कूल सारखी संस्था नासिकला काढण्याच्या उमेदीने रानडे, विद्वांस प्रभृतींनी 'शिवाजी विद्यालय' सुरू केले. (सावरकर हे प्रारंभी ह्या संस्थेचे विद्यार्थी होते) पुढे १९०१ च्या सुमारास हे विद्यालय बंद झाले.

मित्रमेळा.– १९०० जानेवारीच्या सुमा-रास स्थापन झालेल्या मित्रमेळ्याने वक्तृत्व, उत्सव, वाङमयाभ्यास इ. पूर्वीच्या गोष्टींना नवे उद्दिष्ट व नवे रूप दिले. गणेशोत्सव, शिवाजी उत्सवांना, राष्ट्रीय आंदोलनाचे कार्य करणाऱ्या ह्या युवक संघटनेने एक वेगळे सामर्थ्य प्राप्त करून दिले. स्वयंसेवक संघटना म्हणूनही भिन्न जातींतील पण एकदिल असलेल्या ह्या युवकांच्या संघटनेचा उल्लेख करावयास हवा.

नंतरच्या काळात जॅक्सनचा खून, टिळ-कांची शिक्षा इ. घटनामुळे जवळजवळ थिजून गेलेले नासिकचे सार्वजनिक जीवन १९१३ मध्ये भरलेल्या प्रांतिक परिषदेपासून पुन्हा चळवळ करू लागले. हळू हळू राजकीय चळवळीच्या पार्श्वभूमीवर सामाजिक शैक्षणिक धार्मिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्था नासिक-मध्ये निर्माण झाल्या.

ब्राह्मणेतर चळवळ – सामाजिक व शैक्ष-णिक चळवळ–

महात्मा जोतिबा फुले यांनी स्थापिलेल्या सत्य-शोधक समाजाच्या कार्याला महर्षि शाहू छत्र-पतींच्या नेतृत्वामुळे नवे बळ आले व नवी दृष्टीही लाभली. ती प्रेरणा घेऊन श्री. राव-साहेब भाऊसाहेब थोरात ह्यांनी १९१३ मध्ये उदोजी मराठा बोर्डिंगची स्थापना केली व बहुजन समाजाच्या जागृतीच्या व शिक्ष-णाच्या अतिशय महत्वाच्या कार्याला अत्यंत परिश्रम घेऊन नासिकमध्ये प्रारंभ केला. व चिकाटीने ह्या कार्याचे लोण पुढे पसरविले.

ह्याच सुमारास धारच्या अधिपतींच्या अध्यक्षतेने मराठा शिक्षण परिषद नासिकला झाली. १९२० मध्ये राजर्षि शाहू छत्रपतींनी नासिकला येऊन विद्यार्थी गृहाचा पाया घातला. वंजारी बोर्डिंगलाही त्यांनी त्याचवेळी प्रेरणा दिली. हळू हळू बहुजन समाजातील विविध थरात नवे चैतन्य निर्माण झाले व वेगवेगळ्या जातींनी आपापल्या शिक्षणसंस्था काढल्या. असे होणे हे अपरिहार्यच होते. १९१९ मध्ये सोमवंशी शिक्षण वर्धक फंड संस्था नासिकमध्ये पूर्वास्पृष्टांनी स्थापन केली व दलित-वर्गाला शिक्षणाचे दरवाजे खुले केले. शाहू-महाराजांनी संस्थेस देणगी दिली व शाहू-छत्रपती बोर्डिंग उभे राहिले. पुढे भिन्न जातीतील सामान्य व धनिक नागरिकांनीही ह्या व अशा संस्थांना साहाय्य केले.

बहुजन समाज जागृत झाला. ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद रंगू लागला. राजकारणाला म. महात्मा गांधींच्या नेतृत्वाने नवी दिशा मिळाली.

महाराष्ट्रीय हिंदुधर्म परिषद:- १९२० मध्ये डॉ. कुर्तकोटी ह्यांच्या अध्यक्षतेखाली नासिक येथे भरलेली परिषद तत्कालीन घडामोडींच्याच दृष्टीने नव्हे तर हिंदु समाजातील विविध थरांचे व प्रवृत्तींचे मनोगत ओळखण्याच्या दृष्टीने आजहि महत्वपूर्ण वाटते हिंदु समाजातील जातीजातीत प्रेमळ सलोखा राहण्यासाठी कोणती उपाययोजना करावी ह्याचा शोध घेण्यासाठी भरलेल्या ह्या परि-षदेला सर्व विचारांचे व थरांचे प्रतिनिधी उपस्थित होते. डॉ. श्री व्यं. केतकर, प्राज्ञ पाठशाळेचे परिवर्तनवादी विख्यात पंडित नारायणशास्त्री मराठे, 'सनातनी सुधारक' श्री. साटे, आचार्यपीठच नको म्हणणारे ब्राह्मणेतर पुढारी ना. भास्करराव जाधव वर्णाश्रम व्यवस्थेचे अभिमानी ब्राह्मणेतर पुढारी श्री. नारायणराव गुंजाळ, धर्माच्या नावावर अस्पृश्यावर होणारा अन्याय दूर करा असे आवाहन करणारे के. वी. जाधव, काळे प्रभृति अस्पृश्य पुढारी, ह्त्यादींनी ह्या परि-षदेत भाग घेतला. मंदिर प्रवेश, चातुर्वर्ण्य, भिन्न जमातींचे धार्मिक अधिकार इ. विविध प्रश्नांवर चर्चा झाली.

१९२० नंतर म. गांधींच्या नेतृत्वाने राजकारणाला वेगळेच महत्व आले व हळूहळू इतरत्र झाले त्या प्रमाणे नासिकमध्येही राज-कीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आंदोलने व संस्था ह्यांची कार्यक्षेत्रे व सरहद्दी ठरविणे अवघड होत चालले व ह्या विविध क्षेत्रातील घडामोडी एकमेकावर परिणाम करू लागल्या.

१९२० ते १९४० ह्या अवधीत नासि-कला बऱ्याच संस्था निर्माण झाल्या व सभा-संमेलनेही झाली. वेगवेगळ्या जातींच्या शिक्षणसंस्था व इतर संस्था निर्माण झाल्या. सेनान्हावी बोर्डिंग (१९२०), वंजारी विद्यार्थी संमेलन (१९२१), महिला सहकारी संस्था (१९२१), अस्पृश्यांची वार्षिक सभा (१९२३), क्षात्र जगद्गुरुंच्या अध्यक्षतेखाली भरलेली सामाजिक परिषद व ना. भास्करराव जाधव ह्यांच्या अध्यक्षतेखाली सांजेगांव येथे भरलेली ब्राह्मणेतर परिषद (१९२३), न्हावी समाजोन्नति परिषद (१९२३), हिंदुवैदिक धर्मसभेची शाखा स्थापना (१९२१), मातंगसमाजाची सभा (१९२५), मेहतर समाजाने बांधलेल्या लक्ष्मीनारायण मंदिरात लक्ष्मीनारायण मूर्तीची स्थापना (१९२५), सावतामाळी शिक्षण परिषद, डॉ. कुर्तकोटी ह्यांनी स्थापन केलेला आचार्यमठ व संस्कृत पाठशाळा (१९२३), शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मण संस्था, १९३० नंतर स्थापन झालेला चित्पावन ब्राह्मणसंघ व देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण संस्था इ. संस्थांचा व उपक्रमांचा उल्लेख करावयास हवा.

ह्याप्रमाणेच जरा वेगळ्या भूमिकेतून अस्तित्वात आलेल्या संस्था व सभा ह्यांचाहि

निर्देश करणे आवश्यक आहे. श्री खाडीलकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले १९२१ चे कीर्तन संमेलन, जातीनिरपेक्ष भूमिकेतून निर्माण झालेल्या छात्राश्रम व अनाथ विद्यार्थी गृह (१९२३) प्राथमिक शिक्षक परिषदेचे तिसरे अधिवेशन (१९२४), मद्यपान निषेध संस्था, राष्ट्रीय आंदोलनातून निर्माण झालेली भारतीय कन्याशाळा व टिळक राष्ट्रीय विद्यालय (१९२१), पुणे सेवासदन सोसायटीच्या नासिक शाखेची स्थापना (१९२५), नासिक येथे १९२९ मध्ये भरलेले अखिल भारतीय वैद्य संमेलन व त्याला जोडून भरलेले वनस्पती प्रदर्शन, नासिक जिल्हा मराठा शिक्षण परिषद (१९२८) व मुंबई मराठेतर जातींची राष्ट्रीय ब्राह्मणेतर प्रांतिक परिषद (अध्यक्ष वालचंद कोठारी १९२८) महाराष्ट्र शारीरिक शिक्षण परिषद (१९३०) (अध्यक्ष माणिकराव) व सर्वधर्म परिषद (१९३३) ह्या त्यातील काही प्रमुख संस्था व परिषदा होत.

सामाजिक उपयुक्तता विशेष असूनही सामान्यतः ज्याचा सामाजिक वा सांस्कृतिक चळवळीत फारसा उल्लेख होत नाही अशा चळवळीही नासिकमध्ये झाल्या. पुण्याच्या देवधर जिमखान्याच्या धर्तीवर १९११ मध्ये नासिक जिमखाना सुरू झाला. बालवीर संघटनेलाही १९१४ पासून स्थान मिळू लागले. शिमग्यातील अनिष्ट प्रकाराला आळा घालण्यासाठी काही उपक्रम सुरू झाले. आरोग्य मंडळाची स्थापना होऊन शहराच्या स्वच्छतेकडे लक्ष दिले जाऊ लागले. जलतरण क्लब व श्री. वर्दे ह्यांचा भारतीय शिल्पकला वर्ग असेही उपक्रम सुरू झाले. परंपरेने चालत आलेल्या व पुढे राष्ट्रीय चळवळीचे एक अंग बनलेल्या गणेशोत्सवाला आगळे वेगळे वळण मिळू लागले. विविध विषयांवरील व्याख्याने, शिबिरे, काव्यगायन, संगीत, वाद्यप्रयोग, कला प्रदर्शने इ. गोष्टींना कार्यक्रमात महत्व आले व हे उत्सव लोकांचे एक रंजनसाधन बनून नागरिकांच्या विविध गुणदर्शनाला अवसर मिळू लागला. पी. डब्ल्यू. डी. विद्यार्थी संघ ह्यांचे गणपती उत्सव हे विशेष गाजत असत. १९२५ मध्ये सर्व गणपतींची विसर्जनाची एक मोठी मिरवणूक काढण्यात आली. शाहू छत्रपती बोर्डिंगचा गणपती व मेहतर समाजाचा गणपतीही त्यात सामील होते. १९२२ पासून बालाजी मंदिरातील उत्सवाला नवे व आकर्षक वळण मिळाले व १०-१५ वर्षे हा उत्सव नासिककरांचे एक प्रमुख आकर्षण बनले. चित्रकला व इतर कला ह्यांची प्रदर्शने स्पर्धा, गायनाचे उत्तम कार्यक्रम, उत्कृष्ट कीर्तने, प्रवचने, व्याख्याने, रमणीय सजावट, इ. अनेकविध गोष्टींमुळे बालाजी उत्सवाची लोक उत्सुकतेने वाट बघत. मुरलीधर मंदिरातील सजावट हेही एक अनेच उल्लेखनीय आकर्षण आहे. नासिकची सुप्रसिद्ध पांजरापोळ ही संस्थाही एक वेगळ्या प्रकारचे पण उपयुक्त असे सामाजिक कार्य गेली कित्येक वर्षे नासिकमध्ये करीत आलेली आहे. ह्या संस्थेचाही येथे अवश्य उल्लेख करावयास हवा.

साहित्य प्राच्यविद्या इ. १९१८ मध्ये स्थापन झालेल्या वृत्त यजुःशाखीय शिक्षण प्रसारक मंडळाने संस्कृत विद्येच्या जोपासनेसाठी महत्वाचे कार्य केलेले आहे. नारायणगुरु देवाची वेदशाळा, भद्रकाली मंदिरातील पाठशाळा, प्राच्यविद्या प्रसारक मंडळाने वेदशास्त्र विद्यालयाचा संकलित केलेला उपक्रम, १९३१ साली वामनशास्त्री दातार यांच्या पुढाकाराने स्थापन झालेली गीर्वाण वाग्वर्धिनी सभा, पंचवटी पाठशाळा, समर्थ रेणुका वाचनालय व नुकतेच नासिक येथे भरलेले संस्कृत अधिवेशन ह्यांचे ह्या संदर्भात स्मरण ठेवणे आवश्यक आहे. श्रीभद्रकाली मंदिर व वारकरी संप्रदाय आखाडा या ठिकाणी चालू असलेल्या कीर्तनसंस्थेचे कार्य व अलीकडे

काही वर्षे साजरा होत असलेला नामसप्ताह ह्यांचाही या ठिकाणी उल्लेख करणे उचित होईल.

१९३० च्या सुमारास नासिकमध्ये मराठी काव्य, नाट्यादि साहित्याचे प्रेम बाळगणाऱ्या व्यक्तींनी वाङमय मंडळ, वाङमय विहार मंडळ, महाराष्ट्र नाट्य मंदिर ह्यासारख्या संस्था स्थापन करून काही वर्षे चालविल्या. वाङमयविषयक चर्चा, व्याख्याने, काव्यगायन, साहित्यिकांचे स्मृतिदिन, वाङमयाचा अभ्यास, नाट्यप्रयोग, इ. कार्यक्रम ह्या संस्था करीत. नासिक नगर वाङमयोपासक संमेलन (१९३०) व माधव ज्यूलियन ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले महाराष्ट्र कविसंमेलन, सार्वजनिक वाचनालयाचा शताब्दि समारंभाचा कार्यक्रम व मराठी रंगभूमीचा शतसांवत्सरिक उत्सवाचा नासिकने केलेला कार्यक्रम, नाट्य संमेलन व १९४२ साली भरलेले मराठी साहित्य संमेलन ह्या वरील उपक्रमातील विशेष संस्मरणीय घटना होत.

इतर क्षेत्रात अशा तऱ्हेचे कार्य होत असले तरी नासिकने १९२० ते ४० पर्यंत सर्व महाराष्ट्राचे लक्ष वेधून घ्यावे अशा घटना सामाजिक सुधारणाविषयक क्षेत्रातच झाल्या.

नासिकमधील सामाजिक सुधारणाविषयक चळवळी, सामान्यतः १९२० पर्यंत विधवा विवाह, स्त्रीशिक्षण इ. प्रश्न पुरत्याच व पांढरपेशा समाजापुरत्याच मर्यादित होत्या. १९२० नंतर ह्या चळवळी बहुजनसमाजाभिमुख झाल्या व त्यांचे नेतृत्वही बहुजनसमाजाकडेच गेले. १९२१ मध्ये काशिनाथ दामोदर नित्सुरे (ब्राह्मण) व सौ. सीताबाई काळसेकर (मराठा) ह्यांचे रजिस्टर लग्न हे नासिक जिल्ह्यातले आंतरजातीय व पहिले रजिस्टर लग्न असले तरी तो सामाजिक सुधारणेचा सहेतुक प्रयत्न मानता येणार नाही. नंतर पाटणकर वकील व अभ्यंकर वकीलांच्या पाठिंब्याने नासिकला विधवा विवाह झाला असता त्यास श्रामण्याचा धाक दाखविला गेला पण नंतर वातावरणच बदलत गेले व श्री. ग. सरनोबत ह्यांच्या पुढाकाराने १९२६ मध्ये स्थापन झालेल्या विधवा विवाह मंडळाद्वारे असे विवाह ब्राह्मण जातीतच नव्हे तर मारवाडी जातीतही घडवून आणले. वैदिक विवाह पद्धतीने वेदबाह्य गणलेल्या जातीतील विवाहही लावण्यास प्रारंभ केला.

● अस्पृश्यताविरोधक चळवळी –

१९२५ मध्ये डॉ. आंबेडकर नासिकला प्रथम आले. भाऊराव गायकवाड प्रभृतींच्या सहकार्याने त्यांनी अस्पृश्य समाज जागृत केला. त्याच प्रयत्नातून सहभोजनाचे तीन कार्यक्रम झाले. त्यात १९२६ मधील सहभोजन पहिले होय. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या उपस्थितीत झालेल्या तिसऱ्या सहभोजनाला मात्र सर्व वर्गातील सुमारे ३०० स्त्रीपुरुष उपस्थित राहिले. पण अस्पृश्यांच्या चळवळीला उग्रता आली ती १९३० सालच्या राममंदिर प्रवेश सत्याग्रहापासून. डॉ. आंबेडकर, राजभोज देवराव नाईक, भाऊराव गायकवाड प्रभृति अस्पृश्य नेत्यांनी हा अपूर्व लढा दिला. स्थानिक सुधारक स्पृश्य पुढाऱ्यांनी पाठिंबा दिला असला तरी हा लढा मुख्यतः अस्पृश्य वर्गाने स्वतःच्या सामर्थ्यावर विसंबून दिला व सारा महाराष्ट्र हादरून गेला. सनातनी समाजानेही तीव्र प्रतिक्रिया प्रकट केली. ह्या प्रश्नाला १९२० पासूनच हळूहळू तीव्रता येऊ लागली होती. नंतरचा रथसत्याग्रहही असाच महाराष्ट्रभर गाजला व अस्पृश्यता विरोधी चळवळीचे नवे पर्व सुरू झाले. अस्पृश्य समाज हा स्वतंत्रपणे व निकराने कार्य करू लागला. १९४७ साली स्थापन झालेले रमाबाई आंबेडकर वसतीगृह,

नासिकजवळचे आंबेडकर नगर व त्यात झालेला बौद्धधर्मदीक्षा स्वीकार ह्या गोष्टी म्हणजे ह्या मंदिर प्रवेश चळवळीसारख्या चळवळीची पुढची पायरी होय.

सन १९३६ साली पं. मालवीय ह्यांनी नासिक येथे अस्पृश्यता विरोधी व्याख्याने देऊन स्पृश्य समाजाला कर्तव्याची जाणीव करून दिली व रामकुंड घाटावर सुमारे १००–१२५ पूर्वास्पृश्यांना 'ॐ नमः शिवाय' मंत्राची दीक्षा दिली. परंतु अस्पृश्यता विरोधी चळवळीचे नेतृत्व अशा प्रयत्नातूनही अखेर अस्पृश्य समाजाकडेच राहिले व तो समाज सवर्ण हिंदु समाजापासून अधिक दूर गेला.

● शुद्धीकरण –

नासिकचे नांव महाराष्ट्राबाहेरही नेणारी समाजसुधारणाविषयक घटना म्हणजे पुढे इंदूरच्या महाराणी शर्मिष्ठा म्हणून ओळखल्या गेलेल्या मिस् मिलरचे शुद्धीकरण ही होय. डॉ. कुर्तकोटी ह्यांच्या नेतृत्वाने एका स्थानिक कार्यकर्त्यांच्या समितीने दि. १३–१–२८ रोजी हा शुद्धिसमारंभ साजरा केला. लक्ष्मणशास्त्री जोशी ह्यांनी पौरोहित्य केले होते. सनातनी वर्चस्वाखाली असलेल्या नासिकसारख्या क्षेत्रात हे शुद्धीकरण म्हणजे एक क्रांतिकारक घटनाच म्हटली पाहिजे. इ. सि प्रेसमधील त्र्यंबक बळवंत यार्दी ह्या ख्रिस्ती धर्म स्वीकारलेल्या कामगारासही १८–३–२८ रोजी पुन्हा हिंदुधर्मात घेण्यात आले. विनायकमहाराज मसूरकर व पाचलेगावकर महाराज ह्यांच्या शुद्धि कार्यालाही नासिकने पाठिंबा दिला.


● सनातनी प्रतिक्रिया –

अस्पृश्यांच्या मंदिर प्रवेशाप्रमाणेच ह्या शुद्धीकरणालाही सनातन्यांनी विरोध केला. अहिंदूचा हिंदुधर्म प्रवेश हा अशास्त्रीय आहे हा पक्ष मांडण्यासाठी शिरोळकर स्वामींच्या प्रेरणेने अनंतकृष्ण शास्त्री, पं. राजेश्वरशास्त्री द्रविड प्रभृती काशीकर पंडितांनी नाशिकला मोठा वाद केला. १९३० साली शारदा कायद्याला केलेला विरोध, मंदिर प्रवेश बिलाला केलेला विरोध, गांधींच्या प्रतिरोधक सत्याग्रह, वर्णाश्रम स्वराज्य संघाचे १९३४ साली नाशिक येथे गुजाळांच्या अध्यक्षतेखाली झालेले अधिवेशन, रामराज्य परिषद इ. च्या रूपाने स्थानिक वर्णाश्रमधर्माभिमानी समाजाने आपली प्रतिक्रिया व्यक्त केलेली आहे. अशा विचारांचा व अंध श्रद्धेचा पगडा दूर होणे किती अवघड आहे ह्याची साक्ष १९३४ साली नाशिकला कॉलरा झाला असता महामारी शांत्यर्थ बळी काढून ह्या मताच्या लोकांनी पटवून दिली आहे. (ह्या प्रसंगी २७ मण तांदूळ, १० मण डाळ, १२ मण तूप, ३ मण गहू, ४ मण गूळ जमवून शेकडो लोकांना भोजन दिले गेले ह्यावर त्यावेळी टाइम्स ने टीकाही केलेली आहे.)

● स्वातंत्र्य प्राप्तीनंतर –

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकसत्ताधिष्ठित राज्यशासनाकडेच आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, जवळ जवळ सर्वच क्षेत्रातील कार्याचे नेतृत्व गेले. नवसमाज रचनेच्या दृष्टीने आवश्यक त्या सुधारणा करण्यासाठी कायदे झाले व सरकार आर्थिक साहाय्य देऊन अन्य मार्गांनीहि ह्या कार्यास प्रोत्साहन देत आहे असे असले तरी एकट्या सरकारकडून ही सर्व कामे होणार नाहीत ह्याचे भान ठेऊन बऱ्याच संस्था नासिकमध्येही आपापल्या क्षेत्रात काम करीत आहेत.

१९४८ मध्ये श्री. पंजाबराव देशमुख श्री वि. ह. घाटे प्रभृतींच्या नेतृत्वाने नासिकला भरलेल्या मराठा शिक्षण परिषदेने ग्रामीण विभागात शिक्षण प्रसार करण्याच्या कार्यास मोठी चालना मिळाली. मराठा विद्याप्रसारक समाज, डांग सेवा मंडळ, रमाबाई बोर्डिंग ह्या दृष्टीने उल्लेखनीय कार्य करीत आहेत.




रविवार कारंजा · वैद्य त्रिवलकर यांनी बांधलेला. येथून आजचा गोविंदराव देशपांडे पथ (जुना मेनरोड) सुरू होतो.



भद्रकाली कारंजा : जुन्या नासिककडील एक जुना कारंजा. याच भागांत भद्रकालीचें सुप्रसिद्ध देवालय आहे.

गांवकरी प्रेस




पेशवे वाडा : या पेशवे वाड्यांत वरच्या मजल्यावर नाशिक सार्वजनिक वाचनालय व तळमजल्यावर शहर पोलिस ठाणी आहेत.




गावकरी प्रेस



शिवाजी उद्यान पूर्वी जॅक्सन गार्डन म्हणून प्रसिद्ध. हल्ली शिवाजी उद्यान उद्यानाला दिवसेंदिवस नवी खुलावट येत आहे.




रामसेतु पूल : नाशिक–पंचवटी जोडणारा एक धागा: हा धागा मजबूत सिमेंट-कांक्रीटचा आहे




रामकुंड : गोदावरींतील प्रसिद्ध तीर्थ. याच तीर्थांत भगवान शंकर पावन झाले आणि महात्माजी, जवाहरजी यांच्या अस्थिविलयानें ते अधिक पावन झालें.



गांवकरी प्रेस



गाडगे महाराज पूल : नासिक – पंचवटी जोडणारा आणखी एक साधा.



व्हिक्टोरिया पूल : या दृश्यांत रामकुंड, व्हिक्टोरिया पूल आणि सुंदरनारायण मंदिर असा परिसर दिसतो.

गावकरी प्रेस

सुमारे १० वर्षांपूर्वी स्थापन झालेल्या अनाथ महिलाश्रमाने, मिशनरी वृत्तीने व पद्धतीने हिंदूंनी समाजोपयोगी परोपकारी कामे कशी करावी ह्याचे जणू प्रात्यक्षिक दाखविले आहे. नगरपालिकेनेही जागा व वार्षिक अनुदान देऊन ह्या संस्थेला आधार दिला आहे. मुक्त कैद्यांची दखल घेणारे नवजीवन मंडळ, स्थानिक मराठी समाजात एकरूप असूनही आपली अस्मिता जोपासणारे गुजरात महामंडळ, अस्पृश्यांसह सर्वांना राहण्याची चांगली सोय करून देणारी, बहुजनसमाजाभिमुख असलेली व त्यांच्याच द्रव्याने निर्माण झालेली गाडगेमहाराज धर्मशाळा, कुष्ठधाम, रोटरीक्लब, विविध ज्ञाति संस्थांनी विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिलेल्या सोयी व बांधलेली मंगल कार्यालये, जैन बोर्डिंग, मराठा बोर्डिंग, डोंगरे बोर्डिंग आयुर्वेद सेवासघ रुग्णालय, वेलजीबाई दवाखाना ह्यासारख्या संस्था, सार्वजनिक वाचनालय, सुभाष वाचनालय ह्यासारख्या ज्ञानप्रसाराची मोठी कामगिरी करणाऱ्या संस्था, स्त्रीमंडळ, हिंदु वनितामंडळ, कॉंग्रेस महिला मंडळ ह्यासारख्या स्त्रियांच्या संघटना, इ. अनेक संस्था समाजोपयोगी कार्य आजही करीत आहेत. आजच्या महाराष्ट्रातील जवळ जवळ प्रत्येक विख्यात साहित्यिक व कलाकार ह्यांचा लाभ नासिककरांना घडविणारी व सांस्कृतिक, शैक्षणिक, साहित्यिक व कलाविषयक कार्य गेली १३ वर्षे करणारी लोकहितवादीमंडळासारखी संस्था व नाट्यसंघ, कलायतन ह्यासारख्या उदयोन्मुख संस्था, विष्णुसंगीत विद्यालय ह्या कला व संस्कृति ह्यांच्या जोपासनेचे कार्य आपल्या शक्तिप्रमाणे करीत आहेत.

नासिक नगरपालिकेचे ह्या सर्व संस्थांना साहाय्य लाभत असते ही गोष्ट नगरपालिकेला जशी भूषणावह तशी सामाजिक जीवनाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत इष्ट होय.

सहकारी पद्धतीने चाललेल्या पंचवटी नागरिक मंडळ मध्यवर्ती ग्राहक संघ ह्यासारख्या संस्था, भिन्न भिन्न व्यवसाय, उद्योगधंद्यांनी आपापल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी निर्माण केलेले संघ व संघटना, त्या त्या उद्योगधंद्यातील श्रमिकांनी निर्माण केलेल्या स्वतःच्या संघटना, वृद्धासाठी स्थापन झालेला वृद्धाश्रम, वेगवेगळे क्लब्ज व कर्मचाऱ्यांची स्नेहमंडळे ह्यासारख्या अनेक उपयुक्त संस्था आज नासिकचे सार्वजनिक जीवन घडवीत आहेत. असे असले तरी लोकहितवादी, आगरकर, ज्योतिबा फुले व आंबेडकर ह्यांच्या विचारांचा समन्वय साधणारी व खरी सामाजिक सुधारणा घडविण्यासाठी झटणारी संस्था महाराष्ट्राप्रमाणेच नाशकांतही असणे अत्यावश्यक वाटते. महाराष्ट्र सामाजिक परिषदेचे ३ रे अधिवेशन १९५७ मध्ये नासिकला भरले होते हे खरे असले तरी सामाजिक सुधारणेसाठी झटणाऱ्या संस्थांची उणीव भासल्याशिवाय राहत नाही. मुसलमान समाजांत मात्र मुस्लिम बोर्डिंग व आता नॅशनल हायस्कूल ह्या नावाने ओळखिली जाणारी शिक्षणसंस्था ह्यापेक्षा विशेष उल्लेखनीय व सामाजिक स्वरूपाच्या घडामोडी वा संस्था निर्माण झालेल्या दिसत नाहीत.

● नासिकमध्ये झालेले शताब्दि समारंभ

महाराष्ट्रात ज्या प्रमुख ठिकाणी कांही महत्त्वाचे शताब्दि समारंभ उत्साहाने साजरे झाले, त्यात नाशिकचा अवश्य उल्लेख हवा. न्या. रानडे जन्मशताब्दि, स्वातंत्र्यवीर सावरकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झालेला सार्वजनिक वाचनालयाचा शताब्दिसमारंभ, १८५७ च्या स्वातंत्र्य युद्धाचा शताब्दि उत्सव, अभिनव भारत मंदिराचा उत्सव, विवेकानंद जन्मशताब्दि महोत्सव इ. उत्सव ज्या प्रमाणावर व ज्या पद्धतीने साजरे झाले ते लक्षांत घेता नासिकच्या नागरिकांची जागरूकता व कृतज्ञताबुद्धी स्पृहणीयच मानावी लागेल.

सार्वजनिक वाचनालयाच्या शताब्दीच्या प्रसंगी 'प्रदक्षिणा' हा महत्त्वाचा ग्रंथ नासिकने प्रसिद्ध केला तसाच विवेकानंद जन्मशताब्दि प्रसंग निमित्ताने विवेकानंद स्मृतिगौरव ग्रंथही प्रसिद्ध करण्यांत आला.

गेल्या शंभर वर्षातील नासिक येथील सामाजिक चळवळीचा व संस्था जीवनाचा हा परिचय संक्षिप्त असला तरी आपल्या समाज-जीवनाचे स्थूल रूपाने दर्शन घडविण्यास तो पुरेसा बोलका आहे असे म्हणण्यास अडचण पडणार नाही.

तो भयंकर दुष्काळ !

सन १९१८ च्या सिंहस्थानंतर सर्वत्र भयंकर दुष्काळ पडला होता. त्याची झळ नासिक भागालाही लागली. दुष्काळ निवारणार्थ मुंबईच्या काही धनिकांनी, नगरपालिकेने आणि सरकारने स्वस्त धान्याची दुकाने उघडली होती. त्यावेळी रुपयाला ५ जुने शेर तांदूळ व रुपयाला ७ शेर बाजरी मिळे. कोकणभागातील लोकांचे त्यावेळी फार हाल झाले. दुष्काळाचे स्वरूप तीव्र बनू लागल्यावर कोकणातील अनेक लोक येथे आले. त्यांनी उपासापोटी इकडेतिकडे अरबट चरबट खाल्यामुळे मोठ्या प्रमाणात लोक दगावले. मृत्यूचे प्रमाण इतके भयानक होते की नगरपालिकेला त्यांची प्रेते हलवावी लागली.

— दामोदर महादेव चंद्रात्रे माजी म्यु. सभासद

नासिकची सुखद हवा !

आमचे शेंदुर्णी येथे घर असून जहागिरी होती. त्या ठिकाणापासून नोकरी निमित्ताने गावोगावी जावे लागे. कायगाव टोके येथेही एक वाडा आहे. नारायण दीक्षित म्हणून एक पुण्यात्मा होते. बाळाजी विश्वनाथ पेशव्यांना नारायण दीक्षितांनी आशिर्वाद दिला म्हणून बाळाजींनी कायगाव टोके येथे त्यांच्यासाठी वाडे बांधले. नारायण दीक्षित पेशव्यांचे गुरु म्हणून नंतर नावाजले. काशी येथेही दीक्षितांचा वाडा असून इकडील भागातील लोक त्याचे भाविकतेने दर्शन घेतात. नारायण दीक्षित त्र्यंबकेश्वर येथे १२५ वर्षांचे होऊन वारले.

घराण्यात अशा रीतीने नासिक भागाची ओढ प्रथमपासूनच होती. एक बंधु मुंबई येथे आहे. शेंदुर्णीला घर, नोकरी निमित्ताने गावोगावी बदली आणि मुंबईशी नातेसंबंध याचा विचार करून मध्यवर्ति ठिकाण म्हणून नासिक येथे आलो. नोकरीतून निवृत्त झाल्यावर येथे घर बांधून राहिलो पण मुख्यत: नासिकच्या सुखद हवेमुळे आम्ही नासिककर झालो.

— एम्. जे. दीक्षित माजी कलेक्टर नासिक.

नेहरू चौकाची नवी घडण !

पूर्वी फक्त कापड बाजारात कापडाची विक्री होई. कापडाच्या व्यवहारासाठी कापडबाजार अपुरा पडू लागला. म्हणून भद्रकाली मार्केट तयार करण्यात आले. तेथे व्यापारी वर्गाची चांगली सोय झाली.

आजइतकी चांदवडकर गल्ली तेव्हा विस्तृत नव्हती. दहिपूल भागात चौगुल्यांचे मंदिर होते. या मंदिराजवळ चांदवडकर गल्ली बंद होई. मध्यभागी घरे होती. भागवत तबेल्याकडे जाणारा रस्ता पूर्वीपासून अस्तित्वांत आहे. मेनरोडपासून दिल्लीदरवाजापर्यंत आज जो मलग मोठा रस्ता दिसतो तो अलिकडचा आहे. रस्ता करण्यासाठी नगरपालिकेने हस्तक्षेप करून घरे पाडली व त्यामुळे चांदवडकर गल्ली, दहिपूल, नेहरू चौक असे स्वरूप त्या भागास आले. दिल्लीदरवाजा भागातील दरवाजाचे अवशेष अलिकडच्या काळापर्यंत शाबूत होते.

— श्री. गणपतराव निरंतर माजी म्यु. सभासद

स्वातंत्र्य संग्रामांतील कामगिरी



—द. शं. पोतनीस

भारताच्या नकाशावर नासिकचा उल्लेख एक प्रमुख धर्मक्षेत्र म्हणून होत असतो, त्यामुळें या शहरास राजकीय इतिहास तो काय असणार असें वाटण्याचा संभव आहे. नाग-काच्या धार्मिक महत्त्वाचें कारण राजकीय स्वरूपाचेंच आहे. प्राचीन काळांत साऱ्या भारत-वर्षाला हलवून सोडणाऱ्या राजकीय घटना येथें घडल्या आहेत. उत्तर व दक्षिण भारताचें ऐक्य सांधून एक जुलमी साम्राज्य उलथून पाडण्याचें महत्कार्य रामचंद्रांनी येथूनच आरंभिलें.

इतिहास काळांतहि नासिकचा परिसर राजकीय दृष्ट्या नेहमीच आघाडीवर राहिलेला आहे. ह्या लेखांत ज्या राजकीय घटनांचा धांवता परामर्श घ्यावयाचा आहे, त्या काल-खंडांत नासिक शहरानें महाराष्ट्रांतील किंबहुना भारतांतील आपल्या बरोबरीच्या शहरांच्या मानानें यथायोग्य अशी कामगिरी बजावलेली आहे.

सन १८६४ पासून १९६४ पर्यंतच्या राज-कीय इतिहासापैकीं १९४७ पर्यंतचा इतिहास हा देशाच्या स्वातंत्र्याच्या प्रयत्नाचा इतिहास आहे. प्रस्तुत लेखांत त्यांचाच परामर्श घेण्याचें योजिले आहे. १९४७ नंतरच्या अलीकडच्या काळांतील घटना ताज्या असल्यामुळें सामान्यपणें सर्वांच्या परिचयाच्या आहेत. त्यांचा उहापोह ह्या लेखात केलेला नाहीं.

सन १८६४ च्या सुमारास नासिक शहरांतील परिस्थितीची पार्श्वभूमि कशा प्रकारची होती हें प्रारंभीच समजून घ्यावयास हवें. १८६०–पासूनच देशांतील परिस्थिति एक नवें रूप धारण करीत होती. १८५७ मध्यें इंग्रजी राज्य झुगारून देण्याच्या इरायानें सशस्त्र क्रांतीचा फार मोठा प्रयत्न झाला. तो इंग्रजांनी निष्ठुर-पणानें दडपून टाकला होता. ह्या सशस्त्र उठावाचा उद्रेक प्रामुख्यानें उत्तर भारतांत झाला. महाराष्ट्रांत ह्या स्वातंत्र्य-प्रयत्नांस थोडी-बहुत साथ मिळाली. ह्यांपैकीं सातारा, कोल्हा-पूर ह्या ठिकाणचे उठाव राजघराण्याभोंवतीं संघटित झाले होते. परंतु सामान्य जनतेकडून ब्रिटिश सत्तेला जर कोठें प्रभावी आव्हान मिळालें असेल तर तें नासिक भागांतूनच मिळालें. सिन्नर तालुक्यांतील नांदूर–शिंगोट्याचें भागूजी

नाईकांचें बंड, त्र्यंबकेश्वर येथील वासुदेव भगवंत जोगळेकराची चढाओ. पेठ येथील भाऊराजे ऊर्फ भगवानराव नीळकंठराव देशमुख ह्यांचा उठाव ह्यांच्यामुळें १८५७ मध्ये कांही काळ नासिकच्या पश्चिमेकडील पट्टीमध्यें इंग्रजी राज्य नष्टप्राय झालें होतें. हे सारे उठाव ब्रिटिश पलटणींनीं मोडून काढले. भागोजी नाईक १८५९ च्या नोव्हेंबरांत युद्धांत मारला गेला. जोगळेकरांना त्र्यंबक येथें व राजे देशमुख ह्यांस पेठ येथे ठार करण्यांत आलें. ह्यांच्याशिवाय नाशकांत व इतरत्र अनेकांना देहदंड देण्यांत आला. ज्यांचा ज्यांचा सशस्त्र उठावाशी थोडाफार संबंध आढळला त्यांच्या घरादारावरून नांगर फिरविण्यांत आले. परंपरागत सशस्त्र युद्धाच्या मार्गानें परकीय राजवट उलथून टाकण्याच्या ह्या राष्ट्रीय प्रयत्नांस अपयश आलें. तथापि ज्यांनीं ह्या स्वातंत्र्य–यज्ञात आत्माहुति दिली त्यांनी नासिकचें नाव पुढील पिढ्या अभिमानानें घेतील असा इतिहास निर्माण करून ठेवला.

१८५७ ते १८५९ अखेरपावेतों नासिक भागांत ही बंडाळी चालू होती. पण ती संपल्या-नंतरहि सरकारी दडपशाही बराच काळ चालली. सर्वत्र भीतीचें साम्राज्य झालें. नाशकात नंतर कांही वर्षे स्मशानशांतता नांदत होती.

परंतु ही स्थिति दीर्घकाळ टिकली असे मात्र नाही.

रात्रीच्या गर्भांतुनी येतो पुनः उषःकाल ।

ह्या कवींच्या उक्तीप्रमाणें अल्पकाळांतच जनतेची स्वातंत्र्याची ऊर्मि पुन्हा प्रगट होऊं लागली.

१८५७ नंतर परकीय राज्यकर्त्यांनी ह्या देशाच्या कारभारासंबंधीच्या आपल्या धोरणांत मूलगामी बदल केले. जनतेचें लक्ष सनदशीर मार्गा-कडे वळावें ह्यासाठी कांही काळ उदार धोरणाचा प्रारंभ करण्यांत आला. विश्वविद्यालयें व हायकोर्टें स्थापन करण्यांत आलीं. सन १८६१-६२ च्या दरम्यान कायदेमंडळें अस्तित्वात आलीं. पाश्चात्य शिक्षण व पाश्चात्य वाङ्मय ह्यांचा समाजांतील वरच्या थरांत प्रचार होऊं लागला. ह्या वर्गावर विजेत्यांच्या संस्कृतीनें बरीच मोहिनी घातली. भारतात एका निराळ्या युगाचें आगमन झालें.

पुणें हें महाराष्ट्राचें प्रमुख शहर. नव्या व जुन्याचा पुण्यांत विशेष संघर्ष झाला. ह्या प्रश्नावर पुण्यांत तट पडले. नासिक सनातनी विचाराचें केंद्र आणि जुन्या संस्कृतीचें माहेरघर होतें. परंतु पाश्चात्य शिक्षण आणि विचार ह्यांना येथें विशेष जळजळीत विरोध झाल्याचें आढळून येत नाहीं. जुन्यानव्यांचा तारतम्यानें विचार करावा. जुन्यातील चांगलें तें अभिमान-पूर्वक राखावें. नव्यातील हितावह गोष्टींना स्वीकार करावा ही सारासार दृष्टि नासिक-करांनी त्याकाळीं राखली होती. भारतांत त्या काळात विविध सार्वजनिक चळवळी आणि संस्था निर्माण होत होत्या. त्या सर्वांची प्रतिरूपें येथेंहि निर्माण झाल्याचें आढळून येतें. पुण्यास सार्वजनिक सभा स्थापन झाली. नासकांतहि सरदार विंचूरकर प्रभृतींनी सार्वजनिक सभा चाल-विली. जनतेच्या गाऱ्हाण्यांची सरकार दरबारी वकिली करणें हें सार्वनिक सभेचें काम असे. नासिकची सार्वजनिक सभा हें काम उत्तम प्रकारें करीत होती. सार्वजनिक वाचनालय येथें १८४५ सालीच स्थापन झालें होतें. वृत्तपत्रें सार्वजनिक विचार मांडण्याचें महत्त्वाचें माध्यम. ह्या काळांत भारतात सर्व महत्त्वाच्या शहरांतून वृत्तपत्रें सुरू होत होती. सन १८७० मध्यें एकूण वृत्तपत्रांची संख्या ४७५ होती. नासिकमध्येंहि श्रीयुत काळे यांचें 'नासिकवृत्त', सहस्त्रबुद्धे यांचें 'नासिक-समाचार', खरे वकिलाचें 'नासिक वैभव', वर्वे यांचें 'लोकमित्र.' हीं वृत्तपत्रें निरनिराळ्या वेळी सुरू झालीं 'नासिकवृत्त' हें साप्ताहिक १८६९ सालीं सुरू झालें चिपळूणकर, आगर-कर, टिळक यांचा 'केसरी' ह्यानंतर सुरू झाला. त्याचा उल्लेख नासिकवृत्ताच्या अंकांत अभि-प्राय रूपानें आला आहे. कांही पदवीधर व होतकरू तरुणांनीं देशहिताच्या हेतूनें केसरी पत्र काढलें ह्याबद्दल नासिकवृत्ताच्या संपादकांनी वडिल-

कोच्या भूमिकेवरून कौतुक केलें आहे. वृत्तपत्र काढणें सोपें पण चालविणें कठीण असा इशारा दिला आहे आणि हें धाडस यशस्वी होवो, ही सदिच्छा व्यक्त केली आहे.

ह्याच सुमारास नासिक शहरांत लवाद कोर्ट, वक्तृत्व सभा, स्वसुधारणेच्छु सभा, प्रार्थनासमाज अशा विविध संस्था स्थापन झाल्या. नवोदित अशा ह्या संस्थात्मक सार्वजनिक जीवनांत अनेक कळकळीचे कार्यकर्ते भाग घेत होते. समाजाची सद्यःस्थिति कशी आहे, त्याचें अभ्युत्थान कशा प्रकारें होईल ह्याचा विचार व चर्चा करून लोकहिताचे प्रयत्न करणाऱ्या सेवकांची एक परंपरा ह्या संस्थांच्या निमित्तानें उभी राहिली.

१८७० पासून १९०० पावेतोंच्या नासिकच्या सार्वजनिक जीवनांत विशेष भाग घेणाऱ्या व्यक्ती म्हणजे श्री. गंगाधर नरसिंह केतकर वकील, नारायण परशराम टिल्लू वकील, श्रीधरपंत पट्टेकर वकील, गणेशशास्त्री लेले, कृष्णराव भोंडे, शीघ्रकवि म्हणून विशेष प्रसिद्धीस आलेले बळवन्त खंडूजी पारख अित्यादि होत.

सन १८७७ मध्ये पुण्याचे प्रसिद्ध पुढारी श्री. गणेश वासुदेव जोशी ऊर्फ सार्वजनिक काका ह्यांनीं स्वदेशीच्या प्रचाराचीं व्याख्याने दिलीं. लोकांनीं आपले तंटे आपापसांत मिटवावेत, कोर्टांत जाऊन पैसे खर्च करूं नयेत, ह्यासाठीं लवादकोर्टें म्हणजे जनता—न्यायालयें स्थापन करावींत असाहि त्यांनी प्रचार केला. त्याप्रमाणें नासिक येथें लवादकोर्ट स्थापन झालें. सन १८७३मध्यें पंचवटीमध्यें व सन १८७८-मध्यें नाशकांत वक्तृत्वसभा स्थापन झाल्या. सन ७५–७६ ला स्वसुधारणेच्छु ह्या नांवाची सभा स्थापन झाली. १८७७ मध्यें रा. ब. गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी जॉइंट जज्जच्या जागेवर आणि श्री. माधवरावजी रानडे सदर अमीनाच्या जागेवर येथें बदलून आले. गांवांतील सार्वजनिक जीवनास त्यांनीं विशेष चालना दिली. ह्या काळांत नाशकांतील बऱ्याच संस्थांचे नेतृत्व श्री. गंगाधर नरसिंह उर्फ बापूसाहेब केतकर ह्यांच्याकडे होतें. पदराला खार लावून लोकहिताच्या कळकळीने त्यांनीं अनेक संस्थांचा संसार चालविला. १८९६ साली ते निवर्तले. त्यांचा स्मारकाप्रीत्यर्थ न्यायमूर्ति माधवराव रानडे ह्यांच्या हस्तें केतकर टाऊन हॉल उघडण्यांत आला.

प्रचार आणि संघटना ह्या बाबतींत जी मुभा मिळत गेली तिचें पर्यवसान राजकीय आकांक्षांच्या वाढत्या व्यक्तिकरणांत होत गेले, ह्याची जाणीव सत्ताधाऱ्यांना तत्काळ झाली. लॉर्ड लिटनसारखे जे साम्राज्यवादी प्रवृत्तीचे व्हाईसरॉय आले त्यांनीं प्रतिगामी कायदे करून येथील सार्वजनिक जीवनावर निर्बंध लादले. वृत्तपत्रांवरील नियंत्रणें कडक केलीं. त्यामुळें जनतेंतील असंतोष वाढत गेला. ह्याच सुमारास देशांत जागोंजागीं तीव्र दुष्काळ पडत गेले. महाराष्ट्रांत शेतकऱ्यांचे दंगे झाले. याच दरम्यान वासुदेव बळवंत फडके यांनीं सशस्त्र उठाव केला. सरकारी दडपशाहीमुळें निर्माण होत असलेला असंतोष व्यक्त करण्याचें कार्य देशांत स्थापन झालेल्या लहान-मोठया राजकीय संस्था करीत होत्या, पण त्या फारशा संघटित नव्हत्या. देशव्यापी राजकीय संघटना निर्माण करावी अशी कल्पना सुरेन्द्रनाथ बॅनर्जी ह्यांना सुचली. वाढत्या असंतोषाची वाफ दडवून ठेवली तर तिचा स्फोट होईल, म्हणून तिला वाट करून दिली पाहिजे, ही गोष्ट सत्ताधाऱ्यांतील विचारी वर्गास पटूं लागली. त्यांत ह्यूम साहेबांनीं पुढाकार घेतला, आणि भारतीय कॉंग्रेस संस्थेची स्थापना केली. १८८५ मध्यें मुंबईस कॉंग्रेसचें पाहिलें अधिवेशन भरलें. एखाद्या लहानशा निर्झराच्या रूपानें उगम पावलेल्या प्रवाहास पुढें प्रचंड महानदीचें रूप यावें तसें कॉंग्रेसचेंही अल्पावधींत झालें. तिचा विस्तार देशभर झाला. तिचें काम प्रासंगिक न रहातां नित्याचें बनलें.

नासिक शहरात कांग्रेसची संघटना प्रारंभाच्या काळापासूनच झाली. कांग्रेस अधिवेशनास प्रति-वर्षी प्रतिनिधि जाऊं लागले. तेथे काय काय घडलें ह्याची माहिती देणारी व्याख्यानें होऊं लागलीं. १८८२ मध्यें स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये लोकनियुक्त प्रतिनिधी पाठविण्याचा हक्क मिळाला. हे प्रतिनिधी निवडण्यासाठी नाशकांत मतदान व निवडणुका सुरू झाल्या नगरपालिका, तालुका लोकल बोर्ड व जिल्हा लोकल बोर्ड ह्यांच्या कारभारांत लोकांचा शिरकाव झाला.

अशा प्रकारें लोकशाही जीवनाचा पाया घातला गेला. सन १९०० नंतर नाशकांत नांव घेण्याजोगे पुढारी श्री. बाबासाहेब खरे वकील झाले. भव्य रुबाबदार शरीरयष्टि मोहक व्यक्तिमत्व, सर्वांच्या उपयोगी पडण्याची वृत्ति ह्यांच्यायोगानें जनतेंत ते विशेष लोकप्रिय होते. नाशकांतील अव्वल दर्जाचे वकील म्हणून त्यांची ख्याति होती. त्यांनी देशसेवेला वाहून घेतलें. ते म्युनिसि-पालिटीचे चेअरमन होते. लोकमान्य टिळकांच्या भोंवती त्याकाळी बेळगावचे गंगाधरराव देशपांडे उमरावतीचे खापर्डे, नगरचे देशपांडे अशी प्रभावळ निर्माण झाली होती. तिच्यात नासिकचे श्री. बाबासाहेब खरे ह्यांचा अन्तर्भाव होता. कांग्रेसच्या इतिहासांत १९०६ ते ११ पर्यंत पहिली प्रचंड चळवळ झाली. वंगभंग–विरोध. स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण आणि मद्य-निषेधन हा चळवळीचा कार्यक्रम होता. नाशकांत ह्या चळवळीचे नेते बाबासाहेब होते. प्रचंड जाहीर सभा आपल्या वक्तृत्वानें त्यांनी गाजविल्या. परदेशी मालाच्या होळ्या केल्या. वकिलीत हजारों रुपये मिळकत असतां झोळी घेऊन मुष्टिफंड मागावयास सुरवात केली.

देशातील चळवळ दडपून टाकण्यासाठी सरकारनें दमननीतीचा अवलंब केला होता. नासिकचे कलेक्टर जॅक्सन ह्यानें बाबासाहेब खरे ह्यांना जहाल भाषणें न करण्याचा हुकूम दिला. त्यांनी तो जुमानला नाही म्हणून त्यांच्याकडून जातमुचलका घेतला. पुढें दसऱ्याची मिरवणूक वंदेमातरम्‌चा घोष करीत कालिकेकडे जात असतां, घोषा बंद करा असें ओरडून पोलिसानें अडविली. श्री. बाबाराव सावरकरांच्या नेतृत्वाखालीं तरुणांनीं त्या पोलिसास बडविलें. त्याबद्दल सावरकर, वर्तक वगैरे तरुणांच्या बरोबर बाबासाहेबांवरही खटला भरण्यांत आला. हा 'वंदेमातरम् खटला' म्हणून प्रसिद्ध आहे. बाबासाहेब त्यांतून निर्दोष सुटले. पण जॅक्सननें त्यांची वकिलीची सनद रद्द केली. जमीनजुमला जप्त केला. मोकासा जहागीर सरकारजमा केली. बाबासाहेबांची परिस्थिति कठीण झाली. पुढें त्यांना देशाच्या स्वातंत्र्याचाच ध्यास लागला. विपन्नावस्था येऊन त्यांतच ह्या थोर गृहस्थाचा अंत झाला.

सरकारची दडपशाही जसजशी वाढत चालली. तसतशी देशांतील असंतोषाची तीव्रताहि वाढत गेली. ह्या काळात महाराष्ट्रांत कांग्रेसमधील मवाळ पक्षाचे नेते गोपाळ कृष्ण गोखले व जहालपक्षाचे अथवा राष्ट्रीय पक्षाचे नेते लोकमान्य टिळक होते. लोकमान्यांच्यापेक्षांही जास्त जळजळीत कार्यक्रमाचा पुरस्कार 'काळ'-कर्ते शिवरामपंत परांजपे यांचा असे. परंतु नाशकांत स्वातंत्र्यवीर तात्याराव सावरकरांनी आपल्या प्रभावी नेतृत्वानें साऱ्या महाराष्ट्राचें लक्ष आपल्याकडे वेधून घेतलें होतें. सभा, अर्ज, विनंत्या या मार्गांनी जनतेचीं गाऱ्हाणी दूर करून इंग्रजी राज्य जनतेस सुखावह कर-ण्याचा मवाळांचा मार्ग अथवा जनतेची सनदशीर चळवळ संघटित करून इंग्रजी राज्य नष्ट करण्याचा राष्ट्रीय अथवा जहाल पक्षाचा मार्ग हे दोन्ही निरुपयोगी आहेत. सशस्त्र क्रांति अथवा दहशतवाद ह्यांचा अवलंब करुन इंग्रजांना येथे राज्य करणें अशक्य करुन सोडले पाहिजे असें सावरकरांनी आग्रहानें प्रतिपादिलें. प्रारंभी गणेशोत्सवांतून जहाल विचारांच्या प्रचारासाठी मित्र–मेळ्याची त्यांनी स्थापना केली. ह्या मेळ्यांतील स्वातंत्र्यवीर

सावरकर, गोविंद कवि ह्यांच्या देशप्रेमाच्या भावना उद्दीपित करणाऱ्या कवितांचा समाजावर मोठा परिणाम झाला. मित्र-मेळ्यांतून पुढें 'अभिनव भारत' ह्या संघटनेची स्थापना झाली. महाराष्ट्रांत व इतरत्रही तिच्या शेंकडों शाखा स्थापन झाल्या. ह्या सुमारास राष्ट्रीय आंदोलन दडपून टाकण्यासाठी लाला लजपत-रायांना हद्दपार करण्यांत आले होते. लोक-मान्यांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावून मंडालेच्या कारागृहांत रवाना करण्यांत आलें. बाबासाहेब खरे ह्यांच्याबर निर्बंध लादण्यांत आले. नाशकास वंदेमातरम् खटला झाला. ह्याच सुमारास एका गाडीवानानें गोल्फचा चेंडू दिला नाहीं म्हणून एक्झिक्यूटिव्ह इंजीनियर विल्यम्स ह्यानें त्यास मरेमरेतों मारले. बाबाराव सावरकरांनी 'अभिनव भारत पद्यमाला' छापून प्रसिद्ध केल्याबद्दल त्यांना जन्मठेपेची सजा देण्यांत आली.

ह्या सर्व अत्याचारांमुळें नाशकातील तरुण मंडळी बेभान झाली. श्री. कृष्णाजी गोपाळ कर्वे, विनायक नारायण देशपांडे प्रभृतींनीं गुप्त कट करून जॅक्सनचा वध करण्याचें ठरविलें. औरंगाबाद येथील तडफदार व देशप्रेमी तरुण अनंत कान्हेरे त्यांना येऊन मिळाला.

'एके करीं शस्त्र, एके करी शिर ।
स्वातंत्र संगीत, रव-अंतरी ।। '

ह्या भावनेनें ते भारुन गेले. विजयानंद नाट्यगृहांत किर्लोस्कर नाटक मंडळीचा 'शारदा' नाटकाचा प्रयोग सुरू असतां कान्हेरे ह्यानें पिस्तुलाच्या गोळ्यांनी जॅक्सनला ठार केले. खुनाची चौकशी झाली. कान्हेरे, कर्वे व देश-पांडे ह्यांना फांशी देण्यांत आले. कटाचा खटला स्वतंत्रपणें चालला. जॅक्सन-वधाच्या वेळीं तात्याराव सावरकर इंग्लंडमध्यें होते. तेथेंही ते आपलें क्रांतिकार्य करीत होते. कटाच्या खटल्यांत त्यांनाही गोंवले. श्री. दामुअण्णा चंद्रात्रे, वि. म. भट, विष्णुशास्त्री केळकर, जोशी इत्यादि अडतीसजणांना कमीअधिक मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यांत आल्या. श्री. कृ. ब. महाबळ गुरुजींना शिक्षकाच्या नोकरीस मुकावें लागलें. नाशकांत ह्या काळांत अपरिमित दडपशाही झाली. सर्वत्र भीति व दरारा बसविण्यांत आला.

ह्यापुढें १९१० नंतर अनेक वर्षें नाशकांतील सार्वजनिक जीवन थंड होतें. १९१४ सालीं लोकमान्य टिळकांची मंडालेहून सुटका झाली. तेव्हां महाराष्ट्रांत पुनः हालचाल सुरू झाली. नाशकांतील सार्वजनिक जीवनास चालना देण्याचें कार्य श्री. किसनलाल चक्रपाणी तिवारी, विठ्ठलपंत उपाध्ये, दादासाहेब गद्रे, भाऊसाहेब अकूत, भाऊसाहेब पाटणकर, लोक-मान्यांचे जावई श्री. अप्पासाहेब केतकर, पटेल वकील ह्या कांहीं पुढाऱ्यांनीं केलें. १९१६ सालीं नाशिक येथें ना. शास्त्री ह्यांच्या अध्य-क्षतेखाली १७ वी राजकीय प्रांतिक परिषद भरविण्यात आली. लोकमान्यांच्या होमरूल चळवळीला येथून मोठी साथ मिळाली. श्री. किसनलालजी तिवारी ह्यांनीं नाशकांत होमरूल लीगची शाखा स्थापन केली. रौलेट ॲक्ट व जालियनवाला बाग अत्याचार ह्याच्या निषेधार्थ मोठमोठ्या सभा येथें झाल्या.

सन १९२० मध्यें लोकमान्य टिळक वारले व गांधीयुगास प्रारंभ झाला. असहकारितेच्या कार्यक्रमाद्वारां एक वर्षात स्वराज्य मिळवि-ण्याचा गांधींचा कार्यक्रम राष्ट्राने स्वीकारला. ह्या कार्यक्रमांत नासिक शहरानें मोठा भाग घेतला. १९२० मध्यें महात्मा गांधी, मोतीलाल नेहरू ह्यांनी नाशकास भेट दिली. यशवंतराव महाराज पटांगणावरील प्रचंड सभेंत त्यांनीं असहकारितेचा संदेश सांगितला. ह्या सभेंत श्री.विठ्ठलराव उपाध्ये यांनीं वकिली सोडल्याचें जाहीर केलें. श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी त्यावेळी भटजी महाराजांच्या मठांत रहात. त्यांचा गांधीजींनीं आपल्या चळवळीस आशीर्वाद घेतला.

नाशकांत असहकाराच्या आंदोलनांतील सर्व कार्यक्रमांचा प्रारंभ करण्यांत आला. श्री. शिव-रामपंत कळवणकर, गोपाळराव जोशी, श्री.

वर्वे यांनी सरकारमान्य शाळांतील शिक्षकाच्या नोकरीचे राजीनामे दिले. त्यांनी व बाळासाहेब मराठे, महाबळ, नरहरपंत क्षीरसागर ह्यांनी आपली स्वतंत्र टिळक राष्ट्रीय शाळा स्थापन केली. श्री. गोविंदराव देशपांडे, श्रीराम गोसावी व वामनराव यार्दी ह्या विद्यार्थ्यांनी सरकारमान्य शाळा सोडून ह्या शाळेंत प्रवेश केला. त्यावेळच्या महाराष्ट्रातील राष्ट्रीय शाळांत ही पहिल्या प्रतीची शाळा होती. [डॉ. द. ब. खाडिलकर, एम्. बी. बी. एस्.च्या शेवटच्या वर्गात होते. त्यांनी शिक्षणास रामराम ठोकला व चळवळीत उडी घेतली. सूतकताई. व खादी भांडार सुरू करण्यात आलें. दारुगुत्त्यांवर निरोधनें झाली. असहकारितेचा कार्यक्रम दिसण्यास सोपा परंतु त्यात स्वार्थत्यागाची व शिस्तीची परिसीमा गाठावी लागणार आहे ह्याची पुरेपूर कल्पना देशास नव्हती. चौरीचौरा येथें दंगा झाल्यामुळें गांधींनी असहकारिता चळवळ स्थगित केली. त्यांना अटक करुन सरकारनें सहा वर्षाची सजा दिली. नंतर कौन्सिलप्रवेशाच्या प्रश्नावर काँग्रेसमध्यें तट पडले. महाराष्ट्रात मूळच्या टिळक अनुयायांत केळकर–करंदीकरांचा म्हणजे 'केसरी'कारांचा एक गट झाला. परांजपे, खाडिलकर गंगाधरराव देशपांडे–म्हणजे 'काळ'-कारांचा दुसरा गट झाला. दुसऱ्या गटांत शंकरराव देव, अण्णासाहेब दास्ताने ही मंडळी सामील होती. नाशकातही हाच प्रकार झाला. भाऊसाहेब पाटणकर, अप्पासाहेब केतकर वगैरे केसरी–गटांत राहिले व हळूहळू काँग्रेसपासून अलग होत होत हिंदूमहासभेचीं सूत्रें चालवं लागले. दादासाहेब गद्रे, भाऊसाहेब अकूत, बाळासाहेब मराठे, गांधींच्या नेतृत्वाचा स्वीकार करुन शहर व जिल्हा काँग्रेसचे पुढारी बनले. रामभाऊ प्रधान ह्यांना गांधीवादी तत्त्वज्ञान शभर टक्के मान्य नव्हते. परंतु हा प्रत्यक्ष कृतिवादी कार्यक्रम आहे हें जाणून ते सदैव निष्ठेनें काँग्रेसबरोबर राहिले. श्री. दादासाहेब गद्रे ह्यांना त्यांनी देता येईल तेवढी साथच दिली.

१९२५ सालीं प्रांतिक कायदे मंडळाची निवडणूक झाली. श्री. बाळासाहेब मराठे व रामभाऊ प्रधान निवडणुकीस प्रतिस्पर्धी म्हणून उभे राहिले. त्यांत रामभाऊ निवडून आले. त्यांनीं कायदे मंडळातील आपली कारकीर्द विद्वत्तापूर्ण व अभ्यासू व्याख्यानानीं बरीच गाजविली.

पुढें गांधीजींची सुटका झाली. त्यांनीं लागलीच संघटना–कार्याला प्रारंभ केला. स्वराज्याच्या मागणीच्या जोर वाढत गेला. लहानमोठे लढे होत राहिले. नासिकच्या नेत्यांनीं बागलाण तालुक्यांतील सारावाढीविरुद्ध लढा १९२८ मध्यें दिला. बारडोलीच्या सत्याग्रहाप्रमाणे जनतेने संघटनेची कमाल केली. नासिकचे बाळासाहेब मराठे, महंत सीतारामदास शास्त्री, डॉ. भुतंकर, गोविंदराव देशपांडे, नामपूरचे श्री. नरहर गोपाळशेट, केशवशेट खुटाडे ह्यांनीं ह्या चळवळींत फार मोठें कार्य केलें. नासिकचें नांव बागलाण चळवळीमुळें महाराष्ट्रांत दुमदुमून गेलें.

देशांतील जनता राजकीय हक्क देण्यासाठी कितपत लायक झाली आहे, ह्याची पहाणी करण्यासाठीं सरकारनें १९२८ सालीं सायमन कमिशन नेमलें. भारताला हा अपमान वाटला. ग्रेसने कमिशनवर बहिष्कार पुकारला. १९२९ सालीं लाहोर काँग्रेसमध्यें संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव करण्यांत आला. ह्या काँग्रेसला नेहमीप्रमाणें दादासाहेब गद्रे, गोविंदराव देशपांडे, महंत सीतारामदास शास्त्री वगैरे उपस्थित राहिले.

१९३० सालीं काँग्रेसनें महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं सविनय कायदेभंगाची चळवळ पुकारली. गांधीजींची अितिहासप्रसिद्ध दांडीयात्रा आणि मिठाचे सत्याग्रह झाले. मिठाच्या सत्याग्रहासाठीं नासिकमधून श्री. द. या. पिंगळे, रा. भि. महाजन, दगूअण्णा जालनेकर, भागप्पा गुळवे, आत्मारामपंत

नळवाडकर ह्यांच्या नेतृत्वाखालीं स्वयंसेवकांच्या तुकड्या पाठविण्यांत आल्या. भगिनींचीहि अेक तुकडी सत्याग्रहास गेली. चळवळीसाठीं विद्यार्थ्यांची व तरुणांची संघटना करण्यांत आली. ह्या कामीं श्री. कृ. द. बेंदरकर, प्रा. रा. वि. ओतूरकर, दत्तोपंत पोतनीस ह्यांनीं परिश्रम केले.

१९३० च्या ऑगस्टमध्यें बागलाण, कळवण व नांदगांव ह्या तालुक्यांत मोठे जंगल सत्याग्रह करण्यांत आले. मिठाच्या कायदेभंगामुळें केवळ समुद्रकांठच्या रहिवाशांत सत्याग्रहाच्या चळवळीचें लोण पोहोंचलें होतें. जंगल सत्याग्रहामुळें तें लोण सर्व ग्रामीण भागात पसरलें. नाशकास केतकर टाऊन हॉलमध्यें स्वयंसेवकांचीं शिबिरें सुरू झालीं. रोज प्रभात फेऱ्या, प्रचार सभा सुरू झाल्या. बागलाण तालुक्यांत भिलवाड आणि पठावे येथें दादासाहेब गद्रे व डॉ. खाडिलकर ह्यांच्या नेतृत्वाखाली जंगल सत्याग्रह करावयाचें ठरलें. शहरांतून तिरंगी ध्वज फडकावीत प्रचंड मिरवणुका निघाल्या. बागलाण जंगल सत्याग्रहांत हजारों शेतकऱ्यांनीं भाग घेतला. दादासाहेब गद्रे, डॉ. खाडिलकर आदि शेंकडों कार्यकर्त्यांना अटक व शिक्षा झाल्या.

कळवण तालुक्यांतील चणकापूर सत्याग्रहांत त्या भागांतील आदिवासींनी प्रचंड संख्येने भाग घेतला. आदिवासींच्या जमावावर पोलिसांनी गोळीबार केला. त्यांत अनेक लोक मरण पावले. कळवण भागांत तीव्र दडपशाही करण्यांत आली.

परंतु दडपशाहीनें नाशिकची चळवळ दबली नाहीं. श्री. बाळासाहेब मराठे, गोविंदराव देशपांडे, महंत सीतारामदास शास्त्री, डॉ. भुतेकर, द. या. पिंगळे ह्या कार्यकर्त्यांनीं ती तेवत ठेवली व अेकामागून अेक कारावास पत्करले. १९३० पूर्वी कांहीं मोजक्या नेत्यांच्या कर्तृत्वानें राजकीय कार्य पुढें जात असे. आता हजारों सामान्य कार्यकर्ते नेते बनले. चळवळीला व्यापक स्वरूप आलें.

१९३० च्या सविनय कायदेभंगांच्या चळवळीने राज्यकर्त्यांना सळो कीं पळो करून सोडलें. व्हाईसरॉय लॉर्ड अर्विन ह्यांनीं गांधीजींशी वाटाघाटी केल्या. त्यांत मार्च १९३१ मध्यें गांधी–आर्यावन करार झाला, सर्व राजकैद्याना मुक्त करण्यात आले. स्वराज्याच्या चळवळीनें प्रगतीचा अेक महान् टप्पा गांठला.

१९३१ साली स्वराज्याचें स्वरूप ठरविण्यासाठी लंडनला गोलमेज परिषद भरली. पण इंग्लंडमध्यें हुजुरपक्षाचा जोर झाला. १९३० मध्यें इंग्रजी साम्राज्याची भारतांतील इभ्रत कमी झाली. तिची कडक कारभारानें भरपाई केली पाहिजे असें धोरण ठरलें. नवे व्हाईसरॉय लॉर्ड विलिंग्डन ह्यांनी दडपशाहीची पूर्ण तयारी करून ठेवली. गांधी-आर्यावन कराराच्या कलमांना त्यांनी हरताळ फांसला. तिकडे गोलमेज परिषद अयशस्वी झाली.

गोलमेज परिषदेहून परत येताच गांधीजींनीं वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ पुकारली. पुन: देशांतील हजारों कार्यकर्त्यांनीं तुरुंग भरून गेले. नाशकांतील दादासाहेब गद्रे, मराठे, देशपांडे, पिंगळे, महंत सीतारामदास, भैय्यासाहेब पांडे, माधवराव जानोरकर, काशीनाथपंत वैशंपायन, आपटे गुरुजी इत्यादि सर्व नामवंत कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यांत आलें. ह्या चळवळीच्या प्रारंभापासून श्री. दत्तोपंत पोतनीस ह्यांनीं नाशकांत भूमिगत राहून जिल्ह्यांतील चळवळीची सूत्रें चालविलीं. सायक्लोस्टाईलवर बुलेटीन काढून त्याची वितरणव्यवस्था श्री. काशीनाथ जोशी, अण्णा क्षेमकल्याणी, विश्वनाथ गायधनी ह्यांच्या साहाय्यानें चालविली. ह्या बुलेटीन प्रकरणांत ह. प्रा. ठा कॉलेजांतील प्रा. ओतुरकर ह्यांना अटक करून तुरुंगांत टाकण्यांत आले. श्री. वसंत नारायण नाईक, श्री. दत्तोपंत बिडकर हे नवीन पुढारी याचवेळी चमकूं लागले. १९३० व ३२ सालच्या चळवळींनीं राजकीय कार्य-

कर्त्यांचा फार मोठा संच नासिक शहरांत निर्माण झाला.

वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ १९३४ साली विराम पावली. सर्व राजबंदी ह्या सुमारास मुक्त झाले. पण सत्याग्रह थांबला तरी कार्यकर्त्यांनीं राजकीय जागृति व संघटनेचें कार्य मात्र थांबविले नाहीं. श्री. गोविंदराव देशपांडे, महंत सितारामदास ह्यांच्यासारख्या नेत्यांनीं आपल्या प्रभावी भाषणांनीं राजकीय जागृति व संघटना वाढविण्याचें कार्य चालविले. श्री. दत्तोपंत पोतनीस, श्री. दत्तोपंत बिडकर ह्यांनी जिल्ह्यात जागोंजागी विधायक कार्याच्या संस्था स्थापन केल्या व गांधीजीच्या रचनात्मक कार्याची मजबूत फळी नासिक शहरांत व जिल्ह्यांत निर्माण केली.

१९३५ मध्ये नव्या संघटनेप्रमाणें मध्यवर्ती कायदे मंडळाच्या निवडणुका झाल्या. कांग्रेसचे उमेदवार श्री. केशवराव जेधे व काकासाहेब गाडगीळ ह्यांच्या प्रचाराचें कार्य श्री. गोविंदराव देशपांडे ह्यांनी उत्तम प्रकारें संघटित केलें.

१९३७ सालीं प्रांतिक स्वायत्ततेच्या तत्त्वानुसार प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुका झाल्या. नासिक मतदार संघातर्फे कॉंग्रेसचे श्री. गोविंदराव देशपांडे, वसंतराव नाईक, पृथ्वीराज शेठ निमाणी हे तिघेही यशस्वी झाले. मालेगांव विभागांत श्री. भाऊसाहेब हिरे, लालचंद हिराचंद हे कांग्रेसचे व रावसाहेब थोरात हे शेतकरी कामकरी पक्षाचे आमदार निवडून आले. बहुतेक सर्व राज्यांत कांग्रेसचें बहुमत झालें. परन्तु गव्हर्नरांनी मंत्रिमंडळाच्या कारभारांत ढवळाढवळ न करण्याचें आश्वासन दिल्याखेरीज सत्ता हातीं घेण्यास कॉंग्रेसनें नकार दिला. सरकारनें कॉंग्रेसविरोधी मंत्रिमंडळें सत्तारूढ केलीं पण ती बहुमताशिवाय कारभार कशी करणार? अखेरीस ढवळाढवळ न करण्याचें आश्वासन देऊन कॉंग्रेसनेत्यांना मंत्रिमंडळें स्थापन करण्यास पाचारण करण्यांत आलें. मुंबई राज्यांत श्री. बाळासाहेब खेर ह्यांच्या नेतृत्वाखालीं मंत्रिमंडळ स्थापन झालें. भाऊसाहेब हिरे यांना पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून निवडण्यांत आलें. भाऊसाहेबांच्या कर्तृत्वानें मंत्रिमंडळाचा कारभार २७ महिने चालला. युरोपांत हिटलरनें भोवतालचीं लहान राष्ट्रें गिळंकृत करावयास प्रारंभ केला व दुसऱ्या जागतिक युद्धास १९३९ सालीं तोंड लागलें. लोकशाहीच्या संरक्षणासाठीं हें युद्ध असल्यानें भारत ह्या युद्धांत सामील आहे असें व्हाईसरॉय लिन्लिथगो ह्यांनीं जाहीर केलें. परन्तु हें युद्ध साम्राज्य–रक्षणासाठीं नसेल व लोकशाहीरक्षणासाठीं असेल तर भारतीय स्वातंत्र्याची घोषणा ब्रिटिश सरकारनें केली पाहिजे असा आग्रह कॉंग्रेसनें धरला. परन्तु ब्रिटिशांनी ही सूचना स्वीकारली नाही. पंतप्रधान चर्चिल ह्यांनीं तर जाहीर केलें की ब्रिटिश साम्राज्याचें विसर्जन करण्यासाठीं मी पंतप्रधान झालेलों नाहीं. सर्व कांग्रेस मंत्रिमंडळांनी राजिनामे दिले. व्हाईसरॉयचा अनियंत्रित कारभार सुरू झाला. नासिक येथे गोविंदराव देशपांडे, माधवराव जानोरकर, वसंतराव नाईक वामनराव यार्दी प्रभृतींनी ब्रिटिशांची युद्धविषयक दुतोंडी भूमिका जनतेसमोर मांडण्यासाठी ज्वलंत भाषणाचे युद्धविरोधी दौरे केले. त्यांच्यावर खटले भरून त्यांना लांब मुदतीच्या शिक्षा देण्यांत आल्या. अेवढ्यांत गांधीजींनी वैयक्तिक सत्याग्रह पुकारला. नाशकांत पहिले सत्याग्रही ह्या नात्यानें वयोवृद्ध श्री. दादासाहेब गद्रे ह्यांनी सत्याग्रह केला. त्यावेळी श्री. दादासाहेबांचें वय ६७ वर्षांचें होतें. वि. चि. पवार, आव्हाड वकील, भाऊसाहेब हिरे, यशवंतराव पिंपळगांवकर, डॉ. गो. ग. जोशी, दादा चंद्रात्रे वगैरे सर्व प्रमुख पुढारी सत्याग्रह करून तुरुंगांत गेले. दुसऱ्या जागतिक युद्धांत जर्मनीच्या नेतृत्वाखालीं अक्षराष्ट्रांची सरशी होत होती. सरकारला जया–साठी भारताची सर्व साधनसामग्री, मनुष्यबळ युद्धाच्या कामी वापरावयाचें होतें. सरकारी दडपशाही वाढत गेली. देशातील राजकीय परिस्थिति तापू लागली. मुंबईस अखिल भारतीय

काँग्रेसच्या अधिवेशनांत गांधीजींनी ब्रिटिशांना "चले जाव"ची घोषणा केली. राष्ट्राला 'करेंगे या मरेंगे'चा आदेश दिला. प्रत्येकाला स्वतःच पुढारी होण्यास सांगितलें. ह्यांतून १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाचा प्रारंभ झाला.

मुंबई अधिवेशनाहून परत येतांच श्री. गोविंद राव देशपांडे, माधवराव जानोरकर, दत्तोपंत पोतनीस, डॉ. खाडिलकर वगैरेंना स्टेशनवर अटक करण्यांत आली. श्री. दादासाहेब गद्रे ह्यांची शहरांत येतांच मिरवणूक काढली व सरकारवाड्यासमोर सभा भरवून ब्रिटिश सत्तेवर 'चले जाव' ची नोटीस बजावली. त्यांना नासिकरोड जेलमध्यें टाकण्यांत आलें. इतर शेकडों पुढारी व कार्यकर्ते कारागृहांत स्थानबद्ध करण्यांत आले. श्री. वसंतराव नाईक, वामनराव यार्दी, माधवराव लिमये इत्यादि बरेच पुढारी भूमिगत झाले. त्यांनी गुप्त राहून नाशकाची चळवळ दीर्घकाळ चालविली. स्त्रियांनी या चळवळींत फार मोठा भाग घेतला. राधाबाई देशपांडे, कमलाबाई जानोरकर, माई जोशी, पार्वतीबाई अिंगळे, सौ. वत्सलाबाई पोतनीस, मालतीबाई सबनीस, सौ. चंदूताई यार्दी, कमलाबाई देवरे इत्यादि स्त्रियांना शिक्षा झाल्या. माधवराव अिंगळे, भि. रा. जाधव, केशवराव मोरे, नारायणभाअी कंसारा, रामाचार्य वगैरेंना शिक्षा झाल्या.

१९४५ मध्यें काँग्रेस व सरकार यांच्या दरम्यान वाटाघाटी सुरू झाल्या व सर्व राजबंदींची सुटका झाली.

क्रिप्स शिष्टाई जरी अयशस्वी झाली तरी व्हाअीसरॉय लॉर्ड माउंटबॅटन यांनीं वाटघाटींना निर्णायक स्वरूप दिलें. देशाची फाळणी झाली. १९४७ रोजीं भारत स्वतंत्र झाला. अनेक पिढ्यांनी स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं केलेल्या बलिदानाचें सार्थक झालें. थोर देशभक्तांनीं उराशीं बाळगलेलें स्वप्न साकार झालें. भारतभू स्वतंत्र झाली.


नाशकांत श्री. दादासाहेब गद्रे ह्यांच्या हस्तें मध्यरात्री नगरपालिकेवर तिरंगी राष्ट्रध्वज पहिल्या स्वातंत्र्यदिनी मोठ्या इतमामानें फडकविण्यांत आला.

पारतंत्र्याच्या प्रदीर्घकाळांत नासिकमधील हजारों स्त्री-पुरुष देशभक्तांनीं स्वातंत्र्यप्राप्तीसाठीं निरनिराळ्या मार्गांनीं आपापल्या परीनें जे प्रयास केले त्या सर्वांचा नांवनिशीवार उल्लेख ह्या अल्पशा लेखांत करतां आला नाहीं. तथापि, ज्ञात व अज्ञात अशा ह्या असंख्य कार्यकर्त्यांचा ऋणनिर्देश करणें कर्तव्य आहे. असंख्य देशभक्तांच्या त्यागांतून व आत्मक्लेशांतून नासिक शहराचें नांव स्वातंत्र्याच्या आंदोलनाच्या अितिहासामध्यें ठळकपणें लिहिलें गेलें आहे. कांहींजणांनीं ह्या कार्यांत प्रत्यक्ष भाग घेतला. बऱ्याच जणांनी अप्रत्यक्ष रितीनें कार्यास साहाय्य केलें. सर्वांच्या प्रयत्नानें देशाचें स्वातंत्र्य साकार झालें. ह्या सर्व राष्ट्रभक्तांना सहस्त्रशः अभिवादन!

••०••०••०••

साहित्य आणि नियतकालिकें

(१८६४–१९६४)



– प्रा. मु. गो. देशपांडे

अगदी थोड्या स्थलमर्यादेत शंभर वर्षांच्या साहित्याचा आढावा आणि नियतकालिकांची कामगिरी स्थूलमानानें वाचकापुढे मांडतांना टीकात्मक विवेचन येथें अभिप्रेत नाहीं. नगरपालिकेचा शताब्दिमहोत्सव साजरा करणारा हा गौरवग्रंथ आहे. म्हणून या विहंगमावलोकनात मूल्यमापनाची दृष्टि फारशी ठेवलेली नाही. या आढाव्यासाठी १ काव्य, २ नाटक, ३ कादंबरी, लघुकथा व विनोद, ४ चरित्र व आत्मचरित्र, ५ वाङमयसमालोचन व संपादन कार्य आणि ६ संकीर्ण असे प्रमुख विभाग कल्पिले आहेत. ह्यांखेरीज ऊर्दू व इंग्रजीमधील साहित्यनिर्मिति, संस्कृत विद्येचा व्यासंग यांचाहि थोडक्यांत निर्देश करून नियतकालिकांची कामगिरी सूचित करावयाची आहे.

काव्य : शंभर वर्षांच्या या वाङमयीन कामगिरीचा इतिहास गणेशशास्त्री लेले याच्यापासून सुरू होतो. गणेशशास्त्री लेले यांनी १८५३ ते १८८८ पर्यन्त एकूण वीस पुस्तकें लिहिलीं. त्यापैकी बरीचशी प्रकाशित असली तरी काही अद्यापि अप्रकाशित आहेत असे त्यांच्या कालिदासविरचित 'रघुवंश' या काव्याच्या द्वितीयावृत्तीत म्हटलें आहे (१९३३). 'जानकीपरिणय' हें नाटक त्यांनी १८६५ सालीं प्रसिद्ध केलें. परंतु नाशिक शहराची काव्यक्षेत्रांतील परंपरा मराठी वाङमयांत श्रेष्ठ ठरणारी असल्यानें व जवळ जवळ अखंडितपणें शंभर वर्षे चाललेली दिसत असल्याने गणेशशास्त्री लेले यांच्या 'शिवाजी चरित्र' या काव्याच्या निर्देशानें आरंभ करणें योग्य होईल. कुंटे यांचें गाजलेलें 'राजा शिवाजी' हें काव्य, नाटककार किर्लोस्कर यांचेहि शिवाजी–वरील काव्य व गणेशशास्त्र्यांचें 'शिवाजी–चरित्र' ही तीन परीक्षकांपुढें होतीं. लेले शास्त्री यांना प्रथम क्रमांकाचें बक्षीस मिळाल्याचा निर्देश इतिहासांत आढळतो. 'रघुवंशाचें भाषांतर' (१८८१) आणि 'कृष्णाकुमारी' (१८८८) हीं त्यांचीं काव्यें प्रसिद्ध आहेत. शंकराचार्यांच्या अमरुशतकाचें त्यांनी केलेलें भाषांतर १८८१–मधील आहे. रघुवंशाच्या प्रस्तावनेचें वर्ष १८८१ आहे. निर्णयसागरनें छापलेलें वर्ष १८८३ आहे.

गणेशशास्त्री लेले यांच्या संबंधीं सौकर्यानें अधिक लिहितां येण्यासारखी स्थिति त्यांच्या दोन महत्त्वाच्या ग्रंथांच्या पुनर्मुद्रणामुळें निर्माण झाली असून देखील या ठिकाणीं स्थलाच्या अभावीं जास्त विवेचन करतां येत नाही. सोलापूरची महाराष्ट्र साहित्य परिषद व पॉप्युलर प्रकाशन यांचें संयुक्त प्रकाशन म्हणून रघुवंशाच्या मराठी अनुवादाची दुसरी आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली असून डॉ. शं. गो. तुळपुळे यांनी या रघुवंशाचें रसग्रहण केलें आहे तें सुरुवातीला या नव्या आवृत्तींत घातलेलें आहे. खेरीज रघुवंशाच्या नवव्या सर्गाचें लेले शास्त्र्यांनीं समवृत्त भाषांतर केलें होतें तेंहि शेवटीं या ग्रंथांत दिलें आहे. चरित्र व ग्रंथलेखन यांविषयी जी थोडक्यांत माहिती आधीं दिली आहे त्यातील पंडिता रमाबाई यांच्याबरोबर त्यांचा नासिक येथें संस्कृत भाषेंत झालेला वाद व त्यांत त्यांनीं नासिकला मिळवून दिलेला तेव्हांचा विजय यांचा उल्लेख महत्त्वाचा आहे. म. म. पोतदारांनीं 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' यांत जी माहिती दिली आहे तिचा उपयोग या कामीं करून घेण्यांत आला आहे किंवा नाहीं हें या प्रास्ताविकावरून ध्यानांत येत नाहीं. लेले शास्त्री यांच्या ज्या दुसऱ्या ग्रंथाचें पुनर्मुद्रण झालें तें म्हणजे 'तीर्थयात्रा-प्रबंध' याचें होय. देशमुख प्रकाशन संस्थेनें तें प्रकाशित केलें असून द. वा. पोतदार यांनीं अगदी छोटी प्रस्तावना या पुनर्मुद्रणासाठीं लिहिली आहे. याचा निर्देश पुढें त्या संदर्भात थोडक्यांत केला आहे.

लेलेशास्त्र्यांजवळ संस्कृत शिकलेले कवि नारायण वामन टिळक यांची सुरुवातीची कविता नासिकच्याच परिसरांत लिहिली गेली आहे. 'काव्यकुसुमांजलि' हें कवितेसाठीं एक मासिकहि त्यांनीं चालविलें होतें. या मासिकाचें छोटें प्रसिद्धि-पत्रक टिळकांची तळमळ दर्शविणारें आहे. त्यांत त्यांनीं आपल्याजवळ तयार असलेल्या एकशें-त्रेसष्ट कवितांची यादी दिली होती. हिंदुत्वाचा अभिमान, मराठ्यांचा इतिहास, गोरक्षणाविषयींची तळमळ या गोष्टींनीं भारलें गेलेलें टिळकांचें कविमन सुरुवातीच्या कवितांमधून प्रतिबिंबित झालें आहे. टिळकांची पुढील कविता भारतीय संस्कृतीचा वारसा व उदात्तता आत्मसात केलेली भावकविता झाली. केशवसुत व टिळक यांची एकमेकांबद्दलची आदरभावना, बालकवींचा प्रिय सहवास या गोष्टीहि टिळकांच्या कवि-हृदयाची साक्ष देणाऱ्या आहेत. फुलामुलांचे कवि ते होतेच, परंतु धर्मान्तरामुळें हिंदुत्व व मराठी इतिहास ह्यांच्या चिंतनांतूच मिळणारीं पोषक द्रव्यें जरी त्यांच्या प्रतिभेला पुढें वापरतां आलीं नाहींत, तरीहि फार मोठ्या आशयाची कविता त्यांनीं अधून मधून लिहिली आहे. प्रासादिक रचना व कोमलता हे टिळकांच्या कवितेचे विशेष आहेत.

स्वातंत्र्यवीर सावरकर आणि कवि गोविंद यांच्या काव्याबद्दल सर्व मराठी भाषिकांना अभिमान वाटणें स्वाभाविक आहे. रविंद्रनाथांना नोबेल पारितोषिक मिळाल्यानंतर स्वतःचा आनंद बंदीखान्यांतून व्यक्त करणाऱ्या सावरकरांच्या ऊर्जस्वल कवितेची आठवण त्यांच्या प्रतिभेची महात्मता सूचित करणारी आहे. कल्पना-वैभव, देशाभिमान आणि भव्योदात्तता दर्शविणाऱ्या 'जगन्नाथाचा रथ', 'सागरास', 'माझें मृत्युपत्र' अित्यादि सावरकरांच्या कविता कोणत्याहि वाङमयाचें भूषण ठराव्यात. त्यांच्याच स्फूर्तीनें कवि गोविंदांनीं लिहिलेली देशाभिमानपर व आध्यामिक वळणाची कविता ओजस्वी आणि हृदयस्पर्शी आहे. 'टिळकांची भूपाळी', 'मुरली' आणि 'सुन्दर मी होणार' या कविता लिहिणारा कवि एक अमर कवि होय. उपहासाचा अवलंबहि देशाभिमानी गोविंदांनीं अत्यंत जाज्वल्य स्वरूपांत केला आहे. सबंध महाराष्ट्राला चैतन्यमय करून टाकणारी त्यांची कविता भवानी तलवारीसारखी लखलखली. सरकारनें त्यांच्या कवितांपैकीं बऱ्याच जप्त केल्या होत्या त्या खेर मंत्रिमंडळानें मुक्त केल्यानंतर कृ. ब. महाबळ व अितर मित्र यांनीं उत्कृष्ट संपादनाची जोड देऊन आतां उपलब्ध करून दिल्या आहेत.

चंद्रशेखर पुढें जरी उष्ण गुजरातेत बडोद्याचे राजकवि म्हणून गेले तरी त्याच्या मनःचक्षूसमोर शीतल पुण्यमयी गोदावरी सदैव उभी असे. 'गोदागौरव' या कवितेची नादमधुरता आणि भक्तिरस वाचकाला गुंगवून टाकतात. 'काय हो चमत्कार !' वगैरेंमध्ये देखील त्याच्या पद्यपंक्ती सुडौल उतरल्या आहेत. विठ्ठलराव घाटे यांनी आपल्या आत्मचरित्रात चंद्रशेखराचे जें वेधक व अतिशय सहृदय रीतीने रेखाटलेलें शब्दचित्र दिलें आहे तें या कवितेचा आस्वाद आणखी वाढविते.

लक्ष्मीबाई टिळक आणि सोपानदेव चौधरी यांच्या कविता थोड्याच आहेत. संतकवळ (१९३६) व 'भरली घागर' हे लक्ष्मीबाईचे कवितासंग्रह. काव्यकेतकी (१९३०) व अनुपमा (१९५०) हे सोपानदेवाचे कवितासंग्रह. कवित्व-शक्ति पहिल्यापासूनच लक्ष्मीबाईच्या अंगी होती. १९३३ च्या नाशिक येथील कविसंमेलनाच्या त्या स्वागताध्यक्षा होत्या. येथील साहित्य-परंपरेचा थोडक्यांत गोषवारा देऊन कविता व कपिता यांतील भेद त्यांनी त्यावेळी मांडला होता. टिळकांचें अपुरें ख्रिस्तायन पूर्ण करण्यांत त्या बऱ्याच यशस्वी झाल्या. सोपानदेव चौधरी यांची 'गोकुळिचा कान्हा माझा' ही कविता घरोघर म्हटली गेली आहे. बहिणाबाईच्या अस्सल कवित्वाचा आनुवंशिक वारसा त्यांना लाभला आहे. भावपूर्ण कवितेबरोबरच विडंबनात्मक कविताहि ते गंमतीदारपणे लिहू शकतात.

कुसुमाग्रजांच्या काव्यसंपदेनें गेली वीस बावीस वर्षे सर्व मराठी रसिकवर्ग भारावून गेला आहे. या कवितेला गुरुस्थानीं मानणारे नंतरचे कांहीं श्रेष्ठ कवि आहेत. नवकवितेच्या प्रभावी आगमनानें विचलित न होतां नव्यांतीलही सत्त्वांश आत्मसात करणारी कुसुमाग्रजांची कविता अजून अग्रभागीच आहे. त्यांच्या इतर साहित्यसेवेचें महत्त्व कमी न करता असे कोणीही म्हणू शकेल की यंदाच्या साहित्य-संमेलनाच्या अध्यक्षपदीं त्यांची जी अविरोध निवड झाली ती त्याच्या कवित्वशक्तीबद्दलची थोर भावना प्रामुख्यानें व्यक्त करणारी आहे.

अडीचशें ते तीनशें कविता ही संख्या लहानशी नाही व फार मोठीहि नाही. परंतु ग. रं. शिरवाडकर या नांवाने नाशिकच्या 'बालबोध-मेवा' किंवा 'नवा मनु'मध्ये प्रसिद्ध झालेल्या सुरवातीच्या कवितापासून अगदी अलीकडच्या कवितेपर्यंत गुणवत्ता कायम ठेवण्याचे कुसुमाग्रजांना साधलें आहे हे विशेष होय. तोच तो सूर किंवा कृत्रिम रीतीनें लावविलेला आशय फार थोड्या कवितांत आढळेल. प्रत्येक कवितेची कांति संशयातीत आहे. मराठी बाणा, संस्कृत वाङमयाचा अभ्यास, नवी सामाजिक जाणीव व मानवी आकांक्षांची भरारी यांचबरोबर संवेदनाक्षम मनाला अकारण केव्हातरी व्याकुळ करणारें पिसे यांची प्रचीति त्याच्या कवितामधून येते.

घोटीव रेखीवपणा आणि 'मेटॅफर'चा (प्रतिमेचा) समर्थ उपयोग यांमुळे कुसुमाग्रजाना कमीतकमी शब्दांत जास्तीत जास्त अभिव्यक्ति साधते. व्यक्तिमनाचें आविष्करण करतांनाच जनमनाचाहि ठाव घेणारी ही कविता आहे. 'आगगाडी आणि जमीन', 'कोलंबसाचें गर्वगीत', 'मातीचा पुत्र' इत्यादि त्याच्या कविता आणि पूर्वीची 'गर्जा जयजयकार' व चिनी आक्रमणाच्या त्वेषातून निर्माण झालेली अलीकडची कविता मानवी प्रतिष्ठेची आणि अन्यायाला बेचिराख करून टाकणाऱ्या दिव्यशक्तीची मूर्तिमंत प्रतिमाच आहे. या तेजस्वितेबरोबर कमालीचें रेशमी हळुवारतेनें भरलेलें 'स्वप्नाची समाप्ति' हें गीत त्यांनी चांदण्याच्या हातांनी लिहिलें आहे.

कवि निकुंब ह्यांचे उज्वला (१९४५), उर्मिला (१९५४) व सायसाखर (१९५४) हे काव्यसंग्रह कोमल व नादमधुर अभिव्यक्तीमुळें रसिकमान्य झाले आहेत. 'सोन्याचा अंबरा' ही त्यांची कविता वारवार उल्लेखिली जाते.

या ठळक कवींव्यतिरिक्त बळवंत खंडूजी पारख यांची 'विष्णुसहस्रनामार्थमंजिरी', वि. ना. वाड यांचें काव्यकुसुमोद्यान (चार भाग), एकनाथ यादव निफाडकर यांची 'काव्यानंद मंजुषा' व खंडकाव्यें, त्यांनींच वाड प्रभृतींच्या मदतीनें व पाध्यांच्या साहाय्यानें संपादित केलेला 'गोदातटीचा गुंजारव' या काव्यसंग्रहांचा उल्लेख केला पाहिजे. कवि अनंततनय यांनीं पद्मदल (१९२७)हा महत्त्वाचा कवितासंग्रह संपादित केला. तो नाशिक-नगर वाङमय मडळाच्या वतीनें प्रसिद्ध झाला. या संग्रहांत लक्ष्मणशास्त्री लेले यांनी 'जनस्थान-प्रशंसा' या नांवाची कविता लिहिली आहे. पूर्वीच्या महत्त्वाच्या व्यक्तींच्या कार्याचा त्यांत उल्लेख असून शिवाय टीपाहि दिल्या आहेत. इतिहासासाठी त्या कवितेचा उपयोग चांगला होईल. पद्मपूर हें नाशिकचे आद्य नाव. म्हणून या पुस्तकाला 'पद्मदल' हें नाव दिलें आहे. 'माधवी' या कवितासंग्रहांत सव्वीस कवी व दोन कवियत्री आहेत. कुसुमाग्रज, निशिगंध (रा. श्री. जोग), सोपानदेव चौधरी, ठोकळ वगैरे कवि यांत आहेत. 'कृष्णकरीं चंद्र' आणि 'मनोरमा' या दोन शिरवाडकरांच्या कविता यांत आहेत. 'पद्मपुष्पहार' वेगवेगळया वर्षी चार विभागांत लिहिणारे ग. गो. जोशी, पु. वि. रहाळकर वगैरेंच्या कविताही यांत आहेत. 'पारिजात' हा संग्रह पु. वि. रहाळकर यांनी संपादित केला आहे. यांत त्यांच्या व इतर सतराजणांच्या मिळून सदतीस कविता आहेत. कवितासंग्रहांनीं त्यावेळी केलेली ही कामगिरी नाशिकच्या दृष्टीनें महत्त्वाची खासच आहे. पाध्यांच्या प्रयत्नानें 'गोदातटीचा गुंजारव' हें पुस्तक तर विद्यापीठाच्या उच्च अभ्यासक्रमांतही समाविष्ट झालें होतें. रहाळकर, कोचरगांवकर, दे. ना. टिळक वगैरेंची कवित्व-शक्ति या संग्रहांतून अनेकदां प्रत्ययाला येते. पांगारकरांचीही कविता नमुनेदार आहेत.

यांखेरीज बा. गं. घोटीकर यांचें किंकर हें पुस्तक, कवि अशोक (द. के. भट) ह्याचे 'चांदोबाच्या निळ्या घरीं', शिवदत्त देवपूरकर यांचा 'पाषाण पाणी' व कवि भृंग यांचा 'गुंजारव' हे संग्रह आढळतात. अ. वि. मुळे यानी लजपत राय, मोतीलाल व जवाहरलाल नेहरू, बापु गोखले व संभाजी नारायण पंतसचिव यांजवर पोवाडे लिहिले आहेत. जी. के. डबीर यांनीं नेताजी पालकर ह्यांचा पोवाडा लिहिला आहे. वारे शास्त्री यांच्या यादींत हीं पुस्तकें नसलीं तरी 'पिठाचें काव्यमय वर्णन' या गो. मु. पंडित यांच्या काव्याचा उल्लेख आहे. ब. चिं. सहस्र-बुद्धे यांनीं 'स्वल्पविराम' हा विनोदी कवितांचा संग्रह प्रसिद्ध केला आहे. श्री. वसंत बापट ह्यांचा 'सोमवेद' हा कवितासंग्रह व वि. म. घुले ह्यांचीं बालगीतेंही प्रसिद्ध झालीं आहेत. काव्यविष-याच्या या आढाव्याच्या अखेरीस खाडीलकर वकोल आणि योगेश्वर अभ्यंकर व गोपालसिंग परदेशी यांचा उल्लेख आवश्यक आहे. अभ्यं-करांची वरीच भावगीतें लोकप्रिय झाली आहेत.

नाटक : महत्त्वाच्या व्यक्तीचा निर्देश सावर-करांच्या 'उःशाप', 'संन्यस्त खड्ग' व 'उत्तर-क्रिया' या नाटकांच्या संदर्भात करून पुढें जातां येईल. अनंत वामन बर्वे यांनीं आधीं लिहिलेलीं पौराणिक व ऐतिहासिक नाटकें बरींच आहेत. तथापि त्यांच्या 'महाराणा प्रतापसिंह' या नाटकावर सरकारनें बंदी घातली होती. त्यांच्या पौराणिक नाटकांची लोकप्रियताही तेव्हां बरीच होती व त्यांनी गोल्डस्मिथच्या 'शी स्टूप्स टु काँकर' या नाटकाचें 'समजुतीचा घोटाळा' हें रूपांतर केलें अेवढें येथें नमूद करण्यापेक्षां अधिक तपशील स्थलाभावीं देतां येत नाहीं.सावरकरांच्या नाटकांत अहिंसेचा निष्प्रभपणा, पानिपतानंतर उत्तर दिशा जिंकण्याची उरलेली क्रिया पार पाडणे व धर्मांतर केलेल्यांचें शुद्धीकरण हे विषय आले आहेत.

नंतरचा अुल्लेख अलीकडच्या तीन चार विद्यमान नाटककारांचा आहे. डॉ. वर्टी यांचें 'राणीचा बाग' हें नाटक राज्यस्पधत प्रथम क्रमाकाचें ठरलें होतें. त्याचप्रमाणें या नाटकास

अिद्रूरचें यशस्वी पारितोषिकही मिळालें आहे. आपल्या 'अभिनय' ह्या कादंबरीवरून त्यांनी तें रचिलें आहे. या नाटकांतील उत्कटता मनाची पकड घेणारी आहे. 'मॅकीज् पाँ' याचें रूपांतर 'तिसरी अिच्छा' या नांवाने त्यांनीं केलें असून तेंही परिणामकारक अुतरलें आहे. अितरही कांहीं अेकांकिका त्यांनीं लिहिल्या असून त्यांतील विनोद प्रेक्षकांच्या मनाची पकड घेणारा आहे.

वि. वा. शिरवाडकरांच्या नाटकांपैकीं 'दुसरा पेशवा' व 'कौंतेय' ही ऐतिहासिक व पौराणिक विषयांवरील स्वतंत्र नाटकें असून 'दूरचे दिवे' 'वैजयन्ती', 'राजमुकुट' आणि 'ऑथेल्लो' हे गाजलेले अनुवाद आहेत. यांखेरीज 'दिवाणी दावा व 'नाटक बसतें आहे' या अतिशय लोकप्रिय विनोदी नाटिका आणि 'देवाचें घर' ही अनुवादित नाटिका ह्याही सर्वपरिचित आहेत. 'दुसरा पेशवा'मधील बाजीरावाचें व्यक्तिचित्रण अत्यंत प्रभावी आहे. 'कौन्तेय' नाटकांत कर्णाची दारुण मनोव्यथा व्यक्त होते. प्रामुख्यानें सर्व घटना कर्णाच्या अन्तर्मनांत घडत असतात. यांतील कृतीहि ही अतिशय सहृदयतेनें आणि नव्या जाणिवेनें रंगविली आहे. 'वैजयंती' नाटक विषय फारसा अनुकूल नसूनहि भाषेच्या सौष्ठवामुळें आणि सामर्थ्यामुळें यशस्वी ठरतें.

शेक्सपिअरचे अनुवाद पूर्वी झाले आहेत. परन्तु 'मॅक्बेथ'व 'ऑथेल्लो' यांच्या अनुवादामध्यें शिरवाडकरांनीं जी समज आणि जी शब्दशक्ती दाखविली ती अतिशय गौरवस्पद खासच आहे. हीं नाटकें समर्थपणें रूपांतरित करणे हे कलावंताला अेक आव्हानच होय. त्या आव्हानाचा शिरवाडकरांनी जो स्वीकार केला आहे तो परिणामकारक आहे. 'राजमुकुट' (मॅक्बेथ) हें नाटक चेटकिणीचे प्रवेश सोडले तर गद्यच आहे परन्तु मनोव्यथा रगविताना वापरलेले शब्द कोठेंही फारसे कमी पडत नाहीत. 'ऑथेल्लो'मध्यें सर्वत्र मूळच्या पद्यमय भागाचें पद्यमय रूपांतर नसलें तरी बऱ्याच ठिकाणी मुक्तछंद अुत्कृष्ठ रीतीनें वापरलेला आहे दमयंतीचे अखेरचें 'मी आता नाहीं नाहीं' हें गीत लिहिणाऱ्या लेखणीची कवित्वशक्ति असाधारण आहे यांत शकाच नाहीं.

वसंत कानेटकर यांचें नाट्यक्षेत्रांतील पदार्पण यशस्वितेनें झालें आहे. 'वेड्याचें घर उन्हांत' या त्यांच्या पहिल्या नाटकांत नावीन्य आणि उत्कटता दोन्हीही आढळतात. वेडा दामू आणि दादासाहेब यांच्या सुरुवातीच्या भूमिकांतील अदलाबदल नाटकाच्या अखेरीस फारच कौशल्यानें नाटककारानें दाखविला आहे. 'देवाचें मनोराज्य' या नाटकानंतर त्यांनी लिहिलेल्या 'प्रेमा तुझा रंग कसा?' या नाटकावर शहरवासी रसिक बेहद्द खूष आहेत. त्यातील आवर्तरूपाने व्यक्त होणारा नर्म विनोद मराठी नाट्यसृष्टींत नवीनच ठरेल. सांसारिक जीवन ज्या समजदार रीतीनें, उल्हसित वृत्तीनें व मुरलेल्या मर्मज्ञतेनें कानेटकरांनीं रंगविलेलें आहे त्यामुळें हे नाटक अतिशय मनोरम झालें आहे बल्लाळ आणि निळभाऊ अविस्मरणीय आहेत. थोड्यात्र रेखाटनांत निळ्या रंगाची अथांगता निळभाऊ प्रत्ययाला आणून देतात. 'रायगडाला जेव्हां जाग येते' या नाटकानें ऐतिहासिक नाट्यलेखनाला कलात्मक कलाटणी मिळण्याचा संभव आहे. सांकेतिकतेची कोंडी फोडणारी मनुष्याच्या मनाची जाणीव कानेटकरांनीं त्यांच्या सुरुवातीच्या 'शियाळ आणि चांगुणा' या संगीतिकेमधूनदेखील प्रगट केलेली आहे 'दोन ध्रुवांवर दोघे आपण' व आणखीहि कांहीं इतर यशस्वी नाटकें त्यांच्या लेखणीतून उतरत आहेत व उतरलेलीही आहेत. व्ही. शांताराम यांनी त्यांच्या एका पटकथेचा स्वीकार केला आहे. तीन वेळां प्रथम क्रमांकाचीं नाट्यलेखनाचीं पारितोषिकें मिळविण्याचा अपूर्व मान कानेटकरांनीं मिळविला असल्यानें आजच्या नाटककरांत ते अग्रभागीं आहेत. महाराष्ट्र शासनानें केंद्र सरकारच्या संरक्षण खात्यामार्फत ज्या पांच साहित्यिकांची लडाख सीमा प्रत्यक्ष पाहून येण्यासाठी निवड केली होती त्यात श्री. वि. वा.

शिरवाडकर व प्रा. वसंत कानेटकर हे दोन नाशिकचे साहित्यिक होते याबद्दल नाशिककरांना रास्त अभिमान वाटतो.

प्रभाकर तामणे यांच्या 'एक धागा सुखाचा' या चित्रपटाचें स्मरण ताजेंच आहे. 'अशीच एक रात्र येते' हें त्यांचें उल्लेखनीय नाटक. या नाटकालाही पारितोषिक मिळालें आहे. दत्ता भट यांचें 'जेथें जातो तेथें' हें नाटकही अलीकडे गाजलेल्या नाटकांपैकीं एक आहे. माधव कुलकर्णी यांनीं लिहिलेलीं 'जावें त्यांच्या वंशा' व 'प्रेमाविना भिकारी' ही नाटकें रंगभूमीवर आलीं असून त्यांच्या 'मोठ व्हायचं मला' या कृतीलाही सरकारी बक्षिस मिळालेलें आहे. गो. के. भट यांचें 'गृहदाह' मुद्दाम उल्लेखिलें पाहिजे.

या त्यांतल्या त्यांत ठळक अशा थोड्या उल्लेखानंतर कालक्रमानें नजरेसमोर येणाऱ्या नाट्यकृतीचा उल्लेख करावयाचा आहे. गणेशशास्त्री लेले यांच्या भाषांतरित नाटकांचीं नांवें अशीं : जानकीपरिणय, मालविकाग्निमित्र, विद्धशालभंजिका व कर्पूरमंजिरी. नारायण वामन टिळक यांची तीन नाटकें:'संगीत आनंदराव (१८८६),' 'संगीत गोदुःखविमोचन' व 'शीलम् परम् भूषणम्' ही आहेत. वि. ना. वाड यांनीं 'शिवप्रसाद' लिहिलें. पु. वि. रहाळकर यांचें 'नवे डोळे', वि. वा. आंबेकर यांचें 'कुटाळकंपू' (ए स्कूल फॉर स्कॅंडल चें रूपांतर), पां. जि. सबनीस यांचें 'चार्वाक' व 'पंढरीचा देव', ल. वि. वेलदे यांचें 'ईश्वरी वइ तर एकांकिका', ब. चिं. सहस्त्रबुद्धे यांचीं 'द्विदल', 'आणि पुन्हा तेंच' व 'गुलामांची सजा', मनोहर शिरवाडकर यांची 'तिसरा जावई', 'बाभुळगांवचा जहागिरदार', वसंत नागपुरे यांचें 'रेशमाचा कोश', वसंत बापट यांचें बुद्धजीवनावरील नाटक हीं नाटकें आढळतात. दे. ना. टिळक यांनीं 'सेतुबंधन' लिहिलें आहे तें बरेंच जुनें आहे. कालक्रमानें ज्याचा उल्लेख थोडा आधीं हवा होता तें दुसरें नाटक म्हणजे रा. ग. प्रधान यांचें 'मोना व्हिना' या नाटकावरून रूपांतरित केलेलें 'विमलादेवी' हें नाटक होय. 'वैजयंती' नाटकाच्या आधीचा हा मूळ नाटकाचा पहिला अनुवाद. प्रधानांनीं प्रस्तावनेंत या नाटकाला १९१४ च्या पूर्वी इंग्लंडांत बंदी होती याचा उल्लेख केला असून भारतीय वातावरणाला अनुरूप असे कांहीं थोडेसेच बदल आपण अनुवादांत केले आहेत असें म्हटलें आहे.

कादंबरी, लघुकथा व विनोद : हे वाङ्मय प्रकार अलीकडचेच आहेत. परंपरा अशी त्यांना फार थोडी आहे. म्हणून ना. वा. टिळक यांच्या आनंदीबाई (भाषांतरित १९०३), दे. ना. टिळक यांच्या 'तीव्र जाणीव' (१९१८) व 'कृष्णा' (१९३०) रा. वा. जानोरकर यांच्या 'प्रणयतरंग' व 'वजीर मुरारराव', रा. वि. ओतूरकर यांच्या 'समाजबंधन', वि. मा. दी. पटवर्धन यांच्या 'रत्ना' व 'त्रिकोण', रमाकांत वेलदे यांच्या 'भूक', वि. वा. आंबेकर यांच्या 'काळे ढग,' वा. श्री. पुरोहित यांच्या 'त्याग' व 'खुणेचें पान', डॉ. वर्टी यांच्या 'इच्छा' व 'अभिनय' आणि तामणे यांच्या 'पुनर्मीलन' या कादंबऱ्यांच्या उल्लेखानें या विभागाची सुरुवात केली आहे.

पुरोहित, वर्टी, शिरवाडकर, कानेटकर व मनोहर शहाणे हे विचारांत घेण्यासारखे कादंबरीकार नाशिकच्या दृष्टीनें निःसंशयच आहेत. पुरोहितांची 'खुणेचे पान' ही कादंबरी ऑक्टोबर १९१३ पासून पहिलें महायुद्ध सुरू झाल्यावेळेपर्यंतच्या काळावर आधारलेली असून खासगी शिक्षणसंस्थेमधील दांभिकतेचा चांगला स्फोट त्यांत सुरुवातीला व मधून मधून घडविला आहे. तत्कालीन वातावरण रंगविण्यांत पुरोहित यशस्वी झाले आहेत. डॉ. वर्टी यांची 'नवा धर्म' ही कादंबरी हिंदु-मुसलमानांच्या धार्मिक कलहामुळें मित्राचे शत्रू कसे बनले त्याची भेदक कहाणी सांगणारी आहे. वर्टींनी अतिशय गंभीरपणानें ही कादंबरी लिहिली असून त्यांतील आबाजान ही व्यक्तिरेखा आदरणीय व श्रेष्ठ मानवता धर्माची उपासक आहे. शिरवाडकर यांच्या 'वैष्णव',

'जान्हवी' व 'कल्पनेच्या तीरावर' या कादंबऱ्यांचें वाचकवर्गाकडून चागलें स्वागत झालें असून 'वैष्णव' व 'जान्हवी' या कादंबऱ्यांना 'अर्थसुंदर आणि गुणनिर्भर' म्हटलें गेलें आहे. वामन मल्हार जोशी यांच्या धर्तीची तत्त्वचिंतनात्मक कादंबरी लिहिण्यांत शिरवाडकरांनी आपला ऋजु मनोधर्म प्रगट केला आहे. 'जान्हवी' या कादंबरीवर चित्रपटहि निघाला होता. 'कल्पनेच्या तीरावर' ही नव्या धर्तीची कादंबरी आहे. व्यक्तिचित्र साकार करणें हें तिचें उद्दिष्ट नाही. एका कल्पनारम्य देशांतील रीतिरिवाज, धर्मकल्पना, वाङमयास्वाद, समाज-जीवन-नियंत्रण वगैरेंच्या मिषानें लेखकानें महत्त्वाच्या जीवनविषयक प्रश्नाचा लालित्यपूर्ण ऊहापोह येथें केला आहे. 'लॉस्ट होरायझन' व 'एरेव्हॉन' यांच्या संमिश्र स्फूर्तींतून निर्माण झालेल्या या कल्पनाविश्वामध्यें रमणीयता आहे. जादूगाराचें कसब आहे आणि सामाजिक जीवनाचें चिंतनही आहे. येथें एखादा न्हावी धर्मविषयक सभेचा अध्यक्ष होऊन अतिशय व्यावहारिक पण समर्पक समारोप करीत असलेला पाहून कौतुक वाटतें. कानेटकर यांच्या 'घर' या कादंबरींत मज्ञाप्रवाहाचें व मुक्त छंदाचें तंत्र वापरलें आहे. तेंच मंज्ञाप्रवाहाचें तंत्र संयमपूर्वक कौश-ल्यानें पुढे 'पोरका' कादंबरींत वापरलें गेलें आहे. व्यक्तित्वाचा विकास घडवून आणूं शकणारें हिरवें वेड आणि चाकोरींतील जीवन यामधील संघर्ष रंगविण्याचा कानेटकरांचा प्रयत्न तंत्राच्या नवीनतेमुळेंही उठून दिसतो. मनोहर सहाणे यांनी लिहिलेली 'थांबलेलें आकाश' ही कादंबरी नाशिक शहर व त्याभोंवतालचा परिसर या पार्श्वभूमीवरील असून तिच्यांतील सुटया सुटया छोटया वाक्यांची शैली लेखकानें हेतुपुरस्सर वापरली आहे हें चटकन ध्यानांत येतें.

लघुकथालेखनाच्या आद्यांत दे. ना. टिळक (पाऊलवाट), वि. मा. दी. पटवर्धन, वर्टी (मुमताज, अकरावा गडी, सोनेरी स्वप्न, नवा देव, अखेरचा आघात, कामसेना, मुलूचा मर्व्हंट), शिरवाडकर (फुलवाली सतारीचे बोल काहीं वृद्ध काहीं तरुण), वा. श्री. पुरोहित (मनोरथ), आवेकर (भावचित्रें), मनोहर सहाणे (सहाण्यांच्या गोष्टी) हीं नांवें नजरे-समोर येतात. पुरोहित आणि आवेकर यांच्या लघुकथालेखनांत भावनांची कोवळीक व मध्यम-वर्गीय जीवनातील कुचंबणा व्यक्त झाली आहे. डॉ. वर्टी यांचें लघुकथालेखनांतील यश निर्विवाद सिद्ध झालें आहे. वि. वा. शिरवाडकर यांची 'सतारीचे बोल' ही लघुकथा मराठी वाङमयांत अनन्यसाधारण ठरेल; कारण एका कविमनानें दुसऱ्या कविमनाचा ठाव घेण्याचा हृद्य प्रयत्न तिच्यांत दिसून येतो. प्रभाकर तामणे यांच्या 'निम्मी' या लघुकथासंग्रहानंतर आणखीही काही संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. कथालेखक अ. श. अग्निहोत्री हे विद्यार्थीदशेत नाशिकला रहात असत.

गद्यकाव्याच्या लेखनांत जी नावें नजरेसमोर येतात ती वि. वा. शिरवाडकर आणि कवि गोविंद यांची होत. 'समिधा' हें शिरवाडकरांचें पुस्तक आणि शिवजयंतीवरील कवि गोविंदाचा काव्यमय लेख यांची रसिकांवर खासच मोहिनी पडेल.

विनोदाच्या क्षेत्रांत पटवर्धन, वर्टी, शिर-वाडकर व रायरीकर यांचा उल्लेख आवश्यक आहे. पटवर्धन यांचें 'साहित्य सुदाम' हें पुस्तक व त्यांनी रंगविलेला जिवा असामी पात्र ठरलें आहेत. 'कागदी घोडे' हेंही त्यांचें पुस्तक मराठी वाङमयाच्या लेखनाच्या आद्यांत नमूद करण्यासारखें आहे. वर्टी यांच्या विनोदानें अनेकांना हसविलेले आहे. त्यांची दंतकथा, डालडुप्पो वागीमाडू, मंत्र्याचा मंत्री हीं विनोदी पुस्तकें प्रसिद्ध आहेत. शिरवाडकर यांच्या 'नाटक बसतें आहे' व 'दिवाणी दावा' या दोन नाटिकानीं हमखास यश संपादन केलें आहे. ह. मा. रायरीकर यांच्या 'अजागळाचे उपद्व्याप' या पुस्तकामुळें त्यांच्याबद्दलच्या अपेक्षा फार वाढलेल्या आहेत. त्यांनी ज्या 'पिंपर्णी' गांवांतील 'घारूअण्णा' व इतर मंडळी निवडली आहेत. त्यांची ओळख प्रत्येक गावा-

कधीच नव्हता आणि तो तसा असणें शक्यच नाही. कारण खेळ, मग त्याला निरनिराळ्या स्थळी प्रकारांनी प्रसारवलेला असो वा नसो, हे जीवनापासून भिन्न करतांच येत नाहीत. जीवनाशीं ते एकरूप असतात, जीवनाचे ते अंग म्हणून असतात. परिस्थितीप्रमाणें, कालमानाप्रमाणें खेळांचे प्रकार बदलतात. परंतु बीजरूपानें ते अस्तित्वात राहतातच.

नासिकच्या जीवनात नासिककरांनीं वन्यपशूंच्या शिकारीपासून जीवन संघर्षात उपयोगी पडणाऱ्या युद्धविषयक खेळांना आधार दिला आहे. या सर्वांचा इतिहास केव्हां लिहिला गेला असता तर तो योग्य रूपानें भावी पिढीस मिळण्याची शक्यता आली असती. तथापि गेल्या शंभर वर्षांचा इतिहास जेथें दुर्लभ होतो व पारतंत्र्याच्या काळांत तर तो अधिक होतो, तेथे एवढ्या प्रदीर्घ कालखंडातील खेळांचा इतिहास जमविणें, संकलित करणें केवळ असंभवप्रायच होते. तथापि आपल्या मर्यादेत या बाबतीतील माहितीनिशी संकलन मिळालेल्या माहितीप्रमाणे आपण करण्याचा प्रयत्न करू या. यात त्रुटी नाहीत असे विधान कोणीच करू शकणार नाही. आम्हीहि ते करूं शकत नाही.

या कालखंडातील शारीरिक शिक्षण व मनोरंजनाकरिता खेळल्या जाणाऱ्या विविध प्रकारामध्यें १) भारतीय खेळ व २) शासनकर्त्यांच्या बरोबर आलेले खेळ असे स्थूलमानानें दोन भाग पाडतां येतील. पैकी भारतीय खेळाच्या परंपरेचे बीज शोधणें केवळ असंभवच आहे. या खेळांत आट्यापाट्या, कुस्ती, हुतुतू, खो खो, लगडी, दांडपट्टा, विटीदांडू, लगोऱ्या, सूरपारंब्या, धांवणें, पोहणें, फरीगदगा, दंडबैठक, मल्लखांब व वेताचा मल्लखांब इत्यादि अनेकविध खेळ येतात. तर सन १८१८ नंतरच्या कालखंडापासून पारतंत्र्याची शृंखला भारताला जखडली गेल्यामुळे शासनकर्त्यांचे जननेशी नातें हे जित व जेते अशाच भावनेचे असल्यानें त्यांचे खेळ हे नागरिकांच्या कांही वरच्या थरांपर्यंतच पोहोचले. सर्वसामान्य जनता अनेक वर्षांपर्यंत यापासून अलिप्त राहिली व वंचितहि राहिली. ते खेळ म्हणजे क्रिकेट टेनिस, फुटबॉल, हॉकी, गोल्फ, व्हॉलीबॉल, बॅडमिंटन, स्केटिंग, वेटलिफ्टिंग, सिगल्बार, डबलबार व यासारखे इतर खेळ. तथापि याच्या गतिशीलतेवर हे आधुनिक खेळहि नासिकच्या जीवनाचे अंग म्हणून आले आहेत व आज तरी नासिकच्या जीवनात वरील सर्व क्रीडा या बहुतांशी एकरूप झाल्या आहेत.

खेळांच्या या विविध अंगांत एवढ्या मंडळींनी आजपर्यंत भाग घेतला आहे कीं त्यांची केवळ जंत्रीहि करणें शक्य नाही. तथापि त्याचा नांवांनी उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे. पैकी अनेक व्यक्ती दिवंगत झाल्या आहेत. कांही हयात आहेत तर कांही आजहि त्या क्षेत्रांत चमकत आहेत.

व्यायाम परिषदा

नासिक शहरानें दोन मोठ्या व्यायाम परिषदा घेतल्या. सन १९३३–३४ मध्ये अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळाचे अधिवेशन श्री. माणिकरावजी यांच्या अध्यक्षतेखाली घेतलें. श्री. दादासाहेब गद्रे हे स्वागताध्यक्ष होते. सन १९४७ मध्यें याच मंडळाचें १६ वें अधिवेशन माननीय श्री. ग. वा. मावळणकर यांच्या अध्यक्षतेखाली घेतलें. श्री. महाबळ गुरुजी हे स्वागताध्यक्ष होते आणि श्री. सदाशिवराव गोसावी हे या परिषदेचे जनरल सेक्रेटरी होते.


सामने इत्यादि

गावांतील पुष्कळशा संस्था विविध खेळांचे सामने घेत. तथापि यशवंत व्यायाम प्रसारक मध्यवर्ती मंडळानें प्रदीर्घ कालपर्यंत सामने घेतल्याचें नासिककरांच्या स्मरणांत असेलच. अ. म. ना. जि. मंडळहि बरीच वर्षे सामने घेत असे. यशवंत व्यायाम शाळा, अहिल्याराम व्यायाम शाळा, गुलालवाडी, तरुण ऐक्य मंडळ, दीपक मंडळ व S. T. आदींनीं सामने घेण्याची परंपरा चालू ठेविली आहे.

क्रीडांगणें

नासिक शहरात हायस्कूल ग्राऊंड, यशवंत महाराज पटांगण, पळनिटकर शेरी, निवारी

व्यायाम संस्था आणि बलोपासक



डॉ. वि. म. गोगटे

प्रास्ताविक

नाशिक नगरपालिकेची स्थापना होऊन दिनांक १ मे १८६४ रोजी एकशें-एकाव्या वर्षास सुरुवात होत आहे. या निमित्ताने नाशिक नगरपालिका शहरांतील नागरिकांच्या जीवनांतील विविधांगाचें धावतें समालोचन करण्याच्या उद्देशाने एक ग्रंथ प्रकाशित करीत आहे. त्यांपैकी जीवनांतील महत्त्वाचें अंग– खेळांचें अंग– त्याचा संक्षिप्त वृत्तान्त या प्रकरणांत येत आहे.

शंभर वर्षांचा कालखंड हा मानवी जीवनाची मर्यादा दर्शविणारा असला तरी नगरीच्या जीवनात असे [illegible] कालखंड अनेक येणार. तथापि हा नगरपालिकेचा कालखंड प्रथमचा. या दृष्टीने त्याला असामान्य महत्त्व आहे. नागरिकांच्या जीवनसौख्याकरिता आवश्यक ती व्यवस्था पहाणारी ही संस्था असली तरीहि या संस्थेच्या जन्मापूर्वी कित्येक तरी वर्षे हें शहर अस्तित्वात होतेच. विविध नावांनी ते अस्तित्वांत [illegible]

[illegible] रामायणात [illegible] [illegible] पंचवटी येथे वास्तव्य घालून तप [illegible] [illegible] नाशिक पद्मनगर नाव पडलें. त्रेतायुगात खर, दूषण व [illegible] [illegible] राक्षसांच्या [illegible] कंटकासारखे [illegible] [illegible] [illegible] याला त्रिकंटक नाव पडलें होतें. प्रभु रामचंद्रांनी वसति करून हा भाग निर्भय करून जनांना रहाण्यासारखा करून दिला म्हणून ह्याला रामक्षेत्र अथवा जनस्थान असे नाव पडलें. लक्ष्मणाने शूर्पणखेची नासिका कापली म्हणून म्हणा किंवा शहराची वस्ती नऊ टेकड्यांवर नवशिखांवर आहे म्हणून म्हणा या गावास नासिक हे नामाभिधान प्राप्त झालें. [illegible] [illegible] तरी कालांत ते [illegible] [illegible] असे म्हणतात [illegible] [illegible] सुमारास यांत मौर्यांचे [illegible] [illegible] [illegible] पैकी कृष्ण तसेच [illegible] [illegible] [illegible] येथे कारभार पाहिलेला आहे. [illegible] अभीर राठोड, राष्ट्रकूट, चालुक्य व यादव या वंशांनी नासिकवर राज्य केले. नंतर मुसलमान, मराठे पेशवे व नंतर इंग्रजांना अमल होता. आज त्यावर भारतीयांची [illegible] [illegible]

एवढ्या या प्रदीर्घ कालखंडात [illegible] [illegible] व्यायाम [illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]

लेखांत 'शिक्षण आणि शिक्षण-संस्था' ह्याची माहिती द्यायची होती व त्यांतें मर्यादित स्वरूपच या विचारांत घेऊन गुणावगुणाची चर्चा करीत नाही.

लेखात विषयाचें समावलोकन करतांना चालू पिढीला ज्या घटना, संस्था, व्यक्ति अपरिचित आहेत त्यांचेंच सविस्तर विवेचन केलें आहे. त्यामुळें अलीकडे (सन १९४० नंतर) निघालेल्या शैक्षणिक संस्थासंबंधी अधिक माहिती देतां आली नाही

पूर्व प्राथमिक शाळा, संस्कृत पाठशाळा व विविध क्षेत्रांत ज्ञानदानाचें कार्य करणाऱ्या संस्था ह्यांना ह्या विश्वांत स्वाभाविकच स्थान देता. आलें नाहीं.

पुणे विद्यापीठाच्या पीएच्. डी. परीक्षेसाठीं श्री. व. रा. नागपुरे हे डॉ. ग. श्री. खैर ह्यांच्या मार्गदर्शनाखालीं संशोधन करीत आहेत. 'नासिक जिल्ह्यांतील शैक्षणिक प्रगति आणि इतिहास' ह्या प्रबंधांतील माहितीवर हा लेख आधारलेला आहे.

— संपादक



महाविद्यालयीन शिक्षण

गोखले एज्युकेशन सोसायटीने सन १९२४-२५ साली नाशिक येथे 'हंसराज प्रागजी ठाकरसी कॉलेज' सुरू केले. सन १९२८-२९ साली २९ विद्यार्थी मुंबई विद्यापीठाच्या पदवी-परीक्षेस बसले.

सन	विद्यार्थी संख्या
१९२४-२५	५५
१९२५-२६	१०४
१९२८-२९	१३०
१९२९-३०	१९७
१९३०-३१	१८०
१९३२-३३	२९३
१९३७-३८	२३९

नगरपालिकेने कॉलेजला रु. २५० मदत दिल्याचा उल्लेख सन १९३७-३८ च्या कॉलेजच्या जमाखर्चात आहे.

सन १९३७-३८ साली मराठीत आर्टस् कोर्स शिकविण्यासाठी व गुजराथीमध्ये पास कोर्स शिकविण्यासाठी मुम्बई विद्यापीठाने परवानगी दिली होती. अेम्. अे. (मराठी, संस्कृत इंग्रजी) आणि बी. अेस्. सी. वर्गापर्यंत शिकविण्यात येते.

भिकुसा यमासा क्षत्रीय (सिन्नर) कॉलेज ऑफ कॉमर्स– गोखले एज्युकेशन सोसायटीनें कॉमर्स कॉलेज जून १९५७ मध्ये एच्. पी. टी. कॉलेजच्या इमारतीत सुरू केले. पहिल्या वर्षी एफ्. वाय्. कॉमर्सचे वर्ग सुरू केले त्यावर्षी विद्यार्थी १६० होते; त्यापैकी विद्यार्थिनी १० होत्या. सन १९६३ साली ३९ विद्यार्थी व ३ विद्यार्थिनी असे एकूण ४२ विद्यार्थी बी. कॉम परीक्षेस बसले.

सन १९६३ साली कॉलेजच्या स्वतःच्या इमारतीचे उद्घाटन झाले. जुलै १९६३ मध्ये वसतिगृह आणि भोजनगृह, युनिव्हर्सिटी ग्रँटस् कमिशनच्या मदतीने पूर्ण करण्यात आले. बी. कॉम पदवीनंतर एम्. कॉमसाठी विद्यार्थी तयार करण्याची परवानगी पुणे विद्यापीठाने जून १९६४ पासून दिली आहे. त्याशिवाय बी. कॉम परीक्षेस कॉस्ट अकौंटसी हा विषय जून १९६४ पासून शिकविण्याची परवानगी मिळाली आहे. कॉमर्स असोशिएशन मार्फत म्युझियम (संग्रहालय) सुरू करण्यात आले. राज्यसरकारनें कॉलेजमध्यें सुरू असलेल्या प्लॅनिंग फोरमला क्रियाशील कार्य विभाग अशी मान्यता सन १९६३ मध्ये दिली.

प्रिन्सिपाल श्री. मो. न. गोसावी ह्यांच्या मार्गदर्शनाखाली कॉलेजने शैक्षणिक आणि क्रीडाक्षेत्रात असामान्य प्रगति केली आहे. नवीन उपक्रम सुरू करून ते कार्यान्वित आणण्यात प्राचार्य गोसावींची कल्पकबुद्धि आणि उत्साह यांची जोड मिळते.

गोखले एज्युकेशन सोसायटी तर्फे चालविण्यात येणाऱ्या वरील महाविद्यालयांशिवाय आयुर्वेद सेवासंघामार्फत 'आयुर्वेद महाविद्यालय' चालविण्यात येत आहे.

अुपसंहार –

गेल्या शतकांतील आणि त्यापूर्वकालातील शिक्षणाची वाटचाल अभ्यासल्यानंतर, भारताच्या आणि महाराष्ट्राच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहरांतील शैक्षणिक प्रगति समाधानकारक आहे असे म्हणावे लागेल.

ब्रिटीश साम्राज्याच्या प्रारंभीच्या पूर्व परंपरागत प्राथमिक शाळा, त्यानंतरच्या काळातील पाश्चिमात्य शास्त्राचा व ज्ञानाचा त्याचप्रमाणे इंग्रजी भाषेचा लोकमनावरील पगडा, राज्यकर्त्यांच्या सहाय्यार्थ ठरलेले मिशनरींचे शैक्षणिक कार्य, राष्ट्रीय शिक्षणाचा अुगम आणि विकास, राष्ट्रीय मनोवृत्तीनें स्थापन झालेल्या व आजवर कार्य करीत असलेल्या शैक्षणिक संस्था ह्या घटना सामाजिक, राजकीय व शैक्षणिक मनोभूमिकेतील स्थित्यंतरे दर्शवितात.

शाळा सुरू केली. सन १९४० सालींच शाळेंत ४८० विद्यार्थी दाखल झाले. सन १९४२ साली ह्या शाळेतून विद्यार्थी मॅट्रीकच्या परीक्षेस बसले. सुरुवातीला शाळेचें वसतिगृह होतें. परन्तु नंतर युद्धजन्य परिस्थितीमुळें तें बंद करण्यांत आलें. सन १९६१ मध्ये नवीन इमारतीच्या बांधकामास सुरुवात झाली आहे.

१९४७ मध्ये शाळेंतील विद्यार्थी केंघे ह्याला सरकारची 'जगन्नाथ शंकरशेट शिष्यवृत्ति' मिळाली. विद्यार्थी डुमाने सन १९५६ साली नासिक केंद्राला पहिला आला होता. एस्. एस्. सी. बोर्डाची पारितोषिकें मिळविणाऱ्यांमध्यें विद्यार्थी रणजित लिमये (मराठी १९६२),पद्माकर पाटणकर (रसायन विज्ञान १९६३) व अशोक अहिरे (समाजशास्त्र १९६२) ह्यांचें यश उल्लेखनीय आहे.

एन्. ई. आय् गर्ल्स स्कूल - न्यू एज्युकेशन इन्स्टिटयूटमार्फत ही मुलींची इंग्रजी शाळा सन १९४४ पासून चालविण्यात येत आहे. मुलींच्या स्वतंत्र शिक्षणाची सोय करणें हा संस्थेचा उद्देश होता. सन १९५० साली विद्यार्थिनीं एस्. एस्. सी. परीक्षेस पाठविण्यांत आल्यात. शाळा सुरू झाली त्यावर्षी शाळेत ११६ विद्यार्थिनी होत्या. हल्ली (सन १९६३–६४) ८५६ विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत.

शाळेच्या पहिल्या मुख्याध्यापिका सौ.शोभना टिळक ह्या होत्या. 'पालक-पत्रिका' हें ह्या शाळेचे वैशिष्टच होय.

न्यू अेज्युकेशन इन्स्टिटयूट मार्फतच सन १९५३ पासून माध्यमिक अध्यापन विद्यालय चालविण्यांत येत आहे. सुमारें ४५० शिक्षक ह्या संस्थेने प्रशिक्षित केले आहेत

शारदा मंदिर, नाशिक--नासिक अेज्युकेशन सोसायटीची ही मुलींची इग्रजी शाळा सन १९४६ मध्ये सुरू करण्यांत आली. पेठे विद्यालयांतील विद्यार्थिनी 'शारदा मंदिर' येथें दाखल करण्यात आल्या. १९५२ साली विद्यार्थिनी अेस्. अेस्. सी. परीक्षेस बसल्या. सन १९४६-४७ मध्ये ही शाळा पेठे विद्यालयाच्या अिमारतीतच भरत होती. नंतर १९४७ पासुन सन १९६२ पर्यंत राजेबहादूर वाडयांत भरूं लागली. नंतर १९६३ पासून हायस्कूल ग्राअुंडवरील स्वतःच्या अिमारतीत ही शाळा गेली आहे.

हल्ली (१९६३-६४)शाळेंत १०५० विद्यार्थिनी आहेत. विद्यार्थिनीची अभ्यास, वक्तृत्व, नाटय, संगीत अित्यादि क्षेत्रांत चौफेर प्रगति आहे. सौ. लीलाबाई ठकार ह्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेनें १७ वर्षात नेत्रदीपक अशी प्रगति केली आहे.

सेठ रामरिखदास परशराम पुरीया विद्यालय पंचवटी, नासिक–श्री पंचवटी अेज्युकेशन सोसायटीनें सन १९४५ साली गुजराथी माध्यमांतून इंग्रजी शाळा सुरू केली. १९४५-४६ साली शाळेत १७२ विद्यार्थी होते. सन १९४९-५० साली शाळेंतील विद्यार्थी अेस्.अेस्. सी. ह्या परीक्षेला बसले. सन१९५९ साली विद्यार्थी अरुण अेम्.वीजन हा विद्यार्थी अेस्.अेस्. सी. ह्या परीक्षेत हिंदीह्या विषयांत प्रथम आला. १९५० साली शाळेचा निकाल १०० टक्के लागला व सन १९६३ साली ९८ टक्के लागला.

सन १९६३-६४ मध्यें शाळेंत १६ वर्ग आहेत व ६३० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत

सोसायटीमार्फत १९६३ मध्ये प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज सुरू करण्यांत आलें आहे. त्याशिवाय प्राथमिक शाळा, मॉंटेसरी शाळा व शिवणवर्ग चालविले जातात.

अितर माध्यमिक शाळा–महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभा, पुणे मार्फत गांधीनगर येथे 'हिंदी विद्यालय' चालविण्यात येत होतें. पंचवटीत श्रीराम विद्यालय, दिल्ली दरवाजा येथें लोकमान्य विद्यालय, उपनगर येथे महाराष्ट्र विद्यालय ह्या नवीन शाळा प्रगति करीत आहेत.

पार्शी बोर्डिंग स्कूल–बॉईज टाऊन–नासिक पार्शी विद्यार्थ्यांकरिता बोर्डिंग स्कूल प्रथम सन १९२३—२४ मध्यें सुरू करण्यांत आलें. मेथा एज्युकेशन ट्रस्टमार्फत ही शाळा चालविण्यांत येत आहे. ह्या ठिकाणीं हल्लीं सर्वधर्मीय विद्यार्थ्यांना प्रवेश मिळतो. पूर्व–प्राथमिक आणि दुय्यम शिक्षण त्याठिकाणीं देण्यात येते. माध्यम अंग्रजी आहे. भारताचा भूतपूर्व क्रिकेट–कप्तान नरी कॉन्ट्रॅक्टर ह्याच शाळेत शिकला.

शाळेची प्रगति पुढील तक्त्यावरून दिसून येईल:

सन	विद्यार्थी संख्या
१९२३—२४	९९
१९३३—३४	१२६
१९४३—४४	१४९

प्रशस्त इमारती, क्रीडांगण आणि वसतिगृह ह्यामुळें शाळेचें वातावरण प्रसन्न आहे.

सेवासदन— मुलींची माध्यमिक शाळा. सेवासदन ही मुलींची इंग्रजी शाळा सन १९३३–३४ मध्यें स्थापन झाली. सन १९४६ मध्यें ती पुष्पावती कन्या शाळेंत समाविष्ट करण्यांत आली. सरकारी कन्या शाळेव्यतिरिक्त स्थापन झालेली ही मुलींची पहिली शाळा.

सन	विद्यार्थिनींची संख्या
१९३३–३४	५६
१९३८–३९	७०
१९४३–४४	१७९.

मराठा हायस्कूल, नासिक— मराठा शिक्षण प्रसारक मंडळानें सन १९१४ सालीं नासिक येथें विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरू केलें. या संस्थेची स्थापना वर्णीचे कै. रावसाहेब थोरात ह्यानी केली. सन १९३६ मध्यें नासिक येथ मराठा हायस्कूल ही इंग्रजी शाळा सुरू केली. संस्थेनें नासिक येथें महर्षि शिंदे ट्रेनिंग कॉलेज १९३६ साली सुरू केलें. सन १९५० साली प्राथमिक शाळा, सन १९६० सालीं शारीरिक शिक्षण विद्यालय, १९६१ साली कै. भाऊसाहेब थोरात माध्यमिक अध्यापन विद्यालय ह्या संस्था सुरू केल्या आहेत.

संस्थेस कै. पांडुरंग सरकटे वकील, कै भाऊसाहेब हिरे, कै रायबहादुर आर् डी वडेकर, कै विठ्ठलराव गाडवे, श्री. देवराम सयाजी वाघ व राजेसाहेब वैंयंथीलराव पवार इत्यादि मान्यवर व्यक्तींचे मार्गदर्शन लाभले आहे. मराठा हायस्कूलची प्रगति सुरुवातीपासूनच समाधानकारक झाली आहे.

सन	विद्यार्थी
१९३७–३८	२३५
१९६०–६१	३०६
१९६३–६४	३८७

श्री छत्रपति शाहू बोर्डिंगमध्ये मराठा हायस्कूलमधील बरेच विद्यार्थी रहातात देशी व विदेशी खेळांच्या बाबतीत मराठा हायस्कूल प्रथमपासून आघाडीवर आहे

भोसला मिलिटरी स्कूल— विद्यार्थ्यांना शालेय जीवनात लष्करी शिक्षण देणें आवश्यक आहे ह्याची जाणीव कै. डॉ. मुंजे ह्यांना पचवीस वर्षांपूर्वीच झाली. त्यांनीं आपल्या मनातील योजना भोसला मिलिटरी स्कूल सन १९३८–३९ साली सुरू करून मूर्त स्वरूपात आणल्या. ह्या शाळेत अखिल भारतातून विद्यार्थी शिकण्यासाठी येतात. मुलांसाठी व मुलींसाठी खास वर्ग सुट्टीमध्ये चालविण्यात येतात घोडदौड, रायफल ट्रेनिंग इत्यादि शिक्षण शालेय अभ्यासक्रमाबरोबरच दिलें जातें.

न्यू हायस्कूल, नासिक— श्री ल. र. साठ्ये श्री वा. गो. पानसे यांनी सहकार्याने सन १९४० साली न्यू एज्युकेशन इन्स्टिट्यूटची स्थापना केली व न्यू हायस्कूल ही माध्यमिक

स्कूल' ह्या नांवाने माध्यमिक शाळा सुरू केली. मंडळाचे अध्यक्ष सेवानिवृत्त सबजज्ज, राव-बहादुर दातार हे होते. त्यांचे सहकारी श्री. शि. रा. कळवणकर (मुख्याध्यापक), श्री. अ. भा. कडिले, श्री. गो. श्री. जोशी, श्री. वि. वि. बर्वे, श्री. वा. अ. गोसावी, आणि श्री. वा. वि. पारासरे हे होते. मंडळाला सुरुवातीपासूनच कै. बाबासाहेब साठचे, कै. ग. ब. डोळे, कै. अप्पासाहेब केतकर, यांचे साहाय्य लाभलें. तसेच कै. रा. ग. प्रधान व कै. भाऊसाहेब अकूत ह्यांनी मंडळाला चिरस्थायी स्वरूप आणून देण्यास मदत केली. कै. बाळासाहेब वैशंपायन, कै. बुधमल केवलचंद, कै. रा. व. जोशी यांनीं वेळोवेळी आर्थिक सहाय्य केलें.

सुरवातीलाच ह्या शाळेला लोकाश्रय मिळाला. विद्यार्थी–संख्या जोमानें वाढू लागली. व सन १९२३–२४ मध्ये ही शहरातील सर्वात मोठी शाळा झाली. विद्यार्थ्यांच्या संख्येत होणारी वाढ पुढील तक्त्यावरून दिसून येईल:

सन	विद्यार्थी
१९२०–२१	२६२
१९२४–२५	५७७
१९३०–३१	३४८
१९३४–३५	३१५
१९३९–४०	९४०
१९४३–४४	३७२

'न्यू अिंग्लीश स्कूलचे' नामकरण 'जे. अेस्. रुंग्टा हायस्कूल' असें सन १९४३ सालीं झालें. संस्थेंतून कै. भाऊसाहेब हिरे, कै. गो. ह. देश-पांडे यांच्यासारखे अखिल भारतीय कीर्तीचे नेते शिकून तयार झाले. अ.हेन. चतुरस्त्र क्रिकेटपटू श्री. बापू नाडकर्णी ह्याच शाळेचे माजी विद्यार्थी होत. संस्थेमार्फत सन १९४९ पासून पुष्पावती रुंग्टा कन्या विद्यालय आणि नाईट हायस्कूल (स्थापना सन १९५३) चालविले जाते. त्याशिवाय एस. टी. सी. क्लास, प्राथमिक शाळा चालविली जाते.

सरकारी कन्या शाळा– सरकारी शिक्षण खात्याने सन १९२०–२१ मध्ये मुलींकरिता 'गव्हर्नमेंट ब्रॅन्च अे. व्ही. गर्ल्स हायस्कूल' सुरू केले. सुरवातीला अिंग्रजी १ ली ते ४ थी पर्यंतचें शिक्षण देण्यांत येत असे. विद्यार्थिनींची संख्या पुढीलप्रमाणे होती:

सन	विद्यार्थिनींची संख्या
१९२०–२१	३६
१९२४–२५	६७
१९२९–३०	९५
१९३४–३५	१०५
१९३८–३९	१४९

सन १९४० साली ह्या शाळेचें पूर्ण हाय–स्कूलमध्यें रूपांतर झालें व १७ विद्यार्थिनी मॅट्रिकच्या परीक्षेस पाठविण्यांत आल्या. त्यांपैकी १२ पास झाल्या.

सन	विद्यार्थिनी–संख्या
१९४०–४१	२३७
१९४२–४३	२७४
१९४३–४४	२४९
१९६३–६४	३०८

विद्यार्थिनींची संख्या कायम दिसते. कारण शिक्षकांची संख्या व जागा ह्यांचा विचार करतां अधिक वर्ग वाढविणें शक्य होत नाही. ह्या शाळेतील विद्यार्थिनींना स्कॉलरशिप्स् मिळत असत. नामांकित विद्यार्थिनींमध्ये कुसुम राजाध्यक्ष, हेमलता गडकरी, नलिनी दाणी ह्यांची गणना होते. शाळेच्या मुख्याध्यापिका दस्तुरबाई यांच्या कारकिर्दीत शाळेची फार प्रगति झाली. त्यावेळी झालेलीं प्रदर्शनें व संमेलनें लोकांना फारच आवडलीं होतीं.

नासिक हायस्कूल बंद झाल्यानंतर नवीन इमारतीत सरकारी स्त्रियांच्या ट्रेनिंग कॉलेज–बरोबर ही शाळा आली. त्यापूर्वी साठेचा बंगला (१९२१-२७), राजेबहादूर वाडा (१९२७-३०) पाटणकर बंगला (१९३०–४०), अेवढी शाळेची स्थलांतरें झाली.

नंतर मुलांचे मिड्लस्कूल बंद पडले त्याचे मुख्य कारण असे होते की चर्च मिशन मार्फतच नासिक गावात 'सेंट जॉर्ज हायस्कूल' ही शाळा सन १९१३—१४ पासून सुरू करण्यात आली व त्यामुळे शरणपुरातील शाळा मिशनने बंद केली.

चर्च मिशन-सेंटजॉर्ज हायस्कूल, पेठे हायस्कूल चर्च मिशनने सन १९१३ १४ पासून सेंट-जार्ज हायस्कूल ही शाळा सुरू केली शाळेची वाढ सुरुवातीला फारच झपाट्याने झालेली दिसून येईल. मात्र ही वाढलेली संख्या कायम राहू शकली नाही व सन १९२२ २३ साली ही शाळा बंद पडली.

सन	विद्यार्थी
१९१३–१९१४	१०२
१९१५–१९१६	२६२
१९२०–१९२१	१६४
१९२१–१९२२	१३४

एक वर्षाच्या अवधीनतर सन १९२३ २४ साली नासिक एज्युकेशन सोसायटीच्या नेतृत्वाखाली 'सेंट जार्ज स्कूल' परत सुरू करण्यात आले त्याचे तत्कालीन आजीव सदस्य व सन १९६३-अखेर काम करणारे एकमेव संस्थापक सदस्य कै. शकर दिनकर तथा नानासाहेब अभ्यंकर हे होते.

सन १९२३ पासून केलेल्या प्रगतीची कल्पना खालील माहितीवरून येईल.

सन	विद्यार्थी
१९२३–१९२४	२३४
१९२८–१९२९	२१६
१९३३–१९३४	२३९
१९३८–१९३९	३२१
१९४३–१९४४	७७५

सन १९४२ पासून संस्थेची प्रगति खूपच झपाट्याने झाली. सन १९३९ साली शाळेच्या इमारतीसाठी जुना पेशवेवाडा सरकार मंत्रिमंडळाने विनामूल्य जागेसह दिला तो वाडा समूळ पाडून त्या ठिकाणी शाळेची नवीन इमारत बांधून स्वत्वाने बांधावी व पेशवे सरकार असे नाव पेशव्याच्या स्मरणार्थ द्यावे अशी अट घातलेली होती. तदनुसार संस्थेने १९४३ मध्ये पहिल्या मजल्याचे काम पूर्ण केले. त्याचवर्षी मुंबईचे दानशूर मोतीवाले श्री. पेठे बंधू यांनी संस्थेस उदार देणगी दिली व सेंट जॉर्ज हायस्कूलचे 'पेठे हायस्कूल' असे नामकरण करण्यात आले सन १९४८ मध्ये तिन्ही मजल्यांचे बांधकाम पुरे करण्यात आले

सध्या (सन १९६३ ६४) शाळेत ४० वर्ग असून विद्यार्थी–संख्या १७३५ आहे. ह्याच संस्थेमार्फत 'शिवाजी अध्यापन मंदिर' ह्या नावाचा एस्. टी सी. वर्ग चालविण्यात येत आहे.

झोरेस्ट्रियन मिशनस्कूल व्हिक्टोरिया गर्ल्स-स्कूल नासिक—झेड्. एम्. मिशनमार्फत प्राथमिक शाळा बुधवार व रविवार पेठेत चालविल्या जात होत्याच मिशनने सन १९१२'१३ मध्ये व्हिक्टोरिया गर्ल्स स्कूल ही इंग्रजी शाळा सुरू केली ही शाळा १–४–१९२४ रोजी बंद करण्यात आली. ह्या शाळेत २३ मुली होत्या

नासिक होम स्कूल ऑफ लीग ऑफ मर्सी- युरोपियन आणि अँग्लोइंडियन मुलींसाठी ही शाळा सन १९१३–१९१४ला सुरू झाली. ह्या शाळेत सन १९२३–१९२४ मध्ये २१ विद्यार्थिनी होत्या. ही शाळा १९२८ साली खंडाळ्याला हलविण्यांत आली

नासिक शिक्षण प्रसारक मंडळ - न्यू इंग्लिश स्कूल -रुंगटा हायस्कूल नासिक.—मिशनरींच्या ध्येयवादाने नासिक येथील कांही तरुण आणि उत्साही मंडळींनी राष्ट्रीय विचारसरणी असो बाणविणारे तेजस्वी शिक्षण अल्पखर्चात सामान्य जनतेच्या आवाक्यात आणण्याच्या हेतूने व लोकशाही जीवनाला आवश्यक असणाऱ्या शिक्षण-प्रसाराचे कार्य नासिक शहर आणि जिल्ह्यात करण्याच्या हेतूने नासिक शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. त्याच दिवशी (ता १ मे १९१८) नासिक येथे श्री शंकर-राव कांडेकर ह्यांच्या वाड्यात न्यू इंग्लिश

सन १९००-०१ व १९०१-०२ मध्यें विद्यार्थ्यांची संख्या ७ वर आली. विद्यार्थी-संख्या फारच कमी असल्यामुळें सन १९०३-०४ मध्यें हा इंग्रजी वर्ग बंद करण्यांत आला.

लोकांची मागणी वाढल्यामुळें सन १९०६-०७ मध्ये परत हा वर्ग सुरू करण्यांत आला. सनवार विद्यार्थी-संख्या पुढीलप्रमाणें होती. :

सन	विद्यार्थी
१९०६-०७	१९
१९०८-०९	२३
१९१०-११	३४
१९१२-१३	२८
१९१३-१४	२८
१९१४-१५	२५
१९२०-२१	३३
१९२१-२२	२४
१९२२-२३	२८
१९२३-२४	३५
१९२४-२५	४३
१९२५-२६	३८
१९२७-२८	३७

सन १९२८-२९ पासून अँग्लो उर्दू मिडल-स्कूलमध्ये ह्या इंग्रजी वर्गाचें रूपांतर करण्यांत आलें व त्याची व्यवस्था शिक्षणखात्याकडे गेली. मिड्लस्कूलमध्यें रूपांतर झाल्यानंतर विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागली.

सन	विद्यार्थी
१९२९-३०	५८
१९३०-३१	६१
१९३२-३३	६७
१९३३-३४	६०
१९३४-३५	५८
१९३५-३६	७३
१९३७-३८	७४
१९३७-३९	७३

मिड्लस्कूलची प्रगति समाधानकारण झाल्यामुळे सन १९३९-४० मध्ये मिड्लस्कूलचें हायस्कूलमध्यें रूपांतर झालें.

सन	हायस्कूल	मिड्लस्कूल	विद्यार्थी
१९३९-४०	३६	७७	११३
१९४०-४१	५३	७१	१२४
१९४२-४३	७५	७०	१४५
१९४३-४४	५५	८८	१४३

१ डिसेंबर १९४९ मध्यें हें सरकारी हायस्कूल 'नॅशनल एज्युकेशन' सोसायटीकडे चालविण्यासाठी देण्यांत आलें व त्याचें नामकरण 'नॅशनल हायस्कूल मध्यें झालें. सध्यां (१९६३-६४) ह्या शाळेंत ३६५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. ह्या शाळेंत सहशिक्षण देण्यात येत आहे. जिल्हा परिषदेच्या मालकीच्या इमारतींत ही शाळा भरते.

चर्च मिशनस्कूल--मिडल्स्कूल, शरणपूर-चर्च मिशनमार्फत शरणपुरांत एक मिड्लस्कूल मुलांकरिता व दुसरें मुलींकरितां चालविण्यांत येत असे.

सन १८८३-८४ मध्यें मुलांचे मिड्लस्कूल शरणपुरांत होतें. मुलींचें त्यानंतर सुरू करण्यांत आलें. मुलांचें मिड्लस्कूल सन १९२१-२२ साली बंद झालें व मुलींचे त्यापूर्वीच सन १९०६ मध्यें बंद करण्यात आलें. मुलांच्या आणि मुलींच्या शाळांतील विद्यार्थी-संख्या पुढीलप्रमाणें होती.

सन	मुलांचें	मुलींचें
१८९९-१९००	२९	१२
१९००-१९०१	२९	१४
१९०१-१९०२	३७	१७
१९०३-१९०४	३६	१२
१९०४-१९०५	४२	११
१९०५-१९०६	५१	१४
१९०६-१९०७	८०	—
१९१०-१९११	७९	—
१९१३-१९१४	८४	—
१९१५-१९१६	८९	—
१९२१-१९२२	६२	—

६) पांडुरंग गंगाधर लिमये, बी. ए. एस्. टी. सी.-१९२८ ते १९५०. मराठी भाषेतील एक लेखक, जाणते रसिक असून, व्यासंगी विद्वान होते. 'गोदावरीचा गुजारव' ह्या नासिकमधील कवींच्या काव्यसंग्रहाचे हे संपादक होते. नासिक येथील साहित्यविषयक व नाट्यविषयक चळवळींत प्रमुखपणें भाग घेत असत.

७) श्री. नारायण हरी ववें, बी. ए. एलएल. बी.–सन १९३३ ते १९४१. मुंबई विद्यापीठाचें जुरिस प्रुडन्स व रोमन ला ह्यांतील पारितोषिक ह्यांनीं मिळविलें होतें. सन १९३३ पासून उपशिक्षक होते. संस्कृत हा आवडता विषय

नासिकच्या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचें उल्लेखनीय विश्वविद्यालयीन यश. . श्री. गोविंद कृष्ण मोडक– जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप १८९९, श्री. वामन केशव मरे– जगन्नाथ शंकरशेट संस्कृत स्कॉलरशिप १९०३, श्री. ना. वि. जोशी– जगन्नाथ शंकरशेट स्कॉलरशिप १९०४, श्री. श्रीकृष्ण चिंतामण नगरे– मुंबई युनिव्हर्सिटी मॅट्रीक परीक्षेत प्रथम १९०३. श्री. अशोक चिंतामण आमडेकर– मुंबई युनिव्हर्सिटी मॅट्रीक परीक्षेत प्रथम १९०३, श्री. वामन अबादास जोशी– चॅटफील्ड स्कॉलरशिप १९३०, श्री. डी. टी. साकुरीकर– बीडकर संस्कृत पारितोषिक १९३६, कु. कृष्णाबाई अनंत आपटे– यमुनाबाई दळवी संस्कृत स्कॉलरशिप १९३७.

नासिक हायस्कूलनें राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कीर्तीचे नेते निर्माण केले आहेत. क्रीडाक्षेत्रात शाळेच्या माजी विद्यार्थ्यांनी नांव कमाविलें आहे व बहुतांशी सर्वांनी व्यावसायिक जीवनात यश मिळविलें आहे.

राजकवि चंद्रशेखर, कै. लक्ष्मणशास्त्री लेले, कृ. पां. कुलकर्णी, ग. वा. रे. नारायण वामन टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर, कै. गो. ह. देशपांडे, श्री. भाऊराव गायकवाड, श्री. ग. वि. केतकर, कै. बाबासाहेब चांदवडकर, श्री. ना. प. थत्ते, श्री. नानासाहेब गाडगीळ. श्री. मा. पा. पुरंदरे, श्री. डा. रा. प्रधान (आय्. सी. एस्.). श्री. ना. मा. कामटे, श्री. म. गो. प्रधान, श्री. ग. वा. राजदेरकर, श्री. वा. ल. कुलकर्णी, श्री. वा. गो. कुलकर्णी, श्री. द. व. माडीलकर, श्री. प्रल्हाद बाळाचार्य गजेंद्रगडकर (भारताचे सरन्यायाधीश), श्री. ल. व्यं. घोलप (आय्. सी. एस्.), प्रा. पुरुषोत्तम दामोदर चंद्रात्रे, श्री. जिभाऊ जाधव, प्रा. रघुनाथ त्र्यंबक टोपे, श्री. श्रीपाद अमृत डांगे, प्रा. कृ. बा. निकुंब, श्री. हरी विनायक पाटसकर, श्री. श्री. ना. बनहट्टी नागपूर, श्री. बाळकृष्ण वासुदेव भडकमकर (आय्. सी. एस्.), श्रीमती दुर्गा भागवत, श्री. मधुकर राऊत, श्री. शांबेकरा अर्देसर लाल, श्री. अ. वा. वर्टी, कै. रमाकांत वेलदे, श्री. गोविंद आबाजी शौचे, श्री. विनायक पद्मनाथ साठे वकील, सौ. सरोजनी देशपांडे, श्रीमती सुमति क्षेत्रमाडे आणि नासिक हायस्कूलचे असंख्य माजी विद्यार्थी, ज्यांचीं नावें स्थलाअभावी देतां येत नाहीत. सर्वांनी नासिक हायस्कूल अजरामर केलें आहे.

सन १९४० मध्ये सरकारी स्त्रियांचे ट्रेनिंग कॉलेज काढण्यासाठी नासिक हायस्कूलमधील वर्ग कमी करण्यात आले व सन १९४१ पासून नासिक हायस्कूल ही शाळा बंद करण्यांत आली.

नासिक नगरपालिका उर्दू शाळा– नॅशनल हायस्कूल– नगरपालिकेकडे प्राथमिक शिक्षणाची व्यवस्था सन १८८३–८४ मध्यें आली. त्या वेळेस सरकारी शिक्षण खात्यामार्फत चालविण्यांत येणाऱ्या प्राथमिक शाळा नगरपालिकेकडे चालविण्यासाठीं आल्या. नंतर नगरपालिकेनें प्राथमिक हिंदुस्थानी शाळा (उर्दू शाळा) सुरु केली. इंग्रजी भाषेचें महत्त्व वाढू लागल्यानंतर उर्दू शाळेंत इंग्रजी वर्ग सुरू करण्यात आला. मराठी भाषा बोलणारे विद्यार्थी नासिक हायस्कूलमध्यें जात व ह्या इंग्रजी क्लासमुळें उर्दू भाषेतून इंग्रजीच्या शिक्षणाची सोय झाली.

सन १८९९–१९०० मध्ये ह्या इंग्रजी क्लासमध्यें १४ विद्यार्थी होते व नगरपालिकेनें ह्या क्लासवर १६० रुपये खर्च केले. विद्यार्थ्यांकडून फी १३ रुपये जमली व त्या वर्षी वर्गावर एकूण १३३ रुपये खर्च आला.

माध्यमिक शिक्षण

माध्यमिक शाळांची तपशीलवार माहिती बघतांना प्रत्येक शाळेची तपशीलवार माहिती बघणें सोईचें आहे. सन १८६१ पूर्वी नासिक शहरांत माध्यमिक शाळा नव्हती. मात्र अिंग्रजी भाषेचें शिक्षण शरणपुरांतील प्राथमिक शाळेंत देण्यांत येत होतें.

नासिक हायस्कूलः—नासिक हायस्कूल ही नासिक शहरांतील सर्वांत प्रथम सुरू झालेली माध्यमिक शाळा होय. सरकारी शिक्षण खात्या-मार्फत सन १८६१मध्यें 'सुपिरियर अँग्लो व्हर्नाक्युलर स्कूल' ह्या नांवाचें सुरू करण्यांत आलें. नंतरच्या काळांत सन १८७१ मध्यें 'नासिक हायस्कूल' ह्या माध्यमिक शाळेंत त्याचें रूपांतर झालें व नासिक हायस्कूलमधील विद्यार्थी मुंबआी विद्यापीठाच्या मॅट्रिकच्या परीक्षेस पाठविण्यांत येऊ लागले.

सन	विद्यार्थी संख्या
१८६२–६३	१००
१८६३–६४	९२
१८८२–८३	२४६
१८८३–८४	३०५
१८९३–९४	३६९
१९०३–०४	२२०
१९१०–१४	४४०
१९२३–२४	४६६
१९३३–३४	४९०
१९३८–३९	४९०
१९३९–४०	३११
१९४०–४१	१८६

नासिक हायस्कूलचा इतिहास हा अलौकिक व्यक्तींच्या आठवणींनीं असामान्य घटनांनीं भरलेला आहे. सन १८६१ ते १९४१ हें ऐंशी वर्षांचें शाळेचें आयुष्य त्या शाळेंत शिकणारे विद्यार्थी, शिकविणारे शिक्षक आणि शिक्षणतज्ज्ञ असे मुख्याध्यापक ह्यांच्या असामान्यत्वाची जाणीव करून देते. अभ्यासाच्या बाबतींत आणि खेळांच्या बाबतींत नासिक हायस्कूलनें अलौकिक कामगिरी बजावली आहे. नासिक हायस्कूलचे मुख्याध्यापक, शिक्षक आणि विद्यार्थी ह्यांनीं शाळेच्या आयुष्यांत आणि नासिकच्या सार्वजनिक जीवनांत सुवर्ण युग निर्माण केलें आहे.

नासिक हायस्कूलच्या उल्लेखनीय मुख्याध्यापकांचीं नांवें व माहिती पुढें संक्षेपानें दिली आहे.

१) श्री. द्वारकानाथ राघोबा तर्खडकर—२५।२।१८८९ ते ३१।३।१८९९ ह्यांनीं अिंग्रजी भाषांतर पाठमालेची प्रसिद्ध तीन पुस्तकें लिहिलीं आहेत. नासिक येथील 'गंगामंदिर' ह्यांनीच बांधलें आहे. सेवानिवृत्त झाल्यानंतर ते नासिक येथें येऊन राहिले. मृत्यु १९०४

२) श्री. रा. ब. गणेश व्यंकटेश जोशी—१।४।१८९९ ते २२।१०।१९०० ह्यांचा आंकडेशास्त्र, इतिहास, राज्यव्यवस्था आणि अर्थशास्त्र या विषयांचा अभ्यास अतिशय खोल होता. न्या. रानडे, लो. टिळक व नामदार गोखले इत्यादि पुढारी वरील विषयांत यांचा सल्ला घेत. सरकारी जमीन महसूल आणि शिक्षण ह्या खात्यांच्या कारभारावर मार्मिक टीकालेख हे लिहीत असत. त्यांचे लेख 'टाईम्स'मध्यें 'जे' ह्या सहीनें प्रसिद्ध झाले आहेत.

३) श्री. हरी गणेश गोडबोले—ऑक्टोबर १९०० ते जुलै १९०१. ह्यांनीं वेदांतावर 'आत्मविद्या' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला आहे.

४) श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे,बी. अे.—१९१४ ते १९२४. हे मुख्याध्यापक असतांना शाळा स्वतःच्या इमारतींत १९२० सालीं आली. अेवढया मोठया शाळेचे मुख्याध्यापक असण्याचा पहिला मान ह्यांना मिळाला. आपल्या दोन नातेवाअीक मुलींना शाळेंत घालून नासिकमधील अिंग्रजी स्त्रीशिक्षणाचा व सहशिक्षणाचा यांनीं पाया घातला.

५) श्री. रामचंद्र भास्कर भागवत,अेम. अे.—१९२५—२७, १९३० ३१, हे लॅटिन विषयाचे नाणावलेले पंडित व रँग्लर परांजपे यांचे सहाध्यायी होते.

प्राथमिक शिक्षणाच्या शाळा, नवीन अभ्यासक्रमाप्रमाणें सुरू केल्या.

सन १८८३।८४ मध्यें नासिक शहरांत खालील दोन प्राथमिक शाळा होत्या व त्यांना सरकारी अनुदान मिळत होतें.

१) चर्च मिशन : प्राथमिक मुलांची शाळा— विद्यार्थी— ३१ सरकारी ग्रँट १० रु.

२) आय्. अेफ्. अेन. स्कूल अँड इन्स्ट्रक्शन सोसायटी गर्ल्स स्कूल मुलींची प्राथमिक शाळा. } विद्यार्थिनी ३० सरकारी ग्रँट २० रुपये

सन १८९३।९४ मध्ये झोरेस्ट्रियन मिशनमार्फत बुधवार पेठेत व आदितवार (रविवार) पेठेत मुलांमुलींच्या शाळा चालविल्या जात होत्या व त्या शाळांत अनुक्रमे ५० व ५४ विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्या शिवाय चर्च मिशनतर्फे शरणपुरात अेक मुलींची शाळा चालविली जात होती व शरणपुरांतील ह्या शाळेत २४ विद्यार्थीनीं होत्या. नगरपालिका संस्कृत शाळेला मदत करीत असे.

सन १८९९।१९०० साली पुढील शाळा होत्या.

शाळेचें नांव	विद्यार्थी	सरकारी ग्रँट	म्युनिसिपल ग्रँट
१ चर्च मिशन मुलांची शरणपूर	५८	रु. ११०	—
२ झोरेस्ट्रीयन मुलामुलींची बुधवार	१०७	रु. १२०	—
३ झोरेस्ट्रियन मुलामुलींची आदितवार	६८	रु. १२२	—
४ संस्कृत शाळा	४३	रु. १००	रु. १००

नाशिक नगरपालिकेच्या हद्दीतील परंतु नगरपालिकेमार्फत न चालविल्या जाणाऱ्या प्राथमिक शाळांची आंकडेवारी खालीलप्रमाणे आहे:

सन	शाळांची संख्या	विद्यार्थी
१८९९—१९००	७	४१२
१९१०—१९११	८	६७९
१९१५—१९१६	९	५६३
१९२१—१९२२	७	८०९
१९२४—१९२५	६	५५१

सन १९२४।२५ नंतर मात्र मिशन प्राथमिक शाळांची संख्या कमी झाली. सन १९२९।३० मध्ये ३ शाळा एडेड (किंवा खाजगी) होत्या व १९३९—४० मध्यें ती संख्या २ वर आली.

नंतरच्या काळांत मात्र परत खाजगी शाळांची संख्या वाढू लागली. ह्या नवीन खाजगी शाळा शैक्षणिक संस्थामार्फत चालविण्यात येत होत्या. बहुतेक शैक्षणिक संस्थाचीं शहरांत हायस्कूलें होतीं व त्यांना पूरक म्हणून त्यांनी प्राथमिक शाळा सुरू केल्या. सन १९५४-५५ मध्यें ह्या शाळांची संख्या १० होती, १९५९-६१ मध्यें १२ झाली व सन १९६३-६४ मध्यें ही संख्या १३ झाली आहे. ह्या खाजगी शाळांमध्ये गुजराथी उर्दू, मराठी शाळा आहेत.

सन १९६३—६४ मधील नगरपालिका मदत देत असलेल्या खाजगी प्राथमिक शाळांची नांवें पुढीलप्रमाणे आहेत:

१) प्राथमिक शिक्षण मंदिर,
२) बाल शिक्षण मंदिर,
३) रविंद्र मंडळ संचालित प्राथमिक शाळा,
४) आदर्श मराठी शाळा,
५) सफिया मदरसा,
६) बॉईज टाऊन, नाशिक
७) महाराष्ट्र विद्यालय (गांधी—उपनगर)
८) प्राथमिक विद्या मंदिर,
९) बाल विद्या मंदिर,
१०) सरस्वती विद्यालय,
११) नवभारत विद्यालय, पंचवटी,
१२) गोदावरीवाडी प्राथमिक शाळा, आणि
१३) मन इंद्रिया प्राथमिक शाळा.

सन १९२४–२५ आणि १९२५–२६ ह्या दोन वर्षांमधील फरक अभ्यासनीय आहे. त्याच दरम्यान सक्तीचें प्राथमिक शिक्षण योजना अंमलांत आली व त्याचाहि परिणाम विद्यार्थी-संख्येवर व शाळेच्या रकमेच्या वाढीकडे झाला.

साल	शाळा	मुलें	मुली	एकूण	शिक्षक–संख्या
सन १९२४–२५	११	२१६८	७३६	२८०४	—
सन १९२५–२६	२२	२५९५	८८९	३४८४	१०८

ह्या दोन वर्षातील शाळेच्या संख्येंत फरक पडण्याचें कारण असें असावें कीं विद्यार्थी-संख्या वाढली त्यामुळें शिक्षकांची संख्या वाढली. परंतु शाळेच्या इमारती मात्र वाढल्या नाहींत व त्यामुळें एकाच इमारतींत दोन शाळा भरवाव्या लागत असाव्यात. सरकारी रिपोर्टांत सन १९२५–२६ मध्यें शाळा अकराच होत्या असा उल्लेख आहे. परंतु नगरपालिकेच्या दप्तरीं शाळांची संख्या २२ आहे. त्यामुळेंच शाळा दुबार भरत असाव्यात असें अनुमान काढावें लागतें.

सन १९३९।४० सालांत नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांत ४४४१ मुलें व २२०४ मुली एकूण ६६४५ विद्यार्थी २२ शाळांत शिकत होते.

सन १९५९–६० सालांत शाळांची संख्या ४८ झाली व विद्यार्थी संख्या १९४७७ झाली. त्यांपैकीं मुलें १०९४० व मुली ८५३७ होत्या.

सन १९६३।६४ मध्यें नगरपालिकेच्या मार्फत चालविण्यांत येणाऱ्या शाळांची माहिती सविस्तर खालीलप्रमाणें:

शाळांची संख्या ४३. ह्या ४३ शाळा २८ इमारतींत भरतात. त्या २८ शाळांपैकीं १६ इमारती भाड्यानें घेण्यांत आल्या आहेत. ४ शाळांचें भाडें नगरपालिकेला देण्यांत येतें. ३ शाळांच्या इमारती स्कूल बोर्डाच्या मालकीच्या आहेत आणि ५ इमारती मोफत वापरण्यास मिळाल्या आहेत. नगरपालिकेमार्फत मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दू, सिंधी शाळा चालविल्या जातात.

इयत्तावार विद्यार्थी पुढीलप्रमाणें

इयत्ता	मुलें	मुली	एकूण
पहिली	१७९७	१३७६	३१७३
दुसरी	२०१३	१५१३	३५२६
तिसरी	१७४९	१२०८	२९५७
चौथी	१३५८	१०९९	२४५७
पांचवी	१०९१	८९१	१९८२
सहावी	१००३	३०९	१६१२
सातवी	८४१	४७४	१३५५
अेकूण	९८५२	७१७०	१७०२२

नगरपालिकेंत अेकूण ३९५ शिक्षक आहेत. त्यांपैकीं प्रशिक्षित आहेत. स्त्री शिक्षिकांची संख्या आहे. त्यांशिवाय २ ड्रॉईंग शिक्षक, ३ शिवण शिक्षिका आणि, पी. टी. शिक्षक आहे. निरनिराळ्या शाळेंतील कामाठ्यांची संख्या १८ आहे.

प्राथमिक शिक्षण :

नगरपालिकेच्या व्यतिरिक्त आणि खाजगी संस्थांमार्फत चालविल्या जात असणाऱ्या प्राथमिक शाळांची माहिती येथें देणें उपयुक्त ठरेल.

प्रास्ताविकांत उल्लेख केल्याप्रमाणें ' पूर्व-परंपरागत प्राथमिक शाळा ' ज्याला 'पंतोजींची शाळा' असें म्हटलें आहे, गेल्या शतकाच्या उत्तरार्धात चालूच होत्या. परंतु सरकारी शिक्षण खात्यानें नवीन प्राथमिक शाळा सुरू केल्या-नंतर खाजगी संस्थांनीं विशेषतः मिशनऱ्यांनीं

विद्यार्थी-संख्या १० वर्षांत १३४४ वरून १४१४-वर गेली. नगरपालिकेच्या शाळांत तरी फक्त ७० विद्यार्थी वाढले असले तरी खाजगी, विशेषत: मिशनरी लोकांच्या शाळेंत बरेच विद्यार्थी जाऊं लागले. ह्याचें मुख्य कारण नगरपालिकेच्या शाळेंत आकारण्यांत येणारी फी हें होय. चालू शतकाच्या सुरुवातीला (सन १९००–०१) नगरपालिका एकूण ९ प्राथमिक शाळा चालवित होती. त्यांपैकीं मुलांच्या मराठी प्राथमिक शाळा ६, हिंदुस्थानी शाळा (उर्दू शाळा) आणि मुलींच्या २ शाळा होत्या. त्यांपैकीं ७ शाळा भाड्याच्या इमारतींत भरत होत्या व बाकीच्या मोफत असाव्यात अथवा नगरपालिकेच्या मालकीच्या असाव्यात. कारण सन १९००–०१ च्या जमाखर्चात ह्या ७ शाळांच्या भाड्यावर रु. ६११ आणे ८ खर्च दाखविला आहे.

सन १९००–०१ च्या जमाखर्चावरून बरीच महत्त्वाची माहिती मिळू शकते. तीपैकी शाळा–भाड्याचा वर उल्लेख आलाच आहे त्याशिवाय शिक्षकांच्या पगाराविषयी माहिती मिळते शाळेच्या मुख्याध्यापकाला सरासरी द. म. पगार रु. २५ होता. शिक्षकाला सरासरी द. म. रु. १० पगार होता. त्याशिवाय पेन्शन फंडाचा नगरपालिकेचा हिस्सा देण्यात येत असे. नगरपालिकेच्या शिक्षण-विषयक खात्याचा खर्च वार्षिक रु. २६४ होता.

सन १९०१–०२ ह्या सालांतील शाळा, शिक्षक, विद्यार्थी व खर्च ह्यांचा खालील तक्ता, त्यावेळच्या परिस्थितीची कल्पना देईल.

हिंदुस्थानी शाळेंत इंग्रजी वर्ग चालत असे. त्याचा विचार स्वतंत्र करण्यात येईलच. त्या-शिवाय हिंदुस्थानी शाळेंत मराठी भाषा शिकविण्यासाठी शिक्षक होता. मराठी शाळा नं. १ व हिंदुस्थानी शाळेंत द. म. रु. १ आणे ८ ह्या पगारावर माळी होता व पंचवटी शाळेंत स्त्री–कामाठी होती व तिचा पगार द. म. रु. ३ होता.

सन १९१०-११ सालीं शाळांची संख्या १३ झाली. विद्यार्थ्यांची संख्या १६३५ झाली. नगर-पालिकेनें खर्च रु. ७२३० केला व सरकारी ग्रँट १३६७८ मिळाली. परंतु सन १९१२–१३ मध्यें शाळांची संख्या ११ वर आली. विद्यार्थी-संख्या १७३३ झाली. नगरपालिकेच्या खर्चात मात्र वाढ झाली व नगरपालिकेनें त्यावर्षी प्राथमिक शिक्षणावर १७०८८ रुपये खर्च केला. त्याप्रमाणांत सरकारी ग्रँट मिळाली. सरकारी ग्रँट त्या वर्षाकरितां रु. २६०१४ मिळाली. मात्र पुढच्याच वर्षी नगरपालिकेचा खर्च रु. ८५२५ वर आला व सरकारी मदत रु. १७३३२ वर आली.

सन १९२१–२२ साली नगरपालिकेच्या प्राथमिक शाळांची संख्या ११ राहिली. त्यांपैकी ७ शाळा मुलांच्या होत्या व ३ मुलींच्या होत्या. हिंदुस्थानी (उर्दू) शाळा चालूच होती. प्राथमिक शाळेंत २१३१ मुले व ६२२ मुली—एकूण २७५३ विद्यार्थी शिक्षण घेत होते. नगरपालिकेचा खर्च रु. ३३१२५ झाला व सरकारी ग्रँट रु. ५५४०० मिळाली.

शाळेचें नांव	शिक्षक–संख्या	विद्यार्थी संख्या	खर्च
			रु.
मराठी मुलांची शाळा क्र. १	४	१०६	९००
मराठी मुलांची शाळा क्र. २	६	१३१	१८८३
मराठी मुलांची शाळा क्र. ३	६	११७	१०८५
मराठी मुलांची शाळा क्र. ४	मे १९०० पासून बंद		
मराठी मुलांची शाळा क्र. ५	३	४२	४५९
पंचवटी शाळा	५	८९	९१८
हिंदुस्थानी मुलांची शाळा	५	९५	११४८
मराठी मुलींची शाळा क्र. १	–	४४	३६५
हिंदुस्थानी मुलीची शाळा	–	५८	४०४

शाळेचें नांव	स्थापना	पटावरील मुलें	फीजमा	सरकारी खर्च	प्रत्येक विद्यार्थ्यामागें सरासरी खर्च
			रुपये	रुपये	रु. आ. पै.
प्राथमिक शाळा नं. १	१८२६	१६७	२७५	४०५	५–७–९
पंचवटी शाळा	१८६२	६४	९१–१२	१३८	४–६–५
प्राथमिक शाळा नं. २	१८६३	९४	६६–११	१२०	५–४–९

वरील तपशिलाकडे पहातां नासिक शहरांतील पहिली प्राथमिक शाळा सन १८२६ मध्यें स्थापन झाल्याचें दिसून येईल. त्यावेळीं बॉम्बे नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीनें ही शाळा सुरू केली. पंचवटी शाळा व प्राथमिक शाळा क्र. २ ह्या नगरपालिकेच्या स्थापनेपूर्वीच सुरू झाल्या होत्या.

सरकारी प्राथमिक शाळेचा कारभार नगरपालिकेकडे सन १८८३–६४ मध्यें आला. त्यावेळची सरकारी दप्तरांतील माहिती उल्लेखनीय आहे.

१)	नासिक शहराची लोकसंख्या (१८८१)	२४१०१
२)	३१ मार्च १८८३ रोजीं शाळांची संख्या	११
३)	३१ मार्च १८८३ रोजीं विद्यार्थी–सख्या	१३४४
४)	विद्यार्थ्याचें लोकसंख्येशीं प्रमाण	५·६
५)	प्रत्येक १००० लोकसंख्येला एक शाळा ह्याप्रमाणें नवीन उघडावयास पाहिजे असलेल्या शाळा	१३
६)	नगरपालिकेकडून जमा (१८८२–८३)	रु. १५७४
७)	चालू खर्च (१८८२–८३) किरकोळ दुरुस्तीसह	रु. ६४०१
८)	सरकारी ग्रँट दर प्रत्येक विद्यार्थ्यामागे ३½ पैप्रमाणें	रु. ३९७
९)	तूट ७ (६+८)	रु. ४४३०
१०)	सरकारी ग्रँट मंजूर खर्चाच्या ⅓ दरानें	रु. २१३४
११)	तूट ७ (६+१०)	रु. २६९३
१२)	नवीन शाळा उघडण्याचा खर्च प्रत्येक शाळेमागें रु. ३०० च्या ⅔ प्रमाणें नगरपालिकेला येणारा	रु. २६००
१३)	नवीन शाळा उघडण्याचा खर्च प्रत्येक शाळेमागें रु. ३०० च्या ⅓ प्रमाणें सरकारला येणारा	रु. १३००
१४)	एकूण सरकारला येणारा खर्च १०+१३	रु. ३४३४
१५)	एकूण नगरपालिकेला येणारा खर्च ११+१२	रु. ६८६७

सरकारनें प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी नगरपालिकेवर टाकल्यानंतर वरीलप्रमाणें खर्चाचें व जमेचें पत्रक करून दिलें. सरकारची अपेक्षा अशी होती कीं प्रत्येक १००० लोकसंख्येमागें एक प्राथमिक शाळा असावी. बारकाईनें वरील आंकडे बघितल्यास त्यांतून नगरपालिकेवर टाकलेल्या जबाबदारीची कल्पना येईल. अर्थात् सरकारी धोरणाप्रमाणें शाळांची संख्या वाढू शकली नाहीं.

३१ मार्च १८९४ रोजीं नगरपालिकेनें चालविलेल्या प्राथमिक शाळांची संख्या ९ होती. परंतु शाळांची संख्या २ नें कमी झाली आणि

जाण्यापूर्वीच्या नासिक शहरांतील शैक्षणिक परिस्थितीची कल्पना मुंबई सरकारनें प्रसिद्ध केलेल्या नासिकच्या गॅझेटीयरवरून येते. सन १८८३ मध्यें प्रसिद्ध झालेल्या ह्या संदर्भग्रंथांत नासिक शहरांतील शाळांची पुढील माहिती सांपडते.: "नासिक गांवांत सन १८७९/८० मध्यें ९ सरकारी शाळा होत्या. विद्यार्थी–संख्या ११५४ होती. सरासरी हजेरी ८९९.५ किंवा शहराच्या लोकसंख्यांच्या ४ ६% इतकी होती. ह्या नऊ शाळांपैकीं एक हायस्कूल होतें व आठ व्हर्नाक्युलर शाळा होत्या. व्हर्नाक्युलर शाळांमध्यें सात मुलांच्या व एक मुलींची शाळा होती. ह्यांशिवाय तीन खाजगी शाळा. येथील चर्च मिशनरी सोसायटीने चालविल्या होत्या. त्यांपैकीं एक अँग्लोव्हर्नाक्युलर व दोन व्हर्नाक्युलरपैकी एक मुलांची व एक मुलींची होती. खाजगी शाळेत ७७ विद्यार्थी पटावर होते."

नासिक शहरांत ब्रिटीशसाम्राज्यशाही मागोमागच ख्रिस्ती मिशनऱ्याचा प्रवेश झाला. नासिक येथें सन १८३२ मध्यें रेव्हरंड जॉन डिक्सन हा मिशनरी आला. त्यानें चर्च मिशन स्थापन केले. त्याचें वसतिस्थान म्हणजे शरणपूर त्या ठिकाणी त्यांनी शाळा, दवाखाना, पंगु मुलांकरिता आरोग्य केंद्र इत्यादि लोकोपयोगी संस्था सुरु केल्या. रे. जॉन डिक्सन याने मराठी भाषा आत्मसात केली व दलीत व पीडित लोकांत जाऊन शिक्षणाविषयीं व आरोग्यविषयी माहिती द्यायला सुरवात केली. त्याचे सहकारी रे. विल्यम मिचेल, रे. चार्ल्स् पिनहार्न फरार, मिसेस फरार ह्यांनीं बरीच मराठी ग्रंथनिर्मिति केली. रे. फरार यानें 'ईश्वराचें पवित्रत्व व न्यायत्व याचें प्रदर्शन', 'इतर आंतील गोष्टी', 'मराठीं चित्रें', 'पहिली पोथी' ह्याच्या नवीन आवृत्तीला 'बालोपदेश' नांव दिलें व ह्या पुस्तकाचा शाळेंत उपयोग करण्यांत येऊं लागला. 'दावीदाचीं गीतें' इत्यादि पुस्तकें चर्च मिशन मार्फत प्रसिद्ध केलीं. मिसेस फरार यांनीं 'चमत्कारिक गोष्टी', 'हेन्री व त्याचा सांभाळणारा संभू ह्यांची गोष्ट', 'कुटुंब प्रवचननीति', 'यात्रेकऱ्याचा मुलगा' इत्यादि पुस्तकें लिहिली. त्यांच्यानंतरचा मिशनरी रे. सी. एफ्. श्वॉर्झ हा सन १८७३ मध्यें नासिकला आला व १८७९ मध्यें मरण पावला. चर्च मिशनरी सोसायटीचें कार्य अद्यापपावेतों शरणपुरांत चालू होतें. मिशननें मराठी वाङमयांत, नासिक शहरातील शिक्षणक्षेत्रांत फारच मोलाची कामगिरी केली आहे. त्यांनीं चालविलेल्या प्राथमिक शाळा, हायस्कूल इत्यादि संबंधी माहिती पुढील विवेचनांत येईलच.

शैक्षणिक प्रगतीचे समावलोचन करतांना वरील पार्श्वभूमि विचारांत घेऊन अधिक तपशीलवार माहिती पहाणें योग्य ठरेल. समालोचनाच्या बाबतीत पुढील विभाग करणें आवश्क आहे. प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण आणि महाविद्यालयीन शिक्षण हे मुख्य तीन विभाग आहेतच. त्याशिवाय प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत नगरपालिकेनें केलेलें कार्य आणि खाजगी शिक्षणसंस्थांनी केलेले कार्य ह्यांसंबंधी स्वतंत्र विचार करावा लागेल. त्याचप्रमाणें माध्यमिक शिक्षणाच्या बाबतीत सरकारी शाळा व खाजगी संस्थांनी चालविलेल्या शाळा ह्यांचीहि स्वतंत्र माहिती विचारांत घ्यावी लागेल. महाविद्यालयीन शिक्षणासंबंधीं मात्र गोखले एज्युकेशन सोसायटीचें कार्य एकमेव आहे. हं. प्रा. ठा. महाविद्यालय (कला व विज्ञान) आणि बी. वाय्. के. कॉलेज ऑफ कॉमर्स (वाणिज्य) ही महाविद्यालयें गोखले एज्युकेशन सोसायटीमार्फत चालविली जातात.

प्राथमिक शिक्षण :

१ मे १८६४ रोजी नासिक नगरपालिका स्थापन झाली. त्यावेळी नासिक शहरांतील शाळा मुंबई राज्याच्या डायरेक्टर ऑफ पब्लिक इंस्ट्रक्शन यांच्या अधिकाराखालीं होत्या व सरकारी शिक्षण खाते हा कारभार बघत होतें.

१ एप्रिल १८८४ रोजीं नासिक शहरांत असलेल्या प्राथमिक शाळांची माहिती पुढीलप्रमाणे.:

अभ्यासक्रमांत बदल अनुक्रमें १८६५।६६ मध्यें करण्यांत आला व त्यातील विषयांची गर्दी कमी करण्यांत आली व सन १८७० मध्यें सामान्य विद्यार्थ्याला पेलतील व उपयोगी पडतील असे विषय ठेवून बाकीचे काढून टाकण्यात आले.

प्राथमिक शाळेचे तीन प्रकार चालू करण्यांत आले. उच्च (Superior) प्राथमिक शाळा (ज्या शाळेंत प्राथमिक शाळेचा पूर्ण अभ्यासक्रम शिकविण्यांत येई) कनिष्ठ (Inferior) प्राथमिक शाळा, (ज्या शाळेंत इयत्ता ४ थीपर्यंतचा अभ्यासक्रम शिकविण्यांत येई व विभाग शाळा (Branch Schools) (ज्यामध्यें लिहिणें, वाचणें व गणित शिकविण्यांत येई) शेवटच्या दोन प्रकारच्या शाळा लोकप्रिय झाल्या.

त्याच दरम्यान इंग्रजी भाषेचा पगडा सामान्य जनतेवर बसला व दुय्यम शाळेंत जाण्यासाठीं इयत्ता ४ थी पास होणें आवश्यक होतें व म्हणून प्राथमिक शाळेंतील गर्दी वाढूं लागली.

नासिक नगरपालिका १८६४ मध्यें जरी स्थापन झाली असली तरी सन १८८३।८४पूर्वी शिक्षणाचा नगरपालिका क्षेत्रांत अंतर्भाव नव्हता. जिल्हा शिक्षण मंडळ (District School Board) नगरपालिकेच्या हद्दींतील प्राथमिक शाळा चालवित होतें. आणि नगरपालिका जिल्हा शिक्षण मंडळाला आपला शिक्षणावरील खर्चाचा हिस्सा देत असे.

सन १८८३।८४ पासून नगरपालिकेकडे प्राथमिक शाळा (शिक्षण) सोपविण्यांत आलें व सरकारनें त्यांना ग्रॅंट ठरवून दिली. एकंदर खर्चाचा ⅓ अितकी रक्कम सरकारनें नगरपालिकेला द्यायचे ठरविलें. मात्र रकमेची आकारणी दरवर्षी न होतां प्रथम वर्षी आकारण्यांत आलेली ग्रॅन्टच दरवर्षी देण्यांत येऊं लागली. साहजिकच दरवर्षी खर्च वाढूं लागला. पण ग्रॅन्टची फेरआकारणी सन १८९३ मध्यें, १९०९ मध्यें झाली व सन १९०३ मध्यें ग्रॅन्टचा दर ५० टक्क्यांनीं वर नेला. सन १९१२ मध्यें परत आकारणी करण्यांत आली. सन १९११।१२ च्या खर्चाच्या ५० टक्के इतकी आकारणी झाली. वरील गोष्टींवरून साधारण दर दहा वर्षांनी फेरआकारणी झाली असें दिसून येईल. परंतु नगरपालिकेचें मर्यादित उत्पन्न व ठराविक ग्रॅन्टची रक्कम ह्यांमुळें शाळेची संख्या वाढूं शकली नाहीं. त्याचप्रमाणें नवीन अिमारती होऊं शकल्या नाहींत. मात्र विद्यार्थी संख्या वाढतच राहिली.

सन १९१८ मध्यें ज्यावेळीं फेर-आकारणी झाली त्यावेळीं ग्रॅन्टची रक्कम मागील वर्षाच्या खर्चावर आकारण्यांत येऊं लागली व त्यामुळें माफक प्रमाणांत खर्च होऊं लागला व त्यावर सरकारी ग्रॅंट मिळूं लागली तरीहि आर्थिक परिस्थितीमध्यें फारशी उल्लेखनीय सुधारणा झाली नाही.

सन १९२३ मध्यें नगरपालिकेचे दोन प्रकार पाडण्यांत आले. स्थानिक अधिकार असलेल्या नगरपालिका (Local Authorised Municipality) आणि स्थानिक अधिकार नसलेल्या नगरपालिका (Non-local Authorised Municipality) नासिक जिल्ह्यांतील दोन नगरपालिका 'स्थानिक अधिकार असलेल्या नगरपालिका' जाहीर करण्यांत आल्या व त्यांचेवरील प्राथमिक शिक्षणासंबंधी जबाबदारी कायम करण्यांत आली. त्यामुळें नासिक जिल्ह्यांतील नासिक व मालेगांव ह्या व्यतिरिक्त सर्व नगरपालिकेच्या कक्षेंतील शाळा परत जिल्हा शिक्षण मंडळाकडे गेल्या व त्या नगरपालिका जिल्हा शिक्षणमंडळाकडे शिक्षणावरील खर्चाचा हिस्सा देऊं लागल्या. नासिक नगरपालिकेला सरकारी ग्रॅंटचा दर कायम ५० टक्केच राहिला.

नगरपालिकेची स्थापना झाल्यानंतर पण नगरपालिकेकडे प्राथमिक शिक्षणाची जबाबदारी

शिक्षणाच्या प्रगतीचा व विकासाचा विचार करण्यापूर्वी त्यावेळची प्राथमिक शिक्षणाची परिस्थिति काय होती, हे बघणें उद्बोधक होईल. ब्रिटीश राज्यस्थापनेच्या वेळी मुंबई राज्याच्या प्रत्येक खेड्यांत 'पंतोजीची शाळा' होती. शिक्षणक्रमांत अंकगणित, मोडी व बालबोध लिहीणें, वाचणें ह्याचा समावेश होता. सरकारी जुन्या दप्तरांतील कागदपत्र पहातां त्याच्यासंबंधी पुरावाहि मिळतो. साक्षरतेचें प्रमाण त्यावेळीं बऱ्या प्रमाणांत होतें. त्याशिवाय शेतकरी वर्ग व्यवहारांतील आंकडेमोडीत, मोडी व बालबोध लिहिण्यावाचण्यांत तरबेज होता. ह्यासंबंधी त्या वेळेच्या गव्हर्नरर्स कौन्सिलच्या सदस्याचे विचार मननीय आहेत.

मि. प्रेन्डेरगास्ट (Mr. Prendergast) ह्यांनी गव्हर्नरर्स कौन्सिलपुढे तसे १८२१ साली खालील आशयाचे उद्गार काढले आहेत.:

"प्रांतांत असें अेकहि खेडेगाव नाही कीं ज्या ठिकाणीं एकहि शाळा नाही. लहानशा गांवांत कमीत कमी एक शाळा आहे आणि मोठ्या गांवांत एकापेक्षा जास्त शाळेंत लिहिणें वाचणें आणि गणित शिकविण्यांत येतें. असा एकहि शेतकरी नाहीं कीं जो स्वतःचे जमाखर्च काटेकोरपणें ठेवूं शकत नाहीं. मला असें वाटते कीं आपल्या देशांतहि अशी परिस्थिति सांपडणार नाहीं"

त्यावेळच्या शिक्षणपद्धतीचा विचार करतां पुढील गोष्टी निदर्शनास येतात. शिक्षक व्यावसायिक दृष्टचा प्रशिक्षित नसत. शाळांच्या स्वतंत्र अिमारती नव्हत्या. शाळा देवळांत, अेखाद्या श्रीमंत माणसाच्या घरांत किंवा शिक्षकाच्या घरांत भरत. त्यावेळी अभ्यासक्रम नव्हता, नियमित वर्ग नव्हते, क्रमिक पुस्तकें नव्हतीं. विद्यार्थी आपल्या आवडीप्रमाणे विषय शिकत व शिकावेसें वाटेपर्यंत शिकत. लिहितां वाचतां यायला लागल्यानंतर शेतकऱ्याचा मुलगा शाळा सोडून देई. व्यापाऱ्याच्या मुलाला हिशेब येऊं लागल्यावर घरीं ठेवून घेण्यात येई. आणि ब्राह्मणाचा मुलगा त्यांच्यापुढे जाऊन शिके. शिक्षकाच्या लायकीप्रमाणें अभ्यासक्रम बदले किंवा लोकांच्या गरजेप्रमाणे शाळेंतील विषय बदलत. परंतु लिहिणें, वाचणें आणि गणित ही शिकविलीं जातच. शिक्षकाला धान्य अथवा कपडा व कांहीं प्रसंगीं पैसे मिळतच पण त्याला योग्य तो मान मिळत असे.

ब्रिटिशांना ही शिक्षणपद्धति अत्यंत अकार्यक्षम आणि निरुपयोगी वाटली. 'प्राथमिक शिक्षण' म्हणजे पाश्चिमात्य शास्त्रांचें आणि ज्ञानाचें मातृभाषेंतून शिक्षण अशी त्यांची धारणा होती. त्यामुळें नवीन शाळा हा दृष्टिकोन पुढें ठेवून उघडण्यात आल्या.


सन १८४० मधील प्राथमिक शाळेंतील अभ्यासक्रमांत खालील गोष्टींचा समावेश करण्यात आला होता : मोडी व बालबोध लिहिणें, वाचणें, अंकगणित, बीजगणित, भूमिति, त्रिमिति, खगोलशास्त्र, भूगोल, निसर्गविज्ञान, इंग्लडचा व हिंदुस्थानचा अितिहास यांशिवाय ज्यांना सरकारी नोकरी करावयाची असेल, त्यांना महसूल कायदे, दिवाणी व फौजदारी कायदे यांचाहि अभ्यास करावा लागत असे.

नवीन शाळेतील अभ्यासक्रम सहा ते दहा वर्षांचा होता व एकच शिक्षक वरील सर्व विषय शिकवीत असे. सरकारी शिक्षणखात्यानें वरील प्रकारच्या शाळा सुरू केल्या तरी खेडेगांवांत नवीन प्राथमिक शाळा लोकविरोधामुळें स्थापन होऊं शकल्या नाहींत. मात्र शहरांत त्यांची संख्या वाढूं लागली.

नवीन प्राथमिक शाळांना लोकांनीं बरेच दिवस प्रतिसाद दिला नाही. त्याला मुख्य कारणें पुढीलप्रमाणे : पहिलें कारण अभ्यासक्रमातील विषयांची गर्दी; दुसरें कारण छापील पुस्तकें, वह्या, पाट्या, वापरायचा सरकारचा आग्रह, फी दरमहा भरावी लागे हें कारण तिसरें. त्यामुळें नवीन प्राथमिक शाळांत मुलांना पाठविण्याचा पालकांचा कल नसे व जुन्या शाळेंतील गर्दी कायम राहिली.



तांत्रिक शिक्षण शाळा : तांत्रिक युगाची पहांट असलेली संस्था. काय सांगावें, येथूनच स्थापत्य शिक्षणाच्या योजना जन्म पावतील- - - -




महाराष्ट्र इंजीनिअरींग रिसर्च इन्स्टिट्यूट : पूर व पाणी या संबंधांत संशोधनासाठीं स्थापन झालेली एक अग्रेसर संस्था.




दूधसागर धबधबा : नासिकजवळील एक प्रेक्षणीय ठिकाण. मूर्ति लहान पण कीर्ति मोठी.







गंगापूर धरण : जीवनदात्री गोदावरीला अडवून मानवाच्या सेवेला जुंपणारा बांध. बांधाचा एक भाग असलेला टॉवर.




पांडव लेणीं : बौद्ध आणि हिंदू संस्कृतींचें दर्शन घड-विणारी नासिकजवळील शिल्पकला.



समर्थांचा टाकळी मठ : रामदासांनीं स्थापन केलेली मारुतीरायांची पहिली मूर्ति व स्वतःचा पहिला मठ.

गांवकरी प्रेस



म्युनिसिपल वॉटर वर्क्स नाशिक शहराला पाणी ✤
पुरवठा करणारे हेच ते महत्वाचे ठिकाण



गावकरी प्रेस

✤ गुराचा बाजार : नदी भागांतील बाजारात जनावरांची
मोठ्या प्रमाणात देवघेव होते.

शिक्षण आणि शिक्षण-संस्था



— श्री. वसंत नागपुरे

नाशिक नगरपालिकेच्या स्थापनेला १ मे १९६४ रोजी शंभर वर्षे पूर्ण होत आहेत. त्याप्रसंगी गेल्या शंभर वर्षातील प्रगतीचें सिंहावलोकन करणें योग्य होईल. शिक्षणाची गेल्या शतकांतील वाटचाल हा ह्या लेखाचा उद्देश आहे. प्राथमिक शिक्षण हा नगरपालिकेच्या कक्षेतील विषय आहे. नगरपालिकेच्या परिसरांतील शाळा चालविणें, खाजगी शाळांना मदत करणें, हीं कामें नगरपालिकेच्या स्कूलबोर्डामार्फत चालविली जातात. परंतु प्रस्तुत लेखांत प्राथमिक शिक्षण, माध्यमिक शिक्षण व महाविद्यालयीन शिक्षण ह्या सर्वांचाच आढावा घ्यावयाचा आहे.

शिक्षणाचा प्रसार कसा झाला हे बघण्यापूर्वी शिक्षणाच्या कांहीं मूलभूत गोष्टी विचारांत घ्यायला हव्यात. नगरपालिका अथवा संस्था ज्या शिक्षणाच्या क्षेत्रांत काम करतात त्यांना निरनिराळ्या प्रयोगांचें, उपक्रमांचें स्वातंत्र्य फारच थोडे आहे. सरकार राज्यपातळीवर अथवा केंद्रपातळीवर शैक्षणिक पद्धतीचा स्वीकार करते व स्थानिक परिस्थितीचा विचार न करतां शिक्षण संस्थांवर ती लादली जाते.

नगरपालिकेवर व खाजगी शिक्षण संस्थेवर सर्व बंधनें टाकण्यात येतात थोडक्यांत, सर्व अधिकारी शिक्षणखात्याच्या हातांत असतात व नगरपालिका किंवा खाजगी शिक्षण संस्था ह्यांचा फक्त साधनासारखा उपयोग केला जातो.

शिक्षणाची प्रत्यक्ष जबाबदारी पार पाडतांना नगरपालिकेला अथवा खाजगी शिक्षण संस्थेला जमाखर्चाच्या तोंडमिळवणुकीचा सर्वात मोठा प्रश्न पडतो. नगरपालिकेचें ठराविक उत्पन्न बघतां शिक्षणाचा प्रसार योग्य रीतीनें करतां येत नाहीं ही सत्य परिस्थिति आहे, व अर्तीं नगरपालिकेपेक्षा खाजगी संस्थांची परिस्थिति मोठी शोचनीय होते.

ब्रिटिशांचें साम्राज्य १८१८ मध्यें प्रस्थापित झाल्यानंतरच्या पन्नास वर्षात ब्रिटीशांच्या राजकारणाचा, विचारसरणीचा, त्याचप्रमाणें शिक्षणपद्धतीचा पगडा सामान्य जनतेवर बसला व त्यावेळेची प्रचलित शिक्षणपद्धति जी शतकानुशतकें चालत आली होती ब्रिटीश राज्यरचनेला निकामी वाटूं लागली व नवीन पद्धतीचें शिक्षण देण्याऱ्या शाळांची स्थापना होऊं लागली.


नगरपालिकेच्या स्थापनेपूर्वीची शिक्षणाची स्थिति विचार करण्याजोगी आहे. प्राथमिक

घटना काढून मिग कारखान्याचे बांधकाम मिळविण्याचे प्रयत्न करण्यास हवेत. मिग विमानाच्या कारखान्यासाठी आवश्यक त्या इमारतींचे बांधकाम नासिकच्या परिसरात वेगाने सुरू झाले आहे. कारखान्याच्या योजनेविषयीचे दोन आराखडे आता तयार झाले असून त्यांच्या तपासणीचे कामहि सुरू झालें आहे. तिसरा आराखडा लवकरच पूर्ण होणार आहे. आतां नासिकच्या परिसरांत मिग विमानाचा कारखाना आणि इतर मोठमोठे कारखाने होत आहेत आणि त्यामुळें औद्योगिक विकासास योग्य असे वातावरण तयार झाले आहे. त्याचा स्थानिक लोकांनी जरूर फायदा घ्यावयास हवा.

नासिक जिल्हा शेतकीप्रधान असला तरी संस्थेच्या चालक मंडळींनी या जिल्ह्याचा औद्योगिक विकास कसा करतां येईल याचा विचार करून स्थापन केलेल्या औद्योगिक विकास सहकारी संस्थेचे भवितव्य फार उज्ज्वल आहे असे वाटते. शहरांत आता लौकरांत लौकर एक चेंबर ऑफ कॉमर्स सुरू करावे व प्रचलित औद्योगीकरणाच्या प्रयत्नांना विशेष दिशा मिळावी असें वाटतें. मुंबईत उद्योगधंद्याची झालेली दाटी आणि मुंबईच्या आसपास उद्योगधंदे वसविण्याची उद्योगपतींची प्रवृत्ति लक्षात घेतां नासिक जिल्ह्याचीच व त्यातील नासिक शहराचीच निवड या दृष्टीने होत राहील आणि त्यामुळे येथे येत्या पाच-दहा वर्षांत मध्यम [illegible] प्रमाणावर उद्योगधंदे सुरू होतील [illegible]

सर्व परिस्थिति अनुकूल असूनसुद्धा आम्ही आमचा औद्योगिक विकास साधू शकत नाही यांत दोष आमचाच आहे. कारण नासिकवासी जन आत्मसंतुष्ट आहेत. कदाचित् हा अवगुण नासिक हें तीर्थक्षेत्र असल्यामुळें आमच्यात राहिला असेल. तेव्हां आळस झाडून आपण कामाला लागण्यास हवे. त्याप्रमाणे आपण प्रयत्नशील होत आहोत ही समाधानाची गोष्ट आहे.

नासिक जिल्ह्यात राजकीय, सामाजिक व औद्योगिक या सर्व क्षेत्रांत दिसलेला हा आत्मसंतुष्टपणाचा अवगुण जितक्या लौकर जाईल तितक्या लौकर आपला विकास सुयोग्य घडू शकेल. नासिकच्या जवळचा आदिवासी तर लंगोटीवर खुष आहे. शेतकरी कष्ट करून पोट भरतो आणि पाठ शेकतो पण तक्रार करीत नाही. तरी आपण सगळ्यांनी आहे त्यापेक्षा जास्त मिळविण्यासाठी विशेष प्रयत्नशील व उपक्रमशील बनल्याशिवाय आपली प्रगति होणार नाही. सर्व सामाजिक, राजकीय व शैक्षणिक कार्यकर्त्यांत ही वृत्ति वाढली पाहिजे म्हणजे विकास लांब नाही असे मला वाटते.



दूरवरच्या ठिकाणीहि नासिकच्या द्राक्षानीं आपलें वेगळें असें स्थान निर्माण करून ठेविलें आहे. असें आगळें महत्त्व द्राक्षाच्या बाबतीत इतर कोणत्याहि विभागानें भारतीय पातळीवर अद्याप मिळविलेलें नाही. आज आपल्या नासिकच्या द्राक्षाच्या लागवडीखालील क्षेत्रांत ९० टक्के क्षेत्र भोकरीखालींच आहे. सबंध महाराष्ट्रांत द्राक्ष लागवडीखालील क्षेत्रात आपला जिल्हा अग्रेसर असून संशोधन केंद्र मात्र पुण्याला आहे. या संशोधन केंद्रावर सिलेक्शन ९४ व नंतर सिलेक्शन ७ या नवीन जातीचा शोध लागल्याचा सुगावा नासिकला अगदीं पहिल्या प्रथम क्रॉफर्ड मार्केटमध्ये जेव्हां या जातीचीं द्राक्षें विक्रीसाठीं आली तेव्हां लागला. त्यामुळे येथील शेतकरी त्यांच्या डोळ्यांसमोर असलेल्या जातीचीच जोपासना करण्यात गुरफटला होता. नासिककरात द्राक्ष लागवडीची हिंमत उपजतच आहे आणि अधिक उत्पादनाची जिद्द ही तर आजची इज्जत आहे. द्राक्ष संशोधनाचें केंद्र नासिकला स्थापन करण्याबद्दल जरूर प्रयत्न व्हावा. त्याचबरोबर येथे कृत्रिम रेशीम उत्पादनाच्या शक्यतेच्या दृष्टीनेहि कितपत अनुकूलता आहे याची पहाणी व्हावी. या धंद्याच्या वाढीस येथें बराच वाव आहे असें वाटतें.

नासिकचें वाढतें महत्त्व लक्षांत घेऊन महाराष्ट्र सरकारनें नासिकला प्रवासी केंद्र (टुरिस्ट सेंटर) सुरू करावें. कारण नासिक व नासिकच्या आसपासचा परिसर प्रेक्षणीय स्थळांचा व उत्तम हवेचा आहे. तसेंच धार्मिक, ऐतिहासिक, राजकीय व शैक्षणिक बाबतींत असणारें नासिकचें महत्त्वहि कमी नाही. भारतांतीलच नव्हे तर परदेशचेहि लोक नासिकला भेट देण्यास येत असतात. नवीन होत असलेला मिग विमानाचा कारखाना व प्रसिद्ध पावूं लागलेल्या द्राक्षाच्या आदर्श बागा याकडेहि प्रवासी आकर्षित होऊं लागले आहेत.

सध्याची सर्व परिस्थिति लक्षात घेतां या भागास विशेष उत्तेजन मिळावें असे उद्योगधंदे म्हणजे स्टेनलेस स्टील व अॅल्युमिनियम इंडस्ट्री, वुड–सीझनिंग प्लॅन्ट व हार्ड बोर्डाचें उत्पादन केंद्र तसेंच डायरेक्टोरेट ऑफ इंडस्ट्रीज यांनीं केलेल्या मास्टर प्लॅनप्रमाणें स्ट्रक्चरल इंजीनियरिंग इंडस्ट्रीज, स्ट्रक्चरल फॅब्रिकेशन, स्टील रीरोलिंग मिल, वायर ड्रॉइंग प्लँटसारखे उद्योगधंदे प्रस्थापित होण्यास नासिकचा परिसर अधिक अनुकूल आहे. परंतु केवळ नासिकरोडला स्टील यार्ड नाहीं म्हणून कांहीं प्रगति झालेली नाहीं. तेव्हां शासनानें नासिकरोडला स्टील यार्ड स्थापन करणें आवश्यक आहे. यांशिवाय येथील आल्हाददायक हवा, स्वस्त जमीन, पुरेसा पाणी–पुरवठा, सुलभ दळणवळणाचीं साधनें यांमुळें बाहेरच्या मोठ्या उद्योगपतींना नाशकास येऊन उद्योगधंदे काढण्यास प्रवृत्त केलें पाहिजे. रशियन, स्विस मंडळींनीं येथें येऊन त्या दृष्टीनें पाहणी केल्याचें कळतें. परंतु केवळ वीज नाही तर कोठें पाण्याची अडचण म्हणून या उद्योगपतींना आपल्या कल्पना येथें मूर्त करतां आल्या नाहीत.

नासिक शहराची सर्वंकष आणि सखोल भौगोलिक व औद्योगिक पहाणी होणें जरूर वाटतें. यादृष्टीनें सरकारी पातळीवर जास्तीत जास्त वेगानें चक्र फिरल्यास नासिक औद्योगीकरणाच्या मार्गावर नजिकच्या भविष्यांत जोरानें घोडदौड करूं शकेल व जिल्ह्याच्या आणि राज्याच्या सर्वतोपरी हातभार लावूं शकेल असा आत्मविश्वास वाटतो. या लेखाच्या शेवटीं दोन तक्ते जोडले आहेत त्यावरून भवितव्यांत नासिक शहराच्या औद्योगीकरणाचा मार्ग दृष्टिक्षेपांत आणतां येईल. आज जर कशाची जरुरी असेल तर वाजवी धोका पत्करून नव्या दृष्टीनें व दूरगामी विचारानें प्रयत्नशील होण्याची. भांडवल, तांत्रिक ज्ञान व कच्चा माल याची मग उणीव भासणार नाही.

ओझरला मिग विमान कारखान्याखाली ज्यांनी जमीन गेली त्यांनीसुद्धां नव्या दृष्टीनें नव्या उद्योगाकडे वळलें पाहिजे. जमीन गेल्यामुळे निराधार झालेल्या लोकांनी सहकारी सोसा-

फायनॅन्शिअल कॉर्पोरेशन, स्टेट बँक किंवा इतर बँका यांच्याकडून लहान उद्योगधंद्यांना खेळत्या भांडवलासाठी लागणारे कर्ज फॅक्टरी-टाईप बेसीसवर मिळविता येईल का याचा विचार करावा. त्याचप्रमाणे राईसमिल, आईल-मिल यानाहि मदतीस पात्र ठरविता येईल का ते पहावें. तांत्रिक मार्गदर्शनाखेरीज, औद्योगी-करणाची वाटचाल, कुशल तज्ञ व कारागीर यांच्याशिवाय अशक्यच आहे. त्यादृष्टीने जिल्ह्यात १५ ऑगस्ट १९६० ला स्थापन झालेली औद्योगिक प्रशिक्षण संस्था चांगले कार्य बजा-वित आहे. या संस्थेत अद्ययावत यंत्रसामग्रीने सुसज्ज अशी वर्कशाप्स आहेत. त्यामुळे सर्व आधुनिक यांत्रिक पद्धतींचें ज्ञान विद्यार्थ्यांस प्राप्त होतें. येथील प्रत्येक कोर्स दोन वर्षांचा असून लोहारकाम, फिटर, इलेक्ट्रिशियन ड्राफ्टस्मन, टर्नर, वेल्डर व मोल्डर अशा व्यव-सायाचे प्रशिक्षण येथे मिळतें. तथापि नाशिक शह-रास आजच्या वाढत्या औद्योगीकरणाच्या दृष्टीने एका पॉलिटेक्नीची अत्यंत आवश्यकता आहे असे मला वाटतें. औद्योगिक वसाहतीसमोर २० एकर जागा या संस्थेने घेतली असून तेथे (इमारती) उभारण्याच्या कामास सुरुवात झाली आहे.

नाशिक जिल्ह्यात नाशिक, मालेगाव, मनमाड, इगतपुरी आणि येवला या ठिकाणी औद्योगिक वसाहतींची स्थापना करण्याचे ठरविले असून तिसऱ्या योजनेत नाशिक व मालेगाव या ठिकाणी अशा वसाहती स्थापण्याचे कार्य सुरु झाले आहे. या वसाहती सहकारी पद्धतीवर उभारल्या जात असून त्यामधून लहानलहान उद्योगधंद्यांकरता जागा, पाणी वीज, शेड अशा प्राथमिक गरजा पुरविल्या जातील. नाशिकच्या औद्योगिक वसाहतीकरता सहकारी संस्था रजि-स्टर झाली असून नाशिक-त्र्यंबक रस्त्यावर नाशिकपासून अर्धा मैलावर सातपूरजवळ जागाहि निश्चित झाली आहे आणि यातील नेअर-सेल्फ उद्योगनगरीसाठी जेरू ठरविण्याचे काम सुरू झाले आहे. मुंबई या औद्योगिक

कार्पोरेशनने नाशिक-त्र्यंबक रस्त्यावरील नाशिक-पासून ४ मैलावर सातपूर खेड्यांत १,२००० एकर जागा औद्योगिक विकासासाठी उपलब्ध करण्याचे योजले आहे. या ठिकाणी मोठ्या मध्यम व लहान उद्योगधंद्यांची स्थापना कॉर्पो-रेशनच्या जागेच्या हद्दीतच नाशिकची औद्योगिक वसाहत म्हणून झाली आहे. या कारखान्यांत इंजीनिअरिंग इंडस्ट्रिज् ८, रबर इंडस्ट्रीज् ३, शेतीविषयक उद्योगधंदे ५, रासायनिक व औषध-विषयक २ व इतर १, असे उद्योगधंदे आहेत. त्यामध्ये होणारी गुंतवणूक रुपये १२ लाख होईल असा अंदाज आहे. ही औद्योगिक वसाहत लौकरच चांगले बाळसे धरणार अशी सुचिन्हे आज दिसत आहेत ही आनंदाची गोष्ट आहे.

नाशिक शहरांत १२०० चात्या असणारी स्पिनिंग मिल सुरू करण्यास आवश्यक असा परवाना केंद्र सरकारनें दिला आहे. या कार-खान्यासाठी प्राथमिक स्वरूपात जी संस्था निर्माण करण्यात आली तिचे चीफ प्रमोटर आमदार श्री. वसंतराव नाईक हे असून कार्यवाह श्री. सुमतिलाल चंदुलाल शहा हे आहेत.

सरकारनें जी परवानगी दिली ती सहकारी संस्थेमार्फत हा कारखाना सुरू केला पाहिजे अशा अटीवर दिली आहे. वैयक्तिक नागरिकाला स्वतःच्या भांडवलावर या परवान्याने हा कार-खाना काढता येणार नाही. या योजनेस ३५ लाख रुपये लागणार असून त्यापैकी २० टक्के शेअर्समधून, २० टक्के भांडवल सरकारकडून व ६० टक्के भांडवल कर्जरूपाने फायनान्स कॉर्पो-रेशन आणि आयुर्विमा मंडळ यांच्याकडून दिले जाणार आहे. या कारखान्यांत किमान ३०० कामगार काम करतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

कांहीं विधायक सूचना

आज द्राक्षे म्हटली की नाशिकचे नाव डोळ्या-पुढे येते. त्याच्या जोडीला गाजर टमाटो या पिकाची ख्याति झालेली आहे. केवळ आसपासच नव्हे तर कलकत्ता, दिल्ली, आग्रा, काशी व लखनौ या

मिग विमानाच्या कारखान्यांत नोकऱ्याहि देण्यांत येणार आहेत.

योजनाबद्ध विकासाचा शोध

नाशिक शहरांतील चालू औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें जमीन, पाणी, वीज, कच्चा माल, यंत्रसामग्री, आर्थिक साहाय्य, तांत्रिक मार्गदर्शन, बाजारपेठ आणि उद्योगवाढीस वाव व शक्यता या दृष्टीनेंच सर्वांगीण विचार होणें इष्ट आहे.

जमिनीबाबत म्हणजे औद्योगिक विकास कॉर्पोरेशनच्या हद्दीतच सरकारकडून जागा मिळाली असल्यानें हा प्रश्न सुटला आहे. ही जागा सध्यां पुरेशी असून पुढे १०० शेअर-होल्डर्सना वाजवी या दृष्टीने किमान २५० एकर जागा सभासदांसाठी राखून ठेवण्याचे आश्वासन मिळालें आहे ही आनंदाची गोष्ट आहे.

पाणी व वीज यांचा योग्य प्रमाणात पुरवठा न झाल्याने आजपर्यंत नासिकला एकहि मोठ्या प्रमाणावरील कोणतेंहि इंडस्ट्रिअल युनिट स्थापन होऊं शकलें नाही. पाणी–पुरवठ्याच्या बाबतींत सरकारनें स्वतंत्र योजना आंखली असून ती या वर्षाअखेरीपर्यंत पूर्ण करण्याचें आश्वासन मिळालें आहे. गंगापूर जवळील गोदावरी नदीत पंपिंग सेट बसवून औद्योगिक वसाहतीत उंच टेकडीवर पाण्याचा सांठा करण्यांत येणार आहे. यासाठीं लागणारी वीज महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्डानें ताबडतोब देण्याचें ठरविलें आहे. यासाठीं लागणाऱ्या जागा ताब्यांत घेण्यांत आल्या आहेत. वीज–पुरवठा ही तर आमच्या औद्योगिक प्रगतीतील प्रमुख अडचण आहे. प्रायव्हेट इलेक्ट्रिक सप्लाय कंपनीतर्फे नासिकला वीज–पुरवठा होतो आहे आणि तो अत्यंत अनियमित व अपुरा आहे.

सिक्युरिटी प्रेस येथें आहे पण त्यासाठी लागणारा कागद हुशंगाबादहून येतो. कारण तसा कागद तयार करण्यास लागणारें पाणी व वीज–पुरवठा आम्ही देऊं शकलेलों नाही. तेव्हां महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिसिटी बोर्डातून किंवा कापना योजनेतून पुरेशी वीज या शहरांत त्वरित येण्याची सोय करावी. या दृष्टीने आनंदाची घटना म्हणजे एकलहरे येथील थर्मल स्टेशन योजना व महाराष्ट्र राज्य विद्युत् मंडळाचें सहकार्य मिळण्याचें सुचिन्ह. नासिकजवळ २८० मेगावॅटचे थर्मल स्टेशन उभारण्यास नियोजन मंडळाने तत्वतः मान्यता दिली आहे. या कामाचा अंदाजे खर्च २,३०० लक्ष रुपये आहे. या कामाच्या पहिल्या सेटचें काम ६४ एप्रिलमध्ये सुरू होऊन ६८ अखेर संपेल व दुसऱ्या सेटचें काम १९६९ फेब्रुवारीत संपेल असा अंदाज आहे. हें थर्मल स्टेशन महाराष्ट्रांत नव्यानें सुरू होणाऱ्या सर्व थर्मल स्टेशनांमध्यें सर्वांत मोठें होणार आहे. त्यांतून सुरुवातीस ६० हजार किलोवॅट वीज निर्माण होईल व स्टेशन पूर्ण झाल्यावर त्यांतून ३ लक्ष २० हजार किलोवॅट वीज निर्माण केली जाणार आहे.

त्याचप्रमाणें वैतरणा अप्पर ही योजना फारच निकडीनें सरकारनें हाती घेतली आहे. कारण तीमुळेच मुंबई शहरास पाणीपुरवठा व नासिक जिल्ह्यास वीज–पुरवठा असें दुहेरी फायदे साधणार आहेत. वरील दोन्ही योजना कार्यवाहित होताच नासिक शहरास व जिल्ह्यासहि वीजेचा प्रश्न रहाणार नाहीं.

कच्च्या मालाच्या पुरवठ्याबाबतीत एक दोन मुद्दे मांडणे अगत्याचें आहे. लोखंड व पोलादाचा पुरवठा याबाबत समाधानकारक परिस्थिति निर्माण करून घेण्यांत येणार आहे. कारण परमिट मिळालें म्हणजे माल मिळेलच असें नसतें. त्यामुळें औद्योगिक वसाहत सहकारी संस्थेला याची संस्थेकरतां एजन्सी देण्याबाबत विचार चालू आहे. विदर्भ, मराठवाडा व कोंकण या भागांना याबाबत असलेल्या विशेष सवलती मुंबई विभागांतील मुंबई शहराबाहेरच्या क्षेत्रास देण्याचा विचार व्हावा. यंत्रसामग्रीच्या-बाबतीत ती हायर परचेस पद्धतीने मिळवून देण्यास होणारा विलंब कसा टाळतां येईल तें पहावें. आर्थिक साहाय्याबाबतीत उद्योगपति,

ही नावे फार परिचित असून आतां नवीन चिवडाहि लोकप्रिय झालेला आहे.

जुन्या नाशकात विणकर समाज आहे व विणकर कारागीराची अेक सोसायटीहि पण आहे. हातमागावर कापड विणण्याचा धंदा गेली कित्येक वर्षे चालू आहे.

खादीची भाडीं व नक्षीकाम केलेले जिन्नस मोठ्या प्रमाणावर मशीनच्या साहाय्यानें व हस्तकलेच्या साहाय्यानें नासिक येथे सध्या होतात.

नासिकची चादी ही १ल्या प्रतीची मानली जाते तिची अेक वेगळीच प्रत आहे. येथील वैशंपायन सराफ हे पिढीजात या व्यवसायात नांव टिकवून आहेत त्यांच्या शिवाय टकले व यू. पिंगळे, वसंतसा अँड कंपनी यांचाहि हा धंदा मोठ्या प्रमाणावर चालतो. शुद्ध चादीचा माल तयार करून दूरवरच्या शहरीं पाठवून बाजारपेठ मिळविल्या-मुळे या धंद्यात नासिकचे नाव फार पसरले आहे.

रसायनिक द्रव्यें व औषधींबाबतीत नासिक-रोडला बिटको वक्स यांचे ग्राईप वॉटर व टुथपेस्ट उत्पादन केंद्र सर्वात मोठे असून आता नायट्रीक अॅसिड निर्माण करण्याचा कारखाना जर्मन मदतीच्या जोरावर नासिकरोडला स्थापन झाला आहे. आयुर्वेदिक औषधींच्या निर्मितीची तीन चार केंद्रे नासिकला आहेत. यांखेरीज कपडे धुण्याचे साबण, हातानें बनवि-लेले कागद व पुठ्ठे, रबरी हातमोजे, ह्युम पाईप्स, सिमेंटचे जिन्नस ह्यांचे उत्पादन कर-णारी अनेक उद्योग केंद्रे या शहरात निर-निराळ्या ठिकाणी आहेत. देवळालीस अेका नव्याने स्थापन होणाऱ्या उद्योगधंद्यास अम्मी-मीटर व इतर विजेची उपकरणे निर्माण कर-ण्याच्या केंद्रास औद्योगिक परवाना नुकताच मिळाला आहे असे वाटते.

औद्योगिक व्यवसाय म्हणून नाशकांत प्रेस व सिनेमागृहे याबद्दल लिहिणें जरूर आहे नाशकात आज जवळ जवळ ४० प्रेस असून साप्ताहिक, दैनिक मासिके वगैरे छपाई गावकरीतच होते. नाशकांत 'गावकरी' हा महत्त्वाचा छापखाना असून त्याची १९३२ पासून अेकसारखी वाढ होत आहे. त्याच्या बरोबर फोनेक्स, मर्कल प्रेस, विज्ञान प्रेस हीहि नावे घेण्याजोगी छपाई कारखानदारी प्रगतीच्या वाटेवर आहे. शहरांत अेकूण ८ सिनेमागृहे असून त्यापैकी दामुसेठ चंदले यांची दोन 'मधुकर' व 'विजयानंद' रावसाहेब ओकांची. 'मर्कल' व 'विकास' ही प्रभात चित्रमंदिर हेमलता या थिएटरप्रमाणेच सर्वप्रिय आहेत नासिकच्या वाढत्या लोकवस्तीत करमणुकीची प्रमुख केंद्रें म्हणून या धंद्यांचे महत्व असून सिनेमा-गृह अद्ययावत् करण्याचे प्रयत्न चालू आहेत. औद्योगीकरणाच्या वाटचालीत नाशिकजवळील ओझर गावी सुरु होणाऱ्या मिग कारखान्याचाहि उल्लेख केला पाहिजे रशियन मदतीने सुरु होणारा हा विमानाचा सांगाडा तयार कर-ण्याचा कारखाना येथे १९६३ ला स्थापन कर-ण्याचे मध्यवर्ती सरकारने ठरविले त्याप्रमाणे कार्य सुरु झाले असून ह्या कारखान्यात दहा हजार मजूर गुंतविण्यात येतील असे कळते भारतातील तीन विमान कारखान्यांपैकी हा अेक अत्यंत महत्त्वाचा कारखाना असून यामुळे नाशिकच्या औद्योगिक महत्त्वात विशेष भर पडणार आहे.

मिग विमानाच्या कारखान्यासाठी जानोरी, आंबे, ओझर मोहाडी वगैरे गांवातील अंदाजे सात हजार अेकर जमीन सरकारने ताब्यात घेतली आहे त्यानंतर जमिनीच्या किंमती ठर-विण्यांत आल्या असून ज्या मालकांनी पैशाची मागणी केली त्यांना तातडीने रकमा अदा करण्यांत आल्या आहेत. त्याचप्रमाणे औद्योगिक शिक्षणकेंद्रात विनामूल्य शिक्षण देण्यात येणार आहे. तसेच योग्य अशा मुलांची यादी करण्याचे काम जवळजवळ पूर्ण करण्यांत आले आहे औद्योगिक शाळेतील शिक्षण पूर्ण झाल्यानंतर या मुलाना नासिकरोड येथील तांत्रिक शिक्षण केंद्रात मिग विमानाच्या तांत्रिक अभ्यासासाठी प्रवेश देण्यात येणार आहे. त्यानंतर या मुलांना

मुंबईपासून ११५ मैलांवर व मुंबई—आग्रा या राजमार्गावर असले आहे. मुंबई पुणें ही औद्योगिक केंद्रे ८ तासांच्या रस्त्यावर आहेत. रोज सुमारें २,००० ट्रक्सची वाहतूक या शहरांतून होत असते. मोटार वाहतूक फारच सोयीस्कर ठरली आहे. रेल्वे स्टेशन सेंट्रल रेल्वेवर असल्यानें तेही वाहतुकीस महत्वाची मदत करणारें आहे. आसपास मुबलक जमीन उपलब्ध आहे. तीपैकीच १,६०० एकर जागा सरकारनें आतां नासिक शहराच्या औद्योगीकरणास घेतलेली आहे. या विभागांत तौलनिक दृष्टया पाहतां मजुरीचे दरही स्वस्त आहेत. लागणारें भांडवलही उपलब्ध होऊं शकेल. विजेचा प्रश्नही लौकरच सुटेल अशी पावलें पडलेली दिसत आहेत. यामुळें आसपासच्या जंगलविभागावर व फळफळावळ भाजीपाला यांवर चालणारे अनेक उद्योगधंद्यांचें जाळें येथें निर्माण होण्यास अशा प्रकारें प्रभावी व अनुकूल अशी पार्श्वभूमि येथे आज तयार आहे. जवळच आदिवासी भाग असल्यानें त्यांना वर्षातून तीनचार महिने शेतीकाम संपल्यावर रोजगार मिळणें आवश्यक आहे. अशा स्तिथींत औद्योगिक विकासामुळें त्या लोकांना भरपूर रोजगार मिळणें शक्य होईल व त्यांच्या आर्थिक विकासास योग्य हातभार लागेल.

१९४८ च्या फॅक्टरी अॅक्टान्वये नोंदविल्या गेलेल्या या जिल्ह्यांतील एकूण ३१५ फॅक्टरीजपैकी नासिक शहरांत ५५ फॅक्टरीज असून इतर ९० लहान उद्योगधंद्यांचीं युनिट्स येथें आहेत. नासिक हे बऱ्याच काळापासून तांब्यापितळेच्या भांड्याकरितां प्रसिद्ध आहे. चार मोठ्या फाउंड्रीज असून तांबट लोकांची वस्ती भरपूर आहे. तपकिरे, काळे, आंबेकर ही घराणी पिढ्यान्‌पिढ्या या क्षेत्रांत बाजारांत प्रतिष्ठा टिकवून आहेत. रोजच्या वापरांत लागणारी सर्व भांडी येथे हातांनी तांब्यापितळी पत्र्यापासून घडविली जातात. गेल्या १५ वर्षांत या क्षेत्रांत मनसुखलाल नारायणदास यांनी यांत्रिकीकरणाच्या साहाय्यानें फार मोठा उद्योगधंदा उभारला आहे त्याचप्रमाणें सहकारी पद्धतीवर नव्या तांबट आळींत सर्व व्यवसायबंधूनी कंसारा युनियन स्थापन करून आपली कारखानदारी राखून धरली आहे.

सागाचें कापीव लाकूड तयार करण्यासाठीं जवळ जवळ ३० सॉ मिल्स असून त्या नासिक-रोड रस्त्यावर आहेत. विडी तयार करण्याच्या १० फॅक्टरीजमध्ये ५,००० हून कधिक कामगार काम करतात. विडी क्षेत्रांतील आद्य धंदा कै. भिकुसा यमासा यांनीच १९०७ साली नासिकला सुरू केला. येथें आज त्यांच्याकडे १,४०० चे वर मजूर काम करीत आहेत. तसेंच वस्तीराम नारायणदास, के. सी. तिवारी अॅंड सन्स, इस्माईल महमदखान, नरहर कोंडाजी, कावळे वगैरे इतर नांव घेण्याजोगे लहानमोठे कारखाने आहेत. नासिकला तंबाखू पिकत नसूनही विडीच्या क्षेत्रांत नासिकची कारखानदारी विशेष प्रतिष्ठेनें टिकून आहे ही महत्वाची गोष्ट आहे. सहकारी पद्धतीवर ७०० टन स्टोअरेज कपॅसिटीचें कोल्ड स्टोअरेज युनिट बांधण्याचें काम नाशिकला चालू आहे. नासिकरोडला नोटा, पोष्ट-कॉर्डस, तिकीटे छापण्याचा प्रेस असून त्यांत ६,००० कामगार काम करीत आहेत. याशिवाय मध्यवर्ती सरकारने आयोजित केलेला गांधीनगर येथील छापखाना व एक रुपयांच्या नोटांचा छापखाना ही वैशिष्टयें आहेत. नासिकचा सिक्युरिटी प्रेस हा आशियांतील पहिल्या नंबरचा प्रेस असून ब्रम्हदेशच्या नोटाही येथून छापून नेल्या जातात ही उल्लेख करण्यासारखी बाब आहे. मशीन रिपेअर्स व सर्व्हिसिंगसाठीं कांहीं मेकॅनिकल व अॉटो वर्कशॉप्स् येथें आहेत. मेट्रीक वजनमापें तयार करणाऱ्या ८ फौन्ड्रीज् आहेत. हिंद टाईल्स कृषि लिमिटेड, लक्ष्मी टाईल्स मॅन्यु. कंपनी ही नांव घेण्याजोगी टाईल्सची कारखानदारी नासकांत अलिकडेच वाढली आहे.

नासिकला दुसरा नांव घेण्याजोगा व्यवहार चिवड्याचा आहे. या क्षेत्रांत कोंडाजी व सकाजी

विनिमय केंद्रांची स्थापना

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळावधींत उद्योग विनिमय केंद्रांची वाढ करण्यात आली. १९५८ साली मार्च महिन्यांत नासिक येथे उद्योग विनिमय केंद्र उघडण्यात आलें. रोजगाराची मागणी व पुरवठा यांचा मेळ घालण्यासाठीं व उद्योगव्यवसाय मिळालेल्यांची आंकडेवारी गोळा करण्यासाठी या उद्योग विनिमय केन्द्रांतर्फे एम्प्लॉयमेंट मार्केट नावाची योजनाही सुरू करण्यात आली.

ग्रामीण विभागांतील बेकारीचा प्रश्न परिणामकारक रीत्या सोडविण्याच्या हेतुने घरगुती उद्योगधंद्यांना उत्तेजन देण्यांत आलें. कारागिरांच्या व धंदेवाईक सहकारी संस्थांच्या स्थापनेपासून छोट्या ग्रामीण उद्योगांची आर्थिक स्थिती बऱ्याच प्रमाणांत सुधारली यांत शंका नाही.

दुधाची योजना : डेअरी इंडस्ट्री

नाशिक शहराचा दुधाचा प्रश्न सोडविण्यासाठी पुणे योजनेसारखी अेक दूधयोजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत डिसेंबर १९६० पासून नासिक शहरांत सुरु करण्यांत आली. सध्यां ४० मण दूध रोज गोळा करून तें वांटण्यांत येते. नासिक शहराची गरज भागवून उरलेले दूध मुंबईच्या वरळी डेअरीकडे पाठविण्यात येते. ह्या योजनेमुळे वाजवी भावात शुद्ध व सकस दूध मिळतें तसेच यामुळें शेतकऱ्यांना चांगला जोडधंदा मिळाला असून दुधाचें उत्पादनही वाढत आहे

औद्योगिक वसाहतीची स्थापना

नासिक शहराच्या औद्योगिक विकासाच्या दृष्टीनें अेक महत्त्वाची घटना म्हणून गेल्या वर्षी येथें राज्याच्या उद्योगमंत्र्यांच्या हस्तें औद्योगिक वसाहतीच्या भूमिपूजनाचा कार्यक्रम समारंभपूर्वक झाला याचा उल्लेख करावा लागेल. नासिक शहराच्या औद्योगिक विकासासंबंधी विचार व चर्चा करण्यासाठीं माननीय मंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली त्यावेळी अेक परिसंवादही आयोजित होऊन शहराच्या व जिल्ह्याच्याही आर्थिक प्रगतीच्या मार्गावर अेक नवें पाऊल टाकलें गेलें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आली. कारण योजनाबद्ध आर्थिक विकासांत शेतीबरोबरच औद्योगिक व सामाजिक बाबींचाही विकास अभिप्रेत आहे. शेतीच्या दृष्टीनें नासिक शहर जरी पुष्कळ पुढारलेले असले तरी औद्योगिक विकासाच्या बाबतींत तें फारच मागासलेलें राहिलें आहे आणि गेल्या कांही वर्षांत पंचवार्षिक योजनेची दोन वर्षें या शहरानें यशस्वीरित्या पार पाडली असली तरी चालू तृतीय पंचवार्षिक योजनेंत आपल्या या नासिक शहरांत कांही उद्योगधंदे वसवून जिल्ह्याच्या विकासातील ही मोठी उणीव दूर करता येईल, याचा गंभीरपणें विचार करणे अतिशय इष्ट झालें आहे. नासिक शहरांत अशा औद्योगिक विकासाला लागणारी अनुकूल पार्श्वभूमि आहे ही वस्तुस्थिति सर्वमान्य आहे. तसेच येथील जनताही औद्योगिक क्षेत्रात भांडवल गुंतविण्यास फार उत्सुक आहे हेही निदर्शनास आलें आहे. अशी अनुकूल परिस्थिति असतांना व जनता भांडवल गुंतविण्यास तयार असतांनासुद्धां व्हावें तेवढें औद्योगीकरण होऊं शकलें नाहीं यास महत्वाचे कारण म्हणजे भांडवल गुंतवू इच्छिणारा जनता वर्ग व गुंतवणूक करण्यासंबंधींचे योग्य क्षेत्र यांचा संबंध व त्याबाबत मार्गदर्शन जनतेला आजपर्यंत होऊ शकलें नाही असे मला वाटते. त्यादृष्टीनें शहरांतील गेल्या अेक दीड वर्षांत टाकली गेलेली पावलें, भरविल्या गेलेल्या परिषदा व आयोजिलेले परिसंवाद शहराच्या व पर्यायाने जिल्ह्याच्या औद्योगिक विकासास चालना मिळण्याच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त ठरलेले असल्याचें दिसून येत आहे.

प्रचलित औद्योगिक विकासाचे विहंगमावलोकन

नासिकच्या परिसरात औद्योगिक विकासास आवश्यक पार्श्वभूमि आहे. नासिक शहर हें



द्राक्षें, द्राक्षें : हीं द्राक्ष फार गोड आहेत ह ! तें नासिककराना का मांगायला पाहिजे?



गांवकरी प्रेस



❖ विडी व्यवसाय : विडी व्यवसायानें पुरुषांबरोबर कित्येक महिलांना रोजगार पुरविला आणि अनेक ससारांना हातभार लागला.



❖ तांब्यापितळेची भांडी : नासिकचे तांब्याचे हंडे सर्व भारतात प्रसिद्ध. त्यांचीच घडणावळ चालू आहे

गावकरी प्रेस



चांदीवरील कोरीव काम : हलक्या हाताने चांदीवर फुलकळ्या आणि वेलपट्ट्या कोराव्यात नासिकच्याच चांदीकारागिरांनी. ❖

वल रु. २५,००० मिळालें आहे. जानेवारी १९६४अखेर संस्थेस निव्वळ नफा रु.२७,००० चा आहे. संस्थेचे व्यक्तिगत सभासद ३०० व सोसायटचा ६६ आहेत. शीतगृहासाठीं शेअर धारण करणाऱ्या २३ संस्था आहेत. या संस्थेची सरकारनें सहा लाख रुपयांची एक महत्त्वाची शीतगृहयोजना मंजूर केली असून सदर योजना आतां शीतगृहाच्या बांधकामरूपानें साकार झाली आहे. अमेरिकेंतून या शीतगृहासाठीं कांहीं खास यंत्रें मागविण्यांत आली आहेत. तीं बसवून झालीं म्हणजे एप्रिल १९६४ मध्ये ह्या शीतगृहाचा उपयोग करण्यास सुरुवात होईल.

गंगापूर धरणामुळें विकासास हातभार

दुसऱ्या महायुद्धानंतर गुळाला व साखरेला जास्त मागणी होऊं लागल्यामुळें सध्यां असलेल्या गोदावरीवरील जुन्या कालव्यांतील पाण्यासाठीं ऊंसाकरितां अधिक मागणी होऊं लागली. त्यामुळें उपलब्ध असलेला पाण्याचा सांठा कमी पडूं लागला व आणखी सांठा वाढविण्यासाठीं निरनिराळ्या योजनांची पहाणी करण्यांत आली. शेवटीं गोदावरी व काश्यपी यांच्या संगमाच्याखालीं धरणाची जागा कायम करून १९४९–५० मध्यें प्रत्यक्ष कामास सुरुवात झाली. या धरणाचें काम १९५४ साली पूर्ण झालें व त्यानंतर दोन्ही बाजूच्या म्हणजे उजव्या व डाव्या कालव्यांचें काम हातीं घेण्यांत आलें. डाव्या बाजूचा कालवा बराचसा पूर्ण झाल्यावर त्यांतून ऑक्टोबर १९५४ पासून रब्बी पिकांना पाणी देण्यास सुरुवात करण्यांत आली. त्यावेळेपासून या कालव्यांतून दरवर्षी सुमारें २० हजार एकर क्षेत्राला पाणी देण्यांत येते.

आतां १९६१ सालांपासून धरणाचा सांठा पंचावन्नशें दशलक्ष घनफूटांपासून सातहजार दोनशें दशलक्ष घनफुटापर्यंत वाढविण्यासाठीं गंगापूर तलावाच्या सांडीवरती सिमेंट कॉंक्रीटचा पूल बांधण्याचें काम जोमानें सुरू झालें आहे. त्यावर नवीन पद्धतीचे टेंटेर दरवाजे बसविण्यांत येतील. हें काम पूर्ण झाल्यावर साधारणपणें दोन्ही कालव्यांवर मिळून ४४,००० एकर क्षेत्र पाण्याखालीं भिजूं शकेल.

सांडीवरील कॉंक्रीटच्या पुलाचे दरवाजे बसविण्याचें काम झाल्यावर नासिकच्या डाव्या कालव्यावर बारमाही पिकांच्या म्हणजे ऊंस, घांस, फळबाग अशा शेतीच्या पिकांच्या लागवडीस परवानगी देण्यांत येईल. त्याचा नासिक व निफाड तालुक्यांच्या आर्थिक परिस्थितीवर अनुकूल परिणाम झाल्याशिवाय राहाणार नाहीं.

रस्ता वाहतुकीचा विकास

नासिक शहराच्या गजबजलेल्या भागांतून जाणारा मुंबई–आग्रा रस्ता नासिक शहराच्या बाहेरून नेण्याचें काम पूर्ण झालें आहे. मुंबई–आग्रा रोड व नासिक-पुणे रोड हे दोन राष्ट्रीय मार्ग सुधारण्याचें काम पंचवार्षिक योजनेंत झालें. दुसऱ्या योजनेनें नासिकच्यापुढें खानदेशाच्या बाजूस मुम्बई-आग्रारोड हा दोन फुटांनीं रुंद करण्यांत आला. त्या रस्त्यावरील डांबरी पट्ट्यांची रुंदी दहा फुटांवरून बारा फुटांवर नेण्यांत आली. त्याचप्रमाणें नासिक-पुणें रस्त्याची रूंदी ३२ फूटांपर्यंत सर्वत्र वाढविण्यांत आली. नासर्डी नदीवरील व नासिक रोड रेल्वे स्टेशनवरील मध्यपूल पूर्ण करण्यांत आले.

१ अेप्रिल १९५० पासून स्टेट ट्रान्सपोर्टचा नाशिक विभाग सुरू झाला. या वाहतूक व्यवस्थेची जिल्ह्यांत झपाट्यानें प्रगति झाली. पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या अखेर ३४९९ मैल लांबीचे मार्ग स्टेट ट्रान्स्पोर्टकडे आले असून रोज सुमारें ३,५०,००० प्रवासी अेस्. टी. गाड्यांतून सुखानें प्रवास करतात. वाहनांच्या दुरुस्तीसाठीं ७ डेपो व १ वर्कशॉप उघडण्यांत आलें. प्रवाशांच्या सोयीसाठीं आधुनिक पद्धतीच्या शेड्स जिल्ह्यांत बऱ्याच ठिकाणीं बांधण्यांत आल्या. आज महाराष्ट्रांत सर्वात मोठा डेपो नासिकचा असून येथें ८० गाड्यांची सोय आहे.

कारी बँका काढण्यांत याव्या हा विचारप्रवाह नासिकच्या विचारवंतांत येऊं लागला यांतूनच १९५५ सालीं नासिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची स्थापना झाली व तिचें धुरीणत्व सहकार-महर्षि कै. कर्मवीर भाऊसाहेब हिरे व कै. दादासाहेब पुराणिक यांच्याकडे आलें. तेही वरील विचारसरणीशी सहमत होते. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचें आर्थिक साहाय्य व मदत यामुळे सन १९५९ ते ६३ या केवळ तीनच वर्षांत जिल्ह्यांत अनेक व्यापारी पेठांच्या गावीं नवीन १४ व्यापारी सहकारी बँकांची स्थापना झाली. आज जिल्ह्यांत ह्या बँकांची संख्या १८ आहे.

व्यापारी सहकारी बँकांचें भांडवल व निधि १९४६ सालीं [illegible],३१ लाख होते ते ६३ अखेर [illegible] १५·१० लाख झालें. या रु. [illegible] लाख वाढीपैकीं रु. ५·३१ लाखाची वाढ गेल्या दीड वर्षांतच झालेली आहे. वाढतें भागभांडवल व निधि हे वाढत्या स्थैर्याचें द्योतक आहेत. १९५८ सालीं रु. ७·०४ लाखांच्या ठेवी होत्या. त्या ६३ अखेर ३८·०० लाखांवर गेल्या आहेत. ह्या रु. ३०·९६ लाख वाढीपैकी रु. १८·[illegible] लाखांची वाढ तर केवळ गेल्या दीड वर्षांतच झालेली आहे. स्थानिक भांडवल जमवून तें स्थानिक व्यापाऱ्यांच्या वाणिज्यासाठी उपयोगांत आणण्याच्या प्रयत्नांना वाढतें यश येत आहे व स्थानिक भांडवलाचा स्थानिक शेती, व्यापार व उद्योग वाढविण्याकडे उपयोग होत आहे. शेती-व्यवसायाचें उत्पादन वाढविण्यासाठीं जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक अधिकाधिक कर्जवाटप करीत आहे. ५९ सालीं बँकेनें या कार्यासाठीं १ कोटी ८५ हजार रुपये कर्ज दिलें होतें तर ६३ सालीं हें कर्ज-वांटप ४ कोटी ९७ हजारापर्यंत वाढविण्यांत आलें आहे. शेती-उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून बँकेनें चलनरूपानें कर्जवाटप केलेंच आहे त्याचप्रमाणें कीटकनाशकें, एंजिन, सरकी [illegible] प्रकारची बी-बियाणें शेतीची अवजारें आदि स्तें यासाठींही कर्जवांटप केलें आहे. कर्जाची फेड कर्ज घेणाऱ्यांना सोयीस्कर व्हावी म्हणून बँकेनें कर्ज फेडीच्या अखेरच्या मुदती हंगामाच्या सोयीनुसार ठेवण्याची नवीन पद्धत कार्यवाहीत आणली आहे. खरेदी-विक्री संघाचें कार्य अधिक चांगलें आणि परिणामकारक व्हावें म्हणून बँकेनें मालाच्या तारणावर अल्प व्याज घेऊन कर्ज देण्याचीही योजना कार्यवाहीत आणली आहे. दुभती जनावरें विकत घेण्यासाठी कर्ज देण्याची नवीन पद्धत अंमलात आणली गेली आहे. त्यांशिवाय ग्रामीण विभागांतील जीवन अधिकाधिक स्वावलंबी आणि समृद्ध व्हावें म्हणून सुतार, लोहार, चांभार, विणकर वगैरे कारागिरांना कर्ज पुरविण्याची एक योजना कार्यवाहीत आणली आहे.

कांदा बटाटा उत्पादक सहकारी संस्थेचें कार्य

सहकारी संस्थांमध्ये नासिकची कांदा [illegible] उत्पादक सहकारी संघ ही संस्था अनेक [illegible] कांदा निर्यातीत ह्या संस्थेचा अखिल भारतात पहिला क्रमांक लागतो. नासिक जिल्हा कांदा बटाटा उत्पादक सहकारी संघ ही संस्था १९५[illegible] मध्यें रजिस्टर झाली. नासिक जिल्ह्यांतील शेतकरी बांधवांना निर्भेळ व उत्तम प्रतीचें बटाटा-बियाणें [illegible] उपलब्ध करून देणें या हेतूनें १९५[illegible] पूर्वी बटाटा-[illegible] [illegible] अनेक समस्या [illegible] आली होती. [illegible] बटाटा-बियाणें [illegible] अन्य वस्तू-सुद्धा शेतकऱ्यास अल्प दरानें उपलब्ध करून द्याव्यांत या हेतूने सदर संस्था १९४८ मध्ये सहकारी कायद्याखालीं रजिस्टर झाल्यापासून १९५४ ते १९५८ या मुदतीत संस्थेनें निर्भेळ बटाटा-बियाणें पुरविणें व उत्तम प्रतीचीं [illegible] तयार करणें, या कामांशिवाय फार मोठ्या प्रमाणावर परदेशी व्यवहार [illegible] सन [illegible] संस्थेनें आपल्या जिल्ह्यातील कांदा [illegible] [illegible] व पेनांग [illegible] [illegible] [illegible] ३०० [illegible]

मोठ्या शहराऐवजीं खेड्याकडे आपलें लक्ष केंद्रित केलें आणि विमाक्षेत्रांत मानाचें स्थान प्राप्त करून घेतलें. या विमा कंपनीला डॉ. पंजाबराव देशमुख व श्री. स. का. पाटील यांच्यामार्फत अखिल भारतीय कीर्तीचे पुढारी संचालक मंडळाचे अध्यक्ष म्हणून लाभले. १९४९ साली नासिक शहरांत कलेक्टर कचेरीच्या शेजारी सह्याद्रीनें आपल्या मुख्य कचेरीसाठीं जागा व सर्व सोयींनीं युक्त अशा इमारती मिळविल्या. त्याच इमारतीत आतां आयुर्विमा कॉर्पोरेशनची विभाग कचेरी थाटलेली आहे. १९५६ साली भारतांतील सर्वत्र आयुर्विमा कंपन्याप्रमाणें सह्याद्रीचेदेखील त्या कॉर्पोरेशनमध्यें विलीनीकरण झालें आणि म्हणूनच नासिक शहरांतील आयुर्विमा कॉर्पोरेशनची विभाग कचेरी ही सह्याद्रि विमा कंपनीचीच परिणति होय.

आयुर्वेद कारखान्याची स्थापना

श्री. सौन्दणकर व श्री. जोशी याच द्वयीनें विमा कंपनीच्या पाठोपाठ दि सेवा फार्मसी लिमिटेड या आयुर्वेदिक कारखान्याची सन १९४८ साली स्थापना केली आणि आणखी एका नव्या औद्योगिक क्षेत्रात प्रवेश केला. या औषधी कारखान्यांत सर्व प्रकारचीं शास्त्रोक्त औषधें आज तयार होत असून रत्नागिरि, कुलाबा, नगर, मराठवाडा, चांदा, अमरावती, यवतमाळ अित्यादि जिल्ह्यात आपल्या औषधांचा प्रसार वाढविला आहे हा कारखाना प्रगतीची वाटचाल करीत आहे.

बॅकींग क्षेत्रांतील कामगिरी

अलीकडील ज्या व्यापारी व औद्योगिक हालचालींमुळें नासिक शहराचें महत्व तें फक्त एक क्षेत्र आहे एवढेंच मर्यादित नसून, व्यापार, छोटे छोटे उद्योगधंदे ह्यांच्या वाढीसाठी असणारें अमाप कार्यक्षेत्र यामध्येंहि सामावलें आहे असे वाटतें. त्यांत बॅकींग क्षेत्रांतील प्रगतीचा उल्लेख करण्यास हवा. ज्या काळीं सहकारी चळवळीला राजाश्रय नव्हता व समाजालाहि सहकारी चळवळीविषयीं विशेष माहिती नव्हती, अशा काळांत त्या वेळच्या ज्या समाजधुरीणांनीं दूरदृष्टीनें एक व्यापारी सहकारी बँक स्थापन करून ती चालू ठेवण्यांत विशेष आत्मीयता व कळकळ व्यक्त केली त्या सर्वांस धन्यवाद देणें आवश्यक आहे. अशा संस्थापकांत सर्वश्री कै. मनाजी दगडुजी कांवळे, कै. विष्णुशास्त्री केळकर. कै. तुळशीदास लवजी, कै. बुधमलशेट निमाणी, कै. केशवराव परांजपे, कै. भाऊसाहेब आकुत, कै. रावबहादुर घुमाळ, कै. नानासाहेब गायधनी, श्री. भय्यासाहेब पांडे, श्री. चांदमलशेट ब्रम्हेचा, श्री. धन्नालालशेट अग्रवाल, श्री. काशिनाथ नारायण केतकर वकील, श्री. शंकर नारायण रानडे अित्यादि मंडळींचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. शहरामध्यें आज होत असलेल्या व्यापाराची व्याप्ति पहातां व्यापार व उद्योगधंदे ह्यांची सूत्रबद्ध वृद्धि करण्यासाठीं स्थानिक व्यापारी बंधुनीं अलीकडे प्रयत्न करणें सुरू केलें आहे. शहरामध्यें मोठमोठ्या जॉअिंट स्टॉक बँन्का या कार्याची पूर्तता करण्यासाठीं बरेच दिवस कार्य करीत आहेत, तथापि व्यापारी वर्गास सहकाराच्या छायेखालीं आणून त्यांची स्वतःची संस्था स्थापून त्यांना स्वतःचा फायदा करून देण्याच्या कामीं पुढाकार घेण्याचें कार्य मात्र १९५९ पर्यंत बाकी राहिलेलें होतें. तें कार्य व्यापारी सहकारी बँकेनें उत्तम प्रकारें पार पाडून शहराच्या आर्थिक व व्यापारी विकासास फार मोठा हातभार लावला आहे.

नासिक-सहकारी बँकेचें कार्य


नासिक येथें ४० वर्षापूर्वी नगरवासियांच्या आर्थिक गरजा भागविण्याच्या हेतूनेंच एक सहकारी बँक सुरू करण्यांत आली. सहकारी शक्तीची जाणीव व्यापारी वर्गास व सहकारी क्षेत्रांत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यास प्रथमपासून असल्यानें मार्केट यार्डस्च्या प्रत्येक गांवीं व्यापारी बँक काढल्यास ही उणीव भरून निघेल ह्या हेतूने ठिकठिकाणीं व्यापारी सह-

चौरस मैल एवढाच होता. १९३५-३६ मध्ये तो ७·७५ चौरस मैल एवढा झाला व आज नासिकचें क्षेत्रफळ २२ चौरस मैल आहे. १८६५ मध्यें नासिकची लोकसंख्या २०,००० होती ती १९४१ मध्यें ४५,००० झाली. १९५१-मध्यें ती ९७,४०८ एवढी होती ती सन १९६१ च्या शिरगणतीप्रमाणे १,३०,८०४ आहे. १९४१ पर्यंत नासिक शहरांत ७ वॉर्ड होते. आज एकूण ११ वॉर्ड आहेत. क्षेत्रफळांतील वाढ, वॉर्डांच्या संख्येत वाढ व लोकसंख्येत वाढ यांवरून नागरी जीवनांत होणाऱ्या बदलाची कांहींशी कल्पना येऊ शकते. परंतु नासिक शहराची बैठकच मुळांत धार्मिक, पुरातन व सनातनी असल्याने औद्योगिक व आर्थिक दृष्टीनीं शहराचें महत्त्व लक्षांत येण्याजोगें वाढू शकलें नाहीं. त्या दृष्टीनें टाकलीं गेलेली पावलें ही विशेषेकरून अलीकडच्या काळांतीलच, साधारण १९३५ पासून व त्याहीपेक्षां स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या वर्षांतील, नियोजनबद्ध विकासाच्या वेळेंतीलच आहेत हे लक्षांत येतें.

सह्याद्रि कंपनीची स्थापना

औद्योगिक-आर्थिक क्षेत्रांत प्रामुख्यानें सांगण्याची घटना म्हणजे सन १९३६ सालीं सह्याद्रि विमा कंपनीची मुख्य कचेरी नासिक येथें सुरू करून श्री. गोपाळराव सौदणकर व श्री. वामनराव जोशी या दोघां नासिकच्या पदवीधर तरुणांनीं नासिक शहराच्या औद्योगिक क्षेत्राच्या इतिहासास नवीन वळण दिलें ही होय. तत्पूर्वी नासिक शहर हें फक्त तांब्या-पितळेच्या भांड्याविषयी प्रसिद्ध होतें. एक लहानशी बँक व एक जिल्हा सहकारी बँक अशा लक्षांत घेण्यासारख्या दोनच व्यापारी संस्था त्यावेळीं नासिक शहरांत कार्य करीत होत्या. परंतु सह्याद्रि विमा कंपनीच्या स्थापनेने पुण्या-मुंबईच्या औद्योगिक वातावरणाशी त्यावेळीं अपरिचित असलेल्या नासिक शहराला विमा-क्षेत्र हें नवीन कार्यक्षेत्र मिळालें व तदनंतरच पुरातन पवित्र तीर्थक्षेत्राच्या बरोबरच आर्थिक व औद्योगिक व्यवसायालादेखील नासिक भाग तितकाच लायक आहे असा आत्मविश्वास या शहरांतील नागरिकांमध्यें वाढीस लागला. श्री. सौदणकर व श्री. जोशी हीं दोन्हीही घराणी नासिक जिल्ह्यामधली. या उभयतांचें दुय्यम शिक्षण येथें झालेलें असल्यानें त्यांना या शहराचा आपुलकीपूर्ण अभिमान वाटत होता. पुणे येथें कॉलेज-शिक्षण घेत असतांना व शिक्षण संपल्यावर पुण्याच्या हायस्कूलमध्यें शिक्षकाचा व्यवसाय करीत असतानाच्या सुमारें एक-एक तपाच्या कालावधींत पुण्या-मुंबईचा निरनिराळ्या क्षेत्रांतील विकास, घडामोडी आणि पुणे शहरांतील व्यापारी, उद्योगधंदेविषयक आणि सामाजिक अशा विविध क्षेत्रांत अनेक संस्थांचें चाललेलें कार्य त्या दोघांना जवळून पहावयास मिळालें आणि म्हणूनच उभयतांनी मास्तरकीचा पेशा सोडून व्यापारी क्षेत्रांत प्रवेश करावयाचें ठरविलें. त्या सुमारासच नासिक येथील श्री. जोशी-सौदणकर यांचे बालपणापासूनचे स्नेहीसोबती कै. दे. भ. गोविंदराव देशपांडे, श्री. धोंडोपंत कांचरगावकर वकील, श्री. माधवराव जानोरकर वकील शहराच्या अनेक संस्थांच्या कार्यक्षेत्रांत आघाडीवर होते. त्यांच्या सहकार्यानें व नासिक नगरपालिकेचे माजी अध्यक्ष व मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलचे त्यावेळचे सभासद व प्रमुख पुढारी कै. रावबहाद्दुर गोपाळराव प्रधान, कै. सरदार भय्यासाहेब विंचूरकर, पै. खानबहाद्दूर बी. एच्. काझी व श्री. बाबासाहेब दीक्षित, रिटायर्ड कलेक्टर अशा विविध क्षेत्रांतील सन्माननीय नागरिकांचें साहाय्य घेऊन दिनांक १५ मे १९३६ रोजीं सह्याद्रि विमा कंपनीची श्री. सौदणकर व श्री. जोशी यांनी प्रस्थापना केली आणि प्रयत्नाची चिकाटी, व्यवहारांतील सचोटी आणि संघटनेची हातोटी या त्रिकोटीच्या जोरावर सह्याद्रीची प्रगति उत्तरोत्तर करून दाखविली. धनवान भांडवलदारांपेक्षां पर्णकुटींतील शेतकऱ्यांना विम्याचें संरक्षण मिळणें अधिक जरुरीचें आहे याचें महत्त्व जाणून सह्याद्रि विमा कंपनीने

आर्थिक, औद्योगिक आणि व्यापारी वाटचाल



प्राचार्य मो. स. गोसावी,
M. Com., B. A., LL. B., साहित्याचार्य,
बी. वाय्. के. कॉलेज, नासिक,

प्रास्ताविक

नासिक नगरपालिकेच्या शताब्दिउत्सवाच्या निमित्तानें नगरपालिकेनें आपला इतिहास व नासिक शहराच्याही विविध जीवनांगाचें इतिवृत्त प्रसिद्ध करण्याचें योजिलें आहे ही एक साभिमान आनंदानें नमूद करण्यासारखी गोष्ट आहे. या शताब्दि स्मृति–गौरव ग्रंथांत नासिक शहरांत गेल्या शतकांत आर्थिक, औद्योगिक व व्यापारी क्षेत्रांत विकासाची पावलें कसकशी पडत गेलीं व सांप्रतची परिस्थिति काय आहे यादृष्टीनें विहंगामलोकन करण्याची संधि मिळाली आहे. आर्थिक विकास हा प्रामुख्यानें आपल्या देशांत शेतीविकासावर व नागरी जीवनविकासावर बराचसा अवलंबून रहात आलेला आहे. वास्तविक आर्थिक विकासांत शेतीबरोबरच सामाजिक विकासहि अभिप्रेत असतो. शेतीच्या दृष्टीनें आमच्या शहरांत गेल्या शतकांत कांहीं नांव घेण्याजोगी प्रगति झाली असली तरी औद्योगिक विकासाच्या, आर्थिक प्रगतीच्या किंवा व्यापारी भरभराटीच्या दृष्टीनें आतां अलीकडेच जारीनें प्रयत्न सुरू झाल्याचे सर्वश्रुत आहे. तरीसुद्धां गेल्या शतकांत शेतीबरोबरच कलाकुसर, तांब्या–पितळेचीं भांडीं, चांदीच्या वस्तू, विणकामाचा धंदा, विडी उद्योग, विमा व्यवसाय व सहकार या विविध क्षेत्रांत नासिक शहरानें संस्मरणीय कामगिरी केल्याचें दिसतें. आज जे नासिक शहराला औद्योगीकरणाच्या दृष्टीनें मुंबई-पुण्याच्या खालोखाल महत्त्व आलें आहे, त्याची पार्श्वभूमि या संस्मरणीय कामगिरीच्या विहंगमावलोकनानें कोणासहि समजूं शकेल. त्या दृष्टीनें आजच्या औद्योगिक क्षेत्रांतील विशेष घटना व भावी प्रगतीचें रेखाचित्रही या निमित्तानें उभारण्याचा प्रयत्न या ठिकाणी करण्यांत आला आहे.

नागरी जीवनांतील बदल

नासिक नगरपालिकेची स्थापना १८६४ सालीं झाली असली तरी शहर नगरपालिकेचा दर्जा तिला १८७४ सालींच आला. १८७४ ते १९३० या काळांत नासिकचा परिसर ४·९८६

कार्यक्रमांतून काही उत्कृष्ट वक्त्यांच्या नकला करतात व आज त्यांनी नकलाकार म्हणून चांगला लौकिक मिळविला आहे. श्री. बंडोपंत धुमाळ ह्यांनी नाटकांत व बोलपटांत चांगला लौकिक मिळविला आहे. श्री. माधवराव काळे ह्यांनी रुपेरी पडद्यावरील एक लोकप्रिय नायक म्हणून एक काळ गाजविला आहे. आजचे एक उदयोन्मुख कलावंत म्हणून श्री. प्रभाकर माने यांचा निर्देश करणे आवश्यक आहे. एकपात्री सौभद्राचे प्रयोग करून त्यांनी रसिकांच्या अपेक्षा उंचावल्या आहेत त्यांचे परिश्रम कौतुकास्पद आहेत.

नासिकची कलोपासना ह्या विषयाचा समारोप करतांना मला नासिक नगरपालिकेच्या ह्या उपक्रमाबद्दल धन्यवाद द्यावयाचे आहेत. नासिकमधील सर्वच कलावंतांना मी न्याय देऊ शकलो नाही याची मला जाणीव आहे. १९४७ पासून गेली १७ वर्षे ह्या शहराच्या जीवनाशी समरस झालेले सिंधी व पंजाबी निर्वासित यांच्या नासिकमधील कलोपासनेचा परामर्ष मला घेतां आलेला नाही. त्याचप्रमाणें नासिकमध्यें येऊन आपल्या गाण्याचा आनंद देणारे गंगूबाई हनगल, बसवराज राजगुरु, भीमसेन जोशी इत्यादि गायक यांचा विचार करता आलेला नाही. कुमार गंधर्व, केसरबाई ह्यांच्यासारख्या दिव्य गायकांनी नासिकचें वातावरण भारून टाकलें. सितारासारख्या नर्तिकेच्या पदन्यासांनी भान हरपलें. हा सर्व इतिहास स्थलकालाच्या मर्यादेंत संक्षेपित करावा लागला. त्या सर्व ज्ञात अज्ञातांच्या कलोपासनेबद्दल आदर व्यक्त करून हे त्रोटक टिपण संपवितो.



क्षेत्र निर्माण केले आहे. श्री. सोमनाथ गांधी ह्यांनी **आपल्या** कलेनें अमृत व कुमार ह्या मासिकांची **लोकप्रियता** वाढविली आहे. गणपतीच्या सुबक **मूर्ती** तयार करण्याचें कौशल्य प्रकर्षानें व्यक्त **करणारे** गर्गे आर्टिस्ट, श्री. नावट बंधू, श्री. लोंढे, **श्री.** दीक्षित ह्या चित्रकारांनी नासिक गाजविले **ह्यांत** शंका नाही.

८. **वक्तृत्व कला** : वक्ता दशसहस्रेषु--हा **अभिजात** वक्त्याचा गौरव आपण मानला तर **नासिकनें** ह्या कलेची केलेली उपासना केवळ **नासिकलाच** नव्हे तर महाराष्ट्राला भूषणावह **वाटावी** अशी आहे.

नासिकची वसंत व्याख्यानमाला हा एक **सांघिक** उपक्रम वक्तृत्वकलेच्या दृष्टीने संस्मर**णीय** आहे. अनेक ज्ञात व अज्ञात वक्ते ह्या मालेत **बोलून** गेले.

राजकीय विचार समाजांत रुजविण्यासाठी खुद्द नासिकचे म्हणून जे वक्ते होऊन गेले त्यांत **कै.** बाबासाहेब खरे ह्यांचा प्रथम उल्लेख करावा **लागेल.** अभिनव भारत ह्या संस्थेच्या कार्य**पद्धतीत** वक्तृत्वाला महत्त्वाचे स्थान होतें. स्वा. **सावरकर,** वामनशास्त्री दातार यांच्या आधीच्या **पिढीतील** वक्ते म्हणून गाजले रामभाऊ **प्रधान,** भाऊसाहेब पाटणकर व जनुभाऊ अभ्यंकर हे तीन वकील. ह्या वक्त्यांचा विशेष असा की त्यांची विषयाची तयारी सखोल असे रामभाऊ **प्रधान** शरीरानें किरकोळ पण ग्रीक वक्त्याला **शोभणारा** त्यांचा खणखणीत आवाज आज **अभावानेंच** तळपतो. इंग्रजी व मराठी दोन्ही **भाषांत** ते उत्कृष्ट भाषणें करीत. वक्ता म्हणून **त्यांनीं** आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविली. श्री **भाऊसाहेब** पाटणकर मराठीप्रमाणेंच संस्कृत **भाषेंतून** वक्तृत्व करीत. असा त्यांचा संस्कृत **भाषेचा** व्यासंग होता. जनुभाऊ अभ्यंकर यांचें **वक्तृत्व** प्रभावी असे.

१९१० ते १९२० ह्या १० वर्षांत नासिकचें **राजकीय** जीवन सरगळलें होतें. त्यापूर्वीच्या १० वर्षांतील वक्ते म्हणून ज्यांचा गौरवाने विचार करावा लागेल असे वक्ते म्हणजे तिघे सावरकर बंधू--बाबाराव, तात्याराव व बाळाराव सावरकर व त्यांचे सहकारी वामनशास्त्री दातार, रामभाऊ दातार हे होत. १९२० नंतर गांधी युग सुरू झालें व त्या युगाचा संदेश सामान्य जनतेंपर्यंत पोहोंचविण्यासाठी ज्यांनीं आपलें वक्तृत्व कारणी लावलें त्यांत सितारामशास्त्री महाशब्दे, श्री. बाळासाहेब मराठे, डॉ. खाडीलकर, श्री. गोविंदराव देशपांडे, श्री. माधवराव जानोरकर, वामनराव यार्दी, श्री. बापूसाहेब उपाध्ये, श्री. माधवराव लिमये आदींचा प्रामुख्याने समावेश करावा लागेल. श्री. भाऊसाहेब हिरे, काकासाहेब वाघ, श्री. वसंतराव नाईक हे बहुजन समाजाचे वक्ते ह्यांच काळांत गाजले.

राजकीय वक्त्यांच्या आजच्या पिढीत श्री. नानासाहेब टिळक, श्री. वि. वा. शिरवाडकर, श्री. एम्. आर. दळवी, श्री. बाबासाहेब टकले, श्री. दादासाहेब पोतनीस आदींचा समावेश करावा लागेल.

राजकारणाव्यतिरिक्त अन्य विषयांत वक्तृत्वाला स्थान आहे हें नासिकमध्यें प्रस्थापित करण्याचें श्रेय श्री. बाळासाहेब कानिटकर ह्यांना आहे. भद्रकाली मंदिरांत पुराणावर त्यांनी दिलेलीं प्रवचनें आणि वसंत व्याख्यानमालेतील त्यांचीं भाषणें ह्या दृष्टीने पुरावा म्हणून देतां येतील. त्यांचे एक सहकारी श्री. वामनराव पुरोहित यांनी नाट्य व साहित्य यांमधील विषयांवर वसंत व्याख्यानमालेत व अन्यत्र भाषणे करून आपलें वक्तृत्व गाजविलें आहे.

नासिक येथें हंसराज प्रागजी ठाकरजी महाविद्यालय स्थापन झालें व त्यामुळे प्राचार्य श्री. टी. ए. कुलकर्णी, प्रा. र. श्री. जोगळेकर, प्रा. श्री. वि. बा. आंबेकर व प्राचार्य श्री. पुराणिक ह्यांचें वक्तृत्वकलेतील स्थान प्रकर्षानें दिसलें. त्याच परंपरेंत प्रा. श्री. वसंत कानेटकर प्रा. श्री. गोळवलकर ह्यांचा श्रेष्ठ वक्ते म्हणून उल्लेख करणें आवश्यक आहे.

ह्याच संदर्भात श्री. सदानंद जोशी आपल्या

विविध खाद्यपदार्थांची स्पर्धा हेही कार्यक्रम होतात भजनकीर्तन हेही कार्यक्रम साजरे होतात. आर. पी. विद्यालयाचे चित्रकला-शिक्षक माध्यमिक शाळांच्या नाट्यस्पर्धांत एक गुजराथी नाटक कलापूर्ण रीतीनें सादर करतात व त्यांनी आपल्या शाळेकरिता ढालही मिळविली आहे. नासिकच्या शरद्वाला यांनी गुजराथी रंगभूमीवर लौकिक मिळविला हें अभिमानास्पद आहे.

३. **चित्रकला** नासिकच्या चित्रकलेच्या उपासनेला आन्तरराष्ट्रीय लौकिक प्राप्त करून देणारे चित्रकार श्री वासुदेवराव कुलकर्णी ह्यांनी ह्या कलेचे शिक्षण अवघड परिस्थितीत घेतलें. श्री. हळदणकरांसारख्या सिद्धहस्त गुरूच्या हाताखाली वासुदेवरावांनी चित्रकलेचे शिक्षण घेतले व नंतर दीर्घ प्रयत्नांनींच केवळ महाराष्ट्रांतीलच नव्हे तर जगातील एक श्रेष्ठ चित्रकार हा लौकिक त्यांना प्राप्त झाला आहे. वासुदेवरावांच्या कलोपासनेचे एक आगळे वैशिष्टय आहे. कलेपासून आपल्याला मिळणारा आनंद सर्वांना कसा मिळेल, समाज कलाभिमुख कसा होईल ही त्यांची आत्यंतिक तळमळ. १९४०च्या जूनमध्ये आपल्या काही सहकाऱ्यांच्या मदतीने नासिक आर्ट ट्रेझर्स ही संस्था स्थापन करून ह्या संस्थेद्वारा आपल्या कलोपासनेच्या कल्पना गेली २४ वर्षे तें साकार करीत आहेत. प्रतिसृष्टि निर्माण करूं पाहणाऱ्या विश्वामित्रालाच आचरतां येईल असे हें दिव्य तप आहे. नासिकमध्यें आर्ट गॅलरी उभी करण्याचा त्यांचा हव्यास उभ्या महाराष्ट्रांत अक्षरशः अद्वितीय आहे. प्रतिवर्षी नासिकमध्ये चित्रकला प्रदर्शन भरवून प्रदर्शनांतील उत्कृष्ट ठरलेलें चित्र भर किंमत देऊन विकत घेऊन अशा चित्रांचा संग्रह करावयाचा हें स्थायी स्वरूपाचें कार्य ही संस्था करीत आहे.१९४७मध्ये स्वातंत्र्य-प्राप्तीनंतर ह्या संस्थेनें नासिक कला निकेतन असें नांव धारण केलें. संस्था विश्वस्त कायद्याखाली नोंदली आहे. १९४० मध्ये ह्या संस्थेचा उद्घाटन-समारंभ त्या वेळच्या मुंबई सरकारचे मुख्यमंत्री श्री. एच्. एफ. नाइट ह्यांच्या हस्तें साजरा झाला. श्री. नाइट स्वतः चित्रकार म्हणून त्यांना वासुदेवरावांच्या कुंचलीचे सामर्थ्य जाणण्याची योग्यता होती. श्री. अप्पासाहेब फडके, श्री. डोंगरे, श्री मोगल, श्री. चव्हाण, श्री. बाबुराव फडके, श्री. पाराशरे ह्यांनी वासुदेवरावांच्या ह्या प्रयत्नांना चांगली साथ दिली. श्री. एम्. ए. केमरकोंडी, श्री गजाननराव भागवत, श्री. ना. गो. शुक्ल, श्री. बा. श्री पुरोहित यांनी वासुदेवरावांच्या कल्पनेचा पहिल्यापासून पुरस्कार केला. सेवानिवृत्त कलेक्टर श्री. एम्. जे. दीक्षित सुरुवातीपासून आजतागायत ह्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. नासिक जिल्ह्यातील चित्रकला-शिक्षकांची एक चांगली संघटना ह्या संस्थेच्या नेतृत्वाखालीं तयार झाली आहे. वासुदेवरावांनीं कलोपासनेची खरीखुरी एक परंपरा नासिकमध्यें निर्माण केली. हाच वासुदेवरावांच्या कलोपासनेचा खरीखुरी गौरव आहे. त्यांची कला आज अनिकेत आहे. ह्याची खंत कुणाही सहृदय रसिकाला वाटावी. नगरपालिका अथवा राज्य सरकार ह्यांच्या अधिकार कक्षेतील ही गोष्ट आहे. आपल्या कलेला घर मिळालें पाहिजे हा एक सत्य संकल्प आहे. आणि हा संकल्प तो सर्व शक्तिमान परमेश्वर पूर्ण करील अशी सदिच्छा बाळगू या.'

शिल्पकलेच्या क्षेत्रात श्री. वासुदेवराव कुलकर्णी, श्री. तांबट, कै. गर्गे हे सिद्धहस्त कलावंत होत. श्री रंगा सिकेनीस हे एक अवलिया चित्रकार आहेत. श्री. शिवाजी तुपे ह्यांचा लॅंडस्केप हा विषय हातखंडा आहे मुंबईला असलेले श्री बाळ चावडकर, श्री. राजा बेंदरकर, श्री. पद्माकर चावडकर ह्यांची कलोपासना अभिनंदनीय आहे. कमर्शियल आर्टसच्या दृष्टीने 'प्रतिभा ॲडव्हटायझिंग'चे संचालक श्री गर्गे व श्री पळणीटकर ह्यांनी पुण्यास आपली संस्था नेऊन कार्याचा विस्तार केला आहे. श्री पंडित सोनवणी यांनी मासिकाचा अंक सर्वांगसुंदर करण्याचें श्रेष्ठ कौशल्य मिळवून मुंबईमध्यें स्वतःचे कार्य-

यांनीं 'जीवनगंगा' साकार केली



महाराष्ट्र साहित्य संमेलन (मडगाव) चे अध्यक्ष श्री. वि. वा. शिरवाडकर, नगराध्यक्ष श्री. ह. ता. शेलार व शताब्दि–ग्रंथासाठी कार्य करणारे इतर (गावकरी प्रेस)



साहित्य संगीत आणि कला या सर्वच क्षेत्रांत नासिकनें मानाचें असें स्थान प्रस्थापित केलें आहे.



पन्नास वर्षांपूर्वी याच नासिक शहरांत कै. दादासाहेब फाळके यांनीं भारतीय चित्रपटसृष्टीची मुहूर्तमेढ रोवली. आज त्याचा विस्तार पाहतांना दादासाहेब फाळके यांच्या कर्तृत्वाची आणि दूरदृष्टीची साथ पटून मन आदरानें नि अभिमानानें नतमस्तक होतें.

तमाशा पाहिलेले रसिक नासिकमध्यें आहेत. शास्त्रोक्त लावणी म्हणणारा एक विशेष वर्ग नासिकमध्यें आहे. नासिकच्या दीपक रेस्टारंटचे संचालक श्री. उपळेकर हे ह्या विषयांतले एक माहितगार आहेत. लावणी पद्धतीनें गाणें म्हणण्यांत मुंबई व उपनगरांत ज्यांनी विशेष लौकिक मिळविला ते कै. लक्ष्मणराव रुगडे ह्यांची उपासना गौरवास्पद होती व सुभद्रेची त्यांची भूमिका एका काळीं फार नांवाजली गेली.

श्री भीमराव मावळीराम बागुल यांनी शास्त्रोक्त तमाशा ह्या कलेची उपासना आजन्म केली. पुराणांच्या माहितीच्या आधारावर रचलेल्या ह्या शास्त्रोक्त लावण्यांना चढउतार किंवा कलगीतुरा अशीही नांवें आहेत. ह्या सांप्रदायांतील दादा विसपुते, आबा ब्रस्मन बेळे, बंडू सूर्यवंशी ह्यांची कला आज नामशेष असली तरी त्याना ऐतिहासिक परंपरा आहे हें लक्षात घेतलें पाहिजे. अद्यापही दरवर्षी फाल्गुन पौर्णिमेला ह्या परंपरेचे गायक आध्यात्मिक स्वरूपाच्या पराशरामी लावण्या पंचवटीतील देवीजवळ गातात. १९२७–१९२८ मध्यें नासिकमध्यें पठ्ठे बापुराव व पवळी यांचा तमाशा झाला. १९४३–१९४४ मध्ये पठ्ठे बापुराव यांचा सत्कार करण्यात आला.

नारायणराव घनगर व भागीदार केदार मायकलवाले, श्री. भीमराव बागुल व भागीदार श्री. बाबुराव कोल्हाळकर ह्यांनी नीला हाऊसमध्ये तमाशांचे कार्यक्रम कित्येक महिने चालविले. राधाबाई व कौसल्याबाई ह्यांच्याप्रमाणेंच बनाबाई शिर्डीकरीण, बेलापूरची तारा कवाली गाणारी, सोनुबाई दिर्डेकरीण ह्या स्त्रियांनी नासिक गाजविलें आहे.

बुकीश नाटके रंगभूमीवर येण्यापूर्वी ज्याप्रमाणें मुक्त नाटकाचे प्रयोग होत त्याचीच पुनरावृत्ति–तमाशांत वग ह्या नांवाने ओळखला जाणारा नाट्यप्रकार–नासिकमध्यें ज्यांनी लोकप्रिय केला त्यांत शेख महमद शेख पहिलवान व श्री. भीमराव बागुल प्रसिद्ध आहेत. शेख महंमद आज मुंबईत असले तरी मूळचे नासिकचे आहेत, व राजा व प्रधान या भूमिका करण्याबद्दल प्रसिद्ध आहेत. श्री. बागुल वगात शिवाजीची भूमिका करीत. दामाजी कोरगांवकर ह्यांची वगांतील कामें खूप गाजलीं आहेत. सत्यभामा-सावित्री कथानकावर आधारलेला वग पहातांना प्रेक्षक अश्रूंचा करभार देत असत.

सोनुबाई दिर्डेकरीण आज भजन–कीर्तनांत रंगल्या आहेत व कोठावरच्या कृष्णमंदिरांत त्या नियमित भजन–कीर्तन करतात.

आबा ब्रम्हन ह्यांनी रचलेल्या व लिहिलेल्या शेकडो लावण्या आज उपेक्षेच्या अंधारांत अज्ञातवास भोगीत आहेत. तो मराठी भाषेचा अज्ञातवास आहे एवढी जाणीव जरी आम्हाला झाली तरी पुष्कळ झाले.

६. **महागुजराथ मंडळ** : नासिकमध्यें स्थायिक झालेल्या गुजराथी समाजाला प्रेरणा दिली दोन व्यक्तींनीं येथें पोस्ट खात्याचे मुख्याधिकारी म्हणून बदलून आलेले श्री. मेहता यांच्या सुविद्य पत्नी प्रेमकुॅंवर बेन मेहता व गांधीच्या चळवळीत तुरुंगांत आलेले श्री. भुलाभाई देसाई. महागुजराथ मंडळ स्थापन झालें सन १९३३ मध्ये. व जयंतीभाई ओझा हे ह्या मंडळाच्या बालमंदिराचे पहिले शिक्षक म्हणून १९३३ च्या डिसेंबरमध्ये नासिकमध्यें आले. स्वत: जयंतीभाई श्रेष्ठ कलावंत आहेत. अभिनय, नाट्यलेखन व नाट्यदिग्दर्शन, नृत्य व गायन ह्या सर्वच कलांत ते तज्ज्ञ आहेत. गुजराथी समाज हा देवविलासी समाज आहे व त्याचे दोन महत्त्वाचे उत्सव साजरे केले जातात. श्रावणांत बालकृष्णाच्या मूर्तीसमोर स्त्रिया गरबा नृत्य करतात व पुरुष गरबी नृत्य करतात. अश्विनांत देवीचा उत्सवही असाच साजरा केला जातो. लीलाधर दुर्लभराम ह्यांच्या घराण्यांत गेली ६० वर्षे ह्या कार्यक्रमाचें संयोजन करण्याची परंपरा आहे. आजही लालजीभाई जपी तें कार्य करीत आहेत. देवापुढें रांगोळी प्रदर्शन,

करून त्यांच्या गुणाची वाढ होईल असे प्रयत्न करणे हे या संस्थेचें विशेष कार्य होय.

श्री अवधूत नाट्य मंडळ ही संस्था १८-१०-६२ रोजी स्थापन झाली असून त्यांनीं येथे नाट्यक्षेत्रांत कार्य करणाऱ्या व्यक्तीपासून प्रेरणा घेतली आहे. सर्वश्री. वेळे, बर्वे आणि टांबरे हे ह्या संस्थेचे प्रमुख कार्यकर्ते आहेत कै श्री. नागेश जोशी यांच्या अवधूत या भूमिकेचे नाव संस्थेला देऊन एका नटाचा गौरव ह्या संस्थेने केला आहे. प्रा. श्री. जाधव ह्या संस्थेचे अध्यक्ष असून श्री. बापूसाहेब काळसेकर ह्यांचे मार्गदर्शन ह्या संस्थेला आहे. अल्पावधीत धडाडीने लोकप्रियता मिळविणाऱ्या संस्थांत लोकरंजन कला केंद्राचा नामनिर्देश करावा लागेल. सदर संस्था सरकार- मान्य असून आजपावेतो एका वर्षांत ३ नाट्य प्रयोग यशस्वीरीत्या संस्थेने सादर केले. संस्थेचे कार्य नेटाने पार पाडण्याची जबाबदारी डॉ. श्रीराम कुलकर्णी, श्री मधुकर झेंडे, श्री. बाळ वैद्य, श्री मुकुंद शुक्ल, श्री गजानन वेणी इत्यादि कार्यकर्ते उचलीत आहेत.

४. **बोहाडे** : हेच खरेखुरे लोकनाट्य होय. नासिकमध्यें ही प्राचीन परंपरा आहे. जुन्या नाशकांत चावडी आहे. तेथून हीं सोंगे निघत व होलाराच्या वाद्यांच्या ठेक्यावर ठरलेल्या रस्त्याने तीं नाचत जात. प्रेक्षक वर्ग रस्त्याच्या दुतर्फा उभा राहून रात्र रात्र ही सोंगें पहाण्या- साठी तिष्ठत असे प्रेक्षक आणि नट यांना एकरूप करणारे नाट्य भाषेच्या माध्यमाशिवाय रसोत्कर्ष करते हा एक कलाक्षेत्रातला चमत्कार आहे. ह्या सोंगांसाठी लागणारे मुखवटे व इतर साज येथेच तयार होत असत व आसपासच्या खेड्यां- तील लोक येथून भाडें देऊन मुखवटे व साज घेऊन जात. श्री. शिंदे पेंटर हेच टोप व मुखवटे करण्याचें व भाड्याने देण्याचें काम करीत. विशिष्ट घराण्यांचे विशिष्ट सोंगे घेण्याचे मान वंशपरंपरेने चालत असत. नरसिंह आणि वीरभद्र ही सोंगे घेणाराला कांहीं अवघड व्रत करावे लागतें. सोंग घ्यावयाचें त्या दिवशी उपोषण करून शुचिर्भूत रहावे, हा नियम सोंग घेणाराला कसोशीनें पाळावाच लागतो. अशी आख्यायिका आहेत की नरसिंह अथवा वीरभद्र ह्यांचा संचार झाल्यामुळे समोरचे हिरण्यकश्यपु अथवा दक्षप्रजापति खरोखरच ठार झाले. हे सोंगाड्या नाट्य आज लुप्त झाले आहे वीरभद्राचा टोप घालणाराला महिना महिना आधी त्या वजनाची चिखलाची पाटी डोक्यावर घेऊन नाचण्याची तालीम करावी लागे. फळविक्री करणारे काची व सोनार ह्या घराण्यांत हीं सोंगें घेण्याची परंपरा असे. बोहाड्याची सुरुवात गणपति व सरस्वती ह्यांच्या सोंगापासून व शेवट महिषासुर मर्दिनी देवीच्या सोंगापाशी असा क्रम ठरलेला असे सूर्योदयाला देवी व महिषासुर ही सोंगें निघत तेहरु चौकांत असलेली देवीची मूर्ति बोहाड्यात मिरवल्या जाणाऱ्या देवीची आहे नासिकमधील लोकनाट्य अथवा बोहाडा हा एक स्वतंत्र प्रबंधाचा विषय आहे

५. **तमाशा** : नासिकमध्ये तमाशा होत आला परंतु त्याचा प्रेक्षक वर्ग समाजाच्या विशिष्ट थरांतून येत असे. ह्या गांवांत व्यवसायी व हौशी नाट्यसंघ तयार झाले, त्याप्रमाणे येथे एखादा तमासगिरीचा संघ निघाला व त्याने गावोगाव जाऊन तमाशे केले असा इतिहास उपलब्ध नाही नाटक व्यवसायाला उतरती कळा लागली त्या काळात म्हणजे १९३० नतरच्या काळात तमाशांना उर्जित दशा आली. आणि पांढरपेशे प्रतिष्ठित या कलेचा आस्वाद घेऊं लागले. नासिकमध्यें विशेष लोकप्रिय झाल्या अशा दोन नाचणारणी व गाणारणी–कौसल्या कोपरगाव- करीण व राधाबाई बुधगावकरीण. ह्या दोघी स्त्रियांच्या तमाशाला भरपूर गर्दी होई कौसल्या- बाईंना तमाशातला 'बालगंधर्व' म्हणत कारण ती अभिनय करताना बालगंधर्वांचें अनुकरण करी. राधाबाई आतां आंध्र राज्यात जमीनदार आहेत. त्यांच्या मुली व मुले त्यांना साथ देतात बापूराव पठ्ठे व त्यांची पवळी ह्यांचा

नाशिकच्या नाट्यकलाभक्त तरुणांची एक संघटना " महाराष्ट्र नाट्य मंदिर " ह्या नावानेंच स्थापन झाली ती इ. स. १९२९ च्या ३० मे रोजी व ह्या संस्थेने इ. स. १९४७ पर्यंत आपलें नाट्यकलाविषयक कार्य यथाशक्ति चालविले. ह्या १९ वर्षांच्या काळांत ह्या संस्थेनें नाट्यप्रयोग केले व नाशिकमधील शिक्षणसंस्थांना व इतर सार्वजनिक कार्य करणाऱ्या संस्थांना नाट्यप्रयोग बसविण्यास शक्य तें साहाय्य केलें. ह्या संस्थेचे एक कार्यकर्ते श्री. पुरोहित ह्यांनीं नाट्यविषयक लेख लिहून व भाषणे देऊन संस्थेचें कार्यक्षेत्र विस्तृत केलें. श्री. डी. आर. प्रधान त्या वेळचे रेव्हेन्यू सेक्रेटरी, ह्यांनी ह्या संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन करतांना असे उद्गार काढले की ह्या संस्थेनें सामान्य जनतेमध्यें असलेले नाट्यविषयक दुराग्रह व गैरसमज दूर केले. व्यवसायी नटांना समाजाभिमुख केले आणि एका सांस्कृतिक चळवळीचा पाया घातला.

महाराष्ट्र नाट्य मंदिराने रंगभूमीवर दिसणाऱ्या नटांना सार्वजनिक व्यासपीठ प्राप्त करून देण्याचा प्रयत्न केला. इ. स. १९४० मध्यें नाशिकला भरलेलें नाट्य-संमेलन व इ. स. १९४२ मध्यें झालेलें साहित्य संमेलन याची जबाबदारी मुख्यत्वेंकरून या संस्थेनेंच उचलली. कवि संमेलन, लक्ष्मीबाई टिळक यांचा सत्कार-समारंभ, मराठी रंगभूमीचा जन्मशताब्दि-महोत्सव, अशा विविध कार्यक्रमांतून ही संस्था कार्य करीत आली. श्री. बाळासाहेब काळे, श्री. बाळासाहेब कानीटकर, श्री. प्रल्हादराव औरंगाबादकर, श्री. शंकरराव निफाडकर, श्री. पांडोबा कुलकर्णी, श्री. बाबुराव खारकर, श्री. वामनराव व श्री गोपाळराव खरे, श्री. वामनराव खरे, श्री श. पु. जोशी, श्री. प्रभाकर महाबळ, श्री. वामनराव पुरोहित, श्री. बाबुराव तासकर अशी तरुण कार्यकर्त्यांची एक पिढी नाशिकमध्यें कार्यप्रवृत्त झाली. ह्याला कारण महाराष्ट्रनाट्य मंदिर ही संस्था होय.

इ. स. १९४७ मध्यें सार्वजनिक कार्याचा समृद्ध वारसा मागें ठेवून महाराष्ट्र नाट्य मंदिर ही संस्था नामशेष झाली.

इ. स. १९४७ मध्यें भारताला स्वातंत्र्य प्राप्त झालें व भारताची कळा पालटूं लागली. इ. स. १९५० मध्यें कवि कुसुमाग्रज यांच्या नेतृत्वाखालीं लोकहितवादी मंडळाची स्थापना झाली व सांस्कृतिक कार्याचा नवा प्रवाह सुरू झाला. शारदीय व्याख्यानमाला व वासंतिक नाट्योत्सव ह्या प्रतिवार्षिक कार्यक्रमांतून ह्या संस्थेने केलेलें कार्य भरीव स्वरूपाचे आहे. "साधना" ही ह्या संस्थेची अभ्यास शाखा कलेच्या क्षेत्रांत महत्त्वाचे कार्य करीत आहे. श्री. बाबुराव सावंत ह्यांच्यासारखा नट ह्याच संस्थेनें घडविला असें म्हणावयास हरकत नाहीं. श्री. बाळासाहेब सहस्रबुद्धे, श्री. गोपाळराव खरे, श्री. दत्ता सराफ, श्री दत्ता नाडगौडा, श्री. वसंत पेठे, श्री वेलदे, श्री. महेंद्र, श्री. मुरलीधर औरंगाबादकर ही ह्या संस्थेच्या कार्यकर्त्यांची प्रभावळ ह्या शहराला अभिमानास्पद आहे.

इ. स. १९६० च्या जुलैमध्यें स्थापन झालेली 'कलायतन' ही संस्था लहान मुलांच्या कला-प्रवृत्तींचा परिपोष करावा ह्या हेतूनें स्थापन झाली. श्री. दळवी ह्यांच्या नेतृत्वाखाली ही संस्था कार्य करीत आहे. सौ. उषा सराफ, सौ. लिमये, प्रा. श्री. वनंक, श्री. रत्नाकर गुजराथी इत्यादींच्या कल्पनांचा आविष्कार या संस्थेतर्फे होत आहे.

श्री. अनासपुरे, श्री. शांताराम वावरे व त्यांचे सहकारी यांच्या नेतृत्वाखाली नाट्यसंघ ही संस्था नुकतीच स्थापन होऊन कार्य करूं लागली आहे. १ ऑगस्ट १९५९ हा ह्या संस्थेचा स्थापना-दिन होय. श्री. विश्वेश्वर कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालीं ही संस्था कार्य करीत आहे. नाट्यवाचन, दिवाकर नाट्यस्पर्धा, हे नवीन कार्यक्रम सुरू करण्याचें श्रेय ह्या संस्थेला आहे. साभिनय कथा सादर करण्याचें पहिले श्रेय आपले आहे असा हा संस्थेचा दावा आहे. सरकारी नोकरी करणाऱ्या नाट्यप्रेमी कलावंतांची संघटना

घटोत्कच व देवळाचा भस्मासुर उपयोग श्री. फाळके ह्यांनी चित्रपटातील देखावे दाखविताना केला आहे.

चित्रपट-व्यवसायाचा प्रारंभ व उत्कर्ष करण्याचे श्रेय नासिकला आहे. १९३४ च्या मे महिन्यात मडगाव येथे भरलेल्या साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष कवि कुसुमाग्रज ह्यांनी ह्याच हौदाच्या वगल्याच्या परिसरात लक्ष्मणाची भूमिका केली ह्या घटनेचा उल्लेख करणे आवश्यक आहे. कुसुमाग्रजांनी ह्या व्यवसायातून पाऊल मागे घेतले म्हणून महाराष्ट्राला 'मराठी माती' सारखा कविता संग्रह मिळाला. प्रतियश नाटककार श्री. मामा वरेरकर ह्यांनी सासाचा वायदा करून ह्या व्यवसायाचे एक घटक म्हणून नासिक-मध्ये येऊन राहिले होते. सुप्रसिद्ध व्यायाम-विशारद श्री सद्भाऊ गोडबोले ह्याच व्यवसायात करार करून येथे राहिले होते. त्यांनी केली भूमिका रावणाची! श्री कृष्णराव आठवले ह्यांनी एका व्यापाऱ्याच्या साह्याने 'महावीर फिल्म कंपनी' असा एक उपक्रम करून पाहिला परंतु तो यशस्वी झाला नाही.

इ. स. १९१० ते १९२० ह्या दशकात ज्या व्यवसायी नाटक मंडळ्यांनी आपले प्रयोग केले त्यांचा दर्जा असाधारण होता व त्या नटांचे नाट्य वेड लावणारे होते. स्वदेश हितचिंतक, चित्ताकर्षक, गंधर्व, शाहू नगरवासी, महाराष्ट्र, वसईकर, राजापूरकर, ललितकलादर्श, किर्लोस्कर नाट्य कला ह्या नाटक मंडळ्यांचे मुक्काम व त्यांची नाटके ह्या कालखंडातील महत्त्वाचा चर्चेचा विषय होता. श्री. फाळके ह्यांच्या हिन्दु-स्थान फिल्म कंपनीतील नट श्री. गजाननराव साने बालाजी उत्सवात व गणपति उत्सवात आपले मूकाभिनयाचे प्रयोग करून दाखवित असत.

नासिकमध्ये नाटकें करणारे क्लब त्या काळात होते. श्री. बापूसाहेब लोंढे गायनवादन व नाटकाचे शौकी म्हणून प्रसिद्ध होते. कलावन्तांना त्यांचे प्रोत्साहन व आश्रय असे. सरदार रास्ते यांच्या गणपति मंदिरातील गुरुवारच्या गाण्याच्या बैठकी सुरू झाल्या त्या ह्याच काळात. रावबहादूर वाड्यात भरणाऱ्या गव्हर्नमेंट हायस्कूलच्या वार्षिक स्नेह-सम्मेलनात नाट्यप्रवेश गद्य व संगीत होत असत. नाटकात विद्यार्थी कामे करीत ती केवळ हौस म्हणून. इ. स. १९१८ च्या मे महिन्यात नासिक हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी विजयानंद थियेटरमध्ये तोतयाचे बंड ह्या नाटकाचा प्रयोग केला त्याच्या आधी पहिल्या जागतिक महायुद्धांत सरकारला मदत म्हणून चंद्रगुप्त ह्या नाटकाचा स्त्री-भूमिकासह प्रयोग सेंट जॉर्ज स्कूलच्या विद्यार्थ्यांनी केला. ह्या प्रयोगातून काम करणाऱ्या विद्यार्थ्यां-पुढें ज्या व्यवसायी नटांचे आदर्श होते ते श्रेष्ठ होते, ह्यात शंकाच नाही.

इ. स. १९२० ते १९३० हा काळ नाट्य-कलेच्या उपासनेच्या उमेदवारीचा होता. आय-डियल क्लब ह्या नावाने हायस्कूलचे काही विद्यार्थी नाट्यप्रयोग करावा असा प्रयत्न करीत होते. त्यांत श्री. पुरोहित, श्री. खाडीलकर, श्री. श्री. गांगल, श्री. कुलकर्णी, श्री. तात्या वाड, श्री. माधवराव जानोरकर अशी काही नावे घेता येतील. उन्हाळ्याच्या सुटीत कुणाच्यातरी घरी जमावे व नाटकांतील गाजलेली भाषणे टिपेच्या आवाजांत म्हणावी हीच नाट्यकलेच्या उपासनेची मर्यादा होती.

१९१८ मध्ये स्थापन झालेल्या न्यू इंग्लिश स्कूलने प्रथम स्त्रीभूमिकाच्या पुरुष-भूमिका करून व नंतर स्त्रीभूमिकासह वार्षिक स्नेह-सम्मेलनप्रसंगी नाटकें करण्यास सुरवात केली परंतु शाळेच्या ह्या नाट्यप्रयत्नांत क्रांतिकारक बदल घडवून आणला तो सरकारी शाळेचे हेडमास्तर श्री. लिमये ह्यांनी. चंद्रग्रहण ह्या नाटकाचा शाळकरी प्रयोगात विद्यार्थ्यांनी स्त्रीभूमिका केल्या व प्रेक्षकांनी त्याचे कौतुक केले. श्री बाळासाहेब काळे ह्या प्रयोगाचे दिग्दर्शक म्हणून नावाजले गेले व आजही त्यांचा तो लौकिक कायम आहे. न्यू इंग्लिश स्कूलनें विद्यार्थ्यांच्या स्त्रीभूमिकांना परवानगी देऊन तीच परंपरा चालविली.

एकनाथ भराडी, वी. एम्. देशपांडे व डी. वाय देशपांडे व श्री. दत्तोपंत गरुड ह्यानी हार्मोनियम वादनाची कला यशस्वीपणे सांभाळली.

३. **नाट्य** : नासिकच्या नाट्य–कलोपासनेची परंपरा प्राचीन आहे. तशीच स्फूर्तिदायक आहे. इ. स. १८८४ ते १८९४ ह्या दहा वर्षांच्या काळात नासिककर संगीत मंडळी अथवा व्हिक्टोरिया ज्युबिली नासिककर नाटक मंडळी ह्या नावाची व्यवसायी नाटक मंडळी चालवून ह्या क्षेत्रातील कलोपासकांनी विक्रम केला असे म्हणावयास हरकत नाही. आजचे सुप्रसिद्ध साहित्यिक प्रा. श्री. वि. मा. दी. पटवर्धन ह्यांनी त्यावेळचे दप्तर अत्यंत आस्थेने सांभाळले आहे. श्री. अण्णासाहेब व दीक्षित पटवर्धन ह्यांच्या मालकीची ही नाटक मंडळी होती. श्री. ब. ल. वरसोडे गर्गे हे व्यवस्थापक होते. त्यांचा पत्रव्यवहार अभ्यास करण्यासारखा आहे. श्री. गर्गे ह्यांच्यावर अितराजी झाल्यानंतर रावसाहेब ह्या नांवाने उल्लेखिले जाणारे श्री. बाबुराव धांगरेकर व्यवस्थापक झाले. किर्लोस्कर नाटक मंडळीनीं आपले शाकुंतल नाटक घेतले नाही म्हणून श्री. डोंगरे ह्यांनी नासिककर मंडळीकडे ते नाटक दिले. डोंगऱ्यांचे इंद्रसभा नाटक, तसेच सौभद्र, रामराज्यवियोग ह्या नाटकांचे प्रयोगही ही नाटक मंडळी करीत असे. इ. स. १८९४ मध्ये अण्णासाहेबांनी मंडळीचें कर्ज देण्यासाठी आपली एक मिळकत विकली व कर्जफेड करून कंपनी बंद केली.

इ. स. १८९० ते इ. स. १९१० ह्या काळात व्यवसायी नाटक मंडळ्या नासिकमध्यें येत. इ. स. १९०७ मध्यें नासिकला श्री अनंत वामन बर्वे ह्यांच्या पुढाकाराने भारत नाट्य संमेलनाचे एक अधिवेशन झाले. श्री. अनंतराव बर्वे ह्यांनी नासिक सोडलें व ते पुण्यात स्थायिक झाले. नाट्यशिक्षणाचे ते पहिले गृह अर्थात् हे वर्ग नासिकमध्ये सुरू झाले नाहीत तर पुण्यात सुरू झाले.

त्या काळात नाशकात दोन नाट्यगृहे होती. विजयानंद व ब्रह्मानंद अशी त्यांची नांवे. ब्रह्मानंद नाट्यगृहाचें रूपांतर आज मधुकर टॉकीजमध्ये झालें आहे.

इ. सन १९१३ मध्ये श्री दादासाहेब फाळके ह्यांनी भारतातील चित्रपट–व्यवसायाचा प्रारंभ नासिकलाच हौदाच्या बगल्यांत केला. ट्रिक फोटोग्राफी हा श्री. फाळक्यांचा हातखंडा विषय होता. पुराणांतलीं कथानकें निवडून श्री. फाळके यांनी आपले चित्रपट सजविले व गाजविले. ह्या चित्रपटांतच जोडून श्री. फाळके ह्यांनीं काही विनोदी प्रसंगही चित्रित केले. ह्या व्यवसायांत प्रथम काहीं वर्षे पुरुषच स्त्री–भूमिका करीत. नन्तर काही वेश्यांनी ह्या व्यवसायांत प्रवेश केला. आवाजाचा प्रश्न नसल्यामुळें नाकीडोळी नीटस् व आकर्षक बांधा एवढ्यावर गरज भागत असे. छायाचित्रण चालू असतां ओठांची हालचाल व्हावी म्हणून जी वाक्यें उच्चारलीं जात त्यांच्या अनेक दंतकथा आजही उपलब्ध आहेत. आश्चर्य व्यक्त करण्याकरितां एक स्त्री म्हणते, " काय बरं पडलं आहे अिथे ? पाहूं का मी उचलून ? " रावणाने आवेश व्यक्त करण्याकरिता रामाला वाटेल तशी शिवीगाळ करणें मंजूर होतें. कारण ध्वनिमुद्रणाची कला नव्हती. मामा निरंतर, मामा शिंदे, भाऊराव दातार, अण्णा साळुंके, दावके व जाधव अित्यादि आघाडीचे नट. 'फाळके फिल्म कंपनीं'त सांगली-मिरजच्या पटवर्धन घराण्यांतील एक गृहस्थ अप्पासाहेब पटवर्धन हे व्यवस्थापक म्हणून होते. गोरा रंग, बळकट शरीरयष्टि, भेदक दृष्टि असलेले हे गृहस्थ रस्त्यांतून चालूं लागले म्हणजे भीति वाटे. फाळके ह्यांच्या फिल्म-कंपनीची मालकी मुंबईचे गिरणीमालक श्री. वामनराव आपटे व मयाशंकर ठक्कर यांच्याकडे नंतर गेली.

इ. स. १९१८ ते १९२० मध्यें श्री. फाळके ह्यांनी 'रंगभूमि' या नावाचें नाटक बसवून त्याचे प्रयोग केले. 'चाबुकस्वार' ह्या साप्ताहिकांत ह्या नाटकाचा काही भाग छापला गेला. आज ह्या नाटकाचा मागमूस नाही. नासिकच्या

देशपांडे बहुधा दर शनिवार–रविवार जाऊन डॉक्टरांना गाण्याची तालीम देतात व स्वतः रियाज करतात.

पन्नास वर्षांपूर्वी गायन–शिक्षकाची जबाबदारी पेलली एका स्त्रीने त्यांचे नाव नर्मदा ह्याच नावाने त्या आबालवृद्धांना नाशिकमध्ये परिचित होत्या. गोपाळबुवा पेठणकर, दामुशास्त्री पाराशरे, जगन्नाथबुवा कुलकर्णी अशा अनेक पुरुषांनी त्यांच्यासमोर बसून गायनाचे धडे घेतले आहेत. बाळकृष्णबुवा इचलकरंजीकर ह्यांच्या ह्या शिष्या व ख्याल-गायकीबद्दल त्या प्रसिद्ध होत्या.

श्रीमती गंगूबाई [illegible] ह्यांनी नाशिकमध्ये सर्वप्रथम गायन वर्ग सुरू केला व आजमितीपर्यंत चालविला आहे. कमीत कमी फी घेऊन गायन विद्या शिकविण्याचे विष्णु दिगंबरांचे व्रत त्यांनी आजही चालविले आहे.

प्रसिद्ध गायक नट श्री. भाऊराव कोल्हटकर ह्यांचे दोन भाचे श्री. दादा करंदीकर व श्री. अनोबा करंदीकर ह्यांनी नाशिकमध्येच गायन-कलेची उपासना केली. दादा करंदीकर इरिगेशन खात्यात सरकारी नोकर होते व मेनरोडवरील डोंगऱ्यांच्या गणपति मंदिरात गुरुवारची हजेरी ते देत असत. त्याच काळातील [illegible]-तील श्री. गोविंदराव क्षीरसागर हे एक ख्यात-नाम गायक होते.

दत्तोपंत कुलकर्णी व त्यांचे बंधू पांडोबा कुलकर्णी हे गायक असून पांडोबा कुलकर्णी ह्यांनी वझेबुवांची तालीम घेतली आहे.

श्री. रावजी केशव काळसेकर ह्यांनी १९१५ ते १९३५ वीस वर्षे नाशिकमध्ये बोहरपट्टीत गायनवादनांचे वर्ग चालविले. त्यांचे बंधू श्री. बापुसाहेब काळसेकर ह्यांनी सन १९५० मध्ये ललितकला नृत्य–नाट्य–मंदिर स्थापन करून नृत्यकलेच्या उपासनेस प्रारंभ केला. १९५४ व १९५६ मध्ये ह्या संस्थेने काही जाहीर कार्यक्रम केले. गेली ८ वर्षे श्री. हर्डीकर यांनी नृत्यकला केंद्र ही संस्था चालविली आहे. पंचवटीत स्थापन झालेल्या आर.पी. विद्यालयाने एक वेगळी परंपरा नाशिकमध्ये सुरू केली. गरबा नृत्य व इतर गुर्जर नृत्यप्रकार ह्या संस्थेमुळेच येथे रूढ झाले. श्री. जयंतीभाई ओझा व वकुलभाई ह्यांनी नृत्य, संगीत नाट्य ह्या कलांच्या माध्यमातून बालमनांवर संस्कार घडविले. हा उपक्रम स्वागतार्ह आहे एवढेच नव्हे तर अत्यंत पुरोगामी आहे. आर. पी. विद्यालयाचे श्री. दरबार ही अभिनंदनीय परंपरा चालवित आहेत. ह्या विद्यालयाच्या वार्षिक समारंभाच्या निमित्ताने गुर्जर कलेचे जे दर्शन घडते ते विलोभनीय असते. कृष्णदास सुरदासजी सुरसारंग नांवाचे वाद्य वाजवीत व त्यांच्या साथीवर ते गायन भजन व कीर्तन गावोगाव करीत.

इ. सन १९०० च्या आधीच्या काळात बळवंतराव लोणकर पाटोदेकर हे धृपदी गायक होऊन गेले. त्यांनी श्री. गोपाळराव पेठणकर यांना ५०० धृपदे शिकविली. सोनूशास्त्री आणि भाऊशास्त्री दोघे ख्याल गायक व साथीदारांच्या परंपरेत बाबाजी गुरव, काशीनाथ गुरव, गंगाधर गुरव, सखाराम गुरव हे कलावंत होऊन गेले. ह्याच परंपरेतील सदाशिव गुरव आज हयात आहेत. श्री. पवार त्यांचेच शिष्य आहेत. मनोहर बुवा पेठणकर बापूशास्त्री पेठे ह्यांची तबल्याची साथ प्रसिद्ध आहे. नाशिकच्या कापड पेठेतील लक्ष्मीनारायण मंदिरात ५० वर्षांपेक्षा अधिक-काळ गायनवादन रोज सायंकाळी, तास दोन तास चालत असे. ठराविक प्रतिष्ठित रसिक तेथे जमत. कृष्णराव माडवगणे पेटीची साथ करीत व त्यांचे वडील तबला वाजवीत. ब्रम्हदेव बाघ व इतर काही मुले जमत गाणी म्हणत. सर्वांना तेथे प्रवेश नसे. त्यामुळे रस्त्यांतच उभे राहून अथवा समोरच्या दुकानांत बसून काही रसिक त्या आनंदाचा आस्वाद घेत. हार्मोनियम–वादन करणाऱ्या कृष्णरावांची अशी शिफारस सांगतात की, हार्मोनियमच्या पट्ट्यांवर मखमली पट्टी आथरून ते अचूक सुरावट वाजवीत. 'कुंज-विहारी' ह्या संगीत नाटकाचा प्रयोग येथे जमणाऱ्या कलावंतांनी केला. काशीनाथ भगाडी.

योजना चालू आहे. नानाबुवा वडोदकर व त्यांचे शिष्य निजामपूरकर बुवा यांची कीर्तनें नाशकांत गाजली आहेत! नासिकला स्त्री कीर्तनकारांनी येऊन ह्या कलेची उपासना केली आहे. आज सौ. म्हाळकर ही परंपरा चालवीत आहेत मिरकरांची कीर्तनें अतिशय रंगतात. गौतमबुवा पाठक ह्यांचा लौकिक चांगला आहे. श्री बाबुराव वैद्य बी. ए., बी. टी. ह्यांना कीर्तनें करण्यांचा छंद आहे. व्यवसायाने शिक्षक असून ते प्रतिवर्षी यशवंतराव महाराजांच्या उत्सवांत कीर्तनाची हजेरी देतात. स्वत. आख्याने रचतात. अिंग्रजी भाषेतील उत्तम कथानकें घेऊन त्यांवर त्यांनी आख्यानें केली आहेत.

व्यायाममहर्षि श्री. तात्या महाबळ यांनी ऐतिहासिक कथानकावर कीर्तनें केलीं आहेत. त्र्यंबकबुवा देवपूरकर, दसककर ह्यांनी कीर्तनकार म्हणून लौकिक मिळविला. आज तरी ही परंपरा नामशेष होत चालली आहे. व सत्विचारांचें एक प्रभावी प्रचारक्षेत्र निर्जन होत आहे.

२ कीर्तनकाराला थोडीबहुत गायनकलेची उपासना करावीच लागते. गायनकलेच्या दृष्टीने नासिकच्या दोन मंदिरातील उपक्रम लक्षांत घेणे आवश्यक आहे. कोठावरील दत्तमंदिर येथील साप्ताहिक परंपरा अधिक जुनी आहे. काही प्रसिद्ध गवयांनी देवासमोर हजेरी दिली आहे. त्यात रहिमत खां ह्या प्रसिद्ध गवयाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. मेनरोडवरील गणपती मंदिर ह्याची उभारणी व व्यवस्था ह्याला सर्वस्वी जबाबदार कै. दामुअण्णा डोंगरे हेच आहेत. दर गुरुवारी देवासमोर हवशे व नवशे गवयी येऊन गायन करतात. माघातला गणेशजन्म–उत्सव थाटाने होतो व त्यावेळी काही सुप्रसिद्ध गायक गाऊन गेले आहेत. ग्वाल्हेरचे गायक राजभैया पूंछवाले ह्यांचे गायन झाले. गणपति मंदिराच्या ह्या परंपरेने काही ख्यातनाम गायक निर्माण झाले न झाले ह्यापेक्षा शेंकडो रसिक निर्माण केले. त्या दृष्टीने संगीताची ही उपासना उपकारकच म्हणावी लागेल. ह्याच संदर्भात काजीपुऱ्यांतील प्रसिद्ध दर्ग्यात गेली कित्येक वर्षे जो उरूस भरतो, त्यांत अनेक गाणारणी व नाचणारणी गाऊन व नाचून गेल्या आहेत. हा उरूस महिनाभर सारी रात्र उजागरा करून चालतो. त्यात हिंदु व मुस्लीम दोन्ही धर्मांचे लोक भाग घेतात. खेळाप्रमाणेच कलेच्या क्षेत्रात कडवे धर्मभेद विरून जातात, ही गोष्ट त्यांनी सिद्ध केली आहे. सय्यद सादीकच्या शाहर मदिनेचा हा दर्गा आहे.


वरील तीन सांघिक उपक्रमांखेरीज कांही वैयक्तिक उपासकांचा विचार करणें आवश्यक आहे नासिकचे काही गायक ग्वाल्हेरला शागिर्दी करून गायन शिकून आले. अशा गायकांत बाबुराव दीक्षित, जलालपुरकर, अंबादास पैठणकर, दसककर, जगन्नाथबुवा कुलकर्णी ह्या उपासकांचा उल्लेख केला पाहिजे ग्वाल्हेरच्या ह्या परंपरेबरोबरच बाळकृष्ण अिचलकरंजीकर ह्यांची परंपरा विष्णू दिगंबर पलुस्कर ह्यांनी नासिकमध्ये रूढ केली. १९१९ मध्यें 'श्रीराम नाम आधाराश्रम' ही संस्था स्थापन करून गेलीं पंचेचाळीस वर्षे संगीताची उपासना चालविली आहे. त्याच परंपरेतील श्री. त्रिवेदी ह्यांनी विष्णू संगीत विद्यालय स्थापन करून शेंकडों विद्यार्थी-विद्यार्थिनींना संगीताची दीक्षा दिली आहे. श्री. खरवंडीकर हे ग्वाल्हेरी परंपरेतील येथेंच उपासना चालवित आहेत. विष्णु दिगंबरांचे शिष्य श्री. सोपानदेव चौधरी ह्यांनी काव्यगायक म्हणून अखिल भारतांत लौकिक संपादन केला आहे

अब्दुल करीम खाँचे शिष्य व हिराबाअी बडोदेकरांचे गुरुबंधु रामभाऊ खाडीलकर आपल्या गायनकलेच्या उपासनेंत देवभक्तीला श्रेष्ठ स्थान देतात. ह्या परंपरेतील सुरेल आवाजाची देणगी त्याना आहे.

सह्याद्रि लाईफ इन्शुरन्स कंपनीमध्यें ऑडीटर म्हणून आलेले श्री. श्रीधरपंत देशपांडे हे एक व्यासंगी गायक नासिकमध्यें आल्यापासून उपासनेचा एक नवा मार्ग त्यांनी चालविला आहे. डॉ. चिंतामणराव खाडीलकर ह्यांच्या घरी श्री.

कलोपासना

(१८६४ ते १९६४)



— वा. श्री. पुरोहित,
एम्. ए., बी. टी.

नाशिक शहराच्या गेल्या शतकांतील झालेला सर्वांगीण विकास लक्षात घेताना कलोपासना ह्या विषयाला निश्चितच स्थान आहे. मिळेल तेवढी माहिती टिपून घेणे व नोंद करणे एवढेच आज शक्य आहे व तसाच हा प्रयत्न आहे.

कला विविधरूपी आहे. त्या सर्व रूपांचा परामर्श घेणे शक्यतेच्या कोटीतील नाही. म्हणून गेल्या शतकांत नाशिकमध्ये ज्या कलांचा आविष्कार समर्थपणे केला गेला अशाच काही कलांचा विचार येथे करावयाचा आहे.

१. **कीर्तन** : गणेशशास्त्री मोडक यांच्या कीर्तनाची ओढ बालवृद्धांना असे. विठोबा अण्णा दप्तरदार आणि त्यांची श्लेषयुक्त कविता ह्यांचा भरपूर उपयोग आपल्या कीर्तनात करून गणेशशास्त्री रंग भरीत. बेताशीर उंची, गोरापान रंग, गोल चेहरा, गुलाबी छटा असलेले धोतर, स्वच्छ अंगरखा, डोक्यावर ब्राह्मणी पागोटे अशा थाटात करताल वाजवीत गणेशशास्त्री कीर्तनाला उभे राहिले की नवरस हात जोडून उभे राहत. किर्लोस्कर संगीत मंडळी ही त्या कालातील अग्रेसर नाटक मंडळी होती. त्या मंडळीचा सौभद्र खेळ लागला तर गणेशशास्त्री सौभद्र हेच आख्यान आपल्या कीर्तनातून रंगवीत व श्रोत्यांना मंत्रमुग्ध करीत अशी त्यांची ख्याति सांगतात. साथीला अण्णा मोडक व सवाराम गुरव असत. म्हातारपणी गणेशशास्त्र्यांची दृष्टि गेली तेव्हा कीर्तन करायला ते उभे राहात व सर्व हालचाली पायाखालच्या फळीच्याच मर्यादेत स्पर्शज्ञानाने करीत. गणेशशास्त्री यांची परंपरा काशीनाथबुवा शौचे व गोपाळबुवा पंढरपूरकर यांनी चालविली. आपली कीर्तने रंगविण्यात दोघेही मुरब्बी होते. गोपाळबुवा आज हयात आहेत.

इ. स. १९१९ मध्ये नाशिकला कीर्तनसंमेलन झाले. महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांचे संमेलन त्या निमित्ताने नाशिकला भरला होता. संमेलनाच्या अध्यक्षस्थानी नाट्याचार्य श्री. खाडिलकर होते.

बालाजी नवरात्र उत्सवात कित्येक वर्षे चांगल्या कीर्तनकारांच्या कथा होत असत. भद्रकाली मंदिरात दररोज कीर्तन व्हावे अशी एक संघटित

साहित्यनिर्मितीचा व नियतकालिकांचा हा आढावा जितक्या आटोपशीरपणानें, कोणावरही अन्याय न होतां घेतां येईल तेवढा घेण्याचा येथपर्यंत प्रयत्न केला आहे. ग्रंथसूचि, अर्वाचीन मराठी साहित्य सेवक, वारे शास्त्री व लक्ष्मण शास्त्री लेले ह्यांनीं निर्देशिलेल्या नामावळचा, अ. ना. देशपांडे ह्यांचा 'मराठी वाङमयाचा इतिहास', पोतदारांचें 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' हें पुस्तक ह्यांबरोबरच कांहीं व्यक्तींनीं पहावयास दिलेलीं पुस्तकें व इतर माहिती ह्यांचा उपयोग ह्या कामीं झाला आहे. विद्यमान भारतीय साहित्यिकांविषयीं थोडक्यांत परिचय करून देणाऱ्या साहित्य अकादमीच्या 'हूज हू' ह्या पुस्तकाचाही उपयोग झाला आहे. जवळ जवळ ५७०० भारतीय लेखकांपैकीं अठरावीस लेखक नासिक शहरांतील आहेत, असें ह्या संदर्भ-ग्रंथावरून दिसतें. ह्यांत उघडच कांही नांवें राहून गेलीं आहेत. परंतु ज्यांचीं नांवें आहेत असे विद्यमान लोक पुढीलप्रमाणें आहेत. : सर्वश्री. अं. शं. अग्निहोत्री, वि. बा. आंबेकर, व. शं. कानेटकर, कृ. वें. गजेंद्रगडकर, श्री. बा. गोसावी, बा. ग. चव्हाण (यांच्या नांवावर जीं पुस्तकें 'हूज हू'-मध्यें नोंदलीं आहेत तीं पुढीलप्रमाणें आहेत : १) महाराष्ट्र सारस्वत मार्गदर्शिका २) काश्मिरी फुलांची पखरण ३) कल्चर्ड मोती ४) महादजी शिंदे (३ व ४ नाटकें) ५) श्रीमंत माधवराव महाराज शिंदे, ग्वाल्हेर यांची आदर्श राजनीति ६) मराठी साहित्य शोभा (टीका), सोपानदेव चौधरी, दे. ना. टिळक, प्र. वा. ताम्हणे, गो. वि. देवस्थळी, मु. गो. देशपांडे, वि. मा. दी. पटवर्धन, वा. श्री. पुरोहित, गो. के. भट, म. म. श्री. आ. वारे, ल. वि. वेलदे, वि. वा. शिरवाडकर, पां. जि. सबनीस, ब. चिं. सहस्रबुद्धे व वि. दा. सावरकर. या यादींत नजरचुकीनें कांहीं-जणांची नांवें माझ्याकडून राहून गेलीं असतील किंवा मूळ लेखांतही माझ्याकडून सुटलीं असतील हें शक्य आहे. वाचकांनीं एवढीच खात्री बाळगावी कीं हेतुपुरस्सर असें कोठेंही घडलेलें नाहीं. विद्यमान् भारतीय साहित्यिकांच्या सूचीमध्यें श्री. न. र. फाटक यांचें नांव आढळत नाहीं. तेव्हां या लेखांत जर कोणा व्यक्तीच्या कार्याचा उल्लेख राहून गेला असेल तर तो क्षम्य ठरावा



दे. ना. टिळक ह्यांचें ' बालबोध मेवा ' हें मासिक, पांगारकरांचें 'मुमुक्षु', नाथ निफाडकरांचें 'वाङमय', प्रधानाचें 'भारत सेवक' व शहाणे ह्यांचें 'पालवी' ही मासिकें पूर्वी प्रसिद्ध होत असत. सध्यां 'भालचंद्र', 'याज्ञवल्क्य', 'आयुर्वेद पत्रिका' व 'होमिओदूत' आणि 'श्रीधरसंदेश' हीं मासिकें नाशिकमधून प्रसिद्ध होत असतात. 'कुमार' मासिक येथें प्रसिद्ध होत नसले तरी त्यांचें संपादन वि. वा. शिरवाडकर करतात. अिंग्रजी वृत्तव्यवसायांत यश मिळविणारे दिनकर साक्रीकर, युनायटेड अेशियाचे गोपाळ पोहेकर, बाळ चावडकर व श्याम देशपांडे यांनी आपले पाठ या शहरांतच गिरविले.

'गांवकरी',– 'दैनिक व साप्ताहिक', 'रसरंग' साप्ताहिक आणि 'अमृत' व ' श्रीयुत ' मासिकें ही खास उल्लेखनीय आहेत. गावकरी १ जानेवारी १९३८ रोजीं साप्ताहिक म्हणून निघाला. ४२ च्या १५ ऑगस्टपर्यंत चालून पुढें दोन वर्षे तो बंद राहिला. नंतर आणखी कांही वर्षांनी ह्या साप्ताहिकाचें दैनिकांत रूपांतर झालें (विजया-दशमी १९४७). आता जिल्हापत्रच नव्हे तर अेक सर्वांगपरिपूर्ण दैनिक म्हणून त्याची चांगली प्रगति होत आहे. नाशिक कॉंग्रेसच्या वेळी गाव-करीने चांगली कामगिरी बजावली. विशेषत: पश्चिम महाराष्ट्राच्या उत्तर विभागांतील जन-तेच्या प्रश्नांना व सांस्कृतिक, शैक्षणिक आणि क्रीडाविषयक घडामोडींना अवश्य ती प्रसिद्धि देण्याचा उपक्रम श्री. पोतनीस ह्यांनीं चालू ठेविला आहे. रा. ग. जाधव, दत्ता सराफ प्रभृ-तींनीं येथेंच सुरुवातीचे धडे घेतले आहेत. मध्यंतरीं श्री. पां. वा. गाडगीळ हेही गांवकरीला येऊन मिळाले होते. गांवकरीच्या जोडीला औरंगाबादहून 'अजिंठा' हें दैनिकही पोतनीसांनी चालविलें आहे. गांवकरीचे दिवाळी अंकही गेलीं १४–१५ वर्षे निघत असतात. साप्ताहिक गांवकरी अधिक आकर्षक रीतीनें निघू लागला आहे. 'रसरंग' हें पोतनीसाचें साप्ताहिक, क्रीडा, नाट्य आणि चित्रसृष्टि ह्यावरील अतिशय लोकप्रिय असें साप्ताहिक ठरलें आहे. १० मे १९५८ रोजी तें सुरू झालें. श्री. छाजेड यांचें 'लोकवार्ता' हे साप्ताहिकही यशस्वीपणें चालू आहे. गेली २५ वर्षे येथें 'भालचंद्र' मासिक प्रसिद्ध होतें. अतिशय अडचणींतून श्री. वि. दा. दाणी यांनी मासिकाचा संसार चालविला आहे.

'अमृत' मासिकानें सबंध महाराष्ट्राचें एवढेंच नव्हे तर भारतांतील व परदेशांतील मराठी भाषिकाचें लक्ष वेधून घेतलें आहे. डॉ. वर्टी ह्यांच्या कुशल संपादकत्वाखाली तें २६ जाने-वारी १९५२ पासून तें सुरू झालें. संकलनात्मक मासिकाचें कल्पक रीतीनें केलेलें संपादन यशस्वी होईल ही पोतनीसाची कल्पना बरोबर ठरली असून ह्या मासिकानें प्रथमपासून मिळविलेलें यश कायम टिकविलें आहे. सुरुवातीपासून डॉ. वर्टींना साहाय्य करणारे श्री. मनोहर शहाणे आतां वर्टींच्या नंतरही समर्थपणानें व नवनव्या कल्पना अमलांत आणून श्री. अरविंद दत्तात्रय पोतनीस ह्यांच्या सहकार्यानें संपादकाची धुरा वहात आहेत.

डॉ. वर्टी ह्यांचे 'श्रीयुत' हें मासिक त्यांनीं आधीं 'श्री' म्हणून सुरू केलेल्या मासिकाचें धाकटें भावंड ! 'श्री' काही कारणामुळें त्यांना बंद करावें लागलें. पण आता 'श्रीयुत'च्या संपा-दनामध्यें डॉ. वर्टी आपलें सर्व कौशल्य प्रगट करीत असून ह्या मासिकानेंहि अनेक रसिकांना आपल्याकडे खेचून घेतलें आहे. नासिकच्या सांस्कृतिक जीवनाचीं हीं दोन मासिकें सध्यांचीं भूषणें आहेत. परंतु वैचारिक जागृति, संशोधना-त्मक लेखन व सृजनशील ललित वाङमय ह्यां-साठीं कांही मासिकें- अेकदोन तरी- येथून प्रसिद्ध होणें आवश्यक आहे. नासिकच्या बाहेर पुणें व मुंबई येथें कितीतरी नासिककर वृत्तपत्रसृष्टींत आहेत. पुण्याचा 'तरुण भारत' चालविणारे ग. वि. केतकर व वसंत प्रल्हाद गीत आणि मुंब-ईच्या 'टाईम्स'मधील श्री. देशपांडे, श्री. पद्माकर कुलकर्णी, श्री. करमरकर प्रभृतींचा व श्री. दत्ता सराफ यांचा उल्लेख करणें योग्य होईल.

नियतकालिकें व मासिकें:– ' नासिकवृत्त ' ह्या साप्ताहिकाहून जुनें असें कांहीं आढळत नाहीं. 'नासिकवृत्त' १८६९ च्या नोव्हेंबर महिन्यांत सुरू झालें. प्रत्येक शनिवारीं सायंकाळीं तें प्रसिद्ध होई. त्र्यंबक हरि काळे ह्यांनी जरी तें चालविलें होतें तरी गं. न. केतकर त्यांना साहाय्य करीत असत. न्या. रानडयांचें पुण्यांतील सत्कारप्रसंगीचें भाषण, गोखले ह्यांनीं दिलेली वेल्बी कमिशनपुढील साक्ष, कांग्रेसचे ह्युम ह्यांनीं वाळवे येथें भरवलेली शेतकरी परिषद महाबळेश्वरला ब्राम्हणाच्या मिषानें अेका मुसलमानानें देवालयांत केलेला प्रवेश वगैरे त्यांतील मजकूर ऐतिहासिक दृष्टचा महत्त्वाचा आहे. नाशिकमधील इतर घडामोडीही त्यांत चांगल्या तऱ्हेनें प्रतिबिंबित झाल्या आहेत.

हरि विष्णु सहस्रबुद्धे ह्यांचें 'नासिक समाचार' १८७५ पासून शिळाप्रेसवर चालविलें जाओ. हें बहुधा पाक्षिक असावें. येथील सार्वजनिक वाच्नालयांत ह्याचा फक्त अेक अंक काचेंत घालून ठेविला आहे. ' वैद्य सुधाकर ', ' सुबोधसार ' व 'नामस्मरण' ह्या पुस्तकांच्या जाहिराती नोव्हेंबर १८८९ च्या या अंकांत आहेत. 'नासिकवैभव' 'गंगालहरी' व 'लोकसेवा' हीं पत्रेंही नासिक येथें काही काल निघाली. लोकसेवा या पत्रांत गणेशशास्त्री लेले यांचें निधन झाल्याची बातमी व त्यांच्यावरील गौरवपूर्ण शब्दांतील मृत्युलेख लेलेशास्त्री हयात असतांनाच प्रसिद्ध झाला. व या चुकीमुळें संचालक बर्वे यांना फार वाईट वाटलें असें अलीकडे प्रसिद्ध झालेल्या लेलेशास्त्रांच्या पत्रावरून दिसतें.

'लोकसत्ता' हें साप्ताहिक वि. ग. केळकर ह्यांनीं १९२० च्या डिसेंबरांत दत्तजयंतीच्या मुहूर्तावर सुरू केलें. गांधीवधाच्या वेळचे दोन महिने सोडल्यास तें १९५९ डिसेंबरपर्यंत चालू होतें. प्रथम शनिवारीं व पुढें प्रत्येक रविवारीं तें प्रसिद्ध होओ. १९३२ किंवा ३४ पासून तें रविवारी व बुधवारी प्रसिद्ध होऊं लागलें. साहित्य संमेलनासाठीं शुक्रवार ३० ऑक्टोबर १९४२ ह्या दिवशीं निघालेल्या खास अंकांत मं. वि. राजाध्यक्ष, व.. ल. कुलकर्णी प्रभृतींच्या लेखांबरोबरच निकुंबांची अेक कविताही दिली आहे. नासिक–नगर असा गांवांचा संयुक्त उल्लेख लोकसत्ता करीत असे.

'नवा मनु' हें गो. रा. अत्रे ह्यांचें साप्ताहिक १९२७ ते १९३१ पर्यंत प्रत्येक सोमवारीं प्रसिद्ध होई. नासिक–नगर वाङमय विहार मंडळाचें वृत्त व शिरवाडकरांच्या कांहीं कविता अधूनमधून येत. हं. प्रा. टा. महाविद्यालयाच्या सुरुवातीच्या दिवसांत ह्या साप्ताहिकानें लोकांची सहानुभूति महाविद्यालयाकडे वळविण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदु-मुसलमान तंटचाच्या वेळीं प्रखर भूमिका ह्या साप्ताहिकानें घेतली होती. अेक दोन वेळां सरकारी रोषाला बळी पडलेलें नाशिकमधील हें असें अेकमेव वृत्तपत्र दिसतें.

'स्वदेश' ह्या साप्ताहिकाबद्दल महाराष्ट्रांतील इतर ठिकाणींही कुतुहल होतें. डॉ. चिटणीस ह्यांची 'दिदी' ही कादंबरी हयांत क्रमशः आली. हैद्राबादच्या रझाकारांनीं घातलेल्या धुमाकुळाविषयीं स्वदेशनें फार त्वेषानें लिहिलें आहे. वि. वा. शिरवाडकर व रमाकांत वेलदे हे आठवडचातून दोनदां प्रसिद्ध होणाऱ्या ह्या अर्धसाप्ताहिकाचें संपादक होते. पुढें वेलदे हेच संपादक राहिले व 'स्वदेश' फक्त साप्ताहिक झाला. १९४९ सालीं स्वदेश बंद झाला. गोपाळराव सौदणकर तो चालवीत असत.

ह्या निर्देशाखेरीज बा. ज. मराठे ह्यांचें 'स्वातंत्र्य' हें साप्ताहिक, प्रथम पुण्याहून व नंतर नाशिकहून निघणारे कुर्तकोटी ह्यांचें 'स्वधर्म' हें साप्ताहिक, अत्रे वकील ह्यांचें भोपटकरांच्या आशीर्वादानें १९३७मध्यें सुरू झालेलें 'चैतन्य' हें दुसरें साप्ताहिक, रावसाहेब ओक ह्यांचें 'समता' हें साप्ताहिक आणि 'कोहिनूर' 'रामराज्य', 'शेतकरी', 'आसूड', 'तानाजी' इत्यादि नांवे आतां इतिहासजमा झालीं असलीं तरी ह्या प्रत्येकानें आपापल्या परीनें महत्त्वाची सेवा बजाविली आहे.

महत्त्वाचें पुस्तक मागील वर्षी लिहिलें. या विषयावरील आटोपशीर असे मराठीतील हें पहिलेंच पुस्तक असावें. गीतेवरील डॉ. देवस्थळी व डॉ. केंघे यांची पुस्तकें उल्लेखनीय आहेत. डॉ. खाडिलकर व वामनशास्त्री दातार ह्याची नाणी वगैरे संबंधीही आयुर्वेदावरील पुस्तकें प्रसिद्ध आहेत. डॉ. चि. ल. मुळे यांचे 'माझें घर' हें पुस्तक फार लोकप्रिय ठरलें होतें. लिहिणारे अभ्यासक आहेत. श्री. प्रभाकर वैशंपायन यांच्याकडे असलेल्या दुर्मिळ ऐति— हासिक नाण्यांसंबंधी बनारसच्या संशोधनात्मक मासिकांत माहिती आली असून त्यांनी स्वतः भारत अितिहास संशोधक मंडळांत आपले निबंध वाचले आहेत.

माधवराव लिमये, सौ. कुसुम पटवर्धन, देवीदास बागुल वगैरे लेखकही यशस्वी अनु— वादकांच्या मालिकेंत बसतात आणि यापैकी लिमये व देवीदास बागूल हे तर स्वतंत्र ललित लेखन व वृत्तपत्र लेखनही करीत आहेत.

महाराष्ट्रीय संतवाङमय प्रकाशन संस्था आपल्या परीनें भक्ति वाङमयाचा प्रसार करीत आहे. भगवन्नाम महात्म्य, वारकरी जीवन, ज्ञाने- श्वर महाराजांचे समग्र ग्रंथ, एकनाथी भागवत, ज्ञानेश्वर, निवृत्तिनाथ, सोपानदेव, मुक्ताबाई व चांगदेव यांचे संपूर्ण अभंग ही पुस्तकें श्री. करवा यांनी या संस्थेच्या नांवें प्रकाशित केलीं आहेत. प्रा. गजेंद्रगडकर यांनीं रा. द. रानडे यांच्या 'मिस्टिसिझम अिन् महाराष्ट्र' या पुस्त- कांचे खंडशः ऊर्दू व इंग्रजी भाषांतर मराठींत केलें आहे.

हजरत अब्दुल रज्झाक 'शेवन' हें उर्दूतील अतिशय प्रसिद्ध असे नाशिकचे कवि. धार्मिक वाङमय लिहिणारे मौलवी अिमामुद्दीन व त्यांचे चिरंजीव मौलवी वशिरुद्दीन हे नाशिक मधील उर्दु पंडित मानले जातात. महंमद पैगंबराचें चरित्र व 'गुलजारे—ए—सादिक' या दोन पुस्तकांचा तरी उल्लेख केला पाहिजे. नाशिकला गुलशनाबाद असें पूर्वी म्हणत असत हें नाशिकच्या या अितिहासावरून समजतें.

इंग्रजी भाषेंतून लेखन करणाऱ्यांपैकी पहिलें नाव रा. ग. प्रधान यांचें घेतां येईल. गं. दे. खानोलकरांनी अर्वाचीन मराठी वाङमय- सेवकात त्यांच्या ग्रंथांची यादी दिली आहे. तींत खालील तीन अिंग्रजी ग्रंथ वाढविले पाहिजेत. १ अिंडियन स्ट्रगल फॉर स्वराज्य, २ प्रिन्सिपल्स ऑफ द कॉन्स्टिटयूशन ऑफ द युनायटेड स्टेटस् ऑफ अिंडिया, ३) नोशन ऑफ किंगशिप् इन् द शुक्रनीति. प्रधानांनीं लिहिलेला स्वराज्याचा इतिहास अत्यंत साक्षेपीपणानें मांडला आहे. सायमन कमिशननंतर भरणाऱ्या राऊंड टेबल परिषदेविषयीं व हिंदी राज्यव्यवस्थेविषयीं दुस- ऱ्यांत चर्चा असून संरक्षण प्रश्नाविषयींची प्रधा- नांची भूमिका आपणास समजून येते व त्यांच्या धोरणीपणाचें व राजनीतिज्ञतेचें त्या पुस्तकांत दर्शन घडतें. श्री. प्र. वा. देवळालकर वकील यांचें कायद्यासंबंधीचें पुस्तकही महत्त्वाचें आहे. डॉ. कुर्तकोटी यांचें 'ईक्वालिटी—ए स्टटी अिन द भगवद्गीता' हें पुस्तकही महत्त्वाचें आहे. डॉ. गो. वि. देवस्थळी यांनी संस्कृत हस्तलिखितांची महत्वपूर्ण संदर्भसूचि तयार केली असून मुंबअी विद्यापीठाच्या वाचनालयांतील हस्तलिखितें त्यांत नोंदली आहेत. गौरवग्रंथांतून व इतर संपादकांच्या नेतृत्वानें तयार होणाऱ्या पुस्तकांतून कांहीं लेख त्यांनीं लिहिले आहेत. अलीकडे इंडियन ॲंटि- क्वेरीचें संपादन त्यांनीं 'ओरिएंटल थॉट'च्या संपादनानंतर सुरू केलें आहे. प्रा. गजेंद्रगडकर यांनीं अरिस्टॉटलच्या मीमांसेविषयीं लिहिलें आहे. पां. जि. सबनीस यांनीं 'चार्वाक' हें इंग्रजी नाटक लिहिलें आहे. विशेष आवर्जून ज्यांचा उल्लेख करायला पाहिजे ते दोन अिंग्रज गृहस्थ म्हणजे जॅक्सन व किंकेड हे होत. जॅक्सनच्या संस्कृत व पुराणवाङमयाच्या अभ्यासाबद्दल गौरव- पूर्ण उल्लेख डॉ. भांडारकर यांनीं केले आहेत तर किंकेड यांचें नांव अितिहास-वाङमयांत तर सर्वश्रुतच आहे.

महानुभाव 'विचारविहार'(बेदरकर), रियासतकार सरदेसाई यांच्या निबंधांचें पुनर्मुद्रण, 'इंग्रजी कसें शिकवावें' (प्रा. मु. गो. देशपांडे), 'प्रो. विजापूरकर यांचे लेख' (प्रा. देशपांडे), विवेकानंद जन्मशताब्दि महोत्सव समितीनें प्रसिद्ध केलेला 'स्मृतिगौरव ग्रंथ' (प्रा. मो. स.गोसावी) या प्रयत्नांचा करतां येईल. 'प्रो. विजापूरकर यांचे लेख' हें मागील वर्षातील एक महत्त्वाचें पुस्तक असा अभिप्राय सर्व जाणत्या मंडळींनीं व्यक्त केला आहे. प्रा. रा. श्री. जोग व कवि कुसुमाग्रज यांनीं संपादित केलेलें काव्य-वाहिनीचें पांच भागही अतिशय महत्त्वाचें संपादन आहे.

संकीर्ण : या विभागांत गणेश 'शास्त्री लेल्यांच्या कितीतरी पुस्तकांची माहिती 'मराठी गद्याचा इंग्रजी अवतार' यांत दिली आहे. तीर्थयात्रा प्रबंध या ग. स. लेलेशास्त्री यांच्या नासिक- वृत्त छापखान्यांत छापलेल्या १८८५ च्या पुस्तकांचा उल्लेख प्रथम येतो. तीर्थयात्रा प्रबंध हें पुस्तक सरदार रघुनाथराव विंचूरकर यांनीं उत्तर हिंदुस्थान, मध्य हिंदुस्थान आणि दक्षिण हिंदुस्थान यांची जी यात्रा सन १८४८ पासून १८७४—७५ पर्यंत, मधून मधून कांहीं वर्षे आपल्या संस्थानचा कारभार पहात, पूर्ण केली तिजविषयीच्या टिपणांवर आधारलेलें आहे. लेलेशास्त्री प्रकृतीच्या कारणास्तव श्रीमंत विंचूरकर यांच्याबरोबर जाऊं शकले नाहींत. परंतु प्रवासांतील सर्व हकीकतीचें टिपण त्यांच्याकडे पाठविलें जाई. अतिका संगतवार, माहीतगारपणानें भरलेला, ऐतिहासिक घटनांचा उल्लेख असणारा, परंपरा व संस्कृति यांचा परिचय करून देणारा आणि महाराष्ट्राच्या व भारताच्या त्यावेळच्या महत्त्वाच्या व्यक्तींबद्दल थोडक्यांत महत्त्वाचें सांगणारा असा हा प्रबंध वाचून लेलेशास्त्रांच्या व्युत्पन्नमतित्वाचें कौतुक वाटतें. सरदार विंचूरकर यांचें हें चरित्रच आहे असें म्हटलें तरी चालेल. एक बहुमोल साधन ग्रंथ म्हणून याकडे आतां विद्वानांची नजर खात्रीनें जाईल. यांतील शिलालेखांचा उल्लेख अतिशय उपयुक्त आहे. नाशिक शहरवासीयांना या पुस्तकाचें महत्त्व वेगळें सांगावयास नको. त्यावेळची नाशिक नगरपालिका, तिचें उत्पन्न, शहरची लोकवस्ती, शाळा वगैरेंबद्दल या पुस्तकांत थोडक्यांत माहिती दिली आहे. या महोत्सव ग्रंथाच्या वेळीं हें प्रकाशन देशमुखांनीं प्रसिद्ध केलें हा उत्तम योगायोग! शिक्षण विषयक, राज्यशास्त्र विषयक वगैरे जीं पुस्तकें नजरे समोर येतात त्यांत रा. ग. प्रधान यांचीं तीन पुस्तकें महत्त्वाचीं आहेत. १) प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धति, २)प्लेटो व त्याचे राजकीय विचार ३) भारत सेवकांतील निवडक लेख. जॉन स्टुअर्ट मिलच्या पुस्तकाचें भाषांतर म्हणून पहिल्याचें महत्त्व. शिवाय जयकरांनीं त्याला प्रस्तावना लिहिली आहे व प्रधानांनीं स्वतःच्या अनुभवानें योग्य तें स्वतंत्र लेखनही यांत समाविष्ट केलें आहे. श्री. निमकर ह्यांचें हिंदु लग्न संस्था हें पुस्तकही महत्वपूर्ण आहे. जोगळेकर यांनीं प्लेटोची आदर्श राज्य व्यवस्था हें पुस्तक रिपब्लिकवरून तयार केलें आहे. ग. वि. अकोलकर यांनीं शिक्षण विषयावर बरींच पुस्तकें लिहिलीं असून त्यांतील कांहीं अतिशय महत्त्वाचीं ठरलीं आहेत. ड्यूईच्या पुस्तकाचा अनुवाद म्हणून लोकशाही व शिक्षण हें पुस्तक महत्त्वाचें आहे. 'मातृभाषेचें अध्यापन' हें त्यांनीं एका प्राध्यापकांच्या सहकार्यानें लिहिलेले पुस्तक फारच चांगलें उतरलेलें आहे. शैक्षणिक मनोविज्ञान, शैक्षणिक मूलतत्वें, नवशिक्षण प्रवाह आणि प्रवृत्ति, रशियांतील विद्यामंदिरें वगैरे त्यांनीं लिहिलेलीं अितर पुस्तकें. गांधी वाङ्मयाचा अनुवादही त्यांनीं केला असून गांधी शिक्षण—विचार व गांधी—भाषा,कला व संस्कृति हीं दोन पुस्तकें अलीकडेच प्रकाशित झालीं आहेत. प्रा. मु. गो. देशपांडे यांनींही गांधीजींच्या स्त्रीजीवन विषयक लेखांचा अनुवाद 'स्त्रियांशीं हितगुज' या नांवाच्या पुस्तकांत पूर्वी केला आहे. डॉ. सुधीर फडके यांनीं 'महाराष्ट्रांतील आदिवासी व त्याचे प्रश्न' या नांवाचें एक

वंधामुळें अभिमानास्पद वाटावी यांत नवल नाही.

स्फुट टीकात्मक लेखनाचा पहिला अुल्लेख अनंत वामन बर्वे यांचा करावा लागेल. त्यांनी 'शकार' या भूमिकेबद्दल लिहिलें आहे. दे. ना. टिळक यांचा 'माधवानुज' हा लेख अुल्लेखनीय आहे. नाथ निफाडकर यांनी निरंजनमाधवासंबंधी लिहिलें आहे वि. वा. शिरवाडकर यांनी थोडेंच परन्तु महत्त्वाचें टीकालेखन केले असून 'आयोगो'वरील त्यांचा लेख याची साक्ष देईल. प्रा. आवेकर यांनी ज्ञानप्रकाशमधून अनेक वाङ्मयीन विषयावर व वाङ्मयसेवकांवर 'तरंग व तुषार' या मदरान बरीच वर्षे सातत्यानें दर आठवड्याला चांगलें टीकालेखन केलें आहे. पांगारकर--साहित्य गौरव या ग्रंथांतही त्यांचा अेक लेख समाविष्ट करण्यांत आला आहे. प्रा. मु. गो. देशपांडे यांनीं स्फुट लेखनाबरोबरच 'पाश्चात्य प्रतिभा' हें पुस्तक मागील वर्षीच प्रसिद्ध केलें आहे. या ग्रंथाला अिदूरच्या महाराष्ट्र साहित्य संस्थेने बक्षीस दिलें आहे. प्रा. वा. वा. दातार यांचा 'मराठी नाटकांतील विनोद' हा पी अेच्. डी. चा प्रबंध प्रकाशनाच्या मार्गावर आहे. त्यांतील संशोधनाचा भाग महत्त्वाचा असून विवेचन मर्मग्राही आहे. प्रा. वसंत कानेटकर व प्रा. रा. ग. जाधव यांचाही अुल्लेख मर्मग्राही टीकाकार म्हणून येथें आवश्यक आहे. 'पांगारकर–साहित्यगौरव' या ग्रंथांत ज्यांचे लेख समाविष्ट करण्यांत आले आहेत ते म्हणजे ग. वि. अकोलकर व पां. जि. सबनीस हे होत. अशोक देवदत्त टिळक यांचा 'कविवर्य टिळक' हा पीएच्. डी. चा प्रबंधही लवकरच प्रकाशित होईल.

संपादनकार्य व संस्कृत ग्रंथसंपत्तीचा अभ्यास :

श्रीधरशास्त्री वारे यांनी लिहिलेला 'संस्कृत साहित्याचें महत्त्व' हा 'पांगारकर–साहित्य–गौरव' या ग्रंथांतील लेख नाशिकमधील ग्रंथ–निर्मितीचा आढावा घेणाराही आहे. त्यांत विठोबा अण्णा दप्तरदार, पद्मेगावकर, अच्युतराव मोडक वगैरेंच्या कामगिरीबरोबरच स्वतः वारेशास्त्री यांच्या ग्रंथांचीही नोंद आढळते. 'शुक्ल यजुर्वेदीय वाङ्मयपरिचय' या पुस्तकाशिवाय संस्कृतमध्यें 'दत्तकनिर्णयामृतम्', 'शत पथ ब्राम्हण', 'सायणभाष्य' (५ खंड) वगैरे भाष्यें त्यांनीं लिहिलीं आहेत. होशिंग, दिनकरशास्त्री खांबेटे वगैरे नांवेही या संदर्भात उल्लेखनीय आहेत संस्कृत विद्येच्या या व्यासंगांत डॉ भांडारकर यांचे काहीं काळ गुरु असणारे आप्पाशास्त्री खाडिलकर, हरिशास्त्री गर्गे, गणेशशास्त्री भागवत, यादवशास्त्री टकले अित्यादींचीं नांवें महत्त्वाचीं आहेत. दादा देव, नारायणशास्त्री फडके, एकनाथपंत गर्गे, सखारामशास्त्री दीक्षित, गोविंदशास्त्री निरंतर, त्र्यंबक रामचंद्र कुलकर्णी उर्फ कविकौस्तुभ यांचीं नावें आदरणीय म्हणून लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं अितर आणखी कितीतरी विद्वानांबरोबर 'जनस्थानप्रशंसा' या कवितेंत गोंवलेलीं आहेत.

'परशुराम कवीच्या लावण्या' हें पुस्तक स्वतः बरीच शाहिरी कविता लिहिणारे बळवंत खंडूजी पारख यांनी तयार केलें असल्याचा उल्लेखही या कवितेत आला आहे. तो चिंत्य आहे. अितर संपादनकार्याचा थोडक्यांत निर्देश करायचा म्हणजे 'स्मृतिचित्रांची संक्षिप्त आवृत्ति' (दे. ना. टिळक), बालकवींची कविता (पाटणकर), 'रामदासी बोवा' या जप्त पुस्तकावरील बंदी कै. गोविंदराव देशपांडे वगैरेंच्या प्रयत्नानें उठल्यानंतर केलेलें पुनमुद्रण (ग. त्र्यं. बगदे), 'समर्थ संजीवनी' या पुस्तकाचें, पांगारकरांनी टाकळी येथील जीर्णोद्धारासाठीं जी चोवीस कलमी योजना प्रसिद्ध केली होती, तिच्यासह केलेलें पुनर्मुद्रण (ग. त्र्यं. बगदे), महानुभाव यल्हण सुत विद्वांस कृत 'श्रीकृष्ण बाळक्रीडा ग्रंथ' (जामोदकर)

आवेशयुक्त प्रयत्न सहज समजण्यासारखा आहे. एके ठिकाणी ते लिहितात, "त्यांनी (रमाबाईंनी) आपल्या धर्माव्यतिरिक्त सारें हिंदुत्व कायम ठेविलें होतें." हिंदुत्व म्हणजे भारतीय नागरिकत्व अशी ही कल्पना दिसते !

पांगारकरांच्या 'चरित्रचंद्रां'त आढळणारी आत्मश्लाघा—दर्पोक्ति नव्हे—प्रासादिक लेखनाचा हें आत्मचरित्र हा उत्कृष्ट नमुना ठरेल. त्यांच्या भाविक अंत:करणाचा तो आरसाच आहे.

वाङमय समालोचन व संपादन कार्य

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांनी लिहिलेला मराठी वाङमयाचा अितिहास हें या दालनांतील अतिशय महत्त्वाचे लेखन. त्यांनी लिहिलेली कविचरित्रें त्यांची कीर्ति सुप्रतिष्ठित करणारी अशी आधीच ठरलीं होती. निरंजन माधवासंबंधींचें त्यांचें संशोधनकार्यही सर्वश्रुतच आहे. परंतु त्यांच्या आधी या दालनांत ज्याचा उल्लेख पुन: एकदां करायचा ते गणेशशास्त्री लेले. यांनीं साहित्यशास्त्र संस्कृत वाङमयाच्या आधारानें लिहिलें आहे. काव्याचें लक्षण व प्रयोजन, शब्दांच्या शक्ती वगैरेविषयीं सूत्ररूपानें या ग्रंथांत विवेचन आलें आहे.

पांगारकरांच्या वाङमयाच्या त्रिखंडात्मक अितिहासांत पाल्हाळ आला त्याची कारणें लक्षांत घेतली पाहिजेत. विद्यापीठामधून देशी भाषांचा अभ्यास आस्थेनें सुरू व्हावयाचा होता. पूर्वींचें वाङमय लोकांपर्यंत पोंचावयाचें होतें. अशा काळांतील स्फूर्ति घेऊन केलेलें, आपल्या धर्मकल्पना, संस्कृति, परंपरा, कुलाचार आणि संप्रदाय यांच्या यथायोग्य जाणिवेनें निर्माण झालेलें असें हें लेखन आहे. शिवाय, आज जरी प्रांतीय भाषा सन्मानपूर्वक आपला संसार चालवीत असल्या तरी अेकमेकींविषयींचा प्रेमभाव या भाषांत तेव्हां होता तेवढा आज आढळत नाहीं. मद्रासच्या परीक्षांना मराठी हा विषय पूर्वी होता; तामीळ भाषेबद्दल महाराष्ट्रांत आस्था होती. किंबहुना बंगाली भाषा, तामीळ भाषा, आंग्लची भाषा यांबद्दल त्या काळांत आपल्याला जेवढी आस्था होती तेवढी सध्यां मुळींच आढळत नाहीं. या कारणांचा विचार केला तर वाङमयाच्या अितिहासांत संस्कृतीचीं महत्त्वाचीं असलेलीं भक्तिमार्गाची पूर्वपीठिका दर्शविणारीं अंगें, मराठी भाषेची सुरुवात, तामीळ भाषा व वाङमय वगैरेंविषयी पांगारकरांनीं केलेला उहापोह समजू शकतो. अच्युतराव कोल्हटकर तामीळ साहित्याचें समालोचन मासिक मनोरंजनांत पूर्वी करीत असत हें ज्यांना माहीत आहे त्यांना पांगारकरांच्या अितिहासांतील या मजकुराची सयुक्तिकता समजेल. आपल्याकडील वाङमय-सेवकांच्या विवेचनांत निरनिराळ्या वर्गीकरणाखालीं अुतारेच्या अुतारे पांगारकर देतात याचेंही कारण तें वाङमय लोकांपुढें यावे ही तळमळ होय. व्युत्पत्तिज्ञान असणाऱ्या भांडारकर किंवा राजवाडे यांच्यासारख्या विद्वानांचीही परंपरा न समजल्यास दिशाभूल होतें असें पांगारकर दाखवून देतात.

ग्रंथस्वरूपांत याखेरीज अितर कांही या आढाव्यांत नोंदण्यासारखें आढळत नाहीं. आजच्या सुविख्यात अशा दोन टीकाकारांचीं नांवें मनासमोर येतात. प्रा. वा. ल. कुलकर्णी हे मूळचे नासिकचे. त्यांनीं आपलें लेखन बाहेरगांवीं गेल्यानंतर केले आहे. प्रा. रा. श्री. जोग यांनीं 'अभिनव काव्यप्रकाश' हा प्रसिद्ध ग्रंथ नासिक येथील वास्तव्यांत लिहिला परंतु त्यानंतरचें त्यांचें सर्व लेखन पुण्यांतूनच झाले. प्रा. दि. के. बेडेकर याही टीकाकाराचा नासिकच्या वाङमयीन जीवनाशीं निकटचा संबंध प्रस्थापित झाला होता परंतु तो दोन-तीन वर्षांपेक्षां अधिक टिकला नाही. प्रा. माधव मनोहर हे या क्षेत्रांत गाजलेले आहेत. प्रा. गो. के. भट हेही नाशिकचे राहाणारे. परंतु नासिकबाहेर गेल्यावर या दोघांनीं समीक्षाक्षेत्रांत लौकिक संपादन केला. महाराष्ट्राला परिचित असलेली या ख्यातनाम टीकाकाराची साहित्यसेवा, पूर्वीच्या ऋणानु-

तील लोकांना जवळचे कोणीतरी असल्यासारखी पटेल. ना. धो. ताम्हणकर यांचे लेखन सर्व-परिचित आहे.

चरित्र व आत्मचरित्र : एकूण मराठी वाङमयांत या शभर वर्षांच्या मुदतीत दीड हजाराहून अधिक चरित्रें लिहिलीं गेलेली नसा-वीत. या आधीच लहान असणाऱ्या संख्येंतील नाशिकची भर फार तुटपुंजी आहे. मात्र 'स्मृतिचित्रें', 'चरित्रचंद्र', 'पंडिता रमाबाई', 'माझ्या आठवणी' व 'मॅझिनीचें चरित्र' ही पुस्तकें या दालनांत येत असल्यानें सर्व मराठी भाषिकांना या कामगिरीबद्दल धन्यता वाटणे स्वाभाविक आहे. या पुस्तकाकडे वळण्यापूर्वी कांही अितर प्रयत्नांची दखल घेणे युक्त होईल. गणेशशास्त्री लेले याचा क्रम येथेंही पहिलाच आहे. त्यांनीं लिहिलेली कप्तान कुक, कोलंबस व यशवंतराव महाराज ही चरित्रें जुन्या वळणाचीं आहेत. मराठी गद्याचा इग्रजी अवतार या पुस्तकांत कप्तान कुकच्या चरित्रांतील एक संवाद उद्धृत केला आहे. ब. ख. पारख यांनीं ज्ञानेश्वरांचें व वज्रेश्वरीचें चरित्र लिहिलें आहे. 'वज्रेश्वरीचें चरित्र' हें पुस्तक या विभागांत पडेल कीं कादंबरींत पडेल या-बद्दल मला थोडी शंका आहे. रेनॉल्डसच्या एका कादंबरीचा 'वज्रेश्वरी' असा अनुवाद पूर्वी झाला आहे. पारखानीं असेच कांहीं केलें असणें संभवनीय आहे. मूळ पुस्तक पहावयास मिळालें नाहीं. गंगाधर नरसिंह केतकर यांचें चरित्र लक्ष्मणशास्त्री लेले यांनीं लिहिलें आहे. वामनशात्री दातार यांनीं वैद्य देवधर व कवि गोविंद हीं चरित्रें आत्मीयतेनें लिहिली आहेत. महाबळ गुरुजींचें 'राजरत्न माणिकराव' हें चरित्र बऱ्याचजणाना माहीत आहे. डॉ. गुप्ते यांचे 'अलेक्झांडर' मवनीमाचे 'रूसो', पिंगळे यांचें 'हैदर चरित्र', अकोलकरांचे 'मादाम क्यूरी' ही चरित्रेंही उल्लेखनीय आहेत. 'पांगारकर व्यक्ति व वाङमय' हा निबंधही त्यांनी पांगारकर गौरव ग्रंथांत लिहिला आहे. महाबळ गुरुजींचे चिरंजीव प्रभाकरपंत यांच्या अकाली निधनानंतर त्यांच्या स्मृति-गौरवार्थही एक पुस्तक लिहिण्यात आलें आहे. अगदीं अलीकडे वा. श्री. पुरोहित यांनीं 'मराठी नाटकें—माझा छंद' हें आत्मचरित्रात्मक पुस्तक लिहिलें आहे. 'माझी भूमिका' हें गणपतराव बोडसांचे पुस्तक नाशिकला प्रथम प्रसिद्ध झालें इत्यादि त्यांतील माहिती सध्यांच्या आपल्या संदर्भात उद्बोधक आहे. पु. ह. गद्रे यांनीं 'तुकाराम महाराजांची चरित्रगंगा' हें पुस्तक लिहून मोठीच कामगिरी केली आहे.

लक्ष्मीबाई टिळकांच्या स्मृतिचित्रांचे चार भाग मराठी वाङमयाचें एक महनीय लेणें आहे. आचार्य अत्रे यांच्यापासून गंगाधर गाड-गिळापर्यंत सर्व साहित्यिकानीं या पुस्तकापुढें आपलीं मस्तकें विनम्र केलीं आहेत. पत्नीनें स्वत:विषयी व आपल्या महामना परंतु कलंदर पतीविषयी लिहिलेलें हें लेखन अवश्य तेथें तेथें हृदयाला भिडणारें असून अितर ठिकाणीं अतिशय प्रसन्न, स्वाभाविक, मोकळेपणाचें व प्रत्ययकारी झालें आहे. याचें कारण लक्ष्मी-बाअीच्या सात्विक व्यक्तिमत्वांत आहे आणि व्यवहारदक्षतेंत व मिस्किलपणातही आहे. त्यांनीं स्वीकारलेला ख्रिश्चन धर्म त्यांच्या या विनोद-वृत्तीला अधिक मोकळेपणा देऊं शकला असें म्हणतां येईल काय?

सावरकरांच्या आठवणींचा सुरुवातीचा भाग नाशिक येथील वास्तव्यासंबंधीचा असून त्यांच्या प्रखर व्यक्तिमत्वाची घडण समजण्याच्या दृष्टीनें हें पुस्तक फार महत्त्वाचें आहे. लंडन-मध्यें १९०७ साली मॅझिनीच्या आत्मचरित्राचें त्यांनीं भाषांतर केलें. मॅझिनी हें दैवत असणारे हरिभाऊ आपटयांचेदेखील कांहीं नायक आहेत. सावरकरानींच १९५९ च्या सह्याद्रि दिवाळी अंकात मॅझिनीच्या चरित्रलेखनाची पार्श्वभूमि सांगितली असल्याने येथें अधिक कांहीं लिहि-ण्याची आवश्यकता नाहीं.

'पंडिता रमाबाई' हें दे. ना. टिळक यांनीं लिहिलेलें चरित्र भरपूर साधनें मिळवून लिहिलेलें आहे. टिळकांचा रमाबाअींचें समर्थन करण्याचा

महाल नदी बाजू, वेताळाच्या जवळ, पांजरपोळाजवळ, यशवंत व्यायाम शाळा, शरणपूर मैदान, हेला पटांगण, पेठ ग्राऊंड, गोल्फ ग्राऊंड, पोलीस परेड ग्राऊंड व निरनिराळ्या शाळांचीं मैदानें या ठिकाणीं विविध सामने होतात. तथापि नाशकांत एका सुसज्ज क्रीडामंदिराची व प्रेक्षागृहाची आवश्यकता आहे. वाढत्या वस्ती बरोबर क्रीडांगणें कमी होत चालली आहेत. व्यस्त प्रमाणांत ! ही परिस्थिति गंभीर आहे कुस्तीकरितां लोकमान्य टिळक खुलें नाटयगृह कांहीं अंशांनीं उपयोगी पडतें. तथापि एक भव्य असें क्रीडांगण ही शतसांवत्सरीच्या निमित्ताने ठळकपणें नजरेंत भरण्यासारखी गरज आहे नासिकच्या परिसरांत कांहीं जागा पद्धतशीर पणे आतांच राखून ठेवल्यास नासिक हें क्रीडांगणांचें शहर म्हणून प्रसिद्ध होण्यास भरपूर वाव आहे.

नासिकमधील व्यायामाचीं ठिकाणें

गंगापात्र, गंगाकांठावरील पटांगणें. कॉलेज रोडवरील तालीम, घणकर आळी, दाडेकर, दीक्षित, ओक, भानोसे, रंगोपंत कुलकर्णी, बालाजी, मोहन मास्तर, छपरीची, मौलाबाबा, धनगर समाज, विराम वस्ताद, माळी समाजाची फुले तालीम, बंडू वस्ताद, काळे, मोठी (आखाड्याची), पंचवटी दीक्षित तालीम, पाथरट, गणेशवाडी. रोकडोबा, आंबेडकर कॉलनी, मधली होळी, सेंट जॉर्ज हायस्कूल तालीम, न्यू इंग्लिश स्कूल तालीम, उदोजी मराठा बोर्डिंग, हं. प्रा. ठा. कॉलेज, सेकंडरी टीचर्स स्पोर्टस् असोसिएशन, बॉइज् टाऊन, भोसला मिलीटरी, कलाल, काळूभाईची तालीम, बालयुवक संघ, यशवंत व्यायाम शाळा, अहिल्याराम व्यायाम शाळा, तरुण ऐक्य मंडळ, गुलालवाडी, नवी तांबट आळी, विद्यार्थी संघ, बालाजी संघ, भगवंत व्यायाम शाळा, यशवंत व्यायाम प्रसारक मध्यवर्ती मंडळ, वाघाडी तालीम, नासिक शहर कुस्तीगीर संघ, नासिक जिल्हा तालीम संघ, अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळ, जिमखाना, मित्रविहार, दीपक मंडळ, अ वि गृह तालीम, नरसिंगपुरा तालीम, नृसिंह व्यायाम शाळा (भोईर तालीम), भक्त प्रल्हाद व्यायाम शाळा, शेंडोबा तालीम, नासिक शहर क्रीडा मंडळ, होमगार्ड, पोलीस ट्रेनिंग कॉलेज, निरनिराळी हायस्कूलें, प्राथमिक शाळांचीं पटांगणें, सी. पी. एड् इन्स्टिटयूट आदि संस्था, ठिकाणें, तालमी, व्यायाम शाळा वगैरे ठिकाणीं व्यायाम वा शारीरिक शिक्षण घेतलें जात असे. आज त्यापैकीं काहीं संस्था विद्यमान नसल्या तरी त्यांनी बरेंच भरीव कार्य केलें आहे. नासिक नगरपालिकेनें यांपैकीं अनेक संस्थांना त्यांचा योगक्षेम चालण्याकरितां अनुदानरूपानें भरपूर साहाय्य दिलें आहे.

सी. पी. एड् व इतर कोर्सेस

शारीरिक शिक्षण क्षेत्रांतील शिक्षक तयार व्हावेत याकरितां नासिकमध्ये मराठा एज्युकेशन सोसायटीनें सी. पी एड्.चा कोर्स सुरू केला आहे व तो चांगल्या तऱ्हेनें चालला आहे

कांदिवलीचा शिक्षणक्रम यशस्वी रीतीनें पुरा करून पुष्कळसे पदवीधर नाशकांतील विविध संस्थांत शारीरिक शिक्षकाचें काम करीत आहेत.

याशिवाय अहिल्याराम, गुलालवाडी व यशवंत व्यायाम शाळा यांनीहि उन्हाळी शारीरिक शिक्षण शिबिरें वर्षानुवर्षे घेतली आहेत.

कुस्ती–नासिक शहर हें कुस्तीकरितां उत्तर महाराष्ट्रांत प्रसिद्ध आहे. ३०–४० हजार वस्तीच्या त्यावेळच्या नाशकांतहि ३२ पर्यंत तालमींची संख्या होती यावरून मेहनत घेणारांचें प्रमाण किती होतें याची कल्पना येईल. कुस्त्यांचे दंगल नाशकांत फार वर्षांपासून होत असत. आजहि निरनिराळ्या निमित्तानें ते होत आहेत. आर्थिक दृष्टया संपन्न लोकहि कुस्त्या खेळत. तथापि हा शौक प्राधान्यें करून आर्थिक दृष्टया तृतीय श्रेणींतील नागरिकांत अधिक प्रमाणांत आढळून येतो. कुस्ती ही मोठ्या प्रमाणांत खेळली जात होती. त्यामुळें लहानथोर खेळणारे पुष्कळच होते व आहेत. त्या सर्वांचा नामनिर्देश

करणे कठीण. तथापि चटकन ज्यांची नावे राहिली आहेत त्यांची क्षमामागून पुढे यादी सादर करीत आहोत. या यादी अकारविल्हेवारीने दिली आहे. पहिलवान मंडळी आडनांवापेक्षा त्यांच्या अंगच्या नावानेच अधिक लोकप्रिय असतात व ओळखली जात. ती मंडळी अशी—उदयप्रभु, उद्धव जाधव, उपळेकर, कृष्णाजी पहिलवान, कल्याणजी कृष्णाजी फडतरे, केशवराव भागवत, काशिनाथ खंडू मोरे, खंडू पाटील, खोडे, गणू गाडे, गोपाळा हमाल, गोविंद नयाजी, गवंडी (कुस्तीशिक्षक), गणपत भालेराव, गंगाधर जोशी, गणपत शुक्ल, गुलाम महम्मद, गणेश भट पटवर्धन, गोपाळराव क्षेमकल्याणी, घमन हलवाई, चैनीदादा, चांदवड, का, टमाजी मामा, छकुल्या वस्ताद, छोटूमा क्षत्रिय, छत्र दादा भोईर, जाधव (डेक्कन गुरु-) जाधव बंधू, जोशी (एम. टी.) टिपण्णा डुकरे बंधू तान्याबा शेलार, तुकाराम गाडे, तात्या सुतार, त्र्यंबकनाथ फाटक मास्तर, त्र्यंबक नगाजी, दगडू लोणारी दादा गद्रे, दगडू पाटील देशपांडे दाजी गायधनी, दामुअण्णा नवात्रे, दिल फरास, दे शर्मा, धुमाळ वकील धोंड-भट लेले धोंडभट विश्वामित्र, नाथ, नारायणराव देशकर, पचभाई मास्तर, प्रभाकर अभोणकर, प्रभाकर महाबळ, पाचे, बारक्या भुजारी, बिरजा, बिराम वस्ताद बंडू पहिलवान, बच्चू वानेरी बाळू पहिलवान बाजीराव माळी, बापुराव गायधनी, बजरंग, बापू श्रीधर दीक्षित, बाळकृष्ण बुरकुले, बाबू नवेदकर, बापू दशपुत्रे बन्सी पहिलवान (पारसी) बालाजी काळे, बनाजी भ. भि. मन भाऊराव चव्हाण, भय्या, भोळे, मोहन मास्तर, महमद, मुरलीधर घुलेकर, मुरलीधर जो. म. बाबाराव जाधव, मोहन सेनभक्त, मकबूल महाबळ, मकाजी महादेव आप्पाजी, मोरे, मठाणे, यशवंत राघो, राघुभाऊ रंगोपंत कुलकर्णी राम मोजीर रामभाऊ कुलकर्णी, रा. श. दीक्षित, रामाजी छत्रे, राजा वेळे राम भाटे, रा. श्य. कामेकर, रंगनाथ, रामचंद्र पहिलवान, राम पारधे, रामभाऊ मोकळ, रामभाऊ पट-वर्धन, रतन रमेश चांदवडकर, लक्ष्मणराव ठाकरे, वामनराव भुसार, वामनराव नवात्रे, वामन भट दातेकर, विष्णु वैद्य, भावे, विठ्ठल मनमाड, शंकरराव फाटक, शंकरगीर गोसावी, शंकरराव निकम, शंकर पहिलवान, शंकरराव पारासरे, शंकरराव काळे, शंकरराव भोईर, शंकर अण्णा पवळी शामराव आव्हेकर, शिवराम धनगर, शिवाजी, शिवा काळे, श्रीधरपंत पुरोहित, श्रीधरपंत जोशी, शेळके, संतू टिळे, सोनू भट, सखारामपंत शुक्ल, सीताराम दीक्षित, सतूजी शिंदे, सखाराम वस्ताद काळे, सोनूजी कुलकर्णी, सखाराम गुनाळ, सादिक वस्ताद, सहादू भाऊ कलाल, सदाशिव, हरिभाऊ आव्हेकर, हरिभाऊ लोणारी—आदि असंख्य पहिलवान त्या त्या वेळी गाजलेले होते. प्रत्येकाचा डाव बहुधा ठरलेला असे त्याने रमोरच्या गडी सापडला की त्याला चित-पट होण्याशिवाय गत्यंतर नसे. नाशकातील तालमीतील कलगी व तुरा हे दोन गट शिवाय तिसरा गट असे तीन गट प्रसिद्ध आहेत. तथापि सन १९५० सालापासून नाशकातील सर्व तालमींना मिळून एक तालीम संघ असावा याकरिता प्रयत्न करण्यात आले त्याकरिता श्री. मदुभाऊ भोरे, पंडितराव थोरस्ते, काळे, राय, उदयप्रभू, डॉ. गोगटे आदि मंडळी प्रयत्न करीत आहेत. म. रा. कुस्तीगीर परिषदेने योग्य ते प्रोत्साहन दिल्यामुळे नाशिकमधील कुस्ती शौक वाढल्या पुढील वाढेल यात शंका वाटत नाही.

नाशकात मदनांच्या कुस्तीत अनेक होत असतात व आजीव होतात पडेल पहिलवानाला जोड न देण्याची प्रथा पूर्वी कधी काळी असली तरी आज ती प्रथा नाही. इनाम वाटण्यात जिंकणाराला दहा आणे व पडणाराला सहा अशी विभागणी होत असे. बरोबरीच्या हंगाम्यात जिंकणाराला पूर्ण रक्कम देण्यात येत असे. पूर्वी सर्वसामान्य नियम असत पण हल्ली अ. भा. कुस्तीगीर परिषदेच्या नियमाने कुस्त्या खेळल्या जातात. सर्व कुस्त्या रजवाडे पद्धतीनेच खेळल्या जातात की स्टाईलचा प्रकार नाशकात नाही.

जागतिक स्पर्धेत नाशिकच्या कुस्तीगीरांना भाग घेतां यावा याकरिता श्री. वामनराव चंद्रात्रे यांनीं गादीवर कुस्ती शिकविण्याकरिता नाशकात शिबिरें घेऊन अभिनव उपक्रम केला होता.

मल्लखांब : नाशकांत कुस्तीच्या या उपांगाची उपासना करणारी अनेक मंडळी होती आज तेवढ्या प्रमाणात ती दिसत नाहीत. प्रतिपक्षाच्या तालमीत जाऊन कुस्तीत जिंकून त्या तालमीतील मल्लखांब घेऊन येण्याची प्रथा असे. विजयाचे ते दर्शक मानलें जाई. मल्लखांबांत नांव घेण्यासारखी मंडळी पुढीलप्रमाणे आढळण्यात आली—सर्वश्री. दाजीसाहेब गायधनी, विष्णुशास्त्री केळकर, भानोसे, रंगोपंत कुलकर्णी, मामा देशपांडे, पारनाईक (प्रि. पी. टी. सी.), राधाकृष्ण भोसेकर, रामभाऊ, भाऊराव जालिहाळकर, डॉ. केळकर, शंकरराव निकम, विनायक केतकर, पचधारी मास्तर, विष्णुपंत खरे इत्यादि.

आट्यापाट्या : हा खेळ सध्या लुप्तप्राय झाला आहे. तथापि पूर्वी नाशकात हा खेळ मोठ्या प्रमाणांत खेळला जाई पट्टीच्या खेळणारांत पुढील नांवांचा प्रामुख्याने अंतर्भाव करतां येईल.: सर्वश्री केशवराव वैद्य, विश्वनाथ परांजपे, त्र्यंबक देशपांडे, कृष्णा फडकर, महादेव आबाजी, महाबळ गुरुजी, ल. पां. सोमण, र. कृ. यार्दी, आंबेकर, ग. द. वैशंपायन, चिंतामण भडकमकर, भय्या लेले, अण्णा सहस्त्रबुद्धे, काका पटवर्धन, शंकर अभ्यंकर, केशव दाते, विष्णु दाते, शेळके, रावसाहेब जोशी, विष्णु खरे, प्रभाकर महाबळ इत्यादि.

हुतुतू : या खेळाचे सामने नाशिकमध्यें अधिकांत अधिक होतात. पोरांपासून थोरापर्यंत या खेळाने वेड निर्माण केले आहे. एवढे कीं यामुळे बाकीच्या खेळांचे अस्तित्वहि नाहीसे होण्याची वेळ आली आहे. नाशिक हुतूतूचे सामने खेळले तरी शेकडावारी गर्दी येतात. नाशिकमध्यें या खेळाचे पंचहि पुष्कळ तयार झालेले आहेत अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण मंडळानें बऱ्याच वर्षांपासून नाशिकमध्यें पंचपरीक्षा केंद्रें सुरू केलीं आहेत व दरसाल ह्या परीक्षांना विद्यार्थी बसतात. सन १९४७ साली झालेल्या परीक्षेत नाशिकमधून हुतुतूकरितां बसलेल्या पंचपरीक्षांत डॉ. वि. म. गोगटे हे अखिल महाराष्ट्रात पहिले आले होते. हुतुतू या खेळांत कालमान परिस्थितीप्रमाणे लहानसहान बदल होत आहेत व परिणामतः हुतुतूप्रमाणेंच कबड्डीचे सामनेहि होऊं लागले आहेत. नाशकांत अखिल महाराष्ट्रांतील हुतुतूचे संघ येऊन खेळून गेले आहेत. उत्तम क्रीडांगणाची सोय झाली तर नाशिकमधून अनेक होनहार खेळाडूंस उत्तेजन मिळेल.

त्या खेळाच्या नियमाचें स्वरूप बदलत चालले आहे. पूर्वी दम घालतांना हुतुतु हेलमेल मारिन बुक्का पाडिन तेल—हिंदुस्तान बडे मैदान—भिडू मेला भिडूचें रगत—तुझा मी भगत—असे अनेक वाक्प्रचार आढळत. ते जाऊन आतां हुतुतू असा आवाज सक्तीनें काढावयाचा नियम झाला आहे. या खेळाचें अल्पपरिवर्तन होऊन कबड्डी हा आंतर्देशीय खेळ होऊ घातला आहे. नाशिकमध्ये आज हे दोन्ही खेळ खेळले जातात.

खो खो : हुतुतूच्या वाढत्या जोराबरोबरच खो खो हा खेळ कमी होत चालला आहे व आट्यापाट्या हा खेळ तर नामशेषच झाला आहे. तथापि एक काळ असा होता कीं हे तिन्ही खेळ सारख्याच प्रमाणांत खेळले जायचे. कारणें कांहींहि असत तरी नाशिकमधील हा खेळ आज लुप्तप्राय झाला आहे. सात मिनिटाच्या डावांतहि ६ मिनिटपर्यंत पाठलाग चुकवून तग धरणारे अनेक खेळाडू यात निर्माण झाले आहेत. गेली बरीच वर्षे श्री. वीरकर, श्री. प्रभाकर वैशंपायन, श्री. गो. ना. भट ही खेळाडू मंडळी पुनः काम करीत आहेत. रावसाहेब जोशी, नानु देशपांडे आदि

जुन्या खेळाडूनीं या खेळाचा दर्जा गुप्त उंचवला होता.

फरिगदागा लाठी, लकडी, दांडपट्टा वगैरे — हे संरक्षणक्षमता व आक्रमणवृत्ती निर्माण करणारे खेळ नासकांत अनेक तालमींतून खेळले जात होते. युद्धाची रीति बदलली असली तरी दैनदिन जीवनात याचा नितान्त उपयोग आहे या खेळात कै. प्रभाकर महाबळ, केशवराव देशपांडे, तरुण ऐक्याचे श्री नाथ, वामनराव चद्रात्रे, वासुदेव चद्रात्रे, जमनादास परदेशी यांनी प्रभुत्व मिळविले होते. पंचवटीतील काही तालमींतून अद्यापहि दांडपट्टा वगैरे खेळणारे तुरळक खेळाडू राहिले आहेत. बाबुराव भोसेकर, रामभाऊ [illegible], शांताराम गांगटे यानीहि या खेळांत आपले नांव अजरामर केले. विटीदांडू खेळ गल्लीगल्लींत खेळला जात होता व अद्यापहि खेळला जातो आहे.तथापि सामने स्वरुपात तो १९५२-५३-५४ सालीं अखिल महाराष्ट्र शारीरिक शिक्षण-मंडळाच्या नियमानें वल्लो व्हॉलीबॉल क्लबने पुढाकार घेऊन जनतेपुढें आणला.

धांवणें, चालणें, पोहोणें — आपल्या नासिक शहरांत धांवण्याच्या लहान सहान शर्यती अनेक वेळां होतात. धांवण्याच्या शर्यतीना प्रोत्साहन मिळण्याच्या दृष्टीनें ट्रॅक् नाही. तो कायम स्वरुपाचा असल्यास नासिकमध्यें येणारा आदि-वासी वर्ग हा निश्चितपणें नासिकचें नाव जगात काढील. नासिकमध्यें कांही वर्षापूर्वी २६ मैल मीटर्सची मॅरॅथॉन शर्यत झाली होती व तीत श्री. यादीं (धुळे), श्री. के. देशपांडे व श्री. शिपरु कृष्णा वैरे या गृहस्थांनीं भाग घेतला होता. आज नासिकमध्यें केवळ हेड क्वार्टर्सचाच ट्रॅक् आहे. तथापि अन्यत्रहि तयार ट्रॅकस् पाहिजे आहेत. यामुळे धावण्याच्या शर्यतींना प्रोत्साहन मिळू शकेल.

चालणें— चालण्याच्या शर्यती या आंतर-राष्ट्रीय स्पर्धेचा विषय आहे. नासिकच्या एक नागरिक श्री अरविंद वैद्य यांनी एक जागतिक रेकार्ड मोडल्याची माहिती मिळते. त्यांनी ४॥ वर्षात ९० हजार मैलांचा प्रवास भारतभर केला याशिवाय सतत ५७ तास ३७ मिनिटे अविश्रान्त चालण्याचा प्रयत्न नॅशनल स्पोर्टस् कौन्सिलच्यामार्फत केला. हा प्रयोग भारतातील तसा एकमेव प्रयत्न होता. (याबाबतीत जागतिक विक्रम ५७ तासांचा आहे व तो कॅप्टन बरकले यांनी केला होता). श्री. वैद्य यांनी १४ दिवस व १३ तासात अर्नाकुलम् ते मुंबई हे १ हजार मैलाचे अंतर तोडले आहे.

पोहोणें— वर पडणाऱ्या धो धो पावसामुळे गोदावरीला सतरवी पूर येऊन ती दुथडी वाहा-यला लागली कीं त्या पुरात उडया टाक-णारी मंडळी नासकांत होती व आजहि आहेत. पण गंगापूर धरणामुळे व वाढत्या लोकसंख्ये-मुळे आणि पुलांमुळे ते दिवस आतां व पुढेहि येतील असे वाटत नाहीं. त्यामुळे आतां तसा पोहोण्याची केवळ स्मृतिच राहिली आहे. सर्वश्री. वामण हलवाई, हरी नाठे, मोहन सेन-भक्त, भडकमकर, साळुंके, बाबुराव भोसेकर, तात्या, प्रभाकर महाबळ, यादीं, देशपांडे, बाबा वैद्य, काळे, सुकेणकर, पायलट गाडगीळ, दळवी आदि जलतरणपटू हे जनतेच्या स्मृतींतून कधींच जाणार नाहींत.

क्रिकेट— जगाच्या भूगोलावर नासिक हे अन्यान्य गोष्टींकरितां प्रसिद्ध असलें तरी जाग-तिक कीर्तीचा सर्वांगीण खेळाडू श्री. बापू नाडकर्णी यांनी नासिकचें नांव जगप्रसिद्ध केलें आहे श्री. नगी कांट्रॅक्टर व श्री. दाणी यांसारख्या खेळाडूबद्दलहि नासिकला अभिमान वाटावा अशीच कीर्ति त्यानीं नासिकला मिळवून दिली आहे.

क्रिकेट हा खेळ भारताचा आहे असे म्हण-ण्यास पुरेशी जागा नाही. सर्वसाधारणपणे तो पारशांच्याबरोबरच भारतात आला असावा [illegible] [illegible] [illegible] [illegible] भारताच्या [illegible] [illegible]. नासिकात [illegible] [illegible]

लब्ध होत आहे त्यावरून डेक्कन कॉलेजमधून आलेले नासिक हायस्कूलचे शिक्षक श्री. गोगटे व श्री. अध्यापक यांनीं या खेळास नासिकमध्यें सुरुवात केली. सन १९२० सालीं श्री. नौरोजी पटेल या वकील महाशयांनीं एक 'पटेल शील्ड' ठेविली. त्याची त्यावेळीं व्यवस्था एन्. एच्. एस्. वाय्. एम्. सी. सी. या संस्थेकडे होती. हल्लीं त्या शील्ड या सामन्यांची व्यवस्था हं. प्रा. ठा. कॉलेजकडे आहे. या टूर्नामेंटस्च्या निमित्तानें पुष्कळ खेळाडू विविध गुणांकरिता चमकून गेले. श्री. बाबुराव मुजुमदार हे हिंदु टीमचे १९२० सालचे कोच. त्यांनीं बरेचसे खेळाडू नाशकांत तयार केले. एकंदर त्यावेळच्या प्रथितयश खेळाडूंत सर्वश्री. रवेन, फाऊलर, भाया वदर्स, जाल युरेन, मास्टर, थत्ते, बाबासाहेब चौबळ, रावसाहेब चौबळ, परांजपे, परदेशी, सोलंकी, रामजी, रिचर्ड, बापूसाहेब काळमेकर, नानासाहेब अभ्यंकर, बाबा वैद्य, पट्टीचे खेळणारे जिभाऊ जाधव, मधु कुंभळे, राजा शेळके, नानासाहेब चांदवडकर, दत्तोपंत पुरोहित, के. के. काळे, ल. पां. सोमण, शेटचे वकील, अण्णा शेळके, वावरे, डोळे, बाबु थोरात, डास वकील, सावंत (D. S. P.). बॅरिस्टर डोंगरे, नारायण देवकर, मोहोनी बंधु, पांडोबा भोसले, मेद. दिनु वर्टी, बर्वे, भागवत, वरखेडकर, माळे, गवळी, केकाण, सुकेणकर, एम्. एस्. जाधव, प्रधान, कोहोक, फडतरे, बाळासाहेब खर, मेजर गडकरी, अरविंद कर्णिक, मोनटक्के, मानपुते, जयंत सपट, महाडिक, शिरूपाल, अण्णा आठवले, बाळ पंडित, प्रभाकर शेळके, कमरुद्दीन, मुस्ताक अन्वर, दिनु शेळके व बाळ डोंगरे आदि जुन्या व नव्या खेळाडूंनी नासिकची व महाराष्ट्रातील क्रिकेट क्रीडांगणें आपल्या कौशल्यानें अनेक वेळां गाजविली आहेत.

श्रीमंत बाबासाहेब चांदवडकर, नानासाहेब चांदवडकर व सरदार विंचूरकर तसेंच रा. ब. प्रधान व पाडे यांनींहि या खेळाच्या उत्तेजनार्थ्या हाती ठेवून व इतरहि प्रकारें नागरिक पाठबळ दिलें होतें.

प्रथम प्रथम हा खेळ केवळ टोलेबाजी म्हणून खेळला जाई. तथापि श्री. नानासाहेब अभ्यंकर व श्री. बाबुराव मुजुमदार या जोडीनें अव्वल दर्जाचा खेळ खेळण्याची हातोटी व गोडी निर्माण केली. सन १९३९ पर्यंत हा खेळ नासिकमध्यें मनमुरादपणें खेळला जात असे. परंतु दुसऱ्या महायुद्धास सुरुवात झाली व लोकांच्या आवडीचें क्रीडांगण ब्रिटीशांच्या मिलिटरीच्या गाड्यांचा तळ बनला ! आणि, सुमारे या कालापासून म्हणजे सन १९४३ च्या सुमारापासून नासिकच्या क्रिकेटला ओहोटीच लागली. तथापि सन १९५५ साली चीफ ऑफ सुरगाणा यांच्या व त्यांच्या सहकाऱ्यांच्या पुढाकारामुळें नासिक डिस्ट्रिक्ट क्रिकेट असोसिएशन स्थापन झाली. या मंडळींच्या पुढाकारानें सन १९५८ साली प्रथमतः पोलीस परेड ग्राऊंडवर बडोदा विरुद्ध महाराष्ट्र हा सामना झाला. पुढें १९६० लाहि पुन्हा एक मोठा सामना झाला. इंटर ऑफिसेस्, एल्. आय्. सी. वगैरेंशीहि अनेक वेळां सामने घेतले आहेत.

नासिक क्रीडांगण बंद झाल्यावर दिनांक १।१।५९ला मात्र १६ वर्षांनी नासिकमधील सर्व जुने नवे मिळून ३२ खेळाडू मोठ्या आनंदानें नासिक क्रीडांगणावर क्रिकेट पुन: खेळले. याचें बरेचसे श्रेय नासिक क्रिकेट क्लबला आहे. याच्यामुळें या क्रीडांगणावर पुन्हा क्रिकेट खेळला जाऊं लागला.

आज तरी नासिकला क्रिकेट पूर्णपणानें व उमेदीनें खेळला जाईल असे ग्राऊंड राहिलेलें नाही हें नासिककरांचें दुर्दैवच आहे. क्रीडांगण नाही तर खेळ कोठून ?

व्हॉलीबॉल

क्रिकेटच्या खालोखाल खेळला जाणारा हा खेळ आहे. विशेष असा आढळला की सबंध हिंदुस्थानात नासिकमध्यें प्रथम सन १९३३ सालीं ह्या खेळाच्या सामन्यास वगैरे व्हॉलीबॉल वगैरेने सुरुवात केली ! त्यावेळीं येथे बाहेरच्या टीम्स् नाशकात खेळण्यास येत असत. त्यांनी खेळ हाच

[illegible] श्री. आर्वीकर दुभत्रहून [illegible] खेळण्यास आणित असत श्री. हर्डीकर [illegible] हे त्या वेळचे असे उत्तम खेळाडू होते. श्री. गान् व श्री. नाडे गुरुजी यांनी [illegible] पासून बॅडमिंटन सुरू केले. [illegible] पासिंग गेमला सुरुवात [illegible] त्यावेळी [illegible] वधू, कांबळे, दीक्षित, वैशंपायन [illegible] चुंबळे, [illegible] कुलकर्णी व प्रधान आदि मंडळी खेळत [illegible] सन १९५४ ते ६० पर्यंत बॅडमिंटन [illegible] उत्साहानें होत असत. पण गेल्या [illegible] मात्र तो उत्साह ओसरला आहे! त्यावेळी [illegible] जवळ जवळ ५० [illegible] नवीन खेळाडूंत सर्वश्री पुणतांबेकर, [illegible] कुलकर्णी, [illegible] आपटुरे, [illegible] शिंदे, थामणकर, [illegible] वगैरे व धीमुरकर [illegible] भावे व भिका पाटील [illegible] खेळाडूंचा उल्लेख करावा लागेल. [illegible] परिणाम म्हणून बॅडमिंटनची [illegible] होती तेव्हां [illegible] श्री. प्रधान [illegible] आपटे यांनी त्यावेळी बरीच मेहनत घेतली होती.

टेनिस -- क्रिकेटप्रमाणेच टेनिस हा खेळ अधिक [illegible] नाशिकला तो खेळही हाताळला [illegible] रीतीने. त्यासंबंधीहि थोडा इतिहास आहेच. सन १९२० सालची गोष्ट आहे. [illegible] मनावर एक विशिष्ट परिणाम घडविण्याकरिता [illegible] यांनी [illegible] व परिणामतः भारते [illegible] अनेक नावी स्मारकें झाली. नाशिकच्या [illegible] क्लब (जिमखाना) याचा जन्म [illegible] आहे. यानंतर नाशिककर [illegible] टेनिस खेळ [illegible] व [illegible] हा खेळ खेळला जाऊ [illegible]

[illegible]

[illegible] व प्रसारे प्रमाणे प्रवेश [illegible] सावक म्हणून [illegible] बरीच ह्या खेळ [illegible] पुढेही नव्हे तर अदयही [illegible] फार [illegible] नियंत्रित होते [illegible] ठेवणारासच होते. त्याचवेळी नाशिक [illegible] रावबहादूर देशमुख व श्री. आकुत यांना [illegible] त्याचे महत्त्व [illegible] आलें. परिणामतः राव. गोपाळराव प्रधान व भाऊसाहेब आकुत या स्वतंत्र बाण्याच्या मंडळींनी स्वतः पैसे [illegible] करून असीन धेतली व जॉर्ज क्लब (मित्रविहार) सुरू केला. व तेव्हांपासून म्हणजे सन १९१२ सालापासून या क्रीडांगणावर टेनिस सुरू झाला. साधारण [illegible] ह्या खेळ खेळण्याची संधी मिळाली. आनंदि श्री. बापूराव मुजुमदार यांनी बऱ्याच दर्जाचे प्रेक्षणीय खेळ दिले. या खेळाचे [illegible] व. प्रधान वगैरे मंडळींनी [illegible] नाशिकचे टेनिस खेळाडू म्हणून जी नावे पुढे आली व कळली त्यांत सर्वश्री. बापूसाहेब [illegible], [illegible], शेरीफखान, नानासाहेब [illegible], [illegible] [illegible], [illegible] [illegible] दीक्षित, नानासाहेब चांदवडकर [illegible] जनार्दन [illegible] आदि [illegible] मंडळी आहेत.

आजहि हा खेळ नाशिकमध्ये खेळण्याची ठिकाणे म्हणजे मित्रविहार, जिमखाना, पालिस ट्रेनिंग कॉलेज यांच्या क्रीडांगणाकडे बोट दाखविता येईल.

टेबल टेनिस -- हा खेळ [illegible] सर्वांत [illegible] म्हणता येईल. [illegible] स्थापनेनंतर त्याला सुरुवात झाली. आतां म्हणजे सन १९४८ सालापासून [illegible] नाशिक जिमखाना व मित्रविहार [illegible] त्या खेळाला सुरुवात [illegible] [illegible] सुरू [illegible] म्हणायला [illegible]

[illegible]

सोय झाल्यामुळे साहजिकच खेळाडू वाढले, दर्जा वाढला व स्पर्धाहि वन्याच झाल्या. सर्वश्री प्राध्यापक नाडकर्णी, सुरेश प्रभूर, वसंत आठवले हे खेळाडू नाशिक बाहेरहि चमकले आहेत. याशिवाय बापु नाडकर्णी, पार्कर, अरविंद पंडित, मोहन वर्मा, मनोहर बोडस, राजा कोचरगावकर, बाबा शेलूकर, महेंद्र शहा, अरुण फाळके, अरविंद वैद्य, व सचिन देसाई, सुधा बोडस, मदा बोडस, लता पंडित, श्रोत्रीय, आपटे, विजया वर्टी, पादणकर इत्यादि भगिनीहि आहेत. कुमार विभागात होशी दारूवाला, राजा वर्टी, प्रकाश सोंदणकर, प्रकाश दामले, श्रीकृष्ण शिंदे, रवि बोडस आदि अनेक झांकली माणिकेंहि आहेत.

बॅडमिंटन- नाशकांत बॅडमिंटन हा खेळहि क्रिकेट वगैरे खेळांबरोबरच खेळत होता, तथापि मुंबईचे श्री. टोपीवाले देसाई यांनी या खेळासाठी जिमखान्यात एक हॉल बांधून दिला आणि तेव्हांपासून या खेळास अधिक रंग भरूं लागला. अनेक सामने झाले व त्यात सर्वश्री वन्मीलाल तिवारी, मुळे, जिभाऊ जाधव, टिळे व गोगले तसेच सुधा बोडस व लता पंडित वगैरेंनी एक परम्परा निर्माण केली आहे. जिमखान्याशिवाय नाशकात ऑफिसर्स क्लबमध्येहि एक बॅडमिंटन कोर्ट आहे. नाशिकचे खेळाडू विश्वविद्यालयांतील सामन्यांतूनहि यशस्वी झालेले आहेत.

गोल्फ—नाशिकमध्यें हा खेळ खेळण्याकरता एक प्रसिद्ध क्रीडांगण होतें. वस्तुतः भारतामध्यें हे एक नावाजलेले क्रीडांगण होतें. त्यामुळे येथें गोल्फ बराच खेळला जात असे व सर्वसामान्य जनतेला दुरूनच मात्र हा खेळाचें कौतुक करण्याची संधि लाभत असे एवढेंच! हे क्रीडांगण भारतांत दुसऱ्या दर्जाचे होतें व यावर अनेक पाश्चात्य पाहुणे या खेळाकरतां पावसाळ्यानंतरच्या सुमारास गर्दीच करीत असत. आज ते ग्राऊंड नाममात्र गोल्फ ग्राऊंड राहिलें आहे!

